अ. वि. गृह प्रकाशन : विद्यापीठ ग्रंथमाला

अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें

[PRINCIPLES OF ECONOMICS]

लेखक

प्रा. व. गो. सहस्रबुद्धे,

एम्.ए., बी.ई.एस्.

एलिफन्स्टन कॉलेज, मुंबई.

★

डिसेंबर] किंमत आठ रुपये [१९५७

अ. वि. गृह प्रकाशन : विद्यापीठ ग्रंथमाला

अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें

[PRINCIPLES OF ECONOMICS]

[आधुनिक आर्थिक विचारांचा मागोवा घेत अर्थशास्त्राच्या मूलतत्त्वांचें सुबोध व साकल्यानें स्पष्टीकरण करणारा मराठींतील पहिलाच ग्रंथ.]

लेखक

प्रा. व. गो. सहस्त्रबुद्धे,

एम्.ए., बी.ई.एस्.

एल्फिन्स्टन कॉलेज, मुंबई.

प्रथमावृत्ति

डिसेंबर] किंमत आठ रुपये [१९५७

: प्रकाशक :
शं. दा. चितळे, एम्.ए., बी.टी.,
अ. वि. गृह प्रकाशनासाठीं,
६२४, सदाशिव पेठ, पुणें २.

★

प्रा. व. गो. सहस्रबुद्धे यांचे अर्थशास्त्रविषयक ग्रंथ

१. **सुलभ अर्थशास्त्र :** (ना. दा. ठा. महिला विद्यापीठांत पाठचपुस्तक म्हणून मंजूर झालेला ग्रंथ.) प्रथमावृत्ति १९४८; द्वितीयावृत्ति १९५४; तृतीयावृत्ति १९५६; चतुर्थावृत्ति १९५७.

२. **अर्थशास्त्राचा विकास :** १९५१ (मुंबई विद्यापीठाचें १९५२ चें तर्खडकर पारितोषिक मिळालेला ग्रंथ).

३. **भारताचें आर्थिक जीवन** : १९५५ (मुंबई विद्यापी ाचें १९५५ चें तर्खडकर पारितोषिक मिळालेला ग्रंथ).

४. **देशोदेशांचा आर्थिक विकास** : जुलै १९५७ (युरोपच्या आर्थिक विकासावरील पहिलाच मराठी ग्रंथ).

५. **अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें** : डिसेंबर १९५७ (आधुनिक अर्थशास्त्राच्या मूलतत्त्वांचें निरूपण करणारा पहिलाच मराठी ग्रंथ.)

६. **अर्थशास्त्र-परिचय**
७. **चलनशास्त्र व चलननीति**
८. **कल्याणकारी राज्याचें अर्थकारण**
: (लौकरच प्रकाशित होतील).

★

: मुद्रक :
ना. वि. पेंडसे, बी.एजी.,
लोकसंग्रह छापखान्यासाठीं,
६२४, सदाशिव पेठ, पुणें २.

लेखकाचें निवेदन

माझा 'सुलभ अर्थशास्त्र' हा अर्थशास्त्राचा प्राथमिक परिचय करून देणारा ग्रंथ अनाथ विद्यार्थी गृहातर्फे १९४८ मध्यें प्रसिद्ध झाला. हा ग्रंथ प्रसिद्ध झाला तेव्हां विद्यापीठांत मराठी माध्यमाचा प्रवेशहि झाला नव्हता. त्या ग्रंथारंभींच्या माझ्या निवेदनांत मराठी माध्यमाचा मीं पुरस्कार आग्रहानें केला होता व मराठी माध्यम लौकरच सुरू होईल अशी अपेक्षा व्यक्त केली होती.

त्यानंतर आज नऊ वर्षांनीं 'अर्थशास्त्राच्या मूलतत्त्वांचा' अधिक वरच्या पातळीवरून परिचय करून देणारा प्रस्तुत ग्रंथ मराठींतूनच वाचकांना मी सादर करीत आहें. मध्यंतरीच्या काळांत मराठी माध्यमाचा विद्यापीठांत प्रवेश तर झालाच आहे; पण तें थेट पदवीपरीक्षेपर्यंत पोंचलें आहे. मराठी माध्यमाचा हा विस्तार ज्ञानार्जन सुलभ होण्याच्या दृष्टीनें इष्ट आहे ह्यांत शंकाच नाहीं. पण तो ज्या पद्धतीनें व ज्या कारणाकरितां होत आहे त्याबद्दल जरा विचारच केला पाहिजे, अशी परिस्थिति आहे. आज मराठी माध्यम विद्यापीठांत येत आहे तें त्या माध्यमाचें महत्त्व पटल्यामुळें नव्हे; तर विद्यार्थ्यांचें इंग्रजीचें ज्ञान कमी झाल्यामुळें येत आहे, ही गोष्ट खटकल्याशिवाय राहात नाहीं. शिवाय मराठी माध्यमाचा विस्तार होत असतां इंग्रजीचें ज्ञान कमी होत जाणें ही घटना इष्ट आहे असें म्हणतां येत नाहीं. इंग्रजीचा संबंध संपूर्णपणें सुटणें ही गोष्ट कोणत्याहि शास्त्राचा भारतांत विकास होण्याच्या दृष्टीनें हितकर नाहीं, हें स्पष्टपणें सांगितलें पाहिजे. विद्यार्थ्यांचा इंग्रजीचा दर्जा कमी न होतां, मराठी माध्यमाचा विस्तार झाला तरच मराठी माध्यम सर्व दृष्टींनीं उपकारक ठरेल. ह्या गोष्टीची जाणीव ठेवून प्रस्तुत ग्रंथांत मुद्दामच मी ठिकठिकाणीं तळटीपांत प्रख्यात अर्थशास्त्रज्ञांच्या इंग्रजी ग्रंथांतील अवतरणें दिलीं आहेत. त्या अवतरणांच्या अनुरोधानें देखील प्रतिपाद्य विषय समजूं शकेल अशा अनुक्रमानें तीं अवतरणें देण्याचा शक्य तेवढा प्रयत्न केला आहे. इंग्रजी मजकुरांत महत्त्वाच्या पण सहज लक्षांत येतील अशा छपाईच्या चुका झाल्या आहेत. त्या बद्दल मी दिलगीर आहें. इंग्रजी अवतरणांची भाषा क्वचित कठिण वाटली तरी ती समजून घेण्याचा विद्यार्थी वाचक कसोशीनें प्रयत्न करतील अशी मला उमेद आहे. तसेंच प्रत्येक प्रकरणाच्या शेवटीं निवडक व प्रमाणभूत इंग्रजी ग्रंथांची जी छोटीशी यादी दिली आहे तीमुळें विद्यार्थ्यांची जिज्ञासा जागृत होईल व यादींतील ग्रंथ मुळांतच वाचण्यास ते प्रवृत्त होतील अशी आशा आहे.

अर्थशास्त्रांतील सर्व आधुनिक विचारप्रवाहांचा मागोवा घेत हा ग्रंथ मीं लिहिला आहे. अलीकडे बाजारपेठांतील समतोल व समस्त अर्थव्यवस्थेचा समतोल, अशी विभागणी करून अर्थशास्त्राच्या मूलतत्त्वांचें निरूपण करण्याची पद्धत रूढ

होत चालली आहे. त्याच पद्धतीचा मीं प्रस्तुत ग्रंथांत अवलंब केला आहे. अर्थशास्त्राचा परिचय करून देण्याच्या दोन पद्धति अलीकडे रूढ होत असल्याचें दिसून येतें. उत्पादन, उपभोग, विभाजन ह्या धोपट मार्गानें जाणें ही त्यांतील पहिली पद्धत होय. राष्ट्रीय उत्पन्न हा केन्द्रबिन्दु करून विविध प्रकारच्या आंकडेवारीच्या आधारें समस्त अर्थव्यवस्थेच्या कारभाराचें वर्णन करणें व अर्थव्यवस्थेंतील प्रवृत्ति-प्रवाहांचें दिग्दर्शन करणें ही दुसरी पद्धत होय. ह्या दोन्ही पद्धतींचा परिचय वाचकांना होईल, अशा पद्धतीनें प्रस्तुत ग्रंथाची रचना केली आहे, हें जाणकारांच्या लक्षांत येईलच. प्रस्तुत ग्रंथांत न आलेल्या विषयांचाहि उल्लेख केला पाहिजे. चलनशास्त्र, आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहार व सरकारचें अर्थव्यवहार हे विषय अर्थशास्त्रांत समाविष्ट होत असले तरी त्यांचा विस्तार आतां खूप झाला असून एक प्रकारें ते स्वतंत्र विषयच झाले आहेत. म्हणून त्यांचा विचार स्वतंत्र ग्रंथांत करण्याचें योजिलें आहे. प्रस्तुत ग्रंथांतील तत्त्वें अप्रगत अर्थव्यवस्थेला किती प्रमाणांत लागू पडतात हाहि अलीकडे विवाद्य विषय झाला आहे. पण ह्या ग्रंथाच्या व्याप्तींत त्याचा समावेश केला नाहीं.

हा ग्रंथ प्रकाशित करण्याचें मान्य केल्याबद्दल व अल्पावधींतच तो वाचकांच्या हातांत देण्याबद्दल अनाथ विद्यार्थी गृहाच्या प्रकाशन-विभागाचे प्रमुख श्री. शं. दा. चितळे व त्यांचा कार्यक्षम सहकारी वर्ग ह्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों. माझे आजपर्यंतचे अर्थशास्त्रविषयक सर्व ग्रंथ अनाथ विद्यार्थी गृहातर्फेंच प्रकाशित झाले आहेत, हें उल्लेखनीय आहे.

'उद्योगधंद्याची शास्त्रशुद्ध पुनर्रचना' हें प्रकरण लिहितांना माझ्या एल्फिन्स्टन कॉलेजमधील सहकारी प्रा. अंबिका भिडे ह्यांनीं लिहिलेल्या एका लेखाची बहुमोल मदत झाली. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. परिभाषेच्या बाबतींत अहमदनगर कॉलेजचे प्रा. श्या. म. कुलकर्णी ह्यांच्या 'अर्थशास्त्र-परिभाषा' ह्या ग्रंथाचा मला बराच उपयोग झाला, हें मी आभारपूर्वक नमूद करतों.

एल्फिन्स्टन कॉलेज, मुंबई
१० डिसेंबर, १९५७

व. गो. सहस्रबुद्धे

अनुक्रमणिका

(कंसांत पृष्ठांक दिले आहेत)

स्वतंत्र बाजारपेठांचा समतोल : प्रवृत्ति व प्रवाह

प्रकरण १ लें : अर्थव्यवस्थेचीं कार्यें--पृष्ठांक १ ते ५.

आर्थिक प्रश्न (१), उत्पादन-विभाजनासंबंधीं निर्णय (१), उत्पादनविषयक निर्णयांची अंमलबजावणी (२), उत्पादन-साधनें बहुविध उपयोगांचीं (२), उत्पादनाचे निर्णय घेण्यांतील अडचणी (३), उत्पादनांत भर टाकण्याची आवश्यकता (४), उत्पादनशक्ति वाढविणें आवश्यक (४).

प्रकरण २ रें : अनियोजित अर्थव्यवस्थेचा कारभार--पृष्ठांक ६ ते १४.

नियोजित व अनियोजित अर्थव्यवस्थेंतील मुख्य फरक (६), उत्पादन व उपभोग-स्वातंत्र्य (६), किमतीचें मार्गदर्शन (७), उपभोगाचा आराखडा किमतीवर अवलंबून (८), खर्चाची विभागणी (९), बचतीचा विनियोग (९), उत्पादन-विषयक निर्णय (९), उत्पन्न वाढविण्याची प्रेरणा (१०), उत्पादन-विषयक निर्णया-मागें नफ्याची प्रेरणा (११), नफा किमतीचा परिणाम (११), विभजन व किमती (१२), उपभोक्त्यांचें सार्वभौमत्व (१२), उपभोक्त्यांचें स्वातंत्र्य मर्यादित (१३).

प्रकरण ३ रें : वस्तुमूल्य-निश्चिति--पृष्ठांक १४ ते ४३.

(अ) **बाजाराचें स्वरूप** (१४), पूर्ण स्पर्धा (१४), वस्तुभेदाचा अभाव (१५), केवळ किमतींना प्राधान्य (१५), पूर्ण स्पर्धेचे परिणाम (१६), अमा . लवचिकता (१६), एकच किंमत (१६), जाहिरातबाजीचा अभाव (१६), मक्तेदारी अथवा एकाधिकार (१७), पूर्ण पर्यायाचा अभाव (१७), पूर्ण मक्तेदारी अपवादात्मक (१८), पूर्ण स्पर्धाहि अपवादात्मकच (१९), अपूर्ण स्पर्धा अपरिहार्य (२०), वस्तूंत गुणभेद असतात (२०), अपूर्ण स्पर्धेचे परिणाम (२३), अपूर्ण स्पर्धेंत अनेक किमती (२४), जाहिरातबाजी (२५), अपूर्ण स्पर्धेचीं लक्षणें (२५), (आ) **वस्तूमूल्य कसें ठरतें ?** (२६), दीर्घकालीन समतोल होण्याच्या अटी (२६), पूर्ण स्पर्धेतील वस्तुमूल्य-निश्चिति (२७), दुसरी अट केव्हां पुरी होते ? (२८), दोन्ही अटी कधीं पुऱ्या होतात ? (२९), सरासरी व सीमान्त खर्चाचा संबंध (३०), तक्ता अ (३०), तक्ता ब (३१), तक्ता क (३१), आकृति क्रमांक २ (३३), आकृति क्रमांक ३ (३३), पूर्ण स्पर्धेतील दीर्घकालीन मूल्य (३४), शुद्ध स्पर्धेतील उत्पादन-प्रमाण (३४), पूर्ण मक्तेदारी व दीर्घकालीन मूल्य (३५), आकृति क्रमांक ४ (३६), मागणी कमीजास्त लवचिक असण्याचे परिणाम (३७), मागणी बिनलवचिक असल्यास, (३७), तक्ता अ (३७), तक्ता ब (३७), मागणी लवचिक असल्यास

(३८), तक्ता अ (३८), तक्ता ब (३८), मक्तेदारींतील मूल्यभेद (३९), भिन्न किमतीची आकारणी कां केली जाते ? (४१), अपूर्ण स्पर्धेतील मूल्य-निश्चिति (४२).

प्रकरण ४ थें : ग्राहकांच्या मागणीची मीमांसा--पृष्ठांक ४४ ते ५५.

मागणीची सनातन मीमांसा (४४), सनातन मीमांसेंतील दोष (४५), मागणीची आधुनिक मीमांसा (४५), समवृत्तीची कल्पना (४६), आकृति क्रमांक ५ (४७), शेजारील आलेखाचें स्पष्टीकरण (४७), एकापेक्षां अधिक समवृत्तीच्या कमानी (४८), आकृति क्रमांक ६ (४८), समवृत्तीच्या कमानी व मागणीचा सिद्धान्त (४९), आकृति क्रमांक ७ (४९), आकृति क्रमांक ८ (४९), उत्पन्न वाढल्यास अगर कमी झाल्यास (५०), किंमत कमी अगर अधिक झाल्यास (५०), आकृति क्रमांक ९ (५१), आकृति क्रमांक १० (५१), मागणीची शाब्दिक मीमांसा (५१), किंमत बदलण्याचा मागणीवर होणारा परिणाम (५२), उत्पन्न कमी-अधिक होण्याचा परिणाम (५४).

प्रकरण ५ वें : उत्पादनखर्च-चिकित्सा--पृष्ठांक ५६ ते ६८.

उत्पादनखर्चाचा अर्थ (५६), उत्पादन-खर्च व उत्पादन-प्रमाण ह्यांचा संबंध (५७), अल्पकालीन व दीर्घकालीन उत्पादनखर्च (५८), अल्पकालीन उत्पादनखर्च (५९), अल्पकालीन उत्पादनखर्चांत फेरफार (५९), अल्पकालीन उत्पादनखर्चांतील फेरफार दर्शविणारा तक्ता (६१), सरासरी खर्चांतील फेरफाराचें आद्य कारण (६२), उत्पादनफल-सिद्धान्ताची मीमांसा (६२), दीर्घकालीन उत्पादनखर्च (६३), दीर्घकालीन उत्पादनखर्चांतील फेरफारांचें स्वरूप (६४), दीर्घकालीन उत्पादन-खर्चांतील फेरफारांच्या विशिष्ट स्वरूपाचा खुलासा (६४), मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे फायदे (६५), विशेषीकरणाचे फायदे (६५), विशेषीकरणाचे फायदे मिळण्याचें आद्य कारण : उत्पादन-घटकांची अविभाज्यता (६६), सरासरी खर्चांत शेवटीं वाढ कां होते ? (६७), पर्याप्त उत्पादन (६८).

प्रकरण ६ वें : पर्याप्त उत्पादन-प्रमाण--पृष्ठांक ६८ ते ९३,

पर्याप्त उत्पादन-प्रमाण म्हणजे काय ? (६८) एकापेक्षां अधिक पर्याप्त-प्रमाणें (६९), उत्पादन-तंत्रदृष्ट्या पर्याप्त उत्पादन-प्रमाण (७०), उत्पादन-प्रक्रियांचें एकत्रीकरण (७१), यांत्रिक उत्पादन (७२), मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणें तंत्रदृष्ट्या हितकर (७४), पर्याप्त व्यवस्थापन-प्रमाण (७५), कार्य-विभागणीचे फायदे (७५), कार्यविभागणीच्या मर्यादा (७६), लहान प्रमाणावरील उत्पादनाचे व्यवस्थापनदृष्ट्या फायदे (७६), तांत्रिक व व्यवस्थापनीय पर्याप्त उत्पादन-प्रमाणांचा मेळ (७८), स्वतंत्र कारभार-केन्द्रें (७८), प्रक्रियांचें विकेन्द्री-करण (७९), पर्याप्त क्रय-विक्रय-प्रमाण (७९), मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्याचे फायदे (८०), मोठ्या प्रमाणावर विक्री (८१), पर्याप्त क्रय-विक्रय-

प्रमाण (८२), पर्याप्त क्रय-विक्रय-प्रमाण व पर्याप्त व्यवस्थापन-प्रमाण ह्यांचा समन्वय (८३), भांडवलदृष्टया पर्याप्त उत्पादन-प्रमाण (८५), संयुक्त भांडवल संस्थांचे फायदे (८५), भांडवल-बाजाराचें महत्त्व (८७), बाजारपेठेंतील आंदोलनें व उत्पादन-प्रमाण (८८), मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचें श्रेष्ठत्व (९१), संयोग व विसंयोग (९२), विसंयोग (९३).

प्रकरण ७ वें : उत्पादन-स्थल-निश्चितीची कारण-मीमांसा——पृ. ९४ ते १०२.

उत्पादन-क्रियेचे तीन विभाग (९४), वाहतूकखर्च (९४), वाहतूक खर्चाबाबतचीं तत्त्वें : अंतर व मार्गाचा खर्चावर परिणाम (९५), वाहतुकीचें साधन व वाहतूक खर्च (९६), वस्तूचें स्वरूप व वाहतुकीचा खर्च (९६), वाहतूक-खर्च व उत्पादन-स्थळाची निवड (९६), कच्च्या मालाकडे आकृष्ट होणाऱ्या वस्तु (९७), बाजार-पेठेकडे आकृष्ट होणारें उत्पादन (९८), वाहतुकीच्या ृष्टीनें मध्यवर्ती स्थळें (९९), संस्करण-खर्च कमी करण्याच्या दृष्टीनें होणारी उत्पादन-स्थळाची निवड (९९), घटकांच्या किंमती असमान (१००), घटकांची उत्पादन-क्षमता सारखी नसते (१००).

प्रकरण ८ वें : उद्योग-धंद्यांची शास्त्रशुद्ध पुनर्रचना——पृष्ठांक १०२ ते १०८

शास्त्रशुद्ध पुनर्रचना (१०२), शास्त्रशुद्ध पुनर्रचनेचें धोरण (१०३), शास्त्रा-धिष्ठित व्यवस्थापन व शास्त्रशुद्ध पुनर्रचना (१०३), शास्त्रशुद्ध पुनर्रचनेंत काय येतें ? : पर्याप्त उत्पादन-प्रमाणाचा स्वीकार (१०४), उत्पादन-क्रियेंतील मूलभूत सुधारणा (१०४), अकार्यक्षम उत्पादन-संस्थांचें उच्चाटन (१०५), उत्पादन-संस्थांचा संयोग (१०५), उत्पादन-संस्थांचा संयोगास विरोध (१०६), शास्त्र-शुद्ध पुनर्रचनेचे फायदे-तोटे (१०६), बेकारीचा संभव (१०७), शास्त्रशुद्ध पुनर्रचनेंतील आणखी कांहीं धोके (१०७), नियोजनाधिष्ठित व नियंत्रित शास्त्रशुद्ध पुनर्रचनेची आवश्यकता (१०८).

प्रकरण ९ वें : मक्तेदारी——पृष्ठांक १०८ ते १२३.

पूर्ण मक्तेदारीच्या अटी (१०८), व्यवहारांत मक्तेदारीचा प्रभाव अधिक (१०९), एक-दोन उत्पादकांचें पुढारीपण (१०९), मर्यादित प्रवेश : कायद्यानें निर्माण केलेल्या अडचणी (११०), आर्थिक स्वरूपाच्या अडचणी (१११), मक्ते-दारीचा अधिकांश होण्याची प्रवृत्ति (११२), अपूर्ण स्पर्धाहि अस्थिरच (११३), अल्पकालीन व कायमची मक्तेदारी (११४), मक्तेदारीची निर्मिति (११५), मक्ते-दारीची इष्टानिष्टता : मक्तेदारी व स्पर्धा ह्यांची तुलना (११६), मक्तेदारींतील औद्योगिक कार्यक्षमता (११७), मक्तेदारी व भांडवल-पुरवठा (१२०), मक्तेदारी व क्रय-विक्रयांतील काटकसर (१२०), वरील विवेचनाचा निष्कर्ष (१२१), रोजगारा-वर अनिष्ट परिणाम (१२२), मक्तेदारी व विभाजन (१२२).

प्रकरण १० वें : कामगारांचें वेतन--पृष्ठांक १२४ ते १४६.

वेतन म्हणजे काय ? (१२४), मागणीची बाजू (१२४), उत्पादन-क्षमतेचें महत्त्व (१२४), मागणीची मर्यादा (१२६), वेतनाचा सीमान्त-उत्पादनक्षमता सिद्धान्त (१२७), सीमान्त उत्पादनक्षमतेच्या सिद्धान्तांतील गृहीतें (१२७), वस्तूच्या उत्पादनांतील अपूर्ण स्पर्धेचा परिणाम (१२८), पुरवठ्याच्या बाजूकडील वैगुण्यें (१२९), कामगाराची सौदाशक्ति कमी (१२९), सीमान्त उत्पादकत्वाचा सिद्धान्त वास्तवतेला सोडून (१३०), कार्यक्षमता सारखी असूनहि वेतनांत भेद आढळतो (१३१), गतिसौकर्याचा अभाव व वेतन-भेद (१३३), मनुष्यबळाचा एकंदर पुरवठा (१३३), श्रमप्रमाण (१३६), वेतनमान व काम करण्याची तयारी (१३७), कामगारांची वेतनविषयक अपेक्षा (१३८), सांघिक सौदा (१३९), कामगार-संघटना व वेतनमान (१४०), कामगार-संघटनांच्या मर्यादा (१४२), जीवन-वेतन अंशत: निश्चितपणें करण्याचे परिणाम (१४३), किमान-वेतनाची कायद्यानें निश्चिति (१४४), जीवन-वेतन ठरविणें नेहमींच अनिष्ट असतें काय ? (१४५).

प्रकरण ११ वें : कामगार-प्रश्न--पृष्ठांक १४६ ते १६६.

[१] कामगार-कायदे (१४६), कामगार-कायद्यांची आवश्यकता (१४६), कामगार-वर्गाच्या अगतिकत्वाचा फायदा घेण्याचे प्रकार (१४७), कामगार-कायद्यांचा तपशील (१४८), सामाजिक सुरक्षिततेची कल्पना (१४८), सामाजिक सुरक्षितता कायद्याची व्याप्ति (१४९), [२] कामगार-संघटना (१५१), कामगार-चळवळीचीं उद्दिष्टें व कार्यें (१५१), कामगार-चळवळीच्या विकासांतील विविध अवस्था (१५२), कामगार-चळवळ व राजकारण (१५५). आधुनिक कामगार-चळवळीचीं कार्यें (१५५), [३] औद्योगिक संबंधांचा प्रश्न (१५७), औद्योगिक कलहासंबंधीं आधुनिक सरकारचें धोरण (१५९), सरकारी हस्तक्षेपाच्या विविध पद्धति (१५९), चौकशी (१५९), मध्यस्थी (१५९), लवाद-पद्धति (१३०), सरकारी यंत्रणा (१६०), सरकारी हस्तक्षेपाच्या **विविध पद्धतींचा** तौलनिक विचार (१६१), [४] **पूर्ण रोजगाराचा प्रश्न** पूर्ण रोजगार म्हणजे काय (१६१), खुषीची व नाखुषीची बेकारी (१६१), तात्पुरती व कायमची बेकारी (१६१), तात्पुरत्या बेकारीचे दोन प्रकार (१६२), हंगामी बेकारी (१६३), पूर्ण रोजगाराचें महत्त्व (१६५).

प्रकरण १२ वें : व्याज—पृष्ठांक १६७ ते १८२.

व्याज म्हणजे काय ? (१६७), व्याज कसें ठरतें (१६७), व्याजासंबंधीं सनातन मीमांसा : मागणीची बाजू (१६७), पुरवठ्याची बाजू (१६८), समतोल व्याज (१६९), सनातन मीमांसेची सुधारलेली आवृत्ति (१७०), व्याजाचा व्यवहारी दर व नैसर्गिक दर ह्यांतील भेद (१७१), व्याजाची कीन्सवादी मीमांसा (१७१), कीन्स ह्यांच्या सिद्धान्ताचें स्पष्टीकरण (१७२), रोकड बाळगण्याचे तीन हेतु : [१] व्यवहार हेतु (१७२), [२] दक्षताहेतु (१७२), [३] सट्टेबाजीचा हेतु (१७३), रोकड प्राधान्यें

प्रवृत्ति व व्याजाचा दर ह्यांचा संबंध (१७५), व्याजाचा दर हा चलनविषयक प्रश्न (१७७), व्याजाच्या दरांतील भिन्नतेचा खुलासा (१७७), अल्पकालीन व दीर्घकालीन दर (१७७), देशोदेशांतील व्याजाच्या दरांतील भिन्नता (१७८), प्रादेशिक भिन्नता (१७८), व्याजासंबंधीचे विविध सिद्धान्त मूलतः भिन्न आहेत काय ,(१७८), कीन्स प्रणीत सिद्धान्त मूलग्राही (१७९), व्याजाच्या दराचें महत्त्व (१८०), स्वस्त चलनी भांडवलाचें धोरण (१८१).

प्रकरण १३ वें : खंड--पृष्ठांक १८३ ते १९२.

खंडाची एक व्याख्या (१८२), रिकार्डोची खंडाची मीमांसा (१८३), अधिक स्पष्टीकरण (१८४), रिकार्डोच्या मीमांसेचा सारांश (१८६), आधुनिक मीमांसा (१८६), उत्पादन-साधनांच्या पुरवठा-मूल्याची आधुनिक मीमांसा (१८७), उत्पादन-खर्चाचा आधुनिक अर्थ (१८८), खंड ह्या शब्दप्रयोगाचा नवा अर्थ (१९०), आधुनिक अर्थानें खंडाचा उद्भव होण्याचीं कारणें (१९०).

प्रकरण १४ वें : नफा—पृष्ठांक १९२ ते २००.

पूर्ण स्पर्धेत दीर्घकाळांत नफा नाहीं [१९३), नफा उद्भवण्याचीं कारणें (११३), मक्तेदारीनिर्मित नफा (१९३), अर्थव्यवस्था गतिमान असल्यामुळें उद्भवणारा नफा (१९४), अल्पकालीन नफ्यास कारणीभूत होणाऱ्या गोष्टी (१९४), मागणीच्या बाजूचे बदल (१९५), पुरवठ्याच्या बाजूचे बदल (१९६), नफ्यास कारणीभूत होणाऱ्या दोन्ही प्रवाहांचें निकटचें साहचर्य (१९६), नफा व इतर उत्पन्नें (१९७), नफा हा कशाचा मोबदला ? (१९८), खरा प्रश्न आर्थिक विषमतेचा (१९९).

समस्त अर्थव्यवस्थेचा समतोल : प्रवृत्ति व प्रवाह

प्रकरण १५ वें : राष्ट्रीय उत्पन्न--पृष्ठांक २०३ ते २१७.

राष्ट्रीय उत्पन्न (२०३), आयात-निर्यातीचें राष्ट्रीय उत्पन्नांतील स्थान (२०३), अंतर्गत उत्पत्तीचें मापन (२०४), उत्पन्नाच्या मोजणींतील वजाबाकी (२०५), उत्पादनाच्या हिशेबांत समाविष्ट न होणारें उत्पादन (२०६), राष्ट्रीय उत्पन्नाचा उगम (२०६), सरकारचें अर्थव्यवस्थेंतील स्थान (२०७), खाजगी उत्पादनाची व्यवसाय-उद्योगवार विभागणी (२०७), दोन नमुने (२०८), राष्ट्रीय उत्पन्न : उगमाच्या अनुरोधानें (२०८), राष्ट्रीय उत्पादनाचा विनियोग (२०८), उपभोक्त्यांची खरेदी (२०८), सरकारची खरेदी (२०८), व्यापारी सांठ्यांत वाढ (२०९), भांडवली साधनांत वाढ (२०९), उपभोगवस्तु व भांडवलवस्तु (२०९), राष्ट्रीय उत्पन्न ही घटक-मालकांच्या उत्पन्नाची बेरीज (२११), सरकारी करांचें राष्ट्रीय उत्पन्नांतील स्थान (२१२), विविध उत्पन्न-प्रकार (२१२), श्रमजन्य उत्पन्न व मालमत्ताजन्य उत्पन्न (२१३), मालमत्तेपासून मिळणारें उत्पन्न (२१३), उत्पन्न-प्रकारांचें वर्गीकरण (२१४), [अ] व्यक्तिगत

उत्पन्न (२१४), [ब] संस्थागत उत्पन्न (२१५), [क] सरकारचें महसुली उत्पन्न (२१५), [ड] परराष्ट्रीय व्यवहारापासून मिळणारें उत्पन्न (२१५), राष्ट्रीय खर्च (२१५), खर्चाची विभागणी (२१६), एकच गोष्ट मोजण्याच्या तीन पद्धति (२१६), अर्थव्यवस्थेचे विभाग (२१७).

प्रकरण १६ वें : राष्ट्रीय उत्पन्नाचें विभाजन--पृष्ठांक २१८ ते २२५.

विभाजन (२१८), विभाजनांतील विषमता (२१८), कामगार व भांडवलदार (२१९), विभाजनांतील विषमता (२१९), आर्थिक विषमतेचीं कारणें : [१] खाजगी मालमत्ता (२२०), समान संधीचा अभाव (२२१), वैयक्तिक गुणवत्तेंतील फरक (२२२), आर्थिक विषमतेच्या कारणांचा तौलनिक विचार (२२५),

प्रकरण १७ वें : राष्ट्रीय उत्पन्नाचे निर्माते व भागीदार

पृष्ठांक--२२६ ते २३८.

लोकसंख्येच्या प्रश्नाचें महत्त्व (२२६), उत्पादन व लोकसंख्या ह्यांचा संबंध (२२६), माल्थसच्या सिद्धान्ताचा सारांश (२२७), माल्थसच्या सिद्धान्तांतील कच्चे दुवे (२२८), पुरावा (२२९), माल्थसच्या सिद्धान्तांतील कच्चेपणा (२२९), पर्याप्त लोकसंख्येची कल्पना (२३०), पर्याप्त लोकसंख्येची कल्पना व्यवहारांत वापरणें कठिण (२३२), लोकसंख्या विषयक मापनीय प्रवृत्तीचा अभ्यास आवश्यक (२३३), उत्पादनवाढ व लोकसंख्यावाढ ह्यांची तुलना महत्त्वाची (२३३), लोकसंख्येंतील वाढीचें मापन करण्याचीं साधनें (२३४), प्रजोत्पादन प्रमाण (२३४), कर्त्या लोकसंख्येचें प्रमाण (२३५), मानवी जीवनाचा अपव्यय (२३६), कार्यक्षमता (२३६), प्रगत व अप्रगत देशांतील फरक (२३७).

प्रकरण १८ वें : समस्त अर्थव्यवस्थेचा समतोल—पृष्ठांक २३८ ते २५१.

राष्ट्रीय उत्पन्न = खाजगी + सरकारी उत्पन्न (२३८), उपभोग खर्च व बचत (२३८), भांडवल-गुंतवण (२३९), भांडवल-गुंतवणासाठीं क्रयशक्तीची उपलब्धता (२३९), एकंदर खर्च व एकंदर उत्पन्न (२४०), शिल्लक व भांडवल-गुंतवण ह्यांची समानता (२४०), बचत व भांडवलगुंतवण ह्या राशी समान कशा होतात ? (२४३), योजलेली भांडवल-गुंतवण योजलेल्या शिलकीपेक्षां कमी असल्यास (२४३), योजलेली भांडवल-गुंतवण योजलेल्या शिलकीपेक्षां अधिक असल्यास (२४३), समतोलाची महत्त्वाची अट (२४४), अपूर्ण रोजगाराचा समतोल (२४५), कीन्सपूर्व अर्थशास्त्रावर सेच्या बाजाराच्या सिद्धान्ताचा पगडा (२४५), सेचा बाजाराचा सिद्धान्त (२४५), पूर्ण रोजगाराचा अभावहि असंभवनीय (२४७), अपूर्ण रोजगाराच्या समतोलाची कीन्सकृत मीमांसा (२४८), (१) समस्त रोजगार समस्त खर्चावर अवलंबून (२४८), (२) भांडवल-गुंतवणांत सतत वाढ

होणें आवश्यक (२४९), (३) भांडवल-गुंतवण सतत वाढणें कठिण (२४९), (४) पूर्ण रोजगार टिकणें कठीण (२५०), (५) वेतन व समस्त रोजगार ह्यांच्यांतील संबंधाचें स्वरूप (२५०).

प्रकरण १९ वें : अनियोजित, नियंत्रित व नियोजित अर्थव्यवस्था-- पृष्ठांक २५१ ते २५९

अनियोजित अर्थव्यवस्थेंतील पांच अनिष्ट प्रवृत्ति (२५१), अपूर्ण रोजगारीची प्रवृत्ति सर्वांत अनिष्ट (२५२), निर्हस्तक्षेपाची नीति (२५२), जुन्या अर्थशास्त्रांत मानवी कल्याणाला प्राधान्य (२५३), निर्हस्तक्षेप-नीति त्याज्य (२५४), नियंत्रित अर्थव्यवस्थेचा पुरस्कार (२५४), कार्यप्रवण आर्थिक नीतीची व्याप्ति (२५५), आर्थिक नियोजन (२५६), आर्थिक नियोजनाच्या विविध व्याख्या (२५७).

प्रकरण २० वें : अर्थशास्त्र : व्याख्या, स्वरूप, व्याप्ति, कार्यें व उपयुक्तता-- पृष्ठांक २५९ ते २७२

प्रा. रॉबिन्स ह्यांची व्याख्या व भूमिका (२६०), रॉबिन्स ह्यांच्या व्याख्येंतील आशयाचा विस्तार (२६१), (१) मूर्तवस्तूपुरती अर्थशास्त्राची व्याप्ति संकुचित करणें चुकीचें (२६१), (२) अर्थशास्त्राचा विषय मानवी जीवनाचा एक भाग नसून त्याची एक बाजू आहे (२६१), (३) अर्थशास्त्राची अतिविस्तृत व्याप्ति (४) कल्याण-विचार अर्थशास्त्रांत अप्रस्तुत (२६३), (५) कल्याण-विचाराला स्थान दिल्यास अर्थशास्त्राचें शास्त्रीयत्व नष्ट होईल (२६३), (६) अर्थशास्त्राच्या सिद्धान्ताचें स्वरूप (२६६), (७) अर्थशास्त्राची उपयुक्तता (२६७), अर्थशास्त्राच्या उपयुक्ततेच्या मर्यादा (२६८), कल्याणाचें अर्थशास्त्र (२६८), कल्याणाच्या अर्थशास्त्राची रूपरेखा (२६९), उत्पादन-रोजगारांत वाढ इष्ट (२७०), आर्थिक समता इष्ट (२७०), व्यक्तींच्या मूलभूत प्रवृत्ति एकसारख्या (२७१), कल्याणाच्या अर्थशास्त्राच्या मर्यादा (२७१).

महत्त्वाचे पारिभाषिक शब्द -- पृष्ठांक २७३-२७८

REFERENCE BOOKS

(1) S. Aaronovitch—Monopoly–A study of British Capitalism.
(2) Arrow—Social Choice and Individual Values.
(3) American Economic Association–Studies in the Theory of Income and Distribution.
(4) Bain—Pricing, Distribution and Employment.
(5) Belshaw—Population Growth and Levels of Consumption.
(6) Bowen—Population.
(7) Burns—The Decline of Competition.
(8) Central Statistical Office—National Income Statistics.
(9) Cochrene and Bell—The Economics of Consumption.
(10) Dasgupta—The Conception of Surplus in Theoretical Economics.
(11) Dobb—Inequality of Incomes.
(12) Flenders and Clegg—Industrial Relations in Great Britain.
(13) Hansen—Monetary Theory and Fiscal Policy.
(14) Hayek—Collectivist Economic Planning.
(15) (16) Hicks— (A) Value and Capital. (B) Theory of Wages.
(17) Harris—The New Economics.
(18) Hoover—Location of Industrial Activity.
(19) International Labour Organisation—Approaches to Social Security.
(20) Keynes–General Theory of Interest, Employment and Money.
(21) Knight—Risk, Uncertainty and Profit.
(22) Kurihara—Monetary Theory and Public Policy.
(23) Lerner—Economics of Employment.
(24) Lester—Labour Problems.
(25) Little—Critique of Welfare Economics.
(26) Meade—Economic Theory and Policy.
(27) Myint—Theories of Welfare Economics.
(28) P. E. P.—World Population and Resources.
(29) (30) Robbins— (A) Theory of Economic Policy. (B) The Nature and Significance of Economics.
(31) Robertson—Essays in Monetary Theory.
(32) (33) Robinson E. A. G.— (A) Structure of Competitive Industry. (B) Monopoly.
(34) Mrs. Robinson—Economics of Imperfect Competition.
(35) Shoup—National Income Analysis.
(36) Stigler—Theory of Price.
(37) Wootan—Freedom Under Planning.
(38) Wright—Population.
(39) Zweig—Planning of Free Societies.

स्वतंत्र बाजारपेठांचा समतोल :
प्रवृत्ति व प्रवाह

अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें

: १ : अर्थव्यवस्थेचीं कार्यें

आर्थिक प्रश्न :—मनुष्याच्या गरजा (Wants) अमर्यादित असतात; पण त्या गरजा भागविण्याचीं साधनें (Means) मात्र मर्यादित असतात. ह्या परिस्थितींतून जी समस्या निर्माण होते तिला आर्थिक समस्या अगर आर्थिक प्रश्न (Economic Problem) म्हणतात.[1]

आर्थिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणें हें अर्थव्यवस्थेचें प्रधान कार्य आहे. अर्थव्यवस्थेचें स्वरूप कांहींहीं असो, तिला कांहीं मूलभूत प्रश्न सोडवावेच लागतात. ते सोडविणें हें अर्थव्यवस्थेचें साध्य असतें असें म्हणतां येईल.[२]

ह्या प्रधान कार्यांतून इतर अनेक कार्यें उद्‌भवतात. तीं कोणतीं व प्रधान कार्यांतून तीं कशीं उद्‌भवतात, ह्याचा विस्तारानें विचार केल्यास अर्थव्यवस्थे-पासून नेमकें काय अपेक्षित असतें ह्याचा बोध होतो.

उत्पादन विभाजनासंबंधीं निर्णय :—मनुष्याच्या गरजा साधनांच्या मानानें अमर्यादित असतात. ह्याचा निश्चित अर्थ असा सांगतां येईल कीं, सर्वांच्या सर्व गरजा संपूर्णपणें कधींच भागवतां येणार नाहींत. गरजा भागविण्याची शक्ति असलेल्या उपभोग्य वस्तु व उपभोग्य श्रम (Services) ह्यांचें उत्पादन अर्थव्यवस्थेंत होत असतें; पण सर्वांच्या सर्व गरजा संपूर्णपणें भागतील एवढें उत्पादन करणें गरजांच्या अमर्यादितपणामुळें व साधनें मर्यादित असल्यामुळें केव्हांच शक्य नसतें. अशा परिस्थितींत कोणत्या वस्तूंचें उत्पादन किती प्रमाणांत केलें जावें, ह्याचा निर्णय उत्पादन सुरू होण्यापूर्वीं घेतला जाणें आवश्यक असतें. हा निर्णय घेणें म्हणजेच अनेक गरजांपैकीं विशिष्ट गरजा निवडणें आणि प्रत्येक गरज किती प्रमाणांत भागवावयाची हें ठरविणें हें अर्थव्यवस्थेचें पहिलें कार्य म्हणतां येईल. निराळ्या शब्दांत उपभोग्य वस्तु व उपभोग्य श्रम ह्यांचें उत्पादन करून केलेल्या उत्पादनाचें व्यक्तिमात्रांत विभाजन करण्याची कामगिरी अर्थव्यवस्थेला करावी लागते. कोणत्या वस्तूंचें उत्पादन करावें, हें जेव्हां अर्थव्यवस्थेकडून ठरविलें

---

[1]The economic problem arises as soon as different purposes compete for available resources.

[२]Economies of all nations or social groups must solve the same basic or central problems. In this sense, economic systems have purpose.

जातें तेव्हां उत्पादनविषयक निर्णय घेण्याची कामगिरी अर्थव्यवस्थेकडून पार पाडली जाते. प्रत्येक वस्तूंचें उत्पादन किती व्हावें ह्याचा निर्णय जेव्हां अर्थव्यवस्थेकडून घेतला जातो तेव्हां झालेल्या उत्पादनाचा फायदा कोणास मिळावा किंवा उत्पादनाचें विभजन कसें व्हावे, हेंच अर्थव्यवस्था (Economic System) ठरवीत असते.

उत्पादनविषयक निर्णयांची अंमलबजावणी :—उत्पादनासंबंधीचे निर्णय घेणें, हें पहिलें कार्य केल्यानंतर घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणें प्राप्त ठरतें. उत्पादनविषयक निर्णयांची अंमलबजावणी करणें हें अर्थव्यवस्थेचे दुसरें कार्य आहे असें म्हणतां येईल. उत्पादनविषयक निर्णयांची अंमलबजावणी व्हावयाची असल्यास उत्पादन-साधनांचा ओघ ज्या वस्तूंचें उत्पादन करावयाचें ठरलेलें असतें त्या वस्तूंच्या उत्पादनाकडे वळवावा लागतो. उत्पादनसाधनांचा उपयोग ज्या गरजा महत्त्वाच्या ठरतील त्या भागविण्यासाठींच केला जाणें, हा आर्थिक प्रश्न सोडविण्याच्या प्रयत्नांतील अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. गरजा भागविण्याचीं साधनें विपुल असतीं तर साधनांचा थोडाबहुत दुरुपयोग क्षम्य ठरला असता; पण साधनें मर्यादित असल्यानें प्रत्येक साधन त्याच्या उत्पादन-शक्तीच्या प्रमाणांत पुरेपूर राबविलें जाणें व महत्त्वाच्या निवडक गरजाच भागविण्या-साठीं साधनांचा उपयोग केला जाणें अत्यावश्यक आहे. महत्त्वाच्या गरजा कोणत्या, हें अर्थातच अर्थव्यवस्थेला साधनांचा उपयोग करण्यापूर्वीं ठरवावें लागतें. तें ठरविल्या-नंतर वर सांगितल्याप्रमाणें साधनांचा ओघ ठरलेल्या वस्तूंकडे वळवावा लागतो.

उत्पादन साधनें बहुविध उपयोगाची :—साधनांचा वापर विवक्षित वस्तूंच्या उत्पादनासाठींच करणें अर्थव्यवस्थेंत सुदैवानें शक्य होतें. ह्याचें कारण असें सांगतां येईल कीं, गरजा भागविण्याचीं सर्व साधनें, म्हणजेच निसर्ग किंवा भू (Land), मनुष्यबळ (Labour) व भांडवल (Capital) हे उत्पादन घटक (Factors of Production), एककामी नसून बहुकामी असतात. त्यांचा उपयोग विशिष्ट वस्तूच्या उत्पादनाकरितांच केला पाहिजे; नाहींतर त्यांना निकामी पडूं द्यावें लागेल, असें बंधन सहसा नसतें. एखाद्या विशिष्ट कामाशिवाय इतरत्र त्यांचा उपयोग करतां येणारच नाहीं; अशीच त्यांची तांत्रिक रचना असती तर निरुपायच झाला असता; पण सुदैवानें अशी परिस्थिति नसते. प्रत्येक उत्पादन-घटकाचा व उत्पादनघटकाच्या प्रत्येक मापाचा अनेक वस्तूंच्या उत्पादनासाठीं उपयोग करतां येणें शक्य असतें. [३]

उदाहरणार्थ : एखाद्या जमिनीच्या तुकड्याचा उपयोग भातशेतीसाठीं करतां येईल किंवा घरासाठीं करतां येईल किंवा बागेसाठीं करतां येईल किंवा आणखी कशासाठीं करतां येईल. एखाद्या होतकरू तरुणाला डॉक्टर होतां येईल किंवा वकील होतां येईल किंवा आणखी कांहीं होतां येईल. पण ह्या-बाबतींत दोन गोष्टी मात्र लक्षांत ठेवल्या पाहिजेत. पहिली गोष्ट अशी कीं, उत्पादन-

[३] Means of production are capable of alternate uses.

घटक बहुकामी असले तरी त्यांचा उपयोग विविध कामांसाठीं एकाच वेळीं करतां येत नाहीं. त्यामुळें त्यांच्या अनेक उपयोगांपैकीं कोणत्या विशिष्ट उपयोगासाठीं त्यांना राबवावयाचें, ह्याचा निर्णय अर्थव्यवस्थेकडून घेतला जाणें प्राप्त ठरतें. कोणत्या गरजा किती प्रमाणांत भागवावयाच्या, ह्या निर्णयांतच अर्थात् हाहि निर्णय अंतर्भूत आहे. कोणत्या वस्तूंचे किती प्रमाणांत उत्पादन करावयाचें हें एकदां ठरलें म्हणजे उत्पादनघटकांचा उपयोग त्या वस्तूंच्या उत्पादनासाठीं करावयाचा, हें ओघानेंच येतें; पण एखादा निर्णय घेणें वेगळें व त्या निर्णयाची अंमलबजावणी करणें वेगळें. म्हणून अंमलबजावणीचा उल्लेख स्वतंत्रपणें येथें केला आहे.

उत्पादनाचें निर्णय घेण्यांतील अडचणी :--उत्पादनघटकांच्या बाबतींत दुसरी गोष्ट ही कीं, त्यांचा उपयोग विशिष्ट कामासाठीं करावयाचा असा निर्णय एकदा घेतला जाऊन त्याची अंमलबजावणी एकदां सुरू झाली किंवा पुरी झाली म्हणजे इतर कामांसाठीं त्यांचा उपयोग करणें कठिण होऊन बसतें. एखाद्या कामगारानें एखादा व्यवसाय स्वीकारला म्हणजे तो व्यवसाय सोडून दुसरा व्यवसाय स्वीकारणें त्याला अशक्य नसलें तरी बरेंच जड जातें, ह्यांत शंका नाहीं. तसेंच विशिष्ट कामासाठीं म्हणून एखादें यंत्र बनविण्यांत आलें कीं ते यंत्र दुसऱ्या कामासाठीं वापरणें सहजासहजीं शक्य होत नाहीं. एखादा उत्पादनघटक एखाद्या कामासाठीं वापरण्यास सुरवात झाल्यानंतर जसजसा अधिक वेळ जाईल तसतसें तो घटक दुसऱ्या कामासाठीं वापरणें अधिकाधिक कठिण होत जातें. तांत्रिक भाषेंत हीच गोष्ट अशी सांगतां येईल कीं, उत्पादनघटक जेव्हां त्यांच्या प्राथमिक अवस्थेंत असतात तेव्हां त्यांच्यांत गतिसौकर्य (Mobility) भरपूर असते म्हणजे त्यांचा उत्पादनासाठीं उपयोग करण्याच्या बाबतींत अनेक पर्याय असूं शकतात. उदाहरणार्थ : ज्याच्या शिक्षणालाच सुरवात व्हावयाची आहे अशा बालकाला योग्य तें शिक्षण देऊन कोठल्याहि व्यवसायासाठीं तयार करतां येतें. पण त्याच उत्पादन-घटकाचा एखाद्या व्यवसायासाठीं एकदां उपयोग करण्यांत येऊं लागला म्हणजे व्यवसायान्तर करण्यांतील सुलभता किंवा त्या घटकाचें गतिसौकर्य कमी होतें. काळ वाढत जातो तसें गतिसौकर्य अधिक कमी होतें. कारण बदल करण्यांतील अडचणी वाढत जातात. विशिष्ट व्यवसायाचें शिक्षण घेऊन तो व्यवसाय कामगार करूं लागला म्हणजे बदल सुकर नसतो. हीच गोष्ट इतर उत्पादनघटकांनाहि लागू असल्यामुळें असें सर्वसाधारणपणें म्हणतां येईल कीं, उत्पादनघटकांच्या प्राथमिक अवस्थेंत ते घटक बहुकामी असले तरी हें त्यांचें वैशिष्टच कालान्तरानें कमी होतें. ह्यामुळें उत्पादनसाधनांचा उपयोग कशासाठीं करावयाचा, ह्यासंबंधीचे निर्णय अत्यंत काळजीपूर्वक घ्यावे लागतात. एकदां निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी सुरू झाली म्हणजे पूर्वीचे निर्णय बदलण्यांत अपव्ययाचा धोका संभवतो. निर्णय बदलण्याची निकड फारच असली तर हा अपव्यय पत्करावा लागतो. ह्या सर्व वर्णनावरून उत्पादनसाधनांचा उपयोग करण्यासंबंधीचे निर्णय घेणें किती कठिण असतें, ह्याची कल्पना येईल.

उत्पादनांत भर टाकण्याची आवश्यकता :--गरजांच्या मानानें उत्पादनसाधनें मर्यादित असल्यामुळें कोणत्या गरजा किती प्रमाणांत भागवावयाच्या, हें ठरवून इष्ट वस्तूंचें इष्ट प्रमाणांत उत्पादन व्हावें, ह्यासाठीं उत्पादन-साधनांचा ओघ तिकडे वळविण्याचें काम अर्थव्यवस्थेला करावें लागतेंच; पण आर्थिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करावयाचा असेल तर आणखीहि एक महत्त्वाचें कार्य अर्थव्यवस्थेला करावें लागतें. तें म्हणजे उत्पादन-साधनांची उत्पादनशक्ति वाढविण्याचें. उत्पादनसाधनांच्या उत्पादनक्षमतेंत कधींहि वाढ न झाल्यास वाढत्या गरजांना तोंड देण्याचें मानवाला कधींच जमणार नाहीं. वाढत्या गरजा राहोच; पण चालू गरजासुद्धां विशिष्ट प्रमाणांत भागवून स्वस्थ बसणें योग्य नव्हे. त्या गरजासुद्धां जास्तींत जास्त प्रमाणांत भागविण्याचा--म्हणजे चालू गरजांपैकीं जास्तींत जास्त लोकांच्या जास्तींत जास्त गरजा जास्तींत जास्त प्रमाणांत भागविण्याचा--प्रयत्न सतत करणें अतिशय आवश्यक आहे. त्यासाठीं अर्थव्यवस्थेकडून होणारें उत्पादन नेहमीं वाढतें असलें पाहिजे. उत्पादन वाढण्या-साठीं उत्पादनसाधनांची संख्यात्मक वाढ तर व्हावी लागतेच; पण त्याचबरोबरीनें त्यांची उत्पादनशक्तिहि सतत वाढती असावी लागते. उत्पादनसाधनांच्या पुरव-ठ्यांत वाढ करणें नेहमींच मानवाच्या हातांत असतें असें नाहीं. उत्पादनसाधनांचें वर्गीकरण निसर्गदत्त उत्पादनसाधनें व मानवनिर्मित उत्पादनसाधनें असें करतां येतें. पैकीं निसर्गदत्त उत्पादनसाधनें वाढविणें मनुष्याच्या शक्तीपलीकडचें असतें. त्यांचा पुरवठा आहे तोच धरून चालून मनुष्याला आपला संसार उभारावा लागतो. मनुष्यनिर्मित उत्पादनसाधनांत--म्हणजेच भांडवली वस्तूंच्या पुरवठ्यांत--मात्र वाढ करणें मनुष्याला शक्य असतें. भांडवली वस्तंचा पुरवठा सतत वाढता राहील, अशी व्यवस्था करणें हें अर्थव्यवस्थेचें एक महत्त्वाचें कार्य समजलें जातें. होणाऱ्या उत्पादनांतील भांडवल म्हणून किती भाग राखून ठेवावयाचा, हा निर्णय अर्थव्यवस्थेल. घ्यावा लागतो. भांडवल म्हणून किती भाग राखून ठेवावयाचा, हा निर्णय भविष्य-काळांतील उपभोगप्रमाणाविषयीं काय आकांक्षा असतात, ह्यावर अवलंबून असतें, सर्वसाधारणपणें उपभोगाचें मान वाढतें असावें, अशीच मनुष्याची इच्छा असते. असें धरून चालण्यास हरकत नाहीं. तेव्हां भांडवलांत सतत वाढ करणें ही दृष्टि अर्थव्यवस्थेला ठेवावी लागते असें म्हणण्यास हरकत नाहीं.

उत्पादनशक्ति वाढविणें आवश्यक :--उत्पादनसाधनांचा पुरवठा आपल्याला शक्य होईल त्या प्रमाणांत वाढविण्याचे प्रयत्न तर मनुष्याला करावे लाग-तातच; पण त्याहीपेक्षां महत्त्वाची गोष्ट अशी कीं, उत्पादनसाधनांची उत्पा-दनशक्ति वाढविण्याचे प्रयत्न मनुष्याला करावे लागतात. उत्पादनशक्ति वाढविणें ह्याचाच अर्थ उत्पादनपद्धतींत सुधारणा करणें असा होतो. उत्पादन-पद्धतींत सुधारणा झाली कीं, तेवढेंच उत्पादन करण्यास कमी उत्पादनसाधनें लागतात किंवा तेवढ्याच साधनांकडून अधिक उत्पादन होऊं शकतें. सर्वसाधारण

अनुभव असा आहे कीं, उत्पादनपद्धति जसजशी सुधारत जाते तसतसें उत्पादन अधिकाधिक भांडवलप्रधान होऊं लागतें. उत्पादन जसजसें अधिक भांडवलप्रधान होत जातें तसतशी एखाद्या वस्तूच्या उत्पादनासाठीं आवश्यक असणाऱ्या उत्पादनटप्प्यांची (Stages of Production) संख्या वाढते. त्यामुळें उत्पादनक्रियेची सुरवात व तिचें अंतिम फळ ह्यांतील अंतरहि वाढतें. उत्पादनपद्धतींत होत असणाऱ्या सुधारणांना तसें पाहिलें तर विविध क्षेत्रांत संशोधन करणारे शास्त्रज्ञ जबाबदार असतात; पण शास्त्रज्ञांनीं शोध लावणें व त्या शोधांचा व्यवहारांत उपयोग करून उत्पादन वाढविणें ह्या अगदीं भिन्न गोष्टी आहेत. संशोधनाचा उपयोग करून उत्पादनघटकांची उत्पादनक्षमता व त्या योगानें उत्पादन वाढविणें ही जबाबदारी अर्थव्यवस्थेवर असते.

वरील विवेचनाच्या आधारें अर्थव्यवस्थेची कार्यें (Functions of the economic system) सारांशरूपानें पुढीलप्रमाणें सांगतां येतील.[४]

(१) कोणत्या वस्तूंचें किती उत्पादन करावयाचें ह्याचा निर्णय घेणें.

(२) उत्पादनासंबंधीं घेतलेले निर्णय पार पडतील अशा प्रकारें विविध वस्तूंच्या उत्पादनासाठीं उत्पादनसाधनांचा जरूर त्या प्रमाणांत पुरवठा करणें.

(३) उत्पादनसाधनांची मर्यादित उपलब्धता लक्षांत घेऊन उपलब्ध उत्पादनसाधनांचा भरपूर उपयोग करून घेणें किंवा निराळ्या शब्दांत उत्पादनसाधनांचा अपव्यय टाळणें.

(४) शास्त्रीय प्रगतीचा उपयोग करून घेऊन उत्पादनपद्धतीत सतत सुधारणा घडवून आणणें व त्या मार्गानें वाढत्या उत्पादनाची सोय करणें.

प्रमुख संदर्भ ग्रंथ

(1) Lionel Robbins—The nature and significance of economics.
(2) Cochrene and Bell—The Economics of Consumption.

[४]Each and every society must meet and solve in some way three fundamental problems :—

(1) What commodities shall be produced and in what quantities ? That is, how much and which of many alternative goods and services shall be produced ?

(2) How shall goods be produced ? That is, by whom and with what resources and in what technological manner are they to be produced ?

(3) For whom are goods to be produced ? That is who is to enjoy and get the benifits of the goods and services produced ? Or to put the same thing in another way—How is the National product to be distributed among individuals and families ?

--Cochrene and Bell

: २ : अनियोजित अर्थव्यवस्थेचा कारभार

नियोजित व अनियोजित अर्थव्यवस्थेंतील मुख्य फरक :—कोणत्या वस्तूंचें उत्पादन करावयाचें, तें किती प्रमाणांत करावयाचें, कोणत्या ठिकाणीं करावयाचें, कोणत्या पद्धतीनें करावयाचें, आणि होणाऱ्या उत्पादनाचें वांटप कसें करावयाचें, ह्यासंबंधीचे निर्णय घेणें थोडक्यांत उत्पादन-विभाजनाचा आराखडा ठरविणें हें अर्थव्यवस्थेचें प्रमुख कार्य असतें. नियोजित व अनियोजित अर्थव्यवस्थेंतील सर्वांत महत्त्वाचा फरक हा कीं, नियोजित अर्थव्यवस्थेंत (Planned Economy) उत्पादन विभाजनाचा आराखडा आगाऊ ठरविलेला असतो व तो ठरविण्याची जबाबदारी समाजाचें प्रतिनिधित्व करणाऱ्या व सर्वसत्ताधारी अशा राज्यसंस्थेवर असते. ह्याच्या उलट अनियोजित अर्थव्यवस्थेंत (Unplanned Economy) समाजाच्या गरजांचा संकलितरीत्या विचार करून उत्पादन-विभाजनाचा आराखडा ठरवला जात नाहीं. तींत प्रत्येक व्यक्ति आपल्यापुरता विचार करून आर्थिक स्वरूपाचे म्हणजेच उत्पादन-उपभोग विषयक जे निर्णय घेते त्यांतून उत्पादनविभाजनाचा आराखडा उद्‌भवतो. निराळ्या शब्दांत हाच फरक असा सांगतां येईल कीं, नियोजित अर्थव्यवस्थेंतील उत्पादन-विभाजनाचा आराखडा सर्व समाजाच्या दृष्टीनें केल्या गेलेल्या पूर्वविचाराचें फळ असतें. तो जाणीवपूर्वक ठरविलेला असतो. उलट अनियोजित अर्थव्यवस्थेंतील उत्पादन-विभाजनाचा आराखडा असंख्य व्यक्तींच्या असंख्य निर्णयांचा परिणाम असल्यानें एकप्रकारें अजाणतांच ठरतो. तो आराखडा ठरविला जाण्याच्या प्रक्रियेला सर्वांचा हातभार लागतो; पण म्हणूनच त्याबद्दल कोणीच जबाबदार नसतें. इतकेंच नव्हे तर जें होणार त्याची नेमकी जाणीव कोणालाच नसते. अनियोजित अर्थव्यवस्थेंतील उत्पादनविभाजनाचा आराखडा व्यक्तीकडून घेतल्या जाणाऱ्या आर्थिक निर्णयांचा परिणाम असल्यानें त्या अर्थव्यवस्थेच्या अभ्यासांत व्यक्तीचें आर्थिक वर्तन (Economic Behaviour) कसें ठरतें, ह्या प्रश्नाला विशेष महत्त्व प्राप्त होतें.[१]

उत्पादन व उपभोग-स्वातंत्र्य :—अनियोजित अर्थव्यवस्थेंत आर्थिक निर्णय घेण्याचा अधिकार व्यक्तीला प्राप्त होतो. ह्याचें मुख्य कारण असें कीं, तींत

---

[१] Planning means the replacement of the whole private entrepleneural system by socialised production and distribution, on the basis of an all comprehensive plan. (Planning means supplanting price mechanism by governmental regulation of the details of the economy) The main difference is that under planning "the overall economic accomplishment is largely premediated whereas in a free enterprise system it just emerges as it will automatically or by accident and contralled mainly by competition." —**Bain**

आपल्याला योग्य वाटेल ते निर्णय घेण्याचें व त्याप्रमाणें वागण्याचें स्वातंत्र्य व्यक्तीला असतें. खाजगी मालकीच्या (Private Property) तत्त्वाला मान्यता हें अनियोजित अर्थव्यवस्थेचें सर्वांत महत्त्वाचें लक्षण होय. त्या अर्थव्यवस्थेंत उत्पादनसाधनें संपूर्णपणें खाजगी मालकीचीं असतात. आणि तीं वापरावीं कशीं, हें ठरविण्याची मोकळीक व्यक्तीला असते. ती इतकी असते कीं, एखाद्या व्यक्तीनें आपल्या मालकीचीं उत्पादनसाधनें न वापरतां तशींच निकामी पडूं दिलीं तरी तिला कोणी आडकाठी करूं शकत नाहीं. ह्यालाच अर्थशास्त्रांत उत्पादन-स्वातंत्र्य (Freedom of Production) म्हणतात. उत्पादन-स्वातंत्र्याचा उपयोग करून आपल्या मालकीचीं उत्पादनसाधनें कोणत्या वस्तूच्या उत्पादनांत गुंतवावयाचीं, ह्याचा निर्णय व्यक्ति घेऊं शकते. सर्वसाधारणपणें आपलें उत्पन्न—हल्लींच्या अर्थव्यवस्थेंत हें पैशाच्या रूपानें मिळतें—जास्तींत जास्त करण्यासाठींच व्यक्तीकडून उत्पादन-स्वातंत्र्याचा उपयोग केला जातो. मात्र ह्याचा अर्थ असा नाहीं कीं, आपलें उत्पन्न जास्तींत जास्त व्हावें, ह्या आर्थिक हेतूखेरीज अन्य दुसरा कोणताहि हेतु मानवी जीवनांत नसतो. मानवी जीवनांत अर्थप्रेरणा (Economic Motive) असतेच. पण त्याखेरीज विविध प्रेरणा असतात. त्या प्रेरणांचा उत्पादनस्वातंत्र्य कसें वापरलें जातें, ह्यावर निश्चित परिणाम होतो. पण सामान्यपणें उत्पादन-साधनांचा मालक आपलें उत्पन्न जास्तींत जास्त व्हावें, ह्यासाठीं झटत असतो, असें म्हणणें अवास्तव होणार नाहीं.[२]

उत्पादन-स्वातंत्र्याप्रमाणेंच अनियोजित अर्थव्यवस्थेंत उपभोग-स्वातंत्र्यहि (Freedom of Consumption) व्यक्तीस उपभोगावयास मिळतें. त्या स्वातंत्र्यामुळें आपल्या उत्पन्नाचा किती भाग तात्कालिक गरजा भागविण्यासाठीं वापरावयाचा व किती भाग भावी काळासाठीं बचत करावयाचा, जो भाग वापरावयाचा तो कोणत्या वस्तूवर खर्च करावयाचा, त्यांतील प्रत्येक वस्तूचा उपभोग किती प्रमाणांत घ्यावयाचा, केलेली बचत कशांत तरी गुंतवावयाची, कीं रोख पैशाच्या रूपानें तशीच पडूं द्यावयाची, ह्यासंबंधीचे निर्णय व्यक्तीला घेतां येतात. हे निर्णय घेतांना सर्वसामान्यपणें आपल्याला जास्तींत जास्त सुख लाभावें आणि आपल्या गरजा त्यांच्या महत्त्वक्रमानुसार भागविल्या जाव्यात, अशी दृष्टि व्यक्तीकडून ठेवली जाते असें दिसून येतें.[३]

किमतींचें मार्गदर्शन :—उत्पादन व उपभोग-स्वातंत्र्याच्या आधारें व्यक्तीकडून घेतल्या जाणाऱ्या आर्थिक निर्णयावर अनियोजित अर्थव्यवस्थेचा कारभार कसा

[२] Labourers and owners of other productive services are free in their disposal of these services. They are free to refuse employment generally or in particular occupations and to shift from occupation to occupation. Such an arrangement is based essentially on the institution of private property which gives to individuals ownership of physical means for production and relatively full powers of control over them.

चालतो, ह्याचा शोध घेतल्यास असें दिसून येतें कीं, त्या अर्थव्यवस्थेंत किंमतीच्या यंत्रणेला (Price Mechanism) अतिशय महत्त्व असतें. किंमतीच्या आराखड्यांत सर्व प्रकारच्या उपभोग्य वस्तूंच्या किंमतींचा व उत्पादनसाधनांच्या किंमतींचा समावेश होतो. ह्या किंमतींना महत्त्व प्राप्त होतें. कारण किंमती ठरण्याच्या प्रक्रियेला ग्राहक किंवा विक्रेता ह्या नात्यानें प्रत्येकाचा हातभार लागत असला तरी बाजारांत शेवटीं ठरणाऱ्या किंमती कोणा एका व्यक्तीच्या हातच्या नसतात. त्यामुळें सर्वसाधारण नियम असा असतो कीं, बाजारांतील किंमती गृहीत धरून त्यांच्या अनुरोधानें व्यक्ति उत्पादन-उपभोगविषयक आपले निर्णय घेते. अनियोजित अर्थव्यवस्थेंत व्यक्तीचें आर्थिक वर्तन बाजारांतील किंमतीवर अवलंबून असतें, असें म्हणणें चूक होणार नाहीं. (The capitalistic economy is a pure market-economy) ह्या म्हणण्याची सार्थकता लक्षांत येण्यासाठीं उपभोग-उत्पादनाचे निर्णय किंमतीमानावर कसे अवलंबून असतात, ह्याचा थोडा विस्तारानें खुलासा केला पाहिजे.

उपभोगाचा आराखडा किंमतींवर अवलंबून :—उपभोगाचा आराखडा म्हणजे उपभोगाच्या कोणत्या वस्तु खरेदी केल्या जातात व किती प्रमाणांत त्या खरेदी केल्या जातात, हें ठरविलें जाण्याला बाजारांतील किंमतीच कारणीभूत होतात. प्रत्येक व्यक्ति आपलें उत्पन्न पाहून आपणांला कोणत्या वस्तु खरेदी करतां येतील, हें ठरवीत असते. म्हणजेच निराळ्या शब्दांत व्यक्तीचें राहणीमान तिच्या उत्पन्नावर अवलंबून असतें. पण व्यक्तीचें उत्पन्न म्हणजे तरी काय ? व्यक्तीचें उत्पन्न म्हणजे तिच्या मालकीच्या उत्पादन-साधनांची बाजारांतील किंमत होय. मजुराच्या श्रमाची किंमत म्हणजेच त्याचें उत्पन्न. जमिनीपासून मिळणारा खंड म्हणजेच जमीनमालकाचें उत्पन्न. अशा प्रकारें उत्पादन-साधनांच्या बाजारांतील किंमती-मुळेंच सर्वांची उत्पन्नें ठरत असतात. उत्पन्नावर अवलंबून असणारी सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्यक्तीकडून केली जाणारी बचत ही होय. व्यक्तीकडून केली जाणारी बचत (Saving) व्यक्तीच्या उपभोगप्रवृत्ती (Propensity to Consume) वर अवलंबून असते. व्यक्तीच्या उपभोगप्रवृत्तीबद्दल अर्थशास्त्रांत सर्वसाधारण सिद्धान्त असा सांगितला जातो कीं, व्यक्तीचें उत्पन्न जसें वाढत जातें तसा उपभोगावर होणारा खर्चहि वाढत जातो; पण ज्या प्रमाणांत उत्पन्न वाढतें त्या प्रमाणांत उपभोग्य वस्तूंवरील खर्च वाढत नाहीं. उपभोगखर्च उत्पन्नापेक्षां कमी प्रमाणांत वाढतो. बचतीच्या बाजूनें विचार करून ह्याच सिद्धान्ताची उलट बाजू अशी सांगतां येईल कीं, व्यक्तीचें उत्पन्न ज्या प्रमाणांत वाढत जातें त्यापेक्षां अधिक प्रमाणांत तिची

[3] Under our system it is generally true that any individual consumer has relatively unrestricted free choice as to where, when and for what he will spend his income. He can spend it all; save it all or divide it between spending and saving as he desires. —**Bain**

बचत करण्याची शक्ति व प्रवृत्ति वाढते. उत्पादनानें कांहीं मर्यादा गांठल्यानंतरच हा नियम लागूं पडतो. उत्पन्नाचा किती भाग खर्च करावयाचा व किती भाग बचत करावयाचा, हा सर्वांत महत्त्वाचा निर्णय अशा प्रकारें उत्पन्नावर—म्हणजेच पर्यायानें उत्पादनसाधनांच्या बाज़ारांतील किंमतीवर—अवलंबून असतो.

खर्चाची विभागणी:—खर्च किती करावयाचा व बचत किती करावयाची, हें ठरल्यानंतर कोणत्या वस्तूवर किती खर्च करावयाचा, हा प्रश्न उभा राहतो. तो प्रश्नहि किंमतीकडे पाहूनच सोडविला जातो. आपण केलेल्या खर्चापासून जास्तींत जास्त समाधान मिळावें, अशी साहजिकच व्यक्तीची इच्छा असते. ती इच्छा साध्य व्हावयाची असेल तर वस्तूंच्या उपभोगापासून प्राप्त होणारें समाधान व तिच्या प्राप्तीसाठीं किंमत-रूपानें करावा लागणारा त्याग ह्यांची तुलना व्यक्तीला करावीच लागते. वस्तूंचा उपभोग जसजसा वाढत जावा तसतसें सीमान्त-समाधान (Marginal Satisfaction) कमी होत जातें, हा सिद्धान्तहि तिला विचारांत घ्यावा लागतो. हा सिद्धान्त व जास्तींत जास्त समाधान मिळविण्याची व्यक्तीची खटपट ह्या दोन्ही गोष्टी विचारांत घेतल्यास असें म्हणतां यईल कीं, सर्व वस्तूंची सीमान्त-उपभोग्यता सारखी व्हावी, अशा बेतानें खर्चाचा आराखडा व्यक्तीकडून ठरविला जातो. सीमान्त-उपभोग्यता जोंपर्यंत सारखी होत नाहीं तोंपर्यंत खर्चाच्या आराखड्याला स्थैर्य येऊं शकत नाहीं. कारण ज्या वस्तूची सीमान्त-उपभोग्यता अधिक त्या वस्तूवरील खर्च वाढविण्याची प्रवृत्ति व्यक्तींत असणें साहजिक आहे. किंमतीच्या भाषेंत बोलावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, वस्तूची किंमत ज्या मानानें अधिक त्या मानानें तिच्यापासूनचें सीमान्त-समाधान मिळावें, अशा बेतानें खर्चाचा आराखडा ठरविला जातो. उदाहरणार्थ ४ रु. किंमतीची एखादी वस्तु असेल व ८ रु. किंमतीची दुसरी वस्तु असेल तर पहिलीपासून प्राप्त होणाऱ्या सीमान्त-समाधानाच्या दुप्पट सीमान्त-समाधान दुसरी-पासून प्राप्त व्हावें, अशी साहजिकच व्यक्तीची इच्छा असते.

बचतीचा विनियोग:—बचत केलेला पैसा कसा वापरावयाचा, ह्या बाबतींतहि किंमतीचा प्रश्न येतोच. बचत केलेला पैसा तसाच रोकडरूपानें ठेवतां येतो किंवा अन्यत्र गुंतवितां येतो. अन्यत्र गुंतविल्यास व्याजाच्या रूपानें किंमत मिळते; पण रोख पैसा जवळ बाळगण्याचे फायदे गमवावे लागतात. व्याजरूपानें मिळणारी किंमत ही गमावलेल्या फायद्याची पुरेशी भरपाई आहे कीं नाहीं, ह्यासंबंधीं विचार करूनच व्यक्ति ह्या बाबतींतील आपला निर्णय घेते. अशा तऱ्हेनें उपभोगविषयक निर्णय ह्या नाहीं त्या किंमतीवर अवलंबून असतात.[४]

उत्पादनविषयक निर्णय :—उत्पादनविषयक निर्णयहि किंमतीवर अवलंबून असतात. उत्पादनविषयक निर्णय घेणाऱ्यांचे स्थूल असे दोन वर्ग पडतात. पहिल्या

[४] The demand for consumption goods is determined by income-level, which in their turn is determined by the prices of factors of production.

वर्गातील लोक आपल्या मालकीचीं उत्पादनसाधनें उत्पादनासाठीं इतरांच्या स्वाधी करून त्यासाठीं त्यांच्याकडून मोबदला घेतात. हा मोबदला म्हणजेच त्यांच्या मालकीच्या उत्पादनसाधनांची बाजारांतील किंमत होय. हा मोबदला जास्तींत जास्त मिळावा, अशीच ह्या वर्गातील लोकांची स्वाभाविक इच्छा असते. त्यामुळें ज्या वस्तूच्या उत्पादनासाठीं आपल्या मालकीचीं उत्पादनसाधनें उपलब्ध करून दिल्यानें जास्तींत जास्त किंमत मिळते त्या वस्तूच्या उत्पादकांना ह्या वर्गातील लोक आपलीं उत्पादनसाधनें विकतात.[५]

उत्पन्न वाढविण्याची प्रेरणा :—त्यासाठीं उत्पादन-साधनांच्या किंमतीतील फेरबदलाकडे ह्या वर्गातील लोकांना लक्ष द्यावेंच लागतें. आपली श्रमशक्ति विकून मजुरी मिळविणारे कामगार आपल्या मालकीची जमीन उत्पादनासाठीं दुसऱ्यांना उपलब्ध करून देऊन खंड मिळविणारे जमीनदार व आपल्याजवळील भांडवल व्याजीं लावणारे भांडवलदार ह्यांचा ह्या वर्गांत समावेश होतो. आपलें उत्पन्न जास्तींत जास्त वाढविण्याची प्रेरणाच ह्या वर्गातील लोकांच्या आर्थिक निर्णयामागें असते, असें स्थूलमानानें म्हणणें चूक होणार नाहीं. स्थूलमानानें म्हणण्याचें कारण असें कीं, कित्येकदां जिकडे उत्पन्न अधिक तिकडे आपल्या मालकीचीं उत्पादनसाधनें वळविण्याची ह्या वर्गातील लोकांची इच्छा असली तरी अनेक अडचणींमुळें तें शक्य होत नाहीं. अर्थशास्त्राच्या परिभाषेंत असें म्हणतां येईल कीं, उत्पादनाच्या घटकांचें गतिसौकर्य (Mobility) मर्यादित असते. एकदां एका वस्तूच्या उत्पादनांत उत्पादन-घटक गुंतविले कीं, त्यांना तेथून काढून दुसरीकडे गुंतविणें सहजासहजीं शक्य नसतें. अर्थात् ज्या अडचणी असतात त्या तात्पुरत्या व कालान्तरानें दूर होण्याजोग्या असतात. म्हणून दीर्घावधीचा विचार करावयाचा झाल्यास जास्तींत जास्त उत्पन्न मिळविण्याची प्रवृत्ति जोरदार असते व अर्थव्यवस्थेला वळण लावण्यास कारणीभूत होते, असें म्हणणें चूक होणार नाहीं. जास्तींत जास्त उत्पन्न मिळविण्याच्या प्रेरणेखेरीज अन्य प्रेरणाहि मानवी जीवनांत असतात व त्यांचाहि आर्थिक क्षेत्रांत मनुष्याकडून घेतल्या जाणाऱ्या निर्णयावर परिणाम होतो, ही गोष्ट प्रस्तुत ठिकाणींहि मान्य केली पाहिजे. पण तरीहि प्रत्येक व्यक्तीनें आपला आर्थिक प्रश्न आपल्या जबाबदारीवर सोडवावा, अशी ज्या अर्थव्यवस्थेची अपेक्षा असते त्या अर्थव्यवस्थेंत आपलें उत्पन्न जास्तींत जास्त वाढविण्यासाठीं प्रयत्न करण्याची प्रेरणाच बहुसंख्य लोकांच्या उत्पादनविषयक आर्थिक निर्णयामागें असते. म्हणून तीच सर्वांत प्रभावी प्रेरणा असते हें निर्विवाद होय.

[५] Since those who are offering the means of production-labourers, capitalists and landowners are desirous of obtaining the highest price possible, the pricing processes in the markets for means of production will tend to bring about the employment of the means of production in those particular channels where they command the highest price. —**Halm**

उत्पादनविषयक निर्णयामागें नफ्याची प्रेरणा :—वरील विवेचन उत्पादन विषयक निर्णय घेणाऱ्या दुसऱ्या वर्गातील व्यक्तींनाहि लागू पडतें. ह्या वर्गातील लोक उत्पादनाची जबाबदारी शिरावर घेणारे असतात. त्यांतील सर्व धोके पत्करावयाची त्यांची तयारी असते. उत्पादनाविषयींचे निर्णय खऱ्या अर्थानें ह्याच वर्गातील लोकांकडून घेतले जातात. केव्हां, कोठें, कशाचें, किती, कसें उत्पादन करावयाचें हें ह्याच वर्गातील लोकांकडून ठरविलें जातें व जें ठरविलें असेल त्याची अंमलबजावणी करण्याचें काम ह्याच्यावरच पडते. उत्पादनांतील धोके पत्करणें व उत्पादनाची व्यवस्था करणें हीं ह्या वर्गाचीं दोन प्रमुख कार्ये होत. ह्या कार्यांचा मोबदला ह्या वर्गाला नफ्याच्या रूपानें मिळतो. नफ्यावर लक्ष ठेवून व तो जास्तींत जास्त करण्याच्या उद्देशानें ह्या वर्गातील लोकांकडून उत्पादनविषयक सर्व निर्णय घेतले जातात, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.[६]

नफा ही बाजारांत ठरणारी किंमत नव्हे; पण बाजारांत वस्तूंच्या व उत्पादनसाधनांच्या किंमती ठरल्या कीं नफा आपोआपच ठरतो.[७]

नफा किंमतीचा परिणाम :——नफा म्हणजे उत्पादित वस्तूची किंमत व उत्पादन-खर्च ह्यांच्यांतील फरक होय. उत्पादन-खर्च बाजारांतील किंमतीवरच अवलंबून असतो. कारण उत्पादन-खर्चांत उत्पादनासाठीं लागणाऱ्या सर्व वस्तूंच्या किंमतीचा व उत्पादन-घटक प्राप्त करून घेण्यासाठीं त्यांच्या मालकांना दिलेल्या मोबदल्याचा समावेश होतो. तेंव्हां नफ्याकडे पाहून उत्पादनविषयक निर्णय घेतले जातात असें म्हणणें व बाजारांतील सर्व किंमती पाहून उत्पादनविषयक निर्णय अनियोजित अर्थव्यवस्थेंत घेतले जातात असें म्हणणें ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच आहेत. अनियोजित अर्थव्यवस्थेंत ज्या वस्तूंच्या उत्पादनांत अधिक नफा मिळतो त्या वस्तु उत्पादिल्या जातात, उत्पादनाचें जें प्रमाण स्वीकारल्यानें नफा जास्तींत जास्त होतो तें प्रमाण स्वीकारलें जातें, ज्या ठिकाणीं उत्पादन केल्यानें उत्पादन-खर्च सर्वांत कमी होतो त्या ठिकाणाची उत्पादनासाठीं निवड केली जाते व ज्या पद्धतीनें उत्पादन केलें असतां उत्पादन-खर्च कमींत कमी होईल ती उत्पादनपद्धति अनुसरली जाते. अशा प्रकारें बाजारांतील किंमतीमुळें अनियोजित अर्थव्यवस्थेंतील उत्पादनाचा आराखडा ठरतो.[८]

---

[६] It is precisely the endeavour to make profits which induces the enterpreneurs to turn to those branches of production in which effective demand awaits satisfaction and to abondon production where a falling demand no longer promises selling-prices that will cover costs.

[७] The margin of profit of the enterpreneur is determined from two directions by the prices both of the products and of the means of production. —Halm

विभजन व किंमती :—उपभोग व उत्पादनाचे आराखडे बाजारांतील किंमतीमुळें अनियोजित अर्थव्यवस्थेंत कसे ठरतात, हें वर दाखविलें आहे. विभजनाचा आराखडा त्या अर्थव्यवस्थेंत किंमतीमुळेंच ठरतो हें तर सहज दाखवतां येईल. कारण विभाजन म्हणजे दुसरें-तिसरें कांहीं नसून आपल्या मालकीचे उत्पादनघटक उत्पादनासाठीं उपलब्ध करून देण्याबद्दल उत्पादन-घटकांच्या मालकांना मिळणाऱ्या उत्पन्नाचेंच तें वेगळें नांव आहे. प्रत्येकाला जें उत्पन्न मिळतें त्या उत्पन्नावरच त्याची बाजारांतील क्रयशक्ति अवलंबून असते. त्या क्रयशक्तीमुळें बाजारांतील विविध वस्तु किती प्रमाणांत त्याला खरेदी करतां येतात—म्हणजेच राष्ट्रीय उत्पन्नाचा किती वांटा त्याला मिळतो—हें ठरतें. घटकमालकांचीं उत्पन्नें उत्पादन-साधनांच्या किंमतीचेंच वेगळें नांव आहे, हें वर सांगितलेंच आहे. अशा प्रकारें संपत्तीचे उत्पादन, विभाजन व उपभोग ह्या तिन्ही अर्थक्रिया (Economic Activities) ठरण्यास बाजारांत निश्चित होणाऱ्या किंमती कारणीभूत होतात. म्हणून अनियोजित अर्थव्यवस्थेचा कारभार कसा चालतो, ह्याची चिकित्सा जेव्हां केली जाते तेव्हां बाजारांत वस्तूंच्या व उत्पादन-घटकांच्या किंमती कशा ठरतात, ह्या प्रश्नाला मध्यवर्ती स्थान दिलें जातें.[९]

उपभोक्त्यांचें सार्वभौमत्व (Consumers Sovereignty) :—अनियोजित अर्थव्यवस्थेचा कारभार बाजारांतील किंमतीच्या मार्गदर्शनाखालीं कसा चालतो, ह्याची वर जी स्थूल स्वरूपाची रूपरेषा दिली आहे ती पाहतां ह्या अर्थव्यवस्थेंत उपभोक्त्याला असाधारण महत्त्व कसें आहे हें दिसून येईल. ह्या अर्थव्यवस्थेंत ज्या वस्तूंच्या उत्पादनांत नफा होतो त्या वस्तु, किमानपक्षीं ज्या वस्तूंच्या उत्पादनांत तोटा होत नाहीं त्याच वस्तु दीर्घकालाचा विचार करतां उत्पादनासाठीं पात्र समजल्या जातात. कोणत्या वस्तूंच्या उत्पादनांत नफा होतो, असा प्रश्न विचारला असतां ज्या वस्तूंवर उपभोक्ते पुरेसा खर्च करण्यास तयार असतात त्याच वस्तूंच्या उत्पादनांत नफा होतो असें त्या प्रश्नांचें उत्तर द्यावें लागेल. सारांश, अनियोजित अर्थव्यवस्थेंत उपभोक्त्यांच्या इच्छेवर उत्पादन अवलंबून असतें. उपभोक्त्यांची लहर फिरली कीं नफा देणाऱ्या वस्तूही बदलतात व उत्पादनाच आराखडा बदलणें क्रमप्राप्त होतें. उत्पादनाचा आराखडा ठरला कीं, त्या अनुषंगानें उत्पादनसाधनांचा ओघ उपभोक्त्यांनीं इच्छिलेल्या वस्तूंच्या उत्पादनाकडे वळवाव लागतो. थोडक्यांत अनियोजित अर्थव्यवस्थेंत उपभोक्त्यांच्या इच्छांना नियंत्रक शक्तीचें स्वरूप प्राप्त होतें. अनियोजित अर्थव्यवस्थेंत उपभोक्त्याकडे सार्वभौम अधिकार असतात असें जें म्हटलें जातें तें ह्याच अर्थानें.[१०]

[८] The direction of production is determined by prices, by the prices of the means of production costs and the prices of the productions. —Halm

[९] The deciding factor is the process of price-determination.

उपभोक्त्याचें स्वातंत्र्य मर्यादित :—अनियोजित अर्थव्यवस्थेंतील उपभोक्त्यांचें सार्वभौमत्व वरवर पाहतां वाटतें तेवढें मात्र तें खरें नसतें. कारण पहिली गोष्ट अशी कीं, उपभोगाच्या बाबतींत मनुष्य हा बऱ्याच प्रमाणांत संवयीचा गुलाम असतो. लहानपणापासून ज्या संवयी लागल्या असतील त्या त्याची आवडनिवड ठरवितात. उपभोक्त्याच्या आवडीनिवडीमागें त्याचा असा विचार असतो, असें म्हणण्यापेक्षां भोंवतालच्या परिस्थितीचा प्रभाव त्या आवडीनिवडीवर विशेष प्रमाणांत पडतो, असें म्हणणें अधिक उचित होईल. मनुष्य हा समाजाचा घटक असतो व समाजाच्या चालिरीती, प्रथा त्याला पाळाव्या लागतात. समाजाच्या चालीरीतींचा व्यक्तीच्या उपभोग स्वतंत्र्यावर बराच परिणाम होतो हें सहज दाखवितां येईल. कायद्याची बंधनेहि व्यक्तीला पाळणें भाग पडतें. उदाहरणार्थ, दारुबंदीचा कायदा झाल्यानंतर दारुच्या बाबतींत व्यक्तीला उपभोगस्वातंत्र्य रहात नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, सध्यांच्या जगांत जाहिरातबाजीचें तंत्र इतकें सुधारलें आहे कीं, कित्येकदां उपभोक्त्यांच्या मनांत नसलेली आवड निर्माण केली जाते. त्यामुळें कित्येकदां उपभोक्त्यांची इच्छा प्रथम व नंतर उत्पादन, असा क्रम राहतोच असें नाहीं. उत्पादन आधीं होतें आणि मग भुरळ पाडणाऱ्या जाहिराती अगर इतर क्लुप्त्यांच्या योगानें त्या उत्पादनासाठीं बाजारांत मागणी निर्माण केली जाते. तिसरी गोष्ट अशी कीं, सर्वच उपभोक्त्यांना चांगलें-वाईट समजतें व त्यांच्या खरेदीला निश्चित कांहीं अर्थ असतो, असें निखालस म्हणतां येत नाहीं. उपभोक्त्यांचा सार्वभौमत्वावर प्रचलित अर्थव्यवस्थेंत पडणारी सर्वांत महत्त्वाची मर्यादा म्हणजे उत्पन्नाची मर्यादा होय. बहुसंख्य लोकांचें उत्पन्न जेमतेम महत्त्वाच्या गरजा भागविण्याइतपतच असल्यामुळें आवडीनिवडीचा फारसा प्रश्न उपस्थित होत नाहीं. तेव्हां अनियोजित अर्थव्यवस्थेंत उपभोक्त्यांचें सार्वभौमत्व असतें, असें जेव्हां म्हटलें जातें तेव्हां वरील गोष्टी लक्षांत घेऊनच तें विधान समजून घेतलें पाहिजे. ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्यानंतर असेंच म्हणावें लागतें कीं, प्रत्यक्ष व्यवहारांत उपभोक्त्याचे सार्वभौमत्व नाममात्र असतें. आपल्या उत्पादनाच्या मर्यादेंतच कोणत्याहि व्यक्तीला उत्पादनाचें नियंत्रण करण्याचा अधिकार प्राप्त होत असतो.[११]

---

[१०] Consumer sovereignty implies "that the consumer is independent and free of outside restriction in spending the income he receives. But it also implies more. Since the great bulk of income under our system is paid into the hands of independent persons who have unrestricted power of disposal over it, consumers as a whole are also in a sense supreme rulers of economic systems. They determine the composition of the total output produced by the economy."

[११] An Individual Consumer's contiol over production is limited by the size of his Income.

आपल्या उत्पादनाच्या मर्यादितहि उपभोक्ता पूर्णपणें स्वतंत्र नसतो. कारण त्याला कायद्याची व समाजाच्या चालीरीतींची बंधनें पाळावी लागतात. त्या बंधनांच्या मर्यादित जेवढें स्वातंत्र मिळतें तेवढ्या प्रमाणांत उपभोक्त्याचें सार्वभौमत्व शिल्लक रहातें.[१२]

पण तेवढें स्वातंत्र्यहि उपभोक्त्यांना स्वस्थपणें लाभूं नये ह्या दिशेनें उत्पादकांचे सतत प्रयत्न चालू असतात. त्यांतूनहि जेवढें उरतें तेंच उपभोक्त्याचें खरें स्वातंत्र्य हें थोड्या लोकांना थोड्या प्रमाणांतच लाभतें हें अगदीं स्पष्ट आहे.

प्रमुख संदर्भग्रंथ

(1) Bain--Pricing, Distribution and Employment.
(2) Hayek—Collectivist Economic Planning.
(2) Mrs. Wooton—Freedom Under Planning.

: ३ :

वस्तुमूल्य-निश्चिति

(अ) बाजाराचें स्वरूप

कोणत्याहि वस्तूचें मूल्य त्या वस्तूच्या बाजारपेठेंत (Market) निश्चित होतें. वस्तूचें मूल्य बाजारपेठेच्या स्वरूपावर अवलंबून असल्यानें बाजारपेठेचें स्वरूप कसें आहे हें प्रथम पहावें लागतें. बाजारपेठेच्या स्वरूपाचा अभ्यास करतांना तीन महत्त्वाच्या गोष्टी विचारांत घ्याव्या लागतात. त्या तीन गोष्टी अशा : (१) बाजारांतील विक्रेत्यांची संख्या. (२) विक्रेय वस्तूंतील गुणभेद आणि (३) ग्राहकांची वर्तणूक.

पूर्ण स्पर्धा:--वरील तीन गोष्टींचा विचार केल्यास बाजारांत पूर्ण स्पर्धा (Perfect Competition) आहे कीं नाहीं हें समजतें. वरील तीन गोष्टींच्या आधारें पूर्ण स्पर्धेचीं तीन लक्षणें सांगतां येतात. तीं अशीं : (१) बाजारांतील विक्रेत्यांची संख्या एवढी मोठी असली पाहिजे कीं, कोणत्याहि एका विक्रेत्याचा वस्तूच्या एकंदर पुरवठ्यांतील भाग उपेक्षणीय असावा.[१]

---

[१२] Within the limits set by law, castom, consumers may spend their income as they will.

[१] The No. of sellers is large so that the output of any one seller is a negligibly small proportion of the total output of the commodity. —**Mrs. Robinson**

वस्तुपुरवठ्यांतील अतिशय लहान भाग—अत्यल्पांश—प्रत्येक विक्रेत्याकडून येत असल्यास कोणत्याहि विक्रेत्यास आपली विक्री—आपला पुरवठा—कमीजास्त करून वस्तूच्या किंमतींत फेरबदल घडवून आणतां येत नाहीं. म्हणजेच कोणत्याहि विक्रेत्याच्या वस्तुमूल्यावर थोडासुद्धां ताबा नसतो. त्यामुळें बाजारांत ठरणारी किंमत बदलण्याचा प्रयत्न न करतां त्या त्या वेळीं अस्तित्वांत असणारी किंमत गृहीत धरून पुरवठ्यासंबंधीं आपलें धोरण विक्रेता निश्चित करीत असतो.

वस्तू-भेदाचा अभाव:—विक्रेय वस्तूंत गुण-भेद (Product differentiation) असूं नये. विक्रेय वस्तु एकाच नांवानें बाजारांत खपत असली तरी त्या वस्तूचे अनेक प्रकार असूं शकतात. गुणदृष्टया त्यांच्यांत खराखोटा फरक असण्याची शक्यता असते. खराखोटा म्हणण्याचें कारण असें कीं, कित्येक वेळां विविध विक्रत्यांनीं एकाच नांवानें विकलेली वस्तु गुणदृष्टया खरोखरीच सारखी नसते. पण कित्येक वेळां तीसारखी नाहीं, अशी ग्राहकांची केवळ समजूत झालेली असते किंवा विक्रेत्यांनींच करून दिलेली असते. वस्तूंतील गुणभेद वास्तविक असो किंवा काल्पनिक असो, त्यामुळें स्पर्धेचें स्वरूप शुद्ध राहत नाहीं. गुणभेदामुळें सर्व विक्रेते एका पातळीवर राहात नाहींत. वस्तूचें नांव एकच असलें तरी त्या वस्तूच्या सर्व विक्रेत्यांचा समावेश एकाच वर्गात करतां येत नाहीं. गुणप्रकार जेवढे असतील तेवढे विक्रेत्यांचे गट पडतात—प्रत्येक विक्रेत्याचा प्रकार वेगळा असला तर प्रत्येक विक्रेता एक प्रकारें स्वतंत्र होतो—आणि एकंदर विक्रेत्यांची संख्या भरपूर मोठी असली तरी प्रत्येक गटांतील विक्रेत्यांची संख्या लहान होऊन त्या त्या वस्तूप्रकाराच्या किंमतीवर विक्रेत्यांचा ताबा कांहीं प्रमाणांत तरी प्रस्थापित होण्यास मदत होऊन बाजारपेठेच्या शुद्धतेला बाधा येते. सर्व विक्रेत्यांकडून एकाच नांवानें विकली जाणारी वस्तु गुणदृष्टया एकसारखी असली म्हणजे विक्रेत्यांतील स्पर्धेची शुद्धता अबाधित राहते.[२]

केवळ किंमतीना प्राधान्य:—बाजारांत कोणत्याहि कारणामुळें ग्राहकांनीं किंमतीखेरीज दुसऱ्या कशाकडेहि लक्ष देऊं नये. म्हणजेच बाजारांतील विक्रेते व ग्राहक ह्यांचे संबंध अवैयक्तिक स्वरूपाचे असावेत. कमी किंमतीला जो विक्रेता माल द्यावयास तयार असेल त्याच्याकडेच माल घ्यावयाचा, अशी ग्राहकांची वृत्ति असावी. तशी ती नसेल आणि कोणत्या ना कोणत्या कारणानें ग्राहक व विक्रेता ह्यांच्यांत वैयक्तिक लागेबांधे निर्माण होऊन कांहींहि किंमत पडो, विशिष्ट विक्रेत्यांकडून माल घ्यावयाचा, अशी वृत्ति ग्राहकांत असेल तर विक्रेत्यांची संख्या मोठी असली तरी बहुतेक

[२] Sellers may be said to handle similar commodities when from the viewpoint of buyers their respective commodities are close substitutes. If on the other hand commodities handled by different sellers are not considered close substitutes by buyers then the commodities are not similar and the sellers are in separate markets.

विक्रेत्यांभोंवतीं ग्राहकांचा एखादा एकनिष्ठ समूह तयार होऊन बाजारपेठचे अनेक छोटे भाग पडतात आणि त्या त्या भागांत विक्रेता, ग्राहक आकारलेल्या किंमतीकडे कांहीं प्रमाणांत तरी दुर्लक्ष करीत असल्यानें, किंमतीवर थोडयाफार प्रमाणांत ताबा मिळवूं शकतो. ग्राहकांचें किंमतीकडे दुर्लक्ष नसल्यास कोणत्याहि विक्रेत्याला इतर विक्रेत्यापेक्षां अधिक किंमत आकारून चालत नाहीं. म्हणजेच बाजारपेठेंतील किंमत त्याला स्वीकारावी लागते.

पूर्ण स्पर्धेचीं वरील तीन लक्षणें लक्षांत घेतां असें म्हणतां येईल कीं, **जेव्हां कोणत्याहि वस्तूच्या बाजारपेठेंत विक्रेत्यांची संख्या अतिशय मोठी असते, सर्व विक्रेत्यांचा माल अगदीं सारखा असतो आणि विशिष्ट विक्रेत्यांकडीलच माल घ्यावयाचा, अशा वृत्तीचा ग्राहकांत अभाव असतो** तेव्हां ह्या बाजारपेठेंत पूर्ण स्पर्धा आहे असें मानतात.[३]

पूर्ण स्पर्धेचे परिणाम :—वरील तीन लक्षणांनीं युक्त अशी पूर्ण स्पर्धा बाजारांत असतां तिचे जे तीन परिणाम होतात ते लक्षांत घेतले पाहिजेत. ते खालीलप्रमाणें :—

(१) **अमाप लवचिकता** :—वस्तूच्या मागणीची लवचिकता (Elasticity) कितीहि असो प्रत्येक विक्रेत्याच्या दृष्टीनें त्याच्या मालाकरितां जी मागणी असते तिची लवचिकता अमाप असते.[४] ह्याचें कारण उघडच आहे. विक्रेत्यानें मालाची किंमत थोडी जरी कमी केली तरी मागणी भरमसाट वाढूं शकते. कारण किंमतीखेरीज अन्य कोणत्याहि गोष्टीकडे लक्ष न देणारे असंख्य ग्राहक त्याच्या मालावर अक्षरशः तुटून पडतात. उलट त्यानें थोडीशी जरी किंमत वाढवली तरी त्याच कारणामुळें एकहि ग्राहक न मिळण्याचा अनवस्थाप्रसंग उद्‌भवतो. (२) **एकच किंमत** :—सर्व विक्रेत्यांना एकच किंमत आकारणें भागच पडतें. कारण कोणासहि दुसऱ्यापेक्षां अधिक किंमत आकारणें सोयीचें व फायद्याचें नसतें. त्यामुळें एकच किंमत बाजारांत प्रस्थापित होते. वस्तु तीच; पण किंमती मात्र सर्वत्र भिन्नभिन्न, अशी परिस्थिति बाजारांत कधींहि आढळून येत नाहीं. (३) **जाहिरातबाजीचा अभाव** :—आपला माल ग्राहकांच्या डोळ्यांत विशेष भरावा, ह्या हेतूनें मालाची जाहिरात करावी लागत नाहीं. माहिती देण्यापुरती जाहिरात अर्थात् करावीच लागते; पण त्यापलीकडे जाहिरातबाजीला स्थान नसतें. कारण कितीहि जाहिरात केली तरी शेवटीं ग्राहक किंमतीकडे पहाणारे असल्यास ती निरुपयोगी ठरतें.

---

[३] " When the number of firms being large, so that a change in the output of any one of them has a negligible effect upon the total output of the commodity, the commodity is perfectly homogeneous in the sense that buyers are all alike in respect of their preferences (or indifference) between one firm and its rivals, then competition is perfect ". —**Mrs. Robinson**

[४] Elasticity of demand for the individual firm is infinite.

मक्तेदारी अथवा एकाधिकार:––पूर्ण स्पर्धेत वस्तूची किंमत कोणत्याहि एका विक्रेत्याच्या ताब्यांत नसते. हें झालें एक टोंक. मक्तेदारीला दुसरें टोंक म्हणतां येईल. कारण मक्तेदारीचें स्वरूप बाजाराला प्राप्त झालें असतां विक्रेत्याला वस्तूच्या किंमतीवर जास्तींत जास्त प्रमाणांत अंमल बसवितां येतो. हें कसें होतें, हें समजण्यासाठीं मक्तेदारी म्हणजे काय, हें नीट ध्यानांत घेतलें पाहिजे. मक्तेदारीचें मुख्य वैशिष्टय हें कीं, एका नांवानें ओळखिल्या जाणाऱ्या वस्तूचा **एकच उत्पादक** असतो.[५]

पूर्ण पर्यायाचा अभाव:––त्या उत्पादकाला इतर कोणत्याहि उत्पादकाची पर्वा करावी लागत नाहीं. जगांतील दुसऱ्या कोणत्याहि उत्पादकाचा माल—मग त्या मालाला नांव कांहींहि दिलेलें असो—त्याच्या मालाऐवजीं वापरून ग्राहकांना आपली गरज भागवितां येत नाहीं. शास्त्रीय भाषेंत असें म्हणतां येईल कीं, त्यानें उत्पादिलेल्या वस्तूला निकटची बदली किंवा पूर्ण पर्याय वस्तु (Perfect Substitute) नसते. शिवाय तो ज्या वस्तूचें उत्पादन करीत आहे त्याच वस्तूचें उत्पादन दुसरा कोणी करील, अशी भीतीहि त्याला नसते. कारण पूर्ण मक्तेदारींत बाजारपेठ एकाच उत्पादकासाठीं राखून ठेवली जात असल्यानें संभाव्य स्पर्धेलाहि मक्तेदारींत अजिबात स्थान नसतें. खुल्या स्पर्धेत उत्पादकांना बाजारपेठेंत मुक्तद्वार असते. त्यामुळें उत्पाकांची संख्या कमी अधिक होऊं शकते; पण मक्तेदारींत बाजारपेठेंत एकापेक्षां अधिकांना प्रवेश मिळतच नसल्यामुळें उत्पादक नेहमींच एकुलता एक असतो. ह्या एकुलत्या एक उत्पादकाचा पुरवठ्याच्या बाजूवर संपूर्ण अधिकार चालतो आणि त्या अधिकाराचा वापर करून किंमतींत इष्ट असा फेरबदल त्याला घडवून आणणें शक्य होतें. मक्तेदाराचा अधिकार वस्तूच्या पुरवठ्याच्या बाजूपुरताच मर्यादित असतो, हें आग्रहानें सांगितलें पाहिजे. मागणीच्या बाजूवर त्याचा कांहींएक अधिकार चालत नाहीं. मागणीची परिस्थिति जी असेल ती गृहीत धरूनच त्याला आपलें धोरण आंखावें लागतें. मागणीच्या परिस्थितींत मागणीच्या लवचिकतेचा समावेश होतो. तेव्हां असें म्हणतां येईल कीं, मक्तेदारी असतां वस्तूच्या मागणीची लवचिकता आणि वैयक्तिक उत्पादकाच्या मालाला असलेल्या मागणीची लवचिकता ह्यांच्यांत कांहींएक फरक नसतो.[६]

तो नसावा हें स्वाभाविकच होय. कारण वस्तूचा उत्पादक एकच असल्यानें वस्तूकरितां मागणी आणि त्याच्या उत्पादनाकरितां मागणी ह्या दोन भिन्न गोष्टी

[५] A Monopolist is the single seller of a commodity, so in terms of Number of sellers monopoly is at the opposite pole from competition. —**Stigler.**

[६] A Monopolists ' demand curve is the demand curve for the monopolized product. ' —**Stigler.**

नसतात. बाजारांत जेव्हां एकापेक्षां अधिक उत्पादक असून त्यांच्यांत स्पर्धा चालू असते तेव्हां प्रत्येक उत्पादकाच्या मालाकरितां असलेल्या मागणीची लवचिकता वस्तूच्या मागणीची जी लवचिकता असेल तिच्यापेक्षां निश्चित अधिक असते. कारण किंमतींत फेरबदल करून इतर उत्पादकांच्या ग्राहकांना आकर्षित करण्यास प्रत्येक उत्पादकाला भरपूर धाव असतो. खुल्या स्पर्धेप्रमाणें मक्तेदारींत एकच किंमत बाजारांत असेल, अशी ग्वाही देतां येत नाहीं. उत्पादक एकच असल्यानें अनेक विक्रेत्यांच्या अनेक किंमती असण्याचा प्रश्नच मक्तदारींत उद्‌भवत नाहीं हें खरें; पण निरनिराळया ग्राहकांना निरनिराळ्या किंमती आकारणें मक्तेदाराला शक्य असतें. तसें करण्यास परिस्थिति अनुकूल आहे असें मक्तेदाराला वाटल्यास तसें तो करतोहि. पूर्ण मक्तेदारींतहि जाहीरातीसाठीं फारसा खर्च करण्याचें प्रयोजन नसतें. कारण मक्तेदाराची वस्तु ज्यांना हवी असेल त्यांना त्याच्याकडेच ती घेण्याशिवाय दुसरा मार्ग नसतो.

पूर्ण मक्तेदारी अपवादात्मक :––जगांतील सर्व वस्तूंच्या बाजारपेठांची तपासणी केली तर असें आढळून येईल कीं, पूर्ण स्पर्धा व पूर्ण मक्तेदारी (Perfect Monopoly) ह्या दोन्ही अपवादात्मकच आहेत. [७]

जेथें जेथें मक्तेदारी आढळते तेथें तेथें एकतर ती कायद्यानें म्हणजे राज्यसंस्थेच्या मान्यतेनें तरी प्रस्थापित झालेली असते किंवा आर्थिक दृष्टचा एकापेक्षां अधिक उत्पादकांना बाजारपेठेंत टिकून राहणें शक्यच नसतें म्हणून निर्माण झालेली असते. वस्तूची बाजारपेठ जर उत्पादनप्रमाणाच्या मानानें एवढी लहान असेल कीं, एकापेक्षां अधिक उत्पादकांना उत्पादन किफायतशीर होण्याचा सुतराम् संभव नाहीं; तर प्रस्थापित झालेली मक्तेदारी मोडण्यासाठीं दुसरा उत्पादक त्या बाजारपेठेंत शिरकाव करून घेण्यास धजावत नाहीं. एखाद्यानें तें धाडस केलेंच तर आधीं बस्तान मांडल्यामुळें ज्याचा उत्पादनखर्च बराच कमी झाला आहे त्याच्या बरोबरीला स्पर्धेत नव्यानें येणाऱ्याचा टिकाव न लागून त्याला लौकरच आपलें चंबुगबाळें आवरावें लागतें. त्यामुळें मक्तेदारी टिकते. विशिष्ट मार्गावरील वाहतुकीच्या साधनांबाबत बहुधा अशी परिस्थिति असते. त्यामुळें विशिष्ट मार्गावर विमान-वाहतूक, रेल्वे-वाहतूक किंवा जलवाहतूक करणारी एखादीच संस्था दिसून येते. कित्येक वेळां एकच काम करणाऱ्या एकापेक्षां अधिक संस्था असणें केवळ नुकसानीचेंच नव्हे तर गैरसोयीचें देखील असतें. उदाहरणार्थ: एकाच शहरांत विजेचा अगर पाण्याचा पुरवठा करणाऱ्या किंवा टेलिफोनची सोय उपलब्ध करून देणाऱ्या एकापेक्षां अधिक संस्था असणें किती गोंधळाचें होईल, ह्याची कल्पना करणें सोपें आहे. एकापेक्षां अधिक उत्पादन-संस्था असणें जेव्हां किफायतशीर किंवा सोयीचें नसतें तेव्हां अशी परिस्थिति ओळखून राज्यसंस्था बहुधा मक्तेदारीला आपली मान्यता देऊन तिला कायदेशीर स्वरूप प्राप्त करून देते

७ "Perfect competition is never likely to prevail in th production of any actual commodity." ––**Mrs. Robinson.**

Monopoly is not a common form of organisation —**Stigler.**

किंवा स्वतःचीच मक्तेदारी त्या बाजारपेठेंत प्रस्थापित करते. अशीं उदाहरणें थोडींच व म्हणून अपवादात्मकच असतात. आर्थिक दृष्टचा मक्तेदारी अपरिहार्य नसूनहि मक्तेदारी केवळ कायद्यानें प्रस्थापित केली आहे म्हणून टिकून राहते असेंहि होऊं शकतें. कायद्याच्या आधारावर एकाच उत्पादकाची किंवा उत्पादन-संस्थेची मक्तेदारी असण्याचे प्रकार राजसत्ता अनियंत्रित होती तेव्हां बऱ्याच प्रमाणांत आढळत; पण अलीकडील काळांत अशीं उदाहरणें तुरळकच असतात. एवंच काय, तर पूर्ण मक्तेदारी ही अपवाद म्हणूनच दिसून येते.

पूर्ण स्पर्धाहि अपवादात्मकच:––पूर्ण मक्तेदारी जशी अपवादात्मक असते तशी पूर्ण स्पर्धाहि अपवादात्मकच असते. बहुतेक प्रत्येक वस्तूची बाजारपेठ कोणत्या ना कोणत्या कारणानें गढूळ झालेली असते. बाजारांत उत्पादकांची संख्या लहान नसेल तर स्पर्धा गढूळ होऊं शकते. कारण त्या परिस्थितींत कोणत्याहि उत्पादकाचें बाजारांतील पुरवठ्याच्या बाजूकडील स्थान उपेक्षणीय नसतें आणि पुरवठ्याचें प्रमाण कमीअधिक करून किंमतीत फेरबदल घडवून आणण्याची मक्तेदाराएवढी नसली तरी कांहीं प्रमाणांत तरी त्याल शक्ति प्राप्त होते. तसेंच उत्पादकांची संख्या लहानमोठी कितीहि असो; सर्व उत्पादकांचा माल गुणदृष्टचा सारखा नाहीं, अशी उत्पादकांची खरीखोटी समजूत झालेली असेल किंवा किंमतीकडे लक्ष न देतां विशिष्ट विक्रेत्याकडूनच माल घेण्याची प्रवृत्ति ग्राहकांत कोणत्याहि कारणानें निर्माण झाली असेल तरीहि उत्पादकांतील स्पर्धा गढूळते. कारण तसें झाल्यास सबंध बाजारपेठ नसली तरी बाजापेठेचा एखादा भाग एका उत्पादकाच्या पूर्णपणें कह्यांत येतो आणि तेवढ्या भागापुरता जणूं तो मक्तेदारच बनतो. सारांशः **(१) उत्पादकांची संख्या लहान असणें (२) वस्तूंत गुणभेद असणें किंवा (२) विशिष्ट विक्रेत्यांनाच ग्राहकांची पसंती लाभणें हीं स्पर्धा गढूळ होण्याची तीन कारणें आहेत.** ह्यांपैकीं कोणतीहि एक दोन अगर तीन्ही गोष्टी बाजारांत आढळून आल्यास विक्रेत्यांची संख्या एकापेक्षां अधिक असूनहि व त्या विक्रेत्यांत स्पर्धेचा संबंध असूनहि त्यांच्यांतील स्पर्धेचें शुद्धत्व नष्ट होतें. जेव्हां स्पर्धा कोणत्याहि एक अगर अधिक कारणामुळें डागळलेली असेल तेव्हां बाजारपेठेंतील त्या परिस्थितीला अर्थशास्त्रांत अशुद्ध किंवा अपूर्ण स्पर्धा (Imperfect Competition) असें म्हणतात. अशुद्ध स्पर्धेमुळें पूर्ण मक्तेदारी जरी बाजारांत आढळली नाहीं तरी मक्तेदारीचीं चिन्हें—विशेषतः वस्तूच्या किंमतीवर वैयक्तिक उत्पादकाचा अधिकार हें मक्तेदारीचें प्रमुख लक्षण—बाजारांत दिसूं लागतात. म्हणूनच अपूर्ण स्पर्धेला मक्तेदारीयुक्त स्पर्धा (Monopolistic Competition) असेंहि म्हटलें जातें. अपूर्ण किंवा मक्तेदारीयुक्त स्पर्धा हा आजच्या जगांतील बाजारपेठांचा नियम आहे. पूर्ण स्पर्धा किंवा पूर्ण मक्तेदारी हा अपवाद आहे. बहुतेक सर्व वस्तूंच्या बाजारपेठा पाहिल्या तर असेंच दिसून येतें कीं, उत्पादकांची लहान संख्या, वस्तूंतील गुणभेद, किंमत किंवा मालाचा दर्जा ह्यांखेरीज अन्य गोष्टींतहि प्राधान्य देण्याची ग्राहकांची प्रवृत्ति ह्यांपैकीं एक-दोन अगर तीन्ही गोष्टीचें अस्तित्व

त्यांत आहे. सारांश: आजचें जग हें स्पर्धकांचें जग आहे, असें म्हणण्यापेक्षां मक्तेदारांचें जग आहे (A world of Monopolies), असें म्हणणेंच अधिक सयुक्तिक ठरतें.[८]

अपूर्ण स्पर्धा अपरिहार्य:—अपूर्ण स्पर्धा हा नियम व पूर्ण स्पर्धा हा अपवाद. अशी परिस्थिति कां असते, हें पाहिलें असतां असें समजून येईल कीं, **सध्यांची उत्पादनपद्धति व एकंदर मनुष्यस्वभाव लक्षांत घेतां अपूर्ण स्पर्धा ही गोष्ट अगदीं अपरिहार्य आहे.** अपूर्ण स्पर्धा अपरिहार्य असण्याचें पहिलें कारण असें कीं, उत्पादन-संस्थांकडून होणाऱ्या उत्पादनाचें प्रमाण एवढें वाढलें आहे कीं, वस्तूच्या बाजारपेठेंत प्रत्येक उत्पादकाचें स्थान उपेक्षणीय ठरेल एवढ्या उत्पादकांना स्थान मिळूं शकतच नाहीं. मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणारे थोडे उत्पादक अशीच परिस्थिति आधुनिक स्वरूपाच्या उद्योगधंद्यांत आढळणेंच अधिक संभवनीय असतें. शेतीच्या क्षेत्रांत मात्र अल्प प्रमाणावर उत्पादन करणाऱ्यांना अद्यापहि बराच वाव आहे; पण उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत कांहीं विशिष्ट परिस्थितींतच अल्प प्रमाणावर उत्पादन तग धरूं शकतें. तशी परिस्थिति हल्लीं फारशी आढळत नाहीं. बहुतेक सर्व वस्तूंचें उत्पादन अलीकडे यंत्राच्या सहाय्यानें एकसांच्याचें असें होतें. त्यामुळें मोठ्या प्रमाणावरील उत्पादनच उत्पादन-खर्चदृष्ट्या किफायतशीर ठरतें. मोठ्या प्रमाणावर उत्पादनाचे फायदे जेव्हां स्पष्ट दिसूं लागतात तेव्हां मोठ्या प्रमाणावर उत्पादनाची प्रवृत्ति वाढते आणि लहान प्रमाणावर उत्पादन सुरू करणें वा चालू ठेवणें शक्यच होत नाहीं. बाजार-पेठेच्या मानानें उत्पादनप्रमाण वाढलें कीं, वस्तूच्या उत्पादनाच्या क्षेत्रांत थोडे उत्पादकच राहूं शकतात. आजच्या उद्योगधंद्यांत हीच सर्वसामान्य परिस्थिति आहे. शिवाय मोठ्या प्रमाणावरील उत्पादन-व्यवस्थेचे फायदे मिळविण्यासाठीं निरनिराळ्या उत्पादनसंस्थांचें येनकेन प्रकारेण एकत्रीकरण करण्याची प्रवृत्तिहि आजकाल वाढत्या प्रमाणावर दिसून येते. त्यामुळेंहि पुरवठ्याच्या क्षेत्रांत थोड्या उत्पादकांचेंच वर्चस्व राहिलें. सारांश: यंत्राधिष्ठित व तत्सम भांडवलप्रधान अशा आजच्या उत्पादनपद्धतींत उत्पादनाचें केंद्रीकरण व त्या योगानें पूर्ण स्पर्धेचा अभाव अपरिहार्य आहे.

वस्तूंत गुणभेद असतात:—एकाच नांवानें बाजारांत विकल्या जाणाऱ्या वस्तूंत गुण-भेद अजिबात नसावा व सर्व उत्पादकांचा माल अगदीं एकसारखा व

---

[८] Neither single firm monopoly nor pure competition is especially common — ; these categories represent mainly extreme cases between the limits of which most real markets lie. In practice the situation in an industry is very frequently that there is neither one seller nor very many small sellers. Moreover the products they sell, regardless of their numbers are usually not identical but differentiated in some degree. —**Bain.**

म्हणून एकमेकांची जागा सहजीं घेऊं शकणारा असा असावा, ही शुद्ध स्पर्धेची अपेक्षाहि वास्तव जगांत पुरी होणें शक्य नसतें. व्यवहारी जगांत निरनिराळ्या उत्पादकांच्या उत्पत्तींत (Output) ती एकाच नांवानें बाजारांत दिसली तरी, खराखोटा, सूक्ष्म-स्थूल, काल्पनिक-वास्तविक असा फरक असावयाचाच.[१]

दोन-तीन उदाहरणें ह्या बाबतींत देतां येतील. निरनिराळ्या कारखान्यांतून निघणाऱ्या मोटारगाड्यांत कांहीं एक फरक नसतो आणि ग्राहकानें ही मोटार घेतली काय, किंवा दुसरी घेतली काय सर्व सारखेंच असें कोण म्हणूं शकेल ? रेडिओचें असेंच आहे. एकाच किंमतीला विकल्या जाणाऱ्या पण विविध छाप परिधान करणाऱ्या अंगाला लावावयाच्या साबणाच्या वड्यांमध्यें सूक्ष्मसुद्धां फरक नसतो, असें कसें म्हणतां येईल ? चहाचे किंवा सिगरेटचे विविध नमुने ह्यांच्यांतील फरक तर काय अगदीं जाणवतोच. तेव्हां एकाच नांवानें ओळखल्या जाणाऱ्या वस्तु-वस्तूंत फरक हा असतोच, असें सरसकट जरी म्हणतां आलें नाहीं तरी बहुतेक वस्तूंच्या बाबतींत तसें म्हणतां येतें.

कित्येक वेळां विविध विक्रेत्यांकडून विकल्या जाणाऱ्या मालांतील फरक निव्वळ काल्पनिक असतो. म्हणजे तसा कांहीं फरक आहे, अशी ग्राहकाची अकारण समजूत होते किंवा तशी ती विक्रेत्याकडून करून दिली जाते. मग त्या समजुतीला चिकटन विशिष्ट विक्रेत्याला—म्हणजेच मालाच्या विशिष्ट नमुन्यालाच ग्राहक धरून बसतो. त्या नमुन्याची किंमत इतर नमुन्यांपेक्षां अधिक झाली तरी ती जोंपर्यंत त्याला परवडत आहे तोंपर्यंत ती द्यावयास मागेंपुढें पहात नाहीं. ग्राहकाच्या मनांत कांहीं कल्पना निर्माण करण्यांत जाहिरातीचा भाग मोठा असतो. जाहिरातीच्या मदतीनें प्रत्येक उत्पादक अशी समजूत ग्राहकवर्गांत निर्माण करण्याचा प्रयत्न करतो कीं, आपल्या मालाच्या तोडीचा माल जगाच्या पाठीवर अन्यत्र कोठेंहि मिळावयाचा नाहीं; तेव्हा लोकांनीं माल घ्यावा तर आपलाच. अलीकडील जगांत जाहिरात हे एक स्वतंत्र शास्त्र आहे. त्या शास्त्रांत अनेक शस्त्रें आहेत, आणि व्यक्तीच्या विविध प्रवृत्तींना आवाहन करून व्यक्तीला भुरळ पाडण्याचें एक खास तंत्र आहे. त्या तंत्राचा उपयोग करून प्रत्येक उत्पादक बाजाराचें एक क्षेत्र निश्चितपणें आपल्यास उपलब्ध व्हावें, जमल्यास सबंध बाजारपेठ आपल्याच हातांत यावी अशी खटपट करीत असतो. साबणाचेंच उदाहरण घ्या ना. साबणाचा प्रत्येक उत्पादक आपल्या साबणाची अशी कांहीं जाहिरात करतो कीं, विचारण्याची सोय

[१] Products of various firms producing a given sort of commodity are in most cases not identical or perfect substitutes. In most instances, the out put of firms producing the same sort of goods are some what imperfect substitutes in the eyes of buyers, being differentiated one from another by design, quality, packing, advertising or direct sales promotion. —**Bain**.

नाहीं. त्यासाठीं तो आकाशांत फुगे उडवील, कोणत्या सिनेमानटचा आपला साबण वापरतात, हें त्यांच्याकडूनच वदवून घेऊन लोकांना खुलवील, आपला साबण वापरला नाहीं तर कोणकोणत्या रोगजंतूना शरीरांत प्रवेश मिळेल, ह्याचें भीती-दायक चित्र लोकांपुढें उभें करील, आपला साबण वापरला तर प्रेम, उत्कर्ष, सौंदर्य, संपत्ति इत्यादि गोष्टी मिळण्यास कशी मदत होईल, तेंहि लोकांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न करील. थोडक्यांत काय वाटेल तें करील. हें सर्व करण्याचा हेतु एकच. तो म्हणजे किंमतीला महत्त्व न देतां आपल्याशीं एकनिष्ठ राहाणारा असा एक वर्ग ग्राहकांमध्यें निर्माण करावयाचा व त्या त्या वर्गाचा विस्तार शक्य तेवढा वाढवावयाचा. जाहिरातीमुळें निर्माण होणाऱ्या समजुती कित्येकदां काल्पनिक असतात, हें नाकारतां यावयाचें नाहीं. पण त्या असतात, हें विसरूनहि चालणार नाहीं. कारण वस्तूंतील गुणभेद वास्तविक असो वा काल्पनिक असो, त्यांचा परिणाम एकच आणि व्हावयाचा तोच होतो. त्यामुळें विविध उत्पादकांतील पूर्ण स्पर्धा नाहींशी होऊन अपूर्ण स्पर्धेचें वातावरण निर्माण होतें. वस्तूंतील गुणभेदामुळें स्पर्धेंतील अपूर्णत्व कमी होणें हें अपरिहार्यच समजलें पाहिजे. कारण पहिली गोष्ट अशी कीं, अनेक उत्पादकांचा माल बाजारांत येत असतां, मालामालांत सूक्ष्म फरकहि असूं नये व असलाच तर तो कोणालाहि कळूं नये अशी अपेक्षाच करणें चूक आहे. दुसरी गोष्ट अशी कीं, मनुष्याची मानसिक घडण लक्षांत घेतां व्यावहारिक जगांत थोडयाफार प्रमाणांत जाहिरातबाजी ही चालावयाचीच आणि तिचे परिणाम बाजारावर व्हावयाचेच. मग त्या परिणामांचें प्रमाण कांहींहि असो.[१०]

मनुष्यस्वभाव लक्षांत घेतां तिसऱ्या एका कारणामुळें स्पर्धा शुद्ध राहूं शकत नाहीं. बाजारांत ग्राहक मालाचा दर्जा व किंमत ह्या दोनच गोष्टी विचारांत घेतो. त्यामुळें विक्रेत्याशीं त्याचे संबंध अगदीं अवैयक्तिक स्वरूपाचें असतात, असें गृहीत धरून मूल्यनिश्चितीची मीमांसा करतां येईल; पण तसें करणें वास्तवतेला धरून होणार नाहीं. ग्राहकांत सर्व प्रकारचे नमुने असतात आणि तसें असण्याचा परिणाम बाजारावर होत असतो. ग्राहकांत कांहीं आळशी असतात, कांहीं अज्ञानी असतात, कांहीं बेफिकीर असतात, कांहींना पुरेशी सवड नसते. अशा ग्राहकांचें मालाच्या किंमतीकडे व दर्जाकडे दुर्लक्षच होऊन विक्रेत्यांचें फावत असतें. शिवाय ग्राहक व विक्रेते ह्यांच्यामध्यें वैयक्तिक स्वरूपाचे अनेक लागेबांधे असतात व त्यांचाहि परिणाम बाजारावर होत असतो. शेजारधर्मामुळें, मैत्रीमुळें नात्यागोत्याच्या बंधना-मुळें, पूर्वपरंपरेमुळें, इतरांच्या दडपणामुळें, विशेष सोय असल्यामुळें, अनुकरणप्रियते-मुळें, अशा एक ना अनेक बाजारपेठेंशीं प्रत्यक्षरीत्या संबंधित नसलेल्या कारणामुळें

[१०] Rival producers compete against each other in quality, in facilities, and in advertisement, as well as in price, and the very intensity of competiton, by forcing them to attract the customers in every possible way, itself breaks up the market. –**Mrs. Robinson**.

विशिष्ट विक्रेत्याकडूनच खरेदी करावयाची किंवा विशिष्ट उत्पादकाचा मालच नेहमीं घ्यावयाचा, अशी प्रवृत्ति कित्येक ग्राहकांत दिसते आणि तीमुळेंहि खुली स्पर्धा गढूळ होते.[११]

अर्थात् त्याबद्दल ग्राहकांना दोष देतां येणार नाहीं. कारण मनुष्यस्वभावाशीं विसंगत असें त्यांत कांहीं नाहीं. मनुष्यस्वभाव कसा आहे, ह्याची नीट पारख केल्यास अपूर्ण स्पर्धा हीच अधिक नैसर्गिक व वास्तवतेला धरून आहे. म्हणूनच ती अपरिहार्य कशी, ह्याचा उलगडा होण्यास वेळ लागत नाहीं.

अपूर्ण स्पर्धेचें परिणाम :—अपूर्ण स्पर्धेचा मुख्य परिणाम होतो तो असा कीं, प्रत्येक विक्रेत्याभोंवतीं किंवा उत्पादकाभोंवतीं त्याच्याशीं विशिष्ट मर्यादेपर्यंत एकनिष्ठ राहणारा एक गट निर्माण होतो आणि त्या गटापुरता तो एक छोटासा मक्तेदारच बनतो. अशा प्रकारें कोणत्या ना कोणत्यातरी उत्पादकाच्या गटांत समाविष्ट होणारा ग्राहकवर्ग सोडल्यानंतर ग्राहकवर्गाचा जो भाग उरतो तो मात्र किंमतीचा व दर्जाचाच विचार करणारा असतो आणि ज्याच्याकडून माल घेणें किफायतशीर वाटेल त्याच्याकडून माल घ्यावयास तयार असतो. अपूर्ण स्पर्धेत प्रत्येक विक्रेत्याचा विचार स्वतंत्रपणें करावा लागतो. कारण प्रत्येक विक्रेत्याच्या मालाला असलेल्या मागणीची परिस्थिति भिन्न असते. ती परिस्थिति ज्या त्या विक्रेत्याशीं एकनिष्ठ राहणारा ग्राहकांचा समूह आकारानें किती लहानमोठा आहे त्याच्यावर अवलंबून असते. मागणीची परिस्थिति भिन्न असते. ह्याचा अर्थ असा कीं, प्रत्येक विक्रेत्याच्या मालाला जी मागणी असते तिची लवचिकता सारखी नसते. ती कमीजास्त असते. प्रत्येक विक्रेत्याच्या मालाला असलेल्या मागणीचे दोन भाग पडतात. पहिल्या भागांत एकनिष्ठ ग्राहकांची मागणी येते. ही मागणी कांहीं मर्यादेपर्यंत तरी बिनलवचिकच असते. (Inelastic) कारण ती किंमतीच्या पातळीवर फारशी अवलंबून नसते. अर्थात् किंमत विशिष्ट मर्यादेपलीकडे वाढल्यास ग्राहकांची एकनिष्ठा डळमळीत होऊं शकते आणि कोणत्या मर्यादेपर्यंत एकनिष्ठ रहावयाचें, ह्यासंबंधीं प्रत्येक ग्राहकाच्या कल्पना वेगळ्या असतात. ह्या दोन गोष्टी येथें लक्षांत ठेवल्या पाहिजेत. त्यामुळेंच कोणत्याहि विक्रेत्याच्या मालाची मागणी संपूर्णपणें बिन-लवचिक किंवा ताठर नसते; पण एकनिष्ठ ग्राहकांमुळें तिच्यांत थोड्याफार प्रमाणांत ताठरपणा येतो. मागणीच्या दुसऱ्या भागांत कोणाशींहि एकनिष्ठ नसणारा ग्राहकांचा

[११] 'In actual markets the customer takes into account a great deal besides the prices at which rival producers offer him their goods. Quite apart from the inertia or ignorance which prevents him from moving instantly from one seller to another, as soon as a difference appears between the prices which they charge, he has a number of good reasons for prefering one seller to another'.

—**Mrs. Robinson.**

वर्ग येतो. ह्या वर्गामुळें मागणी लवचिक (Elastic) होण्यास मदत होते. कारण किंमत कमी केल्यास ग्राहकांचा हा वर्ग कोणत्याहि उत्पादकास आपल्याकडे आकृष्ट करून घेतां येतो आणि किंमत वाढवल्यास हा वर्ग लागलीच इतर उत्पादकांकडे वळतो. प्रत्येक उत्पादकाचा जो एकनिष्ठ ग्राहकवर्ग असेल त्या मानानें ग्राहकांचा दुसरा म्हणजे स्वतंत्र ग्राहकवर्ग आकारानें किती लहानमोठा आहे, ह्यावर त्या त्या उत्पादकाच्या मालाला असलेल्या मागणीची लवचिकता अवलंबून असते. ह्या बाबतींत सर्वसामान्य नियम असा सांगतां येईल कीं, ज्या उत्पादकांचा एकनिष्ठ ग्राहकवर्ग स्वतंत्र ग्राहकवर्गाच्या मानानें मोठा असेल त्यांच्या मालाची मागणी बिनलवचिकपणाकडे—ताठरपणाकडे—झुकते. उलट ज्यांचा एकनिष्ठ ग्राहकवर्ग लहान त्यांच्या मालाची मागणी लवचिकपणाकडे झुकते. कारण त्यांनीं किंमत कमी केल्यास त्यांच्याकडे आकृष्ट होणारा व किंमत वाढविल्यास त्यांना सोडून जाणारा वर्ग मोठा असतो. अपूर्ण स्पर्धेच्या परिस्थितींतील मागणीच्या लवचिकपणाबद्दल दुसरा एक सर्वसामान्य नियम असा सांगतां येतो कीं, अपूर्ण स्पर्धा असतां प्रत्येक उत्पादकाच्या मालाची मागणी पूर्ण स्पर्धेतील उत्पादकाच्या मालाच्या मागणीपेक्षां केव्हांहि कमी लवचिक असते. पूर्ण स्पर्धेत सर्वच्या सर्व ग्राहक स्वतंत्र व कोणत्याहि प्रकारचे अन्य लागेबांधे न पाळणारा असल्यानें प्रत्येक उत्पादकाच्या दृष्टीनें मागणीची लवचिकता अमाप (Infinite) असते, हें ह्यापूर्वींच सांगितलें आहे. तेवढी लवचिकता अपूर्ण स्पर्धेत असणें शक्यच नसतें. तथापि हेंहि खरेंच कीं, अपूर्ण स्पर्धेतील कोणत्याहि उत्पादकाला आढळून येणारी मागणीची लवचिकता पूर्ण मक्तेदारींतील एकुलत्या एक मक्तेदाराच्या मालाला असलेल्या मागणीच्या लवचिकपणापेक्षां अधिक असते. कारण मक्तेदारींत सर्व ग्राहकवर्गाला कोणत्याहि परिस्थितींत मक्तेदाराकडून माल घेणें भागच पडत असल्यानें किंमतींतील फेरबदलानें आकृष्ट होणारा किंवा सोडून जाणारा वर्ग तेथें नसतोच; पण असा वर्ग कांहीं प्रमाणांत तरी अपूर्ण स्पर्धेमध्यें असतो. सारांश : अपूर्ण स्पर्धेच्या परिस्थितींतील मागणीची लवचिकता पूर्ण स्पर्धेतील मागणीच्या लवचिकपणापेक्षां कमी पण पूर्ण मक्तेदारींतील मागणीच्या लवचिकपणापेक्षां अधिक असते.

अपूर्ण स्पर्धेत अनेक किंमती :—पूर्ण स्पर्धा असतां बाजारांत सर्वत्र एकच किंमत प्रस्थापित होते, हें ह्यापूर्वीं सांगितलें आहे. अपूर्ण स्पर्धा बाजारांत असतां सर्वत्र एकच किंमत बाजारांत आढळेल, असा भरंवसा देतां येत नाहीं. कारण उघड आहे. वर दाखविल्याप्रमाणें अपूर्ण स्पर्धेत प्रत्येक उत्पादक हा एक छोटासा मक्तेदार असतो व प्रत्येकाच्या मागणीची परिस्थिति इतरांपेक्षां अगदीं भिन्न असते. त्यामुळें इतरांच्या किंमतीकडे लक्ष देण्याऐवजीं आपल्यापुरती मागणी कशी आहे, त्याचा अभ्यास करून स्वतंत्रपणें आपल्याला सोयीची व फायद्याची किंमत ठरवून घेण्याची प्रवृत्ति उत्पादकामध्यें निर्माण होते. प्रत्येक उत्पादकाच्या मालाची किंमत कशी ठरते हा अर्थात् अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे आणि त्याची चर्चा विस्तारानें पुढें केली जाईलच; पण ह्या ठिकाणीं लक्षांत घेण्याची महत्त्वाची

गोष्ट अशी कीं, जेवढे उत्पादक तेवढ्या वेगवेगळ्या किंमती बाजारांत दिसून येणें अगदीं संभवनीय असतें.

जाहिरातबाजी :—अपूर्ण स्पर्धेत जाहिरातबाजीला फार मोठें स्थान असतें. प्रत्येक उत्पादकाला वस्तूची किंमत आपल्या आधीन व्हावी व तें शक्य व्हावें म्हणून बाजारपेठेंतील जास्तींत जास्त ग्राहकवर्ग आपल्याशीं एकनिष्ठ व्हावा अशी इच्छा असते. त्या दृष्टीनें तो साहजिकच प्रयत्न करीत असतो. त्या प्रयत्नांचा एक महत्त्वाचा भाग म्हणूनच तो आपल्या मालाची विविध प्रकारें जाहिरात करीत असतो व आपला माल सर्वोत्कृष्ट कसा हें ग्राहकांच्या मनावर ठसविण्याची खटपट करतो. त्या खटपटींत त्याला ज्या प्रमाणांत यश येतें त्या प्रमाणांत बाजारांतील किमतींत इष्ट असा फेरबदल घडवून आणण्याची किंवा निराळ्या शब्दांत इतर विक्रेत्यांच्या किंमतीकडे लक्ष न देतां आपल्यापुरती स्वतंत्र किंमत ठरविण्याची ताकद त्याला प्राप्त होते.

अपूर्ण स्पर्धेचीं लक्षणें :—अपूर्ण स्पर्धेबाबत आतांपर्यंत केलेल्या विवेचनाचा आशय असा कीं, अपूर्ण स्पर्धेचीं नजरेंत भरणारीं अशीं तीन प्रमुख लक्षणें असतात. तीं अशीं : (१) बाजारपेठेंत उत्पादक व विक्रेत्यांची संख्या लहान असते. त्यांची आपापसांत स्पर्धा चालू असते. त्यांतील प्रत्येकाचें पुरवठ्याच्या बाजूस महत्त्वाचें स्थान असतें. कारण पुरवठ्याच्या मोठ्या भागाबद्दल प्रत्येकजण जबाबदार असतो आणि पुरवठा कमीजास्त करून किंमतींत फेरबदल घडवून आणण्याची ताकद प्रत्येकांत असते : (२) बाजारपेठेंत जाहिरातबाजी मोठ्या प्रमाणावर चालू असते. उत्पादकांत स्पर्धा चालू असली तरी त्या स्पर्धेची बाधा आपल्यास शक्य तों लागू नये आणि इतरांकडे लक्ष न देतां आपल्या मालाची किंमत स्वतंत्रपणें ठरविण्याची शक्ति आपल्यास प्राप्त व्हावी, ह्या दिशेनें प्रत्येक उत्पादक प्रयत्न करीत असतो. त्यासाठींच जाहिराबाजीचा आश्रय घेतला जातो. अर्थातच प्रत्येक उत्पादकाला प्रत्यक्ष उत्पादनखर्चाखेरीज मालाची विक्री वाढावी म्हणून विविध प्रकारें केल्या जाणाऱ्या जाहिरातीवर खास असा जाहिरातखर्च करावा लागतो. ह्या जाहिरात-खर्चालाच प्रामुख्यानें विक्रीखर्च (Selling Cost) असें म्हटलें जातें. (३) वस्तु एकच; पण तिची किंमत मात्र ठिकठिकाणीं भिन्न, अशी परिस्थिति बाजारांत दिसून येते. जों पावेतों विक्रेत्याविक्रेत्यांतील स्पर्धेला प्राधान्य असतें तोंपावेतों विक्रेत्यास इतरांनीं आकारलेल्या किंमतीकडे दुर्लक्ष करून आपल्या मालाची किंमत स्वतंत्रपणें ठरवितां येत नाहीं. पण जसजसा विक्रेता आपलें बस्तान बसवून स्पर्धेपासून मुक्त होण्यांत यशस्वी होतो तसतशी स्वतंत्रपणें आपल्या मालाची किंमत स्वतंत्रणें आकारण्याची शक्ति विक्रेत्याला प्राप्त होते. असें ज्या प्रमाणांत होतें त्या प्रमाणांत एकापेक्षां अधिक किंमती बाजारांत दिसू लागतात. अपूर्ण स्पर्धेचीं हीं तीन दृश्य लक्षणें विचारांत घेतलीं तर सध्यांच्या जगांत बहुतेक वस्तूंचा बाजारपेठेंत पूर्ण स्पर्धेचा

अभाव असून अपूर्ण स्पर्धेचीच परिस्थिति आहे, हें कोणासहि उमजेल. कारण बहुतेक वस्तूंच्या बाजारपेठेंत वरील तिन्ही अगर त्यांतील निदान एक अगर दोन गोष्टी आढळतातच.

(आ) वस्तुमूल्य कसें ठरतें ?

दीर्घकालाचा विचार करतां—म्हणजे ज्या काळांत पुरवठ्यांत वाटेल तेवढी भर होण्यास अगर पुरवठा वाटेल तेवढा कमी होण्यास भरपूर वाव आहे अशा कालावधीचा—जी किंमत प्रस्थापित झाली असतां बाजारांत स्थैर्य दिसून येतें तीच किंमत ही दीर्घकालीन समतोलमूल्य (Long period equilibrium price) होय. ही किंमत कशी ठरते व कशावर अवलंबून असते, ह्याचा शोध घेणें, हाच प्रस्तुत विवेचनाचा मुख्य उद्देश आहे.

दीर्घकालीन समतोल होण्याच्या अटी :—बाजारांत पूर्ण स्पर्धा असो, अपूर्ण स्पर्धा असो, कीं पूर्ण मक्तेदारी असो; पुरवठ्याच्या बाजूला स्थैर्य यावयाचें असेल तर पुढील दोन अटी पूर्ण झाल्या पाहिजेत. त्या अशा (१) कोणत्याहि उत्पादकाला आपलें उत्पादन वाढवावें अगर कमी करावें, असें वाटण्याजोगी परिस्थिति बाजारांत असूं नये आणि (२) आपलें उत्पादन अजिबात बंद करून बाजारपेठेंतून बाहेर पडावें, असेंहि कोणत्याहि उत्पादकास वाटूं नये किंवा नव्यानें उत्पादन सुरू करून उत्पादक म्हणून बाजारांत प्रवेश करावा, असेंहि कोणत्याहि व्यक्तीस वाटूं नये. निराळ्या शब्दांत उत्पादकांच्या संख्येंत वाढ अगर घट होईल असें कारण बाजारांत असूं नये. बाजाराला स्थैर्य येण्याच्या ह्या दोन ज्या शर्ती आहेत त्यांपैकीं दुसरी शर्त मक्तेदारीला लागू पडत नाहीं. कारण मक्तेदारीचा अर्थच असा असतो कीं, उत्पादकांच्या संख्येंत घट अगर वाढ होण्याचा प्रश्नच तेथें उद्भवत नाहीं. हें लक्षांत घेऊन असें म्हणतां येईल कीं, बाजारांत स्पर्धा असल्यास ज्या किंमतीमुळें उत्पादकांची संख्या स्थिर राहते व प्रत्येक उत्पादकाचें उत्पादन स्थिर राहतें—म्हणजेच उत्पादन वाढण्यास अगर कमी होण्यास कोणतेंहि कारण शिल्लक राहत नाहीं—त्या किंमतीमुळें बाजारांत दीर्घकालीन स्थैर्य प्रस्थापित होतें. तेव्हां ती किंमत म्हणजेच त्या वस्तूच्या बाजारपेठेंतील दीर्घकालीन मूल्य (Long run normal Value) होय. मक्तेदारीस हाच नियम लागू पडतो. पण तो मांडतांना थोडा फरक मात्र केला पाहिजे. मक्तेदारींत उत्पादकांच्या संख्येंत वाढ अगर घट होण्याचा प्रश्नच उपस्थित होत नसल्यामुळें त्या अटीचा उल्लेख न करतां एवढेंच म्हटलें पाहिजे कीं, ज्या किंमतीमुळें आपलें उत्पादन वाढवावें अगर कमी करावें, असें मक्तेदारास वाटण्याचें कारण नसतें ती किंमत हेंच मक्तेदारींतील दीर्घकालीन मूल्य होय. सारांश, पूर्ण स्पर्धेत वरील दोन्ही अटी पुऱ्या व्हाव्या लागतात आणि मक्तेदारींत फक्त पहिलीच अट पुरी व्हावी लागते. ही गोष्ट लक्षांत घेऊन प्रथम अनुक्रमें पूर्ण स्पर्धेत

व पूर्ण मक्तेदारीत दीर्घकालीन मूल्य कोणत्या पातळीवर स्थिरावूं शकेल हें पाहूं आणि नंतर अपूर्ण स्पर्धेचा विचार करूं. अपूर्ण स्पर्धा जगांत नियम व पूर्ण स्पर्धा किंवा पूर्ण मक्तेदारी हा अपवाद, असें असूनहि तात्त्विक चर्चेंत पूर्ण स्पर्धा किंवा पूर्ण मक्तेदारी ह्यांना प्रथम स्थान देणें हितावह ठरतें. कारण अपूर्ण स्पर्धेतील वस्तुमूल्य-निश्चितीबाबतच विचार प्रथम ज्यांनीं पुढें मांडला त्या श्रीमती जोन रॉबिन्सन ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें पूर्ण स्पर्धा व पूर्ण मक्तेदारी हीं वास्तविक सृष्टींतील दोन टोंकें आहेत व त्यांच्या आधारेंच अर्धवट स्पर्धा, अर्धवट मक्तेदारी ह्या स्थितीवर चांगला प्रकाश पडतो.

पूर्ण स्पर्धेतील वस्तुमूल्य-निश्चिति :—पूर्ण स्पर्धेत कोणत्याहि उत्पादकास उत्पादन कमीअधिक करण्याची इच्छा राहूं नये, ही शर्त प्रथम पुरी व्हावी लागते. ही शर्त केव्हां पुरी होते, ह्या प्रश्नाचें उत्तर असें कीं, जेव्हां प्रत्येक उत्पादकास असें वाटत असतें कीं, आपल्याला प्राप्त परिस्थितींत जास्तींत जास्त नफा मिळत आहे तेव्हां जें उत्पादनप्रमाण गांठलेलें असतें त्यांत बदल करण्याची इच्छा कोणत्याहि उत्पादकाच्या मनांत निर्माण होत नाहीं. कारण त्या परिस्थितींत उत्पादन कमी करणेंहि तोटयाचें असतें आणि तें वाढविणेंहि तोटयाचें असतें. म्हणजे उत्पादन वाढविल्यास अगर कमी केल्यास मिळणारा फायदा जास्तींत जास्त फायद्यापेक्षां कमी होतो. हें जर खरें असेल तर मग असा प्रश्न उपस्थित होतो कीं, उत्पादनांत जास्तींत जास्त नफा केव्हां होत आहे, हें कसें ओळखावें ? ह्या प्रश्नाचें जें उत्तर आहे त्यानें पहिली शर्त केव्हां पुरी होते, ह्याचा नेमका बोध होतो. तें उत्तर असें कीं, जेव्हां उत्पादनाचा सीमान्त-खर्च (Marginal Cost i.e. M.C.) आणि उत्पादित मालाच्या विक्रीपासून होणारी सीमान्त-प्राप्ति (Marginal Revenue i. e. M. R.) रकमेनें सारखीं होतात तेव्हां उत्पादकांस जास्तींत जास्त नफा मिळतो. सीमान्त-उत्पादन-खर्च म्हणजे उत्पादनाचें शेवटचें परिमाण उत्पादन करावयास लागणारा खर्च किंवा निराळ्या शब्दांत शेवटलें परिमाण उत्पादित करावयाचें ठरविल्यामुळें एकंदर उत्पादन-खर्चांत (Total cost of production) पडणारी भर व सीमान्त-प्राप्ति [१२] म्हणजे शेवटच्या उत्पादित परिमाणापासून उत्पादकाच्या एकूण प्राप्तींत (Total Revenue) पडणारी भर ह्यांच्यांत जेव्हां तफावत नसेल तेव्हां उत्पादन थांबविण्याची सूचना उत्पादकास मिळते, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सीमान्त-खर्चापेक्षां सीमान्त-प्राप्ति अधिक असेल तर शेवटचें किंवा सीमान्तपरिमाण (Marginal Unit or Marginal Product) उत्पादित करण्यामुळें एकंदर नफा वाढतो. ह्या घटनेचा उत्पादक साहजिकच असा अर्थ घेतो कीं, उत्पादन

[१२] The addition to total revenue produced by selling an additional unit of output is marginal revenue. —**Mrs. Robinson.**

वाढवून आपला नफा वाढविण्यास अद्यापीहि अवकाश आहे. मग उत्पादन वाढविण्यास तो प्रवृत्त होतो. ह्याच्या उलट सीमान्त-खर्चापेक्षां सीमान्त-प्राप्ति कमी असेल तर त्याचा अर्थ असा होतो कीं, शेवटच्या परिमाणामुळें--म्हणजे उत्पादन वाढल्यामुळें उत्पादकास तोटा होत आहे. ह्या परिस्थितींत उत्पादक उत्पादन कमी करण्यास प्रवृत्त होतो. सीमान्त-खर्च = सीमान्त-प्राप्ति, अशी जेव्हां परिस्थिति असते तेव्हां मात्र उत्पादन वाढविण्याचें अगर कमी करण्याचें कांहींहि कारण नसतें. थोडक्यांत सीमान्त-खर्च = सीमान्त-प्राप्ति म्हणजेच MR = MC, अशी परिस्थिति जेव्हां निर्माण होते तेव्हां उत्पादकास जास्तींत जास्त नफा मिळाला पाहिजे आणि उत्पादनप्रमाण स्थिर झालें पाहिजे, ही पहिली शर्त पुरी होते. पूर्ण स्पर्धेत एकाच उत्पादनप्रमाणामुळें सर्व उत्पादकांना जास्तींत जास्त नफा होतो, हें सहज समजण्याजोगें आहे. कारण सर्व उत्पादकांच्या बाबतींत उत्पादनखर्चाची व मागणीची परिस्थिति सारखीच असते. उत्पादनाचें कोठलेंहि प्रमाण असतां सर्वांचा सीमान्त-खर्च व सर्वांची सीमात-प्राप्ति-सारखीच असते.

दुसरी अट केव्हां पुरी होते ? :—उत्पादकांची संख्या कमी अगर अधिक होऊं नये, ही पूर्ण स्पर्धा असलेल्या बाजारपेठेंत स्थैर्य निर्माण होण्याची दुसरी अट असते. ती पुरी व्हावयाची असेल तर एकंदर उत्पादनांत उत्पादकांस तोटा होऊं नये किंवा असाधारण नफाहि होऊं नये. सीमान्त-खर्च व सीमान्त-प्राप्ति ह्यांची तुलना केल्यानें शेवटच्या परिमाणापासून उत्पादकाच्या एकंदर नफ्यांत (अगर तोटा होत असल्यास तोट्यांत) भर पडते कीं नाहीं, ह्याचाच फक्त बोध होतो. उत्पादनांत एकंदरीनें लाभ होत आहे कीं तोटा, ह्याचा पत्ता लागत नाहीं. तो पत्ता लागावयाचा असल्यास सरासरी उत्पादनखर्च (Average Cost) व सरासरी प्राप्ति (Average Revenue) ह्यांची तुलना करावी लागते. सरासरी खर्चांत साधारण नफा अंतर्भूत होत असल्यामुळें जेव्हां सरासरी खर्चापेक्षां सरासरी प्राप्ति कमी, अशी परिस्थिति असते तेव्हां तिचा अर्थ असा होतो कीं, उत्पादकाला उत्पादनांत साधारण नफादेखील (Normal Profits) सुटत नाहीं. त्यामुळें कांहीं उत्पादक उत्पादन अजिबात बंद करूं पाहतात. त्या योगानें उत्पादकांची संख्या कमी होऊन एकंदर उत्पादन कमी होण्याचा संभव निर्माण होतो. उलट सरासरी खर्चापेक्षां सरासरी प्राप्ति--म्हणजेच किंमत ही जेव्हां अधिक असते तेव्हां साधारणपेक्षां अधिक म्हणजे असाधारण नफा (Abnormal Profits) उत्पादनांत सुटूं लागतो. असें ज्या वस्तूच्या उत्पादनाकडे बाहेरील लोक आकर्षित होऊन उत्पादकांची संख्या व त्या योगानें एकंदर उत्पादन वाढेल, अशी परिस्थिति निर्माण होते. तसें व्हावयाचें नसेल तर सरासरी खर्च = सरासरी प्राप्ति म्हणजेच किंमत (Averge Cost = Averge Revenue i. e. AC = AR (Price), अशी स्थिति बाजारांत पाहिजे. म्हणजे मग

उत्पादकांची संख्या वाढून अगर कमी होऊन उत्पादन वाढण्याचा अगर कमी होण्याचा प्रश्न उद्भवत नाहीं.[१३]

दोन्ही अटी कधीं पुऱ्या होतात ? :—वरील विवेचनाचा आशय असा कीं, शुद्ध स्पर्धा बाजारांत असतां बाजारपेठेला स्थैर्य येण्यासाठीं (१) सीमान्त-खर्च = सीमान्त-प्राप्ति (MC = MR) व (२) सरासरी खर्च = सरासरी प्राप्ति (AC = AR) ह्या दोन अटी पुऱ्या झाल्या पाहिजेत. त्यांतील एकच पुरी होऊन भागणार नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ह्या दोन्ही अटी एकदम पुऱ्या कोणत्या परिस्थितींत होतात, हें समजून घेण्याच्या दृष्टीनें शुद्ध स्पर्धेच्या स्वरूपाविषयीं ह्या प्रकरणांत ह्यापूर्वी केलेल्या विवेचनावरून निघणारा एक वैशिष्टयपूर्ण निष्कर्ष लक्षांत ठेवला पाहिजे. तो असा कीं, पूर्ण स्पर्धेत सीमान्त-प्राप्ति ही नेहमींच सरासरी प्राप्तीएवढीच असते. सरासरी प्राप्ति म्हणजेच किंमत होय. सरासरी प्राप्ति म्हणजे एकंदर प्राप्तीला एकंदर उत्पादनानें भागिलें असतां येणारी रक्कम. ही किंमत एवढीच असावी हें उघड आहे. सीमान्त-प्राप्ति म्हणजे उत्पादन एका परिमाणानें वाढविलें असतां उत्पादनाच्या एकंदर प्राप्तींत पडणारी भर किंवा उत्पादन एका परिमाणानें कमी केलें असतां उत्पादकाच्या एकंदर प्राप्तींत पडणारी घट. खुल्या स्पर्धेचें स्वरूप नीट लक्षांत घेतल्यास असें दिसून येईल कीं, पूर्ण स्पर्धेत सीमान्त-प्राप्ति ही नेहमीं बाजारांत प्रस्थापित झालेल्या किंमतीएवढीच असते. कारण एखाद्या उत्पादकानें उत्पादन वाढविल्यास अगर कमी केल्यास त्याचा किंमतीवर कांहीं एक परिणाम होत नाहीं. किंमत तेवढीच राहते. त्यामुळें शेवटल्या परिमाणाच्या विक्रीमुळें एकंदर प्राप्तींत किंमतीएवढीच भर पडते. सारांश : सीमान्त-प्राप्ति = सरासरी प्राप्ति ही पूर्ण स्पर्धेच्या परिस्थितीची तार्किक परिणति होय. ही परिणति लक्षांत घेऊन पूर्ण स्पर्धेत बाजाराला स्थैर्य येण्यासाठीं किंवा बाजारांत समतोल प्रस्थापित होण्यासाठीं MC = MR आणि AC = AR असें झालें पाहिजे. ह्या दोन शर्तींकडे पुन: एकदां लक्ष दिल्यास असें तत्काळ उमजेल कीं, AR व MR ह्या दोन्ही गोष्टी एकच असल्यानें MC म्हणजे सीमान्त-खर्च व AC म्हणजे सरासरी खर्च समान झाल्यास दोन्ही शर्ती एकदम पुऱ्या होऊं शकतात. असें जर असेल तर शुद्ध स्पर्धेत बाजाराला स्थैर्य येण्याच्या दृष्टीनें सीमान्त-खर्च व सरासरी खर्च समान होणें एवढी एकच गोष्ट आवश्यक आहे, असें म्हटलें तरी चालण्याजोगें आहे. निराळ्या शब्दांत **सीमान्त-खर्च व सरासरी खर्च समान होण्याची जी पातळी असेल त्याच पातळीवर शुद्ध स्पर्धेच्या परिस्थितींत दीर्घकालीन समतोल मूल्य ठरतें.**[१४]

---

[१३] An industry is said to be in full equilibrium when there is no tendency for the number of firms to alter. The profits earned by the firms in it are then normal. Normal profit is that level of profit at which there is no tendency for new firms to enter the trade or for old firms to disappear out of it.

सरासरी व सीमान्तखर्चाचा संबंध :—सरासरी खर्च व सीमान्त-खर्च केव्हां समान होतात, हें कळण्यासाठीं सरासरी खर्च व सीमान्त-खर्च ह्यांच्या परस्पर-संबंधाची मीमांसा प्रथम केली पाहिजे. तत्पूर्वी सरासरी खर्च म्हणजे एकूण खर्च भागिले एकूण उत्पादन आणि सीमान्त-खर्च म्हणजे शेवटचें परिमाण उत्पादन केल्यामुळें एकंदर उत्पादन-खर्चांत होणारी वाढ हें पक्कें लक्षांत ठेवलें पाहिजे. जोंपावेतों उत्पादन वाढत्या फळाच्या म्हणजेच घटत्या खर्चाच्या (Increasing Returns i. e. Diminishing cost) प्रवृत्तीच्या अंमलाखालीं असतें तोंपावेतों उत्पादनाच्या प्रत्येक पुढील परिणामाला कमी खर्च लागत असतो. म्हणजेच सीमान्त-उत्पादन-खर्च कमी होत असतो. ह्याच्या उलट जेव्हां उत्पादनांत घटत्या फळाची म्हणजे वाढत्या खर्चाची (Diminishing Returns i. e. Increasing cost) प्रवृत्ति दिसत असते तेव्हां उत्पादनाच्या प्रत्येक पुढील परिमाणाला मागीलपेक्षां अधिक खर्च करावा लागून सीमान्त-खर्च वाढत असतो. सीमान्त खर्चाबाबतची ही माहिती लक्षांत घेऊन सीमान्त खर्च व सरासरी खर्च ह्यांतील संबंध पुढीलप्रमाणें सांगतां येईल :—

(१) सरासरी खर्चापेक्षां (अ) सीमान्त-खर्च अधिक झाल्यास सरासरी खर्चांत वाढ होणारच. (ब) सीमान्त-खर्च पूर्वीच्या सरासरीपेक्षां कमी झाल्यास सरासरी खर्च कमी होतोच. व (क) पूर्वीच्या सरासरीखर्चाएवढाच सीमान्तखर्च असल्यास सरासरी-खर्च तेवढाच राहतो.[१५] अ, ब, व क मध्यें सांगितलेला संबंध खालील अनुक्रमें अ, ब व क ह्या तक्त्यांत दर्शविला आहे.

तक्ता अ

परिमाण संख्या	एकण खर्च	सीमान्त खर्च	सरासरी खर्च	शेरा
१०	२००	......	२०	
११	२३१	३१	२१	सीमान्तखर्च वाढत असल्यानें सरासरी खर्चहि वढत आहे. उत्पादनावर वाढत्या फळाच्या प्रवृत्तीचा अंमल आहे.
१२	२६४	३३	२२	
१३	२९९	३५	२३	

[१४] When competition is perfect, marginal revenue is equal to price. Marginal cost must therefore be equal to price. But for full equilibrium price must be equal to average cost. Full equilibrium can therefore only be attained, under perfect competition, when marginal cost is equal to average cost. —**Mrs. Robinson.**

तक्ता ब

परिमाण संख्या	एकूण खर्च	सीमान्त खर्च	सरासरी खर्च	शेरा
१०	२००	......	२०	सीमान्तखर्च कमी होत असल्यानें सरासरी खर्चहि कमी होत आहे. उत्पादन घटत्या फळाच्या प्रवृत्ती-खालीं आहे.
११	२०९	९	१९	
१२	२१६	७	१८	
१३	२२१	५	१७	

तक्ता क

परिमाण संख्या	एकूण खर्च	सीमान्त खर्च	सरासरी खर्च	शेरा
१०	२००	२०	२०	सीमान्तखर्च स्थिर म्हणून सरासरी खर्चहि स्थिर. उत्पादनांत स्थिर फळाची प्रवृत्ति दिसत आहे.
११	२२०	२०	२०	
१२	२४०	२०	२०	
१३	२६०	२०	२०	

(२) वरील तक्त्यावरून असा निष्कर्ष आपोआपच निघतो कीं, सरासरी खर्च कमी होत असतां सीमान्त-खर्च कमी तर होत असतोच आणि नेहमींच सरासरी खर्चापेक्षां कमी असतो. उलट सरासरी खर्च वाढत असतां सीमान्त-खर्च वाढत असतोच; पण नेहमींच सरासरी खर्चापेक्षां अधिक असतो आणि सरासरी खर्च वाढतहि नसेल किंवा कमीहि होत नसेल तर सीमान्त-खर्चहि कमी होत नाही किंवा


[१५] If costs are constant, marginal and average cost are equal. If marginal cost is greater than average cost, average cost must be rising. Similarly if marginal cost is less than average cost, average cost must be falling. Thus so long as marginal cost is greater than average cost, average cost increases with output and so long as marginal cost is less than average cost average cost is falling. If marginal cost is equal to average cost, average cost is constant.


वाढतहि नाहीं. भूमितीच्या भाषेंत हेच संबंध असे मांडतां येतील कीं, जोंपर्यंत सरासरी खर्च दर्शविणारी 'कमान' (Curve) (हिला AC कमान म्हणतात.) अधोगामी आहे तोंपर्यंत सीमान्त-खर्च दर्शवणारी 'कमान' (हिला MC कमान म्हणतात.) पडत असते आणि नेहमींच खालच्या पातळीवर असते. उलट सरासरी खर्च दर्शवणारी 'कमान' ऊर्ध्वगामी असल्यास सीमान्त-खर्च दर्शविणारी कमान ही ऊर्ध्वगामीच असते आणि नेहमींच वरच्या पातळीवर असते. सरासरी खर्च दर्शविणारी रेषा सरळ जात असेल तर सीमान्त-खर्चाची वाटचाल सरळ व त्याच पातळीवर होत राहून दोहोंत फरकच राहत नाहीं.


AC कमान व MC कमान ह्यांतील संबंध खालील तीन आलेखांत दर्शविले आहेत.

N. B.: So long as the marginal curve lies below the average curve the average curve must be falling so long as the marginal curve lies above the average curve the average curve must be rising.

सीमान्त कमान जोंपर्यंत सरासरी कमानीच्या खालच्या पातळीवर असतें तोंपर्यंत सीमान्त कमान पडत असलीच पाहिजे. सीमान्त कमान जोंपर्यंत सरासरी कमानीच्या वरच्या पातळीवर असतें तोंपर्यंत सरासरी कमान चढत असलीच पाहिजे.








आकृति क्रमांक १ अ, ब, क.

(३) उत्पादनांत सर्वसाधारणपणें असें दिसून येतें कीं, प्रथम कांहीं काळपर्यंत उत्पादनावर वाढत्या फळाच्या म्हणजेच घटत्या उत्पादन-खर्चाच्या प्रवृत्तीचा अंमल असतो. पण पुढें जेव्हां मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे फायदे संपुष्टांत येतात तेव्हांपासून घटत्या फळाच्या म्हणजेच वाढत्या उत्पादनखर्चाच्या


प्रवृत्तीचा अंमल सुरू होतो. उत्पादनासंबंधीच्या ह्या सर्वसाधारण सिद्धान्तामुळें सीमान्तखर्च कांहीं काळपर्यंत कमी होतो आणि त्यानंतर वाढत जातो.[१६]



आकृति क्रमांक २

भूमितीच्या भाषेंत, कांही काळपर्यंत सीमान्त-खर्च दर्शविणारी कमान अधोगामी असते. नंतर ती ऊर्ध्वगामी होते. तिचें स्वरूप कसें असतें तें शेजारील आलेखांत दर्शविलें आहे.

(४) कलम दोनमध्यें सीमान्त-खर्च व सरासरी खर्च ह्यांच्यांतील संबंधाचें जें स्वरूप सांगितलें आहे त्यावरून असें म्हणतां येईल कीं, सीमान्त-खर्चाची कमान जोंपर्यंत अधोगामी आहे तोंपर्यंत सरासरी खर्चाची कमान अधोगामीच पण वरच्या पातळीवर असते. सीमान्त-खर्चाची कमान ज्या बिंदूपासून ऊर्ध्वगामी होते त्याच बिंदूपासून सरासरी खर्चाची कमान ही ऊर्ध्वगामीच होते. मात्र ऊर्ध्वगामी झाल्यानंतर ती सीमान्त खर्चाच्या कमानीच्या खालच्या पातळीवर राहते. ह्या सबंधांतून एक अत्यंत महत्त्वाचा निष्कर्ष निघतो. तो असा कीं, **सरासरी खर्चाची किमान मर्यादा गांठली जाते तेव्हांच ते दोन्ही खर्च समान होतात.**[१७]



आकृति क्रमांक ३

म्हणजेच **सरासरी खर्च कमींत कमी झाल्यावेळीं सीमान्तखर्च दाखविणारी कमान व सरासरी खर्च दाखविणारी कमान ह्यांचें मीलन होतें.** ही घटना शेजारील आलेखांत स्पष्ट केली आहे.

[१६] Marginal cost may either fall or rise, as output increases, or it may be constant. In general we should expect that the marginal cost for an individual concern would at first fall and then rise or remain constant. **—Mrs.Robinson.**

पूर्ण स्पर्धेतील दीर्घकालीन मूल्य :--आतांपर्यंत जें विवेचन केलें त्याच्या आधारें पूर्ण स्पर्धेत दीर्घकालीन समतोल मूल्य कसें ठरतें व एकंदर उत्पादनाची मर्यादा कशी ठरते, हें निष्कर्षरूपानें सांगावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, पूर्ण स्पर्धा असतां सीमान्तखर्च व सरासरी खर्च जेव्हां समान होतो तेव्हांच बाजाराला स्थैर्य येतें किंवा निराळ्या शब्दांत बाजारपेठेंत समतोल (Equilibrium) प्रस्थापित होतो. (सीमान्त-खर्च व सरासरी खर्च समान होण्याची आवश्यकता कां व कशी निर्माण होते, ह्याचें समग्र विवेचन ह्यापूर्वी केलें आहे.) सरासरी खर्च किमान म्हणजे कमींत कमी जेव्हां असतो तेव्हांच सरासरी व सीमान्त खर्च समान होत असल्यामुळें असें म्हणण्यास कोणतीहि हरकत नाहीं कीं, **पूर्ण स्पर्धा असतां दीर्घकालीन समतोल मूल्य** (Long period equilibrium value) **कमींत कमी सरासरी उत्पादनखर्चाएवढें असतें.**

शुद्ध स्पर्धेतील उत्पादन-प्रमाण :—शुद्ध स्पर्धेच्या परिस्थितींत प्रत्येक उत्पादकाच्या (किंवा उत्पादनसंस्थेच्या) उत्पादन-प्रमाणाबद्दल असें सांगतां येईल कीं, कमींत कमी उत्पादन-खर्चाएवढ्या मूल्यानेंच बाजाराला स्थैर्य येत असल्यानें ज्या उत्पादन-प्रमाणामुळें उत्पादनखर्च कमींत कमी होतो तें उत्पादन-प्रमाण प्रत्येकाकडून गांठलें जातें. उत्पादन-साधनांचा अपव्यय होऊं देणें टाळावयाचें असेल तर कोणत्याहि वेळीं उत्पादनखर्च कमींत कमी होणें ही अत्यंत चांगली गोष्ट समजली पाहिजे. तसें समजलें जात असल्यामुळेंच ज्या उत्पादन-प्रमाणामुळें सरासरी उत्पादनखर्च कमींत कमी होतो त्या उत्पादन-प्रमाणाला पर्याप्त उत्पादन-प्रमाण (Optimum Scale of Production) असें म्हणतात. प्रत्येक उत्पादकाकडून हें उत्पादन-प्रमाण गांठलें जातें किंवा खरे म्हटलें तर प्रत्येक उत्पादकाला हें उत्पादनप्रमाण गांठणें भाग पडतें.[१८]

कारण ज्यांत साधारण नफा अंतर्भूत आहे त्या कमींत कमी उत्पादनखर्चाएवढी किंमत कमी करण्यास कोणीहि उत्पादक तयार होतो. मग इतरांसहि स्पर्धेच्या दडपणामुळें तसें करावें लागतें. ह्यांतच पूर्ण स्पर्धेची महती आहे. ग्राहकांना साहजिकच पूर्ण स्पर्धा आपल्या हिताची वाटते. कारण कमींत कमी उत्पादनखर्चाएवढ्या किंमतीला वस्तु मिळण्याची हमी तींत असते. त्याच कारणाकरितां उत्पादकांना शुद्ध स्पर्धा अप्रिय असते. ज्या किंमतीमुळें फक्त साधारण नफाच सुटतो त्या किंमतीमुळें

[१७] Marginal and average cost are equal at the minimum point on the average cost curve. —Mrs. Robinson

[१८] In a perfectly competitive industry each firm, in full equilibrium, will produce that output at which average costs are a minimum. Each firm will then be of optimum size.
—Mrs. Robinson

उत्पादक सहसा संतुष्ट होत नाहींत. त्यांना अधिक नफा हवा असतो. शिवाय ज्या परिस्थितींत आपलें बाजारांतील स्थान उपेक्षणीय आहे आणि आपल्या किंमतीवर कोणत्याहि प्रकारचा ताबा नाहीं अशी परिस्थितीहि उत्पादकांना आवडत नाहीं. ज्या वस्तूच्या बाजारपेठेंत पूर्ण स्पर्धा आहे त्या वस्तूचें एकंदर उत्पादन किती होईल हें समजणें कठिण नाहीं. तें उत्पादन अर्थातच पर्याप्त उत्पादनप्रमाण गुणिले उत्पादकांची संख्या एवढें असतें.

पूर्ण मक्तेदारी व दीर्घकालीन मूल्य :— पूर्ण मक्तेदारींत एकच उत्पादक असतो आणि साहजिकच जास्तींत जास्त नफा जी किंमत प्रस्थापित झाली असतां मिळेल ती किंमतच ठरावी, ह्या खटपटींत असतो. ह्या विधानाचा अर्थ असा मात्र नाहीं कीं, पूर्ण मक्तेदारी असतां जास्तींत जास्त नफा मिळविण्याची प्रेरणा उत्पादकाला असते आणि पूर्ण स्पर्धेच्या परिस्थितींत उत्पादकांना तशी प्रेरणा नसते. खरी गोष्ट अशी आहे कीं, उत्पादकांची मनोभूमिका सर्वत्र सारखी असते. बाजारांत पूर्ण स्पर्धा असो, अपूर्ण स्पर्धा असो, कीं पूर्ण मक्तेदारी असो; प्रत्येक उत्पादक जास्तींत जास्त नफा कसा मिळेल, ह्याच चिंतेंत असतो. फरक एवढाच कीं, जास्तींत जास्त नफा मिळविण्याच्या उत्पादकांच्या आकांक्षेवर बाह्य परिस्थितीच्या ज्या मर्यादा पडतात त्यांचें स्वरूप बाजाराप्रमाणें बदलतें. पूर्ण स्पर्धेत किंमत वैयक्तिक उत्पादकाच्या ताब्यांत नसते आणि त्यामुळें त्याला साधारण नफ्यावर संतुष्ट व्हावें लागतें. मक्तेदारींत तशी परिस्थिति नसते. पूर्ण मक्तेदारींत आपल्याला इष्ट वाटेल त्या पातळीवर मूल्याला नेणें मक्तेदाराला शक्य असतें. हा फरक महत्त्वाचा आहे.

पूर्ण मक्तेदारींत बाजारांत समतोल प्रस्थापित व्हावयाचा असेल तर मक्तेदाराला जास्तींत जास्त नफा मिळवावयास हवा. ह्यापूर्वीं जें विवेचन केलें आहे त्यावरून जास्तींत जास्त नफा केव्हां मिळतो हें समजणें कठिण नाहीं. **जेव्हां सीमान्त प्राप्ति व सीमान्तखर्च समान होतात** किंवा भूमितीच्या भाषेंत जेव्हां सीमान्त-प्राप्तीची कमान (Marginal Revenue Curve) व सीमान्त-खर्चाची कमान (Marginal Cost Curve) एकमेकांस छेदून जातात **तेव्हां उत्पादकाचा नफा जास्तींत जास्त होतो.**[१९]

अर्थातच त्या छेदबिंदूनें सूचित होणारें उत्पादन-प्रमाण मक्तेदाराकडून निश्चित केलें जातें. मक्तेदारानें जास्तींत जास्त नफ्याची दृष्टि ठेवून एकंदर उत्पादन किती


---

[१९] It is assumed to be the aim of the producer to fix that price at which the excess of gross receipts or revenue over costs will be at a maximum. He will achieve this if he regulates output in such a way that the addition to his total revenue from selling asy additional unit is exactly equal to the addition to his costs caused by producing that unit.

—Mrs. Robinson

करावयाचें, तें निश्चित केलें म्हणजे मग किंमत एका अर्थानें त्याच्या हातांत रहात नाहीं. त्या उत्पादनाची बाजारांतील किंमत ग्राहकवर्ग ठरवितो. ही किंमत किती असते, हें मागणीचा तक्ता किंवा मागणीची कमान (Demand Curve) पाहिल्याबरोबर समजतें.

मागणीची कमान व सरासरी प्राप्तीची कमान (Average Revenue Curve) ह्या दोन्ही एकच असतात. कारण सरासरी प्राप्ति म्हणजेच कोणतेंहि उत्पादनप्रमाण असतां बाजारांत ठरणारी किंमत होय. ही किंमत तें उत्पादनप्रमाण असतां ग्राहकवर्ग द्यावयास तयार असलेली किंमत असते हें स्पष्टच आहे. तेव्हां असें म्हणावयास कांहींहि हरकत नाहीं कीं, **ज्या उत्पादनप्रमाणामुळें सीमान्त-खर्च व सीमान्तप्राप्ति समान होतात त्या उत्पादनप्रमाणाची मागणीची किंमत हेंच मक्तेदारींतील दीर्घकालीन समतोल मूल्य होय.**[२०]



आकृति क्रमांक ४

P म्हणजे मक्तेदारींतलें दीर्घकालीन समतोल मूल्य. OX हें मक्तेदारींतलें उत्पादन. C हा त्या उत्पादनाचा सीमान्त-खर्च व अर्थातच सीमान्तप्राप्ति.

भूमितीच्या भाषेंत असें म्हणतां येईल कीं, सीमान्त-खर्च व सीमान्त-प्राप्ति दर्शविणाऱ्या कमानींच्या छेदनबिंदूंतून काढलेली सरळ रेघ जेथें सरासरी प्राप्तीच्या कमानीला भिडते त्या बिंदूनें सूचित होणाऱ्या पातळीवर मक्तेदारींतील दीर्घकालीन मूल्य ठरतें. पूर्ण मक्तेदारींत दीर्घकालीन समतोल मूल्य कसें ठरतें, हें दर्शविणारा आलेख शेजारीं दिला आहे. तो पाहण्यापूर्वीं एक-दोन गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत. सीमान्त-खर्च घटत्या फळाची प्रवृत्ति सुरू झाल्यानंतर—आणि ती केव्हांतरी सुरू होणें अपरिहार्यच असते—वाढत जातो. म्हणून सीमान्त-खर्चकमान ऊर्ध्वगामी दाखवलेली आहे. सीमान्त-खर्च व सरासरी खर्च ह्यांच्यांत ज्या प्रकारचे संबंध असतात त्याच प्रकारचे संबंध सीमान्तप्राप्ति व सरासरी प्राप्ति ह्यांत असतात. मागणीच्या सिद्धान्तानुसार मागणीची म्हणजे सरासरीप्राप्तीची कमान अधोगामी दाखविली आहे. ती अधोगामी असल्यानें सीमान्त प्राप्तीची कमान अधोगामी व खालच्या पातळीवर असते. ह्याचा अर्थ असा

कीं, उत्पादनाचें कोणतेंहि प्रमाण घेतल्यास सरासरी प्राप्ति म्हणजे किंमत सीमान्त-खर्च समान असतो तेव्हां—म्हणजे समतोल निर्माण करणारें उत्पादन असतां—किंमत अर्थातच खर्चापेक्षां अधिक असते.

उत्पादनाचा **सरासरी खर्च व किंमत ह्यांतील फरक हा मक्तेदाराचा नफा.**

मक्तेदारींतील दीर्घकालीन समतोल मूल्यासंबंधीचें हें विवेचन संपवण्यापूर्वीं आणखी एकाच महत्त्वाच्या प्रश्नासंबंधीं खुलासा केला पाहिजे. तो असा कीं, मक्तेदारींत सरासरी खर्च व किंमत ह्यांचा संबंध काय असतो? ह्या प्रश्नाचें उत्तर पुढीलप्रमाणें देतां येईल. जेव्हां सीमान्त-खर्च वाढत असतो तेव्हां सरासरी-खर्च वाढता असो किंवा घटता असो (एकंदर खर्चांत स्थिर खर्चाचें प्रमाण बरेंच असल्यास सीमान्त-खर्च वाढूनहि सरासरी खर्च कमी होऊं शकेल) सीमान्तखर्चापेक्षां सरासरी-खर्च कमी असतो. तेव्हां सीमान्तखर्चापेक्षांहि किंमत अधिक असल्यानें सरासरी खर्चापेक्षां ती अधिक असतेच हें ओघानेंच आलें.

मागणी कमीजास्त लवचिक असण्याचे परिणाम :—पूर्ण स्पर्धेत मागणीचा लवचिकपणा अमाप असतो. पूर्ण मक्तेदारींत तसें नसतेंच. मागणीचा लवचिकपणा त्या त्या वस्तूच्या स्वरूपानुसार कमीअधिक लवचिक असूं शकतो अगर कमीअधिक बिनलवचिकहि असूं शकतो. मागणीच्या लवचिकपणाचा अगर लवचिकपणाच्या अभावाचा परिणाम उत्पादनप्रमाणावर व ओघानेंच किंमतीवर होतो. तो होण्याची मीमांसा पुढीलप्रमाणें करतां येईल :—

(१) **मागणी बिनलवचिक असल्यास**—म्हणजे किंमत ज्या प्रमाणांत कमी होते त्या प्रमाणांत ती वाढत नसल्यास—सीमान्तप्राप्ति उणे होते. म्हणजे उत्पादन वाढविल्यास एकंदर प्राप्ति कमी होते आणि उत्पादन जसें वाढवावें तसें एकूण प्राप्ति कमी होण्याचें प्रमाण वाढत जातें. ही परिस्थिति खालील तक्त्यांत दर्शविली आहे

तक्ता अ

परिमाण	किंमत	एकूण प्राप्ति	सीमान्त प्राप्ति
२०	१०	२००	......
२१	९	१८९	११
२२	८	१७६	१३
२३	७	१६१	१५

तक्ता ब

परिमाण	किंमत	एकूण प्राप्ति	सीमान्त प्राप्ति
२०	१०	२००	१२
२१	८	१८८	५६
२२	६	१३२	६३
२३	३	६९	९०

कमी किंमत आकारली जाणारा ग्राहकवर्ग व जास्त किंमत आकारली जाणारा ग्राहकवर्ग ह्यांना कोणताहि उपायानें एकमेकांपासून दूर ठेवण्यांत मक्तेदारानें यश मिळविल्यास सर्वांकडून एकच किंमत न घेतां निरनिराळ्या किंमती घेणें त्याला साधतें. शिवाय कांहीं गोष्टी अशा असतात कीं, कमी किंमत पडणारा आणि अधिक किंमत पडणारा हे दोघे एकमेकांच्या अगदीं सान्निध्यांत असले तरी त्यांना कांहीं करतां येत नाहीं.

भिन्न किंमतीची आकारणी करणें मक्तेदाराला कोणत्या परिस्थितींत शक्य होतें, ह्यासंबंधींचें हें विवेचन उदाहरणांनीं अधिक स्पष्ट होईल. जपानमधील उत्पादक भारतांत आपलें बस्तान बसावें, ह्या हेतूनें भारतांतील ग्राहकांना आपला माल स्वस्त दरानें विकतो. तोच माल खुद्द जपानमधील ग्राहकांना तो अधिक दरानें विकतो. त्याला हें साधतें, कारण कमी किंमत पडणारा ग्राहक आणि अधिक किंमत द्यावी लागणारा ग्राहक हे एकमेकांपासून अंतरानें एवढे दूर असतात कीं, भारतांत कमी किंमतीस माल घेऊन तोच माल जपानांत अधिक, पण मक्तेदाराच्या किंमतीपेक्षां कमी किंमतीला जपानी ग्राहकाला विकणें सामान्यतः अशक्यच आहे. प्रकाशक एखाद्या ग्रंथाची अधिक किंमत असलेली आवृत्ति प्रथम काढतो. ती किंमत परवडणारे ती आवृत्ति खरेदी करतात. कालान्तरानें कमी किंमत परवडणाऱ्यांसाठीं कमी किंमतीची आवृत्ति काढली जाते. अशा प्रकारें एकाच ग्रंथासाठीं निरनिराळ्या ग्राहकांना भिन्न भिन्न किंमत पडते. ही गोष्ट शक्य होते, ह्याचें कारण कालदृष्ट्या ग्राहकवर्गाची विभागणी केली जाते हेंच होय. जेव्हां आवृत्ति बाहेर येते तेव्हां ज्यांना अधिक किंमत देण्याची ऐपत आहे त्यांची खरेदी आधींच झालेली असते. अधिक किंमत देऊं शकणारे स्वस्त आवृत्ति बाहेर पडेपर्यंत थांबत नाहींत. कारण एकतर आपल्यास हवी असलेली वस्तु शक्य तेवढी लौकर मिळविण्याची उत्सुकता मनुष्यमात्रांत नेहमींच असते. शिवाय पुढें स्वस्त आवृत्ति बाजारांत येईल अशी खात्री कोणालाच देतां येत नाहीं. गंमत अशी कीं, भारी किंमतीची आवृत्ति बाजारांत असतां ती किंमत परवडणाऱ्यांनीं कमी किंमतीच्या आवृत्तीसाठीं थांबावयाचें ठरविल्यास ती आवृत्ति निघणारच नाहीं. भारी किंमत परवडणाऱ्यांची खरेदी पूर्ण झाली, अशी खात्री झाल्यानंतरच कमी किंमतीची आवृत्ति काढली जाते. तिसरें उदाहरण सिनेमाचें देतां येईल. तोच सिनेमा पाहण्याकरितां विविध दर्जाच्या प्रेक्षकांना वेगवेगळे दर द्यावे लागतात, हें सर्वपरिचित आहे. हा फरक बसण्याच्या सोयी सिनेमाच्या सर्व वर्गांत सारख्या नसतात, म्हणून केला जातो. हें खरें असलें तरी ही गोष्ट मान्य करावयास हवी कीं, हा फरक करतां येतो, ह्याचें मुख्य कारण हेंच कीं, एकानें सिनेमा पाहून दुसऱ्याचें समाधान होत नाहीं. तसें असतें तर अधिक किंमत परवडणाऱ्यांनीं अधिक किंमत देण्याऐवजीं आपल्या नोकरांना आपल्या बदली सिनेमा पाहण्यास पाठविलें असतें. तसें होऊं शकत नसल्यामुळें सर्व जागा सारख्या असल्या तरी वेगवेगळ्या किंमतीची आकारणी करतां येऊं शकेल. सारांश:

कमी किंमत द्यावी लागणारा व अधिक किंमत द्यावी लागणारा ग्राहक ह्यांच्यामध्यें कोणत्याहि प्रकारचें दूरत्व असेल मग तें भौगोलिक, मानसिक किंवा कालपरत्वें असो, किंवा निर्माण करणें शक्य असेल तर मक्तेदारीमध्यें विविध किंमतीची आकारणी करणें शक्य होतें.

भिन्न किंमतीची आकारणी कां केली जाते ? :—बाजाराचे अगदीं अलग असे विभाग पाडणें मक्तेदाराला शक्य झालें तर भिन्न किंमतीची आकारणी केली जाण्यास अनुकूल परिस्थिति निर्माण होते. तथापि भिन्न किंमतीची आकारणी शक्य आहे म्हणून केवळ मक्तेदार ती करील असें म्हणतां यावयाचें नाहीं. जास्तींत जास्त नफा मिळविणें हा मक्तेदाराचा एकमेव हेतु असतो तेव्हां भिन्न भिन्न किंमती आकारल्यानें आपला नफा वाढेल, अशी खात्री पटली तरच तो मार्ग मक्तेदार अनुसरतो. अर्थात् किंमती भिन्न ठेवण्यानें खर्चांत बदल होण्याचा प्रश्नच उपस्थित होत नसल्यानें एखाद्या ग्राहकाकडूनहि इतरांपेक्षां अधिक किंमत घेतां आली तर मक्तेदाराचा एकूण नफा वाढेलच हें स्पष्ट आहे. तेव्हां खरा प्रश्न असा कीं, बाजाराची अलग विभागांत फाळणी झाल्यानंतरहि भिन्न किंमतीची आकारणी कोणत्या परिस्थितींत इष्ट ठरेल ? ह्या प्रश्नाचें उत्तर असें देण्यांत येतें कीं, जेव्हां **बाजारांतील प्रत्येक विभागांतील मागणीची लवचिकता भिन्न असते तेव्हांच मक्तेदाराकडून भिन्न किंमती आकारल्या जातात**. मागणीच्या लवचिकपणावर बाजारांतील दीर्घकालीन समतोल मूल्य अवलंबून असतें, सर्वसामान्यपणें मागणी जेवढी कमी लवचिक तेवढें मूल्य अधिक, असें ह्या प्रकरणांतील विवेचनावरून लक्षांत येण्याजोगें आहे. प्रत्येक विभागांतील मागणीची लवचिकता भिन्न असेल तरच प्रत्येक विभागांत भिन्न किंमती आकारण्यास मक्तेदार प्रवृत्त होतो. प्रत्येक विभागांतील किंमत कशी ठरते, ह्याची स्वतंत्र चर्चा करण्याचें कारण नाहीं. वर दिलेले नियमच येथें लागू पडतात. म्हणजेच प्रत्येक स्वतंत्र विभागांत मागणी एवढ्या प्रमाणांत भागविली जाते कीं, त्या विभागांतील सीमान्त-प्राप्ति व मक्तेदाराच्या एकंदर उत्पादनाचा सीमान्त-खर्च समान होतात. प्रत्येक विभागाच्या वांट्यास जेवढा पुरवठा येतो त्यासाठीं मागणीची जी किंमत असेल तीच त्या विभागांतील ग्राहकांना आकारली जाणारी किंमत होय. प्रत्येक विभागांत सीमान्त-प्राप्ति व एकंदर उत्पादनाचा सीमान्त-खर्च सारखा होतो. ह्याचा अर्थच असा कीं, प्रत्येक विभागांत मक्तेदारास जास्तींत जास्त नफा मिळतो. प्रत्येक विभागांत जास्तींत जास्त नफा मिळाल्यास एकंदर नफा जास्तींत जास्त मिळतोच. मक्तेदारींत भिन्न किंमतीची आकारणी कोणत्या परिस्थितींत इष्ट ठरते, ह्यासंबंधींचें हें विवेचन पाहिल्यास पूर्ण स्पर्धेत बाजाराची फाळणी होऊं शकली तरीसुद्धां भिन्न किंमतीची आकारणी कां केली जात नाहीं, हें सहज लक्षांत येण्याजोगें आहे. पूर्ण स्पर्धेत बाजाराच्या प्रत्येक विभागांत प्रत्येक उत्पादकाच्या दृष्टीनें मागणीची लवचिकता अमाप असते; म्हणजेच प्रत्येक विभागांत ती सारखी असते. तेव्हां भिन्न किंमतीची आकारणी इष्ट ठरत नाहीं.[२२]

सारांश, बाजाराची विभागणी करतां आल्यास आणि प्रत्येक विभागांत मागणीचा लवचिकपणा वेगळा असल्यास मूल्यभेद शक्य आहे.[२३] कधीं कधीं असें मात्र होतें कीं, एखादा उत्पादक बाजाराच्या एखाद्या विभागांत मक्तेदार आणि दुसऱ्या विभागांत स्पर्धक असतो. अशा वेळीं ज्या विभागांत तो मक्तेदार असेल व ज्या विभागांत तो स्पर्धक असेल त्या दोन विभागांतील किंमती भिन्न असणें अपरिहार्यच ठरतें.

अपूर्ण स्पर्धेतील मूल्य-निश्चिति :—पूर्ण स्पर्धा असतां व पूर्ण मक्तेदारी असतां दीर्घकालीन समतोल मूल्य कसें ठरतें, ह्याची विस्तारानें चर्चा ह्या प्रकरणांत केली आहे. त्यानंतर आतां अपूर्ण स्पर्धेत मूल्य-निश्चिति कशी होते, हें सविस्तर सांगण्याचें खरोखरच कारण नाहीं. वरील विवेचनांत मूल्य-निश्चितीबाबत जीं स्थूल तत्त्वें सांगितलीं आहेत तीं अपूर्ण स्पर्धेलाही लागू पडतातच. तेव्हां त्या तत्त्वांची पुनरुक्ति टाळण्यासाठीं अपूर्ण स्पर्धेत मूल्य-निश्चिति कशी होते, हें सूत्ररूपानें खालीं सांगितलें आहे :—

(१) अपूर्ण स्पर्धेत बाजारांत वस्तूंची एकच किंमत असूं शकत नाहीं. जेवढे उत्पादक तेवढ्या किंमती, अशी परिस्थिति असूं शकते.

(२) अपूर्ण स्पर्धेत प्रत्येक उत्पादक हा कांहीं प्रमाणांत मक्तेदार व कांहीं प्रमाणांत स्पर्धक असतो. जे ग्राहक त्याच्याशीं निष्ठा बाळगून असतात त्या ग्राहकांपुरता प्रत्येक उत्पादक मक्तेदार असतो. ग्राहकांचा जो वर्ग कोणत्याच उत्पादकास चिकटून राहूं इच्छीत नाहीं आणि किंमत व दर्जा ह्या दोन गोष्टींखेरीज इतर कोणत्याहि गोष्टी विचारांत घ्यावयास तयार नसतो त्या वर्गास आकृष्ट करण्यासाठीं सर्व उत्पादकांची परस्परांशीं स्पर्धा चालू असते. ह्या ठिकाणीं हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, निष्ठावंत ग्राहकांना सुद्धां सांभाळण्याची गरज अपूर्ण स्पर्धेत भासते. कारण निष्ठावंत ग्राहकहि ठराविक मर्यादेपर्यंतच एखाद्या उत्पादकाला चिकटून असतो. प्रत्येक अशा ग्राहकाची निष्ठा विशिष्ट मर्यादेपलीकडे—ही मर्यादा प्रत्येक ग्राहकाच्या बाबतींत भिन्न असूं शकते—किंमत वाढली तर टिकून रहात नाहीं. कांहीं प्रमाणांत निष्ठावान ग्राहकवर्ग प्रत्येक उत्पादकाला लाभण्याचा आणि हा वर्ग सर्व उत्पादकांना समान संख्येनें व प्रमाणानें न लाभण्याचा मुख्य परिणाम असा होतो कीं, प्रत्येक उत्पादकाच्या मालाला असलेल्या मागणीची लवचिकता सारखी

[२२] Under conditions of perfect competition price discrimination could not exist even if the market could easily be dividual into separate parts. —**Mrs. Robinson.**

[२३] Conditions for discrimination.........A first condition for discrimination is that the market for the product can be separated into parts.——A second condition for discrimination is therefore that the demands in the various separable parts of the market be considerably different.—— A third condition is that the cost of separating the markets is not too large. —**Stigler.**

नसते. त्यामुळें सीमान्त-खर्च व सीमान्त-प्राप्ति समान करणारें उत्पादन प्रत्येक उत्पादकाच्या बाबतींत सारखें नसतें. साहजिकच जास्तींत जास्त नफा मिळवून देणारी किंमत प्रत्येक उत्पादकाच्या दृष्टीनें भिन्न असते. ही किंमत कशी ठरते, ह्याची मीमांसा प्रत्येक उत्पादक हा मक्तेदार आहे, असें समजून करतां येते. मक्तेदारींत किंमत जशी ठरते तशीच अपूर्ण स्पर्धेत प्रत्येक उत्पादकाकडून आकारली जाणारी किंमत ठरते.

(३) अपूर्ण स्पर्धेंत कोणत्याहि परिस्थितींत कोणाहि उत्पादकाच्या दृष्टीनें मागणीची लवचिकता पूर्ण स्पर्धेतील मागणीच्या लवचिकपणापेक्षां साहजिकच कमी असते. त्यामुळें अपूर्ण स्पर्धेतील प्रत्येकाचें (व एकंदर) उत्पादन पूर्ण स्पर्धेतील प्रत्येकाच्या (व एकंदर) उत्पादनापेक्षां कमी असण्याचा व किंमत अधिक असण्याचा संभव असतो.

(४) अपूर्ण स्पर्धेतील उत्पादकांची संख्या मक्तेदारींतील उत्पादकांच्या संख्येपेक्षां निश्चितच अधिक असल्यानें प्रत्येक उत्पादकाच्या दृष्टीनें मागणी मक्तेदारीं-तील मागणीपेक्षां अधिक लवचिक असणें संभवनीय असतें. त्यामुळें एकंदर उत्पादन मक्तेदारींतील उत्पादनापेक्षां अधिक होण्याचा आणि सर्वांत अधिक किंमत जो उत्पादक आकारतो त्याची किंमतहि मक्तेदाराच्या किंमतीपेक्षां कमी असण्याची शक्यता निर्माण होते. ह्या नियमाला अपवाद असण्याची संभाव्यता दृष्टीआड करतां येत नाहीं. उदाहरणार्थ : ज्याचा ग्राहकवर्ग शंभर टक्के निष्ठावंत आहे त्या उत्पादकाच्या मालाची मागणी संपूर्णतया बिनलवचिक असणें आणि त्यामुळें त्याची किंमत मक्तेदारीपेक्षांहि अधिक असणें अगदींच असंभवनीय नाहीं. पण असें क्वचितच घडतें.

(५) अपूर्ण स्पर्धा ही स्पर्धा व मक्तेदारी ह्यांचें मिश्रण असतें. स्पर्धेचें प्रमाण जवढें अधिक असतें--म्हणजेच उत्पादकांची संख्या जेवढी मोठी असते आणि किंमत व दर्जा ह्यांखेरीज अन्य गोष्टींकडे लक्ष न देणारा ग्राहकवर्ग जेवढा मोठा असतो--तेवढी किंमत व उत्पादनस्पर्धेतील किंमत उत्पादनाच्या जवळपास येते. मक्तेदारीचें प्रमाण अधिक असल्यास किंमत वाढविणारे प्रवाह जोरदार होतात.

(६) अपूर्ण स्पर्धेत मक्तेदारीप्रमाणेंच भिन्न ग्राहकांना भिन्न किंमती आकार-ण्यास वाव मिळतो. प्रत्येक उत्पादक आपापल्यापुरता परिस्थितीचा अदमास घेऊन नफा वाढण्याची शक्यता असल्यासच तो मार्ग अनुसरतो. अपूर्ण स्पर्धेत स्पर्धेचें प्रमाण कमी असल्यास एकाच उत्पादकाकडून भिन्न किंमती आकारल्या जाण्याची शक्यता वाढते. अन्यथा कमी होते.

(७) अपूर्ण स्पर्धेत समतोल प्रस्थापित होतो तेव्हां बाजारांत अनेक किंमती असतात आणि प्रत्येक उत्पादकाला त्याच्या त्याच्या परिस्थितीनुसार जास्तींत जास्त नफा मिळत असतो. उत्पादकांची संख्या कमीअधिक होऊं नये, ही अट मात्र अपूर्ण स्पर्धेत कधींकाळीं पुरी होईल असें सांगतां येत नाहीं.

प्रमुख संदर्भग्रंथ

(1) Mrs. Robinson--Economics of Imperfect Competition.
(2) Stigler--Theory of Price.

: ४ : ग्राहकांच्या मागणीची मीमांसा

मागणीची सनातन मीमांसा :—बाजारांत कोणत्याहि किंमतीला वस्तूसाठीं जी मागणी असते ती सर्व ग्राहकांच्या मागणीची बेरीजच असते. त्यामुळें विविध वस्तु किती प्रमाणांत खरेदी कराव्या, हें व्यक्ति कसें ठरविते, ह्या प्रश्नाला—विशेषतः मागणीची बाजू बाजारांत फारच महत्त्वाची असल्यानें—साहजिकच महत्त्व प्राप्त होतें. ह्या बाबतींतील सनातन (classical) मीमांसा अशी :—बाजारांत ठरलेल्या किंमतींत आपणास हवे असलेले बदल घडवून आणणें कोणत्याहि एका व्यक्तीच्या कुवतीपलीकडचें असल्यानें बाजारांत ठरलेल्या किंमती गृहीत धरूनच कोणत्याहि वेळीं विविध वस्तूंच्या खरेदीचें आपलें प्रमाण व्यक्ति ठरविते, आणि वस्तूच्या किंमतींत जेव्हां जसा बदल होईल त्या बदलाच्या अनुरोधानें आपल्या खरेदीच्या प्रमाणांत बदल करते. किंमतीकडे पाहून विविध वस्तु किती प्रमाणांत घ्याव्या, हें ठरवितांना व्यक्तीची एकच दृष्टि असते. आपल्या मर्यादित उत्पन्नांत जास्तींत जास्त समाधान मिळवावें, हीच ती दृष्टि. उपभोगापासून मिळणाऱ्या समाधानाला 'उपभोग्यता' (Utility) असें नांव अर्थशास्त्रांत दिलें गेलेलें असल्यामुळें असें म्हणतां येईल कीं, सर्व वस्तूंच्या उपभोगापासून मिळणारी एकंदर उपभोग्यता—म्हणजे प्रत्येक वस्तूपासून मिळणाऱ्या एकंदर उपभोग्यतेची बेरीज—जास्तींत जास्त व्हावी, असा व्यक्तीचा प्रयत्न चालू असतो. एकंदर समाधान जास्तींत जास्त केव्हां होतें, ह्या प्रश्नाचें उत्तर असें कीं, **जेव्हां प्रत्येक वस्तूची सीमान्त-उपभोग्यता त्या वस्तूच्या किंमतीच्या प्रमाणांत असते.** (म्हणजे ज्या वस्तूची किंमत अधिक असेल त्या वस्तूची सीमान्त-उपभोग्यता किंमत जेवढ्या प्रमाणांत अधिक असेल तेवढ्या प्रमाणांत अधिक असते, आणि ज्या वस्तूची किंमत कमी असेल त्या वस्तूची सीमान्त-उपभोग्यता त्या त्या प्रमाणांत कमी असते) **तेव्हां समाधानाची कमाल मर्यादा गांठली जाते.** त्या परिस्थितींत खर्च केलेल्या प्रत्येक चलन-परिमाणापासून (उदाहरणार्थ : एक रुपया) व्यक्तीला सारखेंच समाधान प्राप्त होत असतें.[1] समसीमान्त उपभोग्यतेमुळें एका वस्तूवरील खर्च कमी करून दुसऱ्या वस्तूवर खर्च वाढविण्याची आवश्यकता व्यक्तीस वाटत

[1] Utility will be maximised when the marginal unit of expenditure in each direction brings in the same increment of utility–we can express the conclusion in another way. The marginal utilities of commodities bought must be proportional to their prices. —**Hicks**

असेल त्या वस्तूचा उपभोग कमी झाल्यामुळें जेवढें समाधान कमी होतें त्यापेक्षां जिच्यावर खर्च वाढला आहे त्या वस्तूच्या वाढलेल्या उपभोगामुळें वाढलेलें समाधान कमी असतें. निराळ्या शब्दांत एका वस्तूचा उपभोग वाढल्यामुळें जेवढें अधिक समाधान मिळेल त्यापेक्षां अधिक समाधान दुसऱ्या एखाद्या वस्तूचा उपभोग कमी झाल्यामुळें कमी होते. परिणामीं एकंदर समाधान कमी होतें. अशा प्रकारें प्रत्येक चलन-परिमाणापासून जेव्हां सारखें समाधान मिळतें तेव्हांच जास्तींत जास्त समाधान मिळत असल्यानें ती स्थिति जेव्हां प्राप्त होते तेव्हांच उपभोगाचा आराखडा समतोल होतो.

सनातन मीमांसेंतील दोष :—मागणीसंबंधीची वर जी सनातन मीमांसा दिली आहे तिच्यांतील एका महत्त्वाच्या दोषाकडे कांहीं आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनीं लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. तो दोष असा कीं, वस्तूच्या उपभोगापासून समाधान मिळतें, ही गोष्ट नाकारतां येत नसली तरी समाधान ही मापनीय (Measurable) गोष्ट नाहीं, हें त्या मीमांसेंत विसरलें जातें. समाधान मापनीय नसेल तर समाधान व किंमत ह्यांचा समन्वय साधण्याचा व्यक्ति प्रयत्न करीत असते असें कसें म्हणतां येईल ? आणि तसें म्हणतां न आल्यास मागणीच्या सिद्धान्ताचा (Law of Demand) आधारच डळमळीत होऊन त्यावर आधारलेली मूल्यचिकित्सा बाद होण्याचा अनवस्थाप्रसंग ओढवतो. समाधान मापनीय नसतांना समाधानाच्या मापनावर आधारलेली मागणीची मीमांसा करणें तत्त्वतः चुकीचें आहे.[२] एवढें सर्व असूनहि उपभोग्यता ह्या कल्पनेचा उपयोग ग्राहकाच्या मागणीचा खुलासा होण्यासाठीं अपरिहार्यच असेल तर तो केल्यास हरकत नाहीं. पण बाजारांत विविध वस्तूंकरितां विविध किंमती असतां मागणीचें प्रमाण कसें ठरतें, ह्या प्रश्नाचें उत्तर अन्यत्र व अन्य पद्धतीनें मिळत असेल तर व्यक्तीला मिळत असलेल्या अमापनीय समाधानाची उठाठेव अर्थशास्त्रानें करण्याचें कारण नाहीं. खरी गोष्ट अशी आहे कीं, बाजारांत जें घडतें त्याचा खुलासा करण्यासाठीं समाधान मापनीय आहे असें गृहीत धरण्याची व त्या चुकीच्या गृहीत-कृत्यावर मागणीची मीमांसा आधारण्याची कांहीं एक आवश्यकता नाहीं. उपभोग्यता, सीमान्त उपभोग्यता, घटती उपभोग्यता ह्या कल्पना अर्थशास्त्रांतून काढून टाकल्या तरी फारसें बिघडणार नाहीं.[३]

मागणीची आधुनिक मीमांसा :—सनातन अर्थशास्त्रज्ञांनीं उपभोग्यतेचा आधार घेऊन मागणीची जी मीमांसा केली आहे तिच्यावर आक्षेप घेणाऱ्या आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनीं मागणीची मीमांसा समवृत्तीच्या कल्पनेचा आधार घेऊन केली आहे. तेव्हां ती कल्पना प्रथम समजून घेणें आवश्यक आहे.

---

[२] It is wrong to construct a theory of consumers behaviour which make use of measured units of utility, when in fact, utility is not measurable.

समवृत्तीची कल्पना :—उपभोग एकाच वस्तूचा घेतला जात नसून अनेक वस्तूंचा उपभोग घेतला जातो. त्यामुळें एकाच वस्तूच्या उपभोगाचें प्रमाण निश्चित करून चालत नाहीं. विविध वस्तूंच्या उपभोगाचें प्रमाण निश्चित करून उपभोगाचा आराखडा ठरवावा लागतो. व्यवहारांत असें आढळून येतें कीं, उपभोगाचा आराखडा ठरवूं पाहणाऱ्या व्यक्तींची कांहीं वस्तूसमूहाबाबत समवृत्ति (Indifference) असते. म्हणजे त्या त्या समूहांतील कोणताहि वस्तुसमूह (Combination of goods) उपभोगावयास मिळाला तरी आपल्याला मिळणाऱ्या एकंदर समाधानांत कमतरता आली अशी भावना व्यक्तीच्या मनांत निर्माण होत नाहीं. ज्या विविध वस्तुसमूहाबाबत व्यक्तीची समवृत्ति असते त्या वस्तुसमूहाची तपासणी केल्यास एक गोष्ट निश्चितपणें दिसून येते. ती अशी कीं, समवृत्ति असण्यासाठीं एका वस्तूचें उपभोगप्रमाण कमी झाल्यास दुसऱ्या वस्तूचें प्रमाण वाढावेंच लागतें. ह्याचें कारण उघड आहे. एखाद्या वस्तूचा उपभोग कमी करावा लागल्यामुळें जी समाधानहानि होते तिची भरपाई दुसऱ्या वस्तूचें उपभोगप्रमाण वाढलें तरच होते. व्यवहारांत अनेक वस्तु उपभोगांत समाविष्ट होतात हें खरें, पण सोयीसाठीं दोनच वस्तु आहेत असें समजून ज्याबाबत व्यक्तीची समवृत्ति असते असे कांहीं काल्पनिक वस्तुसमह खालीं दिले आहेत.

(१) ५क्ष+५ज्ञ (२) ४क्ष+६ज्ञ (३) ३क्ष+८ज्ञ (४) २क्ष+११ज्ञ (५) १क्ष+१५ज्ञ.

वरीलपैकीं कोणताहि वस्तुसमूह मिळाला तरी व्यक्तीला आपलें बिघडलें असें वाटत नाहीं; कारण प्रत्येक पुढल्या वस्तुसमूहांत वस्तु 'क्ष'चें प्रमाण कमीं असलें तरी त्याची भरपाई वस्तु 'ज्ञ'चें उपभोगप्रमाण व्यक्तीला योग्य वाटेल अशा प्रमाणांत वाढल्यामुळें होत आहे. **एखाद्या वस्तूचा उपभोग एका परिमाणानें कमी केल्यामुळें होणारी समाधानहानि भरून येण्यासाठीं पर्याय वस्तूचा उपभोग ज्याप्रमाणानें वाढवावा लागतो त्या प्रमाणाला सीमान्त पर्याय-प्रमाण** (Marginal rate of Substitution) असें म्हणतात.[४] एखाद्या वस्तूची उपलब्धता जशीं वाढत जाते तसें


[3]The quantitative concept of utility is not necessary in order to explain market phenomena. It is therefore necessary to undertake a purge rejecting all concepts which are tainted by quantitative utility and replacing them as far as they need to be replaced by concepts which have no such implication. —**Hicks**

[४] We may define the marginal rate of substitution of x for y as the quantity of y which would just compensate the consumer or the loss of a marginal unit of x. This definition is entirely free from any dependence upon a quantitative measure of utility.

—**Hicks**

तिचें महत्त्व कमी होत असल्यामुळें तिचें सीमान्त पर्याय-प्रमाणहि कमी होत जाते. म्हणजे एखाद्या वस्तूच्या प्रत्येक पुढल्या परिमाणाचा उपभोग कमी करावयाचा झाल्यास दुसऱ्या वस्तूच्या रूपानें जी नुकसानभरपाई मिळणें आवश्यक आहे असें व्यक्तीला वाटतें ती कमी होत जाते. वरील उदाहरणांत क्षच्या पांचव्या परिमाणाची नुकसान भरपाई फक्त १ज्ञनें होते तर चौथ्या परिमाणाची नुकसानभरपाई होण्यासाठीं २ज्ञची व क्षच्या तिसऱ्या परिमाणाची नुकसान भरपाई होण्यासाठीं ३ज्ञची आवश्यकता असते. ज्या वस्तुसमूहाबाबत व्यक्तींची समवृत्ति असते तें वस्तुसमूह आलेख काढून दर्शविता येतात. तसा आलेख खालीं काढून दाखविला आहे.


टीप :—ह्या आकृतींत समवृत्तीची कमान सरळ रेषेनें दाखविली असली तरी प्रत्यक्षांत वस्तु ब चें प्रमाण जसें कमी होते तसें तिचें पर्यायप्रमाण वाढत असल्यानें समवृत्तीची कमान अंतर्वक्र असते.



आकृति क्रमांक ५

शेजारील आलेखाचें स्पष्टीकरण :—ह्या आलेखांत जी कमान दाखविली आहे ती समवृत्तीची कमान (Indifference Curve) आहे. आलेखांतील OX ह्या Axis वर वस्तु अचें प्रमाण व OY ह्या Axis वर वस्तु बचें प्रमाण दर्शविलें आहे. समवृत्तिदर्शक प्रत्येक बिंदूनें वस्तु 'अ' व वस्तु 'ब' चें विशिष्ट प्रमाण सूचित होतें **समवृत्तिदर्शक कमानीनें ज्या वस्तुप्रमाणांच्या बाबतींत व्यक्तीची समवृत्ति असते तीं प्रमाणें सूचित करणारे बिंदु एकमेकांस जोडलेले असतात.** उदाहरणार्थ, OB हें वस्तु बचें प्रमाण + अधिक OA हें वस्तु अचें प्रमाण मिळणें किंवा OB' + OA' हा वस्तूसमूह मिळणें ह्यांस समाधानहानि आहे असें व्यक्तीला वाटत नाहीं. व्यक्तीच्या दृष्टीनें ते दोन्ही वस्तुसमूह सारख्याच महत्त्वाचे असतात. म्हणूनच त्यांच्या बाबतींत व्यक्तीची समवृत्ति असते. समवृत्तीच्या कमानीनें पर्याय वस्तूच्या उपयोगाचा सीमान्त-प्रमाणाचाहि बोध होतो. A ते A' हें अंतर वस्तु अचें सीमान्त-परिमाण धरलें तर समवृत्तिदर्शक कमान असेंच सुचविते कीं, त्या सीमान्तपरिमाणाची भरपाई B' ते 'ब' ह्या अंतरानें सूचित होणाऱ्या वस्तु 'ब' च्या प्रमाणानें होईल. हें प्रमाण म्हणजेच प्रस्तुत उदाहरणांतील वस्तु 'अ' चें सीमान्त पर्याय-प्रमाण.

एकापेक्षां अधिक समवृत्तीच्या कमानी:––खालील आलेखांत समवृत्तिदर्शक चार कमानी दाखविण्यांत आल्या आहेत. त्यांतील प्रत्येक वरच्या कमानीवरील कोणताहि




टीप––अशा प्रकारच्या आलेखाला समवृत्ती कमानींचा नकाशा (Indifference map) असें म्हणतात.

आकृति क्रमांक ६


बिन्दु खालच्या कमानीवरील कोणत्याहि बिन्दूपेक्षां व्यक्तीच्या दृष्टीनें उपभोगाची अधिक चांगली परिस्थिति दर्शविणारा असतो. कमान क्रमांक तीनवरील 'ज्ञ' ह्या अक्षरानें सूचित होणाऱ्या समाधानापेक्षां क्रमांक दोनवरील 'क्ष' ह्या अक्षरानें सूचित होणारें समाधान निश्चित अधिक असतें. कारण 'ज्ञ' मध्यें वस्तु 'अ'चें प्रमाण 'क्ष'मध्यें आहे एवढेंच आहे. पण वस्तु 'ब'चें प्रमाण मात्र अधिक आहे. म्हणजे दुसरी वस्तु कमी न होतां एक वस्तु अधिक मिळत आहे, असें त्याच पातळीवरील पण वरच्या कमानीवरील बिन्दूनें सूचित होतें. एका वस्तूचा उपभोग कमी न होतां दुसरी वस्तु अधिक प्रमाणांत मिळाल्यास तें कोणास नको असते? त्यामुळें असें बिनदिक्कत म्हणावयास हरकत नाहीं कीं, समवृत्ति कमानींच्या नकाशांतील वरच्या कमानीवर जाणें व्यक्तीला नेहमींच अधिक पसंत असतें. वरच्या कमानीवर जाणें म्हणजेच एकंदर गरजा अधिक प्रमाणांत भागणें होय. त्याच दिशेनें व्यक्तीची धडपड सतत चालू असते, हें सांगावयास नकोच. वरच्या कमानीवर व्यक्ति जाण्याचा प्रयत्न करते, असें म्हणण्यांत इतर वस्तूंच्या उपभोगांत कपात न करावी लागतां एखादी वस्तु जास्त मिळाली तर ती हवी असते, एवढेंच अभिप्रेत आहे. वरची कमान अधिक समाधान दर्शविते, पण तें किती अधिक हें ठरविण्याचें प्रयोजन नसतें.

समवृत्तीच्या कमानी व मागणीचा सिद्धान्त :—मागणीची मीमांसा करण्याच्या ओघांत समवृत्तीच्या कमानींचा एवढ्या विस्तारानें विचार केला. ह्याचें कारण असें कीं, अर्थशास्त्रांतील महत्त्वाच्या प्रश्नांची चिकित्सा करण्यासाठीं अलिकडे ह्या कमानींचा फारच उपयोग केला जातो. मागणीचा सिद्धान्त स्पष्ट करण्यासाठीं त्यांचा प्रामुख्यानें उपयोग कसा केला जातो तें आतां पाहूं.

समवृत्ति-कमानींचा उपयोग करून किमती व व्यक्तीचें उत्पन्न स्थिर असतां विविध वस्तु किती प्रमाणांत खरेदी केल्या असतां उपभोगाचा समतोल होईल, ह्याचा शोध घेतां येतो. खालील आलेखांत समतोल केव्हां प्रस्थापित होतो हें दाखविलें आहे.



आकृति क्रमांक ७



आकृति क्रमांक ८

टीप—आकृति पांच व सहामध्यें काढलेल्या समवृत्तीदर्शक कमानी सोयीसाठीं सरळ रेषेनें दाखवल्या आहेत. पण वस्तूंचें प्रमाण कमी होत असल्यामुळें समवृत्तीची कमान आरंभस्थानाशीं अंतर्वक्र (Convex to the origin) असणें अपरिहार्य आहे.


वरील आलेखांत 'क्ष'पर्यंतचें अंतर सर्वच्या सर्व उत्पन्न वस्तु 'क्ष' वर खर्च झालें तर त्या वस्तूचें किती प्रमाण खरेदी करतां येईल हें दर्शवितें. 'ज्ञ' पर्यंतचें अंतर सर्व खर्च 'ज्ञ'वर झाला तर 'ज्ञ' किती प्रमाणांत खरेदी करतां येईल हें दर्शवितें. 'क्ष'–'ज्ञ' ह्या रेषेवरील प्रत्येक बिन्दु उत्पन्न व 'क्ष' आणि 'ज्ञ' ह्या दोन्ही वस्तूंच्या किंमती स्थिर असतां किती 'क्ष' अधिक 'ज्ञ' खरेदी करतां येईल, हें दर्शवितें. हा मुद्दा आंकड्यानें अधिक स्पष्ट होईल. समजा : व्यक्तीचें उत्पन्न १०० रु. आहे व 'क्ष'ची किंमत रु. पांच व 'ज्ञ'ची किंमत रु. दहा अशी परिस्थिति आहे. असें असल्यास सर्वच्या सर्व उत्पन्न 'क्ष'वर खर्च करून व्यक्तीला २० 'क्ष' किंवा

तसेंच 'ज्ञ'च्या बाबतींत करून १० 'ज्ञ' खरेदी करतां येईल. किंवा १८ 'क्ष' + १ 'ज्ञ', १६ 'क्ष' + २ 'ज्ञ', १४ 'क्ष' + ३ 'ज्ञ', १२ 'क्ष' + ४ 'ज्ञ', १० 'क्ष' + ५ 'ज्ञ', ८ 'क्ष' + ६ 'ज्ञ', ६ 'क्ष' + ७ 'ज्ञ', ४ 'क्ष' + ८ 'ज्ञ', २ 'क्ष' + ९ 'ज्ञ' ह्यांतील कोणतेंहि प्रमाण खरेदी करतां येईल. हीं सर्व प्रमाणेंच 'क्ष'-'ज्ञ, ह्या रेषेनें जोडलीं आहेत.

'क्ष' 'ज्ञ' ही रेषा समवृत्ति कमानींच्या नकाशांतील कोणत्या ना कोणत्या तरी समावृत्ति-कमानीला भेटेलच. 'क्ष' व 'ज्ञ' ह्यांची भेट आकृति क्रमांक ७ मध्यें दर्शविलेल्या पद्धतीनें झाली असेल तर त्यांच्या भेटीचा बिन्दु उपभोगाचा समतोल ठरूं शकणार नाहीं. कारण वरील आकृतीवरून असें स्पष्ट दिसून येईल कीं, भेटीच्या दोहोंपैकीं कोणत्याहि बिन्दूपासून 'क्ष'-'ज्ञ' रेषेवर खालीं किंवा वर गेल्यास पुढची समवृत्ति-कमान व्यक्तीला गांठतां येते. शक्य तेवढ्या पुढील समवृत्ति-कमानीवर जाण्याची इच्छा व्यक्तीला असतेच आणि तेवढ्याच उत्पन्नांत तशी संधि मिळाल्यास व्यक्ति ती कशाला दवडील ? पण जेव्हां 'क्ष'-'ज्ञ'ची रेषा आकृति-क्रमांक मध्यें दाखविल्याप्रमाणें एखाद्या समवृत्ति-कमानीची स्पर्शरेषा (Target) असते, तेव्हां समवृत्ति-कमान व 'क्ष'-'ज्ञ' रेषा ह्यांच्या भेटीचा एकच बिन्दु असतो आणि 'क्ष'-'ज्ञ' रेषेवर त्या बिन्दूपासून खालीं वर गेल्यास वरच्या पातळीवरील समवृत्तीकमानीवर जातां येणें शक्य नसतें. अशा परिस्थितींतील समवृत्तीकमान व 'क्ष'-'ज्ञ' रेषा ह्यांच्या भेटीचा बिन्दु उपभोगाचा निश्चितपणें समतोल (Consumption Equilibrium) दर्शवितो.

उत्पन्न वाढल्यास अगर कमी झाल्यास :––वरील आकृतींच्या व पद्धतीच्या आधारें उत्पन्न वाढल्यास अगर कमी झाल्यास उपभोगांत कसा बदल होईल, हें सांगणें कठिण नाहीं. व्यक्तीचें एकूण उत्पन्न कमी झाल्यास 'क्ष'-'ज्ञ' रेषा खालच्या पातळीवर येईल. त्यामुळें खालच्या पातळीवरील समवृत्ति-कमानीची ती स्पर्शरेषा ठरेल–– म्हणजेच 'क्ष'-'ज्ञ' ह्या दोन्ही वस्तूंचा उपभोग कमी होईल––असें सर्वसाधारण अनुमान करण्यास हरकत नाहीं. ह्याच न्यायानें उत्पन्न वाढल्यास उपभोग वाढतो. (अपवादांचा विचार येथें केला नाहीं).


किंमत कमी अगर अधिक झाल्यास :––'क्ष' व 'ज्ञ' ह्या दोहोंपैकीं 'ज्ञ' ची किंमत कमी झाली (अगर वाढली) असें समजूं. तसें झाल्यास OY ह्या Axis वरील 'क्ष' हा बिन्दु पूर्वठिकाणींच राहील कारण त्या वस्तूच्या किंमतींत बदल न झाल्यानें पूर्वीच्या उत्पन्नांत ती वस्तु तेवढीच खरेदी करतां येईल. मात्र 'ज्ञ' ची किंमत कमी झाल्यास 'ज्ञ' त्या उत्पन्नांत अधिक प्रमाणांत करतां येऊन 'ज्ञ' हा बिन्दु पुढें सरकेल आणि 'ज्ञ' ची किंमत वाढल्यास अर्थात् मागें सरकेल. त्यामुळें 'क्ष'-'ज्ञ' रेषेचें स्थान कसें बदलेल, हें खालील आकृति क्रमांक ९ मध्यें दाखविलें आहे.



आकृति क्रमांक ९

या आकृतीची मधली रेषा मूळच्या किंमतीप्रमाणें आहे. तिच्या डाव्या बाजूची रेषा 'ज्ञ' ची किंमत वाढते तेव्हांची आणि उजव्या बाजूची रेषा 'ज्ञ' ची किंमत कमी होते तेव्हांची परिस्थिति दर्शविते.

आकृति-क्रमांक ९ वरून असें दिसून येईल कीं, 'ज्ञ' ची किंमत जेव्हां कमी होते तेव्हां क्ष–ज्ञ रेषा जशी 'ज्ञ' च्या दिशेनें येते तशी उजवीकडे सरकते आणि साहजिकच अधिक वरच्या पातळीवरील समवृत्ति-कमानीशीं तिचा स्पर्श होऊं शकतो. समवृत्ति-कमानींचा अंतर्वक्राकार लक्षांत घेतल्यास ही गोष्ट ओघानेंच येते कीं, उजवीकडे सरकलेल्या क्ष–ज्ञ रेषेचा अधिक वरच्या समवृत्ति-कमानीशीं स्पर्शबिन्दु उजवीकडेच असला पाहिजे. (आकृति क्रमांक १०) म्हणजेच 'ज्ञ' ची किंमत कमी झाली कीं 'ज्ञ' चा उपभोग वाढतो. त्याचप्रमाणें



आकृति क्रमांक १०

'ज्ञ' ची किंमत वाढल्यास तिचा उपभोग कमी होतो. (अपवादांचा विचार येथें केला नाहीं).

मागणीची शाब्दिक मीमांसा :—आतांपर्यंत आकृतींच्या साहाय्यानें मागणीची जी मीमांसा केली आहे ती शब्दरूपानें मांडणें कठिण नाहीं. व्यक्तीला जेव्हां तिचें उत्पन्न व विविध वस्तूंच्या किंमती माहित असतात तेव्हां प्रत्येक वस्तु किती प्रमाणांत खरेदी करावयाची, ह्यासंबंधीं निर्णय व्यक्तीला घ्यावा लागतो. व्यक्तीला आपल्या उत्पन्नाची विभागणी विविध प्रकारें करतां येईल हें उघड आहे. आपलें सर्वच्या सर्व उत्पन्न एकाच वस्तूवर खर्च करणें व्यक्तीला जसें शक्य आहे तसेंच प्रत्येक वस्तु विविध प्रमाणांत खरेदी करतां येणेंहि शक्य आहे. ह्या बाबतींत

निश्चित निर्णय घेतां यावा, म्हणून व्यक्तीला विविध वस्तूंचें तौलनिक महत्त्वमापन करावें लागतें आणि परिमाणाचें मूल्य इतर वस्तूंत करून त्या परिमाणाचा त्याग करण्यासाठीं इतर वस्तूंच्या रूपानें किती नुकसानभरपाई मिळाली पाहिजे हें ठरवावें लागतें. अशा स्थितींत **उपभोगाचा समतोल एकाच परिस्थितींत** म्हणजे **कोणत्याही दोन वस्तूंच्या बाबतींत पर्याय वस्तू वापराचें** सीमान्त-प्रमाण त्या वस्तूंच्या किमतीच्या प्रमाणांत असतें अशा परिस्थितींतच शक्य आहे.[४]

उदाहरणार्थ, 'क्ष' ह्या वस्तूची किंमत रु. तीन आहे आणि 'ज्ञ' ह्या वस्तूची किंमत रु. एक आहे. ह्या परिस्थितींत 'क्ष' च्या बाबतींत पर्याय वस्तूंच्या वापराचें सीमान्तप्रमाण जेव्हां तीन 'ज्ञ' होईल तेव्हांच उपभोग समतोल होईल. कारण तसेंच झाल्यास ह्या दोहोंपैकीं एखाद्या वस्तूचा उपयोग वाढवून दुसरीचा कमी करण्याची वृत्ति व्यक्तींत निर्माण होण्याचें कारण नाहीं. तसें न झाल्यास--म्हणजे उदाहरणार्थ, वस्तु 'क्ष' च्या सीमान्त-परिमाणापेक्षां वस्तु 'ज्ञ' च्या तीन परिमाणांना व्यक्तीच्या दृष्टीनें अधिक महत्त्व असल्यास--'क्ष' वरील तीन रुपये वांचवून (म्हणजे 'क्ष' चा उपभोग एका परिमाणानें कमी करून) 'ज्ञ' चा उपभोग वाढविणें आपल्यास अधिक हितकारक आहे, असें व्यक्तीस वाटून ती तसें करील.

किंमत बदलण्याचा मागणीवर होणारा परिणाम :--वरील विवेचनाच्या आधारें असें म्हणतां येईल कीं, वस्तूच्या किंमतींत बदल झाल्याचा मागणीवर परिणाम होतो. ह्याचें नेमकें कारण एकदां प्रस्थापित झालेला समतोल कोणत्याहि वस्तूच्या किंमतींत बदल झाल्यानें ढांसळतो हेंच होय. वरील परिच्छेदांत दिलेलें उदाहरण घ्या ना. वस्तु 'क्ष' ची किंमत रु. तीन व वस्तु 'ज्ञ' ची किंमत रु. एक आहे व समतोल प्रस्थापित झाला आहे. अशा परिस्थितींत वस्तु 'ज्ञ' ची किंमत ७५ नवे पैसे होऊन तीन रुपयांत त्या वस्तूचीं चार परिमाणें मिळूं लागल्यास काय होईल ? ह्या प्रश्नाचें उत्तर सरळ आहे. तीन रुपयांत मिळणाऱ्या 'क्ष' च्या सीमान्त-परिमाणापेक्षां तीन रुपयांत मिळणारीं 'ज्ञ' चीं चार परिमाणें अधिक महत्त्वाचीं ठरतील आणि 'क्ष' वरील खर्च कमी करून 'ज्ञ' वरील खर्च वाढविण्याची प्रवृत्ति व्यक्तींत दिसून येईल. 'ज्ञ' ची मागणी वाढेल हें सांगावयास नकोच. ह्या ठिकाणीं ज्याला अर्थशास्त्रज्ञांनीं पर्याय वस्तु वापराचा परिणाम (Substitution Effect) असें नांव दिलें आहे तो दिसून येतो. म्हणजेच **ज्या वस्तूची किंमत कमी झाली असेल त्या वस्तूचा वापर** इतर वस्तूऐवजीं त्यांचा पर्याय ह्या नात्यानें **वाढविण्याची प्रवृत्ति** दिसून येते. घेतलेल्या उदाहरणावरून असेंहि दिसून येईल कीं, एखाद्या वस्तूची किंमत कमी झाली असतां तिच्याकरितां असलेली

[४] If an individual is to be in equilibrium with respect to a system of market prices, it is directly evident that his marginal rate of substitution between any two goods must equal the ratio of their prices. —**Hicks**

व्यक्तीची मागणी वाढण्याची शक्यता ज्याप्रमाणें निर्माण होते त्याचप्रमाणें इतर वस्तूं-वरील खर्च कमी होऊन त्यांची मागणी कमी होण्याचाहि संभव निर्माण होतो. प्रत्यक्ष परिणाम काय होतो, हें अर्थातच विविध वस्तूंच्या मागणीच्या लवचिकपणावर अवलंबून असतें. उदाहरणार्थ, 'ज्ञ' ची किंमत एक रुपया असतां तिच्या तीन परिमाणांना व्यक्तीची मागणी असली आणि 'ज्ञ' ची किंमत ७५ पैसे झाल्यानें मागणी चार-पर्यंत वाढली तर 'ज्ञ' वरील खर्च वाढणार नाहीं. त्यामुळें इतर वस्तूंची मागणी कमी होण्याचा प्रसंग येणार नाहीं. मात्र 'ज्ञ' वरील खर्च वाढण्याइतकी तिची मागणी वाढली तर (उत्पन्न तेवढेंच राहिल्यानें) इतर वस्तूंवरील खर्च कमी होऊन त्यांच्याकरितां असलेली मागणी कमी होईल. ह्या बाबतींत असें विधान करणें चूक होणार नाहीं कीं, इतर वस्तूंची मागणी कमी होण्याचा प्रसंग आल्यास ज्या गरजा लवचिक आहेत--म्हणजे ज्यांचा उपभोग लांबविणें व्यक्तीला जड जात नाहीं त्यांच्यावर प्रथम गदा येईल. ह्या ठिकाणीं हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, ज्या वस्तूची किंमत कमी झालेली असेल त्या वस्तूची मागणी बिनलवचिक असल्यास किंमत कमी झाल्यानें तिच्या वरील खर्च कमी झाल्यानें इतर वस्तूंवर खर्च करण्या-साठीं अधिक रक्कम उपलब्ध होऊन त्यांची मागणी वाढेल. जेव्हां अन्नवस्तूंच्या किमती कमी होतात तेव्हां इतर वस्तूंची मागणी वाढल्याचा अनुभव येऊं शकतो. सारांश, एकदां ढांसळलेला समतोल पुनः प्रस्थापित होण्याच्या वेळीं मागणींत विविध प्रकारचे बदल होऊं शकतात.[५]

वस्तूची किंमत वाढल्यानें होणाऱ्या परिणामांचें वर्णन वरीलप्रमाणेंच करतां येईल. एखाद्या वस्तूची किंमत वाढली म्हणजेहि पूर्वी प्रस्थापित झालेला समतोल ढांसळतो. ज्या वस्तूची किंमत वाढते तिच्या दृष्टीनें पर्याय वस्तू वापराचा परिणाम प्रतिकूल होतो. म्हणजे त्या वस्तूची मागणी कमी होऊन इतर वस्तूंची मागणी वाढण्याचा संभव निर्माण होतो. हें प्रत्यक्षांत किती प्रमाणांत व कशा प्रकारें घडतें, हें ज्या वस्तूची किंमत वाढतें तिच्या मागणीच्या लवचिकपणावर अवलंबून असतें. मागणी लवचिक असल्यास ती बरीच कमी होऊन त्या वस्तूवरील व्यक्तीचा एकंदर खर्च कमी

---

[५] A fall in the price of a commodity does actually affect the demand for that commodity in two different ways. On the one hand, it makes the consumer better off, it raises his real income, and its effect along this channel is similar to that of an increase in income. On the other hand it changes relative prices; and therefore apart from the change in real income, there will be a tendency to substitute the commodity whose price has fallen for other commodities. The total effect on demand is the sum of these tendencies. i. e. income effect & substitution effect. --**Hicks**

होऊन इतर वस्तूंकरितां मागणी वाढूं लागते. ज्या गरजा लवचिक असतील त्यांच्याकडे लक्ष प्रथम वळण्याचा संभव असतो. मागणी जर लवचिक नसेल तर किंमत वाढल्या-मुळें त्या वस्तूवरील खर्च कमी न होतां उलट वाढतो. त्यामुळें इतर वस्तूंची मागणी कमी होण्याचा प्रसंग ओढवतो. अन्नवस्तूंच्या किंमती जेव्हां वाढतात तेव्हां इतर—विशेषत: चैनीच्या—वस्तूंची मागणी कमी होते हें सुपरिचित आहे. एखाद्या वस्तूची किंमत वाढल्यानें पूर्वी प्रस्थापित झालेला समतोल जेव्हां ढांसळतो तेव्हां आणि पुनः जेव्हां तो प्रस्थापित होतो तेव्हां सर्वत्र वस्तूंची मागणी बदललेली असण्याची शक्यता असते.

एखाद्या वस्तूची किंमत बदलली असतां जे परिणाम होतात, त्यांच्या संबंधांत लक्षांत घ्यावयाची मुख्य गोष्ट अशी कीं, व्यक्तीचें उत्पन्न जेव्हां मर्यादित असतें तेव्हां व्यक्तीच्या विविध गरजांचा परस्परांशीं संबंध स्पर्धेचा असतो. त्यामुळें एका वस्तूचा उपभोग कमी करून तिच्या बदली दुसऱ्या वस्तूचा उपभोग वाढविला जाण्याची शक्यता नेहमींच असते. दूरार्थानें प्रत्येक वस्तु ही दुसऱ्या अनेक वस्तूंची बदली-वस्तु किंवा पर्याय वस्तु (Substitute) होऊं शकते. ज्या वस्तूंना दूरची अगर नजिकची बदली वस्तु नसते त्यांच्याकरितां असलेली मागणी सामान्यतः बिनलवचिक असते. वस्तूची मागणी लवचिक असो अगर बिनलवचिक असो; तिच्या किंमतींत कोणत्याहि दिशेनें बदल झाल्यास मूळचा समतोल ढांसळणें व त्यामुळें केवळ त्याच वस्तूच्या नव्हे तर इतर कांहीं वस्तूंच्या मागणींत बदल होणें अपरिहार्य आहे. हा बदल विशेषेंकरून नजिकच्या बदली वस्तूंवर होतो. एका वस्तूची किंमत बदलल्यामुळें इतर वस्तूंच्या मागणींत होणारा बदल अनेक वस्तूंवर विभागिला गेल्यास डोळ्यांत भरत नाहीं; पण त्यामुळें तो होत नाहीं असें नाहीं. इतर वस्तु थोड्या असल्या तर त्यांच्या मागणीवर होणारा परिणाम अगदीं दिसून येतो. ह्याचें उत्कृष्ट उदाहरण उत्पादनघटकांच्या मांडणींत आढळतें. मनुष्यबळ व भांडवल ह्यांच्यापैकीं एका घटकाची किंमत कमी झाली कीं, त्या घटकाकरितां असलेली मागणी वाढणें आणि दुसऱ्या घटकाची मागणी कमी होणें ह्या गोष्टी बहुधा घडतात आणि उठावदारपणें दिसून येतात.

उत्पन्न कमी-अधिक होण्याचा परिणाम :—व्यक्तीचें उत्पन्न कमीअधिक होण्याचाहि अर्थातच विविध वस्तूंच्या मागणीवर परिणाम होतो. उत्पन्न जेव्हां वाढतें तेव्हां नव्या वस्तूंवर खर्च केला जाण्याची व जुन्या वस्तूंपैकीं ज्या वस्तु कमी प्रतीच्या असतात त्यांच्यावरील खर्च कमी होण्याचा—एवढेंच नव्हे तर त्या वस्तु खर्चाच्या यादींतून अजिबात गळण्याचा—संभव असतो. वाढलेल्या उत्पन्नाचा फायदा घेऊन गुणानें श्रेष्ठ असलेल्या वस्तूंवरील खर्च वाढविला जातो. उत्पन्न वाढलें असतां ज्या वस्तूंची मागणी बिनलवचिक असते त्या वस्तूंवरील खर्च सहसा वाढत नाहीं. त्यामुळें वाढलेलें उत्पन्न विशेषेंकरून ज्या वस्तूंची मागणी लवचिक आहे त्या वस्तूंच्या

वांटचास येण्याचाच संभव असतो. अर्थात् ह्या संदर्भांत एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. ती अशी कीं, जीवनासाठीं अत्यावश्यक गरजा सामान्यपणें बिनलवचिक असतात आणि त्या प्रथम भागवाव्याच लागतात. त्या भागविण्याइतकेंहि मूळचें उत्पन्न नसल्यास उत्पन्नांत होणारी वाढ बहुधा ह्या वस्तूंवरच खर्च केली जाते. त्या गरजा भागविण्याच्या मर्यादेपलीकडे उत्पन्नांत वाढ झालेली असली किंवा त्या गरजा भागविल्यानंतरहि उत्पन्नांतील वाढ चालू राहिली तर मात्र लवचिक गरजांकडे अधिक प्रमाणांत लक्ष पुरविलें जातें. उत्पन्न वाढलें असतां विविध वस्तूंच्या मागणींत होणाऱ्या बदलाचा सारांश असा सांगतां येईल कीं, सर्वसामान्यपणें दर्जानें कमी असलेल्या वस्तूंची मागणी कमी होऊन दर्जानें अधिक असलेल्या वस्तूंची मागणी वाढते. तसेंच जीवनावश्यक वस्तूंची मागणी कांहीं प्रमाणांत व आरामाच्या किंवा चैनीच्या वस्तूंची मागणी विशेष प्रमाणांत वाढते. सर्वसामान्यपणें असें म्हणतां येईल कीं, उत्पन्न वाढलें असतां व्यक्ति राहणीमानाच्या वरच्या पातळीवर जाऊं शकते.

उत्पन्न जेव्हां कमी होतें तेव्हां साहजिकच वरील परिणामांच्या उलट परिणाम होतात. उत्पन्न कमी होतें तेव्हां दर्जानें कमी असलेल्या वस्तूंची मागणी वाढण्याचा व दर्जानें अधिक असलेल्या वस्तूंची मागणी कमी होण्याचा, तसेंच आरामाच्या व चैनीच्या वस्तूंची मागणी कमी होण्याचा संभव निर्माण होतो. व्यक्तीचें मूळचें उत्पन्न किती आहे, ह्यावर हे बदल फार मोठ्या प्रमाणांत अवलंबून असतात, हें मुद्दाम लक्षांत ठेवलें पाहिजे.

प्रमुख संदर्भग्रंथ

(1) Hicks—Value and Capital.
(2) Cochrene and Bell—Economics of Consumption.

---

[६] It follows from the principle of deminishing marginal rate of substitution that the substitution effect is absolutely certain—it must always work in favour of an increase in the demand for a commodity when the price of that commodity falls. But the income effect is not so reliable. Ordinarily it will work in the same way, but it will work the opposite way in the case of inferior goods. —**Hicks.**

: ५ : उत्पादनखर्च-चिकित्सा

पुरवठ्याच्या बाजूचा विचार करतांना उत्पादनखर्चाला विशेष महत्त्व असतें. कारण पुरवठ्याचें प्रमाण प्रामुख्यानें उत्पादनखर्चावर अवलंबून असतें.[१] उत्पादनखर्च व पुरवठा ह्यांच्या परस्परसंबंधाचा विचार करण्यापूर्वी उत्पादनखर्च म्हणजे काय हें प्रथम समजून घेतलें पाहिजे.

उत्पादनखर्चाचा अर्थ :—उत्पादनासाठीं लागणाऱ्या उत्पादनवस्तु व उत्पादन-घटक मिळविण्यासाठीं उत्पादनसंस्थेला खर्चावी लागणारी रक्कम असा उत्पादनखर्च ह्या शब्दप्रयोगाचा अर्थ सांगतां येईल[२].

एखाद्या वस्तूच्या उत्पादनासाठीं पैशाच्या रूपानें जो खर्च होतो, त्यांतील कांहीं खर्च प्रत्यक्ष असतो तर कांहीं अप्रत्यक्ष स्वरूपाचा असतो. म्हणजे कांहीं बाबीं-साठीं प्रत्यक्ष पैसा उचलून द्यावा लागत नाहीं; पण त्या बाबींच्या नांवें कांहीं रक्कम धरून एकंदर उत्पादनखर्चांत ती अंतर्भूत करावी लागते. उदाहरणानें ही गोष्ट चांगली स्पष्ट होईल. उत्पादनासाठीं एखादा कामगार ठेवला तर त्याला द्यावी लागणारी मजुरी प्रत्यक्ष खर्ची पडते आणि उत्पादनखर्चांत ती साहजिकच आपोआप अंतर्भूत होते. पण उत्पादनासाठीं मालकच जेथें प्रत्यक्ष राबत असेल तेव्हां आपल्याच श्रमाचा मोबदला म्हणून कांहीं रक्कम मालकाला प्रत्यक्ष खर्च करावी लागणार नाहीं. पण उत्पादनखर्चाचा शास्त्रशुद्ध हिशेब ठेवावयाचे असतील तर मालकाला, नफा मिळो अगर न मिळो, स्वतःच्या श्रमाचा रास्त मोबदला मिळालाच पाहिजे. मालकाचे श्रम हे उत्पादनाप्रीत्यर्थ खर्च पडलेले असतात. तेव्हां मालकाला कमींत कमी त्या माचा मोबदला मिळणें आवश्यक आहे. मालकाला व्यवस्थापनाच्या श्रमाबद्दल किती मोबदला मिळावा, हें तेंच काम पगार घेऊन त्यानें अन्यत्र केलें असतें तर त्याला काय मिळालें असतें ह्यावर अवलंबून असतें. उत्पादनांत उत्पादकाचें किंवा उत्पादनसंस्थेच्या चालकवर्गाचें जें भांडवल गुंतविलें असेल त्यावरील व्याजासंबंधीं हेंच सांगतां येईल. हें व्याज दुसऱ्यांना उचलून द्यावें न लागलें तरी उत्पादनांत स्वतःचें भांडवल गुंतवणाऱ्यांना नफा होवो अगर न होवो, रास्त

[१] The costs of production which firms incur in producing various different goods are important because taken in conjunction with demands for such goods they determine the quantities of goods to be produced and sold and their prices.

[२] Costs of production may be understood to be amounts paid out or contracted to be paid out or otherwise sacrificed by the firm in order to secure the productive services with which to produce output. —**Bain**

म्हणजे प्रचलित व्याजाचा दर लक्षांत घेऊनच अन्यत्र मिळालें असतें, तेवढें व्याज मिळणें उचित असल्यानें तेवढें व्याज हिशेबापोटीं दाखल करावें लागतें. सारांश, प्रत्यक्ष उचलून द्याव्या लागणाऱ्या रकमांखेरीज कांहीं रकमा हिशेबापोटीं म्हणून दाखल कराव्या लागतात. हें लक्षांत घेतां **उत्पादनखर्च म्हणजे उत्पादनसाधनें खरेदी करण्याकरितां द्यावी लागणारी किंमत किंवा उत्पादनसाधनांच्या नांवें हिशेबापोटीं दाखल करावी लागणारी रक्कम** असें म्हणतां येईल[3].

वस्तूचा एकंदर उत्पादनखर्च साहजिकच उत्पादनासाठीं लागणारें विविध प्रकारच्या उत्पादनसाधनांचें प्रमाण व त्यांच्या किंमती ह्यांवर अवलंबून असतो. उत्पादनपद्धतींत बदल झाल्यामुळें उत्पादनासाठीं लागणाऱ्या उत्पादनसाधनांच्या प्रमाणांत फरक पडला कीं, उत्पादनखर्चांतहि फरक होतो. उत्पादनपद्धतींत जेव्हां सुधारणा होते तेव्हां पूर्वीइतकें उत्पादन करण्यासाठीं लागणारें उत्पादनसाधनांचें प्रमाण कमी होतें किंवा तेवढ्याच उत्पादनसाधनाकरवीं अधिक उत्पादन होऊं लागतें आणि त्यायोगें सरासरी उत्पादनखर्च कमी होण्यास मदत होते. ह्याच्या उलट कांहीं कारणामुळें उत्पादनासाठीं लागणारें उत्पादनसाधनांचें प्रमाण वाढल्यास त्यामळें एकंदर व सरासरी उत्पादनखर्च वाढतो. उत्पादनासाठीं लागणारें उत्पादन-साधनांचें प्रमाण स्थिर राहिल्यास उत्पादन खर्चांत होणारे बदल उत्पादसाधनांच्या किमतीवरच अवलंबून असतात. उत्पादनसाधनांच्या किमती वाढल्या कीं, उत्पादन-खर्च वाढतो; त्या कमी झाल्या कीं, उत्पादनखर्च कमी होतो.

उत्पादनखर्च व उत्पादनप्रमाण ह्यांचा संबंध:—उत्पादनखर्च व उत्पादन-प्रमाण ह्यांचा फार घनिष्ठ संबंध आहे. उत्पादनाचें प्रमाण लहानमोठें कितीहि असो, उत्पादनाचा दरमापीं खर्च म्हणजेच सरासरी उत्पादनखर्च स्थिर राहिला असता तर उत्पादनखर्चाचा किंमतीवर होणारा परिणाम हा प्रश्न यत्किंचितहि गहन झाला नसता; पण वस्तुस्थिति तशी नसते. प्रत्यक्षांत असें आढळून येतें कीं, कांहीं अपवादात्मक वस्तु वगळतां उत्पादनाचें प्रमाण वाढलें कीं, सरासरी खर्चांत फरक पडतो. म्हणजे सरासरी खर्च कमी होतो अथवा वाढतो. एखाद्या वस्तूच्या उत्पादनांत उत्पादनाचें प्रमाण वाढत गेलें म्हणजे सरासरी खर्च नेहमींच वाढतो किंवा कमी होतो असेंहि नाहीं. सरासरी खर्च कांहीं वेळ वाढतो; मग कमी होतो,

[3] The cost of production of any output then may be defined as either the purchase price or the imputed value of all productive services used in producing the output and is equivalent to the total monetary sacrifice of the firm made to secure it. The cost to the firm of producing any output obviously depends on (i) The physical quantities of actual resources or services used in production, (ii) The prices which the firm pays for or imputes to these resources or resource services.—**Bain**

किंवा कांहीं वेळ कमी होऊन नंतर वाढतो, असेंहि होऊं शकतें. ह्या बाबतींत सर्व-सामान्य अनुभव असा कीं, बहुतेक सर्व वस्तूंच्या उत्पादनांत सरासरी खर्च प्रथम कांहीं वेळ कमी व्हावा व नंतर वाढावा हीच प्रवृत्ति दिसून येते[४].

अल्पकालीन व दीर्घकालीन उत्पादनखर्च :--कोणतीहि उत्पादनसंस्था जेव्हां उत्पादनांत वाढ करूं पहाते तेव्हां तिच्याजवळ उपलब्ध असलेल्या उत्पादनसाधनांना —मुख्यतः इमारत, स्थिर भांडवल इत्यादि स्थिर व टिकाऊ स्वरूपाच्या भांडवली वस्तूंना--अधिक राबवून त्यांच्याकरवीं अधिक उत्पादन साधावयाचें, हा एक मार्ग तिला अनुसरतां येतो किंवा एकंदर उत्पादनसाधनांत वाढ करून--म्हणजे नव्या इमारती, नवी यंत्रसामुग्री, अधिक कामगारवर्ग ह्यांचा आश्रय करून--उत्पादनांत वाढ करावयाची हा दुसरा मार्ग तिला मोकळा असतो. ह्या दोहोंपैकीं कोणता मार्ग उत्पादनसंस्थेकडून स्वीकारला जातो, हें मुख्यतः उत्पादन वाढविण्याची त्वरा किती आहे ह्यावर अवलंबून असतें. ह्या संबंधांत सर्वसाधारणपणें असें म्हणतां येईल कीं, उत्पादन वाढविण्यासाठीं मिळालेला कालखंड फार लहान असेल तर आहे त्याच साधनसामग्रीकडून जास्तींत जास्त उत्पादन करावयाचें, हा मार्ग स्वीकारला जातो. पण उत्पादन वाढविण्याची त्वरा नसेल आणि दीर्घकालीन योजना कार्यान्वित करावयास भरपूर अवकाश असेल तर मुळांतील उत्पादनसाधनांत वाढ करण्याचाच मार्ग अनुसरला जातो. नेहमींच्या व्यवहारांत अर्थातच ह्या दोन्ही मार्गांना स्थान असतें. जेव्हां एखाद्या वस्तूची मागणी सातत्यानें वाढत असते आणि त्यामुळें उत्पादनांत वाढ करीत जाण्यांत कोणतीच आडकाठी नाहीं, अशी भावना उत्पादकांच्या मनांत प्रबळ असते तेव्हां आहेत त्या उत्पादनसाधनांचा उपयोग करून जास्तींत जास्त उत्पादन करण्याचा प्रयत्न तर केला जातोच; पण त्याच बरोबरीनें उत्पादन-साधनांत वाढ करून उत्पादन वाढविण्याच्या दीर्घकालीन योजनाहि आंखल्या जातात. उत्पादन वाढविण्याचा जो मार्ग स्वीकारला गेला असेल त्याचा सरासरी खर्चावर होणारा परिणाम मात्र भिन्न स्वरूपाचा असतो, हे येथें मुख्यतः सांगावयाचें आहे. ह्या कारणांकरितांच अर्थशास्त्रीय विवेचनांत अल्पकालीन उत्पादनखर्च (Short Period Cost) व दीर्घकालीन उत्पादनखर्च (Long Period Cost) असा भेद केला जातो. अल्पकालाच्या संदर्भांत जेव्हां उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केला जातो तेव्हां उत्पादनसंस्थेला आपल्या उत्पादनसामग्रींत भर टाकण्यास अवकाश नसतो. दीर्घकालाच्या संदर्भांत जेव्हां उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न होतो

[४] The analysis of pricing would be much simpler if there were, with given productive techniques, some invariant cost per unit of output for every good regardless of the amount produced. But we rarely find such an invariant relation of cost to output. Some systematic variation of cost with output is ordinarily found.

तेव्हां उत्पादनसंस्था आपल्याजवळील साधनसामग्रींत भर टाकते. ह्या फरकावर हा भेद आधारलेला आहे[५].

अल्पकालीन उत्पादनखर्च (Short run Cost) :—अल्पकालाचें वैशिष्टय असें सांगतां येईल कीं, यंत्रें, इमारती यांच्या सारखी उत्पादनाची दीर्घकालोपयोगी साधन-सामग्री (Plant) प्रमाणानें स्थिर असते. उत्पादन वाढवावयाचें झाल्यास मनुष्यबळ व कच्चा माल यांच्यासारख्या उत्पादनसाधनांत कांहीं प्रमाणांत तरी वाढ करावीच लागते. म्हणजेच निराळचा शब्दांत अल्प कालांत उत्पादनाचे कांहीं घटक स्थिर असतात व कांहीं घटकांचें प्रमाण बदलते असतें. ह्याच्या अनुरोधानें असें म्हणतां येईल कीं, अल्पकालीन उत्पादनखर्चाचे स्थिर (Fixed Cost) व बदलता खर्च (Variable Cost) असे दोन भाग पाडतात. स्थिर उत्पादनसाधनांचें प्रमाण उत्पादनप्रमाणाच्या बरोबरीनें कमीजास्त होत नसल्यानें व त्या साधनांची किंमत आधींच दिलेली असल्यानें त्यांच्यावरील खर्च वाढण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. स्थिर उत्पादनसाधनें वापरण्याचा जो खर्च असतो तोहि न बदलणारा असाच असतो. उत्पादनप्रमाण कितीहि असलें तरी स्थिर साधनसामग्रीच्या वापरांत आणि त्यासाठीं होणाऱ्या खर्चांत फरक पडण्याचें प्रयोजन नसतें. सारांश, स्थिर उत्पादन-साधनावरील खर्च स्थिरच असतो. ह्याच्या उलट अल्पकालांतहि उत्पादन वाढवावयाचें असल्यास कांहीं उत्पादनसाधनांच्या प्रमाणांत वाढ करावीच लागते. त्यामुळें त्या उत्पादनसाधनांच्या किमतींत बदल न होऊनहि उत्पादन वाढ़ले कीं, त्यांच्यावरील खर्च वाढतो. ह्याच न्यायानें जेव्हां उत्पादन कमी होतें तेव्हां त्या उत्पादनसाधना-वरील खर्च कमी होतो. थोडक्यांत कच्चा माल, मनुष्यबळ अशासारख्या उत्पादन-साधनावरील खर्च अल्पकाळांतहि बदलता असतो. स्थिरखर्च व बदलताखर्च मिळून अल्पकालांतील एकंदर उत्पादनखर्च ठरतो[६].

अल्पकालीन उत्पादन खर्चांत फेरफार :—अल्पकालीन उत्पादनखर्चांतील फेरफारांचें स्वरूप अजमावतांना उत्पादनसंस्थेकडून होणारें उत्पादन वाढल्यास उत्पादन साधनांच्या किमतींत बदल होण्याची शक्यता किती, ह्याचा प्रथम विचार करावा लागतो. ह्या बाबतींत असें सांगतां येईल कीं, एखाद्या उत्पादनसंस्थेच्या उत्पादनाचें संबंधित वस्तूच्या एकंदर उत्पादनांतील स्थान उपेक्षणीय असल्यास त्या उत्पादन

---

[५] The firm may vary output either by variations in scale of plant or by variations in utilisation of plants. Output variations accomplished either way may influence the cost of production per unit of output, but the influence may be significantly different in the two cases. This leads to an analytical distinction in the treatment of cost variation between the short period and the long period, distinguished by whether or not their duration is sufficient to permit free variation in the size of the fixed plant by the firm.

संस्थेनें उत्पादन वाढविण्याचा अगर कमी करण्याचा प्रयत्न केल्यास उत्पादन-साधनांच्या मागणीवर फार मोठा परिणाम होत नाहीं आणि त्यामुळें त्यांच्या किंमतींत उल्लेखनीय असा फरक होत नाहीं. उत्पादनाच्या बाजूस पूर्ण स्पर्धा असल्यास अशी परिस्थिति असते. ही परिस्थिति गृहीत धरून, अल्पकालीन उत्पादनखर्चांतील फेरफारांचें स्वरूप पुढीलप्रमाणें असल्याचें दिसून येईल.

(१) एकंदर खर्च (Total cost) उत्पादन शून्य असलें तरी थोडासा होतोच. ह्याचें कारण असें सांगतां येईल कीं, खर्चांतील जो स्थिर भाग असतो, तो उत्पादन केलें अथवा न केलें, तरी करावा लागतो.

(२) उत्पादन वाढवीत गेलें म्हणजे एकंदर खर्च वाढत जातो; पण प्रथम कांहीं वेळ एकंदर उत्पादनखर्च मंदगतीनें वाढण्याची व कालान्तरानें शीघ्रगतीनें वाढण्याची संभाव्यता असते. ह्याचें कारण असे सांगतां येईल कीं, उत्पादन वाढूनहि स्थिर खर्च वाढत नाहीं. ह्याचा परिणाम एकंदर खर्चावर होणें अपरिहार्य आहे. जोंपर्यंत एकंदर खर्चांत स्थिर खर्चाचें प्राधान्य असतें तोंपर्यंत बदलत्या खर्चामुळें एकंदर खर्चांत होणारी वाढ भासूं शकत नाहीं. कालान्तरानें वाढलेला बदलता खर्च एकंदर उत्पादन-खर्चांत महत्त्वाचें स्थान पटकावून बसतो. त्यानंतर बदलत्या खर्चाच्या प्रभावामुळें एकंदर खर्चांत शीघ्रगतीनें वाढ होते.

(३) वरील गोष्टीचीच तिसरी बाजू अशी सांगतां येईल कीं, उत्पादनाचा सरासरी खर्च प्रथम कांहीं वेळ कमी होत राहतो. कमी होत होत तो किमान पातळी-पर्यंत येतो. त्यानंतर सरासरी खर्चांत वाढ होऊं लागते आणि ती कायम रहाते. ह्याचें कारण असें कीं, उत्पादन वाढत असतां स्थिरखर्च वाढत्या उत्पादनावर विभागला जाऊन उत्पादनाच्या दर मापावर पडणारा भार कमी पडत जातो. निराळ्या शब्दांत स्थिरखर्च विभागला गेल्यामुळें सरासरी खर्च कमी होण्यास मदत करणारा प्रवाह निर्माण होतो; पण उत्पादनाबरोबरीनें बदलणारा असा जो खर्च असतो त्यामुळें सरासरी खर्च वाढूं पहातो. बदलता खर्च सुरवातीला कांहीं वेळ उत्पादनाच्या प्रमाणांत वाढत नाहीं आणि त्यामुळें तो खर्चहि सरासरी खर्च कमी होण्यास अनकूल ठरतो; पण कालान्तरानें बदलता खर्च उत्पादन-वाढीपेक्षां अधिक गतीनें वाढतो आणि त्यामुळें सरासरी खर्च वाढण्यास सहाय्य करणारी परिस्थिति निर्माण होते. म्हणजे उत्पादनांत थोड्याच अवधींत अशी परिस्थिति येते कीं, स्थिर

[१] In the short period, the firm has certain fixed factors and certain variable factors. Corresponding the firm in the short period finds that its costs are partly fixed and partly variable—In the short period, the productive equipment of the firm is fixed and part of the cost of production is fixed irrespective of output. The costs which need not be incurred if no output is produced (e. g. the cost of labour, raw material and power) are known as prime costs.

खर्चाचा दरमापावर पडणारा भार कमी होत असतो आणि बदलत्या खर्चाचा दरमापावर पडणारा भार वाढत असतो. जोंपर्यंत स्थिरखर्चामुळें सरासरी खर्चांत होऊं पहाणारी कपात बदलत्या खर्चामुळें सरासरी खर्चांत होऊं पहाणाऱ्या वाढीपेक्षां अधिक असते, तोंपर्यंत सरासरी खर्च एकंदरीनें कमी होतो. ही परिस्थिति फार काळ टिकूं शकत नाहीं. त्यानंतर बदलत्या खर्चाचा सरासरी खर्चावर पडणारा प्रभाव अधिक जोरदार ठरून सरासरी खर्च एकंदरीनें वाढतो.

(४) जोंपर्यंत सरासरी खर्च कमी होत असतो तोंपर्यंत सीमान्त-खर्चहि कमी होत असतो. सरासरी खर्च वाढूं लागला कीं, सीमान्त-खर्चहि वाढूं लागतो.

अल्पकालीन उत्पादन-खर्चांतील फेरफार दर्शविणारा तक्ता:

उत्पादन-मापांत Units Produced	एकंदर खर्च रुपयांत Total Cost	स्थिर खर्च रु. Fixed Cost	बदलता खर्च रु. Variable Cost	सरासरी स्थिर खर्च रु. Average fixed Cost	सरासरी बदलता खर्च Average Variable Cost	सरासरी खर्च Average Cost	सीमान्त खर्च Marginal Cost
०	५०	५०	०				
१	५८	५०	८	५०	८	५८	८
२	६५	५०	१५	२५	७·५०	३२·५०	७
३	७१	५०	२१	१६·६७	७·००	२३·६७	६
४	७६	५०	२६	१२·५०	६·५०	१९·००	५
५	८१	५०	३१	१०	६·२०	१६·२०	५
६	८७	५०	३७	८·३३	६·१०	१४·५०	६
७	९४	५०	४४	७·१४	६·२९	१३·४३	७
८	१०२	५०	५२	६·२५	६·५०	१२·७५	८
९	१११	५०	६१	५·५५	६·७८	१२·३३	९
१०	१२१	५०	७१	५·००	७·१०	१२·१०	१०
११	१३२	५०	८२	४·५५	७·४५	१२·००	११
१२	१४४	५०	९४	४·१७	७·८३	१२·००	१२
१३	१५७	५०	१०७	३·८५	८·२३	१२·०८	१३
१४	१७१	५०	१२१	३·५७	८·६४	१२·२१	१४
१५	१८६	५०	१३६	३·३३	९·०७	१२·४०	१५
१६	२०२	५०	१५२	३·१२	९·५०	१२·६२	१६

सरासरी खर्चांतील फेरफाराचें आद्य कारण :—वरील तक्त्यांतील एकंदर सरासरी खर्चांत होणारा फेरफार सर्वांत महत्त्वाचा आहे. कारण वस्तूचा उत्पादन-खर्च किती, अशी जेव्हां चौकशी केली जाते तेव्हां सरासरी खर्चच अभिप्रेत असतो. **सरासरी खर्च प्रथम कमी होणें व नंतर वाढणें ही प्रवृत्ति सर्वसाधारणपणें सर्वत्र आढळून येते. ह्या प्रवृत्तीचें आद्यकारण उत्पादनफलसिद्धान्तांत** (Laws of Returns) आढळून येतें. प्रथम वाढतें फळ (Increasing Returns) व नंतर घटतें फळ (Diminishing Returns) असा उत्पादनफलाचा क्रम असतो हें सुपरिचित आहे. उत्पादनावर वाढत्या फळाचा प्रभाव पडत आहे. ह्याचाच अर्थ असा कीं, तेवढ्याच उत्पादनसाधनाकडून जास्त उत्पादन होत आहे किंवा ह्या गोष्टीचीच दूसरी बाजू म्हणजे उत्पादनाच्या प्रत्येक मापास लागणारें उत्पादनसाधनांचें प्रमाण कमी होत आहे. ह्याच न्यायानें उत्पादनावर घटत्या फळाच्या प्रवृत्तीचा अंमल आहे. ह्याचाच अर्थ असा होतो कीं, उत्पादनाच्या प्रत्येक मापासाठीं लागणारें उत्पादनसाधनांचें प्रमाण वाढत आहे. उत्पादनाचीं जीं स्थिर साधनें असतात त्यांचें दरमापी प्रमाण अर्थातच उत्पादन जेवढें वाढावें तेवढें कमी होतें; पण कच्चा माल, कामगार वर्ग, अशासारख्या उत्पादनसाधनांच्या बाबतींत असा अनुभव येतो कीं, सुरवातीला कांहीं काळपर्यंत बदलत्या उत्पादनसाधनांच्या प्रमाणांत वाढ होते त्यापेक्षां अधिक वाढ उत्पादनांत होते; पण पुढेंपुढें बदलत्या उत्पादनसाधनांत ज्या प्रमाणांत वाढ होते त्यापेक्षां कमी प्रमाणांत उत्पादनांत वाढ होते. उदाहरणानें हें स्पष्ट होईल. एका कामगाराऐवजीं दोन कामगार कामाला लावलें कीं उत्पादन दुप्पट किंवा त्यापेक्षां कमी न होतां दुपटीपेक्षां अधिक होण्याचा संभव असतो. पण हाच न्याय लावून कामगारांची संख्या शंभर केली कीं, उत्पादन शंभर पटींपेक्षीं अधिक होईल असें समजणें चूक होईल. बदलत्या उत्पादनसाधनांचें प्रमाण विशिष्ट मर्यादेपलीकडे वाढल्यास ज्या प्रमाणांत तें वाढवावें त्या प्रमाणांत उत्पादनांत वाढ होत नाहीं. ह्याचें कारण असें सांगतां येईल कीं, ज्या स्थिर उत्पादनसाधनांचा बदलत्या उत्पादनसाधनांशीं संयोग होत असतो त्या उत्पादनसाधनांची जी विवक्षित शक्ति असते ती संपूर्णपणें राबवली जाईपर्यंत बदलत्या उत्पादनसाधनांत वाढ झाल्यास 'अधिकस्य अधिकं फलं' ह्या म्हणण्याचें प्रत्यंतर येतें. म्हणजेच वाढत्या फळाचा अनुभव येतो. त्यानंतर 'अति तेथें माती' ह्या म्हणीचें प्रत्यंतर येऊं लागतें. म्हणजेच घटतें फळ सुरू होतें. सारांश, दरमापीं लागणारें बदलत्या उत्पादन-साधनाचें प्रमाण व त्यामुळें बदलत्या उत्पादनसाधनांवर होणारा खर्च प्रथम कमी होतो व नंतर ह्या दोहोंतहि वाढ ह्यांत सरासरी खर्च प्रथम कमी होतो व नंतर वाढतो ह्याचें आद्यकारण आढळतें.[७]

उत्पादनफलसिद्धान्ताची मीमांसा :—वरील सर्व विवेचन दुसऱ्या प्रकारेंहि मांडतां येईल. उत्पादन वाढवीत गेल्यास प्रथम कांहीं वेळ अंतर्गत काटकसर (Internal Economies) होऊन सरासरी खर्च कमी होतो. अंतर्गत काटकसर

(Internal Economies) होते. ह्याचें कारण असें कीं, जेव्हां एखाद्या उत्पादन-घटकांत वाढ होते तेव्हां त्याच कारणामुळें उत्पादन व्यवस्थेंत सुधारणा घडवून आणतां येते. त्यामुळें उत्पादनांतील वाढ घटकांतील वाढीपेक्षां अधिक होऊं शकते. उदाहरणार्थ, कामगारांची संख्या वाढल्यामुळें श्रमविभागणीस वाव मिळून प्रत्येक कामगाराची उत्पादनक्षमता वाढते. हें जोंपर्यंत शक्य आहे तोंपर्यंत वाढत्या फळाचा अनुभव येतो. अशा सुधारणांना जोंपर्यंत वाव आहे तोंपर्यंत स्थिर उत्पादन-घटकाबरोबर संयोग करणाऱ्या बदलत्या उत्पादनघटकांचें प्रमाण वाढवत जाणें हितकर ठरलें असेंहि म्हणतां येईल; पण अंतर्गत सुधारणांना वाव आहे, अशी स्थिति फार काळ राहत नाहीं. कांहीं काळानंतर केवळ बदलत्या घटकांचें प्रमाण वाढवून सुधारणा होऊं शकत नाहीं. तो काळ जेव्हां येतो त्यावेळीं स्थिरघटकांची उत्पादनशक्ति संपूर्णपणें राबविलेली असते. स्थिर उत्पादनसाधनांत वाढ न करण्यानें पडणारी उणीव इतर उत्पादन-घटकांत वाढ करून भरली जात नाहीं. निराळ्या शब्दांत स्थिर उत्पादनघटकाऐवजीं दुसरा घटक वापरण्याची शक्यता मर्यादित असते. म्हणूनच कालान्तरानें घटत्या फळाचा अनुभव येऊं लागतो. [८]

दीर्घकालीन उत्पादनखर्च :—दीर्घकालच्या संदर्भांत कोणत्याहि उत्पादन-घटकाचें प्रमाण स्थिर नसतें. यंत्रसामुग्री, इमारती ह्यांच्यांत जरूर पडेल त्याप्रमाणें वाढ करतां येते. त्यामुळें दीर्घकालांत कोणताहि खर्च स्थिर नसतो[९].

सर्व बाबींवरील खर्चांत बदल होऊं शकतो. स्थिर भांडवली वस्तूंचा अधिक वापर करून उत्पादन वाढविणें किंवा स्थिर भांडवली वस्तूंच्या प्रमाणांतच वाढ करणें ह्या दोन्ही गोष्टी उत्पादन-संस्थेच्या हातांत असतात. जोंपर्यंत दीर्घकालोपयोगी भांडवली वस्तूंच्या अधिक वापरानें उत्पादन वाढवून सरासरी खर्च कमी करतां येतो, तोंपर्यंत त्या मार्गाचा अवलंब उत्पादनसंस्था करते. पण हें शक्य नाहीं असें जेव्हां आढळून येतें तेव्हां उत्पादन वाढविण्यासाठीं दीर्घकालोपयोगी भांडवली उत्पादनसाधनांत वाढ करण्याचा प्रयत्न केला जात असल्यामुळें प्रत्येक उत्पादन-

---

[७] If variable costs per unit of output in many terms at first decline and then increase, this must be because the variable real costs per unit of output first decline and then increase. That is, it takes at first successively fewer units of variable factors per unit of output and then successively more such units of variable factors per unit of output as output is increased. The variation of variable money cost is simply a reflection of a fundamental variation in variable real cost—As variable factors are successively increased against a fixed factor, there is at first an increasing and then a decreasing average product per unit of variable factor. This law is frequently called the law of diminishing returns or alternately the law of variable proportions. —**Bain**

प्रमाणाच्या अनुषंगानें कमींत कमीं जो सरासरी खर्च असेल तो दीर्घकालीन उत्पादन खर्चाची परिस्थिति यथार्थपणें दर्शवितो[१०].

दीर्घकालीन उत्पादनखर्चांतील फेरफाराचें स्वरूप :—दीर्घकालीन उत्पादन-खर्चांत होणाऱ्या फेरफारांचें स्वरूप काय असतें, हें पाहिल्यास असें दिसून येतें कीं, अल्पकालीन उत्पादनखर्चाप्रमाणेंच दीर्घकालीन उत्पादनखर्चहि प्रथम कांहीं काळ कमी होतो, नंतर कांहीं काळपर्यंत तो स्थिर राहतो आणि शेवटीं वाढतो आणि मग वाढतच जातो[११].

उद्योगधंद्यांतील उत्पादनखर्चाबाबत आजपावेतों जें संशोधन झालें आहे त्यानें ह्या विधानाला पुष्टीच मिळाली आहे.

दीर्घकालीन उत्पादनखर्चांतील फेरफारांच्या विशिष्ट स्वरूपाचा खुलासा :— दीर्घकालीन उत्पादनखर्च उत्पादन वाढत असतां प्रथम कमी होऊन नंतर वाढतो. ह्या अनुभवाचा खुलासा असा देण्यांत येतो कीं, मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे जे विशिष्ट फायदे असतात ते जोंपर्यंत मिळूं शकतात तोंपर्यंत उत्पादनखर्च कमी होतो. ते फायदे एकदा संपुष्टांत येऊन मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे तोटे अनुभवास

---

८ The Law of Increasing returns may be formulated thus. "When an increasing amount of any factor of production is devoted to a certain use, it is often the case that improvements in organisation can be used which will make natural units of the factor more efficient, so that an increase of output does not require a proportionate increase in the physical amount of factors; —The Law of Diminashing returns, as is usually formulated, states that with a fixed amount of any one factor of production, successive increases in the amount of other factors will offer a point yield a diminishing increment of the product. Looking at the matter from the point of view of cost of production, if one factor is fixed in amount and increased amounts of other factors are used with it, and if no improvement in the efficiency or reduction in the price of these other factors is introduced by the increase in the amount used, after a point the cost of production, per unit of output will rise." —Mrs. Robinson

९ In the long run there are no fixed costs. All costs are variable.

१० Any cost amount from a long run average cost curve which corresponds to a specific amount is thus the lowest cost at which that cost can be produced, scale and rate of utilisation of plant factors being coordinately chosen.

११ As the scale of the firm is progressively extended, the cost per unit of output at first declines, then becomes constant and finally increases.

येऊं लागले म्हणजे उत्पादनखर्च वाढूं लागतो. मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाच्या फायद्याची मर्यादा एकदां संपली कीं, कायमची संपते. त्यामुळें विशिष्ट मर्यादेनंतर खर्च वाढतच रहातो.

मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे फायदे :—मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे फायदे खर्चांतील काटकसरीच्या (Economies) रूपानें मिळतात. खर्चांत काटकसर होते, ह्याचें मुख्य कारण उत्पादनसाधनांच्या उप ेगांत जी बचत होते तींत आढळतें. कांहीं वेळां मोठ्या प्रमाणावरील खरेदीमुळें उत्पादनसाधनें स्वस्तांत मिळून उत्पादनसाधनावरील एकंदर खर्च कमी होण्याची शक्यता असते. तथापि उत्पादनसाधनांच्या वापरांत बचत होऊन जी काटकसर होते तीच खर्च कमी होण्याच्या मुळाशीं असल्याचें विशेषेकरून दिसून येतें. उत्पादनसाधनांत बचत होते ह्याचा अर्थ असा कीं, उत्पादनसाधनांवरील खर्चांत जेवढी वाढ होते त्यापेक्षां अधिक प्रमाणांत उत्पादनांत वाढ होते आणि त्यायोगें सरासरी उत्पादनखर्च कमी होतो.

विशेषीकरणाचे फायदे :—दीर्घकालीन संदर्भांत मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे फायदे नेमके कशामुळें मिळतात, ह्याचा शोध घेतला असतां असें दिसून येतें कीं, ज्यांची उत्पादनक्षमता अधिक आहे अशीं उत्पादनसाधनें उत्पादन योग्य प्रमाणांत वाढविलें असतां वापरतां येतात. त्या उत्पादनसाधनाकरितां कमी प्रतीच्या उत्पादनसाधनांच्या मानानें जेवढी अधिक किंमत द्यावी लागते त्यापेक्षां अधिक त्यांची उत्पादनक्षमता असल्यानें मुळांतील त्यांची किंमत अधिक असूनहि त्यांचा वापर काटकसरीस कारणीभूत होतो. उदाहरणार्थ, उत्पादन वाढविल्यामुळें कामगारांची संख्या वाढते तेव्हां श्रमविभागणीस वाव मिळून श्रमविभागणीचे फायदे पदरांत पडतात हें तर खरेंच; पण त्याहीपेक्षां महत्त्वाची गोष्ट अशी कीं, प्रत्येक स्वतंत्र कामाकरितां त्या त्या कामांत तरबेज असलेल्या विशेषज्ञाची योजना करतां येते. ह्या विशेषज्ञांना बराच पगार द्यावा लागतो हें खरें; पण त्यांच्या पगाराच्या मानानें त्यांची उत्पादनक्षमता, त्यांची कार्यक्षमता रघोंस असल्यानें त्यांच्या उत्पादनाच्या दरमापावर पडणारा भार कमी प्रतीच्या कामगारांच्या तुलनेनें कमीच असतो. हेंच यंत्रसामग्रीबाबत म्हणतां येईल. उत्पादनाचें प्रमाण जेव्हां बरेंच मोठें असतें तेव्हां आकारानें व उत्पादनक्षमतेच्या दृष्टीनें मोठी असलेली किंवा खास कामासाठीं बनविण्यांत आलेली असल्यामुळें जिला अधिक किंमत द्यावी लागते अशी यंत्रसामग्री वापरतां येते; एवढेंच नव्हे तर परवडते. कारण किंमतीच्या मानानें तिची उत्पादन-क्षमता बरीच असते व साहजिकच तिचा दरमापीं बोजा बराच कमी होतो. व्यवस्थापकवर्गांतहि श्रमविभागणीचा व विशेषज्ञांचा फायदा घेतां येतो. थोडक्यांत उत्पादनाचें प्रमाण बरेंच मोठें झालें म्हणजे उत्पादनखर्चाशीं संबंधित असलेल्या सर्व क्षेत्रांत 'विशेषीकरणाचा' (Specialisation) फायदा मिळतो. मोठ्या

प्रमाणावरील उत्पादनांत होणाऱ्या काटकसरीचें उगमस्थान विशेषीकरणाच्या फायद्यांत प्रामुख्यानें आढळतें.[१२]

विशेषीकरणाचे फायदे मिळण्याचें आद्य कारण--उत्पादन घटकांची अविभाज्यता (Indivisibility) :—मोठ्या प्रमाणावर उत्पादन केल्यानें उत्पादनक्षमता रपूर असलेले व विशिष्ट कामें करण्यांत तरबेज असलेले उत्पादनघटक वापरतां येतात. ह्यामुळें उत्पादनखर्चांत जी काटकसर होते तींत मोठ्या प्रमाणावर उत्पादनाच्या फायद्यांचें रहस्य सांठविलें आहे. येथें असा प्रश्न उपस्थित होतो कीं, विशेषीकरणाचे फायदे मिळविण्यासाठीं उत्पादनाचें प्रमाण मोठेंच कां असावें लागतें ? ह्या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, प्रत्येक उत्पादनसाधन 'अविभाज्य' (Indivisible) असतें. त्यामुळें त्या उत्पादनसाधनाची जास्तींत जास्त जी उत्पादनशक्ति असेल त्या मर्यादेपर्यंत उत्पादन जेव्हां केलें जातें तेव्हांच त्या उत्पादनसाधनाचा उत्पादनाच्या प्रत्येक मापावर पडणारा भार कमींत कमी होतो. त्यापेक्षां कमी उत्पादन असेल तर तो भार अधिक पडतो. उत्पादनसाधनाच्या कमाल उत्पादनशक्तीपेक्षां उत्पादन कमी करून उत्पादन-खर्च कमी करणें साधत नाहीं. कारण त्या उत्पादनसाधनाचे भाग पाडून थोड्या उत्पादनासाठीं तें उत्पादनसाधन अंशतः वापरतां येत नाहीं. हा मुद्दा उदाहरणानें अधिक स्पष्ट होईल. ट्रॅक्टर वापरण्यासाठीं १०० एकर जमिनीची आवश्यकता असेल तर तेवढी जमीन असल्याखेरीज ट्रॅक्टरचा दर मापावर पडणारा भार किमान व्हावयाचा नाहीं. १० एकर अगर २५ एकर जमीन वापरूनहि ट्रॅक्टरचा भार दरमापीं किमान होणें हें ट्रॅक्टरचे तुकडे पाडून एकदशांश किंवा एकचतुर्थांश भाग वापरतां आला व तो तेवढ्या प्रमाणांत कमी किंमतीला मिळाला तरच शक्य होईल ! असें होईल ही कल्पनासुद्धां वेडगळपणाची आहे, हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. एखाद्या लहान कामाकरितां एखादा तंत्रज्ञ परवडणें हें तो अंशतः वापरावयास मिळाला तरच शक्य होईल. पण व्यवहारांत असें कसें जमणार ? तेव्हां सांगण्याचा मुद्दा असा कीं, प्रत्येक उत्पादनसाधन हें अविभाज्य असतें आणि त्या साधनाच्या कमाल उत्पादनशक्तीएवढें उत्पादन केल्यासच त्या साधनामुळें उत्पादनखर्च कमींत कमी होण्यास मदत असते. दीर्घकालाच्या संदर्भांत लहान प्रमाणावर उत्पादन होतें तेव्हां आणि मोठ्या प्रमाणावर होते तेव्हांहि जीं उत्पादन-साधनें वापरलीं जातात तीं

[१२] It is suggested that in most industries, there are certain economies or cost savings, available through expansion of scale upto a certain point. These include the economies of greater specialisation of labour, of greater specialisation of capital equipment, of large as opposed to small mechanical devices, of large scale distriubution and so forth. As a firm becomes larger, it can reduce its average costs by taking advantages of those economies.

अविभाज्यच असतात. मग ह्या दोन प्रकारच्या परिस्थितींत फरक काय ? तो असा कीं, मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत असतां जीं अविभाज्य उत्पादन-साधनें वापरलीं जातात त्यांची उत्पादनशक्ति खर्चाच्या मानानें फारच प्रचंड असते आणि म्हणून त्यांचा वापर करूनही सरासरी उत्पादनखर्च कमी होतो. सारांश, **प्रचंड शक्तीची अविभाज्य उत्पादनसाधनें वापरण्याची शक्यता हें मोठ्या प्रमाणावरील उत्पादन दीर्घकालाच्या संदर्भात काटकसरीचें ठरतें ह्याचें मूलकारण आहे.** [१३]

सरासरी खर्चांत शेवटीं वाढ कां होते ? :—दीर्घकालाच्या संदर्भांतहि सरासरी खर्च कमी होत जाण्याची प्रक्रिया थांबून केव्हां तरी त्या खर्चांत वाढ होणें अपरिहार्य कां असतें, ह्या प्रश्नाचें आतां उत्तर दिलें पाहिजे. तें असें कीं, दीर्घकालाच्या संदर्भांतहि सर्व उत्पादनघटकांत वाढ करतां येते हें संपूर्णतया खरें नाहीं. व्यवस्थापन (Management) हा उत्पादन-घटक स्थिर (Fixed) असतो आणि ह्या उत्पादन-घटकाच्या शक्तीपलीकडे उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केल्यास उत्पादनांत अकार्यक्षमता, अपव्यय, अनास्था हे त्रिदोष दिसूं लागून सरासरी उत्पादनखर्च वाढूं लागतो. निराळया शब्दांत व्यवस्थापन हा स्थिर घटक ठरून त्या घटकाशीं संयोग करणाऱ्या उत्पादनघटकांच्या बाबतींत घटत्या फळाचा अनुभव येऊं लागतो. घटत्या फळाचा सिद्धान्त अर्थशास्त्रांत प्रथम सांगितला गेला तो 'भू' (Land) ह्या घटकाच्या संदर्भात. एकंदर समाजाच्या दृष्टीनें विचार केल्यास 'भू' च्या उपलब्धतेंत वाढ करतां येत नाहीं. म्हणून एकंदर उत्पादनाचा विचार करतांना नैसर्गिक साधनसामग्रीची अंतिम मर्यादा लक्षांत घ्यावीच लागते. पण जेव्हां एखाद्या उत्पादन-संस्थेच्या उत्पादनाचा व उत्पादनखर्चांचा विचार करावयाचा असतो तेव्हां व्यवस्थापन ह्याच उत्पादन घटकाच्या मर्यादा शेवटीं जाणवतात. इतर उत्पादनघटकांच्या मर्यादा जाणविण्याचें कांहीं कारण नसतें. एकंदर पुरवठ्याच्या मानानें एखाद्या उद्योग-धंद्याची आणि त्यांतीलहि एखाद्या उत्पादनघटकाची कोणत्याहि घटकाकरितां असलेली मागणी उपेक्षणीय असल्यानें कोणत्याहि इतर उत्पादनघटकाच्या प्रमाणांत वाढ करणें उत्पादनसंस्थेला साधारणतः कठिण नसतें. व्यवस्थापनाच्या बाबतींत तसें म्हणतां येत नाहीं हें उघडच आहे. व्यवस्थापनाच्या बाबतींत फार तर एवढेंच म्हणतां येईल कीं, व्यवस्थापनाचें स्वरूप बदलून—म्हणजे वैयक्तिक उत्पादकाच्या जागीं भागीदारी, भागीदारीच्या जागीं उत्पादन संस्था अशा स्वरूपाचा बदल करून— व्यवस्थापन शक्ति वाढवितां येते. पण तरीही ज्या मर्यादेपलीकडे जातां येणारच नाहीं अशी एक उत्पादनाची मर्यादा जाणविणें अपरिहार्य आहे. शिवाय व्यवस्थापनाचें स्वरूप जेवढें किचकट व अवैयक्तिक होत जातें तेवढी अपव्यय, अनवस्था,

[१३] The recognised economies of large scale production are essentially a reflection of a technical indivisibility of factors of production within given patterns of technique. —**Bain**

अकार्यक्षमता ह्या त्रिदोषांना वाव मिळण्याची शक्यता अधिक असते. हा अनुभव परिचित आहे. सारांश, व्यवस्थापनाच्या अपरिहार्य मर्यादामुळें दीर्घकालीन उत्पादन-खर्च सतत कमी होत नाहीं. उत्पादनाचें विशिष्ट प्रमाण गांठलें गेल्यानंतर तो वाढतो व पुढें मग सतत वाढत राहतो.[१४]

पर्याप्त उत्पादन (Optimum Production) :—वरील सर्व विवेचनाचा निष्कर्ष असा सांगतां येतो कीं, उत्पादनाचें एक विशिष्ट प्रमाण असें असतें कीं, त्या प्रमाणावर उत्पादन केलें असतां उत्पादनाचा सरासरी खर्च कमींत कमी होतो. ह्या अनुभवांतूनच पर्याप्त उत्पादन व पर्याप्त उत्पादन संस्था ह्या कल्पना उद्भवल्या. त्या कल्पना अर्थशास्त्रीय विवेचनांत महत्त्वाच्या असल्यानें त्यांचा विस्तार पुढील प्रकरणांत केला आहे.

प्रमुख संदर्भग्रंथ

(1) Mrs. Robinson—Economics of Imperfect Competition.
(2) Bain—Pricing, Distribution and Employment.

: ६ : पर्याप्त उत्पादन-प्रमाण

पर्याप्त उत्पादन-प्रमाण म्हणजे काय ? :—पूर्ण स्पर्धेसंबंधीं लिहितांना पूर्ण स्पर्धेत प्रत्येक उत्पादक पर्याप्त उत्पादन-प्रमाण गांठतो आणि त्यामुळें पूर्ण स्पर्धा ग्राहकाच्या दृष्टीनें आदर्श ठरते असें सांगितलें होतें. पूर्ण स्पर्धेत गांठलें जाणारें पर्याप्त उत्पादन-प्रमाण कसें ठरतें, ह्याचा विचार ह्या प्रकरणांत करावयाचा आहे. तो करण्यापूर्वीं पर्याप्त उत्पादन-प्रमाण म्हणजे काय, ह्याचा प्रथम खुलासा केला पाहिजे.

कोणताहि उद्योगधंदा (Industry) हा एक अगर अधिक उद्योग-संस्थांचा (Firm) बनलेला असतो.[१] प्रत्येक उद्योग-संस्थेच्या हुकुमतीखालीं संबंधित वस्तूचें कांहीं एका प्रमाणावर उत्पादन चालू असतें. उत्पादनाचें प्रमाण कोणतें, हें उत्पादित वस्तूंच्या परिमाणांची संख्या पाहिली म्हणजे समजतें. कोणत्याहि उद्योग-संस्थेला मागणी, किंमत, उत्पादन-खर्च इत्यादि गोष्टींचा विचार करून आपलें उत्पादन-प्रमाण निश्चित करावें लागतें. बाजारांत पूर्ण स्पर्धा असो, अपूर्ण स्पर्धा असो किंवा मक्तेदारी असो; सर्वसाधारण नियम हाच कीं, प्रत्येक उद्योग-संस्था ज्या उत्पादनप्रमाणामुळें आपल्याला

[१४] As output is extended, the management factor cannot be indefinitely expanded without increase in cost of management per unit of output.

[१] An industry is any group of firms producing a single commodity. A firm is a concern that produces only one commodity and is controlled by a single independent interest.

जास्तींत जास्त नफा होईल तेंच उत्पादनप्रमाण निश्चित करते; पण जास्तींत जास्त नफा उत्पादकाला प्राप्त करून देणारें उत्पादनप्रमाण पर्याप्त ठरतेंच असें नाहीं. पर्याप्त उत्पादनप्रमाण हा शब्दप्रयोग विशिष्ट अर्थानेंच वापरला जातो. तो अर्थ लक्षांत घेतां असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, **प्रचलित उत्पादनतंत्र व व्यवस्थापन पद्धति पहाता ज्या उत्पादन-प्रमाणानें सरासरी उत्पादनखर्च कमींत कमी होतो तें उत्पादन-प्रमाण पर्याप्त होय. तसेंच हें उत्पादनप्रमाण ज्या उद्योगसंस्थेनें गांठलें असेल ती पर्याप्त उद्योगसंस्था** (Optimum Firm) **होय.**[२]

ह्या व्याख्येवरून ही गोष्ट लक्षांत येईल कीं, गतिमान अर्थ-व्यवस्थेंत उत्पादनतंत्र व व्यवस्था-पद्धति जशी बदलत जाते तसें पर्याप्त उत्पादनप्रमाणहि बदलत जातें. थोडक्यांत पर्याप्त उत्पादनप्रमाण (Optimum Scale of Production) स्थिर नसतें.

एकापेक्षां अधिक 'पर्याप्त-प्रमाणें' :—कोणत्याहि उद्योग-धंद्यांतील पर्याप्त-उत्पादन-प्रमाण निश्चितपणें ठरविणें सोपें नाहीं. खरी गोष्ट अशी आहे कीं, ह्या बाबतींत निरनिराळ्या दृष्टिकोनांतून विचार करावा लागतो. तसा विचार केल्यास असें आढळून येतें कीं, एका दृष्टीनें पर्याप्त ठरणारें उत्पादन-प्रमाण दुसऱ्या दृष्टीनें उत्कृष्ट ठरेलच असा नेम नाहीं. त्यामुळें पर्याप्त ठरणारीं उत्पादनप्रमाणें अनेक असतात. त्यांच्यांत उपेक्षणीय म्हणतां येणार नाहीं अशी तफावत असते. ती तफावत दूर करून एकंदर खर्चाच्या दृष्टीनें खरोखरच सर्वोत्कृष्ट म्हणतां येईल, असें उत्पादन-प्रमाण गांठण्याची कोशीस उत्पादन-संस्थेला करावी लागते. शेवटीं ठरणारें पर्याप्त उत्पादन-प्रमाण एखाद्या विशिष्ट दृष्टीनें विचार केल्यास उत्कृष्ट ठरेलच असें नाहीं. तें पर्याप्त उत्पादन-प्रमाण एक प्रकारें तडजोडीच्या स्वरूपाचें असतें. त्या उत्पादन-प्रमाणाचें वैशिष्टच असें सांगतां येईल कीं, त्यांत समतोल चांगला साधलेला असतो. त्या प्रमाणानें कांहीं बाबतींत तोटे होत असतात; पण इतर बाबतींत जे फायदे होत असतात त्यांनीं त्या तोटयांची पुरेपूर भरपाई होत असते. अशा प्रकारें सम-तोल साधला जातो. पर्याप्त-उत्पादन-प्रमाण हें एक प्रकारची तडजोड असल्यानें तें ठरविणाऱ्या प्रवाहांचा अभ्यास करावयाचा असेल तर प्रत्येक वेगळ्या दृष्टि-कोनांतून प्रथम विचार करून त्या त्या दृष्टीनें पर्याप्त उत्पादन-प्रमाण कसें ठरतें, ह्याचा शोध प्रथम घेणें व नंतर विविध पर्याप्त प्रमाणांत तफावत असेल तर ती दूर करण्याचे प्रयत्न कसे केले जातात व त्या प्रयत्नांतूनच परिणामीं पर्याप्त उत्पादन-प्रमाण कसें ठरतें, हें पहाणें ही पद्धत सोयीची आहे.

---

[२] By optimum firm we must mean that firm which in the existing conditions of technique and organising ability has the lowest average cost of production per unit when all those costs which must be covered in the long run are included

—**E. A. G. Robinson.**

उत्पादन-तंत्रदृष्ट्या पर्याप्त उत्पादन-प्रमाण (Optimum Technical Unit) :— उत्पादनतंत्राचा विचार करून पर्याप्त उत्पादनप्रमाण ठरवितांना संबंधित वस्तूच्या उत्पादनांत श्रमविभागणी आणि यांत्रिक उत्पादन ह्यांना किती अवसर आहे, हें मुख्यत: विचारांत घ्यावें लागतें. श्रमविभागणीला जेवढ्या प्रमाणांत अवसर असेल तेवढ्या प्रमाणांत उत्पादन-प्रमाण वाढविणें सरासरी खर्च कमी करण्याच्या दृष्टीनें हितकारक ठरतें.[३] श्रमविभागणीचा जास्तींत जास्त शक्य असेल तेवढा अवलंब केल्यानें सरासरी खर्च कमी होण्यास मदत होते. ह्याचें मुख्य कारण असें सांगतां येईल कीं, श्रमविभागणीमुळें मनुष्यबळावरील खर्च ज्या प्रमाणांत वाढतो त्यापेक्षां किती तरी अधिक प्रमाणांत मनुष्यबळाची उत्पादन-शक्ति वाढते. उत्पादन-क्षमतेची वाढ, वेळेची बचत व यंत्राचा वापर करण्याची शक्यता हें श्रम-विभागणीचे तीन फार मोठे फायदे आहेत असें अर्थशास्त्राचा जनक ॲडॅम स्मिथ ह्यानें सांगितलें आहे. ह्या तीन फायद्यांमुळेंच एका कामगाराला अनेक कामगारांचें काम झेपेल एवढी त्याची उत्पादनशक्ति वाढते.[४] श्रमविभागणीमुळें कामगाराची उत्पादनक्षमता वाढते. कारण तेंच तेंच काम सतत करावें लागल्यानें कामगाराला कामाची इतकी संवय होते कीं, केवळ संवयीनें कामाचा वेग वाढतो व कामांतील कौशल्यहि वाढतें. शिवाय एकच काम सतत करावें लागण्यांत वेळाचीहि पुष्कळ बचत होते. त्यामुळेंहि उत्पादनांत वाढ होण्यास मदत होते हें वेगळेंच. श्रमविभागणीमुळें मनुष्यबळावरील खर्च कांहीं प्रमाणांत तरी वाढणें अपरिहार्य आहे. कारण श्रम-विभागणी बऱ्याच प्रमाणांत झाल्यानंतर कोणताहि कामगार हा सामान्य कामगार रहात नाहीं. तो आपापल्या कामांत वाकबगार झालेला असा कुशल कामगार होतो.[५] कुशल कामगाराला सर्वसाधारणपणें अधिक मजुरी द्यावीच लागते, हें सर्वश्रुतच आहे. अशा प्रकारें श्रमविभागणीमुळें मनुष्यबळावरील खर्च जरी वाढत असला तरी त्यापेक्षां किती तरी अधिक प्रमाणांत कामगारांची उत्पादनक्षमता वाढत असल्यानें जेथें जेथें शक्य असेल तेथें तेथें आणि ज्या प्रमाणांत शक्य असेल त्या

[३] Principle of division of labour requires a firm sufficiently large to obtain maximum profitable division of labour.

[४] It is owing first to the increase of dexterity in every particular workman, secondly to the saving of the time which is commonly lost in passing from one species of work to another, and lastly to the invention of a great number of machines which facilitate and abridge labour and enable one man to do the work of many. —**Adam Smith.**

[५] A man or woman who works continuously at one task for some time will acquire a skill or knack of doing it which will not be shared by another, even naturally more skilful, who has not tackled that job before. —**E. A. G. Robinson**

प्रमाणांत श्रमविभागणी करणें अगदीं श्रेयस्कर ठरतें. श्रमविभागणीच्या तत्त्वाचा भरपूर फायदा घेण्यास आवश्यक तेवढें उत्पादन-प्रमाण वाढविणें कोणत्याहि उद्योगधंद्यांत इष्ट असतें.[१]

अर्थात् ह्या ठिकाणीं हें सांगितलेंच पाहिजे कीं, श्रमविभागणीस सर्व वस्तूंच्या उत्पादनांत सारखा वाव असतो असें नाहीं. एवढेंच नव्हे तर कित्येक उद्योगधंद्यांत असें आढळून येतें कीं, त्यांच्या कांहीं शाखांत श्रमविभागणी जेवढी शक्य आहे तेवढी इतर शाखांत नाहीं. ढोबळच उदाहरण द्यावयाचें झाल्यास असें दाखवून देतां येतील कीं, औद्योगिक मालाच्या तुलनेनें शेतमालाच्या उत्पादनांत श्रमविभागणीस कमी वाव मिळतो. कारण शेतींतील उत्पादनक्रिया सामान्यपणें बरोबरीनें न येतां एकापाठोपाठ येतात. वस्त्रोत्पादनाच्या उत्पादनांत असें दिसून येतें कीं, सूतकताईंत श्रमविभागणी जेवढी शक्य होते तेवढी कापड विणण्याच्या कामांत शक्य होत नाहीं. बाकी एवढें मात्र खरें कीं, हल्लीं बहुतेक सर्व प्रक्रियांत श्रमविभागणीची शक्यता भरपूर प्रमाणांत निर्माण झाली आहे. ही गोष्ट उद्योगधंद्यांतील उत्पादनप्रमाण वाढण्यास कारणीभूत झालेली आहे. कित्येक उद्योगधंद्यांत तर श्रमविभागणी अगदीं पराकोटीस पोंचली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. श्रमविभागणी जेवढी वाढते, तेवढें मनुष्यबळहि वाढवावें लागतें आणि अशा प्रकारें उत्पादनप्रमाण सतत वाढतच जातें.

उत्पादन प्रक्रियांचे एकत्रीकरण :––श्रमविभागणीचा उत्पादनप्रमाणावर जो परिणाम होतो त्यासंबंधीचें हें विवेचन करण्यापूर्वीं एका महत्त्वाच्या गोष्टीकडे लक्ष वेधणें अगत्याचें आहे. श्रमविभागणी जेव्हां झालेली नसते तेव्हां तेच लोक सर्व कामें करीत असल्यामुळें एखाद्या वस्तूच्या उत्पादनांतील विविध प्रक्रिया आणि उपप्रक्रियादेखील, एकापाठोपाठ कराव्या लागतात. उदाहरणार्थ, आधीं सूतकताई आणि मग विणण्याचें काम असा क्रम वस्त्रोत्पादनांत ठेवावा लागतो; पण श्रमविभागणी झाल्यानंतर उत्पादनाच्या विविध प्रक्रिया बरोबरीनें होऊं लागतात. ह्या गोष्टीचीहि मदत उत्पादनाची गति वाढण्याच्या दृष्टीनें चांगली होते. आणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे. श्रमविभागणीमुळें बारीकसारीक अनेक प्रक्रियांच्या रूपानें उत्पादनाचे जरी भाग पडले तरी त्यांतील प्रत्येक प्रक्रिया स्वतंत्र कामगारानेंच केली पाहिजे असें मात्र नेहमीं नसतें. कांहीं प्रक्रियांसाठीं करावें लागणारें काम सारख्या स्वरूपाचें असल्यामुळें त्या सर्व प्रक्रिया कामगार एकाच वेळीं करूं शकतो. हा प्रकार दिसावयास श्रमविभागणीच्या उलट दिसत असला तरी श्रमविभागणींतूनच तो उद्भवतो हें विसरून चालणार नाही. श्रमविभागणी नसते तेव्हां सारख्या स्वरूपाच्या प्रक्रियाहि उत्पादनांत ज्या क्रमानें त्या येतात त्याच क्रमानें कराव्या लागतात. पण श्रमविभागणी झाल्यानंतर प्रक्रिया केव्हांहि केली

[१] In a large firm a skilled man can be kept all the time employed on work which requires all his abilities.

तरी चालते. **जेव्हां उत्पादनाच्या एकापेक्षां अधिक प्रक्रिया सोयीच्या दृष्टीनें एकत्र केल्या जातात तेव्हां त्या घटनेचें वर्णन उत्पादन-प्रक्रियांचें एकत्रीकरण** (Integration of Processes) **असें केलें जातें.** सारख्या स्वरूपाच्या ज्या प्रक्रिया असतात त्या सामान्यपणें एकत्र करणेंच फायद्याचें असतें. कारण त्यांतील कोणतीहि प्रक्रिया करण्यास जे कष्ट पडतात तेवढ्यांतच इतर प्रक्रिया होऊन जातात. उत्पादन-प्रक्रियांचें एकत्रीकरण झाल्यामुळें मिळणारे फायदे श्रमविभागणीशीं निगडित झालेले असल्यानें योग्य तितकें उत्पादन-प्रमाण वाढलें तरच मिळूं शकतात. म्हणून ते मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाच्या फायद्यांत समाविष्ट होतात हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे.

यांत्रिक उत्पादन :—स्मिथनें सांगितलेला श्रमविभागणीचा तिसरा फायदा असा कीं, जेव्हां कामाची विभागणी अतिशय सूक्ष्म अशा अनेक प्रक्रियांत होते आणि प्रत्येक कामगाराला सतत विशिष्ट प्रकारच्या हालचाली कराव्या लागतात तेव्हां तीं तीं कामें करण्यासाठीं यंत्राचा वापर करणें सहजसुलभ होतें.[७] असें होण्याचें कारण उघड आहे. श्रमविभागणीमुळें कोणत्याहि कामाला यांत्रिक स्वरूप प्राप्त होतें आणि त्यानंतर तें काम यंत्राकडे सोंपविणें जड जात नाहीं.

श्रमविभागणीमुळें असो अगर इतर कोणत्याहि कारणामुळें असो; उत्पादनांत यंत्राचा उपयोग होऊं लागला कीं, मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे फायदे अनेक पटीनें वाढतात. यंत्राच्या अजस्र उत्पादनशक्तीचें विस्तारानें वर्णन करण्याची गरज नाहीं. पण एवढें मात्र खरें कीं, सामान्यतः एका यंत्रामुळें अनेक कामगारांचें काम होऊं शकतें. यंत्रांची किंमत बहुधा जबर असते आणि सर्वांनाच ती परवडते असें नाहीं; पण ज्यांना ती परवडते त्यांनीं यंत्राचा वापर करणेंच त्यांच्या हिताचें असतें. कारण यंत्राची किंमत जेव्हां त्याच्या अफाट उत्पादनशक्तीवर विभागली जाते तेव्हां उत्पादित वस्तूंच्या दर परिमाणावर पडणारा यंत्राचा बोजा अत्यल्प असतो. मात्र यंत्राचा पुरेपूर फायदा घ्यावयाचा असेल तर कोणत्याहि यंत्राची उत्पादनशक्ति जेवढी असेल तेवढें उत्पादन वाढविणें आवश्यक ठरतें.[८]

प्रत्येक स्वतंत्र उत्पादन-प्रक्रियेसाठीं यंत्राचा उपयोग होऊं लागल्यानंतर स्वतंत्रीकरणाचे फायदे जसे यंत्रापासून मिळूं शकतात तसेंच वर उल्लेखिलेल्या उत्पादन-प्रक्रियांच्या एकत्रीकरणाचा फायदाहि यंत्रामुळें मिळूं शकतो. कारण ज्या प्रक्रिया सारख्याच स्वरूपाच्या असतील त्या एकाच यंत्राकडे सोंपवितां येतात. एकापाठोपाठ करावयाच्या दोन-तीन प्रक्रिया एकाच यंत्राकडे सोपविल्या जाण्याचीहि शक्यता

[७] Development of specialised machinery to perform the different tasks into which the manufacture has been divided, becomes possible.

[८] Once a Machine has been developed to perform some duty an economy lies with those who can afford it.

असते. छपाईसाठीं कागद यंत्रावर चढवला कीं, घडी होऊन वर्तमानपत्र बाहेर पडत असल्याचीं उदाहरणें आपण पाहातोंच. छापणें आणि घडी करणें ह्या दोन्ही प्रक्रिया एकाच यंत्राकरवीं होतात. उत्पादनप्रक्रियेचे अशा प्रकारें एकत्रीकरण होऊं शकल्यास यंत्राकरवीं काम करून घेण्याची वेळ व श्रम ह्यांची बरीच बचत होऊं शकते.[९] हें यंत्र साध्या यंत्रापेक्षां साहजिकच अधिक किचकट व भारी किंमतीचें असतें. त्यामुळें उत्पादनप्रमाण वाढविणें आणखी भाग पडतें. पर्याप्त उत्पादन-प्रमाण कमीअधिक होण्याच्या दृष्टीनें यंत्राची किंमत, यंत्राचा घसारा व भांडवलावर द्यावें लागणारें व्याज ह्या गोष्टींना फार महत्त्व असतें. एकंदरीनें यंत्र महाग पडो अगर स्वस्त पडो; मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणें उत्पादन-खर्चदृष्ट्या हितकरच ठरतें ह्यांत शंका नाहीं.[१०]

पण यंत्राची किंमत किंवा यंत्र बाळगण्याचा खर्च फार नसेल आणि लहान प्रमाणावरील उत्पादनाचे विशेष फायदे असतील तर मात्र दर परिमाणावर पडणारा यंत्राचा बोजा थोडा अधिक असला तरी लहान प्रमाण उचित होऊं शकेल; पण सामान्यपणें अलीकडील उत्पादनाविषयीं असें म्हणतां येईल कीं, सूक्ष्म कामें करणाऱ्या अजस्र यंत्राच्या किंमती जबर असल्यामुळें पर्याप्त तांत्रिक उत्पादन-प्रमाण मोठें होण्यास यंत्रशक्ति कारणीभूत झाली आहे. ह्या बाबतींत हीहि गोष्ट सांगावयाला हवी कीं, एकच काम करणारें एक लहान आणि दुसरें मोठें यंत्र असलें तर त्यांतील मोठें यंत्र घेणेंच खर्चदृष्ट्या हितकर ठरतें. कारण मोठ्या यंत्राची उत्पादनशक्ति जेवढी अधिक असते तेवढी त्याची किंमत मात्र अधिक नसते. कारण मोठें यंत्र बनविण्याचा खर्च दिसावयाला वाढला तरी तुलनात्मक दृष्ट्या तो कमी असतो.[११] हा नित्याचा अनुभव आहे. दोन मजली घरानें रहाण्याची जागा दुप्पट होते; पण बांधण्याचा खर्च मात्र दुप्पट होत नाहीं. किंवा दुप्पट सांठा करणारें पाण्याचें भांडें दुप्पट किंमतीचें नसतें त्यांतलाच हा प्रकार आहे. सारांश, यंत्र वापरणें तर हितकर ठरतेंच; पण शक्य तेवढ्या अधिक उत्पादनशक्तीचें यंत्र वापरणें सरासरी खर्च कमी करावयाचा असल्यास इष्ट ठरतें. यंत्रांच्या बाबतींत असाहि अनुभव येतो कीं,

[९] Two or three or more consecutive processes are performed by a more complicated machine, which thereby eliminates the labour and time required to set up the work on eash of the successive earlier machines.—**E. A. G. Robinson**

[१०] With the expensive tool, economical operation depends on the spreading of its cost over as many units of output as possible during its working life. The greater is the fixed cost per day of possessing a given machine, the greater will be the economy of spreading that cost over a larger output.

[११] In practice larger unit is nearly always relatively cheaper to consrtuct than the smaller.

मोठी व महाग यंत्रसामुग्री तुलनेनें अधिक कार्यक्षम असते.[१२] ह्यामुळेंच तर सर्वत्र उत्पादन-प्रमाण वाढत चाललें आहे.

यंत्रांचा उपयोग करण्याच्या बाबतींत एक अडचण मात्र चांगलीच जाणवते. ती अशी कीं, जेव्हां एखाद्या वस्तूचें उत्पादन करण्यापूर्वी अनेक सुटया भागांची निर्मिति करून मग ते जोडावे लागतात तेव्हां वापरण्यांत येणाऱ्या सर्व यंत्रांची कामाची गति सारखी असली तर तें फार सोयीचें असतें. नाहींतर कांहीं भागांची निर्मिति वेगानें व प्रचंड संख्येनें होत आहे व त्या मानानें दुसऱ्या भागांची निर्मिति फारच मागें पडत असल्यानें संबंधित वस्तूचें उत्पादन जलद होत नाहीं, असा अनवस्था प्रकार होतो. ही अडचण निवारण्याचा एकच मार्ग असतो. तो म्हणजे जलद गतीनें उत्पादन करणाऱ्या एका यंत्राच्या जोडीनें जें काम मंदगतीनें होतें तें करणारीं एकापेक्षा अधिक यंत्रें वापरणें. ह्या ठिकाणींहि जास्तींत जास्त काम करणाऱ्या यंत्रालाच प्राधान्य देऊन उत्पादन-प्रमाण ठरवावें लागतें.

मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणें तंत्रदृष्ट्या हितकर :—श्रमविभागणी व यंत्राच्या सहाय्यानें उत्पादन ह्यासंबंधींच्या वरील विवेचनावरून असा निष्कर्ष निघतो कीं, आधुनिक उत्पादन-तंत्रदृष्ट्या मनुष्यबळ व यंत्र ह्या उत्पादनसाधनांचा भरपूर उपयोग करून घेऊन सरासरी उत्पादनखर्च शक्य तेवढा कमी करावयाचा असेल तर मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणेंच सर्वसाधारणपणें इष्ट ठरतें. जेव्हां उत्पादन एकसांच्याचें नसल्यामुळें श्रमविभागणीस किंवा यंत्राचा वापर करण्यास वाव नसतो, किंवा जेव्हां अल्प उत्पादनशक्तीचीं व अल्प खर्चाचीं यंत्रें मिळूं शकतात (अलीकडे विद्युत् शक्तीमुळें ही गोष्ट साध्य होऊं लागली आहे) तेव्हांच फक्त तांत्रिक दृष्ट्या लहान प्रमाणावरील उत्पादन श्रेष्ठ ठरतें. म्हणजे पर्याप्त उत्पादन-प्रमाण तान्त्रिक दृष्ट्या मोठें नसतें. सर्वसाधारणपणें असें दिसून येतें कीं, उत्पादित होणारी वस्तु जेव्हां आकारानें लहान असते किंवा तिची घडण सुगम असतें तेव्हां लहान प्रमाणावर उत्पादन करणें कठिण नसतें. उलट आकारानें मोठ्या किंवा घडणीच्या बाबतींत गुंतागुंतीच्या वस्तु असतात त्यांच्या बाबतींत उत्पादनप्रमाण तांत्रिक दृष्ट्या मोठें असलें तरच परवडतें.[१३] असें नसतांहि लहान प्रमाणावरील उत्पादन आढळल्यास त्याचीं कारणें इतरत्र शोधावीं लागतात. कित्येकदां असें होतें कीं, मोठ्या प्रमाणावरील

---

[१२] While a smaller mechanical unit is technically possible, a larger one may be more efficient.

[१३] Optimum technical units are large in two wholly different types of industry. In those in which products or the productive machinery is physically very large and in those in which the finel product is highly complex is that it is built up of a great number of small parts optimum technical units are small where the product is both small and simple. —E. A. G. Robinson

उत्पादन तांत्रिक दृष्टया कमी खर्चाचें असलें तरी इतर कारणामुळें शक्य होत नाहीं. उदाहरणार्थ, वस्तूची बाजारपेठ फारच लहान असली तरी मोठ्या प्रमाणावरील उत्पादन तांत्रिक दृष्टया कितीहि श्रेष्ठ असलें तरी शक्य कसें होणार ? तसेंच मोठ्या प्रमाणावर उत्पादनासाठीं मोठ्या प्रमाणावर भांडवल लागतें. तेंच ज्या देशांत नसेल त्या देशांत मोठ्या प्रमाणावर होत असलेलें उत्पादन सर्वत्र कोठून आढळणार ? तसेंच कित्येकदां असेंहि होतें कीं, मोठ्या प्रमाणावरील उत्पादन तांत्रिक दृष्टया फायद्याचें असलें तरी इतर दृष्टींनीं इतकें तोटयाचें असतें कीं, मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाच्या फायद्यांना मुकावें लागलें तरी उत्पादन-प्रमाण लहान ठेवणेंच इष्ट ठरतें. पण तो भाग वेगळा आहे.

पर्याप्त व्यवस्थापन-प्रमाण (Optimum Managerial Unit) :—उत्पादनाची व्यवस्था पहाण्याची जबाबदारी ज्यांच्यावर असते त्यांच्या कार्यक्षमतेबाबत व्यक्ती-व्यक्तींत फरक असणें म्हणजे कांहीं व्यक्तींची कार्यक्षमता इतरांपेक्षां अधिक असणें साहजिकच आहे. तथापि व्यक्ती-व्यक्तींत असलेल्या फरकाचा विचार करण्याचें येथें प्रयोजन नाहीं. येथें सांगावयाची मुख्य गोष्ट अशी कीं, व्यवस्थापनाचें जें तंत्र किंवा जी पद्धति स्वीकारली गेली असेल तिचा सर्वोत्कृष्ट उत्पादनप्रमाण ठरलें जाण्यावर फार मोठा परिणाम होतो. एकाच व्यक्तीवर व्यवस्थापनाची सर्व जबाबदारी असली व व्यवस्थापनाचें प्रत्येक काम केलें जावें, अशी अपेक्षा असली तर व्यवस्थापनदृष्टया पर्याप्त उत्पादन-प्रमाण लहानच होतें. कारण एखादी व्यक्ति कितीहि कर्तृत्ववान् असली तरी तिच्याहि कर्तृत्वाला मर्यादा ह्या असतातच. विशिष्ट मर्यादेपलीकडे तिच्या कर्तृत्वाची झेंप जाऊं शकत नाहीं. सर्व विषय तिला अवगत असूं शकत नाहींत आणि असले तरी सर्व विषयांत तिची सारखी गति नसते.

कार्यविभागणीचे फायदे :—वैयक्तिक कर्तृत्वाच्या मर्यादा ओलांडावयाच्या असल्यास व्यवस्थापनाच्या क्षेत्रांतहि श्रमविभागणीचा किंवा प्रस्तुत संदर्भात अधिक समर्पक शब्द वापरावयाचा झाल्यास कार्यविभागणीचा स्वीकार करणें अतिशय इष्ट असतें. व्यवस्थापनांत अनेक कार्यांचा समावेश होतो. त्यांत महत्त्वाचे निर्णय घेण्याचें काम येतें, विविध प्रकारच्या वस्तूंची खरेदी येते, कामगारांवर देखरेख ठेवण्याची कामगिरी येते, जाहिरातबाजी येते, ग्राहकांची खुषमस्करी येते, संशोधन येतें, नवनवे प्रयोग येतात, सरकारदरबारीं संबंध येतात, लोकाराधन येते, हिशेबठिशेब येतात, भांडवलासंबंधींचे व्यवहार येतात, कायद्याची अंमलबजावणी येते, थोडक्यांत सर्व कांहीं येतें. हीं सर्व कामें करण्याची पात्रता एका व्यक्तींत असणें सहसा संभवत नाहीं.[१४]

कारण ह्यांतील प्रत्येक कामाकरितां कांहीं विशेष गुण लागतात. सर्व कामांकरितां लागणारे गुण एका व्यक्तीच्या ठायीं असण्याचा संभव फारच कमी असल्यानें

[१४] In our ordinary work-a-day would few people possess the whole catalogue of virtues.

त्या त्या कामाकरितां लायक असणाऱ्या व्यक्तीची निवड करून तिच्याकडे तें काम संपूर्णपणें सोंपविणें अतिशय योग्य ठरतें. असें झालें म्हणजे अर्थातच व्यवस्थापनाची जबाबदारी अनेकांत विभागली जाते. अशा प्रकारच्या कार्यविभागणीमुळें श्रम-विभागणीचे सर्व फायदे व्यवस्थापनांत मिळूं शकतात. कार्यविभागणी झाली म्हणजे प्रत्येक व्यक्तीस आपल्यास आवडीचें काम मिळतें. आपल्यास आवडत असलेलें काम कोणतीहि व्यक्ति अधिक उत्साहानें, तत्परतेनें, कुशलतेनें, वेगानें करणें हा नित्याचा अनुभव आहे. थोडक्यांत कार्यविभागणीमुळें व्यक्तीची कार्यक्षमता वाढते, तसेंच कामाचा उरकहि वाढतो.[१५] त्याचप्रमाणें तेवढ्याच वेळांत अधिक व चांगलें काम होतें. व्यक्तीच्या वाढलेल्या कार्यक्षमतेचा पुरेपूर उपयोग करून घ्यावयाचा असेल तर कार्यक्षमतेची वाढ ज्या प्रमाणांत झालेली असेल तेवढ्या प्रमाणांत काम वाढवावें लागतें. सारांश, कार्यविभागणी करून उत्पादनाची जबाबदारी अनेकांवर टाकली गेली कीं, व्यवस्थापनाचें काम सुकर तर होतेंच; पण अतिशय मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाची जबाबदारी पेलण्याची पात्रता व्यवस्थापनाला येते. कार्यविभागणीमुळें व्यवस्थापनदृष्ट्या पर्याप्त उत्पादन-प्रमाण वाढतें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

कार्यविभागणीच्या मर्यादा :—कार्यविभागणी करून उत्पादनप्रमाण अप्रमाण वाढविणें शक्य नसतें. एकतर आपल्यास आवडलेलें काम करण्याची व्यक्तीची जी कुवत असते तिलाहि मर्यादा असतात. शिवाय अधिक महत्त्वाची गोष्ट अशी कीं, कार्यविभाणी कितीहि झाली तरी व्यवस्थापनांत जी एकात्मता असते ती संभाळण्या-साठीं अनेक व्यक्तींच्या अगर शाखांच्या कामांच्या शेवटीं कोठेंतरी सुसूत्रीकरण (Co-ordination) करावेंच लागतें. हें सुसूत्रीकरण करण्याची म्हणजेच निराळ्या शब्दांत महत्त्वाचे निर्णय घेण्याची जबाबदारी ज्या व्यक्तीवर अगर मंडळावर—संयुक्त भांडवल संस्थांत ही जबाबदारी संचालकमंडळावर पडते—असते त्याच्याहि कांहीं मर्यादा असतात. आणि विशष सांगण्याजोगी गोष्ट अशी कीं, त्या मर्यादा उत्पादनप्रमाणाच्या दृष्टीनें सर्वांत महत्त्वाच्या असतात. ह्या मर्यादा ओलांडल्या गेल्यानंतर उत्पादन वाढविणें इष्ट नसतें. त्यानंतरहि उत्पादन-प्रमाण वाढवीत राहिल्यास उत्पादनकार्यांत शैथिल्य येतें व उत्पादनाचा दर्जाहि खालावूं लागतो.[१६] शिवाय उत्पादन-साधनांचा अपव्यय सुरू होऊन उत्पादन-खर्च निष्कारण वाढत जातो तें वेगळेंच.

लहान प्रमाणावरील उत्पादनाचे व्यवस्थापनदृष्ट्या फायदे :—वैयक्तिक जबाबदारीवर केल्या जाणाऱ्या लहान प्रमाणावरील उत्पादनाचा सर्वांत मोठा

[१५] (1) Special abilities can be used to the full and (2) a specialist is able to increase his knowledge of the particular task which is assinged to him.

[१६] How big a firm can grow will depend on how it solves this problem of the co-ordinating of the separated departments and separated specialists.

गुण हा कीं, उत्पादनाबद्दल उत्पादनकार्य करणाऱ्याची आत्मीयतेची भावना असते. मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत असतां व विशेषतः उत्पादनाची जबाबदारी अनेकांत विभागली असतां अशा प्रकारच्या आत्मीयतेची अपेक्षा करतां येत नाहीं; पण आत्मीयतेचा प्रश्न जरी बाजूला ठेवला तरी उत्पादनाच्या व्यवस्थापनाच्या सर्व बाजूंवर देखरेख करण्याचें काम योग्य प्रकारें पार पडलेंच पाहिजे. सुदैवानें यांत्रिक एकसांच्यांत उत्पादनांत आत्मीयतेचा प्रश्न महत्त्वाचा नसतो. त्या उत्पादनांत उत्पादनाचें संख्यात्मक मापन सहज होऊं शकतें. एवढेंच नव्हे तर उत्पादनाचा दर्जा ठरविणाऱ्या कांहीं वस्तुनिष्ठ कसोट्याहि ठरवितां येतात आणि त्यामुळें देखरेखीचें, सुसूत्रीकरणाचें व महत्त्वाचे निर्णय घेण्याचें काम सुलभ होतें. पण तरीहि ज्या मर्यादा पडतात त्या उल्लंघितां येत नाहींत. तसा प्रयत्न करणें इष्टहि नसतें. कारण योग्य त्या मर्यादेपलीकडे उत्पादन-प्रमाण वाढल्यास अनेक अडचणी उपस्थित होतात. चालू उत्पादनाविषयीं व उत्पादनविषयक योजनांसंबंधीं निर्णय घेण्याचें व त्यांची अंमलबजावणी करण्याचें व्यवस्थापनाचें जें सर्वांत महत्त्वाचें काम तेंच पार पाडणें व्यवस्थापनाची जबाबदारी प्रमाणाबाहेर वाढल्यास कठिण होतें. लहान प्रमाणावर होणाऱ्या उत्पादनाचे जे गुण असतात त्यांमध्यें निर्णय घेण्यांत कालहरण होत नाहीं.[१७] घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी जलद होऊं शकते. चूक झाली तरी तिचे परिणाम फार भोंवत नाहींत आणि चूक लक्षांत आल्यानंतर ती दुरुस्त करणें विशेष जड जात नाहीं. हे गुण वाखाणण्याजोगे आहेत. त्याहिपेक्षां महत्त्वाचा गुण म्हणून व्यवस्थापकांमध्यें कामाची आस्था व कार्यतत्परता दिसून येण्याचा संभव लहान प्रमाणावरील उत्पादनांत अधिक असतो. ह्या गोष्टीचा उल्लेख करावा लागेल.[१८] मोठ्या प्रमाणावरील उत्पादनांत ह्या गुणांचा अभाव जाणवतो, निर्णय लवकर घेतां येत नाहींत. कारण, घेण्यापूर्वीं अनेकांना विचारावें लागतें. घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यापूर्वीं अनेकांना ते योग्य आहेत असें पटवून द्यावें लागतें. उत्पादनाचें प्रमाण मोठें असल्यानें चूक झाली तर होणाऱ्या नुकसानीचें प्रमाणहि मोठें असतें. झालेली चूक कळल्यानंतरहि ती दुरुस्त करण्यासहि बराच कालावधि लागतो आणि त्यांत पुनः कांहीं अपव्यय होतो. मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या उत्पादनाचा एकंदर पसारा मोठा असतो आणि त्याचें सव्यापसव्यहि फार असतें. वर उल्लेखिलेले दोष व्यवस्थापनाच्या मानानें प्रमाणाबाहेर वाढल्यासच उद्भवतात. व्यवस्थापनदृष्ट्या जें उत्कृष्ट उत्पादनप्रमाण असतें त्याच्या पलीकडे जाणें केव्हांहि इष्ट नसतें.[१९]

---

[१७] With a small firm with fewer people to consult and to persuade decisions can be reached much more easily and quickly.

[१८] There are many who will work more efficiently and untiringly for their own concern.

[१९] The Managerial optimum sets—not only a lower but also an upper limit to the scale of operations. —E. A. G. Robinson.

तांत्रिक व व्यवस्थापनीय पर्याप्त उत्पादन-प्रमाणांचा मेळ :—तांत्रिक दृष्टचा पर्याप्त असणारें उत्पादन-प्रमाण व व्यवस्थापनाच्या दृष्टीनें पर्याप्त ठरणारें उत्पादन-प्रमाण ह्यांचा समन्वय नेहमींच होतो असें नाहीं. तो न होण्याचाच संभव फार असतो. जेव्हां तो होत नाहीं तेव्हां तो कसा साधावा, हा प्रश्न उपस्थित होतो व सोडवावा लागतो. जरूर तो समन्वय न होण्याचें कारण तांत्रिक दृष्टचा पर्याप्त उत्पादन-प्रमाण व्यवस्थापनदृष्टचा पर्याप्त उत्पादन-प्रमाणापेक्षां लहान असतें हें तरी असतें किंवा त्यापेक्षां मोठें असतें हें तरी असतें. जेव्हां तांत्रिक दृष्टचा पर्याप्त उत्पादन-प्रमाण लहान असतें तेव्हां समन्वय साधणें कठिण नसतें. त्या परिस्थितींत तांत्रिक दृष्टचा स्वयंपूर्ण असणारीं एकापेक्षां अधिक उत्पादन-केन्द्रें एकाच उद्योग-संस्थेच्या व्यवस्थापनाखालीं सोंपविलीं कीं, काम भागतें.[२०] उदा., दहा हजार परिमाणें हें तांत्रिकदृष्टचा पर्याप्त उत्पादनप्रमाण आहे आणि तीस हजार परिमाणें हें व्यवस्थापनदृष्टचा पर्याप्त उत्पादन-प्रमाण आहे. अशा परिस्थितींत उत्पादनाचें केन्द्रीकरण करून एकाच उत्पादनकेन्द्रांत तीस हजार परिमाणांचें उत्पादन करणें उचित होणार नाहीं. तसेंच उत्पादनाचें संपूर्णपणें विकेन्द्रीकरण करून तीन स्वतंत्र उद्योग-संस्थांकडून तीन स्वतंत्र उद्योगकेन्द्रेंहि चालविलीं जाणें योग्य ठरणार नाहीं. प्राप्त परिस्थितींत तीन स्वतंत्र व स्वयंपूर्ण उद्योगकेन्द्रें काढणें व तीं व्यवस्थापनासाठीं एकाच उद्योग-संस्थेच्या हातांत असणें हाच उत्तम मार्ग होय. तांत्रिक विकेन्द्रीकरण व व्यवस्थापनीय-केन्द्रीकरण असें ह्या मार्गाचें वर्णन करतां येईल.

स्वतंत्र कारभार केंद्रें :—जेव्हां पर्याप्त तांत्रिक उत्पादन-प्रमाण पर्याप्त व्यवस्थापन प्रमाणापेक्षां मोठें असतें तेव्हां त्या दोहोंचा समन्वय साधणें अधिक कठिण असतें. त्या ठिकाणीं व्यवस्थापनाची जबाबदारी वाढवावयाची कशी, हा मुख्य प्रश्न नसून ती कमी कशी करावी, ह्याची चिंता करावी लागते. व्यवस्थापनाची जबाबदारी कमी करण्याचे जे अनेक मार्ग आहेत त्यांपैकीं कोठला तरी मार्ग स्वीकारावा लागतो. व्यवस्थापनीय जबाबदारी कमी करण्याचा पहिला मार्ग म्हणजे येन-केन प्रकारेण कारभाराचें विकेन्द्रीकरण घडवून आणणें. व्यवस्थापनाची जबाबदारी कारभाराच्या दृष्टीनें स्वयंपूर्ण असलेल्या शाखांतून विभागली गेल्यास[२१] हा मार्ग स्वीकारला गेला असें म्हणतां येईल. कारभाराचें शाखानिहाय विकेन्द्रीकरण बहुधा प्रादेशिक स्वरूपाचें असतें. म्हणजे स्वयंपूर्ण असलेल्या शाखांचें कार्यक्षेत्र विशिष्ट प्रदेशापुरतें

[२०] The optimum technical unit is simply reproduced several times over.

[२१] Breaking of the firm into various wholly separate departments is one of the methods of overcoming the difficulty created by a larger technical optimum relatively to the managerial optimum.

मर्यादित केलेलें असतें. भारतांतील रेल्वेचा कारभार सध्यां ह्या तत्त्वावर चालविला जात असल्याचें आढळून येतें. मोठमोठ्या बँका व तत्सम संस्था व्यवस्थापनाची कुवत वाढविण्यासाठीं ह्याच विभागीय विकेन्द्रीकरणाच्या (Regional Decentralisation) तत्त्वाचा अवलंब करतात. मूर्त वस्तूंची निर्मिति करणाऱ्या मोठ्या उद्योगसंस्थाहि तांत्रिक दृष्ट्या उत्पादनाचें केन्द्रीकरण एकाच उत्पादन-केन्द्रांत करावें लागलें तरी कारभाराच्या इतर सर्व बाबींसाठीं स्वयंपूर्ण अशा शाखा स्थापून आपले व्यवहार चालवीत असल्याचें आढळून येतें. तांत्रिक केन्द्रीकरण व व्यवस्थापनीय विकेन्द्रीकरणाचा हा मार्ग होय. अशा विकेन्द्रीकरणाचे इतरहि मार्ग असतात. जेव्हां एकच उत्पादन-संस्था तांत्रिक कारणासाठीं अनेक वस्तूंचें उत्पादन एकाच उत्पादन-केन्द्रांत करीत असते तेव्हां प्रत्येक वस्तूसाठीं स्वतंत्र कारभार केन्द्र (Administrative Unit) अस्तित्वांत आणून तांत्रिकदृष्ट्या पर्याप्त उत्पादन-प्रमाण व पर्याप्त व्यवस्थापन-प्रमाण ह्यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला जातो.

प्रक्रियांचें विकेन्द्रीकरण :—व्यवस्थापन-प्रमाण योग्य मर्यादेंत राखण्याचा विकेन्द्रीकरणाखेरीज आणखी एक मार्ग आहे. तो असा कीं, एखाद्या वस्तूच्या उत्पादनांतील सर्व प्रक्रियांची जबाबदारी न घेतां कांहीं प्रक्रियांची जबाबदारी न घेणें किंवा आधीं घेतली असल्यास ती अंगाबाहेर टाकणें. वस्त्रोत्पादनाच्या व्यवसायांत सर्व प्रक्रियांची जबाबदारी घेण्याऐवजीं सूत-कताई, विणणें, ओपवणें, रंगवणें इत्यादि प्रक्रियांसाठीं स्वतंत्र उत्पादनकेन्द्रें चालविण्याची किंवा त्यांतील कांहीं प्रक्रिया तरी उत्पादनकेन्द्राच्या कक्षेंतून वगळण्याची जी प्रवृत्ति दिसून येते तिच्यामागें हीच गोष्ट असते. जेव्हां एखादी वस्तु अनेक सुट्या भागांची मिळून झालेली असते तेव्हां सर्व सुटे भाग एकाच उद्योग-संस्थेकडून उत्पादित व्हावयासच पाहिजेत असें नाहीं. व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेच्या दृष्टीनें त्यांतील कांहीं भाग बाहेरून खरेदी करणें सोयीचें असतें आणि प्रसंगीं स्वयंपूर्णतेचा मोह टाकूनहि पर्याप्त उत्पादन-प्रमाण व पर्याप्त व्यवस्थापन-प्रमाण ह्यांचा समन्वय साधण्यासाठीं हा मार्ग स्वीकारला जातो. रेडिओ, टेलिफोन, मोटारींच्या कारखान्यांत ह्या मार्गाचा स्वीकार केल्याचें आढळून येते.[२२] प्रक्रियांचे विकेन्द्रीकरण असें ह्या मार्गाचे वर्णन करतां येईल.

पर्याप्त क्रय-विक्रय-प्रमाण (Optimum Marketing Unit) :—उत्पादन-खर्च कमींत कमी करावयाचा असेल तर एखाद्या वस्तूच्या उत्पादनासाठीं ज्या

[२२] Where the technical unit requires to be large, not because all the processes require to be on a large scale, but because one process requires to be on large scale that process tends to be separated off and performed for the main industry by another subsidiary industry—The device of vertical disintegration is the commonest method of dealing with a single process which requires a scale larger than is required by other processes and by managerial economy.

इतर वस्तु खरेदी कराव्या लागतात त्यांच्यावरील खर्च शक्य तेवढा कमी करणें आवश्यक असते. काटकसरीच्या दृष्टीनें उत्पादनांतील कार्यक्षमता वाढविणें जेवढें महत्त्वाचे आहे तेवढेंच क्रय-विक्रय व्यवहारांतहि काटकसर करणें महत्त्वाचे आहे.[२३] बहुतेक सर्व वस्तूंच्या उत्पादनांत कच्च्या मालावरील खर्च ४० टक्क्यांपेक्षां अधिक असतो आणि कांहीं ठिकाणीं तो शेंकडा ७०–७५ च्या घरांत जातो, हें लक्षांत घेतल्यास ह्या विधानाची यथार्थता पटेल. विक्रयखर्चांत जाहिरातीवरील खर्चाचा समावेश होतो. त्याखेरीज मूळ उत्पादक व ग्राहक ह्यांना जोडणारी जी लांबलचक व्यापाऱ्यांची सांखळी असते त्यांतील प्रत्येकाचा नफा व इतर खर्च ह्यांचाहि समावेश होतो. कोणत्याहि वस्तूची ग्राहकाला शेवटीं द्यावी लागणारी जी किंमत असते तिच्यांत विक्रीखर्चामुळें वाढलेला भाग कधीं कधीं ४० टक्क्यांच्या घरांत गेलेला असतो. ह्यावरून तो खर्च शक्य तेवढा कमी करण्याचें महत्त्व लक्षांत येईल. विक्रीखर्चांत काटकसर करण्याची शक्यता सुदैवानें असते.[२४]

मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्याचे फायदे :—कच्च्या मालाची खरेदी मोठ्या प्रमाणावर करण्यांत साहजिकच कांहीं फायदे असतात. मोठ्या प्रमाणावर खरेदी करणाऱ्यांना किमतींत सवलत दिली जाते. कारण मोठ्या प्रमाणावरील खरेदी ग्राहकाला जशी सोयीची असते तशी मोठ्या प्रमाणावरील विक्री विक्रेत्याला सोयीचे होते. मुख्य सोय म्हणजे ग्राहकाची वाट पाहत त्याला थांबावें लागत नाहीं. एकदोघांना माल विकून तत्काळ मोकळें होतां येतें. तसेंच विक्रीबाबतची अनिश्चितता नाहींशी होते. मोठ्या प्रमाणावर खरेदी करणाऱ्यांना किंमतींत सवलती मिळवितां येतात त्याचप्रमाणें खरेदीसाठीं जाणती मंडळी नेमतां येतात.[२५] त्यांना थोडा अधिक पगार द्यावा लागला तरी त्यांच्यावर होणाऱ्या खर्चाच्या मानानें बचत अधिक होते. कारण त्यांच्याकडून योग्य भावानेंच खरेदी केली जाईल, अशी हमी असते आणि मालाच्या गुणाबाबत त्यांच्यांत भरपूर चोखंदळपणा असतो. भावांतील चढउताराची शक्यता लक्षांत घेऊन त्यांच्याकडून योग्य वेळीं खरेदी केली जाईल असाहि विश्वास बाळगतां येतो.

वरील सर्व गोष्टी खऱ्या असल्या तरी एक-दोन गोष्टी लक्षांत ठेवल्याच पाहिजेत. मोठ्या प्रमाणांत तज्ज्ञांकरवीं खरेदी करण्यांत सहसा चूक होत नाहीं; पण जर का एखादी चूक झाली तर तिच्यामुळें होणारें नुकसानहि मोठें असतें आणि

---

[२३] Efficient buying may make as much difference to final profit as efficient manufacturing.

[२४] Economies fully as large as any in the process of manufacture can be achieved in the subsequent marketing of the goods. —**E. A. G. Robinson.**

[२५] The large firm is in a stronger bargaining position. Because it is large, it can afford expert buyers.

झालेली चूक निस्तरणेंहि कठिण असतें. त्यामुळें खरेदी करावयाची वस्तु कोणत्या प्रकारची आहे, ह्याला फार महत्त्व येतें. वस्तु लौकर खराब होणारी असेल, तिच्या किंमतीत सतत व मोठ्या प्रमाणांत चढउतार होत असतील, तिच्या गुणांबाबत निश्चित प्रमाणें ठरलेलीं नसतील तर मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्यांतील धोका वाढतो; अन्यथा कमी होतो. उत्पादन-प्रमाण ठरवितांना ह्या गोष्टीचाहि विचार करावा लागतो. अर्थात् मोठ्या प्रमाणावर उत्पादन करावयाचें असल्यास मोठ्या प्रमाणावर खरेदी केलीच पाहिजे, असा कांहीं नियम नाहीं. प्रसंगीं अधिक खर्च पडला तरी मोठ्या चुका टाळाव्या म्हणून मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणारेहि खरेदीचें प्रमाण लहान ठेवतात व अनेक ठिकाणीं खरेदी करतात. ह्या प्रकारांत अर्थातच मोठ्या प्रमाणावरील खरेदीचे फायदे आढळत नाहींत.

मोठ्या प्रमाणावर विक्री :—मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्याचे फायदे ज्या प्रकारचे असतात सामान्यतः त्याच प्रकारचे फायदे मोठ्या प्रमाणावर विक्री केल्यास मिळतात. मोठ्या प्रमाणावर विक्री करण्याचा सर्वांत मोठा फायदा असा कीं, गुंतलेलें भांडवल चटचट मोकळें होतें आणि त्यामुळें व्याजादि खर्च बराच कमी होतो. विक्रीसाठीं जी व्यवस्था करावी लागते तिच्यावरील खर्च विक्रीच्या प्रमाणांत वाढत नाहीं आणि त्यामुळें एकंदर काटकसर होण्यासच मदत होते. विक्रीचा स्वतंत्र विभाग केला जाऊनहि आणि त्यांत लायक माणसांची भरती व्हावी, म्हणून त्यांना भरपूर मोबदला दिला जाऊनहि विक्रीचें प्रमाण मोठें असल्यास प्रत्येक परिमाणावर विक्री-खर्चाचा जो बोजा पडतो तो अलग राहतो हें विशेष होय. जाहिरातीवर जो खर्च केला जातो त्यांतील कांहीं भाग आवश्यकच असतो. कारण ग्राहकाला योग्य ती माहिती उत्पादकानें दिली नाहीं तर विक्री कशी होणार ? आपला माल कोठें मिळू शकेल, त्याची निश्चित किंमत काय, त्यांत कोणते गुण आहेत, त्यांत सुधारणा कशा केल्या जात आहेत इत्यादि माहिती ग्राहकाला मधूनमधून पुरविणें हें उत्पादकाचें एक कामच असतें. माहितीवजा जी जाहिरात केली जाते तिच्यासाठीं फार खर्च करावा लागतो असें नाहीं; पण अलीकडे बाजारपेठेचा विस्तार व त्याबरोबर ग्राहकांची संख्या सतत वाढत जात असल्यानें हा खर्चहि पूर्वीच्या तुलनेनें अधिकच झाला आहे. त्यामुळें मोठ्या प्रमाणावरील उत्पादनावर तो विभागला गेल्यास बरें असतें. शिवाय हा खर्च बराचसा स्थिर स्वरूपाचा असल्यानें जेवढ्या मोठ्या विक्री-वर तो विभागला जाईल तेवढें तें चांगलेंच.[२६]

---

[२६] Where a large number of sales have to be made, and the sales costs are responsible for a larger proportion of the final price, there will be a considerable gain if the quantity of goods to be sold is very large. —**E. A. G. Robinson**

जाहिरातीवरील खर्च परवडण्यासाठीं विक्रीचें प्रमाण मोठें असावें लागतें. ह्याचें खरें कारण मात्र वेगळेंच आहे. अलीकडील जाहिरातींत ग्राहकाला माहिती देण्याऐवजीं त्याची मनधरणीच अधिक असते. ग्राहकाची मनधरणी करण्याची विक्रेत्यांत एक प्रकारची चुरसच लागलेली असते आणि त्या चुरशीपायीं अपव्यय बराच होतो; पण तरीहि तो करावा लागतो. कारण त्याखेरीज उत्पादकाला बाजारपेठेंत स्थान मिळवितां येत नाहीं, मिळविलेलें स्थान टिकवितां येत नाहीं. जाहिरातीवरील खर्चाची गंमत अशी आहे कीं, मोठेपणा प्राप्त होण्यापूर्वीं तो मिळविण्यासाठीं जाहिरात करावी लागते आणि मोठेपणा प्राप्त झाल्यानंतर तो टिकविण्यासाठीं जाहिरात करावी लागते. तसेंच जाहिरात परवडावी म्हणूनहि मोठेपणा टिकवून धरवावा लागतो. जाहिरातरूपी चुरशींत किती खर्च करावा लागेल, ह्याचा नेम नसतो. कारण तें प्रत्यक्ष उत्पादकापेक्षां त्याच्या ग्राहकांवर आणि प्रतिस्पर्ध्यांवर अधिक अवलंबून असतें.[२७] खर्चांत थोडासा बेअंदाजीपणा असला आणि कोणत्याहि परिस्थितीला तोंड द्यावयाची तयारी ठेवावी लागत असली म्हणजे ती गोष्ट मोठ्या उत्पादकाला अधिक शक्य होते, हें सांगायलाच पाहिजे असें नाहीं. ह्या गोष्टीमुळेंच जाहिरातीची आवश्यकता जसजशी अधिक भासत जाते तसतसें उत्पादनाचें प्रमाण मोठें असणें इष्ट ठरतें.

पर्याप्त क्रय-विक्रय प्रमाण (Optimum Marketing Unit) :– क्रय-विक्रय-खर्चामुळें उत्पादनाचें प्रमाण लहान असणें इष्ट ठरतें कीं मोठें असणें इष्ट ठरतें, असा प्रश्न उपस्थित केला तर त्याचें उत्तर देणें सोपें नाहीं. खरी गोष्ट अशी आहे कीं, उत्पादित वस्तूंचें स्वरूप व बाजारपेठेचें स्वरूप ह्यांवर बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात. उदाहरणार्थ, उत्पादित वस्तूसाठीं लागणाऱ्या कच्च्या मालाचें स्वरूप जर असें असेल कीं, तो मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्यानें अत्यल्प काटकसर होते आणि तो खरेदी करण्यासाठीं तज्ज्ञाची आवश्यकता नसते; तर केवळ मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्याचे फायदे मिळविण्यासाठीं मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्याची आवश्यकता नसते. विक्रीचें तसेंच आहे. विक्रेय वस्तूंत गुणभेद करण्याची फारशी आवश्यकता नसेल व गुणभिन्नता असली तरी प्रतवारी लावणें सुलभ असेल तर जाहिरात करण्याचें किंवा खास प्रतिनिधि नेमून विक्रीसाठीं विशेष खटाटोप करण्याचें कारण नसतें. जेथें क्रय-विक्रय-खर्च मोठा नसतो तेथें लहान प्रमाणावर उत्पादन झालें तरी चालतें. उदाहरणार्थ, चहाच्या विक्रीसाठीं उत्पादन करणाऱ्या संस्थेला खास प्रतिनिधि नेमावे लागतात, आपल्या चहाची जाहिरात करावी लागते; पण गहूं खपविण्यासाठीं कोणी प्रतिनिधि नेमले आहेत किंवा आपल्या शेतांतीलच गहूं कसे उत्कृष्ट आहेत, हें जगाला पटविण्यासाठीं कोणी जाहिरात केल्याचें आढळत

[२७] The fact that another firm is attempting to grow may involve an existing firm in added defensive expenditure, and this will in turn increase the routine costs as well as the growing cost of the growing firm.

नाहीं. त्यामुळें गव्हासारख्या वस्तूच्या बाबतींत केवळ क्रय-विक्रय-खर्चांत काटकसर व्हावी व तो खर्च अधिक परिमाणावर विभागला जावा म्हणून उत्पादन-प्रमाण वाढविण्याची आवश्यकता नसते. अलीकडे वजनें-मापें सारखीं करणें किंवा वस्तूची गुणदृष्टया प्रतवारी लावणें ह्याबाबतींत सरकारच पुढाकार घेऊं लागलें आहे. त्याचा फायदा ज्या वस्तूंच्या बाबतींत मिळूं शकतो किंवा ज्या वस्तूच्या बाबतींत गुणाची पारख सामान्य मनुष्यालाहि सरावानें करतां येते त्या वस्तूच्या उत्पादनाचें प्रमाण मोठें करणें क्रयविक्रयाच्या दृष्टीनें फारसें फायद्याचें असतें असें नाहीं. लहान प्रमाणावर उत्पादन करण्यांत इतर कांहीं फायदे असतील तर तसें करण्यास क्रय-विक्रयदृष्टया कांहीं हरकत नसते. बाजारपेठेच्या स्वरूपावरहि क्रय-विक्रय-खर्च बऱ्याच प्रमाणांत अवलंबून असतो, हें वर सांगितलेंच आहे. बाजारांत मक्तेदारी असेल तर जाहिरातीवर फारसा खर्च करावा लागत नाहीं. त्याचप्रमाणें मक्तेदारी नसल्यासहि ग्राहकवर्ग एकंदरीनें किंमतीच्या बाबतींत कांटेकोर आणि गुणाच्या बाबतींत चोखंदळ असेल तर जाहिरातबाजी करून त्याला खुलविण्यापेक्षां उत्पादनाचा दर्जा सुधारणें व शक्य त्या प्रयत्नानें किंमत कमी करण्यावर लक्ष केंद्रित करणेंच अधिक हितावह असतें. तसेंच बाजारांत एका ग्राहकाची मक्तेदारी असली म्हणजे बाजारांत एखाद्या कच्च्या मालाचा एकमेव ग्राहक असला म्हणजे मालाच्या खरेदींत आपोआपच फायदा होतो; पण तो फायदा खरेदी-प्रमाणावर अवलंबून असतो असें म्हणतां येत नाहीं. सारांश, क्रयविक्रयांतील फायदे बहुतांशीं वस्तूंच्या व बाजारपेठेच्या विशिष्ट स्वरूपावर अवलंबून असतात आणि त्याविषयीं पुरी माहिती असल्याखेरीज क्रयविक्रयाचें पर्याप्त-प्रमाण लहान कीं मोठें, ह्यासंबंधीं निश्चित सांगतां येत नाहीं.[२८]

पर्याप्त क्रयविक्रय प्रमाण व पर्याप्त व्यवस्थापनप्रमाण ह्यांचा समन्वय :— पर्याप्त व्यवस्थापन प्रमाणापेक्षां पर्याप्त क्रयविक्रयप्रमाण जेव्हां फार मोठें असेल तेव्हां मालाची विक्री करण्याची जबाबदारी आपल्यावर घेण्याचें उत्पादनसंस्था टाळतात. त्यामुळें खास विक्रीचें काम मोठ्या प्रमाणावर करण्याची जबाबदारी पत्करणाऱ्या मोठमोठ्या विक्रयसंस्था निघूं शकतात.[२९] शेतमालाच्या बाबतींत पर्याप्त

२८ Any general statement about the effects of marketing upon optimum size is obviously impossible. When goods are sufficiently standardised a small producer can as a rule market his goods economically; where goods are less standardised but not sold by name and trade marks, the small producers are not at a disadvantage. But in traders in which branded goods are common, the producer must as a rule maintain his own sales and distributing organisation. In such cases, it is economical to have large scale of production and sales.

उत्पादनप्रमाण लहान असतें व मोठ्या प्रमाणावर विक्रीचे फायदे मिळविण्यासाठीं तें वाढविणें इष्ट नसतें. त्यामुळें छोटेछोटे उत्पादक मोठमोठे व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्यांना अगर विक्रयसंस्थांना आपला माल विकतात आणि मग तो माल व्यापाऱ्यांकडून उपभोक्त्यांकडे येत असल्याचें दृश्य दिसून येतें. छोट्या उत्पादकांचा मोठे व्यापारी गैरफायदा घेतील अशी जेव्हां भीति असते तेव्हां त्यांवर सहकारी क्रय-विक्रय (Co-operative Marketing) हा एक उत्तम तोडगा असतो. सहकारी क्रय-विक्रय संस्थेंत अनेक छोटे उत्पादक संघटित होतात आणि संघटितरीत्या क्रय-विक्रय व्यवहार करतात. जेथें शक्य असेल तेथें सहकारी क्रय-विक्रय हा पर्याप्त उत्पादनप्रमाण व पर्याप्त व्यवस्थापनप्रमाण ह्यांच्यांत समन्वय साधण्याचा एक उत्तम मार्ग आहे, ह्यांत शंका नाहीं. हा जो मार्ग आहे तो उत्पादित वस्तूंत गुणभेद केला जाण्याची फारशी शक्यता नसेल, आणि प्रतवारी सोपी असेल तरच स्वीकारतां येतो, तसें नसल्यानें ह्या मार्गानें समन्वय साधण्याची शक्यता नसते. अशा परिस्थितींत मोठ्या प्रमाणावरील विक्रीचे फायदे मिळविण्यासाठीं पर्याप्त उत्पादनप्रमाणापेक्षां उत्पादन अधिक वाढवून उद्‌भवणारे तोटे स्वीकारावे लागतात. तसें करणें कितपत इष्ट हें तारतम्यानें ठरवावें लागतें. पर्याप्त उत्पादनप्रमाणापेक्षां अधिक उत्पादन केल्यास सरासरी उत्पादनखर्च वाढतो. पण मोठ्या प्रमाणावरील विक्रीच्या व्यवहारानें काटकसर होऊन सरासरी खर्च कमी होऊं पहातो. वाढणारा उत्पादनखर्च व कमी होणारा विक्रीखर्च सारखे होईपर्यंत उत्पादनप्रमाण वाढविणें इष्ट असतें. त्यापलीकडे तें वाढविणें शहाणपणाचें नसतें. कारण त्यानंतर विक्रीचें प्रमाण वाढल्यानें जी काटकसर होते त्यापेक्षां प्रत्यक्ष उत्पादनखर्चांत होणारी वाढ अधिक असते. मोठ्या प्रमाणावरील विक्रीचे फायदे मिळविण्यासाठीं आणखी जी एक युक्ति कधीं कधीं योजिली जाते तिचाहि उल्लेख केला पाहिजे. ती युक्ति अशी कीं, अनेक वस्तूंचें उत्पादन एकत्र करून त्यांच्या विक्रीची समान व्यवस्था करणें.[३०] स्नो, पावडर, क्रीमसारख्या प्रसाधनवस्तूंचें उत्पादन एका संस्थेकडूनच केलें जातें व एका शिक्क्याखालीं त्या वस्तु विकल्या जातात. हें उदाहरण नित्यपरिचयाचें आहे. तसें करण्यांत मोठ्या प्रमाणावरील व्यवस्थापनाचे फायदे ज्याप्रमाणें मिळतात त्याचप्रमाणें मोठ्या प्रमाणावरील विक्रीचेहि फायदे मिळतात. हीं जीं उदाहरणें दिलीं आहेत तीं उत्पादनप्रमाणापेक्षां विक्रीप्रमाण

[२९] The same device of vertical disintegration can be applied also to the difficulty of large scale marketing. The task is separated off and entrusted to specialists working on an appropriate scale.

[३०] It may be to the advantage of a manufacture who is maintaining a sales organisation which by reason of the limitation of the market, is not working to its full capacity, to increase the range of its products and to market them all, through the single organisation.—**E. A. G. Robinson**

जेव्हां मोठें असणें इष्ट असतें तेव्हां समन्वय कसा साधला जातो तें दर्शविणारीं आहेत. उत्पादनप्रमाणापेक्षां विक्रीचें प्रमाण लहान असणें इष्ट अशी परिस्थिति सहसा नसते.

भांडवल दृष्टचा पर्याप्त उत्पादनप्रमाण (The Optimum Financial Unit) :––मोठ्या प्रमाणावर उत्पादन करावयाचें असल्यास भांडवलहि मोठ्या प्रमाणावर गोळा करावें लागतें. ह्या गोष्टीचाहि उत्पादनप्रमाणावर परिणाम होणें अपरिहार्य आहे. शिवाय भांडवलावर द्यावें लागणारें व्याज हा खर्चाचा उल्लेखनीय भाग असतो. हा भाग ज्या योगें शक्य तेवढा कमी होईल तें उत्पादनप्रमाण स्वीकारणें केव्हांहि इष्ट असतें.[३१] भांडवलाचा आणि उत्पादनाचा अगदीं निकटचा संबंध असल्यानें भांडवलाची उपलब्धता व त्यावर द्यावें लागणारें व्याज ह्यांचा उत्पादन-प्रमाणावर––एवढेंच नव्हे तर उत्पादनव्यवस्थेवर––मूलगामी परिणाम व्हावा हें अगदीं साहजिक आहे.

संयुक्त भांडवल संस्थांचे फायदे :––जेव्हां तांत्रिक कारणाकरितां उत्पादन-प्रमाण मोठें नसल्याखेरीज चालतच नाहीं, तेव्हां भांडवल उभारतां यावें ह्या दृष्टीनें सोयीची असलेली उत्पादनव्यवस्था स्वीकारावीच लागते. मर्यादित जबाबदारीवर चालविल्या जाणाऱ्या संयुक्त भांडवली संस्थांचा प्रसार अनेक उद्योगधंद्यांत होण्यास हेंच कारण मुख्यत्वेंकरून जबाबदार आहे.[३२] तांत्रिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणावर चाल-णारें उत्पादन अटळ नसलें, तरी मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यानें काटकसर होऊन सरासरी खर्च कमी होत असेल तरीहि संयुक्त भांडवल संस्थेच्या तत्त्वाचा स्वीकार करणें इष्ट ठरतें. तसें केल्यास अनेकांकडून भांडवल गोळा करतां येऊन भांडवल उभारणें सुलभ होतें. तसेंच उत्पादनांतील धोके अनेकांत विभागले जाऊन ते घेतले जाण्याची प्रवृत्ति वाढते व एकंदरीनें मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचें कार्य सुकर होतें. संयुक्त भांडवल संस्थेमुळें भांडवल केवळ उभारतां येतें. एवढेंच नव्हे तर तें अधिक स्वस्तहि मिळूं शकतें. तसें होण्याची दोन कारणें सांगतां येतील. पहिलें कारण असें कीं, संयुक्त भांडवल संस्थांना भांडवल देणाऱ्यांत सामान्य लोकांचा भरणा मोठा असूं शकतो. त्यांच्या व्याजासंबधींच्या अपेक्षा बहुधा कमी असतात. दुसरें कारण असें कीं, संयुक्त भांडवल संस्थेंत धोके विभागले गेल्यामुळें व तसेंच निर्णय घेण्याचें काम अनेकांकडून केलें जात असल्यामुळें लोकांत त्या संस्थांबद्दल एक प्रकारची सुरक्षिततेची भावना वाढूं लागते व त्यामुळेंहि व्याजाचा दर कमी

[३१] If opportunities of borrowing depend in any sense upon scale the problems of finance will influence the optimum scale of production

[३२] Where a large capital is necessary, the joint stock company with limited liability has become common.

होण्यास मदत होते. सारांश, संयुक्त भांडवल संस्थांमुळें पर्याप्त उत्पादनप्रमाण वाढतें व तें वाढलेलें उत्पादनप्रमाण पेलणेंहि त्याचबरोबरच शक्य होतें.[३३]

पर्याप्त उत्पादनप्रमाण वाढविण्यास संयुक्त भांडवल संस्थांची मदत होण्याचें आणखी एक महत्त्वाचें कारण आहे. तें असें कीं, संयुक्त भांडवल संस्थांत व्यवस्थापनाची जबाबदारी तें काम करण्यास जे खरोखरीच पात्र आहेत त्यांच्याकडे जाऊं शकते. अशा संस्थांत तत्त्वतः तरी भांडवलाची मालकी व व्यवस्थापनाचें काम ह्यांची फारकत होते हें सुपरिचित आहे. तात्त्विकदृष्टया पाहिल्यास अशी फारकत होणें श्रेयस्करच असतें. कारण ज्यांच्याजवळ भांडवल आहे त्यांच्यांत व्यवस्थापनाचें काम करण्याची लायकी असेलच अशी ग्वाही देतां येत नाहीं. व्यवस्थापनाच्या दृष्टीनें जे पात्र आहेत त्यांच्याकडे ती कामगिरी गेल्यास व्यवस्थापन सुधारतें व त्यामुळें पर्याप्त उत्पादनप्रमाण वाढविणें शक्य होतें. अर्थातच ही गोष्ट विसरून चालणार नाहीं कीं, व्यवहारांत कधीं कधीं भांडवलाची मालकी व व्यवस्थापनाची पात्रता ह्या दोन्ही गोष्टींनीं जे युक्त आहेत त्यांना संयुक्त भांडवल संस्थांच्या नियमबद्ध व एक प्रकारें लोकशाही पद्धतीनें चालणाऱ्या कारभारानें त्यांच्या कर्तृत्वावर पडणाऱ्या मर्यादा रुचत नाहींत व त्यामुळें आपल्याला संयुक्त भांडवल संस्थांच्या खोडयांत अडकवून घेण्याऐवजीं लहान प्रमाणावरच पण स्वतंत्रपणें उद्योगधंदे चालविण्याचा मार्ग ते स्वीकारतात. स्वतंत्रपणाचे फायदे फारच असतील तर संयुक्त भांडवल संस्थांच्या आहारीं जाऊन उत्पादनप्रमाण वाढविण्यापेक्षां स्वतंत्रपणें राहून कमी उत्पादनप्रमाण ठेवणें योग्य ठरेल असें कोणीहि कबूल करील; पण खरें सांगावयाचें तर अशी परिस्थिति अपायकारकच असते. एकतर भांडवलाची मालकी व व्यवस्थापनाची पात्रता ह्या दोन्ही गोष्टी ज्यांच्यांत आहेत असे लोक विरळाच[३४] आणि दुसरें म्हणजे असे कांहीं लोक असले तर त्यांच्या कर्तबगारीला संयुक्त भांडवल संस्थांत वाव मिळतच नाहीं असें म्हणणें धाडसाचें ठरेल. उलट संयुक्त भांडवल संस्थांचें तात्त्विक स्वरूप कांहींहि असो, त्यांचा कारभार प्रत्यक्षांत कसा

[३३] The company form of organisation enables promoters or controllers of business to pass on to the general public any part of the task of financing a business which they do not themselves wish to undertake—The passing on to the general public of the task of providing capital makes possible also the employment of large amounts of saving which might otherwise be wasted—The ordinary investor is content as a rule to provide capital more cheaply than those who are in a position to promote and control businesses—**Robinson**

[३४] It is not always that managing ability and ownership of capital are combined—The joint stock company is a very good method of separating the functions of providing capital and of management.

चालतो, हें पाहिलें तर कर्तबगार लोकांना संयुक्त भांडवल संस्थांचीं सूत्रें आपल्या हातीं घेणें मुळींच कठिण जात नाहीं असेंच दिसून येईल. एवढेंच नव्हे तर एक पायरी पुढें जाऊन असेंहि म्हणतां यईल कीं, संयुक्त भांडवल संस्थांमुळें ज्यांचें कर्तृत्व एरवीं एखाद दुसऱ्या उद्योगधंद्यापुरतें मर्यादित झालें असतें त्यांना आपली चमक दाखविण्यास अनेक क्षेत्रें उपलब्ध होतात. ही गोष्ट लक्षांत आल्यामुळेंच संयुक्त भांडवल संस्था प्रगत देशांत लोकप्रिय झाल्या आहेत व त्यांचा आधार घेऊन पर्याप्त उत्पादनप्रमाण सर्वत्र वाढलें आहे. संयुक्त भांडवल संस्थांना भरपूर मान्यता प्राप्त झाल्यानंतर पर्याप्त उत्पादनप्रमाण भांडवल उपलब्ध नसल्यामुळें सहसा खालच्या पातळीवर रहात नाहीं. त्यानंतर पर्याप्त उत्पादनप्रमाणावर मर्यादा पडल्याच तर त्या उत्पादनपद्धतीच्या व व्यवस्थापनाच्या पडतात. म्हणजे तांत्रिक दृष्टया व व्यवस्थापनादृष्टया उत्पादन वाढविणें इष्ट नसेल तरच तें वाढविलें जात नाहीं. तें वाढविण्यास भांडवलाच्या बाजूनें कोणतीच अडचण येत नाहीं.

भांडवलबाजाराचें महत्त्व :—भांडवलाबाबत येणाऱ्या अडचणी संपूर्णपणें नाहींशा व्हावयाच्या असतील तर संयुक्त भांडवल संस्थांच्या बरोबरीनें भांडवल-बाजाराचीहि निकोप वाढ व्हावयास हवी. भांडवलबाजारांत बँका व शेअर बाजार ह्यांचा मुख्यत्वेंकरून समावेश होतो. उत्पादनकार्य चालू राहाण्यासाठीं व उत्पादन-संस्थांच्या विकासासाठीं अल्पकालीन भांडवलपुरवठ्याची आवश्यकता असते. पैकीं अल्पकालीन भांडवलपुरवठ्याची जबाबदारी प्रामुख्यानें बँकांकडून उचलली जाते. अल्पकालीन भांडवलपुरवठ्याची चांगली सोय होणें अर्थातच बँकिंगची वाढ देशांत किती प्रमाणांत झाली आहे, ह्यावर अवलंबून असते. कांहीं देशांत बँकांनीं अल्पकालीन भांडवल-पुरवठा तर करावाच; पण दीर्घकालीन भांडवल-पुरवठ्याचीहि जबाबदारी घ्यावी अशा परंपरा पडल्या आहेत. त्या देशांत त्यामुळें बँकिंगची वाढ होणें व ती निकोप होणें ह्या गोष्टींना फारच महत्त्व येतें. बँकांचें काम जेव्हां अल्पकालीन भांडवलपुरवठा करण्यापुरतेंच मर्यादित असतें तेव्हां दीर्घकालीन भांडवल-पुरवठ्यासाठीं शेअर बाजाराचा आश्रय घेतला जातो. शेअर बाजाराची वाढ योग्य प्रकारें झालेली असेल तर उद्योगधंद्याचा वाढीच्या दृष्टीनें दोन चांगल्या सोयी उपलब्ध होतात. त्यांतील पहिली सोय अशी कीं, नवीन उद्योगधंद्यांना सुरुवातीसाठीं व प्रस्थापित उद्योगधंद्यांना विकासासाठीं दीर्घकालीन भांडवल मिळविण्याची एक खात्रीची जागा अस्तित्वांत येते. दुसरी सोय अशी कीं, भांडवल-गुंतविण्यांतील अनेक अडथळे दूर होतात. सामान्य मनुष्याला तीव्रतेनें भासणारी अडचण अशी असते कीं, उत्पादनांत गुंतविलेला पैसा दीर्घकाळ अडकून पडतो व स्वतःला अतिशय गरज असली तरी तो परत मिळवितां येत नाहीं. ही अडचण शेअर बाजारानें बऱ्याच प्रमाणांत दूर होते. कारण पैशाची गरज भासली कीं, शेअर बाजारांत शेअर विकून गुंतविलेला पैसा लगेच मोकळा करतां येतो. शेअर बाजार सुप्रस्थापित झाला असल्यास भांडवल-गुंतवण अधिक मोकळेपणें होऊं

लागते तें ह्याच कारणामुळें. भांडवलाच्या उपलब्धतेसंबंधीं हें जें विस्तृत विवेचन केलें आहे त्याचा आशय असा सांगतां येईल कीं, संयुक्त भांडवल-संस्था, बँका व शेअर-बाजार ह्यांची निकोप वाढ देशांत झालेली असेल तर उत्पादनतंत्राच्या दृष्टीनें जें पर्याप्त उत्पादनप्रमाण असेल--मग तें लहान असो अगर मोठें असो--तें गांठणें उत्पादकांना जड जात नाहीं. पण वरील गोष्टीची वाढ कोणत्याहि कारणामुळें थोपविली गेली असेल तर तांत्रिकदृष्टया उत्पादनप्रमाण वाढविणें इष्ट असूनहि जरूर तेवढें भांडवल उपलब्ध होत नसल्यामुळें उत्पादनप्रमाण लहान ठेवावेंच लागतें. अशा प्रकारें भांडवल उपलब्ध आहे कीं नाहीं, असल्यास किती व्याजानें उपलब्ध आहे, ह्या गोष्टीचा पर्याप्त उत्पादन-प्रमाणावर फारच परिणाम होतो. त्या परिणामाचा एकंदरीनें विचार करतां असाच निष्कर्ष निघतो कीं मोठ्या उत्पादनसंस्थांना भांडवल उभारणें सुलभ जाण्याचा संभव अधिक असतो. एवढेंच नव्हे तर त्यांना भांडवल स्वस्त मिळूं शकते. कारण मोठ्या उत्पादन संस्थांची कीर्ति दांडगी असते व त्यांच्यावर विश्वास चटकन् बसतो. कित्येक वेळां हा विश्वास अस्थानीं असतो, पण तरीहि तो असतो हें विसरून चालणार नाहीं. आजची दुनिया मोठ्याला भुलणारी आहे. ह्यामुळें लहान पण महत्त्वाकांक्षी व प्रज्ञावंत उत्पादकांची फारच कुचंबणा होते. त्यांच्यांत गुण असूनहि कित्येकदां त्यांना पुरेसें भांडवल उभारतां येत नाहीं.[३५] भांडवलामुळें उत्पादन-प्रमाणावर पडणाऱ्या मर्यादा प्रगत देशांत फारशा जाणवत नाहींत. कारण बचतीचें प्रमाण भरपूर असल्यानें मुळांत भांडवल उपलब्ध असतें. त्याला साजेशी अशी उत्पादन-संस्थांची आणि भांडवलबाजाराची रचना असल्यामुळें भांडवल मोकळेपणीं गुंत-विलेंहि जातें. अप्रगत देशांत भांडवलाच्या बाबतींत आडांत नाहीं तर पोहोऱ्यांत कोठून येणार, अशी परिस्थिति असते आणि ह्यांतहि उत्पादन संस्थांच्या कार-भाराला व भांडवलबाजाराला योग्य वळण लागलेलें नसल्यास दुष्काळांत तेरावा महिना अशी स्थिति होऊन बसते.

बाजारपेठेंतील आंदोलनें व उत्पादनप्रमाण :—प्रचलित अर्थव्यवस्थेंत माग-णीच्या अपेक्षेनें उत्पादन केलें जातें. त्यामुळें मागणींत जे फेरबदल होतात त्यांच्या अनुरोधानें उत्पादनांत बदल होणें आवश्यक असतें. मागणींत होणारे फरक चार प्रकारचे असतात. ते चार प्रकार येणेंप्रमाणें :—(१) कायम स्वरूपाचे बदल. फॅशन्समुळें किंवा नव्या शोधामुळें मागणींत होणारे बदल कायमचे असतात. (२) हंगामी बदल. कांहीं वस्तूंच्या बाबतींत विशिष्ट हंगामांत त्यांच्याकरितां असलेली मागणी वाढते. आणि इतर वेळीं ती कमी असते. उदाहरणार्थ, छत्र्या.

[३५] In general, the large firm possesses of course, an advantage. Its name is better known to the investing public. Its standing can be more easily ascertained. A large firm may be able to borrow more, while a small firm of better real standing may go short—**Robinson**

(३) तेजीमंदींतून उद्‌भवणारे बदल. बाजारांत जेव्हां तेजी असते तेव्हां बहुतेक सर्व वस्तूंना चांगली मागणी असते. मंदी असल्यानंतर लगेच मागणी बरीच कमी होते. तेजीमंदींतून उद्‌भवणारे बदल एका अर्थानें तात्पुरते असतात. कारण कांहीं कालानंतर वाढलेली मागणी आपोआप कमी होते व कमी झालेली वाढते. दुसऱ्या अर्थानें तेजीमंदीनें होणाऱ्या बदलाकडे सतत लक्ष द्यावें लागतें. कारण भांडवलशाही अर्थव्यवस्थेंत तेजीमंदीचें रहाटगाडगें सतत चालू असतें. (४) अर्थव्यवस्था बाह्य कारणांमुळें झालेले बदल. लढाईसारख्या अर्थव्यवस्थेशीं निकटचा संबंध असलेल्या कारणामुळें मागणींत होणारे बदलहि विचारांत घ्यावे लागतात. ह्या चारी प्रकारच्या मागणींतील फेरबदलांना तोंड देण्यास सज्ज अशी उद्योगव्यवस्था व उत्पादनप्रमाण असणें सर्वतोपरि इष्ट असतें. बाजारांतील आंदोलनांना दाद न देतां टिकून रहाण्याच्या दृष्टीनें जें उत्पादनप्रमाण इष्ट असेल त्याला पर्याप्त निर्धास्त उत्पादनप्रमाण (Optimum Survival Unit) असें नांव देतां येईल. वस्तूच्या मागणी पुरवठ्याच्या बाबतींत अस्थिरता फार असेल तर त्याचा परिणाम उत्पादनप्रमाणावर होतो हें ह्या ठिकाणीं लक्षांत ठेवलें पाहिजे. ज्या वस्तूच्या मागणींत सातत्य असतें त्या वस्तूचें पर्याप्त उत्पादनप्रमाण एकच असणार नाहीं हें अगदीं स्पष्ट आहे.[३६] त्या दृष्टीनें मुख्यतः लवचिकता हा गुण उद्योगव्यवस्थेंत व उत्पादनप्रमाणांत असावा लागतो.[३७] हा गुण कोणत्या प्रकारच्या उद्योगव्यवस्थेंत व उत्पादन-प्रमाणांत असण्याचा संभव अधिक असतो ह्याचा थोडासा विचार केला पाहिजे.

ज्या उद्योगधंद्यांत फॅशन्समुळें किंवा नवीन लागणाऱ्या शोधामुळें मागणींत नेहमीं फेरबदल होतात व होणारे बदल कायम स्वरूपाचे असतात, त्या उद्योगधंद्यांत उत्पादनप्रमाण लहान असणें योग्य असतें, असें सकृद्दर्शनीं तरी म्हणण्यास हरकत नाहीं. कारण उत्पादनप्रमाण जेवढें मोठें असतें तेवढी भांडवलगुंतवण अधिक असते आणि एकदम मागणी खालावली कीं मोठें नुकसान होतें. हा धोका लहान प्रमाणावरील उत्पादनांत त्या मानानें कमी असतो. लहान प्रमाणावरील उत्पादनाच्या

---

[३६] The firm which would be the optimum firm in conditions of constant output may not be the optimum firm in conditions of fluctuating output; for it is likely to be too large and too rigid to possess the necessary adjustability.

[३७] Where an industry is subject to considerable changes of demand, due either to changes of taste on the part of the consumers or to changes in the method of production caused by improvements in the things produced, or in the technique of producing it, that firm will be strongest which can best face the problems of reorganisations and adaptation. —**Robinson**

समर्थनार्थ हा मुद्दा वारंवार पुढें मांडला जातो; आणि त्यांत कांहीं प्रमाणांत तथ्य आहे, हें कबूलच करावें लागतें. पण तरीहि ह्या संदर्भांत एक गोष्ट लक्षांत ठेवलीच पाहिजे. ती अशी कीं, फॅशन्समुळें वस्तूच्या स्वरूपांत होणारे बदल जेव्हां मामुली स्वरूपाचे असतात—आणि बहुधा ते तसेच असतात—तेव्हां ते बदल सहज करतां येण्याजोगी लवचिकता मोठमोठ्या कारखान्यांतील यंत्रसामुग्रींत व मनुष्यबळांत सामान्यपणें असतेच.[३८] त्यामुळें मूळचें उत्पादनप्रमाण मोठें असलें तरी हे बदल करणें जड जात नाहीं. उदाहरणार्थ, मोटारीच्या किंवा रेडिओच्या नमुन्यांत सारखे बदल होत असतात. पण हे बदल पचविणें मोठ्या कारखान्यांना मुळींच अवघड वाटत नाहीं. फॅशन्समुळें लोकप्रिय असलेले साड्यांचे आणि एकंदरींत सर्वच प्रकारच्या वस्त्रांचे प्रकार सतत बदलत असतात. पण केवळ ह्याच कारणामुळें एखादी कापडाची गिरणी डबघाईस आल्याचें ऐकूं येत नाहीं. फॅशनमुळें मामुली बदल झाल्यास मागणी कमी होऊन थोडें नुकसान होतें, नाहीं असें नाहीं. पण हें नुकसान सोसण्याची ताकद उत्पादनप्रमाण मोठें असणाऱ्या उत्पादकांत असूं शकते. फॅशन्समुळें किंवा नवीन शोधामुळें केवळ वस्तुप्रकार बदलत नसून एखाद्या वस्तूची मागणी जेव्हां संपूर्णपणें नामशेष होण्याचा धोका असतो तेव्हां मात्र मूळचें उत्पादनप्रमाण लहान असलें म्हणजे उत्पादनाचा गाशा गुंडाळणें सोपें असतें असें म्हणतां येईल. पण ह्याहि बाबतींत असें म्हणतां येईल कीं, अशा वस्तूचें उत्पादन एखाद्या लहान उद्योगसंस्थेनें स्वतंत्रपणें करण्याऐवजीं एखाद्या मोठ्या उद्योगसंस्थेनें इतर अनेक वस्तूंच्या जोडीनें करणें कमी नुकसानीचें असतें. तें शक्य नसलेंच तर मात्र निरुपाय होतो. ह्या विवेचनाचें तात्पर्य असें कीं, जेव्हां एखाद्या वस्तूची मागणी कोणत्या ना कोणत्या कारणानें कायमची बंद होण्याचा संभव असतो तेव्हां उत्पादनाचें प्रमाण लहान असणेंच इष्ट असें म्हणणें सकृद्दर्शनीं जरी बरोबर वाटलें तरी आजच्या उत्पादनव्यवस्थेचें एकंदर स्वरूप पहातां ज्या वस्तूंची मागणी अनिश्चित असते त्या वस्तूच्या उत्पादनांतील धोक्यांना मोठ्या प्रमाणावर व्यवहार करणाऱ्या उत्पादनसंस्था अधिक चांगल्या प्रकारें तोंड देऊं शकतात असें दिसून आलें आहे.

मागणींत होणारे बदल जेव्हां अल्पकाल टिकणारे असतात, मग त्यांचा उगम कोणत्याहि कारणांत असो, मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचें श्रेष्ठत्व संशयातीत असतें. ज्या वस्तूंना हंगामी मागणी असते त्या वस्तूंचें उत्पादन प्रधान उत्पत्ति (Product or Output) म्हणून लहान अगर मोठ्या प्रमाणावर स्वतंत्रपणें करण्याऐवजीं मोठ्या प्रमाणावर चालणाऱ्या दुसऱ्या एखाद्या वस्तूच्या कारखान्यांत उप-उत्पत्ति म्हणून करणें अधिक सोयीचे असतें. कारण त्या वस्तूच्या उत्पादनाचा बोजा भासेल एवढ्या प्रमाणांत मोठ्या कारखान्यावर पडत नाहीं आणि म्हणून मागणी

[३८] The highly specialised machine is for less common than is supposed.

हंगामी असली तरी फारसें बिघडत नाहीं. अर्थात् तसें करणें तंत्रतः अशक्य असेल तर गोष्टच वेगळी. तसें असल्यास हंगामी मागणीचें प्रमाण पाहून स्वतंत्ररीत्या होणाऱ्या उत्पादनाचें प्रमाण ठरवावें लागतें. पण मागणी हंगामी असली तरी उत्पादनाप्रीत्यर्थ लागणारा स्थिर खर्च कायम करीत राहणें भाग पडतें. त्या खर्चाचा बोजा साहजिक हंगामी उत्पादनावर टाकला जाऊन किंमत कांहींशी वाढते.

मागणींतील फेरबदल जेव्हां तेजीमंदीशीं संबंधित असतात तेव्हां मुख्य प्रश्न मंदीच्या दिवसांत टिकून राहण्याचा असतो. मंदीच्या दिवसांत टिकून रहाण्याची ताकद तेजीच्या दिवसांत जी बरकत झाली असेल ती किती दिवस पुरूं शकते ह्यावर अवलंबून असते. मंदीला तोंड देण्याची ताकद मोठ्या उत्पादन संस्थांत जात्याच अधिक असते. महापुराच्या लोंढ्यांत वृक्ष उमळून पडतात; पण वेली-झुडपें टिकून रहातात अशा स्वरूपाचा अनुभव अर्थव्यवस्थेंत कधींकधीं येतो, नाहीं असें नाहीं. मंदी जेवढी अधिक जोरदार असेल तेवढा हा अनुभव अधिक येतो. कारण मोठ्या उत्पादनसंस्थांना बसणारा मंदीचा तडाखाहि जोरदार असतो. पण हा अनुभव जमेस धरून सुद्धां असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, मंदीच्या फटक्यास तोंड देण्याची ताकद मोठ्या प्रमाणावरील उत्पादनांतच अधिक असते. मोठ्या प्रमाणावर व्यवहार करणाऱ्या उत्पादनसंस्था मंदीच्या काळांत कोलमडल्याचें आढळलें तर त्याचें कारण तेजीच्या काळांतले त्यांचे व्यवहार शहाणपणाचें नसतात, त्यांचा तेव्हांचा कारभार कार्यक्षम नसतो हेंच असल्याचें बऱ्याच वेळां आढळून येतें.

मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचें श्रेष्ठत्व :––उत्पादनप्रमाणाविषयीं प्रस्तुत प्रकरणांत आतांपर्यंत जी सांगोपांग चर्चा केली आहे तीवरून असाच निष्कर्ष निघतो कीं, आजचे जग हें मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचें जग आहे. म्हणजे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यांतच फायदा व सुरक्षितता आहे. उत्पादनाचें किमान प्रमाण मुख्यतः उत्पादनतंत्रावर अवलंबून असतें. आजची उत्पादनपद्धति पाहिली असतां बहुतेक सर्व वस्तूंच्या उत्पादनांत हें किमान प्रमाण मोठें कां आहे ह्याचा लगेच उलगडा होतो. आजच्या उत्पादनाचे आधार श्रमविभागणी व यंत्रशक्ति हे आहेत आणि हे दोन्ही आधार किमान उत्पादनप्रमाण वाढविणारे आहेत. उत्पादनाचें कमाल प्रमाण मुख्यतः व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असतें. तंत्रतः उत्पादनप्रमाण वाढण्याचें कितीहि फायदे असलें तरी तें बेलगाम वाढविणें हिताचें नसतें. शेवटीं व्यवस्थापनाची जबाबदारी ज्यांच्यावर आहे त्यांची कार्यक्षमता पाहून लगाम खेंचावाच लागतो. व्यवस्थापनाची कार्यक्षमता वाढविण्याचे प्रयत्न होत असतातच. पण तरीहि व्यवस्थापनाच्या मर्यादा शेवटीं जाणवतातच. जेव्हां तंत्रतः पर्याप्त असणारें उत्पादनप्रमाण व्यवस्थापकांच्या कार्यक्षमतेच्या मानानें लहान असतें तेव्हां व्यवस्थापनाची कार्यक्षमता लक्षांत घेऊनच शेवटीं स्वीकारण्यांत येणारें उत्पादन-प्रमाण ठरविण्यांत येतें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. जेव्हां तंत्रतः

इष्ट असेल तें उत्पादन प्रमाण व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेच्या मानानें मोठें असनें–– हा प्रकार अधिक प्रमाणांत आढळत नाहीं––तेव्हां शेवटीं स्वीकारण्यांत येणारें उत्पादन-प्रमाण, तंत्रदृष्टचा इष्ट असणारें उत्पादन-प्रमाण व व्यवस्थापनदृष्टचा इष्ट असणारें उत्पादन-प्रमाण ह्यांच्या मध्यें कोठें तरी असतें. त्या उत्पादनप्रमाणानें व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेपलीकडे उत्पादन वाढल्यानें होणारे तोटे व उत्पादन-प्रमाण वाढल्यानें होणारी काटकसर समान होऊन प्राप्त परिस्थितींत उत्पादनखर्च कमींत कमी झालेला असतो. सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर जें उत्पादनप्रमाण सरासरी खर्च किमान करण्यास समर्थ ठरेल अशा उत्पादनाला पर्याप्त उत्पादन प्रमात असें म्हणणें योग्य होईल. हें उत्पादनप्रमाण सामान्यपणें तडजोडीच्या स्वरूपाचें असतें. शेवटीं स्वीकारण्यांत यणाऱ्या उत्पादन-प्रमाणावर भांडवलाची उपलब्धता व मागणीचीं आंदोलनें ह्यांचाहि अर्थात् परिणाम होतो. पैकीं आंदोलनें हा प्रवाह उत्पादनाचें प्रमाण वाढविण्यास एकंदरीनें अनुकूल आहे असें वर दाखविलें आहे. त्यामुळें हा प्रवाह उत्पादन-प्रमाण वाढण्याच्या आजच्या प्रवृत्तीला विरोधक नाहीं. भांडवलाची अनुपलब्धता व त्यामुळें वाढणारा व्याजाचा दर मात्र उत्पादन-प्रमाण वाढण्याची प्रवृत्ति थोपवूं शकतो. आजचें उत्पादन-तंत्र मोठ्या प्रमाणावरील उत्पादनास सर्वसामान्यपणें अनुकूल असूनहि कांहीं वस्तूंच्या विशिष्ट उत्पादन-तंत्रामुळें व मागणीच्या वैशिष्टयपूर्ण परिस्थितीमुळें व तसेंच लहान प्रमाणावरील उत्पादनाच्या चिवटपणामुळें लहान उद्योगधंदे अद्यापहि टिकून राहिले आहेत.

संयोग व विसंयोग :––प्रस्तुत प्रकरणांत पर्याप्तउत्पादन-प्रमाण एकच नसल्यामुळें समन्वय करण्याची करण्याची आवश्यकता कशी निर्माण होते व तसा समन्वय करण्याचे मार्ग कोणते, हें मुख्यतः सांगितलें आहे. ह्या प्रकरणांतील विवेचनावरून भिन्न भिन्न पर्याप्त उत्पादनप्रमाणाचा समन्वय करण्याचे दोन प्रमुख मार्ग असतात असें म्हणतां येईल. ते दोन मार्ग म्हणजे अनुक्रमें संयोग (Integration) व विसंयोग (Disintegration) हे होत.

जेव्हां एखाद्या लहान पर्याप्त-प्रमाणाचा मोठ्या प्रमाणाशीं समन्वय साधावयाचा असतो तेव्हां वस्तूंचा, उत्पादनप्रक्रियांचा, उत्पादनसंस्थांचा किंवा उत्पादनकेन्द्रांचा संयोग करून त्यांना एका व्यवस्थापनाखालीं आणावें लागतें. उदाहरणार्थ, (१) तांत्रिक पर्याप्तप्रमाणापेक्षां पर्याप्तव्यवस्थापन-प्रमाण मोठें असल्यास (अ) अनेक वस्तूंचें उत्पादन एकत्र केलें जातें. अशा प्रकारच्या संयोगामुळें एखाद्या वस्तूच्या उत्पादनाच्या विविध अवस्था जेव्हां एकत्र येतात––किंवा सोप्या शब्दांत कच्चा माल व पक्का माल ह्यांच्या उत्पादनाची जेव्हां सांगड घातली जाते––तेव्हां त्याला **ऊर्ध्वसंयोग** (Vertical Integration or Combination) असें म्हणतात कापूस व कापड, ऊंस व साखर, लोखंड व पोलाद ह्यांचें उत्पादन एका व्यवस्थेखालीं होऊं लागल्यास तें अशा प्रकारच्या संयोगाचें उदाहरण होईल. ऊर्ध्वसंयोगामुळें एका

व्यवस्थापनाचे फायदे तर मिळतातच; पण इतरहि कांहीं फायदे उत्पादनखर्च कमी होण्यास मदत होते. (आ) अनेक उत्पादनकेन्द्रें एका व्यवस्थापनाखालीं आणण्यांत येतात. (इ) भिन्न पण संबंधित अशा अनेक वस्तूंचें उत्पादन एकत्र केलें जातें. उदाहरणार्थ, स्नो, पावडर, क्रीम : ह्या प्रसाधनसाधनांचें किंवा निरनिराळ्या औषधांचे उत्पादन करणाऱ्या अनेक उत्पादनसंस्था आहेत. ह्यांतील प्रत्येक वस्तूचें उत्पादन स्वतंत्रपणें करावयाचें म्हटल्यास प्रत्येक वस्तूचा सरासरी उत्पादनखर्च वाढेल. (ई) एकाच वस्तूचें उत्पादन करणाऱ्या अनेक संस्था एकत्र येऊन त्यांतून एक मोठी संस्था निर्माण होते. एकसूत्री व्यवस्थापनाचे फायदे मिळविण्यासाठींच अशी संस्था अस्तित्वांत आलेली असल्यास महत्त्वाच्या बाबतींतच नव्या उत्पादनसंस्थेचा अधिकार चालतो. इतर बाबतींत एकत्र येणाऱ्या संस्था स्वतंत्र असतात. अशा प्रकारच्या संयोगाला **समसंयोग** (Horizontal Combination) असें म्हणतात. (२) व्यवस्थापन-प्रमाणापेक्षां पर्याप्तक्रयविक्रय-प्रमाण जेव्हां लहान असतें तेव्हांहि संयोगाचा उपायच अमलांत आणला जातो. अनेक सजातीय किंवा विजातीय वस्तूंची विक्री एकत्र केली जाते. क्रयविक्रयासाठीं समसंयोग किंवा ऊर्ध्वसंयोग ह्या दोहोंपकीं कोणत्याहि एकाचा अवलंब होऊं शकेल. (३) निर्धास्त उत्पादन-प्रमाण लहान असतांहि संयोगपद्धतीचा उपयोग करण्यांत येतो. ज्या वस्तूचें उत्पादनप्रमाण बाजारांतील आंदोलनांमुळें लहान ठेवणें भाग असेल त्या वस्तूच्या उत्पादनाला मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे फायदे मिळविण्यासाठीं त्या वस्तूचें उत्पादन दुसऱ्या वस्तूच्या पोटांत करण्यांत येतें व अशा प्रकारें संयोग साधला जातो.

विसंयोग :––जेव्हां पर्याप्त व्यवस्थापन-प्रमाण पर्याप्त तांत्रिक-प्रमाणापेक्षां कमी असतें तेव्हां विसंयोगाचा उपाय अमलांत आणला जातो. उत्पादनाच्या कांहीं प्रक्रिया उत्पादनसंस्थेकडून अंगाबाहेर टाकल्या जातात. पर्याप्त व्यवस्थापन अगर तांत्रिक प्रमाणापेक्षां विक्रीप्रमाण फारच मोठें असल्यासहि विसंयोगाच्या पद्धतीचा उपयोग करतां येतो. म्हणजे उत्पादनसंस्था विक्रीची जबाबदारी संपूर्णपणें आपल्या अंगाबाहेर टाकतात. आणि तें काम स्वतंत्र क्रयविक्रय संस्थांकडून केलें जातें. मालाचा विमा उतरविणें हासुद्धां विसंयोगाचाच एक प्रकार आहे. विमा उतरविणें म्हणजे विशिष्ट प्रकारचा धोका पत्करण्याची जबाबदारी अंगाबाहेर टाकून दुसऱ्या संस्थेकडे सोंपविणें होय.

प्रमुख संदर्भग्रंथ

E. A. G. Robinson. :––Structure of Competitive Industry.

: ७ : उत्पादनस्थल-निश्चितीची कारण-मीमांसा

उत्पादनक्रियेचे तीन विभाग (Three stages of a productive enterprise) :—उत्पादनस्थळ कसें निश्चित होतें, ह्या संबंधीचा अधिक अभ्यास करण्यापूर्वी कोणत्याहि वस्तूच्या उत्पादनाचे जे तीन प्रमुख भाग पडतात ते लक्षांत घेतले पाहिजेत. कारण त्यांतील कोणता भाग संबंधित वस्तूच्या उत्पादनांत महत्त्वाचा असतो, ह्याचा स्थलनिर्णयावर बराच परिणाम होतो. (१) वस्तुरूप साधनांची जमवाजमव, (२) संस्करण म्हणजे कच्च्या मालाचें पक्क्या मालांत रूपान्तर करण्याची क्रिया व (३) विक्रीक्रिया असे उत्पादनक्रियेचे तीन भाग पडतात. ह्यापैकीं वस्तुरूप साधनें उत्पादनाच्या स्थळीं आणण्याच्या बाबतींत व तसेंच उत्पादित वस्तु बाजारपेठेंत पोंचती करण्याच्या बाबतींत मुख्यत: वाहतुकीच्या खर्चाचा (Transport or Transfer Costs) प्रश्न येतो. वाहतुकीचा खर्च किमान व्हावा, अशी उत्पादकाची साहजिकच इच्छा असते व त्या अनुरोधानें तो उत्पादनस्थलाविषयीचे निर्णय घेत असतो; पण वाहतुकीचा खर्चच केवळ विचारांत घेऊन त्याला चालत नाहीं. प्रत्यक्ष उत्पादनासाठीं—म्हणजे वर ज्या प्रक्रियेला उद्देशून संस्करण असा शब्द वापरला आहे त्या प्रक्रियेसाठीं—लागणारा खर्चहि पाहावा लागतो. प्रत्यक्ष उत्पादनासाठीं लागणारा खर्च प्रामुख्यानें उत्पादनघटकांच्या—म्हणजे मनुष्यबळ, द्रव्यरूप भांडवल, भूप्रदेश इत्यादि उत्पादन-साधनांच्या—किंमतीवर अवलंबून असतो असें सामान्यपणें म्हणतां येईल. हा खर्च सर्वत्र सारखा नसतो. म्हणून तर उत्पादनाचें स्थळ काळजीपूर्वक निवडण्याचा प्रश्न उपस्थित होतो. उत्पादनघटकांच्या किंमती म्हणजे मजुरीचे दर, व्याजाचे दर, जमिनीचीं भाडीं किंवा त्यांच्या किंमती विविध स्थळीं वेगवेगळ्या असतात. हें लक्षांत घेऊन कोणत्या स्थळीं उत्पादन करणें सर्वांत कमी खर्चाचें होईल, हें उत्पादकाला ठरवावें लागते. संस्करणखर्च व वाहतूक खर्च मिळून एकंदर उत्पादनखर्च होतो. हा कमी करणें हेंच उत्पादकाचें साध्य असल्यानें त्यांतील कोणताहि एक खर्च उत्पादनाचें स्थळ निश्चित करण्यास कारणीभूत होतो, असें म्हणतां यावयाचे नाहीं. उत्पादनाचें स्थळ निश्चित होण्यांत दोहोंचाहि भाग असतो असें म्हणणें वस्तुस्थितीला अधिक धरून होईल. वाहतूक खर्च व संस्करणखर्च कोणत्या गोष्टींवर अवलंबून असतो व स्थळानुसार तो वेगवेगळा असण्याची शक्यता कां असते हें आतां पाहूं.[1]

वाहतूक खर्च :—वाहतूक खर्चाचा प्रश्न दोनदां येतो. एखाद्या वस्तूच्या उत्पादनासाठीं जो कच्चा माल व इतर वस्तुरूप साधनसामग्री लागते ती उत्पा-

---

[1] The factors which influence the choice of a place of production fall into two broad groups, first the factors which determine where the transport cost involved will be at a minimum, second the factors which make for larger cost of production at some places than at other places. —**Robinson**

दनस्थळीं आणावयाच्या वेळीं वाहतुकीचा प्रश्न प्रथम उपस्थित होतो. उत्पादन झाल्यानंतर उत्पादित वस्तु तिच्या बाजारपेठेंत नेण्याच्या वेळीं वाहतुकीचा प्रश्न पुनः एकदां उपस्थित होतो. कच्चा माल मिळविणें स्वस्त व्हावें व त्यावरील वाहतुकीचा खर्च शक्यतों वांचावा, म्हणून कच्च्या मालाची जेथें पैदास होते तेथें अगर जवळपासच उत्पादनस्थळ ठेवावें अशी प्रवृत्ति उत्पादकांत असल्याचें दिसून येते. ह्याच्या उलट उत्पादित वस्तु तिच्या बाजारपेठेंत नेणें सोयीचे व स्वस्त व्हावें म्हणून बाजारपेठेच्या नजीकच उत्पादनस्थळ ठेवण्याची प्रवृत्तिहि उत्पादकांत असल्याचें दिसून येतें. कच्च्या मालाचें निर्मितिस्थळ, उत्पादनघटक भरपूर व स्वस्त मिळण्याचें स्थळ, बाजारपेठेला नजिकचें स्थळ एकच असलें तर उत्पादनस्थळ कोठें असावें, हें ठरविणें मुळींच कठिण नसतें. तो निर्णय आपोआपच ठरला जातो असें म्हणावयास हरकत हरकत नाहीं; पण असा मधुर त्रिवेणी संगम क्वचितच होतो. त्यामुळेंच तुलना करण्याचा, निवड करण्याचा, निर्णय घेण्याचा प्रसंग येतो. वाहतुकीच्या खर्चापुरतेंच बोलावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, कच्च्या मालाच्या वाहतुकीला अधिक प्राधान्य द्यावें कीं पक्क्या मालाच्या वाहतुकीला किंवा निराळ्या शब्दांत उत्पादन-स्थळ कच्च्या मालाच्या निर्मितिस्थळाजवळ असल्यानें उत्पादनखर्चांत अधिक कपात होईल कीं बाजारपेठेजवळ उत्पादनस्थळ अधिक सोयीचें व काटकसरीचें होईल, असा विचार उत्पादकांना करावा लागतो. ज्या वस्तूंच्या उत्पादनांत कच्च्या मालाच्या वाहतुकीला अधिक प्राधान्य असतें त्या मालाचें उत्पादनस्थळ कच्च्या मालाच्या निर्मितिस्थळानजिक असण्याची शक्यता अधिक असते व ज्या वस्तूच्या बाबतींत उत्पादित वस्तु बाजारपेठेंत नेण्यास अधिक प्राधान्य असतें त्या मालाचें उत्पादनस्थळ बाजारपेठेनजिक असण्याचा संभव फार असतो, असा सर्वसाधारण अनुभव आहे.[२]

वाहतूक खर्चाबाबतची तत्त्वें : अंतर व मार्गाचा खर्चावर परिणाम :—वाहतूक खर्च प्रामुख्यानें तीन गोष्टींवर अवलंबून असतो. (१) अंतर (२) वाहतूक साधन व (३) वस्तूचें स्वरूप ह्या त्या तीन गोष्टी होत. अंतराबाबत सर्वसाधारणपणें असें म्हणतां येईल कीं, अंतर वाढलें म्हणजे वाहतुकीचा खर्चहि वाढतो. मात्र ह्या बाबतींत एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे, ती अशी कीं, केवळ अंतर विचारांत घेऊन चालणार नाहीं; तर वाहतुकीचा मार्ग कोणत्या प्रकारचा आहे, हें लक्षांत घ्यावयाला पाहिजे. तेवढेंच अंतर कापण्याकरितां मार्ग वेडावांकडा, डोंगराळ मुलुखांतून जाणारा असेल तर जेवढा खर्च येईल त्यापेक्षां कमी खर्च मार्ग सरळ व मैदानी मुलुखांतून जाणारा असेल तर येईल हें उघडच आहे. ह्याचाच अर्थ असा

[२] The expense and inconvenience of distributing to distant customers and procuring materials from a distance invite producers to locate nearer their markets and their sources of materials. The incentive to reduce transfer costs is thus the basis of mutual attraction between successive stages of production—**Hoover**

कीं, केवळ अंतर पाहून चालत नाहीं; तर ज्या मार्गानें वाहतूक व्हावयाची असेल त्या मार्गांतील भौगोलिक अडचणींचाहि विचार करावा लागतो. विमानमार्गे वाहतूक करावयाची असेल तरीसुद्धां ह्या गोष्टींचा विचार करावा लागतोच. कारण विमानांच्या करितांहि सोयीच्या उतरण्याच्या जागांची आवश्यकता असतेच.

वाहतुकीचें साधन व वाहतूक खर्च :—वाहतुकीसाठीं वापरण्यांत येणारें साधन कोणतें आहे, ह्याचाहि वाहतूक खर्चावर अर्थातच परिणाम होतो. पायीं वाहतूक, बैलगाडी-घोडागाडीनें वाहतूक, मोटारची वाहतूक, लोहमार्गानें वाहतूक, जलमार्गाचा किंवा हवाईमार्गाचा उपयोग असे वाहतुकीच्या साधनांचे अनेक प्रकार आहेत. वाहतुकीचें साधन व वाहतुकीचा खर्च ह्यांच्याबाबत सर्वसाधारणपणें असें म्हणतां येईल कीं, जीं वाहतुकीचीं साधनें अस्तित्वांत आणणें खर्चाचें असेल तीं वाहतुकीचीं साधनें अंतर पुष्कळ असेल व उत्पादनाचें—म्हणजे पर्यायानें ने-आण व्हावयाच्या मालाचें—प्रमाण मोठें असेल तरच परवडूं शकतात. निराळ्या शब्दांत त्या परिस्थितींतच उत्पादित वस्तूच्या दरमापावर पडणारा भार कमी होऊं शकतो. म्हणूनच सामान्यपणें असें आढळून येते कीं, उत्पादनाचें प्रमाण जेव्हां लहान असतें व कापावयाचें अंतर जेव्हां थोडें असतें तेव्हां बैलगाडी किंवा फार तर ट्रकनें मालाची वाहतूक करणें स्वस्तांत पडतें. मोठ्या प्रमाणावरील उत्पादनासाठीं व मोठमोठ्या अंतरासाठीं मालाची ने-आण रेल्वेनें करणेंच सोयीचें व कमी खर्चाचें ठरतें. फार मोठ्या अंतरासाठीं व फार मोठ्या प्रमाणावरील वाहतुकीसाठीं रेल्वेपेक्षांहि जलमार्गाचा उपयोग सोयीचा व कमी खर्चाचा ठरतो; पण जलमार्गाचा उपयोग सर्वत्र करतां येण्याजोगी परिस्थिति सर्वत्र नसते, हें त्या मार्गाचें मुख्य वैगुण्य आहे. जेव्हां एकाच ठिकाणीं वाहतुकीचीं विविध साधनें उपलब्ध असतात तेव्हां त्यांच्यांतील स्पर्धेचाहि उत्पादकाला फायदा मिळूं शकतो. कारण स्पर्धेमुळें वाहतुकीचे दर शक्य तेवढें कमी उरण्यास मदत होते.

वस्तूचें स्वरूप व वाहतुकीचा खर्च :—वस्तूच्या स्वरूपावरहि वाहतुकीचा खर्च बऱ्याच प्रमाणांत अवलंबून असतो. लवकर नष्ट होणाऱ्या, नाजूक, धोक्याला कारणीभूत होणाऱ्या वस्तूंची वाहतूक फारच काळजीपूर्वक करावी लागते आणि त्यामुळें वाहणावळ वाढते. वजनाच्या मानानें ज्या वस्तु अधिक मौल्यवान असतात त्यांचाहि वाहतूक खर्च त्यांच्या किंमतीच्या तुलनेनें बराच कमी असतो.

वाहतूक खर्च व उत्पादन-स्थळाची निवड :—वाहणावळीच्या बाबतींत वर ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्यांच्या उत्पादन-स्थळाच्या निवडीसंबंधीच्या उत्पादकांच्या निर्णयावर परिणाम होणें अपरिहार्य असतें. कारण वर सांगितल्याप्रमाणें नफा वाढविण्याच्या प्रेरणेमुळें उत्पादक वाहतूक खर्च कमींत कमी कसा करतां येईल, ह्या चिंतेंत नेहमीं असतो. कच्च्या मालाची वाहणावळ कमी व्हावी म्हणून कच्च्या मालाच्या निर्मितीस्थळाजवळ उत्पादनस्थळ तो ठेवूं पहातो; तर पक्क्या मालाची वाहणावळ कमी करण्यासाठी उत्पादनस्थळ बाजारपेठेजवळ असलें तर बरें,

असें त्याला वाटत असतें. ह्या दोन्हीं विचारांत संघर्ष नसला तर; म्हणजे दोन्ही दृष्टींनीं सोयीचें असें एकच स्थळ निवडणें शक्य झालें तर उत्तमच; पण तशी परिस्थिति जेव्हां नसते तेव्हां कच्च्या मालाचें निर्मितिस्थळ, बाजारपेठ किंवा त्या दोहोंना जोडणाऱ्या मार्गावरील मधलें कोणतेंहि स्थळ निवडलें असतां एकंदर वाहतूक खर्च किती होईल, हें पाहून जें उत्पादनस्थळ निवडलें असतां वाहतूक खर्च कमींत कमी होईल अशा स्थळाची निवड करण्याची प्रवृत्ति उत्पादकांत दिसून येते.[३] हें विधान करतांना उत्पादकाला जरूर ती सर्व माहिती असते व त्यामुळें उत्पादन स्थळाची अचूक निवड करणें त्याला शक्य होतें, असें गृहीत धरलें आहे. प्रत्यक्षांत असें कांहीं गृहीत धरणें हें वस्तुस्थितीला धरून नाहीं हें सांगावयास पाहिजे असें नाहीं; पण व्यवहारांत अनुभव कांहींहि असला तरी त्यामुळें तात्त्विक विवेचनांत फरक करण्याचें कारण नाहीं. माहितीच्या किंवा योग्य दृष्टीच्या अभावामुळें प्रत्यक्षांत वैयक्तिक उत्पादकाकडून स्थळाच्या निवडीबावत चुका होतात. हें जरी खरें असलें तरी वैयक्तिक उत्पादकांच्या चुकांतून जो अनुभव येतो त्यामुळें झालेली चूक दुरुस्त होण्यास मदत होते हें विसरतां येत नाहीं.[४]

कच्च्या मालाकडे आकृष्ट होणाऱ्या वस्तु :—वाहतूक खर्चाचा उत्पादनस्थळावर होणारा परिणाम लक्षांत घेऊन अर्थव्यवस्थेकडून उत्पादित होणाऱ्या वस्तूंचे तीन भाग पडतात. पहिल्या भागांत ज्या वस्तूंचें उत्पादनस्थळ कच्च्या मालाची पैदास जेथें होत असेल तेथें अगर जवळपासच असण्याची प्रवृत्ति दिसून येते अशा वस्तु येतात. दुसऱ्या भागांत ज्या वस्तू बाजारपेठेकडे आकृष्ट होतात, म्हणजे बाजारपेठेजवळ ज्याचें उत्पादनस्थळ असतें अशा वस्तु येतात. तिसऱ्या भागांत दोन्ही दृष्टींनीं सोयीच्या अशा मध्यवर्ती ठिकाणीं ज्यांचे उत्पादनस्थळ असते अशा वस्तु येतात. पैकीं पहिल्या भागांत समाविष्ट होणाऱ्या—म्हणजे कच्च्या मालाकडे आकृष्ट होणाऱ्या—वस्तु कोणत्या, हें पाहिल्यास सर्वसाधारणपणें असें दिसून येतें कीं, जी वस्तु मिळविण्याकरितां कच्च्या मालांतील बराच अशुद्ध भाग काढून टाकावा लागतो

[३] The place of production will be either at the source of material or at the place of consumption, according as the material or the finished article is more expensive to carry—**Robinson**

[४] The profit seeking individual enterprise responds to transfer costs by seeking to reduce them. Procurement costs can be lessened by moving to a point with better access to materials, or distribution costs can be lessened by moving to a point with better access to markets. These two considerations are quite likely to lead in different directions so that the producer must strike a balance of relative advantages in order to decide where best to locate along the route connecting his materials source with his market. —**Hoover.**

किंवा निराळ्या शब्दांत कच्च्या मालाच्या तुलननें उत्पादित वस्तूचें प्रमाण कमी असतें अशा वस्तूच्या बाबतींत उत्पादनस्थळ कच्च्या मालाच्या पैदाशीजवळ असण्याचा संभव असतो. उदाहरणार्थ, खनिज वस्तूचें उत्पादन. खनिज धातूंतील बराचसा अशुद्ध भाग काढल्यानंतर शुद्ध धातु मिळते आणि अशुद्ध धातूंच्या प्रमाणाच्या मानानें शुद्ध भाग थोडा असतो. साखरेच्या बाबतींत हेंच म्हणतां येईल. उंसाचे वजन जेवढें असतें त्या मानानें मिळणारी साखर फारच थोडी असते. अशा परिस्थितींत वजनानें भारी असलेला, पण ज्यांत अशुद्ध व निरुपयोगी भाग बराच आहे असा कच्चा माल दुसरीकडे वाहून नेण्यापेक्षां जागच्या जागीं त्याचा उपयोग करणें कमी खर्चाचें असतें. प्राथमिक स्वरूपांतील—प्राथमिक उत्पादनापासून प्राप्त होणारा—जो कच्चा माल असतो तो सामान्यपणें अशाच प्रकारचा असतो.[५]

वाहणावळ जेव्हां वजनावर अवलंबून असते तेव्हां वजनी कच्चा माल शुद्ध करून घेणें बरें ह्यांत संशय नाहीं. तसेंच ज्या वस्तूंच्या उत्पादनासाठीं बरेंच जळण लागतें त्या वस्तूंचें उत्पादन जळण उपलब्ध होतें तेथेंच करणें सोयीचें असतें. कारण त्यामुळें जळणाची वाहतूक करण्यांत निष्कारण होणारी यातायात आणि वाहणावळ वांचते. सिमेंटचें उत्पादन, कांचेचें उत्पादन इत्यादि संस्करणाच्या पहिल्या अवस्थेंत पडणारे उद्योगधंदे ह्या सदरांत येतात. अशा उद्योगधंद्यांखेरीज ज्या वस्तूंच्या उत्पादनांत कोणत्याहि कारणामुळें असो कच्चा माल मिळविण्याचा खर्च पक्का माल बाजारपेठेकडे पाठविण्याच्या खर्चापेक्षां अधिक असतो ते उद्योगधंदेहि कच्च्या मालाकडेच आकृष्ट होतात. कापसांतील सरकी काढून टाकण्याची व कापूस तयार करण्याची जी प्रक्रिया असते ती कापसाचें उत्पादन जेथें होते तेथेंच करणें हितकर ठरतें. कारण कापसाचें वजन जरी कमी झालें नाहीं तरी सरकी काढलेला कापूस वाहतुकीस सुलभ अशा गठ्ठ्यांतून बांधतां येतो. त्यामुळें कापसाची वाहणावळ कमी होते.

बाजारपेठेकडे आकृष्ट होणारें उत्पादन :—प्राथमिक उत्पादनांतून (Primary Production) मिळणाऱ्या कच्च्या मालाचें शुद्धीकरण व उपभोग्य वस्तूचें उत्पादन ह्यांतील मध्यंतरीच्या किंवा शेवटच्या ज्या उत्पादनाच्या अवस्था असतात त्यामुळें उत्पादित वस्तु अधिक नाजुक ने-आण करण्याच्या दृष्टीनें अधिक त्रासदायक, वजनाच्या मानानें अधिक मौल्यवान होत जाते. त्यामुळें अशा अवस्थांच्या बाबतींत उत्पादनस्थळ बाजारपेठेनजिक असणें सोयीस्कर व काटकसरीचें ठरतें.[६]

---

[५] Most raw materials as first obtained have a large proportion of waste which it is economic to remove before transportation then after.

[६] It is not surprising that the stages of production closest to the final consumer in the sequence of processing and handling are also closest in the locational sense.

तयार कपडे, कापड, अन्नवस्तु, दूधदुभतें योग्य ह्यासाठीं बाजारपेठेजवळचें स्थळ असतें हें उघड आहे. लवकर खराब होणाऱ्या ज्या वस्तु असतात. किंवा ज्या वस्तूसाठीं लागणारा कच्चा माल कोठेहि मिळूं शकतो त्या वस्तूचें उत्पादन बाजारपेठेजवळच कां होतें, हें सहज समजण्याजोगें आहे.

वाहतुकीच्या दृष्टीनें मध्यवर्ती स्थळें :––वाहणावळ कमी करण्याच्या दृष्टीनें कच्च्या मालाच्या पुरवठ्यानजिकची किंवा बाजारपेठेनजिकची जागाच नेहमीं निवडली जाते असें नाहीं. बऱ्याच वेळां असें होतें कीं, एखाद्या वस्तूच्या उत्पादनासाठीं अनेक प्रकारचा कच्चा माल लागतो. तो विविध ठिकाणांहून मिळवावयाचा असतो. असा माल मिळविणें सुलभ व्हावें व वाहणावळ शक्यतों कमी व्हावी म्हणून कित्येक उद्योगधंद्यांत वाहतुकीच्या दृष्टीनें मध्यवर्ती ठिकाणांना विशेष महत्त्व देण्याची प्रवृत्ति दिसून येते. ह्यामुळेंच तर जेथें रेल्वेचे अनेक फांटे एक येतात अशा गांवांना विविध प्रकारच्या उद्योगधंद्यांच्या दृष्टीनें विशेष महत्त्व येतें. रेल्वेचे फांटे जेथें एकत्र येतात अशी सुद्धां अनेक ठिकाणें एखाद्या देशांत असतात. त्यांपैकीं विशिष्ट उद्योगधंद्यासाठीं लागणाऱ्या सर्व वस्तु विचारांत घेऊन वाहणावळ किमान होईल असें ठिकाण निवडावें लागतें. वाहतुकीचीं अनेक साधनें जेथें उपलब्ध असतात त्या ठिकाणांना अधिक महत्त्व दिलें जातें हें ओघानें आलेंच. वाहतुकीचीं सर्व साधनें जेथें उपलब्ध आहेत व विविध मार्ग जथें एकत्र येतात अशीं ठिकाणें वाहणावळ कमी खर्चाची व वाहतूक कमी त्रासाची होण्याच्या दृष्टीनें अतिशय योग्य असतात. म्हणून अनेक उद्योगधंदे तेथें एकत्र येतात. कच्चा माल जेथें निर्माण होतो तेथेंच उत्पादनस्थळ असणें वाहतूकदृष्ट्या अत्यावश्यक नसेल तर वाहतुकीच्या दृष्टीनें मध्यवर्ती ठिकाणांनाच महत्त्व असतें, असा अनेक उद्योगधंद्यांतला अनुभव आहे.[७]

संस्करणखर्च कमी करण्याच्या दृष्टीनें होणारी उत्पादनस्थळाची निवड (Locational effects of Processing Costs):—ज्या वस्तूंच्या उत्पादनांत वाहणावळीपेक्षां प्रत्यक्ष उत्पादनखर्च अधिक महत्त्वाचा असतो त्या वस्तूंचें उत्पादनस्थळ संस्करणखर्चाच्या अनुरोधानें निवडलें जातें. उत्पादनासाठीं वापरलेल्या वस्तुरूप साधनसामग्रीची (कच्चा माल, जळण, उत्पादनासाठीं वापरलेली शक्ति) मूल्य व पूर्ण तयार झालेल्या (Finished Product) वस्तूचें मूल्य ह्यांच्यांतील तफावतीला उद्देशून संस्करणखर्च (Processing Cost) असा शब्दप्रयोग वापरतां येईल.

[७] An ideal distributing centre is a junction point from which the total distribution cost to a large number of markets is a minimum—Similarly a material oriented establishment which can handle the materials from a considerable area of material supply, seeks good collection centre i. e. a juction with minimum procurement costs for a sufficient supply of the material.

संस्करणखर्चांत मजुरी, व्यवस्थापनखर्च, व्याज, जागेचें भाडें, स्थिर भांडवली वस्तु ठाकठीक राखण्याचा खर्च, घसारा इत्यादि गोष्टी समाविष्ट होतात. एकंदर उत्पादनखर्चांत वाहतूक खर्चाचा भाग अल्प व संस्करणखर्चाचा भाग मोठा, अशी जेव्हां परिस्थिति असते तेव्हां किंवा कोणतेंहि ठिकाण उत्पादनासाठीं निवडलें तरी वाहतूक खर्चांत उल्लेखनीय असा फरक होऊं शकत नाहीं, अशी परिस्थिति असते तेव्हां संस्करण खर्च उत्पादनस्थळाच्या बाबतींत निर्णायक ठरतो.[८]

घटकांच्या किंमती असमान :–संस्करणखर्चांत ठिकाणानुसार फरक पडण्याचें कारण असें कीं, सर्व ठिकाणीं उत्पादनघटकांची किंमत समान नसते. मनुष्यबळ, भांडवल ह्या उत्पादनघटकांत जेवढ्या प्रमाणांत गतिसौकर्य (Mobility) असते, तेवढ्या प्रमाणांत त्यांच्या किंमतींतील विषमता कमी होते; पण भरपूर गतिसौकर्य असणारे उत्पादनघटक आढळतच नाहींत, असें म्हटलें तरी चालेल. त्यामुळें उत्पादन घटकांच्या बाबतींत गतिसौकर्याचा अभाव ज्या प्रमाणांत जाणवतो त्या प्रमाणांत त्यांच्या किंमतींस ठिकाणानुसार तफावत असल्याचें आढळून येतें. भूप्रदेश हा गतिशून्य (Immobile) घटक व त्याच्या विविध परिमाणांत गुणभिन्नता अतिशय. त्यामुळें विविध ठिकाणच्या भूप्रदेशाच्या किंमतींत व भाड्यांत विषमता फारच आढळते. त्या मानानें कमी असली तरी मजुरीच्या दरांतही बरीच विषमता आढळते. कारण सामाजिक, आर्थिक कौटुंबिक अशा अनेक प्रकारच्या कारणांमुळें स्थलांतर करणें कामगार वर्गाला नेहमींच कठिण असतें. मनुष्यबळ व भूप्रदेश ह्यांच्याशीं तुलना करतां गुंतविलें जाण्यासाठीं उपलब्ध असलेलें नवें भांडवल सुलभगति असतें. त्यामुळें देशांतल्या देशांत उत्पादन-स्थळ-निर्णयावर परिणाम घडेल एवढी व्याजाच्या दरांत तफावत नसते. मात्र एवढें खरें कीं, भांडवलबाजार जेथें संघटित झाला आहे अशा मोठमोठ्या गांवांत भांडवल उभें करणें त्या मानानें लहान व दूरच्या ठिकाणीं असलेल्या गांवापेक्षां सुलभ असतें व त्यामुळें व्याजाचा दरहि कमी होऊं शकतो. भांडवलबाजार जेथें संघटित आहे तेथें किंवा त्याच्या जवळपासच उद्योगधंदे आकर्षित होतात त्याचें हें एक कारण संभवतें हें विसरून चालणार नाहीं. पण तरीहि एकंदरीनें असेंच दिसून येतें कीं, उत्पादनस्थळ ठरविणाऱ्या निर्णयांत व्याजाच्या दरांपेक्षां जमिनीची भाडीं व मजुरीचे दर ह्यांचा भाग मोठा असतो आणि त्यांतल्यात्यांतहि मजुरीला अधिक महत्त्व येते.[९]

घटकांची उत्पादनक्षमता सारखी नसते :––उत्पादनघटकांसाठीं द्याव्या लाग-णाऱ्या किंमतीच्या बाबतींत एक महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. ती अशी कीं, घटकपरिमाणांची उत्पादनक्षमता सर्वत्र सारखी नसते. भूप्रदेशाच्या बाबतींत

---

८ In some lines of business it is evident that transfer costs very so little with location in comparision with processing costs that the latter must be the significant locating factor.

ही गोष्ट विशेषेंकरून जाणवते. मनुष्यबळाच्या बाबतींत तुलनेनें ती कमी प्रमाणांत जाणवली तरी मनुष्यबळाच्या बाबतींतहि कार्यक्षमता सर्वत्र सारखी नाहीं असें दिसून येतें. घटकांच्या उत्पादनक्षमतेंत भौगोलिक परिस्थितीमुळें बराच फरक पडतो. मातीचे गुण, हवापाणी, भूप्रदेशस्वरूप ह्यामुळें विशिष्ट वस्तूंच्या उत्पादनासाठीं विशिष्ट स्थळें योग्य ठरतात, ही गोष्ट सर्वपरिचित आहे. शेतमाल व खनिज माल ह्यांचें उत्पादनस्थळ भौगोलिक परिस्थितीवर जें अपरिहार्यपणें अवलंबून असते तें ह्याच कारणामुळें. कामगारांची कार्यक्षमताहि हवापाण्यावर बऱ्याच प्रमाणावर अवलंबून असते. उष्ण हवामान असेल तर कार्यक्षमता कमी होते असा अनुभव आहे. भूप्रदेशाच्या स्वरूपावर इमारतींना पाया किती लागतो, त्यांच्या दुरुस्तीवर खर्च किती होतो, ह्या गोष्टीसुद्धां अवलंबून असतात. तसेंच एखाद्या ठिकाणीं विशिष्ट प्रकारचा कामगारवर्ग स्थाईक झालेला असतो. त्यामुळें त्याच प्रकारच्या इतर ठिकाणीं असलेल्या कामागारवर्गापेक्षां त्याची उत्पादनक्षमता जात्याच अधिक असते. घटकपरिमाणांची उत्पादनक्षमता सर्वत्र सारखी नसते, ही गोष्ट खरी असेल तर उत्पादकाला केवळ किंमती विचारांत घेऊन चालत नाहीं. त्यांची उत्पादन क्षमताहि विचारांत घ्यावी लागते. किंमत जेवढी अधिक घ्यावी लागते त्यापेक्षां उत्पादनक्षमता अधिक प्रमाणांत असल्यास किंमत अधिक पडूनहि परिणामीं तो उत्पादनघटक स्वस्तच पडतो हें सांगावयाला पाहिजे असें नाहीं. संस्करण-खर्चाच्या दृष्टीनें कोणतें स्थळ सर्वांत चांगलें, हें ठरवितांना उत्पादकांना ह्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून चालत नाहीं.

आणखी एक गोष्ट सांगण्याजोगी आहे. एखाद्या घटकासाठीं इतर घटकांच्या तुलनेनें अधिक किंमत द्यावी लागल्यास त्या घटकाऐवजीं इतर घटक वापरणें किती प्रमाणांत शक्य आहे (म्हणजेच त्या घटकाची) ह्याचाहि उत्पादक विचार करतो. अधिक किंमतीच्या घटकाऐवजीं दुसरे घटक वापरून जोंपर्यंत काम भागूं शकतें तोंपर्यंत अधिक किंमत देणें जड वाटण्याचें फारसें कारण नसतें. हें जेव्हां शक्य नसतें तेव्हां मात्र विशिष्ट घटकांच्या किंमतींना बरेंच महत्त्व प्राप्त होतें.

---

[१] Cheap land, cheap labour, cheap capital, efficient business management may all attract production from other places where their prices are higher—Cheap labour, however probably exercises more influence on the location of easilly movable industries than any other single factor—Capital and business management are generally more mobile than the other factors that we have considered and land therefore to move towards them rather than to attract them—**Robinson.**

वरील विवेचनाचा सारांश असा सांगतां येईल कीं, घटकांच्या किंमती, त्यांची उत्पादनक्षमता एका घटकाऐवजीं दुसरा घटक वापरण्याची शक्यता इत्यादि सर्व गोष्टी विचारांत घेऊन संस्करणखर्च कमींत कमी कोठें होईल, हें उत्पादक ठरवितो व अशा स्थळाची उत्पादनस्थळ म्हणून निवड करण्याची प्रवृत्ति उत्पादकांत दिसून येते. [१०]

प्रमुख संदर्भग्रंथ

Hoover : Location of Industrial Activity.

Robinson : The Structure of Competitive Industry.

: ८ : उद्योगधंद्यांची शास्त्रशुद्ध पुनर्रचना

शास्त्रशुद्ध पुनर्रचना (Rationalisation) :—‘ रॅशन्लायझेशन ’ हा शब्द-प्रयोग मूळचा मानसशास्त्रांतील आहे. त्या शास्त्रांत बुद्धिनिष्ठ वर्तणूक किंवा बुद्धीचा उपयोग करून एखाद्या गोष्टींचा केला गेलेला खुलासा असा ह्या शब्दप्रयोगानें बोध होतो. मानसशास्त्रीय दृष्ट्या बुद्धीचा वापर असा त्या शब्दप्रयोगाचा सुटसुटीत अर्थ सांगतां येईल. मानसशास्त्रांतील ह्या शब्दप्रयोगाला पहिल्या महायुद्धानंतरच्या काळांत एक विशिष्ट तांत्रिक अर्थ प्राप्त झाला आहे. पहिल्या महायुद्धानें झालेलें नुकसान त्वरित भरून काढण्याकरितां जर्मनींत औद्योगिक उत्पादनांतील अपव्यय टाळून उत्पादनखर्च कमी करण्याची एकमेव दृष्टि ठेवून उद्योगधंद्यांची झपाट्यानें पुनर्रचना करण्यांत आली. त्या प्रक्रियेला उद्देशून ‘ रॅशनलायझेशन् ’ हा शब्द अर्थशास्त्रांत जर्मनींतील अर्थशास्त्रज्ञांनीं प्रथम प्रचारांत आणला. तेव्हांपासून उत्पादन-खर्च कमी करण्याच्या हेतूनें एखाद्या उत्पादनकेन्द्राची, उत्पादनसंस्थेची किंवा उद्योगधंद्याची पुनर्घटना अशा अर्थानें हा शब्द अर्थशास्त्रांत रूढ झाला आहे. ह्या शब्दाला अर्थशास्त्रांत मिळालेला अर्थ पाहिला तर मुळांतील अर्थ बऱ्याच प्रमाणांत कायम राहिला आहे असेंच दिसून येईल. कारण **अपव्यय दूर करून उत्पादनखर्च कमी करण्याच्या हेतूनें बुद्धीला पटणाऱ्या गोष्टींचा उद्योगधंद्यांत**

[१०] The basis of geographic differences in processing costs is the fact that units of land, labour, and capital are imperfectly mobile and imperfectly divisible. To minimise his processing costs, the individual enterpriser seeks a location conducive to high utilisation of the productive capacity of factors and scale of output appropriate to that location.

स्वीकार[१] असाच अर्थ अर्थशास्त्रांतही अभिप्रेत आहे. उत्पादनांतील दोष दूर करून उत्पादनखर्च कमी करण्यासाठीं विविध शास्त्रांतील प्रगतीचें म्हणजेच पर्यायानें बुद्धीचें--मार्गदर्शन स्वीकारणें हा अर्थ Rationsliation ह्या शब्दप्रयोगांत अभिप्रेत असल्यानें त्या प्रक्रियेला उद्देशून मराठींत उद्योगधंद्यांची शास्त्रशुद्ध (बुद्धिनिष्ठ) पुनर्रचना असें म्हणण्यास हरकत नाहीं.

शास्त्रशुद्ध पुनर्रचनेचें धोरण :--उद्योगधंद्यांची शास्त्रशुद्ध पुनर्रचना यदृच्छया होत नाहीं. ती जाणूनबुजून करावी लागते. निराळ्या शब्दांत शास्त्रशुद्ध पुनर्रचना धोरण म्हणून स्वीकारावी लागतें व धोरण म्हणूनच पार पाडावी लागते. शास्त्रशुद्ध पुनर्रचनेचा जेव्हां धोरण म्हणून स्वीकार केला जातो तेव्हां पुनर्रचनेची व्याप्ति अर्थातच उत्पादनांतील एखाद्या प्रक्रियेपुरती किंवा एखाद्या उत्पादनसंस्थेपुरती मर्यादित नसते. उत्पादनखर्च कमी करण्याची किंवा निराळ्या शब्दांत उत्पादन-साधनांची कार्यक्षमता जास्तींत जास्त वाढविण्याची दृष्टि बाळगून उत्पादनाशीं संबंधित असलेल्या सर्व गोष्टींत जेव्हां मूलभूत स्वरूपाचे बदल केले जातात तेव्हांच खऱ्या अर्थानें पुनर्रचना झाली असें म्हणतां येईल.[२]

शास्त्राधिष्ठित व्यवस्थापन व शास्त्रशुद्ध पुनर्रचना :--शास्त्रशुद्ध पुनर्रचना ह्या शब्दप्रयोगाच्या निश्चित अर्थाविषयीं कांहीं शंका राहूं नये म्हणूनच जेव्हां कोणत्याहि सुधारणा उत्पादनसंस्थांपुरत्या स्वतंत्रपणें मर्यादित असतात तेव्हां त्यांचें वर्णन रॅशन्लायझेशन असें केलें जात नाहीं, हें आग्रहानें सांगितलें पाहिजे. उत्पादनखर्च कमी करण्याच्या उद्देशानें जेव्हां एखाद्या संस्थेच्या अंतर्गत कारभारांत व उत्पादन-तंत्रांत सुधारणा केल्या जातात तेव्हां त्यांचें वर्णन शास्त्राधिष्ठित व्यवस्थापन (Scientific Management) असें केलें जातें.[३]

हें लक्षांत घेऊन शास्त्रशुद्ध व्यवस्थापन व शास्त्रशुद्ध पुनर्रचना ह्यांच्यांतील फरक असा सांगतां येईल कीं, शास्त्रशुद्ध व्यवस्थापन वैयक्तिकरीत्या स्वतंत्र उत्पादनसंस्थांपुरतें मर्यादित असतें. शास्त्रशुद्ध पुनर्रचनेच्या कक्षेंत एखादा उद्योगधंदा संपूर्णपणें यतो. शास्त्रशुद्ध पुनर्रचनेंत अर्थातच वैयक्तिक उत्पादन संस्थांची पुनर्घटना अंतर्भूत असते; पण शास्त्रशद्ध पुनर्रचनेचा विशेष संबंध एखादी उत्पादन-संस्था व संबंधित उद्योगधंदा ह्यांच्या परस्परसंबंधांशीं असतो.[४]

---

[१] The term rationalisation means putting reason into industry.

[२] As a process it is not a name for any single method but stands for the single policy of securing maximum efficiency of the economic organisation with minimum of effort.

[३] Scientific management refers to the internal reorganisation of an individual establishment.

[४] Rationalisation covers the whole industry and tries to examine the relationship of the individual firm to the industry as a whole.

शास्त्रशुद्ध पुनर्रचनेंत काय काय येतें ?–पर्याप्त उत्पादनप्रमाणाचा स्वीकार :— शास्त्रशुद्ध पुनर्रचनेचा अंतिम उद्देश उत्पादनखर्च कमी करणें हाच असतो. तो उद्देश साधण्याकरितां अनेक गोष्टी कराव्या लागतात. उत्पादनखर्च कमींत कमी व्हावयाचा असेल तर प्रत्येक उत्पादनसंस्थेकडून पर्याप्त उत्पादनप्रमाण गांठलें जाईल, ही खबरदारी प्रथम घ्यावी लागते. पर्याप्त उत्पादनप्रमाणांविषयीं ह्यापूर्वी एका प्रकरणांत जें विवेचन केले आहे त्यावरून एक गोष्ट सहज लक्षांत येण्याजोगी आहे. ती ही कीं, पर्याप्त उत्पादनप्रमाण विशिष्ट उत्पादनतंत्राशीं किंवा व्यवस्थापनतंत्राशीं तसेंच क्रयविक्रय, वाहतूक ह्या संबंधांतल्या सोयीशीं संबंधित असतें. अर्थव्यवस्था संपूर्ण स्थितिशीलच जर असेल तर––म्हणजेच उत्पादनतंत्र, व्यवस्थापनतंत्र, वाहतूकव्यवस्था ह्यामध्यें कांहींच बदल होत नसतील तर—एकादां ठरलेलें पर्याप्त उत्पादनप्रमाणहि बदलणार नाहीं, हें उघड आहे; पण वस्तुस्थिति तशी नसते. म्हणूनच शास्त्रशुद्ध पुनर्रचनेची वेळोवेळीं आवश्यकता निर्माण होते. **गतिमान अर्थव्यवस्थेंत** उत्पादनतंत्र, व्यवस्थापनतंत्र, वाहतूकव्यवस्था, क्रयविक्रयव्यवस्था, इत्यादि उत्पादनाशीं संबंधित असलेल्या गोष्टींत सतत सुधारणा होत असतात व त्यामुळें **पर्याप्त उत्पादनप्रमाण वारंवार बदलत असतें.** नव्या सुधारणा किंवा निराळ्या शब्दांत सतत होत जाणारी शास्त्रीय प्रगति पचनीं पाडून घ्यावयाची असल्यास अद्ययावत् शास्त्रीय ज्ञानाच्या अनुषंगानें ठरणारें पर्याप्त उत्पादनप्रमाण उत्पादनसंस्थांकडून स्वीकारलें जाणें आवश्यक असतें. तसें करण्यास उत्पादनसंस्थांचा कांहीं कारणामुळें विरोध असेल तर तो दूर करून त्यांना पर्याप्त उत्पादनप्रमाण स्वीकारण्यास भाग पाडणें हा शास्त्रशुद्ध पुनर्रचनेचा एक हेतु असतो.[५]

उत्पादनक्रियेंतील सूलभूत सुधारणा :––उद्योगधंद्याची पुनर्रचना करून उत्पादनखर्च कमी करावयाचा असेल तर अद्ययावत् शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग करून उत्पादनाच्या प्रक्रियेंत सूलभूत स्वरूपाच्या सुधारणा घडवून आणाव्या लागतात व त्या सुधारणा प्रत्येक उत्पादनसंस्थेकडून स्वीकारल्या जातील अशी व्यवस्था करावी लागते. अशा सुधारणांत श्रमविभागणीचें क्षेत्र वाढविणें, जुनाट यंत्रसामग्री काढून टाकून अद्ययावत् स्वरूपाची नवी यंत्रसामग्री बसविणें, मोठ्या प्रमाणावरील उत्पादन सहजसाध्य व्हावें म्हणून एकसांच्याचें उत्पादन ज्यांच्या बाबतींत शक्य असेल अशाच वस्तुप्रकारांचें उत्पादन करणें, उत्पादनक्रियांतील सुलभता वाढवून मनुष्यबळ व यंत्रसामुग्री ह्या सुधारणांचा प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल.[६]

[५] One purpose of a scheme of rationalisation may be to overcome the resistances of individual employers to the establishment of optimum units of production.

[६] Rationalisation includes installation of up-to-date machinery and simplification of products and process with a view to an intensive and scientific ultilisation of modern method of production and labour.

अकार्यक्षम उत्पादनसंस्थांचें उच्चाटन :—शास्त्रशुद्ध पुनर्रचना करण्यांत आणखी एक महत्त्वाचा हेतु असतो. अद्ययावत् शास्त्रीय ज्ञान पचनीं पाडण्याची कुवत नसलेल्या व म्हणूनच व्यवस्थापनदृष्टया अकार्यक्षम ठरणाऱ्या उत्पादनसंस्थांचें संबंधित उद्योगधंद्यांतून उच्चाटन करून उत्पादन अतिकार्यक्षम अशा उत्पादनसंस्थांत केंद्रित करणें.[७] ह्या शब्दांत तो हेतु सांगतां येईल. एखाद्या उद्योगधंद्यांत पूर्ण स्पर्धा असेल तर ठीकच; पण पूर्ण स्पर्धा हा अपवाद व अपूर्ण स्पर्धा हा नियम, हा व्यवहारांतला अनुभव आहे हें ह्यापूर्वी स्पष्ट केलेंच आहे. अपूर्ण स्पर्धा ही अनेक प्रकारच्या अपव्ययास कारणीभूत असते. अपव्ययकारक स्पर्धा (Wasteful Competition) नाहींशी करणें कोणत्याहि उद्योगधंद्याच्या दृष्टीनें हितावहच असतें. जाहिरातीसारख्या मार्गानें एकमेकांचे पाय ओढण्यांत निष्कारण होणारा खर्च वांचला तर तें चांगलेंच असतें. अकार्यक्षम उत्पादनसंस्थांचें उच्चाटन करून कार्यक्षम उत्पादनसंस्थांत उत्पादन केंद्रित करण्यानें दोन फायदे एकदम मिळूं शकतात. अकार्यक्षम उत्पादनसंस्था नष्ट झाल्यामुळें एकंदर उद्योगधंद्याची कार्यक्षमता वाढून उत्पादनखर्च कमी होऊं शकतो. आणि त्याशिवाय उत्पादनसंस्थांची संख्या कमी होऊन स्पर्धेचें प्रमाण व त्याचबरोबर स्पर्धेतून उद्‌भवणारा अपव्ययही बराच कमी होतो.

उत्पादनसंस्थांचा संयोग :—शास्त्रशुद्ध पुनर्रचनेचे फायदे भरपूर प्रमाणांत पदरांत पाडून घ्यावयाचे असतील तर अकार्यक्षम संस्थांचें उच्चाटन करून कांहीं कार्यक्षम उत्पादनसंस्थांतच उत्पादन केंद्रित करण्यावर संतुष्ट होऊन चालत नाहीं. त्याच्या पुढलीहि पायरी गांठावी लागते. ती पायरी म्हणजे जथें जेथें शक्य असेल तेथें तेथें उत्पादनसंस्थांचें एकत्रीकरण किंवा त्यांचा संयोग (Combination) घडवून आणणें. उत्पादनसंस्थांचा अंतर्गत विकास होऊन—म्हणजेच उत्पादनप्रमाण वाढवून किंवा उत्पादनतंत्र व व्यवस्थापनतंत्र ह्यांत सुधारणा करून—काटकसर करण्यास जोंपर्यंत वाव असतो तोंपर्यंत तसें करण्याकडे प्रथम लक्ष देणें अर्थातच उचित असतें. त्याकरितांच तर शास्त्रशुद्ध व्यवस्थापनाची आवश्यकता असते; पण अंतर्गत सुधारणा करून काटकसर करण्यास असलेला वाव संपुष्टांत आला म्हणजे एकत्रीकरणाचे फायदे मिळविणें हा उत्पादनखर्च कमी करण्याचा एकच मार्ग उरतो. एकत्रीकरणाचे फायदे ह्या ठिकाणीं विस्तारानें सांगण्याची गरज आहे असें नाहीं. थोडक्यांत असें सांगतां येईल कीं, एकत्रीकरणामुळें व्यवस्थापन, वाहतूक, क्रयविक्रय ह्यांच्या पायीं होणारा खर्च बराचसा कमी होतो. कारण हे सर्व व्यवहार मोठ्या प्रमाणावर केले जातात व त्यामुळें बरीच काटकसर होऊं शकते. तसेंच होणारा खर्चहि खूप मोठ्या उत्पादनावर विभागला जात असल्यामुळें दरमापी उत्पादनखर्च कमी

७ Elimination of the efficient firms and concentration of production in the most efficient establishment is one of the important motives behind rationalisation.

होतो. सारांश, एकत्रीकरणामुळें मुख्यतः वरखर्चांत (Overhead Costs) काटकसर होते. उत्पादनसंस्थांच्या एकत्रीकरणाचा पुनर्रचनेच्या दृष्टीनें सर्वांत महत्त्वाचा फायदा असा कीं, बरेंचसें उत्पादन एकाच व्यवस्थापनाखालीं आल्यामुळें आवश्यक त्या सुधारणा करणें बरेंच सोपें होतें.

उत्पादनसंस्थांचा संयोगास विरोध :—उत्पादनसंस्थांचें एकत्रीकरण पुनर्रचनेच्या दृष्टीनें कितीहि इष्ट असलें तरी उत्पादनसंस्था एकत्रीकरणास सुखासुखी प्रवृत्त होतील, असा भरंवसा देतां येत नाहीं. ह्याचें मुख्य कारण असें कीं, जेव्हां उत्पादनसंस्थेचें एकत्रीकरण होतें तेव्हां पूर्वीच्या स्वतंत्र उत्पादनसंस्थांत मानाच्या व अधिकाराच्या जागा बळकावून बसलेल्या सर्वांना उच्चपदप्राप्ति होईलच असें सांगतां येत नाहीं. गंमत अशी कीं, एकत्रीकरण करावें कीं न करावें हें ठरविण्याचा ज्यांना अधिकार असतो त्यांच्यापैकींच कित्येकांना एकत्रीकरण झाल्यानंतर अधिकारभ्रष्ट होण्याची पाळी येते. असें कांहीं होणार ह्याची त्यांना कित्येकदां कल्पनाहि असते. अशा परिस्थितींत कळून-सवरून आपल्या पायावर आपल्याच हातानें धोंडा टाकून घेण्यास कोण तयार होईल? दुसरें असें कीं, स्वातंत्र्याची आवड मनुष्यांत जात्याच असते. त्यामुळें मोठ्या संस्थेंत कोणाच्या तरी हाताखालीं काम करण्यापेक्षां छोट्या संस्थेंत उच्चपदावर विराजमान होणेंच अधिक पसंत केलें जाण्याची प्रवृत्ति सर्वसाधारणपणें आढळून येते. ह्या कारणामुळें आर्थिक दृष्ट्या हितकर असूनहि एकत्रीकरणास उत्पादनसंस्थांच्या चालकवर्गाचा विरोध होत असतो. अगदीं नाईलाज झाला तरच त्यांच्याकडून एकत्रीकरणास मान्यता दिली जाते[८].

शास्त्रशुद्ध पुनर्रचनेचे फायदे-तोटे :—शास्त्रशुद्ध पुनर्रचनेसंबंधी वर केलेल्या विवेचनानंतर शास्त्रशुद्ध पुनर्रचनेचे फायदे विस्तारानें वर्णन करून सांगितलें पाहिजेत असें नाहीं. शास्त्रशुद्ध पुनर्रचनेचा हेतु सफळ झाला तर जो मुख्य फायदा होतो तो उघडच आहे. तो असा कीं, शास्त्रशुद्ध पुनर्रचनेमुळें उत्पादनखर्चांत बरीच काटकसर होतें. उत्पादनखर्चांत होणारी काटकसर प्रथम पैशाच्या स्वरूपांत व्यक्त होत असली तरी परिणामीं ही बचत वस्तुरूप साधनसामग्रींत होते. त्यामुळें शास्त्रशुद्ध पुनर्रचनेचे फायदे समाजाला उपलब्ध होण्याचीहि शक्यता असते. शास्त्रशुद्ध पुनर्रचनेच्या तत्त्वाचा उत्तम उपयोग जर्मनीनें पहिल्या महायुद्धानंतरच्या काळांत करून घेतला. शास्त्रशुद्ध पुनर्रचनेचा स्वीकार जर्मनीनें राष्ट्रीय धोरण म्हणून केला. तेथील सरकारनें औद्योगिक पुनर्रचना करण्यास उद्योगपतींना भाग पाडलें. त्यामुळें जर्मनीच्या अर्थव्यवस्थेची उत्पादनक्षमता कमालीची वाढली. थोड्याच

[८] For a considerable interval it may happen that firms which might profitably combine, do not in fact combine because those who are at persent in control know that they will be eliminated or because they prefer ownership of a small unit to a subordinate position in a larger unit.

अवधींत जर्मनी हा देश आर्थिकदृष्टचा पुनः बलाढ्य झाला. शास्त्रशुद्ध पुनर्रचनेचे फायदे रशिया-अमेरिका ह्या देशांतहि दिसून आले आहेत.

बेकारीचा संभव :—शास्त्रशुद्ध पुनर्रचनेचे फायदे ज्या देशांत प्रकर्षानें दिसून येतात त्या देशांत मनुष्यबळाची कमतरता असते, हें विसरून चालणार नाहीं. मनुष्यबळाची जेथें विपुलता आहे त्या भारतासारख्या देशांत शास्त्रशुद्ध पुनर्रचनेंत एक मोठाच धोका संभवतो. तो धोका म्हणजे बेकारीची वाढ. **उद्योगधंद्याच्या शास्त्रशुद्ध पुनर्रचनेमुळें उत्पादनासाठीं लागणाऱ्या मनुष्यबळाचें प्रमाण साहजिकच कमी होतें आणि त्यामुळें कांहीं कामगारांवर बेकार होण्याचा प्रसंग येतो.** प्रगत अर्थव्यवस्थेंत देखील तात्कालिक स्वरूपाची कां होईना; पण थोडीबहुत बेकारी शास्त्रशुद्ध पुनर्रचनेंत उद्‌भवतेच. अर्थव्यवस्था विकासक्षम असेल तर ही बेकारी कालान्तरानें नाहींशी होते. पण तशी ती नसेल तर एखाद्या उद्योगधंद्यांतील शास्त्रशुद्ध पुनर्रचनमुळें निर्माण झालेली बेकारी कायमची ठरण्याची भीति असते. बेकारीच्या भीतीमुळेंच शास्त्रशुद्ध पुनर्रचनेला सर्व देशांत कामगारांकडून विरोध होतो. अप्रगत देशांत तर तो विरोध फारच प्रखर असतो. आपल्या देशांत कापडधंद्याच्या पुनर्रचनेच्या प्रश्नावर जें रण माजलें आहे तें सर्वपरिचितच आहे. आपल्या देशांतील कापडाच्या धंद्याला परदेशांतील कापडधंद्याबरोबर होणाऱ्या स्पर्धेत टिकाव धरावयाचा असेल तर त्या धंद्याची शास्त्रशुद्ध पुनर्रचना होणें अत्यावश्यक आहे ह्यांत शंका नाहीं; पण तरीहि बेकारीच्या संभवामुळें त्या पुनर्रचनेला बराच विरोध होत आहे, हें लक्षांत घेण्याजोगें आहे.[१]

शास्त्रशुद्ध पुनर्रचनेंतील आणखी कांहीं धोके :—शास्त्रशुद्ध पुनर्रचनेचें तत्त्व स्वीकारल्यास कोणत्याहि उद्योगधंद्यांत स्पर्धेचें प्रमाण अपरिहार्यपणें कमी करावें लागलें, हें वर सांगितलेंच आहे. हें कितपत इष्ट, हाहि वादग्रस्त प्रश्न आहे. औद्योगिक पुनर्रचनेमुळें उत्पादनखर्च कितीहि कमी झाला तरी त्यापासून होणारे फायदे, उद्योगधंद्यांतील मक्तेदारीचें प्रमाण वाढल्यास, कामगारवर्गाला किंवा ग्राहकवर्गाला उपलब्ध करून दिले जातील, असा संभव कमी असतो. उत्पादनखर्च कमी होऊनहि ग्राहकांना आकारली जाणारी किंमत कमी केली जाणार नाहीं, कामगारवर्गाची उत्पादनक्षमता वाढवूनहि त्यांची मजुरी वाढवून दिली जाणार नाहीं. अशासारख्या धोक्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. तसें झाल्यास औद्योगिक पुनर्रचनेचे फायदे विशिष्ट वर्गाच्याच पदरांत पडतात. असें होण्याचा संभव असतो; कारण **शास्त्रशुद्ध पुनर्रचनेमुळें कोणत्याहि उद्योगधंद्यांत आर्थिक सत्तेचें फार मोठ्या प्रमाणावर केन्द्रीकरण होण्याचा धोका** असतो. आर्थिक सत्तेचें केन्द्रीकरण होऊन

[१] Unemployment is the immediate consequence of any scheme of rationalisation. It is not surprising therefore, to find that labour, in general, is opposed to rationalisation.

कोणत्याहि उद्योगधंद्यांत मक्तेदारी निर्माण होणें हिताचेंच असतें, असा निर्वाळा देतां येत नाहीं. मक्तेदारीमुळें व्यक्तिसाहसाचे क्षेत्र एक प्रकारें संकुचित होतें. कारण ज्या उद्योगधंद्यांत मक्तेदारीचें वर्चस्व असतें त्या क्षेत्रांत इतरांना प्रवेश दुर्लभच होतो. मक्तेदारीच्या दोषांची विस्तारानें चर्चा पुढल्या प्रकरणांत येणार असल्यानें येथें करण्याचें प्रयोजन नाहीं. येथें सांगावयाचा मुद्दा एवढाच कीं, शास्त्रशुद्ध पुनर्रचनेची परिणति उद्योगधंद्यांत मक्तेदारी किंवा मक्तेदारीसदृश्य व्यवस्था प्रस्थापित झाल्यास शास्त्रशुद्ध पुनर्रचनेचे फायदे विशिष्ट वर्गालाच. मिळून आर्थिक विषमता वाढण्याचा संभव असतो.[१०]

नियोजनाधिष्ठित व नियंत्रित शास्त्रशुद्ध पुनर्रचनेची आवश्यकता :—शास्त्रशुद्ध पुनर्रचनेचे वर उल्लेखिलेले दुष्परिणाम टाळून तिचे फायदे व्यापक स्वरूपांत मिळवावयाचे असतील तर उद्योगधंद्याची शास्त्रशुद्ध पुनर्रचना आर्थिक नियोजनाचा एक भाग म्हणूनच झाली पाहिजे. शास्त्रशुद्ध पुनर्रचनेच्या दुष्परिणामाकडे डोळझांक करणें कोणत्याहि देशांतील सरकारला ह्यापुढें परवडणार नाहीं. त्याचबरोबर आर्थिक व्यवस्था प्रगतिविमुख होऊं द्यावयाची नसेल तर शास्त्रशुद्ध पुनर्रचना टाळूनहि चालावयाचें नाहीं. अशा परिस्थितींत नियोजनाचा एक भाग म्हणून शास्त्रशुद्ध पुनर्रचनेचा स्वीकार करणें एवढाच मार्ग शिल्लक राहतो. मात्र तें नियोजन डोळस व खऱ्या अर्थानें समाजवादी हवें.

प्रमुख संदर्भग्रंथ

(1) Robinson—The Structure of Competitive Industry.

: ९ :

मक्तेदारी

पूर्ण मक्तेदारीच्या अटी :—आजच्या जगांत पूर्ण स्पर्धा ज्याप्रमाणें अभावानेंच उठून दिसते त्याचप्रमाणें पूर्ण मक्तेदारीहि अभावानें दिसून येते. पूर्ण मक्तेदारीच्या तीन अटी आहेत. त्या अशा—(१) शंभर टक्के पुरवठा एका उत्पादकाच्या हातांत असणें. (२) नसर्गिक किंवा मानवी कारणांमुळें संबंधित वस्तूच्या उत्पादनक्षेत्रांत प्रवेश करण्यास कायमची बंदी असणें. (३) संबंधित वस्तूच्या बदली वापरतां येणारी दुसरी एखादी वस्तु अगर त्या वस्तूचा दुसरा एखादा प्रकार नसणें.[१] ह्या तिन्ही

[१०] Rationalisation may lead to establishment of a monopolistic as different from competitive structure in an industry. Rationalisation may thereby give rise to all evils associated with monopolies. In that case, rationalisation will turn out to be a cure worse than the disease.

[१] Single firm monopoly occurs when one seller sells a product for which there is no close substitute.

अटी पुऱ्या करणारें मक्तेदारीचें एखादें उदाहरण आढळलेंच तर ती एक आश्चर्याची गोष्ट होईल. पूर्ण स्पर्धा (१) अगणित उत्पादक (२) उत्पादनक्षेत्रांत मुक्त प्रवेश व (३) उत्पादित वस्तूच्या सर्व परिमाणांचा तंतोतंत सारखेपणा (त्यामुळें एकानें उत्पादिलेल्या वस्तूऐवजीं दुसऱ्यानें उत्पादिलेली वस्तु कोणताहि फरक जाणविल्याशिवाय वापरतां येते) ह्या तीन लक्षणांनीं युक्त असल्यानें वरील तिन्ही अटी पुऱ्या करणारी मक्तेदारी प्रत्यक्षांत फारशी न आढळली तरी तात्त्विक विचारांत एक दुसरें टोंक ह्या दृष्टीनें ती महत्त्वाची ठरते.

व्यवहारांत मक्तेदारीचा प्रभाव अधिक :—पूर्ण मक्तेदारी व्यवहारांत आढळून येत नसली तरी प्रत्यक्ष बाजारपेठेंत मक्तेदारीचा अंश बराच असतो हें नाकारतां यावयाचें नाहीं. पूर्ण स्पर्धेचा अभाव बाजारांत ज्या प्रमाणांत जाणवतो त्याच प्रमाणांत बाजारांत मक्तेदारीचा अंश असतो, असें स्थूलपणें म्हणतां येईल. प्रत्यक्ष बाजारांत स्पर्धेच्या लक्षणांशीं तुलना करतां मक्तेदारीचीं लक्षणें अधिकांशानें जाणवलीं तरी बाजारपेठेवर मक्तेदारीचेच परिणाम विशेष प्रमाणांत दिसून येतात. आजकालच्या जगांत प्रत्यक्ष व्यवहारांत मक्तेदारीचा प्रभावच अधिक पडत आहे हें कोणत्याहि देशांतल्या उद्योग व्यवस्थेचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास दिसून येईल. तेव्हां मक्तेदारीचे परिणाम जाणून घ्यावयाचे असल्यास अधिकांशानें बाजारांत मक्तेदारी असण्याचीं गमकें किंवा चिन्हें कोणतीं तें निश्चित ठरविलें पाहिजे.[२]

एक-दोन उत्पादकांचें पुढारीपण :—पूर्ण मक्तेदारीच्या वर दिलेल्या अटींच्या आधारें बाजारांत अधिकांशानें मक्तेदारी केव्हां असते हें ठरवितां येईल. तसें पाहिलें तर प्रत्येक उत्पादक आपापल्या उत्पादनापुरता मक्तेदारच असतो. पण मक्तेदारीचें मुख्य चिन्ह किंमतीवरील उत्पादकाचा ताबा हें आहे. पूर्ण स्पर्धेत किंमतीवर उत्पादकाचा यत्किंचितहि ताबा नसतो आणि त्यामुळेंच प्रत्येक उत्पादकाच्या मालाला जी मागणी असते तिची लवचिकता अमाप असते. जेव्हां एखाद्या विक्रेत्याला एकनिष्ठपणें चिकटून राहणारा एखादा ग्राहकांचा गट निर्माण होतो तेव्हां मागणीमध्यें अलवचिकता निर्माण होऊन कांहीं प्रमाणांत तरी त्या उत्पादकाला किंमतीवर आपला ताबा प्रस्थापित करतां येतो. थोडक्यांत पुरवठ्याच्या बाजूला मक्तेदारीचा अंश दिसूं लागतो. बाजारांत मक्तेदारीचा अंश मोठा व स्पर्धेचा अंश लहान अशी परिस्थिति निर्माण होण्यासाठीं वस्तूचा पुरवठा सर्वस्वीं एका उत्पादकाकडून होत नसला तरीहि वस्तूची किंमत बरीचशी एका वैयक्तिक उत्पादकाच्या अगर उत्पादनसंस्थेच्या आधीन आहे असें दृश्य दिसून आलें पाहिजे. खाजगी साहसावर अधिष्ठित झालेल्या आजच्या औद्योगिक संघटनांकडे पाहिलें तर असें दिसून येते कीं, बऱ्याच वस्तूंच्या बाजारपेठेंत पुरवठ्याच्या बाजूस एखादी मोठी उत्पादनसंस्था असते आणि किंमत

[२] We see on every side a drift towards monopolisation under the names of restriction schemes, quota systems, rationalisation, and the growth of joint companies.

अशा अर्थानें तिच्या आधीन असते कीं, किंमतीच्या बाबतींतील तिचें पुढारीपण इतर उद्योगसंस्था मान्य करीत असतात. म्हणजे तिची किंमत पाहूनच व त्या किंमतीच्या अनुरोधानेंच इतर उद्योगसंस्था आपल्या मालाची किंमत निश्चित करतात. एखाद्या उद्योगसंस्थला किंमतीच्या बाबतींत पुढारीपण प्राप्त होणें (Emergence of Price Leadership) ही बाजारांत मक्तेदारीचा अधिकांश असल्याची पहिली निश्चित खूण समजतां येईल. असें पुढारीपण लाभण्यास एकंदर पुरवठ्यांतील एकाच उत्पादकाचा भाग किती मोठा असला पाहिजे ह्यासंबंधीं निश्चितपणें कांहीं सांगतां येत नाहीं. तें उत्पादकांच्या एकंदर संख्येवर अवलंबून राहतें. एकंदर पुरवठ्याच्या फक्त १० ते १५ टक्के भागाबद्दलच जबाबदारी असूनहि एखाद्या उत्पादनसंस्थेला पुढारीपण प्राप्त झाल्याचीं उदाहरणें आहेत. पण सामान्यपणें असें दिसून येतें कीं, पुढारी उद्योगसंस्थेकडून होत असलेला पुरवठा बहुधा बराच मोठा, एकतृतीयांशापेक्षां अधिक असतो.

मर्यादित प्रवेश : कायद्यानें निर्माण केलेल्या अडचणी :—मक्तेदारी अधिकांशानें बाजारांत असण्याची दुसरी खूण अशी कीं, संबंधित वस्तूच्या उत्पादन क्षेत्रांत प्रवेश मिळणें अशक्य नसलें तरी बरेंच कठिण असतें. कारण प्रवेश मिळविण्याच्या मार्गांत अनेक अडचणी असतात. कधीं ह्या अडचणी उत्पादनपद्धतींतच अंतर्भूत असतात, मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचें फायदे मिळविण्यासाठीं एकच उत्पादनसंस्था असणें इष्ट अशी परिस्थिति कांहीं उद्योगधंद्यांत असते. कारण पर्याप्त उत्पादनप्रमाण बाजाराएवढें अगर त्यापेक्षां मोठें असतें. अशा परिस्थितींतून उद्भवणाऱ्या मक्तेदारीला नैसर्गिक मक्तेदारी (Natural Monopoly) म्हणतात. कधीं कधीं ह्या अडचणी कायद्यानें निर्माण केलेल्या असतात.[3] उदाहरणार्थ, वस्तुप्रकाराच्या बाबतींत किंवा उत्पादनपद्धतींत सुधारणा करणाऱ्याला त्या सुधारणेचें 'पेटंट' (Patent) किंवा स्वामित्व कायद्यानें बहाल करण्यांत येतें आणि त्या पेटंटरूपी कवचाचें संरक्षण असेपावेतों इतरांना ती सुधारणा उजळ माथ्यानें तरी करतां येत नाहीं. त्यामुळें एखादी सुधारणा जो प्रथम करतो त्याला कांहीं काळपर्यंत

[3] There must in effect be some barrier to entry in the way of potential rivals, for if there were not there would ordinarily be rivals, and a single firm monopoly would not remain in the long-run. Economies of large scale production may be such that a single firm can supply the entire market at a low cost. The situation where economies of large scale make one firm production the most economical is often called natural monopoly. The barrier to entry which permits establishment and continuance of monopoly may just as will be institutional or legal in character. The principle sorts of legal barrier to entry are patents and trade marks.

तरी त्या सुधारणेचा निर्वेधपणें फायदा घेतां येतो. प्रयोगशीलता व उपक्रमशीलता असा पेटंटच्या कायद्यामागें स्तुत्य हेतु असतो. पण त्यामुळें कांहीं प्रमाणांत तरी मक्तेदारी निर्माण होते हें नाकारतां यावयाचें नाहीं. 'कॉपीराइट' च्या कायद्याचे उद्देश व परिणाम पेटंटच्या कायद्याप्रमाणेंच होतात. 'रजिस्टर ट्रेडमार्क' लाभणें हें मक्तेदारी प्राप्त झाल्यासारखेंच असतें. कांहीं वेळां सोयीसाठीं सरकार एखाद्या उत्पादनक्षेत्रांत प्रवेश कायद्यानेंच मर्यादित ठेवते. उदाहरणार्थ, एखाद्या शहरांत वीजपुरवठा करण्याची जबाबदारी एकाच उत्पादनसंस्थेला घेतां येते किंवा एखाद्या मार्गावर वाहतूक करण्याचे परवाने एक-दोन संस्थांनाच दिले जातात. अलीकडे सार्वजनिक महत्त्वाच्या उद्योगधंद्यांत शासनसंस्था स्वतःच मक्तेदार बनूं पाहात आहे. उत्पन्नाच्या हेतूनेंहि सरकार आपल्याकडे मक्तेदारी घेऊं शकतें. हेतु कांहींहि असो, कायद्यानें उत्पादनक्षेत्रांत प्रवेश मर्यादित करण्याची प्रवृत्ति अलीकडे वाढत आहे ह्यांत शंका नाहीं. कायद्यामुळें निर्माण झालेल्या मक्तेदारीला विधिसिद्ध मक्तेदारी (Legal Monopoly) असें म्हणतात.

आर्थिक स्वरूपाच्या अडचणी :—कधींकधीं उत्पादनक्षेत्रांत प्रवेश मर्यादित असण्याचीं कारणें सरकारनिर्मित नसून आर्थिक असतात. वस्तूच्या उत्पादनासाठीं लागणारा एखादा कच्चा माल, मनुष्यबळ, व्यवस्थापन, भांडवल इत्यादींपैकीं एक अगर अधिक उत्पादनघटक संपूर्णतया अगर बहुतांशानें एखाद्या उत्पादकाच्या आधीन असतील—मग तसें असण्याचें कारण कांहींहि असो—तर त्या उत्पादकाला संबंधित वस्तूच्या उत्पादनक्षेत्रावर आपलें वर्चस्व प्रस्थापित करतां येतें व बाहेरच्यांना त्या क्षेत्रांत प्रवेश करणें कठिण होऊन बसतें. पैकीं कच्च्या मालाचा सर्व किंवा बहुतांश पुरवठा हस्तगत करून उत्पादनक्षेत्रावर प्रभुत्व प्रस्थापित करण्याचा प्रकार बराच आढळतो. उत्पादनक्षेत्रांत अधिकांशानें मक्तेदारी प्रस्थापित करणारें आर्थिक स्वरूपाचें आणखी एक महत्त्वाचें कारण म्हणजे मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचें श्रेष्ठत्व हें होय. मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे फायदे सिद्ध झाल्यानंतर उत्पादनक्षेत्रांतील स्पर्धेत जे मोठे होतात तेच टिकून राहूं शकतात. पर्याप्त उत्पादनप्रमाण एकंदर मागणीच्या मानानें फार मोठें असल्यास बाजारांत पूर्ण स्पर्धेचा निभाव लागत नाहीं. कारण बाजारांत थोड्या मोठ्या उद्योगसंस्थांशिवाय इतरांना स्थान न राहणें एक प्रकारें अपरिहार्य होऊन बसतें आणि विशेष सांगावयाची गोष्ट अशी कीं, किफायतशीर उत्पादन करावयाचें तर तें मोठ्या प्रमाणावरच केलें पाहिजे, अशी कोणत्याहि वस्तूच्या उत्पादनांत एकदां सर्वसामान्य स्थिति होऊन बसली म्हणजे नव्यानें उत्पादन सुरू करणें फारच कठिण होतें. त्यामुळें अर्थातच त्या वस्तूच्या उत्पादनक्षेत्रांत प्रवेश मर्यादित होतो. एखाद्या वेळीं जवळजवळ बंदच होतो. उत्पादनक्षेत्रांत मक्तेदारी सदृश स्थिति निर्माण करणारें—ज्याला आर्थिक म्हणतां येईल असें—आणखी एक कारण असूं शकतें आणि तें म्हणजे एखाद्या उद्योगसंस्थेनें कमावलेलें नांव किंवा तिची प्रस्थापित ख्याति (Goodwill). एखाद्या

उद्योगसंस्थेनें उत्पादित केलेल्या वस्तु गुणानें चांगल्या असतात, अशी प्रसिद्धि एकदां झाली कीं मग त्या संस्थेला बाजारांत महत्त्वाचें स्थान मिळावयास वेळ लागत नाहीं. त्या संस्थेचाच माल घ्यावयाचा, अशी वृत्ति ग्राहकवर्गाच्या मोठ्या भागांत एकदां निर्माण झाली कीं, ती स्थिति मक्तेदारीपासून फारशी वेगळी असत नाहीं. आजच्या जगांत बाजारपेठेंत यशस्वी झालेल्या ज्या उत्पादनसंस्था आहेत त्यांच्या यशांत 'गुडवील'चा भाग मोठा असतो, हें जाणकारांच्या सहज लक्षांत येईल. 'गुडवील'मध्यें एक प्रकारची जादूच असते असें म्हणावयास हरकत नाहीं. कारण कित्येकदां असें आढळून येतें कीं, ज्या गुणांबद्दल एखाद्या संस्थेची विशेष ख्याति होते ते गुण लुप्त झाल्यानंतरहि ती ख्याति बराच काळपर्यंत टिकून राहते आणि उत्पादनसंस्थेला तिचा फायदा मिळत राहतो. कित्येक वेळां नसलेल्या गुणांबद्दलहि एखाद्या उत्पादन-संस्थेची ख्याति होऊन राहते. 'गुडवील' च्या प्रभावाची जाणीव उत्पादकांना चांगलीच असते. म्हणून तर आजच्या अर्थव्यवस्थेंत जाहिरातींना विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. आर्थिक अडचणीमुळें निर्माण होणाऱ्या मक्तेदारीला आर्थिक मक्तेदारी (Economic Monopoly) असें म्हणतां येईल. नैसर्गिक मक्तेदारी व आर्थिक मक्तेदारी ह्यांतील फरक असा सांगतां येईल कीं, नैसर्गिक मक्तेदारींत इतरांना प्रवेश कठिण नसतो तर जवळजवळ अशक्य असतो. तशी स्थिति आर्थिक कारणा-मुळें प्रवेश कठिण मात्र झालेला असतो.

मक्तेदारीचा अधिकांश होण्याची प्रवृत्ति :—आजच्या भांडवलशाही अर्थ-व्यवस्थेंतील औद्योगिक संघटनांचें बारकाईनें निरीक्षण केलें तर मक्तेदारीला त्यांत अधिक प्राधान्य आहे—एवढेंच नव्हे तर मक्तेदारीचा अंश वाढत जाण्याची प्रवृत्ति दिसून येत आहे—असेंच आढळून येईल. तसें होण्याचें मुख्य कारण हेंच कीं, उत्पादकांना मक्तेदारीच स्पर्धेपेक्षां अधिक प्रिय असते. उत्पादकांच्या मनोभूमिके-विषयीं एवढें निश्चितपणें सांगतां येईल कीं, आपला नफा जास्तींत जास्त वाढ-विण्याच्या हेतूनें त्यांचे सतत प्रयत्न चालू असतात. त्या प्रयत्नांचे दोन भाग पडतात. प्राप्त परिस्थिति गृहीत धरून तींत शक्य तेवढा नफा मिळविणें हा त्या प्रयत्नांचा पहिला भाग आणि परिस्थितींत बदल घडवून आणून नफा वाढविण्याचा प्रयत्न करणें हा त्यांचा दुसरा भाग. ह्यामुळेंच पूर्ण स्पर्धेची परिस्थिति यदाकदाचित् निर्माण झाली तरी फार काळ ती टिकूं शकत नाहीं. कारण पूर्ण स्पर्धेपेक्षां अपूर्ण स्पर्धेंत आणि अपूर्ण स्पर्धेपेक्षां मक्तेदारींत नफ्याचें प्रमाण अधिक असूं शकतें. ह्याचें ज्ञान उत्पादकांना जात्याच असतें आणि म्हणून किंमत पाहून आपले निर्णय घेण्याची पाळी न येतां शक्य त्या प्रमाणांत किंमतच आपल्या आधीन व्हावी, ह्यासाठीं प्रत्येक उत्पादक झटत असतो. ह्यांतूनच 'गुडवील'साठीं चाललेले प्रयत्न जन्मास येतात. आणि त्या प्रयत्नांना जसें यश लाभतें तशी बाजारांतील स्पर्धा अधिकाधिक अपूर्ण होत जाते. अपूर्ण स्पर्धेला उत्तेजन मिळण्याचें मुख्य कारण

असें कीं, आजची उत्पादनपद्धति अपूर्ण स्पर्धेलाच अनुकूल आहे. मोठ्या प्रमाणावरील उत्पादनच किफायतशीर ठरत असल्यामुळें अगणित उत्पादकांना बाजारांत स्थान मिळूं शकत नाहीं. त्यामुळें उत्पादकांची संख्या मोजकीच असावी लागते. शिवाय आजची उत्पादनपद्धति गतिमान असल्यानें तींत सारखे बदल होतात आणि त्यामुळें उत्पादनाचें किफायतशीर प्रमाण बहुधा वाढतें. अशा गतिमान अर्थव्यवस्थेंत प्रत्येक नव्या शोधामुळें जुन्यांतील कांहीं उत्पादक गळून पडण्याचा संभव निर्माण होतो. गतिमान अर्थव्यवस्थेंतील बदलांना तोंड देण्यास 'गुडवील'चें कवच चांगलें उपयोगी पडतें. मोठ्या प्रमाणावरील उत्पादन किफायतशीर ठरविणारी व सतत अस्थिर असणारी आजची उत्पादनपद्धति पूर्ण स्पर्धा प्रस्थापित करून ती स्थिर करण्यास मदत करण्याऐवजीं अपूर्ण स्पर्धेला अधिक साहाय्य करते.

अपूर्ण स्पर्धाहि अस्थिरच :—वस्तूची किंमत बाजारांतील प्रवाहांकडून ठरली जाण्याऐवजीं आपल्या ताब्यांत यावी, ह्या हेतूनें वैयक्तिक उत्पादक जे प्रयत्न करतात त्यांतून अपूर्ण स्पर्धेचा उद्भव होतो असें वर दाखविलें आहे; पण अपूर्ण स्पर्धेनेंहि उत्पादकांचें संपूर्ण समाधान होतें असें नाहीं. अपूर्ण स्पर्धेत स्पर्धेचा भाग उपेक्षणीय नसला तर उत्पादकांना ती स्थितीहि फारशी हवीशी वाटत नाहीं. स्पर्धेचा भाग उपेक्षणीय नसल्यास कोणत्याहि उत्पादकाला किंमतीच्या बाबतींत भरपूर स्वातंत्र्य लाभत नाहीं. आपल्या मालाची मागणी कमी होईल, इतरांकडून ती हस्तगत केली जाईल, अशी भीति त्याला बाळगावीच लागते. शिवाय नवीन उत्पादकांचा प्रवेश होऊन संबंधित वस्तूच्या उत्पादन-क्षेत्रांतील आपलें महत्त्व कमी होईल, अशी भीतिहि त्याला असते. तेव्हां किंमती-संबंधीं इतर उत्पादकांचें धोरण पाहूनच त्याला आपलें धोरण निश्चित करावें लागतें. त्यामुळें संपूर्ण मक्तेदारी असती तर जेवढा नफा झाला असतां तेवढा होत नाहीं. साहजिकच नफ्याचा हव्यास हीच जेव्हां उत्पादकांची प्रेरणा असते तेव्हां जमल्यास पूर्ण मक्तेदारी, नाहींतर निदान अपूर्ण मक्तेदारी (अपूर्ण स्पर्धा व अपूर्ण मक्तेदारी ह्यांतील फरक असा सांगता येईल कीं, अपूर्ण स्पर्धेत स्पर्धेचा अंश अधिक असतो आणि अपूर्ण मक्तेदारींत मक्तेदारीचा अंश अधिक असतो. म्हणजे उत्पादकांची संख्या एकापेक्षां अधिक असली तरी त्यांच्यांतील स्पर्धा नाममात्र असते. कारण एखादा उत्पादक इतरांच्या मानानें फार मोठा असतो व बहुतांश पुरवठा त्याच्याकडून होत असतो) प्रस्थापित व्हावी ह्या दिशेनें उत्पादकाचीं पावलें व्यक्तिशः व वर्गशः पडत असतात. ह्याचाच अर्थ असा कीं, अपूर्ण स्पर्धेचीच परिणति मक्तेदारींत होण्याची फार मोठी शक्यता असते.[४] भांडवलशाहींतील

[४] There are certain circumstances effecting entry which may come into being and may favour control of an industry by a few firms. Out of this situation a single fim monopoly may emerge eventually.

नफ्याच्या प्रेरणेची परिणति शेवटीं मक्तेदारींत होत असल्यानें असें बिनदिक्कत म्हणावयास हरकत नाहीं कीं, भांडवलशाही अर्थव्यवस्थेंत मक्तेदारीची वाढ होण्याची प्रवृत्ति जात्याच असते. प्रगत भांडवलशाही देशांतील उद्योगव्यवस्था मक्तेदारीमय झाली आहे व होत आहे. हा केवळ योगायोग नव्हे. भांडवलशाहीचा तो निसर्गक्रमानुसार झालेला विकास आहे.

अल्पकालीन व कायमची मक्तेदारी :—पूर्ण स्पर्धेची किंवा अपूर्ण स्पर्धेची परिस्थिति अशाश्वत असते आणि पूर्ण किंवा अपूर्ण मक्तेदारीची परिस्थिति शाश्वत असते, असें समजण्याचें मुळींच कारण नाहीं. ह्या गतिमान जगांत शाश्वत असें कांहींच नाहीं, ह्या नियमाप्रमाणें मक्तेदारीहि शाश्वत असूं शकत नाहीं. मक्तेदारीचा उद्भव कोणत्याहि कारणामुळें झालेला असो, तात्पुरती मक्तेदारी व कायमची मक्तेदारी असा फरक केला तर कोणतीहि मक्तेदारी बहुधा कायमची—चिरकालीन—नसते. ती केव्हांतरी संपुष्टांत येऊन अल्पकालीन ठरण्याचाच धोका असतो. कायद्यानें—म्हणजे पेटंट, ट्रेडमार्क इत्यादि मार्गांनीं—निर्माण होणारी मक्तेदारी कायमची नसते. कारण कायदा बदलूं शकतो आणि तसेंच पेटंटचें—ट्रेडमार्क—संरक्षण ठराविक काळपर्यंत बहुधा दिलें जातें. शिवाय पेटंटचा कायदा जुमानला न गेल्याचीं किंवा त्यांतील ढिसूळपणाचा फायदा घेतल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. त्यामुळें कायद्यानें निर्माण केलेल्या मक्तेदारींतहि संभाव्य स्पर्धेचीच जाणीव मक्तेदाराला नेहमींच ठेवावी लागते. एखादा उत्पादनघटक एकानेंच हस्तगत केल्यामुळें जी मक्तेदारी निर्माण होते ती जोंपर्यंत तो घटक उत्पादकाच्या हातांतून सुटत नाहीं तोंपर्यंतच टिकूं शकते. हस्तगत झालेला घटक आपल्या हातांत टिकून धरण्याची मक्तेदाराची शक्ति अमर्यादित खासच नसते. त्यामुळें तशा परिस्थितींतहि संभाव्य स्पर्धा मक्तेदाराला विचारांत घ्यावीच लागते. प्रचंड प्रमाणावरील उत्पादन जेव्हां किफायतशीर होऊं लागते तेव्हां बाहेरच्यांना संबंधित वस्तूच्या उत्पादनक्षेत्रांत प्रवेश मिळविणें कठिण होतें, ही गोष्ट खरी; पण ती गोष्ट संपूर्णपणें असंभवनीय असते, असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. 'गुडवील'मुळें निर्माण होणाऱ्या मक्तेदारीचें तसेंच आहे. 'गुडवील'ची महती दांडगी खरी; पण ग्राहकांचा विश्वास ही मोठी नाजुक चीज आहे. कोणत्या कारणानें आणि केव्हां त्याला धक्का बसेल हें सांगतां येत नाहीं. आणि ग्राहकांच्या विश्वासाला एकदां धक्का बसला म्हणजे तो पुनः संपादन करणें फारच कठिण असतें. सारांश, मक्तेदारीचा उठाव कोणत्याहि कारणामुळें झालेला असो; आपलीं मक्तेदारी चिरकालीन आहे, असें समजून मक्तेदारानें वागणें शहाणपणाचें ठरत नाहीं. संभाव्य स्पर्धेची दखल त्याला नेहमींच घ्यावी लागते.

मक्तेदारी कायम टिकणारी नसेल तर मग असा प्रश्न उपस्थित होतो कीं, उत्पादकांनीं मक्तेदारीकडे जाण्याचा खटाटोप कां करावा? ह्या प्रश्नाचें उत्तर असें कीं, मक्तेदारी चिरकालीन नसली तरी पूर्ण अथवा अपूर्ण स्पर्धेच्या मानानें दीर्घकाल

टिकणारीं असते. मक्तेदारी दीर्घकालीन असूं शकते. कारण एकतर बहुधा प्रत्येक मक्तेदारी वरीलपैकीं एकाच कारणांतून उद्भवलेलीं नसून दोन-तीन कारणें एकत्र येऊन उद्भवलेली असते. उत्पादनाचें प्रचंड प्रमाण, उत्पादकाची ख्याति, कायद्याचा आधार, उत्पादनघटकांवरील आधिपत्य ह्या चारांपैकीं दोन-तीन किंवा प्रसंगीं चारहि कारणांचा मिलाफ होऊन उद्भवलेल्या मक्तेदारीचा भंग करणें अतिशय कठिण जातें. शिवाय मक्तेदारी एकदां प्रस्थापित होऊन त्यायोगें प्राप्त होणारी सत्ता मक्तेदार संस्थेच्या हातीं केन्द्रित झाली कीं, तिचें जीवित लांबविण्यासाठीं त्या सत्तेचा उपयोग मक्तेदाराला करतां येणें सहज साध्य असतें. आजच्या औद्योगिक संघटनांत मक्तेदारी निर्माण करण्याचे प्रयत्न ज्याप्रमाणें चालत असतात त्याचप्रमाणें निर्माण झालेली मक्तेदारी टिकविण्याचे प्रयत्न चालू असल्याचेंहि दिसून येतें. सारांश, मक्तेदारीला प्राधान्य मिळण्याची प्रवृत्ति आजच्या भांडवलशाहींत विशेषत्वानें दिसून येते. अमेरिकेसारख्या भांडवलशाही देशांतील उद्योगव्यवस्थेचें वरवर निरीक्षण केलें तरी ही गोष्ट तत्काळ लक्षांत येईल.[५]

मक्तेदारीची निर्मिति :—सुरुवातीपासूनच एका उत्पादकाचें अस्तित्व हा मक्तेदारीचा प्रकार दुर्मिळच. बहुधा प्रथम बरेच उत्पादक असतात व नंतर मक्तेदारीची आवश्यकता त्यांना पटल्यानें त्यांचा संयोग (Combination) होऊन मक्तेदारी अस्तित्वांत येते. उत्पादकांचा संयोग होण्याच्या ज्या दोन तऱ्हा विशेष आढळून येतात त्यांना अनुक्रमें ऊर्ध्वसंयोग (Vertical Combination) आणि समसंयोग (Horizontal Combination) असें म्हणतां येईल. प्रत्येक वस्तूच्या उत्पादनांत कच्च्या मालाच्या निर्मितीपासून तों पक्क्या मालाच्या निर्मितीपर्यंत अनेक अवस्था असतात. त्यांतील कच्च्या मालाचें उत्पादन ही सर्वांत खालची अवस्था मानली आणि ज्या स्वरूपांत वस्तु उपभोगपात्र होऊन बाहेर पडते तें स्वरूप ही सर्वांत वरची अवस्था मानली तर उत्पादनाची प्रक्रिया खालून वर जाणारी असते असें म्हणावयास हरकत नाहीं. उत्पादनांतील प्रत्येक पुढली अवस्था ही अधिक वरची अवस्था असते. उत्पादनासंबंधींची ही माहिती लक्षांत ठेवल्यास ऊर्ध्वसंयोग व समसंयोग ह्या शब्दप्रयोगांचा अर्थ समजण्यास अडचण पडणार नाहीं. **जेव्हां खालच्या व वरच्या अवस्थेशीं संबंधित असलेल्या उत्पादकांचा संयोग होतो तेव्हां तो ऊर्ध्वसंयोग असतो आणि एकाच अवस्थेशीं संबंधित असलेल्या उत्पादकांचा संयोग होतो तेव्हां तो समसंयोग असतो.** ह्या शब्दप्रयोगाचा अर्थ उदाहरणानें अधिक स्पष्ट होईल. कापडाच्या दोन अगर अधिक गिरण्यांचे मालक किंवा साखरेच्या दोन अगर अधिक गिरण्यांचें मालक संयोग करून एकच उद्योग-संस्था स्थापतात तेव्हां तो समसंयोग होय. जेव्हां साखरेचें

[५] The huge corporation has come to be a common place in American economic life. There are a few major industries which cannot boast of at least one big corporation.

कारखाने व उंसाची शेती किंवा कापडाच्या गिरण्या आणि कापसाची शेती ह्यांचा संयोग होतो तेव्हां तो ऊर्ध्वसंयोग होय. ऊर्ध्वसंयोग व समसंयोग ह्यांचा एकत्र आढळ होणेंहि संभवनीय असतें. उदाहरणार्थ, जेव्हां साखरेचें अनेक कारखानदार संयोग करतात आणि त्याच वेळीं उंसाचीं शेतीहि आपल्या मालकीखालीं आणतात तेव्हां ऊर्ध्वसंयोग आणि समसंयोग एकत्र दिसून येतात. ऊर्ध्वसंयोग व समसंयोग स्वतंत्रपणें अगर एकत्र झाल्यास लगेच त्यामुळें मक्तेदारी प्रस्थापित होते असें नाहीं. पण मक्तेदारीच्या निर्मितीसाठीं ऊर्ध्वसंयोग व अथवा समसंयोग ह्यांचा बराच उपयोग करून घेतला जातो ह्यांत शंका नाहीं. जेव्हां समसंयोगामुळें सर्व उत्पादक एकत्र येऊन आजकाल एकच उत्पादनसंस्था स्थापन करतात तेव्हां साहजिकच पूर्ण मक्तेदारी—त्या उत्पादन अवस्थेपुरती अस्तित्वांत येते. पण सर्व उत्पादक एकत्र न येतां बरेच उत्पादक एकत्र आले आणि त्यांनीं निर्माण केलेल्या उत्पादनसंस्थेच्या हातांत बहुतांश उत्पादन केन्द्रित झाल्यासहि मक्तेदारीसदृश परिस्थिति निर्माण होते आणि बाजारांत मक्तेदारीचेच फायदेतोटे अनुभवावयास मिळतात. समसंयोगाचीं उदाहरणें अलीकडे पुष्कळ दिसून येतात. ऊर्ध्वसंयोगाचा उद्देश बहुधा कच्चा माल स्वस्त उपलब्ध व्हावा व तो मिळविण्यांतील स्पर्धा नष्ट व्हावी असा असतो. जेव्हां एखाद्या उत्पादकाला कच्च्या मालाचा सर्वच्या सर्व किंवा बहुतांश पुरवठा हस्तगत करण्यांत यश येतें तेव्हां त्यांतून मक्तेदारी किंवा तत्सदृश परिस्थिति निर्माण होते. ऊर्ध्वसंयोग व समसंयोग जेव्हां एकत्र आढळून येतात तेव्हां निर्माण होणारी मक्तेदारी फारच प्रबळ असते हें सांगावयास नको.

मक्तेदारीची इष्टानिष्टता—मक्तेदारी व स्पर्धा ह्यांची तुलना :—मक्तेदारीनें आर्थिक कल्याण (Economic Welfare) किती साधतें, ह्यावर मक्तेदारीची इष्टानिष्टता अवलंबून असणें स्वाभाविक आहे. मक्तेदारी इष्ट कीं, अनिष्ट, हें निश्चितपणें ठरविणें आर्थिक कल्याणाची कसोटी लावून स्पर्धा व मक्तेदारी ह्यांची तुलना केल्यानंतरच शक्य होईल हें उघड आहे. आर्थिक कल्याणाच्या विचारांत कोणत्या गोष्टींचा समावेश होतो, हें प्रथम स्पष्ट केलें पाहिजे. आर्थिक कल्याणांत सर्वसाधारणपणें पुढील गोष्टी येतात :—

(१) वस्तूचें एकंदर उत्पादन—वस्तूचें एकंदर उत्पादन पाहिल्यास त्या वस्तूकरितां असलेली मागणी किती प्रमाणांत पुरी होते हें समजतें. गरजा भागविणें हें अर्थव्यवस्थेचें उद्दिष्ट असल्यानें ज्या परिस्थितींत उत्पादन अधिक होतें ती परिस्थिति अधिक चांगली हें सरळच आहे.

(२) ग्राहकाला पडणारी वस्तूची किंमत शक्य तेवढी कमी असणें इष्ट आहे. किंमत कमी झाल्यास मागणी वाढते हा मागणीचा सिद्धान्त लक्षांत घेतल्यास किंमत कमी झाल्यानें त्या वस्तूची गरज अधिक प्रमाणांत भागली जाण्यास मदत होते. शिवाय एखाद्या वस्तूवर कमी खर्च करावा लागल्यास व्यक्तीला तिच्या इतर गरजा अधिक प्रमाणांत भागवितां येतात हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे.

(३) वस्तूचा सरासरी उत्पादनखर्च कमी होणें सर्वतोपरि चांगलें, ह्यांत शंका नाहीं. वस्तूचा उत्पादनखर्च प्रामुख्यानें वस्तूच्या उत्पादनासाठीं लागणाऱ्या उत्पादन-घटकांच्या प्रमाणांवर अवलंबून असतो. तेव्हां (उत्पादन-घटकांच्या किंमती बदललेल्या नसल्यास) सरासरी उत्पादनखर्च कमी होणें ह्याचा एखाद्या वस्तु-परिमाणाच्या उत्पादनासाठीं लागणारें उत्पादन-घटकांचें प्रमाण कमी झालें आहे असाच होतो. निराळ्या शब्दांत उत्पादनखर्च कमी होणें म्हणजेच उत्पादन-साधनांच्या वापरांत बचत होणें होय. आर्थिक प्रश्न उद्‌भवण्यास एकंदर गरजांच्या मानानें उत्पादन-साधनांची कमतरता आहे, हें कारण महत्त्वाचें असल्यानें ज्या गोष्टीमुळें उत्पादन-साधनाची बचत होते ती गोष्ट केव्हांहि चांगली. उत्पादनखर्च कमींत कमी व्हावयाचा असेल तर दोन गोष्टी होणें आवश्यक असते. एकतर चालू उत्पादन-पद्धतींत पर्याप्त उत्पादन झालें पाहिजे आणि दुसरी गोष्ट म्हणजे उत्पादन-पद्धतींत सतत सुधारणा होत राहिली पाहिजे. किंवा निराळ्या शब्दांत औद्योगिक कार्यक्षमता (Industrial Efficieney) सतत वाढली पाहिजे.

(४) रोजगार : एकंदर रोजगारांत वाढ होणें हें आर्थिक कल्याणाचें लक्षण समजलें जातें. कारण एकतर प्रचलित आर्थिक व्यवस्थेंत व्यक्तीला चरितार्थाचीं साधनें उपलब्ध होऊन आर्थिक सुरक्षितता लाभावयाची असेल तर किमानपक्षीं तिला रोजगार मिळाला पाहिजे. शिवाय बेकारी असणें हें अर्थव्यवस्थेलाहि भूषणावह नाहीं. कारण साधनांची कमतरता असूनहि उपलब्ध मनुष्यबळाचा संपूर्ण उपयोग करण्यास अर्थ-व्यवस्था असमर्थ ठरली असाच बेकारीचा अर्थ होतो.

(५) संपत्तीचें विभाजन : संपत्तीच्या विभाजनांतील विषमता कमी होणें हें आर्थिक कल्याणास पोषक समजलें जातें.

वरील पांच कसोटचा लक्षांत घेऊन स्पर्धा व मक्तेदारी ह्यांची तुलना करतां येते व मक्तेदारीची इष्टानिष्टता ठरवितां येते.[६]

मक्तेदारींतील औद्योगिक कार्यक्षमता :—संबंधित वस्तूची मागणी एकच पर्याप्त उत्पादन-संस्था पुरी करील, एवढी लहान असेल तर त्या वस्तूच्या बाजारपेठेंत मक्तेदारीच असणें औद्योगिक कार्यक्षमतेच्या दृष्टीनें हितावह असतें हें उघडच आहे. ह्यावर वेगळें भाष्य करण्याचेंहि कारण नाहीं. साहजिकच पर्याप्त उत्पादन-प्रमाण जेवढें मोठें असेल तेवढी मक्तेदारी हितावह असण्याची शक्यता वाढतें. ह्या बाबतींतील उत्तम उदाहरण म्हणून वीज, पाणी वाहतूक इत्यादि सार्वजनिक उपभोग-वस्तूचा (Public Utilities) निर्देश करतां येईल. ह्या वस्तूचें उत्पादन एकाच व्यवस्थापनाखालीं होणें इष्ट असतें. कारण

[६] It is necessary to inquire how monopoly affects aggregate output and employment, efficiency, income distribution, the allocation of resources among uses, progressiveness in technique and product and stability.

तांत्रिकदृष्टया पर्याप्त उत्पादन-प्रमाण एवढें मोठें असतें कीं, एकापेक्षां अधिक उत्पादकांना बाजारपेठेंत स्थान लाभणें अशक्यच होतें. अधिक उत्पादक झाल्यास कोणाचाहि उत्पादन-खर्च भरून यावयाचा नाहीं.[७]

वरीलप्रमाणें परिस्थिति नसल्यास खास मक्तेदारींतून उद्भवणारे असें कांहीं फायदे असतील आणि त्यामुळें कार्यक्षमता वाढून उत्पादन-खर्च कमी होण्याचा संभव असेल तरच मक्तेदारी इष्ट ठरते. उत्पादनखर्च कमी करण्याच्या बाबतींत प्रथमच ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, उत्पादन-खर्च कमी करण्याचें प्रोत्साहन पूर्ण स्पर्धा व पूर्ण मक्तेदारी ह्या दोन्ही प्रकारच्या परिस्थितींत सारखेंच असण्यास कांही अडचण तत्त्वतः नाहीं. पूर्ण स्पर्धेत मागणीची लवचिकता अमाप असल्यानें उत्पादन-खर्च कमी करून किंमत कमी केल्यास मागणीचा ओघ मोठ्या प्रमाणांत आपल्याकडे वळेल, अशी आशा प्रत्येक उत्पादकाला असते. त्यामुळें प्रत्येक उत्पादक उत्पादन-खर्च कमींत कमी होईल एवढें उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करतो. उत्पादनप्रमाण वाढवून प्रत्येक उत्पादन केन्द्राचा सरासरी उत्पादन खर्च कमींत कमी करण्यास मक्तेदारहि प्रवृत्त होतो. कारण उत्पादन-खर्च कमी झाल्यानें किंमत कमी करावी लागण्याचा प्रश्न त्याच्या बाबतींत उद्भवत नसल्यानें सरासरी खर्च कमी झाल्यास मक्तेदाराचा नफा वाढण्याचाच संभव अधिक असतो. ह्याच कारणाकरितां असेंहि म्हणतां येईल कीं, उत्पादनपद्धतींत सुधारणा करून उत्पादन-खर्च कमी करण्याचें प्रोत्साहनहि पूर्ण स्पर्धा व पूर्ण मक्तेदारींत सारखेंच असतें. कदाचित असेंहि म्हणतां येईल कीं, उत्पादनतंत्र व उत्पादनव्यवस्था ह्यांत सुधारणा करून उत्पादनखर्च कमी करण्याचें प्रोत्साहन मक्तेदारींत पूर्ण स्पर्धेच्या मानानें जरा अधिकच असतें कारण पूर्ण स्पर्धेत उत्पादनखर्च कमी झाला म्हणजेच किंमतहि कमी होते. मक्तेदारींत वर दाखविल्याप्रमाणें किंमत कमी न होता नफ्यांत वाढ होण्याचा संभव असतो.[८] व्यवस्थापन-दृष्टया विचार केला तर लक्षांत घ्यावयाची पहिली गोष्ट अशी कीं पूर्ण स्पर्धेत व्यवस्थापनाचें विकेंद्रीकरण होतें, कारण एका वस्तूचें उत्पादन अनेक उत्पादन-संस्थांकडून होत असतें. मक्तेदारींत संबंधित वस्तूचें सर्व उत्पादन एकाच उत्पादन-संस्थेकडून होतें म्हणजेच व्यवस्थापनाचें केंद्रीकरण होतें. हें केंद्रीकरण कितपत इष्ट व अनिष्ट व तें किती प्रमाणांत टाळतां येतें, ह्यावर मक्तेदारीचे फायदे तोटे अवलंबून असतात. मक्तेदार

[७] Given the techniques of production, the extent of economies of large scale production will determine whether or not, monopoly in a given industry in the long run will give lower costs than pure competition.

[८] Monopoly may give rise to a more rapid technological progress than pure competition. The monopoly has an inducement to innovation, in the form of an added profit, a larger share of the resultant cost saving, than the competitive seller. It is thus possible and even probable that monopoly has an efficiency advantage from superior technique over pure competition.

संस्थेलाहि एकंदर उत्पादनाची विभागणी अनेक उत्पादनकेंद्रांत करतां येत असल्यानें प्रत्येक उत्पादन-केंद्र इष्ट मर्यादेपर्यंतच वाढेल, अशा पद्धतीनें प्रत्यक्ष उत्पादनाचें विकेंद्रीकरण मक्तेदारींतहि होऊं शकतें व त्यामुळें केंद्रीकरणाचें दुष्परिणाम अनुभवावयास लागत नाहींत. उत्पादनाची विभागणी अनेक उत्पादन-केंद्रांत झाल्यास व्यवस्थापनाची जबाबदारी थोडयाफार प्रमाणांत विभागली जाते. पण व्यवस्थापनाची अंतिम जबाबदारी, तसेंच उत्पन्न-खर्चासंबंधींची जबाबदारी ह्यांची विभागणी करतां येत नाहीं. त्यामुळें त्या बाबतींत केन्द्रीकरण अटळ असतें. ह्या केंद्रीकरणामुळेंच मुख्यत: मक्तेदारी स्पर्धेच्या तुलनेनें अकार्यक्षम ठरण्याचा धोका असतो. कारण उत्पादनाचा प्रचंड व्याप संभाळण्याची पात्रता असलेले व्यवस्थापक फारच दुर्मिळ असतात. आणि प्रत्येक मक्तेदार-संस्थेला अशा व्यवस्थापकांचा लाभ नेहमींच होईल, अशी ग्वाही देतां येत नाहीं. आतां एवढें मात्र खरें कीं, संबंधित वस्तूच्या उत्पादनांत मक्तेदारी असल्यास उत्पादनविषयक निर्णय घेण्याचें काम सुलभ होतें. कारण स्पर्धकांच्या वर्तनामुळें उत्पादनाच्या कारभारांत जी अनिश्चितता उद्भवते ती मक्तेदारींत जात्याच नसल्यानें महत्त्वाचे निर्णय घेण्याचा प्रसंगच फारसा येत नाहीं. उदाहरणार्थ, दुसरा उत्पादक एखादा नवीन शोध लावून आपल्याला पेंचांत टाकील अशी भीति बाळगण्याचें मक्तेदाराला कारण नसतें. तसेंच ग्राहकाला वस्तूचा एखादा नवा नमुना हवासा झाला, तर आधीं केलेल्या उत्पादनाचें काय करावें, हा प्रश्नहि मक्तेदाराला पडत नाहीं. कारण ग्राहकांच्या लहरी संभाळणें न संभाळणें शेवटीं मक्तेदाराच्याच हातांत नसतें. स्पर्धेत तसें नसतें, कारण एखाद्या उत्पादकानें ग्राहकांना पसंत पडेल असा वस्तूचा एखादा नवा नमुना काढला कीं, इतरांना त्याचें अनुकरण करावेंच लागतें आणि त्या संबंधांत काय करावें असा प्रश्न त्यांना पडतो. सारांश, स्पर्धेच्या अभावामुळें मक्तेदारींत अनिश्चिततेचा भाग बराच कमी होतो. म्हणून व्यवस्थापनाचें काम बरेंच सुकर होतें. निर्णय घेण्याचें प्रसंग फारसें न उद्भवल्यास ठराविक चाकोरींतून जाणें ह्याखेरीज व्यवस्थापनाला वेगळा अर्थ रहात नाहीं. पण तरीहि स्पर्धेच्या तुलनेनें मक्तेदारीची कार्यक्षमता कमी भरण्याचा धोका राहतोच. कारण एक तर जीवनांतील अनिश्चितता संपूर्णपणें नाहींशी कधींच होऊं शकत नाहीं. शिवाय स्पर्धेच्या अभावामुळें सुरक्षिततेची व आत्मसंतुष्टपणाची जी भावना निर्माण होतें तीच कार्यक्षमता व प्रगति ह्यांना बाधक ठरण्याची भीति असते. विनायास नफा मिळू लागल्यास सुधारणांकडे लक्ष दिलें जाणार नाहीं. एवढेंच नव्हे तर चाकोरी पाळण्याबाबतहि अनास्था निर्माण होईल, हा संभव दृष्टीआड करून चालणार नाहीं. ठराविक चाकोरी पाळण्यांत मक्तेदारीनें कार्यक्षमता दाखविली तरी अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनें मक्तेदारी उपकारक आहे, असें त्यामुळें सिद्ध होत नाहीं. कारण एकाचें अनुकरण दुसऱ्याला करावें लागत नसल्यामुळें स्पर्धेच्या परिस्थितींत प्रगतीला जो अवसर असतो तो मक्तेदारींत नसतो.[१]

[१] The world of monopolies has not after all such a very standard with which to compete.

मक्तेदारी व भांडवल-पुरवठा :—उत्पादनांत गुंतविण्यासाठीं हल्लींच्या उत्पादनसंस्था एक तर बाहेरून कर्जें काढून भांडवल मिळवितात किंवा उत्पादनांत झालेला नफा भांडवलरूपानें पुनः गुंतवितात. ह्या दोन्ही दृष्टींनीं मक्तेदारीचे कांहीं खास गुण आहेत कीं काय, हें पाहिलें पाहिजे. ह्या बाबतींत असें सांगितलें जातें कीं, मक्तेदारींत सामान्यपणें नेहमींच नफा होत असल्यामुळें बाहेरून कर्जें मिळविणें मक्तेदारीला सुलभ जातें आणि मक्तेदारींत नफ्याचें प्रमाणहि अधिक असल्यानें पुनर्गुन्तवण करण्याच्या बाबतींतहि मक्तेदारी सरस ठरते. स्पर्धेंतील उत्पादनसंस्थांना कर्ज देण्यांत किंवा त्यांत भांडवल गुंतविण्यांत दुहेरी धोका असतो. संबंधित वस्तूच्या उत्पादनांत तोटा होण्याचा धोका ज्याप्रमाणें भांडवल गुंतविणाराला पत्करावा लागतो त्याचप्रमाणें ज्या विशिष्ट उत्पादनसंस्थेला भांडवल साहाय्य करावयाचें त्या संस्थेला तोटा होईल, हा धोकाहि पत्करावा लागतो. ह्यांपैकीं दुसऱ्या प्रकारच्या धोक्याला, उत्पादनसंस्था एकच असल्यामुळें, मक्तेदारींत स्थान नसतें, हें उघड आहे. ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्यास असें मान्यच करावें लागतें कीं, मक्तेदारींत नफ्याचें प्रमाण सामान्यपणें अधिक असल्यानें व नफ्याला अधिक स्थैर्य व निश्चित-पणा असल्यानें केवळ पुरवठ्याचा प्रश्न घेतला तर मक्तेदारी स्पर्धेच्या तुलनेनें उजवी ठरते.

मक्तेदारी व क्रयविक्रयांतील काटकसर :—क्रयविक्रय खर्चांत काटकसर घडवून आणण्याच्या बाबतींतहि मक्तेदारींत अनेकविध फायदे उपलब्ध होतात. मक्तेदारींतील उत्पादनसंस्था स्पर्धेंतील कोणत्याहि उत्पादनसंस्थेपेक्षां जात्याच मोठी असल्यानें मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री करण्यांतील सर्व फायदे मक्तेदाराला सहजगत्या प्राप्त होतात. त्यामुळें खर्चांत उल्लेखनीय अशी काटकसर होऊं शकते हें उघड आहे. पण त्याहीपेक्षां महत्त्वाची गोष्ट अशी कीं, मक्तेदार कच्चा माल अगर विशिष्ट प्रकारच्या मनुष्यबळाचा एकमेव ग्राहक आहे, अशी परिस्थिति असूं शकते. तसें असल्यास मक्तेदाराच्या सौदा-सामर्थ्यामुळें किंमत पाडून माल किंवा मनुष्यबळ मिळविणें त्याला साधतें. त्यामुळें उत्पादनखर्चांत काटकसर होते. विक्रीखर्चाबाबतहि असेंच सांगतां येईल. विक्रीचें प्रमाण मक्तेदारींत मोठें असतेंच. त्यामुळें मोठ्या प्रमाणावर विक्री करणाऱ्या कोणत्याहि उत्पादकाला मिळणारे फायदे मक्तेदारालाहि मिळतातच. पण त्याखेरीज खास मक्तेदारालाच मिळूं शकणारे असे कांहीं फायदे असतातच. त्यांतील मुख्य फायदा असा कीं, जाहिरातीवर मक्तेदाराला फार खर्च करावा लागत नाहीं. ग्राहकांना आपल्या मालाची माहिती व्हावी म्हणून कांहीं प्रमाणांत जाहिरातीवर खर्च करावाच लागतो. पण अपूर्ण स्पर्धेंत आपल्या मालाचें श्रेष्ठत्व ग्राहकांना पटविण्यासाठीं जी यातायात उत्पादकाला करावी लागते ती मक्तेदाराला करावी लागत नसल्यामुळें जाहिरातीवरील त्याचा खर्च अगदीं बेताचा होतो. पूर्ण स्पर्धेंत तत्त्वतः जाहिरातीवर फार खर्च करण्याचें कारण नाहीं. पण पूर्ण स्पर्धेचें रूपान्तर अपूर्ण स्पर्धेंत व्हावें अशी प्रत्येक उत्पादकाची इच्छा असल्यानें

व्यवहारांत जाहिरातीवर बराच खर्च केला जातो. तेव्हां तुलनेनें जाहिरातीवरील खर्च मक्तेदारींतच सर्वांत कमी व्हावा हें सरळच आहे. मात्र मक्तेदारी कायमची नसेल आणि तिला बाध येण्याचा संभव असेल तर मक्तेदारी टिकविण्यासाठीं व तिचें जीवित वाढविण्यासाठीं मक्तेदारासहि जाहिरातीवर खर्च करावा लागेल हें लक्षांत घेतलेंच पाहिजे.

वरील विवेचनाचा निष्कर्ष :—मक्तेदारीसंबंधीं आतांपर्यंत जें विवेचन केलें त्याचा निष्कर्ष असा सांगतां येईल कीं, कोणत्याहि परिस्थितींत उत्पादनदृष्टचा मक्तेदारी स्पर्धेपेक्षां सरस आहे, असें निश्चित सांगतां यावयाचें नाहीं. एवढेंच फार तर म्हणतां येईल कीं, उत्पादन दृष्टचा मक्तेदारी वाईट असेंहि नाहीं. कारण मक्तेदारीमुळें उत्पादनक्षमता वाढण्याची व खर्च कमी होण्याची बरीच शक्यता असते.[१०] तसेंच ज्या ज्या ठिकाणीं एकूण मागणीपेक्षां तांत्रिक उत्पादनप्रमाण फारच मोठें असेल किंवा ज्या ज्या ठिकाणीं एकापेक्षां अधिक उत्पादक असणें अव्यवहार्यच असेल त्या त्या ठिकाणीं मक्तेदारी असणें हेंच इष्ट, असें निखालसपणें म्हणतां येतें. सामान्यपणें वीज, पाणी, वाहतूक अशा समाजोपयोगी वस्तूंच्या बाबतींत अशी परिस्थिति असते. त्यामुळें त्या व तत्सम व्यवसायांत मक्तेदारी असावी, असेंच प्रतिपादन करावें लागतें; तशी परिस्थिति नसलेल्या इतर व्यवसायांत मक्तेदारी निर्माण करण्याचे कांहीं फायदे जसे असतात तसें कांहीं तोटे असतात. उदाहरणार्थ, क्रयविक्रय खर्चासारख्या कांहीं बाबतींत मक्तेदार काटकसर करूं शकतो आणि एकंदरीनें भांडवल सहजगत्या उभारूं शकतो. उत्पादनखर्चाच्या बाबतींत मक्तेदारी सरस ठरते. ह्याचें कारण थोडक्यांत असें सांगतां येईल कीं, मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे फायदे मक्तेदाराला मिळूनच्या मिळून खास मक्तेदारीचे असे कांहीं फायदे (Economies of Monopolisation) मिळतात; पण तरीहि उत्पादनदृष्टचा मक्तेदारी श्रेष्ठ, असें निःसंकोचपणें म्हणतां यावयाचें नाहीं. कारण एकतर उत्पादनाचें मुख्यतः व्यवस्थापन-दृष्ट्या अवास्तव केन्द्रीकरण मक्तेदारींत होतें व त्यांतून अपव्यय, अकार्यक्षमता, अनास्था अशांसारखे दोष उद्भवण्याचा संभव असतो. त्यामुळें कोणतेहि फायदे संपूर्णपणें मिळतीलच, अशी ग्वाही देतां येत नाहीं. तसेंच मक्तेदारीमुळें होणारी खर्चांतील काटकसर किती असते हें तात्त्विक विवेचन करून ठरवतां येत नाहीं. प्रत्येक उद्योगधंद्याचा स्वतंत्रपणें व तपशीलवार अभ्यास केल्यानंतरच त्या त्या उद्योगधंद्याच्या बाबतींत व एकंदरीनें मक्तेदारी कितपत श्रेयस्कर ह्या संबंधीं कांहीं आडाखे बांधतां येतील. ह्या ठिकाणीं एवढेंच फार तर म्हणतां येईल कीं, कार्यक्षमतेच्या दृष्टीनें मक्तेदारीची इष्टानिष्टता मक्तेदारीमुळें खर्चांत प्रत्यक्ष काटकसर

[१०] Monopoly may frequently give greater efficiency than pure competition could in the same industry and also that monopolised industries perform better relative to ideal standards of efficiency than purely competitive industries.

किती होतें ह्या प्रश्नाच्या उत्तरावर ठरते. किंवा असेंहि म्हणतां येईल कीं, पूर्ण स्पर्धेत उत्पादनखर्च कमी होणें ही गोष्ट सहजगत्या होते. मक्तेदारींत उत्पादन खर्च कमी होईलच किंवा केला जाईलच असा निर्वाळा देतां यावयाचा नाहीं. तसा परिणाम होणें हें बरेचसें मक्तेदारावर व प्रत्यक्ष व्यवस्थापनावर अवलंबून राहील.[११]

रोजगारावर अनिष्ट परिणाम :--शिवाय अधिक महत्त्वाची गोष्ट अशी कीं, उत्पादनखर्च जरी कमी झाला तरी मक्तेदारी असलेल्या उद्योगधंद्यांतील एकंदर उत्पादन त्या धंद्यांत स्पर्धा असती तर झालें असतें त्यापेक्षां कमी होण्याचा संभव फारच असतो. कारण मक्तेदारींतील किंमत अधिक असते हें खरें असेल तर मक्तेदारींतील एकंदर पुरवठा म्हणजेच उत्पादन सामान्यपणें कमी असलेंच पाहिजे हें ओघानेंच येतें. उत्पादन कमी म्हणजे त्या उद्योगधंद्यांतील रोजगारहि कमी.[१२]

मक्तेदारी व विभाजन :--विभाजनाच्या दृष्टीनें मक्तेदारीचा विचार केला तर असें दिसून येतें कीं, ज्या ज्या व्यवसायांत मक्तेदारी आहे आणि इतर उत्पादकांचा प्रवेश होण्याची भीति नाहीं किंवा अगदींच कमी आहे त्या व्यवसायांत नफ्याचें प्रमाण सर्वसाधारण प्रमाणापेक्षां नेहमींच अधिक असतें. हें जर खरें असेल तर त्याचा अर्थ असाच होतो कीं, मक्तेदारी असलेल्या व्यवसायांतील मालकवर्गाला मिळणारा एकंदर उत्पन्नाचा वांटा त्या व्यवसायांत स्पर्धा असतां जो वांटा मिळाला असतां त्यापेक्षां अधिक असतो. तुलनेनें अर्थातच मजूरवर्गाला मिळणारा उत्पादनाचा वांटा मक्तेदारीमुळें कमी होण्याचा संभव असतो. म्हणजेच मक्तेदारीमुळें विभाजनांतील विषमता वाढूं पहाते, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. ह्या ठिकाणीं ही गोष्ट स्पष्ट केली पाहिजे कीं, एखाद्याच किंवा दोनचार व्यवसायांत मक्तेदारी असल्यास तिचा एकंदर विभाजनावर दिसून येईल, एवढ्या प्रमाणांत अनिष्ट परिणाम व्हावयाचा नाहीं. कांहीं मक्तेदार श्रीमान् होतील व त्याचा इतरांच्या उत्पन्नावर कळेल न कळेल एवढाच परिणाम होईल; पण तो परिणाम उल्लेखनीय म्हणतां येणार नाहीं. पण बहुसंख्य किंवा सर्वच उद्योगधंद्यांत मक्तेदारी प्रस्थापित झाल्यास त्या घटनेचा एकंदर विभाजनावर अनिष्ट परिणाम झाल्यावांचून रहावयाचा नाहीं. त्या परिस्थितींत वस्तूच्या किंमती अल्प घटकांच्या मालकांना मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षां सर्वसाधारणपणें अधिक असतात. मक्तेदारी

[११] Pure competition in its natural getting, gives long run maximum efficiency. Monopoly may or may not produce that result.

[१२] The Monopolist is likely to produce a smaller output, irrespective of whether it enjoys technical superiority over a purely competitive industry. The monopolistic output restriction would obviously carry with it a corresponding restriction on employment of productive factors. Restrictive effects on employment of factors would be greater, greater the technological superiority of production under monopoly.

विभाजनाच्या दृष्टीनें अहितकर असतें ह्यांत शंका नाहीं. ती अहितकर असते, ह्याचें कारण असें कीं, मक्तेदारीमुळें उत्पादकांना एका बाजूनें पुरवठा मर्यादित करून मालाच्या किंमती अनैसर्गिकपणें वाढविण्याची संधि मिळते आणि दुसऱ्या बाजूनें उद्योगधंद्यांतील आपल्या वर्चस्वाचा फायदा घेऊन उत्पादनाचे विविध घटक कमी किंमतीनें आपल्या पदरांत पाडून घेण्याची संधि मिळते. जेव्हां विविध व्यवसायांत मक्तेदारी असून सर्व मक्तेदारांची एकच संघटना निर्माण होते तेव्हां तर उत्पादकांची शक्ति फारच वाढते.[१३]

त्यामुळें विभाजनांतील विषमता अतोनात होऊं शकते. अशा परिस्थितींत इतर घटक संपूर्णपणें परावलंबी होतात आणि विशेषत: ते असंघटित असल्यास त्यांचा इलाजच चालत नाहीं. हें सर्व लक्षांत घेतां मक्तेदारीचें अर्थव्यवस्थेंतील प्रमाण व जोर जेवढा अधिक तेवढी विभाजनांतील विषमताहि अधिक, असें म्हणण्यास हरकत नाहीं.[१४]

विभाजनदृष्टया मक्तेदारी अनिष्ट असणें ह्याचा अर्थ असाहि करतां येतो कीं, मक्तेदारीमुळें आपल्या गरजा भागवण्याची समानसंधि सर्वांना मिळणें दुरापास्त होते. मक्तेदारी विभाजनदृष्टया अनिष्ट असल्यामुळेंच जेथें अपरिहार्य असेल तेथेंच मक्तेदारी चालूं देणें (किंवा अधिक चांगला मार्ग म्हणजे तो उद्योगधंदा स्वत:च चालविणें) व तेथेंहि तिच्यावर योग्य तीं नियंत्रणें घालणें, हेंच धोरण सरकारकडून स्वीकारलें जाणें श्रेयस्कर ठरतें.

प्रमुख संदर्भग्रंथ

(1) E. A. G. Robinson—Monopoly.
(2) Mrs. Joan Robinson—Economics of Imperfect Competition.
(3) Bain—Pricing, Distribution and Employment.
(4) S. Aaronovitch—Monopoly :–A study of British Capitalism.
(5) Burns—The Decline of Competition.

---

[१३] Perfect competition is advantageous to the factors and an increase in the size of the unit of control will increase the degree of exploitation.

[१४] Since the profit recipients tend to have larger personal incomes on the average than hired factors or those receiving their incomes, monopoly tends to increase the inequality of personal income distribution. It does so, moreover, by rewarding contrived scarcity rather than the performance of a useful economic function. Consequently if one views more unequal income distribution as socially undesirable, monopoly has undesirable income distribution effects—**Bain.**

: १० : कामगारांचें वेतन

वेतन म्हणजे काय :—कामगाराला श्रम करण्याबद्दल किंवा निराळ्या शब्दांत आपली श्रमशक्ति विकण्याबद्दल जो मोबदला दिला जातो त्याला मजुरी किंवा वेतन (Wages) म्हणतात. वेतन हें मनुष्यबळ ह्या उत्पादनघटकाचें मूल्य असल्यामुळें जेव्हां त्यावर बाह्य नियंत्रण नसेल तेव्हां इतर वस्तूंच्या मूल्याप्रमाणेंच मागणी-पुरवठ्याच्या बाजूकडील प्रवाहामुळेंच वेतन निश्चित होतें.[१] पण एवढें सांगितल्यानें वेतन-निश्चिति कशी होते, हें पुरतें सांगितलें असें होत नाहीं. कारण कामगारांचा पुरवठा, कामगारांकरितां असलेली मागणी, कामगारांची बाजारपेठ व मागणी-पुरवठ्याचा परस्परांवर होणारा परिणाम ह्यांचीं कांहीं खास वैशिष्ट्यें असतात. त्यांचा अभ्यास करावा लागत असल्यामुळें वेतन-निश्चिति कशी होते, हा एक स्वतंत्र महत्त्वाचा विषय ठरतो.

मागणीची बाजू :—कामगारांकरितां जी मागणी असते तिच्या बाबतींत प्रथम ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, ती मागणी श्रमाकरतां आहे असें वारंवार दिसलें तरी, अपवाद वगळतां, त्या श्रमाचें जे फल असतें त्याकरितां असते. कामगाराला कामावर ठेवणारा जो मालक असतो त्याला कामगाराचे श्रम नको असतात तर त्या श्रमाचें जें फल प्राप्त होतें—म्हणजे ते श्रम केल्यापासून जी वस्तु निर्माण होते ती हवी असते. ती तरी कां हवी असते ? तर ती वस्तु त्याला बाजारांत विकावयाची असते म्हणून. म्हणजे श्रमाचें फळ असतें त्याला बाजारांत मोल असल्यास श्रमांनाहि मोल प्राप्त होतें.[२]

उत्पादनक्षमतेचें महत्त्व :— मालक कामगाराला त्याच्या श्रमाबद्दल किती वेतन देऊं करतो, हा मागणीच्या बाजूकडील एक विशेष महत्त्वाचा प्रश्न आहे. ह्या प्रश्नाचें उत्तर असें देतां येईल कीं, कोणत्याहि परिस्थितींत कामगाराच्या श्रमांचें जें फल असतें त्याची बाजारांत जी किंमत ठरते त्यापेक्षां अधिक किंमत कामगाराला कोणताहि मालक देऊं करणार नाहीं. मालकानें त्यापेक्षां अधिक किंमत दिल्यास मालकाचा तोटा होईल. असा तोटा कोणीहि मालक पत्करणार नाहीं.

---

[१] The payments to or the prices of labour are generally referred to as wages. Like all other prices wages in the absence of control tend to be determined by the forces on demand and supply sides of labour.

[२] The demand for labour is a derived demand. It is not a demand for labour or for labour power as such but for what abour produces.

म्हणजेच कामगाराच्या उत्पादनक्षमतेला (Productivity) वेतन निश्चित होण्यांत महत्त्वाचें स्थान आहे. कामगाराचें उत्पादकत्व अर्थातच त्याच्या उत्पादनक्षमतेवर, तसेंच उत्पादनपद्धतीवर अवलंबून असतें. पण विशेष लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट अशी कीं, सर्व कामगारांची उत्पादनक्षमतां सारखी असल्यास व उत्पादन-पद्धतीहि विशिष्ट आहे, असें गृहीत धरल्यास कामगारांचें उत्पादकत्व कामगारांच्या संख्येवर अवलंबून असतें. उत्पादनफल सिद्धान्ताला अनुसरून अशीच ही गोष्ट आहे. त्या सिद्धान्ता-प्रमाणें इतर सर्व घटकांचें प्रमाण स्थिर ठेवून एखाद्याच उत्पादनघटकांत वाढ केल्यास प्रथम कांही वेळ वाढतें फळ व नंतर घटतें फळ अनुभवास येतें. दीर्घकाल-दृष्टचा घटत्या फळाची प्रवृत्ति ही अधिक मूलगामी घेतां असें म्हणतां येईल कीं, कामगारांची संख्या जशी वाढत जाते तसा प्रत्येक नव्या कामगाराचा एकंदर उत्पादनाला लागणारा हातभार कमी कमी होत जातो. निराळ्या शब्दांत मनुष्यबळ ह्या उत्पादनघटकाचें उत्पादकत्व कमी होत जातें. (हा सिद्धान्त अर्थातच सर्वच उत्पादन-घटकांना लागू आहे). कोणत्याहि वेळीं सीमान्त-कामगाराची उत्पादन-क्षमता (Marginal Productivity) सर्वांत कमी असतें. कोणत्याहि घटकाच्या सीमान्त-उत्पादनक्षमतेला मागणीच्या बाजूस महत्त्व आहे. कारण सीमान्त-उत्पादन-क्षमतेएवढें जास्तींत जास्त वेतन कामगारांना द्यावयास मालक तयार असतो. तें वेतन दिल्यास शेवटला किंवा सीमान्त-कामगार कामावर लावल्यानें मालकाचें कांहीं नुकसान होत नाहीं. प्रत्येक नवा कामगार कामावर घेतेवेळीं त्याच्यावर होणारा खर्च त्याच्यामुळें होणाऱ्या प्राप्तीपेक्षां अधिक असूं नये, अशी खबरदारी मालकांकडून घेतली जाणें साहजिक आहे. म्हणूनच सीमान्त-कामगाराला त्याच्या उत्पादकत्वाला अनुसरून वेतन देऊं केलें जातें. तेंच वेतन सर्वांना देऊं केलें जातें. कारण सर्व कामगार सारख्या दर्जाचे असल्यास कोणता कामगार सीमान्त ठरतो, हा केवळ योगायोगाचा प्रश्न आहे. सारांश, सीमान्त-उत्पादकत्वाचें मापन उत्पादित वस्तूच्या परिमाणांत जसें करतां येईल तसें पैशांतहि करतां येईल. हल्ली पैसा हें सर्वच व्यवहारांचें माध्यम असल्यानें सीमान्त-उत्पादकत्वाच्या पैशांत होणाऱ्या मापनाला विशेष महत्त्व आहे. कारण त्यावरच मालकाकडून कामगारांना देऊं करण्यांत आलेलें वेतन अवलंबून असतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. **सीमान्त-कामगाराकडून प्रत्यक्ष उत्पादनांत जी भर पडते तिला वस्तूच्या किंमतीनें गुणल्यास सीमान्त-उत्पादनमूल्य** (Value of Marginal Product) **समजतें.** ज्या उद्योगधंद्याचा विचार चालू असेल त्या उद्योगधंद्यांत पूर्ण स्पर्धा असेल तर त्या धंद्यांतील प्रत्येक उत्पादक उत्पादन वाढलें तरी किंमत कमी होणार नाहीं, असें गृहीत धरूनच सीमान्त-उत्पादकत्वाचें पैशांत मापन करतो. पूर्ण स्पर्धा नसल्यास उत्पादन वाढल्यास किंमत कमी होईल. हा संभव कामगारांना काय वेतन देऊं करावयाचें, हें ठरवितांना उत्पादकाला विचारांत घ्यावा लागतो; हें सीमान्त-उत्पादनमूल्य मालक द्यावयास तयार असलेलें कमाल वेतन असते.[३]

मागणीची मर्यादा :—किती कामगार कामावर लावावयाचे, हें मालक कसें ठरवतो, हाहि एक महत्त्वाचा प्रश्न आहे. ह्या प्रश्नाचें उत्तर असें देतां येईल कीं, जेवढें उत्पादन करावयाचें योजलेलें असेल—उत्पादनविषयक निर्णय कसे घेतले जातात हा प्रश्न स्वतंत्र आहे—त्या उत्पादनासाठीं स्वीकारण्यांत आलेलें उत्पादनतंत्र लक्षांत घेऊन जेवढ्या कामगारांची आवश्यकता असेल तेवढ्या कामगारांसाठीं मालकाकडून मागणी केलें जाते.[४] वस्तूकरितां मागणी व तिची किंमत ह्यांचा परस्पर संबंध असतो, ह्या न्यायानें कामगारांची मागणी व त्यांचे वेतन ह्यांचा संबंध असला तरीहि कामगाराचे वेतन ही एकच गोष्ट मागणी ठरतांना निर्णायक महत्त्वाची ठरत नाहीं. किती उत्पादन करावयाचें व कशाचें करावयाचें, हें ठरवतांना ज्या अनेक गोष्टी विचारांत घेतल्या जातात त्यांमध्यें कामगारांना द्यावें लागणारें वेतनहि असतें. तसेंच उत्पादनतंत्र ठरवितांनाहि वेतनाचा विचार केला जातो. इतर गोष्टी स्थिर आहेत असें गृहीत धरून, सर्वसाधारणपणें असें म्हणतां येईल कीं, जोंपावेतों द्यावें लागणारें वेतन सीमान्त-उपादकत्वापेक्षां कमी असेल तोंपावेतों उत्पादन वाढण्यास उत्पादकांना प्रोत्साहन मिळतें. उलट सीमान्त-उत्पादकत्वापेक्षां अधिक वेतन द्यावयाची वेळ आल्यास उत्पादन कमी करण्याची प्रवृत्ति उत्पादकांत निर्माण होते. उत्पादनतंत्रा-बाबत असेंच सांगतां येईल. मनुष्यबळावर होणारा खर्च जेव्हां तुलनेनें अधिक असतो तेव्हां मनुष्यबळांत शक्य तों बचत करण्याची प्रवृत्ति उत्पादकांत दिसून येते. उलट मनुष्यबळ स्वस्त असल्यास उत्पादकांचा ओढा मनुष्यबळाकडे वळतो. अशा प्रकारें कामगारांचें वेतन व कामगारांकरितां मागणी ह्यांचा संबंध असला तरी ही गोष्ट आग्रहानें सांगितली पाहिजे कीं, उत्पादनतंत्र व उत्पादन-प्रमाण ठरलें जाण्यांत ज्या अनेक गोष्टी येतात त्यांपैकीं वेतन ही एक गोष्ट असते. केवळ वेतनाचा विचार करून त्या गोष्टी ठरविल्या जात नाहींत. **वेतनासहित सर्व गोष्टींचा विचार करून प्रत्येक उत्पादक आपलें उत्पादनप्रमाण व उत्पादनतंत्र निश्चित करतो व त्या अनुरोधानें त्याची विविध प्रकारच्या कामगारांकरितां मागणी निश्चित होते**. मागणी निश्चित झाल्यानंतर त्या त्या प्रकारच्या कामगारांच्या सीमान्त-उत्पादकत्वानें व्यक्त होणारें वेतन देण्यास आपापल्यापुरता प्रत्येक उत्पादक तयार असतो.

[३] The maximum wage which an employer is prepared to give is equal to the money value of the marginal physical product of labour used as a factor of production. As a corollary of the law of diminishing returns the marginal products of the added units of a factor progressively declines as more of it is used in combination with other factors.

[४] The number of men employed by a firm depends directly on two things viz. the quantity of production it turns out and the method it decides to adopt in production. If method is given quantity of labour employed will vary with output. If output is given variation in output will change the demand.

वेतनाचा सीमान्त-उत्पादनक्षमता सिद्धान्त (Marginal Productivity Theory of Wages) :—सीमान्त-उत्पादनमूल्याइतकें वेतन मालकवर्ग द्यावयास तयार असते व जेवढें वेतन जास्तींत जास्त म्हणून मालक द्यावयास तयार असतो त्या पलीकडे वेतन जाऊ शकत नाहीं हा वरील विवेचनांतून निघणारा निष्कर्षच वेतनाचा सीमान्त-उत्पादनक्षमता सिद्धान्त ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. हा सिद्धान्त थोडक्यांत असा सांगतां येईल कीं, **सीमान्त-कामगाराच्याकडून उत्पादनांत जी भर पडते तिच्या एकंदर किंमती एवढें वेतन सर्व कामगारांना मिळतें.** [५] सीमान्त-उत्पादनक्षमतेच्या सिद्धान्ताचें असें समर्थन केलें जातें कीं, उत्पादनतंत्र गृहीत धरून साधारण नफा धरून कमींत कमी उत्पादनखर्च जेव्हां होतो तेव्हांच उत्पादन समतोल होतें म्हणजे उत्पादकाला तें वाढवावें अगर कमी करावें अशी प्रेरणा रहात नाहीं. जेव्हां घटकाची किंमत व सीमान्त-उत्पादनमूल्य समान होतील तेव्हांच अशी परिस्थिति निर्माण होईल घटकाची किंमत सीमान्त-उत्पादनमूल्यापेक्षां कमी किंवा अधिक असेल तर अनुक्रमें उत्पादन वाढविण्याची व कमी करण्याची इच्छा उत्पादकास होईल. [६]

सीमान्त उत्पादनक्षमतेच्या सिद्धान्तांतील गृहीतें :—सीमान्त उत्पादनमूल्याएवढें वेतन कामगारांना द्यावयास मालक तयार असतो असें वरील विवेचनांत दाखविलें आहे; पण त्यामुळें सीमान्त उत्पादनक्षमतेच्या सिद्धान्ताचा पुरावा दिला असें मात्र होत नाहीं. मागणीचें मूल्य ठरण्यांत सीमान्त उत्पादकत्वाचा भाग मोठा असतो ही गोष्ट खरी; पण तरीहि सीमान्त उत्पादकत्वामुळें वेतन ठरतें, असें मात्र म्हणतां यावयाचें नाहीं. कारण सीमान्त-उत्पादनमूल्य हें मालक द्यावयास तयार असलेलें **जास्तींत जास्त** मूल्य असतें हा त्यांतील भाग महत्त्वाचा आहे. त्यापेक्षां कमी वेतन द्यावयाची संधि मिळाली तर मालकाला ती हवीच असते हें

---

[५] Wages of any class of workers are equal to the increased product which results from the last worker employed multiplied by its market price—The only wage at which equilibrium is possible is a wage which equals the value of the marginal product of labour. Marginal product is the difference between the total physical production which is actually secured from the same quantity of other resurces if the number of labourers had been increased or diminished by one—**Hicks.**

[६] If we suppose the prices of all the factors of production to be given the least cost combination of factors will be given by the condition that the marginal products of the factors are proportional to their prices. If that is not the case, it will be to the advantage of the producer to substitute one factor of production for another and to change also the scale of production.

विसरून चालणार नाहीं. तशी संधि देणारी परिस्थिती असेल तर सीमान्त-उत्पादनक्षमतेच्या सिद्धान्ताला व्यवहारांत बाध येईल, प्रत्यक्ष व्यवहारांत अशीच परिस्थिती अधिक प्रमाणांत आढळून येणें ह्याचें मुख्य कारण असें सांगतां येईल कीं, सीमान्त-उत्पादनक्षमतेच्या सिद्धान्तांत अशा अनेक गोष्टी गृहीत धरलेल्या आहेत कीं, ज्या वस्तुस्थितींत आढळत नाहींत. संबंधित वस्तूच्या उत्पादनांत पूर्ण स्पर्धा असते व कामगारांच्या पुरवठ्याच्या बाजूला कोणतीहि वैगुण्यें नसतात, तसेंच सीमान्त-उत्पादनक्षमता नेमकी किती आहे हें मालकांना निश्चित माहीत असते व ती लक्षांत घेऊनच मालकवर्ग उत्पादनासंबंधीचे निर्णय घेतो असें सीमान्त-उत्पादनक्षतेच्या सिद्धान्तांत गृहीत धरलें जातें. दुर्दैवानें ह्या तीन गृहीत कृत्यांपैकीं एकहि वस्तुस्थितीला धरून नाहीं आणि त्यामुळें सीमान्त-उत्पादन-क्षमता सिद्धान्त अनुभवाच्या कसोटीस उतरत नाहीं हा त्यांतील मोठाच दोष आहे.[७]

वस्तूच्या उत्पादनांतील अपूर्ण स्पर्धेचा परिणाम :—सीमान्तउत्पादकत्वाचा सिद्धान्त प्रत्यक्षांत खरा ठरण्यासाठीं संबंधित वस्तूच्या उत्पादनांत पूर्ण स्पर्धा असावी लागते. ज्या उद्योगधंद्यांत पूर्णस्पर्धा असते त्या उद्योगधंद्यांतील काम-गारांना सीमान्त उत्पादकाच्या एवढें वेतन मिळण्याच्या मार्गांत सहसा अडचण येत नाहीं. उत्पादकांतील स्पर्धा त्या पातळीपर्यंत वेतनाला नेण्यास समर्थ ठरते. पण मागणीच्या बाजूस ग्राहक-मक्तेदारी (Monopsony) असेल, किंवा अपूर्ण स्पर्धा असेल तर मालकांना सीमान्त उत्पादकत्वापेक्षां कमी वेतनाला मनुष्यबळाची खरेदी करण्याचा मोका मिळतो. मनुष्यबळाचा ग्राहक एकच असला किंवा मालकामालकांत अभेद्य अशी एकजूट असली तर कामगार अतिशय परावलंबी होतो आणि त्यामुळें सीमान्त उत्पादकत्वापेक्षां कमी वेतन देऊनहि मालकांना मनुष्यबळ खरेदी करतां येतें. मागणीच्या बाजूस ग्राहकांची मक्तेदारी नसूनहि जरी अपूर्ण स्पर्धा असली तरीहि—म्हणजेच एखाद्या प्रकारच्या कामगारांची संख्या मोठी आणि त्यांचा ग्राहकवर्ग छोटा अशी परिस्थिति असली तरीहि ती कामगारांना प्रतिकूल ठरते. ह्या परिस्थितींत कोणत्याहि एका मालकाला आपली मनुष्यबळाची मागणी कमी अगर अधिक करून वेतनावर आपल्याला इष्ट असा परिणाम घडवून आणतां येतो. ह्या परिस्थितीचा फायदा मालकवर्गानें न घेतला तरच नवल. सारांश, मागणीच्या बाजूकडील मक्तेदारीमुळें किंवा अपूर्ण स्पर्धेमुळें

[७] The marginal productivity theory is based upon a number of assumptions that frequently fail to fit the facts of modern economic life. Perhaps the most important and least valid assumptions underlying the theory are that labour and product-markets are perfects markets and that employers decide their production and employment policies according to accurately known marginal productivity data.

सीमान्त उत्पादकत्वाच्या सिद्धान्ताला बाध येतो. प्रत्यक्षांत मागणीच्या बाजूस पूर्ण स्पर्धा क्वचितच आढळते, अपूर्ण स्पर्धाच फार मोठ्या प्रमाणांत आढळते हें सर्व-परिचित आहे.

पुरवठ्याच्या बाजूकडील वैगुण्यें :—सीमान्त उत्पादनमूल्याएवढें वेतन कामगाराला मिळणें रास्त आहे, असें मानल्यास त्यापेक्षां कमी वेतन कामगाराला दिलें जाण्यांत त्याचें शोषण (Exploitation) होते असें म्हणतां येईल. **सीमान्त कामगाराच्या उत्पादनाला बाजारांत वस्तु ज्या किमतीला विकली जाते त्या किमतीनें गुणून जी रक्कम येते त्यापेक्षां कमी रक्कम वेतन म्हणून कामगारांना दिल्यास त्यांच्या श्रमाचें शोषण होतें** अशी कामगार शोषणाची व्याख्या करण्यांत आली आहे.[८] अशा प्रकारचें शोषण मागणीच्या बाजूस अपूर्ण स्पर्धा असल्यामुळें होऊं शकते. त्याचप्रमाणें पुरवठ्याच्या बाजूस कांहीं वैगुण्यें असतात आणि त्यामुळेंहि कामगाराला त्याच्या कामाचा योग्य मोबदला मिळूं शकत नाहीं.

कामगाराची सौदा-शक्ति कमी :—पुरवठ्याच्या बाजूकडील मुख्य वैगुण्य असें कीं, जेव्हां कामगार-वर्ग असंघटित असतो तेव्हां सौदा करण्याच्या शक्तींत (Bargaining Power) तो मालक-वर्गाच्या तुलनेनें कमी भरतो. **कामगाराची सौदा करण्याची शक्ति कमी** असते, ह्याचीं अनेक कारणें सांगतां येतात. पहिलें कारण असें कीं, कामगार-वर्ग सामान्यतः अज्ञानी असतो. बाजाराच्या दोन्ही बाजूंना बाजारांतील परिस्थितीचें भरपूर ज्ञान असलें पाहिजे, हें बाजारांत पूर्ण स्पर्धा असण्याचें एक महत्त्वाचें लक्षण आहे. पण कामगारांच्या बाजार-पेठेंत ह्या अर्थानें पूर्ण स्पर्धा सहसा नसते. मालक-वर्ग अधिक शिक्षित व चाणाक्ष असल्यानें—विशेषतः त्या वर्गाला कोणत्याहि प्रकारच्या साधनांची कमतरता नसल्यामुळें—बाजारांतील परिस्थितीचें योग्य तें ज्ञान त्या वर्गाला बहुधा असतें. पण कामगार-वर्गाचें बाजारांतील ज्ञान मात्र यथातथाच असतें. आपल्या श्रमाचें रास्त मूल्य काय, मालक-वर्ग जास्तींत जास्त किती वेतन द्यावयास तयार होईल, कामगारा-कामगारांत वेतनभेद केला जातो कीं काय, चालू रोजगार सोडून अन्यत्र गेल्यास अधिक वेतन मिळवितां येईल कीं काय, इत्यादि गोष्टींचा कामगारांना पत्ता नसतो. त्यामुळें मालक-वर्गाचें फावतें आणि कामगारांचें शोषण होऊं शकते. तसें शोषण होऊं शकते ह्याचें दुसरें महत्त्वाचें कारण असें कीं, असंघटित कामगार-वर्ग सामान्यपणें अगतिक असतो आणि ह्या गोष्टीचा फायदाहि मालक-वर्गाला घेतां येतो. कामगार-वर्ग अगतिक असण्याचें मुख्य कारण असें कीं,

[८] A group of workers is being exploited when their wage is less than the Marginal Physical Product that they are producing valued at the price at which it is being sold. —**Mrs. Robinson**

प्रचलित अर्थव्यवस्थेंत उत्पादनसाधनें कामगारांच्या मालकीचीं नसतात. दुसऱ्याच्या मालकीच्या उत्पादनसाधनांच्या साहाय्यानें त्यांना उत्पादनकार्य करावें लागतें. सध्यांची उत्पादनपद्धतीच अशी आहे कीं, अन्य उत्पादनसाधनांच्या साहाय्यावांचून मनुष्यबळ फिकें पडतें आणि त्यामुळेंच कामगार-वर्ग परावलंबी होतो. ज्यांच्याजवळ इतर उत्पादनसाधनें आहेत त्यांचेहि मनुष्यबळ पुरेसें उपलब्ध झालें नाहीं तर अडेल, ही गोष्ट नाकारतां येणार नाहीं. परंतु ह्या संदर्भांत ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, आर्थिक विकासक्रमाच्या ओघांत अन्य उत्पादनसाधनांचे मालक श्रीमान् झालेले आहेत. त्यामुळें त्यांच्या मालकीचे उत्पादनघटक कांहीं काळ निकामी पडून राहिले तरी त्यांचें बिघडत नाहीं. केवळ मनुष्यबळच ज्यांच्याजवळ आहे त्यांचें तसें नसतें. रोजगाराला पर्याय उपासमार हाच असतो आणि त्या कारणामुळें कामगार-वर्ग अधिकच अगतिक होऊन प्रसंगीं मिळेल तें वेतन ह्या वर्गास स्वीकारावें लागतें.[९]

सीमान्त उत्पादकत्वाचा सिद्धान्त वास्तवतेला सोडून :—आतांपर्यंतच्या विवेचनाचा आशय असा सांगतां येईल कीं, वेतनासंबंधीचा सीमान्त उत्पादनक्षमतेचा सिद्धान्त उभयपक्ष तुल्यबल असल्यास व कामगारांच्या, तसेंच संबंधित उद्योगधंद्याच्या बाजारपेठेंत पूर्ण स्पर्धा असल्यासच अनुभवास येईल. कामगारांच्या बाजारपेठेंत पूर्णार्थानें पूर्ण स्पर्धा असल्यास त्या बाजारपेठेंत प्रत्येक मालकाकडून दिलें जाणारें वेतन, सामान्य उत्पादन वस्तुमूल्याएवढें असल्याशिवाय आणि सारखी कार्यक्षमता असलेल्या सर्व कामगारांचें वेतन, सारखें झाल्याशिवाय समतोल प्रस्थापित व्हावयाचाच नाहीं. त्या दृष्टीनें हा सिद्धान्त अर्थपूर्ण असला तरी वास्तवतेंत कामगारांच्या बाजारपेठेंत अपूर्ण स्पर्धा असल्यामुळें आणि कांहीं प्रमाणांत तरी त्या बाजारपेठेंतील अपूर्णत्व साहजिक आणि म्हणूनच अपरिहार्य असल्यानें, सीमान्त उत्पादकत्वाचा सिद्धान्त वास्तवतेला सोडून आहे, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं.[१०] आतांपर्यंत त्या सिद्धान्तावर अनेक आक्षेप घेण्यांत आले आहेत. त्या सिद्धान्तावर असाहि आक्षेप घेण्यांत आला आहे कीं प्रत्यक्षांत सीमान्त उत्पादकत्वाचें मापन करणें शक्य नसतें. सीमान्त उत्पादकत्वाचें मापन करतां येण्याजोगा फरक उत्पादनांत पडला पाहिजे आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी

[९] The bargaining power of labour is ordinarily low relatively to employers. This may give rise to exploitation in the sense that labour will be paid a wage lower than the marginal productivity.

[१०] Statistical and factual evidence clearly indicates that the assumption on which the marginal productivity theory is based do not hold water today. Consequently the theroy ceases to be valid in its application to reality.

कीं, कोणत्याहि उत्पादनास सर्व घटकांचा हातभार लागत असल्यामुळें त्यांतील एखाद्या घटकाचा भाग नेमका बाजूस काढतां आला पाहिजे. प्रत्यक्षांत ह्या गोष्टी शक्यतेच्या कोटींतल्या वाटत नसल्यामुळें सीमान्त उत्पादकत्व ही गोष्ट अगदीं काल्पनिक आहे आणि त्याच्या अनुरोधानें मालकवर्ग मागणीचें मूल्य ठरवतो, असें म्हणणें वास्तवतेला संपूर्णपणें सोडून आहे, असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे. ह्या बाबतींत एवढेंच सांगतां येईल कीं, सीमान्त उत्पादकत्वाचें मापन करणें कठिण असलें तरी त्यामुळें ती कल्पना कुचकामाची ठरत नाहीं.[११] कारण कोणताहि कामगार कामावर घेतांना तो आपल्याला परवडतो कीं नाहीं, हें मालकाला ठरवावेंच लागतें आणि त्याच्या उत्पादकत्वाबद्दल कांहीं अंदाज बांधावाच लागतो. ह्या घटनेचा खुलासाच सीमान्त उत्पादकत्व ह्या अमूर्त कल्पनेंत दिलेला आढळतो. अर्थात् सीमान्त उत्पादकत्व ही एक उपयोगी अशी अमूर्त कल्पना आहे, असें मान्य केलें तरीं केवळ त्यामुळें सीमान्त उत्पादकत्वाचा सिद्धान्त वास्तवतेला सोडून आहे ह्या आक्षेपांतून त्या सिद्धान्ताची सुटका होत नाहीं. दुसऱ्या एका कारणाकरितां सीमान्त उत्पादकत्वाचा सिद्धान्त वास्तवतेला सोडून आहे, हें मान्य करावें लागतें. तें कारण असें कीं, सीमान्त उत्पादकत्वाचा सिद्धान्त कामगारांच्या बाजारपेठेंत पूर्ण स्पर्धा असेल तरच सार्थ ठरतो. प्रत्यक्ष जगांत अशी पूर्ण स्पर्धा अपवादात्मक आढळते. पूर्ण स्पर्धेच्या अभावीं सीमान्त उत्पादकत्व व कामगारांचें वेतन ह्यांत तफावत पडते. सीमान्त-उत्पादनक्षमता व वास्तवसृष्टींतील वेतन ह्यांच्यांत भेद आढळतो ह्याचें आणखी एक कारण असें कीं, गतिमान अर्थव्यवस्थेंत कामगाराची सीमान्त-उत्पादनक्षमता कधींच स्थिर नसते. अशा अर्थव्यवस्थेंत उपभोक्त्यांच्या आवडी-निवडी, घटकांची उत्पादनक्षमता, घटकांचा पुरवठा व उत्पादनतंत्र ह्यांच्यांत सतत बदल होत असतो. ह्यांपैकीं कोणत्याहि गोष्टींत बदल झाला म्हणजे काम-गारांची सीमान्त उत्पादनक्षमता बदलतेंच हें उघड आहे. सीमान्त उत्पादनक्षमता बदलल्यानंतर वास्तविक वेतनांत तावडतोब बदल व्हावयास हवा. पण तो होत नाहीं कारण वेतन बदलण्यास कांहीं कालावधि लागतो. सारांश, पूर्ण स्पर्धा असली तरीहि सीमान्त-उत्पादनक्षमता व वेतन ह्यांत नेहमींच फरक राहूं शकतो.[१२]

कार्यक्षमता सारखी असूनहि वेतनांत भेद आढळतो :—कामगारांच्या बाजार-पेठेंत पूर्ण स्पर्धा असेल तर सीमान्त उत्पादकत्वाएवढें वेतन ज्याप्रमाणें काम-गारवर्गाला मिळावयाला हवें त्याप्रमाणें एकाच प्रकारच्या व एकाच दर्जाचें काम करणाऱ्या कामगारांना सारखें वेतन मिळावयास हवें. नाहींतर समतोल प्रस्थापित व्हावयाचा नाहीं. **सीमान्त उत्पादकत्वाएवढें प्रत्येक कामगाराला वेतन**

---

[११] Although the assumptions of marginal productivity theory may not always be realized in practice the theory is of significance as an analytical tool and even the idea of exploitation of labour is explained with reference to marginal productivity.

व एकाच प्रकारचें एकाच दर्जाचें काम करणाऱ्या सर्वांना सारखे वेतन ह्या पूर्ण स्पर्धेच्या परिस्थितींत समतोल प्रस्थापित होणाऱ्या दोन शर्तीच आहेत, असें म्हणतां येईल. पण पूर्ण स्पर्धेच्या अभावीं सीमान्त उत्पादकत्व व कामगारांचें वेतन ह्यांत ज्याप्रमाणें तफावत पडते, त्याप्रमाणें कामगारांच्या बाजारपेठेंत पूर्ण स्पर्धा नसल्यामुळें एकाच प्रकारचें काम करणाऱ्या सर्व कामगारांना सारखेंच वेतन मिळत नाहीं. कामगारांच्या वेतनांत भेद निर्माण करणारीं तीन कारणें सांगतां येतील. पहिलें कारण असें कीं, एकाच प्रकारचें काम करणाऱ्या सर्व कामगारांची कार्यक्षमता सारखी नसते. सर्व परिमाणें सारखीं असणें व त्यामुळें सर्व परिमाणांचें मूल्य सारखें असणें हें पूर्णस्पर्धेचें महत्त्वाचें लक्षण आहे. पण एकाच प्रकारचें काम करणाऱ्या सर्व कामगारांची कार्यक्षमता सारखी असत नाहीं आणि त्यामुळें वेतनभेद निर्माण होतो. कार्यक्षमता सारखी नसल्यानें वेतनांत पडणारा फरक समजूं शकतो. पण सर्व कामगारांची कार्यक्षमता सारखी असूनहि वेतनांत फरक पडलेला दिसून येतो, हें लक्षांत घेण्याजोगें आहे. असा फरक पडण्याचें कारण असें कीं—आणि वेतनभेदाचें हें दुसरें कारण होय कीं—कामगाराची श्रमशक्ति कामगारापासून अलग करतां येत नाहीं. त्यामुळें श्रम करण्याच्या जागीं कामगारांचें शारीरिक अस्तित्व अपरिहार्य ठरतें. त्यामुळेंच कामगाराला कामावर घेतांना त्याच्या श्रमशक्तीबरोबर त्याचें व्यक्तिमत्वहि कधीं कधीं विचारांत घेतलें जातें आणि त्यामुळें कामगारा-कामगारांना एकाच मालकानें देऊं केलेल्या वेतनांत फरक पडला जाण्याची शक्यता निर्माण होते. वस्तुमूल्य-निश्चितीच्या प्रक्रियेचें विवेचन ज्या प्रकरणांत केलें आहे त्या प्रकरणांत मक्तेदार निरनिराळ्या ग्राहकांना वेगवेगळी किंमत कशी आकारूं शकतो, आणि त्यामुळें मूल्यभेद कसा निर्माण होतो हें दाखवलें आहे. वेतनाच्या बाबतींतसुद्धां **ग्राहकीय मक्तेदारी** (Monopsony) असल्यास म्हणजे एखाद्या प्रकारच्या कामगारांना रोजगार देणारा एखादाच मालक असल्यास किंवा रोजगार देणारांची संख्या लहान असल्यास कार्यक्षमता सारखी असूनहि सर्व कामगारांना सारखें वेतन दिलें जाईलच असें नाहीं. पूर्ण स्पर्धेत असा प्रकार व्हावयाचा नाहीं. कारण ज्यांना कमी वेतन एखाद्या मालकाडून दिलें जातें त्यांना त्याच मालकाला चिकटून रहावयाचें कारण नसतें. त्यांना अधिक वेतन देणारा कोणीतरी मालक भेटतोच !

---

[१२] Equality of wages to marginal productivity is not necessarily found in reality. Real labour market is never static. There is a ceaseless change in the ultimate determinents of economic activity such as tastes, knowledge, supply and efficiency of labour etc. As these things change, so the M. P. of labour changes with them. It does not follow, however, that because M. P. of labour has changed level of wages will change at once in the same direction.

गतिसौकर्याचा अभाव व वेतनभेद :—कमी वेतन मिळणारा कामगार अधिक वेतन मिळणाऱ्या ठिकाणीं सुकरतेनें जाऊं शकत असेल तर—म्हणजेच वेगळ्या शब्दांत कामगारांत **पूर्ण गतिसौकर्य** (Perfect Mobility) असेल तर—सर्व कामगारांचें वेतन सारखें असलेंच पाहिजे. प्रत्यक्षांत अशा प्रकारच्या गतिसौकर्याचा अभाव हें कामगारांत वेतनभेद निर्माण होण्याचें तिसरें कारण ठरत असल्याचें आढळून येतें. कामगाराची श्रमशक्ति ही आजच्या अर्थव्यवस्थेंत वस्तु समजून तिची खरेदी-विक्री होत असली तरी कामगाराच्या सर्वांगीण जीवनापासून ती अलग करतां येत नाहीं. एवढें लक्षांत ठेवलें म्हणजे कामगारांच्या बाबतींत पूर्ण गतिसौकर्याची अपेक्षा करणें कसें चूक आहे, ह्याचा सहज उलगडा होतो. कामगाराला एक काम सोडून दुसरीकडे जाणें सहजासहजी शक्य होत नाहीं. दुसरीकडे जावयाचें झालें म्हणजे नव्या परिस्थितीशीं समरस व्हावें लागतें. तें सर्वांना नेहमींच साधतें असें नाहीं. कामगार जेथें काम करतो तेथें कळत न कळत अनेक प्रकारच्या बंधनांनीं चांगलाच गुरफटला जातो आणि मग त्यांतून सुटका करून घेणें फार कठिण होतें. कामगार एखाद्या ठिकाणीं फार दिवस राहिला म्हणजे तें ठिकाण सोडणें त्याला सोपें नसतें. एखाद्या मालकाकड तो पुष्कळ काळ राहिलेला असला म्हणजे त्या मालकाला सोडून दुसऱ्या मालकाकडे जाण्यापूर्वी त्याला हजार वेळां विचार करावा लागतो. एखादे काम शिकून कामगार त्यांत तरबेज झालेला असला आणि कांहीं काळपर्यंत तो तें करीत असला म्हणजे दुसरें काम शिकणें व तें करूं लागणें त्याला अवघड होतें. सारांश, कोणत्याहि कामगाराला अवस्थान्तर, व्यवसायान्तर किंवा स्थलान्तर ह्यासारख्या गोष्टी करणें सामान्यपणें एक ना अनेक कारणामुळें कटकटीचें व अडचणीचें असतें आणि म्हणून इतर घटकांच्या तुलनेनें मनुष्यबळाच्या बाबतींत गतिसौकर्य बरेंच कमी असल्याचें उठावदारपणें दिसून येतें. गतिसौकर्याच्या अभावीं अनेक प्रकारचे वेतनभेद निर्माण होतात व टिकून राहतात.[13]

मनुष्यबळाचा एकंदर पुरवठा (Supply of Labour) :—वेतननिश्चिति कशी होते, ह्या प्रश्नाचा ऊहापोह आतांपर्यंत मुख्यतः मागणीच्या बाजूकडून केला. मागणीच्या बाजूस अपूर्ण स्पर्धा असल्यानें सीमान्त उत्पादकांच्या एवढें वेतन

[13] Wage differences may be due to the fact that there are differences in the efficiency of labourers. But a more important cause of wage differences is to be found in the imperfect mobility of labour as a factor of production. For a variety of socio economic reasons, labourers are not able to move freely from place to place, from one employer to another, from occupation to occupation. Besides the possibility of wage differentiation cannot be entirely ruled out.

जास्तींत जास्त म्हणून द्यावयाची मालकवर्गाची तयारी असूनहि सीमान्त उत्पादकत्वाचा सिद्धान्त वास्तवतेंत अनुभवास कसा येत नाहीं हें त्या ऊहापोहाचें सूत्र होतें. त्या सूत्राच्या अनुरोधानें कामगारांचें अज्ञान, त्यांची अगतिकता, त्यांच्यातील गतिसौकर्याचा अभाव इत्यादि वैगुण्यामुळें सीमान्त उत्पादकत्वापेक्षां वेतन कमी होण्यास कशी मदत होते, हें दाखविण्यापुरता पुरवठ्याचा बाजूचा उल्लेख केला आहे; पण पुरवठ्याच्या बाजूकडील वेतनावर परिणाम घडवून आणणाऱ्या मुख्य गोष्टींचा विचार मात्र आतांपर्यंत केला नाहीं. तो आतां केला पाहिजे.

कामगारांचा एकंदर पुरवठा व कामगारांच्या वेतनविषयक अपेक्षा हे वेतनावर परिणाम करणारे पुरवठ्याच्या बाजूकडील दोन महत्त्वाचे प्रवाह आहेत. त्यांतील पुरवठ्यांत दोन गोष्टींचा अंतर्भाव होतो. कामगारांचें संख्याबल ही त्यांतील पहिली गोष्ट आणि कामगारांचे प्रत्यक्ष श्रम—हे तासांच्या मापानें मोजण्याची पद्धत आहे—ही त्यांतील दुसरी गोष्ट.[१४] त्यांपैकी कामगारांचें एकंदर संख्याबळ लोकसंख्येवर—विशेषतः जिला कर्ती लोकसंख्या म्हणतां येईल अशा लोकसंख्येवर अवलंबून असतें. एकंदर लोकसंख्या वेतनावर अवलंबून असते कीं काय, हा प्रश्न अर्थशास्त्रांत बराच चर्चिला जात होता. वेतनासंबंधी किमान-चरितार्थ सिद्धान्त (Subistence Theory) म्हणून जो सिद्धान्त सांगितला जातो त्यांत वेतन व लोकसंख्या ह्यांचा विशिष्ट संबंध अभिप्रेत आहे. त्या सिद्धान्तानुसार किमान चरितार्थापलीकडे वेतन फार काळ जात नाहीं. तसें तें गेल्यास लोकसंख्या वाढून कामगारांचा पुरवठा वाढतो व वेतन कमी होतें. उलट किमान चरितार्थापेक्षां वेतन कमी झाल्यास मृत्युप्रमाण वाढून कामगारांचा पुरवठा कमी होऊन वेतन वाढतें. सध्यां हा सिद्धान्त मानला जात नाहीं. वेतन व लोकसंख्या ह्यांचा कार्यकारण संबंध आहे, असें म्हणतां येण्याजोगी परिस्थिति नाहीं. त्यामुळें वेतनाचा विचार करतांना एकंदर लोकसंख्या असेल ती गृहीत धरली जाते.[१५] ह्या बाबतींत एवढें मात्र म्हणतां येईल कीं, मागणीपेक्षां जेव्हां पुरवठा अधिक होतो किंवा आर्थिक विकास ज्या गतीनें होत असतो त्यापेक्षां वेगानें लोकसंख्या वाढत असते. तेव्हां वेतन कमी करणारे प्रवाह अर्थव्यवस्थेंत प्रभावी ठरूं पहातात.

कामगारांच्या पुरवठ्याचा विचार करतांना विशिष्ट उद्योगधंद्यांतील किंवा विशिष्ट प्रकारच्या कामगारांच्या पुरवठ्याचा विचार करणें अधिक योग्य ठरतें. देशांतील एकंदर कामगारवर्गाची वांटणी विविध श्रेणींत होत असते. कोणत्याहि

[१४] Labour is a two dimensional quantity, depending both on the number of labourers available and upon their efficiency i. e. the amount of labour each is able and willing to provide.

[१५] The question of the total Number of Labourers avialable in a community is one which modern economists are content to treat as lying outside the theory of wages.

एका काळीं मागणी-पुरवठ्याची परिस्थिति सर्व प्रकारच्या कामगारांच्या बाबतींत सारखी असते असें नाहीं. कांहीं उद्योगधंद्यांत किंवा कांहीं प्रकारच्या कामगारांत मागणीच्या मानानें कामगार-संख्या अल्प असेल तर इतरांच्या मानानें त्या ठिकाणीं वेतन अधिक मिळूं शकतें. देशांत कामगार-संख्या विपुल असूनहि विशिष्ट प्रकारच्या किंवा विशिष्ट उद्योगधंद्यांतील कामगारांचा तुटवडा पडूं शकतो. उदाहरणार्थ, सध्यां भारतांत डॉक्टर, इंजीनियर किंवा तंत्रज्ञ ह्यांची वाण पडत आहे आणि त्यामुळें भारताची लोकसंख्या अफाट असूनहि आणि भारतांतील वेतनप्रमाण सामान्यतः अल्प असूनहि वरील प्रकारच्या मनुष्यबळाला प्राप्त होणारे वेतनमान बरेंच आहे, हें सर्वश्रुत आहे. विविध प्रकारच्या कामगारांची मागणी-पुरवठ्याची परिस्थिति सारखी नसल्यामुळें निर्माण होणारा वेतनभेद नाहींसा होण्याची प्रवृत्ति अर्थव्यवस्थेंत नेहमींच असतें. ह्या प्रवृत्तीमुळें ज्या प्रकारच्या कामगारांना इतरांच्या तुलनेनें अधिक वेतन मिळतें त्या प्रकारच्या कामगारांची संख्या वाढूं पहाते. ज्या प्रकारच्या कामगारांना तुलनेनें कमी वेतन मिळतें त्या प्रकारचा कामगारवर्ग आपलें पहिलें काम सोडून जेथें वेतन अधिक मिळतें तेथें जाण्याचा प्रयत्न करूं लागतो. नव्यानें कामास उपलब्ध होणाऱ्या कामगारवर्गाचा ओघ तर निश्चितपणें जिकडे वेतन अधिक मिळतें तिकडे वळतो. वेतनांतील फरक नाहींसा करणारी प्रवृत्ति सफल होण्यासाठींच पूर्ण गतिसौकर्याची आवश्यकता असते. गतिसौकर्य कमी करणाऱ्या ज्या ज्या गोष्टी असतात त्या त्या वरील प्रवृत्तीच्या मार्गांत अडथळे आणतात. गतिसौकर्य कमी असल्यामुळें निर्माण होणारे अडथळे अल्पकाळच टिकतात आणि शेवटीं सर्वत्र वेतनमान सारखी करणारी प्रवृत्ति अतिशय प्रभावी ठरते, असा जबरदस्त विश्वास अर्थशास्त्रज्ञांना एका काळीं वाटत होता. आज हा विश्वास तेवढ्या जोरदारपणें दिसून येत नाहीं. कारण कामगारांचें गतिसौकर्य कमी करणाऱ्या गोष्टी अतिशय प्रभावी ठरूं शकतात व कित्येकदां वेतन सारखें करणाऱ्या प्रवृत्तीवर दीर्घ-काळपर्यंत सुद्धां मात करूं शकतात असा अनुभव आला आहे. ह्या बाबतींत सर्वसाधारण विधान एवढेंच करतां येईल कीं, केवळ वेतनाकडे पहाण्याची वृत्ति ज्या देशांतील कामगारवर्गांत जोरदारपणें दिसून येते त्या देशांत वेतन सारखें करणारी प्रवृत्ति अधिक प्रभावी असते आणि तिच्या अनुरोधानें वेतनाच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यास हरकत नसते. परंतु भारतासारख्या आर्थिक दृष्ट्या अप्रगत व सामाजिक तसेंच धार्मिक कल्पना व रूढी ह्यांचा विशेष पगडा असलेल्या देशांत कामगारांच्या गतिसौकर्याला विरोधी अशा प्रवृत्तींचा प्रभाव फार पडतो आणि त्यामुळें वेतन सारखें करणाऱ्या प्रवृत्तीची केवळ नोंद घेऊन कामगार पेठेच्या प्रत्येक विभागाचा स्वतंत्रपणें विचार करणें अधिक उचित ठरतें. कामगारांचे अकुशल व कुशल कामगारवर्ग असे दोन प्रमुख भाग पडतात. पैकीं अकुशल कामगारांचें वेतन सर्वसामान्यपणें सारखें होण्याची प्रवृत्ति दिसून येते. कारण त्यांच्यांतील गतिसौकर्य कुशल कामगारांच्या तुलनेनें बरेंच अधिक असतें. कुशल कामगारांचा पुरवठा मुख्यत्वेंकरून शिक्षणाच्या सोयी व शिक्षणाच्या

खर्चावर अवलंबून असतो. शिक्षणाची आवश्यकता जेवढी अधिक व शिक्षणाचा खर्च जेवढा जास्त तेवढा कामगारांचा तुटवडा अधिक तीव्रपणें भासतो व कामगारांच्या गतिसौकर्याच्या मार्गांतील अडथळेहि विशेष प्रमाणांत जाणवतात आणि त्यामुळें विविध क्षेत्रांतील कामगारांच्या वेतनांत उल्लेखनीय अशी तफावत आढळते, निर्माण होते आणि दीर्घकाळपर्यंत टिकून राहूं शकते.

श्रमप्रमाण :—श्रमशक्तीच्या पुरवठ्याच्या बाबतींत कामगारांकडून किती काम केलें जातें व कामगारांची कार्यक्षमता किती असते, ह्या प्रश्नांनाहि महत्त्व द्यावें लागतें. कामगारांची संख्या तीच राहूनहि कामगारांचे कामाचे तास वाढले किंवा त्यांची कार्यक्षमता वाढल्यामुळें त्यांच्याकडून तेवढ्याच वेळांत अधिक काम होऊं लागलें तर मनुष्यबळाचा पुरवठा वाढला असेंच मानावयास हवें. ह्या अर्थानें मनुष्यबळाचा पुरवठा वेतनावर किती प्रमाणावर अवलंबून असतो, हा ह्या बाबतींतला महत्त्वाचा प्रश्न आहे. वेतन व कार्यक्षमता ह्यांचा संबंध असतो हें अगदीं निश्चित आहे. जोंपर्यंत कामगाराला अत्यावश्यक वस्तु योग्य त्या प्रमाणांत मिळत नाहींत, तोंपर्यंत त्यांच्याकडून कार्यक्षमतेची अपेक्षा करणें व्यर्थ होय. ज्यांच्या महत्त्वाच्या गरजाहि भागत नाहींत अशा कामगारांचें वेतनमान वाढूं दिल्यास त्यांची कार्यक्षमता वाढेल अशी आशा करण्यास बरीच जागा असते. मात्र त्याहि पलीकडे वेतनमान सतत वाढत राहिल्यास कार्यक्षमताहि सतत वाढेल असें नाहीं. घटत्या फळाचा सिद्धान्त तेथेंहि अनुभवास येतो. पुढें पुढें ज्या प्रमाणांत वेतन वाढतें त्या प्रमाणांत कार्यक्षमता वाढत नाहीं आणि कांहीं काळानंतर वेतनवाढीचा कार्यक्षमतेवर कांहींच परिणाम होत नाहीं.[१६] कार्यक्षमता सारखी वाढत नाहीं. कारण एकतर घटत्या फळाच्या सिद्धान्तामुळें केवळ श्रमप्रमाणच वाढलें आणि बाकीच्या उत्पादनसाधनांत कांहींच भर न पडली तर उत्पादनांत त्या प्रमाणांत वाढ होऊंच शकत नाहीं आणि दुसरें म्हणजे विवक्षित मर्यादेपलीकडे वेतन वाढलें म्हणजे ज्यांचा कार्यक्षमतेशीं फारसा संबंध नसतो अशा वस्तूंवर कामगारांकडून खर्च केला जातो. त्यामुळें कामगारांचें रहाणीमान वाढतें; पण कार्यक्षमता विशेष वाढत नाहीं. ह्याच संदर्भांत हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, कामगाराची कार्यक्षमता वेतनावर मुख्यत्वेंकरून अवलंबून असली तरी ज्या परिस्थितींत कामगार काम करतो तीवरहि ती बऱ्याच प्रमाणांत अवलंबून असते. कामगाराची रहाण्याची जागा, कामाचे तास, कामाच्या वेळा, काम करण्याच्या जागेंतील सोयी गैरसोयी इत्यादि गोष्टी कार्यक्षमतेवर अनुकूल परिणाम किंवा प्रतिकूल परिणाम करूं शकतात. ह्या बाबतींतहि कांहीं विवक्षित प्रमाणापर्यंत ह्या सर्व सोयी वाढल्या तर कार्यक्षमतेंत उल्लेखनीय अशी वाढ होते; पण त्यानंतर मात्र त्या सोयींवर होणारा खर्च व कामगाराची कार्यक्षमता ह्यांचें व्यस्त प्रमाण पडत जातें.

[१६] If the wages of a large group of men are increased there will nearly always be some favourable reaction on efficiency but the higher the wage, the smaller is that reaction likely to be.

वरील विवेचनाचा निष्कर्ष असा कीं, जेव्हां कामगारांचें जीवनमान किमान-पेक्षां असते आणि कामाची परिस्थिति विशेषशी चांगली नसते तेव्हां कामगारांचें वेतन वाढविणें व त्यांच्या कामाच्या परिस्थितींत सुधारणा करणें अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनें निश्चितपणें हितकारक असतें. पण तरीहि नफ्याच्या दृष्टीनें ज्या अर्थव्यवस्थेंत सर्व निर्णय घेतले जातात, त्या अर्थव्यवस्थेंतील मालकवर्ग कामगारांचें वेतनमान वाढविण्यास उद्युक्त होत नाहीं. ह्याचें एक महत्त्वाचें कारण आहे. तें असें कीं, वाढलेलें वेतन ताबडतोब द्यावें लागतें. कार्यक्षमता लगेच वाढत नाहीं. ती वाढून तिचे दृश्य परिणाम दिसण्यापूर्वी बराच कालावधि जावा. त्यामुळें कमी वेतनावर पुरेसा कामगारवर्ग उपलब्ध होण्यास परिस्थिति अनुकूल असली तर कार्यक्षमता पुढें केव्हांतरी वाढेल, ह्यावर विसंबून वेतनमान वाढविण्यास मालकवर्ग तयार होत नाहीं.

वेतनमान व काम करण्याची तयारी:—कामाच्या प्रमाणांत वेतनमान वाढूं लागल्यास अधिक वेतनमान मिळविण्यासाठीं कामगारवर्ग अधिक काम करण्यास तयार होईल काय, हा एक वेतनविषयक विवेचनांत वादग्रस्त प्रश्न समजला जातो. कामगार जेवढें अधिक काम करील तेवढा मोकळा वेळ त्याला कमी लाभतो. निराळ्या शब्दांत वेतन वाढवून घेण्यासाठीं मोकळ्या वेळाचा व मोकळा वेळ वापरून ज्या ज्या गोष्टी मिळूं शकतात त्या त्या सर्व गोष्टींचा त्याग करावा लागतो. ह्या परि-स्थितींत वाढत्या वेतनाचा रहाणीमानावर होणारा अनुकूल परिणाम जमेच्या बाजूस रून व मोकळा वेळ कमी होण्यापासून होणारे तोटे दुसऱ्या बाजूस घेऊन कामगाराला काम किती करावें, ह्याचा निर्णय घ्यावा लागतो. वेतन वाढल्यामुळें कामगार अधिक काम करीलच किंवा वेतन कमी झाल्यास तो कमी काम करील किंवा निराळ्या शब्दांत पुरवठ्याचा सिद्धान्त कामगाराच्या काम करण्याच्या तयारीला हमखासपणें लागू पडेल, असें ठामपणें सांगतां येईल असें वाटत नाहीं. हा खरोखर मनुष्यस्वभावाचा प्रश्न आहे. सर्व देशांना लागू पडेल असें सरसकट विधान करणेंहि जरा कठीणच आहे; पण तरीहि एवढें म्हणण्यास हरकत नाहीं कीं जोंपर्यंत आपल्याला योग्यसें रहाणीमान लाभलेलें नाहीं अशी कामगाराची कल्पना असते तोंपर्यंत अधिक मोकळा वेळ व अधिक उत्पन्न ह्यांत कामगारांकडून अधिक उत्पन्नालाच प्राधान्य दिलें जाण्याचा संभव असतो पण आपले रहाणीमान कमी नाहीं अशी एकदां कामगारांची कल्पना झाली कीं, मग त्यानंतर मात्र मोकळा वेळ मिळण्याला अधिक महत्त्व देण्याची प्रवृत्ति कामगारांत निर्माण होते. त्यामुळें होतें काय कीं, जेव्हां वेतनमान कमी असतें तेव्हां वेतन वाढलें तरी कामगार अधिक काम करतात आणि कमी झालें तरी अधिक काम करतात. वेतनाचा ताशीं किंवा उत्पादित वस्तूच्या प्रत्येक परिमाणाचा दर वाढल्यास कामगार वाढलेल्या वेतनाचा फायदा घेऊन आपलें रहाणीमान वाढविण्याच्या उद्देशानें अधिक काम करतात आणि वेतनाचा दर कमी झाल्यास आपलें घसरतें रहाणीमान सावरावें म्हणून अधिक काम करतात. जेव्हां कामगारांच्या रहाणीमानाच्या कल्पनां-

पेक्षां वेतनमान अधिक असतें तेव्हां वेगळाच प्रकार होतो. त्या परिस्थितींत वेतनमान वाढलें म्हणून कामगार अधिक काम करण्यास उद्युक्त होतील, असा भरंवसा देतां येत नाहीं. थोडेंबहुत वेतन कमी झालें म्हणून त्याची भरपाई करण्यासाठीं अधिक काम करूं लागतीलच असाहि निर्वाळा देतां येत नाहीं. [१७] ह्या विवेचनाच्या संदर्भांत एक गोष्ट मुद्दाम लक्षांत ठेवली पाहिजे. ती अशी कीं, कामगारांच्या रहाणीमानाच्या कल्पनांना––ह्या देशकालपरिस्थितीप्रमाणें बदलणाऱ्या असतात––काम करण्याची कामगारांची जी तयारी असते तिच्या संबंधांत फार महत्त्वाचें स्थान असतें. त्यामुळें ठोकळेबाजपणाचा कोणताहि सिद्धान्त ह्या संबंधांत सांगून चालत नाहीं.

कामगारांच्या वेतनविषयक अपेक्षा :—कामगारांच्या रहाणीमानाच्या कल्पनांचा काम करण्याच्या तयारीवर ज्या प्रमाणें परिणाम होतो त्यचप्रमाणें वेतनावरहि परिणाम होतो. कारण वेतन किती स्वीकारावयाचें, ह्यासंबंधीच्या कामगारांच्या अपेक्षा रहाणीमानावरच अवलंबून असतात. तांत्रिक भाषेंत असें म्हणतां येईल कीं, मनुष्यबळाच्या पुरवठ्याचें मूल्य रहाणीमानावर अवलंबून असतें. ज्या रहाणीमानाची कामगाराला संवय झालेली असते तें रहाणीमान आपल्याला व आपल्या कुटुंबियांना लाभावें, अशी कामगाराची साहजिकच इच्छा असते आणि त्या रहाणीमानाच्या अनुरोधानें कामगाराच्या वेतनविषयक अपेक्षा ठरत असतात. रहाणीमानाच्या कल्पना देशकालपरिस्थिति-सापेक्ष असतात. कामगाराचें रहाणीमान वेतन अधिक मिळूं लागल्यामुळें वाढलें—मागणीच्या परिस्थितीमुळें तसेंहि होऊं शकतें—आणि दीर्घकाळपर्यंत तें तसेंच राहिलें तर आपलें रहाणीमान वाढलेल्या पातळीवर टिकून रहाण्यासाठीं कामगारवर्ग पराकाष्ठा करतो, असा अनुभव इंग्लंड, जर्मनी, अमेरिकादि प्रगत देशांच्या आर्थिक इतिहासांत आलेला आहे. एकदां रहाणीमान वाढलें कीं, कामगारांच्या वेतनविषयक अपेक्षाहि उंचावतात. ह्याच्या उलट निकृष्ट रहाणीमानाची कामगारांना एकदां संवय झाली कीं, कामगारांचें वेतन सुधारणें दुर्घट होऊन बसतें. त्या परिस्थितीचा फायदा घेण्यास मालकवर्ग टपलेलाच असतो आणि त्यांतच मागणीपेक्षां पुरवठा फार, अशी परिस्थिति असली आणि पूर्ण स्पर्धेच्या लक्षणांचा अभाव असला म्हणजे मग बोलावयासच नको. अशा प्रकारें वेतननिश्चितीच्या प्रक्रियेंत कामगारवर्गाच्या रहाणीमानाला बरेंच महत्त्व आहे. सीमान्त उत्पादकामुळें कामगारांचें वेतनमान ठरतें, असें म्हणणें जसें बरोबर होणार नाहीं तसेंच रहाणीमानावरच वेतनमान अवलंबून असतें, असें म्हणणेंहि बरोबर होणार नाहीं. पहिल्या विधानांत पुरवठ्याची बाजू उपेक्षिली जाते आणि दुसऱ्या विधानांत मागणीच्या बाजूकडे दुर्लक्ष केलें जातें; पण मनुष्यबळाचा पुरवठ्याच्या रहाणीमानाशीं संबंध असतो असें म्हणणें फारसें चूक होणार नाहीं. अर्थात्

[१७] Although the reduction of a poor man's wage may generally make him willing to work hard—this is less certain in the case of a rich man.

ह्या बाबतींतहि अप्रगत देश व प्रगत देश ह्यांमध्यें फरक असल्याचें दिसून येतें. अप्रगत देशांत कामगारवर्गाचें मुळांतील रहाणीमान निकृष्ट असल्यानें कोणत्याहि वेतनावर सर्वच्या सर्व कामगारवर्ग रोजगारास तयार होतो. त्या दृष्टीनें पाहिल्यास अप्रगत देशांतील कामगार वर्गाचा पुरवठा ताठर असतो आणि वेतनमान मुख्यतः मागणीच्या बाजूवर अवलंबून असतें असें म्हणतां येईल. प्रगत देशांतील कामगार-वर्ग मात्र विशिष्ट रहाणीमानासाठीं अडून रहाण्याचा संभव असतो आणि त्यामुळें वेतनमान व कामगारवर्गाची उपलब्धता ह्यांचा संबंध जोडला जातो. ज्या कामासाठीं विशिष्ट शिक्षणाची आवश्यकता असते तीं कामें करणारा आपल्या रहाणीमानाखेरीज शिक्षणाचा खर्च, त्याकरितां लागणारा काळ इत्यादि गोष्टीहि विचारांत घेतो. देश प्रगत असो वा अप्रगत असो, कुशल व शिक्षित कामगारांची उपलब्धता रहाणीमानावर व पर्यायानें वेतनावर अवलंबून असते हें निर्विवाद होय. त्या संबंधांत वेतन जेवढें अधिक तेवढी कामगारांची उपलब्धता अधिक, हा पुरवठ्याचा सर्वमान्य सिद्धान्त सर्वसाधारणपणें लागू पडतो असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सांघिक सौदा :—वेतनमान निश्चित होण्यास प्रक्रियेवर परिणाम करणारी एक प्रभावी शक्ति अलीकडल्या काळांत निर्माण झाली आहे. ती शक्ति म्हणजे कामगारांचें संघटन ही होय. अमेरिकेसारख्या प्रगत देशांत बहुतेक सर्व उद्योगधंद्यांत प्रबळ अशा कामगार संघटना अस्तित्वांत आहेत व वेतन निश्चितीच्या प्रक्रियेंत कामगारसंघटनांना महत्त्वाचें स्थान मिळूं लागलें आहे. कामगारसंघटना प्रबळ झाल्या-नंतर कोणत्याहि उद्योगधंद्यांतील वेतनप्रमाण वैयक्तिक मालक व वैयक्तिक कामगार ह्यांच्यातील वाटाघाटीनें न ठरतां एका बाजूस मालक व दुसऱ्या बाजूस कामगार-संघटना ह्यांच्यांतील वाटाघाटीमुळें ठरते. म्हणजेच कामगार व मालक ह्यांच्यांत स्वतंत्रपणें सौदा न होता मालक व कामगारवर्ग ह्यांच्यांत सौदा होऊं लागतो. ह्या सौद्यांत कामगारवर्ग सामुदायिकरीत्या भाग घेत असल्यामुळें वेतन निश्चितीच्या ह्या पद्धतीला **सांघिक सौदा** (Collective Bargaining)[१८] असें नांव प्राप्त

[१८] Collective bargaining is a method of selling the terms and conditions of employment of employers. As such it can be contrasted with two other method of viz. individual bargaining and public regulation. Individual bargaining takes place when an individual employees comes to an agreement with his employer without entering into any arrangment with other employees in doing so. Public regulation provides for the legal enforcement of minimum conditions of employment. Collective bargaining involves in the first place, employees acting together. This they normally achieve by entrusting a representative organisation, a Trade union with the task of bargaining on their behalf.

झालें आहे. अमेरिकेसारख्या देशांत अलिकडे बहुधा सांघिक सौदा पद्धतीनेंच वेतन निश्चिती होते. तेथें कांहीं उद्योगधंद्यांतील कामगार संघटना एवढ्या प्रबळ आहेत कीं, त्यांना मनुष्यबळाच्या पुरवठ्याच्या बाबतींत मक्तेदारीचेंच सामर्थ्य प्राप्त झालें आहे. त्यामुळें विशिष्ट वेतनाचा आग्रह जोरदारपणें त्या धरतात व तें वेतन मिळविण्यांत यशस्वी होऊं शकतात. ह्या अनुभवामुळें कामगारवर्ग संघटित झाला म्हणजे त्या घटनेचे वेतनमानावर कोणकोणत्या प्रकारचे परिणाम होऊं शकतात, हा मजूरविषयक प्रश्नांचा अभ्यास करणारांना एक नवाच विषय झाला आहे. त्या विषयाचा थोडासा विस्तारानें विचार करणें आवश्यक आहे.

कामगारसंघटना व वेतनमान :—ह्या प्रकरणांत मागणीच्या बाजूचा विचार करून असा निष्कर्ष काढण्यांत आला आहे कीं, मागणीच्या बाजूला पूर्ण स्पर्धा असेल व पुरवठ्याच्या बाजूला महत्त्वाचीं वैगुण्यें नसतील तर सीमान्त उत्पादकत्वाएवढें वेतन कामगारांना मिळूं शकते; पण मागणीच्या बाजूकडील अपूर्णत्व व पुरवठ्याच्या बाजूकडील वैगुण्यें कामगारांना सीमान्त उत्पादकत्वाएवढें वेतन मिळण्याच्या आड येतात. ह्यांपैकीं पुरवठ्याच्या बाजूकडील वैगुण्यें दूर करून कामगारांची लुबाडणूक थांबविण्याची बहुमोल कामगिरी कामगारसंघटना करूं शकतात. कामगारांच्या आर्थिक स्थितींत सुधारणा घडवून आणणें हेंच कामगार संघटनांचे प्रमुख कार्य असतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. **कामगारांचे आर्थिक हितसंबंध सुरक्षित राखणें व कामगारांची आर्थिक स्थिति सुधारणें हें जिचें ध्येय आहे अशी संस्था अशीच मुळीं कामगार संघटनेची व्याख्या करण्यांत येते.** कामगार संघटना सामाजिक, शैक्षणिक कार्यें करीत नाहींत किंवा त्यांनीं तीं कार्यें करणें योग्य नाहीं असें म्हणतां यावयाचें नाहीं. पण एक तर त्या कार्यांना दुय्यमस्थान असतें आणि दुसरें म्हणजे मुख्य कार्याला पोषक असणारीच इतर कार्यें अशा संघटना करतात.[१९] कामगारांत शिक्षणप्रसार करणें, कुटुंबनियोजनाचा प्रभावी प्रचार करून कामगारांना त्यासाठीं प्रवृत्त करणें, सांस्कृतिक कार्याची कामगारांत आवड निर्माण करणें हीं कामगारसंघटनांची प्रमुख विधायक कार्यें समजलीं जातात. हीं सर्व कार्यें परिणामीं पुरवठ्याच्या बाजूकडील दोष दूर करण्यास मदत करून कामगाराचें बळ वाढवितात हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

---

[१९] A labour organisation may be defined as an association of employers designed primarily to maintain or improve the condition of employment of its members. Although labour organisations may perform social, charitable and religious functions as they are labour organisations only if their primary purpose is to further the economic interest of members as employers.

मनुष्यबळाची विपुलता, दारिद्र्य, अज्ञान व वैयक्तिक कामगारांची दुर्बलता हे पुरवठ्याच्या बाजूकडील प्रमुख दोष होत. हे चारी दोष कमीजास्त प्रमाणांत दूर करणें कामगारसंघटनांच्या आवाक्यांतलें आहे. कामगारांचें संघटन झाल्यास प्रत्येक कामगाराला संघटनेचा पाठिंबा मिळून त्याचें व्यक्तिगत दौर्बल्य आपोआपच नाहींसें होतें. कोणत्याहि कामगारसंघटनेला आपल्या सदस्यांचें अज्ञान दूर करून वेतनविषयक, मागणीविषयक, परिस्थितीची योग्य कल्पना करून देणें मुळींच कठीण नाहीं. कामगारवर्ग दरिद्री असल्यानें प्रामुख्यानें निर्माण होणारी अडचण ही कीं, कामगारांत कांहीं काळपर्यंत ओढून धरण्याची कुवत मुळींच नसते. ती कुवत कामगारसंघटनांच्या निधीचा आधार कामगारवर्गाला मिळाल्यास कांहीं प्रमाणांत तरी निर्माण होते आणि त्यामुळें कामगारांचा बराच फायदा होतो. कामगारसंघटना मोठी असली तरी विशिष्ट वेतन मिळाल्यासच कामगारवर्ग रोजगारासाठीं उपलब्ध होईल, अशी परिस्थिति निर्माण करून विपुलतेचा दोष कमी करणेंहि कामगारसंघटनांना साधूं शकतें. मात्र ह्या ठिकाणीं एक गोष्ट लक्षांत ठेवणें अत्यावश्यक आहे. ती अशी कीं, वर उल्लेखलेले जे दोष आहेत ते कामगारांना योग्य वेतन मिळण्याच्या तर आड येतातच; पण कामगारसंघटनांचा उदय होऊन त्यांची निकोप वाढ होण्याच्याहि आड येतात. कामगारवर्ग अज्ञानी असेल तर संघटनांपासून होणाऱ्या फायद्यांचा उमज त्यांना लौकर पडत नाहीं. कामगारवर्ग दरिद्री असेल तर कामगारसंघटनांकडे कोणत्याहि परिस्थितींत पुरा पडेल, असा निधि जमा होत नाहीं. अगतिक असलेला कामगारवर्ग दीर्घ काळानें फळ देणाऱ्या संघटन-मार्गावर विश्वास ठेवण्यास सहजासहजीं तयार होत नाहीं. कामगारवर्ग संख्येनें विपुल असला म्हणजे त्या वर्गांत फुटीरपणा निर्माण होण्याचा, त्याचा कांहीं भाग नेहमींच संघटनांच्या बाहेर रहाण्याचा आणि संघटना प्रबल झाल्या तरीहि बेकारी निर्माण होऊन तिचा संघटनांवर अनिष्ट परिणाम होण्याचा संभव असतो. त्यामुळें अनुभव असा येतो कीं, वरील दोष असूनहि जेव्हां परिस्थितीचा भेद करून कामगार-संघटनांची वाढ होते तेव्हां त्यांचा कामगारांना उपयोग होऊं शकतो. त्याहीपेक्षां जगाच्या आर्थिक इतिहासांत व्यापकपणें आलेला अनुभव असा कीं, आधीं कामगारांची स्थिति सुधारूं लागते आणि नंतर कामगारसंघटनाची वाढ होऊन ती स्थिति टिकविण्यासाठीं त्या संघटनांचा उपयोग होतो. इंग्लंड, जर्मनी आणि अमेरिका ह्या देशांचा इतिहास असें दाखवितो कीं, आर्थिक विकासाचीं चक्रें फिरूं लागलीं म्हणजे कामगारांची स्थिति मागणीच्या प्रभावामुळें सुधारते आणि त्यांतून कामगार-चळवळीचा उद्भव होतो. एकदां ती चळवळ प्रबळ झाली म्हणजे मग मात्र ती कामगारांचा खराखुरा आधारस्तंभ होते. पुरवठ्याच्या बाजूकडील वर ज्या वैगुण्यांचा उल्लेख केला आहे तीं वैगुण्यें तर कामगारचळवळीमुळें दूर होतातच; पण त्याखेरीज गतिसौकर्यांतहि कामगारचळवळीमुळें वाढ होते. कामगारचळवळीचें क्षेत्र बरेंच वाढलें म्हणजे इतर कोणत्याहि गोष्टींपेक्षां वेतनाला प्राधान्य देण्याची प्रवृत्ति

कामगारांत वाढूं लागते आणि त्यामुळें गतिसौकर्य वाढण्यासहि मदत होते· मागणीची बाजू कामगारसंघटनांच्या कक्षेबाहेर पडते हें खरें पण तरीहि विशिष्ट वेतनासाठीं अडून रहाण्याची शक्ति कामगारचळवळीमुळें कामगारवर्गांत आल्यास मागणीच्या बाजूस अपूर्ण स्पर्धा असली तरी कामगारांची लुबाडणूक होऊ नये म्हणून म्हणजे सीमान्तउत्पादकत्व मूल्य कामगारांना मिळावें म्हणून—आग्रह धरणें कामगार-संघटनांना शक्य होतें. ह्या सर्व विवेचनाचा निष्कर्ष असा कीं, **जें वेतन देण्याची मालकवर्गाची तयारी असते, पण परिस्थितीचा फायदा घेतां आल्यामुळें त्यांना टाळतां येते तें वेतन कामगारांना मिळवून देण्यास कामगारसंघटना समर्थ असतात.** अमेरिकेंतला अनुभव निश्चितपणें असा आहे कीं ज्या उद्योगधंद्यांत व ज्या शहरांत कामगार संघटना प्रबळ व प्रभावी असतात त्यांत वेतनमान इतर उद्योग-धंदे व ठिकाणापेक्षां अधिक असते.[२०]

कामगारसंघटनाच्या मर्यादा :—कामगारांना अधिक वेतन मिळवून देण्याचें कामगारचळवळीचें सामर्थ्य अमर्यादित असतें काय, असा प्रश्न येथें उपस्थित होतो. कामगारचळवळीच्या सामर्थ्याबद्दल लिहितांना वर सीमान्त उत्पादनमूल्य प्रमाण म्हणून धरलें आहे; पण खरी गोष्ट अशी असते कीं, सीमान्त उत्पादकत्वाशीं कामगार-संघटनांना कांहीं कर्तव्य नसते. कामगारसंघटना आग्रह धरतात तो कामगारवर्गाला जीवनवेतन (Living wage) मिळावें म्हणून. जीवनवेतन ज्या उद्योगधंद्यांत परवडत नाहीं त्या उद्योगधंद्याच्या अस्तित्वाचेंच समर्थन करतां येणार नाहीं अशीच कामगार-संघटनांची वृत्ति असते.[२१] जीवनवेतन ह्या शब्दप्रयोगाची निश्चित व्याख्या करणें शक्य नाहीं; पण स्थल-काल-परिस्थिति व कामगाराची कार्य-क्षमता ढांसळूं न देण्याची आवश्यकता लक्षांत घेऊन अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य ह्या मूलभूत गरजा विशिष्ट प्रमाणांत भागविण्यासाठीं जें वेतन आवश्यक असतें त्या वेतनाला जीवनवेतन म्हणावें असा अर्थ त्या शब्दप्रयोगाला प्राप्त झाला आहे. तें वेतन कामगारवर्गाला मिळवून देणें हें साहजिकच कामगारचळवळींचें किमान उद्दिष्ट असतें. फार प्रबळ झालेली कामगार-संघटना जीवनवेतनावर संतुष्ट होईल असें सांगतां येत नाहीं· त्यापेक्षांहि पुष्कळच अधिक अशा वेतनमानाचा ती आग्रह धरणेंहि संभवनीय आहे. एखादी कामगार संघटना ज्या वेतनाचा आग्रह धरतें

[२०] Most of the wage differential is doubtless due to union organisation and action—In Industry after industry changes in wage rates relatively to general wage leval have gone hand in hand with changes in the organised strength of the union in that industry—**Lester**.

[२१] If an industry cannot pay the workers engaged in it a reasonable wage, it is in the interests of the community that it should cease operations and that such workers should be absorbed in some other and more profitable industry.

तें जीवनवेतन असो अगर त्यापेक्षां अधिक असो, तें वेतन मिळविण्यांत कामगार संघटना किती प्रमाणांत यशस्वी होते व होत असल्यास त्या घटनेचें कामगारांच्या रोजगारांवर काय परिणाम होतो हें प्रश्न महत्वाचें आहेत.

वरील प्रश्नाबाबत प्रथमच एक गोष्ट स्पष्ट करण्यास हरकत नाहीं. ती अशी कीं, कामगारवर्गाला हवें असलेले वेतन सीमान्त उत्पादकाच्या अनुरोधानें मालकवर्ग द्यावयास तयार असलेल्या वेतनाएवढें अगर त्यापेक्षां कमी असल्यास कामगारांना जीवनवेतन मिळवून देण्यांत कामगारसंघटनाना यश मिळविणें कठिण नसतें. अर्थात् तेवढें वेतन कामगारांना देण्यांतहि मालकवर्ग खळखळ करतो आणि त्यामुळें संघर्ष निर्माण होतो; पण त्यांतून कालान्तरानें कां होईना, सर्वांचें समाधान करील अशी तडजोड निघूं शकते. पण जास्तींत जास्त म्हणून जें वेतन द्यावयास मालक तयार असतो त्या वेतनापेक्षां जीवनवेतन अधिक असल्यास कामगारसंघटनांच्या सामर्थ्याची कसोटी लागते. तशा परिस्थितींत कामगार संघटनाना यश लाभेल काय आणि लाभल्यास तें यश शुद्ध म्हणजे कोणत्याहि अनिष्ट परिणामापासून अलिप्त असें यश असूं शकेल काय, हा विचार विशेष महत्त्वाचा आहे.

जीवनवेतन अंशतः निश्चितपणें करण्याचे परिणाम :—मालकवर्ग द्यावयास तयार असलेल्या वेतनापेक्षां जीवनवेतन अधिक असण्याचे परिणाम भिन्न भिन्न परिस्थितींत भिन्न भिन्न प्रकारचे होतात. सर्वसामान्यपणें असें सांगतां येईल कीं, ज्या उद्योगधंद्यांत कामगारसंघटनांच्या दडपणामुळें जीवनवेतन द्यावें लागतें—हें वेतन सीमान्त उत्पादकत्वापेक्षां अधिक आहे असें ह्या विवेचनांत गृहीत धरलें आहे—त्या उद्योगधंद्यांत नफ्याचें प्रमाण कमी होतें. ह्यामुळें होतें काय कीं, एखाद दुसऱ्या अगर कांहीं उद्योगधंद्यांतच जीवनवेतन द्यावें लागलें तर अशा उद्योगधंद्यांतून भांडवल बाहेर पडूं पहातें आणि जेथें वेतननियंत्रण नसेल तेथें गुंतविलें जातें. त्यामुळें अशा उद्योगधंद्यांतील रोजगार कमी होतो व इतरत्र वाढण्याचा संभव निर्माण होतो. त्यामुळें तात्त्विक दृष्ट्या कामगारवर्गावर विपरीत परिणाम होण्याचें कारण नसतें. कांहीं क्षेत्रांत जी बेकारी निर्माण होते तेवढाच रोजगार इतरत्र क्षेत्रांत उपलब्ध झाल्यास एकंदर रोजगार दीर्घकाळांत संकुचित होत नाहीं. पण अल्पकाळाचा विचार केला तर कांहीं क्षेत्रांतीलच वेतन कृत्रिमरीत्या वरच्या पातळीवर नेल्यास होणारे परिणाम कामगारवर्गाला बाधक ठरतात. कारण त्या क्षेत्रांतील बेकारीमुळें होणारे परिणाम टाळण्यासाठीं जें संक्रमण व्हावें लागतें तें सौकर्यानें होत नाहीं. कितीहि प्रयत्न केला तरी कामगारांतील गतिसौकर्य कमी असतें, ही गोष्ट जेथें तेथें नडते. त्यामुळें कामगारवर्गाच्या कांहीं भागावर तरी नव्यानें उद्भवलेल्या बेकारीचा कायमचा वाईट परिणाम होतो. तसेंच कांहीं क्षेत्रांत जीवन वेतन असेल व इतरत्र नसेल तर एक नव्या प्रकारचा वेतनभेद निर्माण होतो व त्यामुळें कामगारा-कामगारांच्या जीवनांत विषमता दिसूं लागते. ज्या क्षेत्रांत कामगारसंघटना जोरदार

नसतात त्या क्षेत्रांत इतरत्र बेकार झालेले कामगार मोठ्या संख्येनें असल्यामुळें तेथील वेतनमानाची पातळी कमी होण्याचा संभवहि ह्या संदर्भांत लक्षांत घेतला पाहिजे. तसेंच ज्या उद्योगधंद्यांत वेतन निश्चित केलें जातें त्या उद्योगधंद्यांतील उत्पादनाच्या किंमती वाढण्याचा संभवहि लक्षांत ठेवणें जरूरीचें आहे. सारांश, अर्थव्यवस्थेच्या कांहीं क्षेत्रांतील वेतनप्रमाण कृत्रिमरीत्या वरच्या पातळीवर गेल्यास एकंदर कामगारवर्गाचें हित साधेल, असा निर्वाळा देतां येत नाहीं. कामगारवर्गाच्या कांहीं भागाचा फायदा होतो व त्यामुळें उरलेल्या भागाचा तोटा होतो.[२२]

जीवनवेतन अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रांत कामगारचळवळीच्या प्रभावामुळें ठरलें गेल्यास नफ्याचें प्रमाण सर्वत्र कमी होऊन उत्पादनावर व पर्यायानें एकंदर रोजगारावर विपरीत परिणाम होण्याचा धोका असतो.[२३] त्यामुळें कृत्रिमरीत्या अधिक वेतन सर्व उद्योगधंद्यांत दिल्यास अखिल कामगारवर्गाला तें हितकारक होईल, असा निर्वाळा देतां येत नाहीं. कामगारावर सर्वच उद्योगधंद्यांत बेकारीची कुऱ्हाड कोसळते आणि एका उद्योगधंद्यांत बेकार झालेले लोक दुसऱ्या कोणत्याहि उद्योगधंद्यांत मुरवले जाण्याची शक्यता शिल्लकच राहत नाहीं. ज्यांचा रोजगार टिकून राहील त्यांचाच काय तो फायदा होतो. पण तो कितपत होतो, ह्याबद्दल थोडें साशंकच राहावें लागतें. कारण सर्वत्र उत्पादन घटल्यामुळें व कामगारांचें वेतन वाढल्यामुळें वस्तूचें किंमतीमान वाढण्याची जी शक्यता असते तीहि लक्षांत घ्यावी लागते. वेतनखर्च वाढूनहि किंमती तेवढ्याच राहिल्या तर नफ्याचें मान निश्चितपणें कमी होतें.

किमानवेतनाची कायद्यानें निश्चिति :—वरील विवेचनांत जीवनवेतन देण्यास मालकांना कामगारसंघटनांच्या दडपणामुळें भाग पडतें, असें गृहीत धरून त्या घटनेचे परिणाम दर्शविले आहेत. पण वरील विवेचन जसेंच्या तसें किमानवेतन (Minimum Wages) कायद्यानें जेव्हां ठरवलें जातें तेव्हांहि लागू पडतें किमानवेतन जीवनवेतनाएवढेंच असते असें नाहीं. तें त्यापेक्षां कमी अगर अधिकहि असूं शकेल. पण तात्त्विक विवेचनाच्या दृष्टीनें तो प्रश्न महत्त्वाचा

[२२] A raising of wages above the competitive level will contract the demand for labour. In the case of a partial control of wages the important effect is the redistribution of labour. The unemployed labour will find employment in unregulated industry. A wage difference between regulated and unregulated industries is bound to arise.

[२३] If the wage control is general and there is no scope for the absorption of unemployed labour in other industries the unemployment which results is not temporary. It continues until the long run economic forces which determine competitive wage levels have removed it.

नाहीं, किमानवेतन सीमान्त-उत्पादनमूल्यापेक्षां कमी कीं अधिक हा प्रश्न खरा महत्त्वाचा असतो. किमानवेतन सीमान्त-उत्पादनमूल्यापेक्षां कमी असल्यास कायद्याची अमलबजावणी सुकर होऊं शकते. पण जेव्हां तें अधिक असतें तेव्हां मात्र संघर्षाचा प्रसंग उद्‌भवतो. त्या परिस्थितींतहि कायद्याची अंमलबजावणी कडक असल्यास अशा कायद्याच्या यशस्वितेबद्दल शंका घेण्यास जागा राहात नाहीं. पण कायद्यांतील प्रधान हेतु जरी साधला गेला तरी इतर बाबतींत कायद्याचे दुष्परिणाम होणारच नाहींत, अशी हमी कोणतेंहि सरकार देऊं शकत नाहीं. जीवनवेतनविषयक कायद्याचें तसेंच आहे. जीवनवेतन कायद्यानें ठरविलें गेलें काय किंवा कामगारसंस्थांच्या दडपणामुळें मालक-वर्गाला पत्करावें लागलें काय, त्याचे परिणाम जे व्हावयाचे तेच होतात. त्या परिणामांचें स्वरूप काय असतें, हें वर दाखविलेंच आहे. जीवनवेतन कायद्यानें ठरविलें गेलें तरी परिणाम तेच होतात.

जीवनवेतन ठरविणें नेहमींच अनिष्ट असतें काय ? :--वरील सर्व विवेचनावरून असा ग्रह होण्याचा संभव आहे कीं, जीवनवेतन देण्यास मालकवर्गाला भाग पाडणें कोणत्याहि परिस्थितींत अनिष्टच. असा ग्रह होऊं नये म्हणून कांहीं गोष्टी स्पष्ट केल्या पाहिजेत. पहिली गोष्ट अशी कीं, जीवनवेतन जेव्हां परवडतें तेव्हां--म्हणजे ते सीमान्त उत्पादकाच्या अनुरोधानें ठरणाऱ्या वेतनाएवढें किंवा त्याहिपेक्षां कमी असतें तेव्हां--कोणतीच अडचण उपस्थित होत नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, जीवनवेतन परवडत नाहीं अशी भूमिका मालकवर्गाकडून सर्वसाधारणपणें नेहमींच घेतली जाते. तेव्हां प्रत्येक वेळीं पुरवठ्याकडील वैगुण्यामुळें किंवा उद्योगधंद्यांत अपूर्ण स्पर्धा असल्यामुळें जीवनवेतन मिळत नाहीं कीं काय, ह्याचा तपास करावा लागतो. नफ्याचें प्रमाण असाधारण असूनहि जीवनवेतन दिलें न गेल्यास तें परवडत नाहीं, असें म्हणण्यांत कांहींच अर्थ नसतो. तिसरी गोष्ट अशी कीं, जीवनवेतन ठरल्यानंतर इतर गोष्टी अनुकूल असल्या तर त्या उद्योगधंद्याची पीछेहाट होण्याचें कारण नसतें. औद्योगिक विकासाला कारणीभूत होणाऱ्या अनेक गोष्टी असतात. त्यांतील इतर गोष्टींत कोणत्याहि प्रकारचा बदल न होतां फक्त वेतनमानांत बदल केल्यास काय होण्याचा संभव असतो ह्याचें वर विवेचन केलेलें आहे. अर्थशास्त्राची ही विवेचनपद्धति आहे.अर्थशास्त्रांतील कोणत्याहि विवेचनांत अनेक गोष्टी गृहीत धरलेल्या असतात. त्यामुळें तें विवेचन प्रत्यक्षांतील परिस्थितीला जसेंच्या तसें लागू करणें किंवा कोणत्याहि परिस्थितींत लागू पडतें असें समजणें चूक होईल. ह्या बाबतींत सर्वसाधारणपणें असें म्हणतां येईल कीं, **विकासशील अर्थव्यवस्थेंत** (Expanding Economy) सर्व क्षेत्रांत जीवनवेतन स्वीकारलें तरी त्याचा रोजगारावर विपरीत परिणाम होण्याचें कारण नसतें. फक्त ज्या उद्योगधंद्यांत जीवनवेतन परवडत नाहीं असे उद्योगधंदे बंद पडतात आणि ज्यांच्यांत ते परवडते अशा नव्या-जुन्या उद्योगधंद्यांत मनुष्यबळाची पुनर्विभागणी होते. पूर्ण रोजगाराचें धोरण व तत्संबंधींची

जबाबदारी राज्यसंस्थेनें स्वीकारलेली असल्यास जीवनवेतन ठरविण्याचे परिणाम अनिष्ट होतील अशी भीति बाळण्याचें कारण नसते. **विकासशून्य अर्थव्यवस्थेंत** (Stagnated Economy) मात्र न परवडणारें जीवनवेतन अनिष्ट परिणामांस कारणीभूत होतें. चौथी गोष्ट अशी कीं, वेतनमान बदलल्यामुळें नफ्यांत होणारा बदल मान्य करण्यांत आला तर वेतनमान निश्चित करण्याचे अनिष्ट परिणाम होत नाहींत योग्य नफ्यासंबंधींच्या कल्पना अटळ नसतात, हें लक्षांत घेणें आवश्यक नसतें. जीवन-वेतन निश्चित केल्यामुळें नफ्याऐवजीं तोटाच होऊं लागला तर अन्य उपाययोजना करावी लागते. वरील विवेचनांतून दोन निष्कर्ष मात्र काढतां येण्याजोगे आहेत. पहिला निष्कर्ष असा कीं, कांहीं क्षेत्रांतच जीवनवेतन निश्चित करण्याऐवजीं सर्व क्षेत्रांत तें निश्चित केल्यास अनिष्ट परिणाम टाळण्यासाठीं उपाययोजना करणें सुलभ असतें. दुसरा निष्कर्ष असा कीं, जीवनवेतन निश्चित करणाऱ्या सरकारला प्रसंगीं इतर नियंत्रणें बसविण्याची किंवा वेळ पडल्यास उद्योगधंदे ताब्यांत घेण्याची तयारी ठेवावी लागते. खाजगी नफ्यासाठीं उत्पादन हाच उत्पादनाचा एकमेव हेतु असल्यास जीवन-वेतन निश्चित करण्याचे दुष्परिणाम टाळणें कठिण होतें.

प्रमुख संदर्भग्रंथ

(1) Hicks—Theory of Wages.
(2) Lester—Labour Problems.

: ११ : कामगार-प्रश्न

(१) कामगार कायदे

कामगार कायद्यांची आवश्यकता :--रोजगाराला पर्याय उपासमार हाच असल्यानें मालक-कामगारसंबंधांत असंघटित कामगारवर्ग जात्याच अगतिक असतो. त्यांतच तो वर्ग अज्ञानी असल्यास फारच अगतिक बनतो. कामगारवर्गाच्या अगतिक-त्वाचा फायदा मालकवर्गाकडून अनेक प्रकारें घेतला जाण्याचा संभव असतो. तो घेण्यांत मालकवर्गाचा हेतु मात्र एकच असतो. तो म्हणजे येनकेन प्रकारेण मनुष्य-बळावर होणाऱ्या खर्चांत शक्य तेवढी काटकसर करून उत्पादन-खर्च कमी करावयाचा. मालकवर्गाकडून मनुष्यबळावरील खर्च कमी करण्यासाठीं ज्या गोष्टी केल्या जातात त्यांपैकीं कित्येक गोष्टी अशा असतात कीं, संबंधित कामगारांचे जन्माचे नुकसान होते. परंतु कामगार-मालक संबंधाचें मूळांतील कायदेशीर स्वरूपच असें असतें कीं कामगाराच्या नुकसानीची जबाबदारी कोणत्याहि प्रकारें मालकांवर पडत नाहीं

त्यामुळें आपल्या स्वार्थापलीकडे कसलाच विचार करण्याचें मालकाला कारण नसतें. साहजिकच आपला हेतु साधतो कीं नाहीं ह्याखेरीज कामगाराच्या जीविताची पर्वा मालकांकडून सामान्यपणें केली जात नाहीं. मालकांच्या दृष्टिकोनांतून पाहतां ही गोष्ट कदाचित रास्त ठरत असेल, पण एकंदर समाजकल्याणाचा विचार केल्यास ही गोष्ट अनिष्ट असते. कारण (१) कामगार-वर्गाच्या दूरवस्थेमुळें त्यांची कार्यक्षमता कमी होऊन एकंदर उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होतो. (२) आर्थिक विषमता वाढण्यास मदत होऊन बहुसंख्य लोकांना किमान गरजा व्यवस्थितपणें भागविण्याची संधि मिळणेंहि दुर्लभ होतें. हें परिणाम टाळण्यासाठीं कामगार-वर्गाला राजसत्तेकडून प्राप्त होणाऱ्या संरक्षणाची आवश्यकता असते. कामगार-वर्गाला जरूर तें संरक्षण देण्यासाठीं कामगार-कायदे केले जातात.[1]

कामगारवर्गाच्या अगतिकत्वाचा फायदा घेण्याचें प्रकार :—कामगार-कायद्यांचा तपशील तपासण्यापूर्वीं कामगार-वर्गाच्या अगतिकत्वाचा फायदा मालकांकडून कोणकोणत्या प्रकारें घेतला जातो हें पाहिलें पाहिजे. कारण तें समजल्यासच कामगार कायद्यांच्या तपशीलांतील विविध गोष्टींचें महत्त्व उमजूं शकते. कायद्याचें कांहींहि बंधन नसल्यात व कामगारवर्ग असंघटित असल्यास कामगार-वर्गाच्या अगतिकत्वाचा फायदा प्रामुख्यानें पुढील प्रकारें घेतला जातो असें दिसून येतें. (१) स्त्रिया व मुलांना मोठ्या संख्येनें कामावर घेणें. स्त्रियांना त्यांच्या प्रकृतीला न झेपेल अशी कामें देणें. स्त्रिया व मुलें ह्यांची उत्पादनक्षमता जात्याच कमी असल्यानें व अबलत्व त्यांच्यांत प्रकर्षानें असल्यामुळें त्यांना कमी वेतन दिलें तरी चालतें. शिवाय स्त्रिया व मुलांमुळें मनुष्यबळाचा एकंदर पुरवठा वाढल्यास प्रौढ पुरुष कामगाराचें वेतनहि कमी होण्यास मदत होते. कोंवळ्या वयांत मुलांना कामावर लावल्यास त्यांचें भावी आयुष्य शिक्षण न मिळाल्यामुळें व शारीरिक दौर्बल्य लौकर आल्यामुळें कुचकामीं होण्याचा संभव असतो. स्त्रियांना न झेपेल अशी कामें करावयास लावल्यास त्यांच्या प्रकृतीवर तर अनिष्ट परिणाम होतोच पण त्यामुळें भावी पिढ्यांचें आरोग्यहि धोक्यांत येते. (२) कामाच्या वेळांत कामगारांच्या आरोग्याला विघातक एवढी वाढ करणें. त्यामुळें कामगाराची उत्पादनक्षमता कमी होते. पण त्याचा परिणाम मालकाला मात्र फार सोसावा लागत नाहीं. कारण उत्पादनक्षमतेवरील अनिष्ट परिणाम दिसून येण्यास कालावधि लागतो आणि तो विशेष प्रमाणांत दिसून येऊं लागतांच त्या कामगाराला काढून टाकून दुसरा कामगार घेतां येतो. असें होण्यांत काम-

[1] Labour legislation is necessary in order to protect the unorganised and helpless working class from the evils of industrialism. These evils arise because the pursuit of self-interest leads the employers to do a number of things which are detrimental to the health, efficiency and personality of the worker.

गाराचें कायमचें नुकसान मात्र होतें. (३) वेतनाच्या बाबतींत कामगारांचें शोषण करणें. जेव्हां कामगारांना त्यांच्या सीमान्त-उत्पादनक्षमतेपेक्षां कमी वेतन दिलें जातें तेव्हां कामगारांचें शोषण केलें गेलें असें शास्त्रीय दृष्टया म्हणतां येईल. शोषण केल्यानंतर कामगारांना दिलें जाणारे वेतन जीवन-वेतनाएवढें अगर त्यापेक्षां अधिक असेल तर त्याचे कामगारांच्या जीवनावर गंभीर परिणाम होत नाहींत. पण तरीहि एका वर्गानें दुसऱ्या वर्गाच्या अगतिकत्वाचा असा फायदा घणें हीहि गोष्ट अनुचितच होय. तें वेतन जीवनवेतनापेक्षां कमी असल्यास होणाऱ्या अनिष्ट परिणामामुळें ती गोष्ट फारच गंभीर ठरते. (४) कामाच्या ठिकाणीं हवापाणी, स्वच्छता, उजेड ह्या सोयी न करणें इत्यादि गोष्टींचाहि कामगारांच्या प्रकृतीवर विपरीत परिणाम होतो आणि त्यामुळें अकालीं मृत्यु, अकालीं वार्धक्य असें प्रसंग उद्‌भवण्याचा धोका असतो. धोकेबाज यंत्रसामुग्रीपासून काम करणाऱ्याला धोका निर्माण होऊं नये म्हणून कोणतीहि तरतूद न करणें हा प्रकारहि त्यांतलाच.

कामगार कायद्यांचा तपशील :--वरील सर्व अपप्रकारापासून कामगारांचें संरक्षण करणें हा कामगार-कायद्याचा उद्देश असतो हें देशोदेशांतील कामगार-कायद्याचा तपशील पाहिल्यास दिसून येईल. ह्या कायद्यान्वयें (१) रोजगाराचें किमान वय ठरविलें जातें. प्रत्येक नव्या कायद्यानें रोजगाराचें किमान वय वाढविले जाण्याची प्रवृत्ति दिसून येते. रोजगाराचें किमान वय ठरविण्यांत रोजगार सुरू करण्यापूर्वीं कामगाराची पुरेशी शारीरिक, मानसिक व बौद्धिक वाढ झालेली असावी हा हेतु असतो. (२) स्त्री-कामगारांना त्यांना झेपणार नाहीं असें, व त्यामुळें भावी पिढ्यांच्या आरोग्याला विघातक असें काम देण्यास बंदी केली जाते. (३) कामाचे साप्ताहिक तास ठरविले जातात. प्रत्येक नव्या कायद्यानें हे तास कमी करण्याची प्रवृत्ति दिसून येते. कामगाराला कामाचा ताण पडूं नये, त्यामुळें त्याची उत्पादनक्षमता वाढावी, तसेंच त्याला पुरेशी उसंत मिळून जीवनाच्या इतर अंगांकडे लक्ष देण्यास सवड मिळावी हा कामाचे तास कमी करण्यांतला हेतु असतो. (४) किमान वेतन ठरविलें जातें. हें वेतन त्या त्या उद्योगधंद्यांत परवडूं शकेल असें असतें किंवा जीवनवेतनाच्या अनुरोधानें ठरविले जातें. (५) कामाच्या ठिकाणच्या किमान सुखसोयी ठरविल्या जातात. (५) रजा, सुट्ट्या, वेतन देण्याची पद्धत, दंड, इत्यादिसंबंधींचे नियम निश्चित केले जातात.

सामाजिक सुरक्षिततेची कल्पना :--वरील तपशीलानें युक्त असें कायदे केले तरी त्यामुळें कामगाराला आर्थिक सुरक्षिततेचा लाभ होऊं शकत नाहीं. **आर्थिक सुरक्षितता** (Economic Security) **म्हणजे व्यक्तीच्या किमान गरजा व्यवस्थितपणें जन्मापासून मरेपर्यंत सर्व काळ भोगल्या जातील ह्यासंबंधींची शाश्वती** सामान्य कामगारांच्या जीवनांत ही शाश्वती नसते. कारण त्याचें उत्पन्न केवळ

शारीरिक श्रमांवर अवलंबून असतें. जोंपर्यंत श्रम करण्याची पात्रता त्याच्यांत असतें तोंपर्यंत तो उत्पन्न मिळवूं शकतो, पण त्याच्या जीवनांत कांहीं वेळां अशा येतातच कीं त्यावेळीं आपला चरितार्थ आपल्या श्रमानें मिळविण्यास तो समर्थ नसतो. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यांत अशा वेळां येतातच. संबंध आयुष्यांत कोणतेंही संकट, अपघात, आजार अशासारखा प्रसंग आला नाहीं असें धरून चाललें तरी परावलंबी बनून आयुष्यांतला कांहीं भाग काढावा लागणें प्रत्येकाला अपरिहार्य असते. बालपण व वृद्धापकाळ तर कोणालाच टाळतां येत नाहीं. बालपणीं व वृद्धावस्थेंत स्वतःचे उत्पन्न स्वतः मिळवितां येत नाहीं व दुसऱ्यावर अवलंबून रहावें लागतें हें उघडच आहे. बालपण व वृद्धापकाळ एवढाच परावलंबीपणा ज्यांच्या आयुष्यांत येतो असे लोक विरळच. त्याशिवाय आजारीपणाचे प्रसंग प्रत्येकाच्या आयुष्यांत दोन-चारदां तरी येतातच. हे प्रसंग ज्यांचें पोट हातावरच असतें अशांना फारच जाणवतात. कारण त्यावेळीं त्यांची नेहमींची प्राप्ति थांबतें व खर्च तर नेहमींपेक्षां जास्त होण्याचा संभव असतो. अशा प्रसंगाकरितां आधींपासून कांहीं बचत करून ठेवावी अशीहि त्यांची परिस्थिति नसते. आजारीपणाखेरीज कामगारांना सक्तीची बेकारी, काम करतांना होणाऱ्या अपघातामुळें येणारे तात्पुरतें अगर कायमचें अपंगत्व, अशा संकटांना तोंड द्यावें लागतें. स्त्री कामगारांना बाळंतपणासाठीं कांहीं तरतूद करावी लागते. शिवाय कित्येकदां कामगाराच्या अपमृत्युमुळें त्याच्या कुटुंबाची वाताहात होते.[२] कामगारांच्या जीवनांत हे जे आपत्काल येतात त्या वेळीं त्याला कांहीं उत्पन्न मिळण्याची सोय करण्याच्या हेतूनें प्रगत देशांत अलीकडे कायदे करण्यांत येत आहेत. अशा कायद्यांना **सामाजिक सुरक्षिततेचे कायदे** (Social Security Legislation) असें म्हणतात. अशा कायद्यांमुळें व्यक्तीला आर्थिक सुरक्षिततेचा लाभ होतो. प्रत्येक व्यक्तीच्या आर्थिक सुरक्षिततेची जबाबदारी घेणें ही समाजाची जबाबदारी आहे आणि ती पार पाडण्यासाठीं व्यक्तीच्या जीवनांतील आपत्काळ, म्हणजे ज्या काळांत व्यक्ति स्वतःचा चरितार्थ स्वश्रमानें मिळविण्यास असमर्थ ठरते असें काळ, निवडून त्या काळांत व्यक्तीला जरूर तें सहाय्य करणें व अशा रीतीनें तिला जगण्याच्या विवंचनेंतून कायमचें मुक्त करणें हें समाजाचें कर्तव्य आहे अशी आजची विचारस आहे ह्या विचारसरणींतूनच सामाजिक सुरक्षिततेची कल्पना उद्भवली आहे.[३] ह्या कल्पनेनुसार केलेल्या कायद्यांना सामाजिक सुरक्षिततेचे कायदे म्हणतात.

सामाजिक सुरक्षितता कायद्यांची व्याप्ति :—सामाजिक सुरक्षितता कायद्यामुळें आजारीपण, बाळंतपण, बेकारी अशा प्रसंगीं कामगाराला भत्ता देण्याची

[२] In the life of man, there are two stages of dependency, childhood and old age; and in the intervening years of adult life, there are likely to occur spells during which he cannot earn his living.

सोय असते. वृद्धावस्थेमुळें किंवा अकाली येणाऱ्या अपंगत्वामुळें रोजगार कायमचा बंद झाल्यास कामगाराला निवृत्तिवेतन दिलें जातें. अपघातामुळें कोणत्याहि प्रकारची इजा झाल्यास नुकसान-भरपाई देण्यांत येते. कामगारावर अपमृत्यूचा प्रसंग ओढवल्यास कांहीं काळपर्यंत त्याच्या कुटुंबाच्या पालनपोषणाची व्यवस्था केली जाते. कामगारांना केवळ आपत्काळींच मदत न करतां जीवनाचा भरपूर उपयोग करतां यावा म्हणून त्यांना विविध प्रकारें सहाय्य करावें ही कल्पनाहि सामाजिक सुरक्षिततेंत अंतर्भूत होऊं लागली आहे. म्हणूनच प्रवासासाठीं, सुट्टयांचा उपभोग घेण्यासाठीं, सण-समारंभासाठीं, मुलांच्या शिक्षणासाठीं कामगारांना सहाय्य करावें असाहि विचार पुढें येत आहे. सामाजिक सुरक्षिततेचा पूर्ण विस्तार झाल्यास तीवर आधारलेल्या कायद्याची व्याप्ति खूपच वाढेल ह्यांत शंका नाहीं.[४] हें सर्व करतां यावें म्हणून ह्यांतील प्रत्येक गोष्टीसाठीं खास निधीची तरतूद केली जाते व त्या निधीसाठीं सरकार, कामगार व मालक ह्या तिन्ही संबंधीत पक्षाकडून वर्गणी वसूल केली जाते. विमा उतरविण्यांत जी भूमिका व कार्यपद्धति असते तीच सामाजिक सुरक्षितता कायद्यांत असल्यानें त्यांच्यामुळें जी कार्ययंत्रणा उभारली जाते तिला **सामाजिक विमा** (Social Insurance) असेंहि म्हणतात. सामाजिक विम्याखेरीज **सामाजिक सहाय्य** (Social Assistance) ही सुद्धां सामाजिक सुरक्षिततेची एक पद्धत आहे, ह्या पद्धतीचें वैशिष्टय असें कीं, तींत कामगारांकडून वर्गणी घेतली जात नाहीं सामाजिक सुरक्षिततेचे फायदे कामगाराला पैशाच्या रूपानें दिले जातात किंवा वस्तुरूपानें दिले जातात. उदाहरणार्थ आजारपणीं कामगाराला खर्चासाठीं कांहीं विशिष्ट रक्कम दिली जाते किंवा मोफत औषधपाणी पुरवलें जातें. प्रगत देशांत सामाजिक सुरक्षितता कायद्यांची व्याप्ति दोन प्रकारें सातत्यानें वाढत आहे. एकतर व्यक्तीला जेव्हां मदतीची गरज असते असा प्रत्येक बारीकसारीक प्रसंग सुद्धां ह्या कायद्यांच्या कक्षेंत आणला जात आहे आणि दुसरें म्हणजे प्रत्येक प्रसंगीं दिली जाणारी मदतहि

---

[३] The idea of social security springs from the deep desire of men to free themselves from the fear of want—To realise this idea the causes of insecurity must be removed wherever possible and the individual must be assured of that protection against the common risks of life which his own efforts do not avail to provide.

[४] Complete social security coverage includes old-age annuities, unemployment insurance, sickness and disability insurance, workmens' compensation, and financial protection against those contingencies of life for which the average citizen finds it difficult to provide for adequately, for example, the special costs of brith, marriage and death. It is possible to go still further and to include in social insurance the care of teeth, annual vacations, subsidiary payments to children and similar amenities.

वाढत आहे. कामगाराला जीवनभर आर्थिक स्थैर्याचा लाभ करून देणारी सामाजिक संरक्षणाची पूर्ण विकसित यंत्रणा हें आजकालच्या प्रगत अर्थव्यवस्थेचें व कल्याणकारी राज्याचें प्रधान लक्षण मानलें जातें. कारण जीवनभरचें आर्थिक स्थैर्य केवळ जगण्याच्या दृष्टीनेंच नव्हे तर मानवी जीवन सुसंस्कृत व संपन्न होण्यासाठींहि आवश्यक आहे. तसेंच **व्यक्तीला आर्थिक सुरक्षितता उपभोगावयास मिळणें ही गोष्ट केवळ व्यक्तीलाच हितकर नसून समाजालाहि हितकर आहे.** कारण ज्या समाजांत व्यक्तीचें जीवन आर्थिक दृष्टया सुरक्षित असतें असा समाजच प्रगती-पथावर असतो अशी आजची विचारसरणी आहे. म्हणूनच कामगारांना आर्थिक संरक्षण व स्थैर्य मिळवून देणाऱ्या कामगार-कायद्यांना आजकाल फार महत्त्व प्राप्त झालें आहे.

(२) कामगार-संघटना

कामगारांना संरक्षण देण्याचा कामगार कायदे करणें हा एक मार्ग असला तरी त्याहीपेक्षां प्रभावी मार्ग म्हणजे कामगार-चळवळ हाच होय. शेवटीं कामगारवर्ग आपल्या पायावर जेव्हां उभा राहतो तेव्हांच त्याचें अगतिकत्व खऱ्या अर्थानें नष्ट होतें. शिवाय सर्वच देशांच्या इतिहासाचा असा दाखला आहे कीं, कामगार-कायदे सुखासुखी करण्यांत आलेले नाहींत. कामगार चळवळ प्रभावी होऊन तिचें दडपण राज्यकर्त्यांवर जेव्हां पडलें तेव्हांच महत्त्वाचे कामगार-कायदे करण्यांत आले आहेत. सारांश, कामगारांचें अगतिकत्व नष्ट होऊन कामगारवर्ग व मालकवर्ग तुल्यबळ होण्यासाठीं कामगारवर्ग संघटित होणें अत्यावश्यक असतें. कामगारवर्ग संघटित होण्याची प्रक्रिया कामगारसंघटनांच्या द्वारां होत असल्यामुळें कामगारवर्गाला खरेंखुरें संरक्षण प्राप्त होण्यासाठीं कामगारसंघटनांची आवश्यकता असते असें म्हटलें तरी चालेल.

कामगार चळवळीचीं उद्दिष्टचें व कार्यें :—कामगारांच्या व्यावसायिक जीवनाची परिस्थिति सुधारण्याच्या, निदानपक्षीं बिघडूं न देण्याच्या, उद्देशानें अस्तित्वांत आलेली व सातत्यानें कार्य करणारी संस्था अशी कामगार संघाची व्याख्या करण्यांत येते.[५] ह्या व्याख्येवरून कामगारांच्या रोजगाराची परिस्थिति सुधारण्याचा सतत प्रयत्न करणें हें कामगार-चळवळीचें उद्दिष्ट असतें हें लक्षांत येण्यास अडचण पडत नाहीं.

वरील व्याख्येंत कामगारांची कामाची परिस्थिति सुधारण्याच्या प्रयत्नांवर जेवढा भर दिला आहे तेवढाच भर त्या प्रयत्नांच्या **सातत्यावर** दिला आहे हें लक्षांत घेण्याजोगे आहे. ह्याचा अर्थ असा होतो कीं, कामगारचळवळीची आवश्यकता

[५] A Trade union is a continuous association of wage earner for the purpose of maintaining or improving the condition of their working lives—**Mr. & Mrs. Webb.**

कधींच संपुष्टांत येत नाहीं. कामगार चळवळ ही कायम टिकणारी चळवळ आहे. कामगार चळवळ ही केवळ भांडवलशाहींतच असते असा जो गैरसमज पसरलेला असतो तो ह्या खुलाशानें दूर व्हावा.[६] समाजवाद आला तरी कामगारांचे प्रश्न हे रहाणारच. ते कामगाराच्या दृष्टीनें समाधानकारक रीत्या सोडवून घेण्यासाठीं कामगार-संघटनांची आवश्यकता राहाणारच. मात्र कामगारांच्या प्रश्नांचें स्वरूप मात्र सारखें बदलत असतें, म्हणून वरकरणीं पहातां कामगार संघटनांचीं कार्यें हीं बदलत असतात. मूळचा उद्देश मात्र तोच कायम राहतो. भांडवलशाही देशांत सुद्धां कामगार चळवळीचीं कार्यें सर्व देशांत सारखीं नसतात. कामगार चळवळीचीं नेमकीं कार्यें स्थलकालसापेक्ष असतात. अर्थव्यवस्थेनें प्रगतीची जी सीमा गांठली असेल व आर्थिक विकासक्रमांत कामगारांच्या प्रश्नाबाबत जी परिस्थिति प्राप्त झाली असेल तिच्या अनुरोधानें कामगार-चळवळीचीं प्रत्यक्ष कार्यें ठरतात. मूळचा उद्देश मात्र सर्वत्र कामगारांना संघटित करून आपल्या पायावर उभें राहून आपली परिस्थिति सुधारण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत निर्माण करणें हाच असतो. औद्योगिक क्षेत्रांतील स्पर्धेची झळ कामगारांना न लागतां त्यांच्या रोजगाराच्या परिस्थितींत सुधारणा होईल असा प्रयत्न करणें हा कामगार चळवळीचा मूळचा हेतु असतो असें थोडक्यांत म्हणण्यास हरकत नाहीं.[७]

कामगार-चळवळीच्या विकासांतील विविध अवस्था :—कामगार संघटनांचे ध्येय एकच असलें तरी त्या प्रीत्यर्थ करावीं लागणारीं कार्यें निदान त्यांचें तौलनिक महत्त्व, परिस्थितिनुसार बदलत असतें. ही महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेवणें अगत्याचें आहे. कामगारवर्ग जेव्हां अगदीं असंघटित असतो तेव्हां त्या वर्गाला संघटनेसाठीं प्रवृत्त करणें हेंच कार्य अतिशय महत्त्वाचें असतें. कामगारवर्ग संघटित होण्यापूर्वीं त्या वर्गाचें अज्ञान दूर करावें लागतें. त्यासाठीं कामगारवर्गाला रूढ अर्थानें शिक्षण तर द्यावें लागतेंच, पण व्यापक अर्थानें कामगाराला सुशिक्षित करणें विशेष महत्त्वाचें असतें. कित्येकदां कामगारांतील धार्मिक, सामाजिक, वांशिक भेद त्या वर्गाला संघटित करण्याच्या आड येतात. त्यावर मात करून संघटनाचें कार्य करावें लागतें. कामगार संघटनांच्या पहिल्या अवस्थेंत, शिक्षणप्रसार, कामगारात एकतेची भावना निर्माण करणारें सांस्कृतिक कार्यक्रम अशासारख्या विधायक कार्यक्रमावर विशेष भर द्यावा लागतो.

---

[६] Trade union is not merely an incident of the present phase of capitalist industry, but it has a permanent function to fulfill in the democratic state—**Mr.** and **Mrs. Webb.**

[७] Its fundamental objective is "The deliberate regulation of conditions of employment in such a way as to ward off from the manual working producers the evil effects of industrial competition"—**Mr. & Mrs. Webb.**

कामगारवर्ग पुरेसा संघटित झाल्यानंतर कामगार वर्गाची परिस्थिति ज्यायोगें सुधारेल अशा गोष्टी पदरांत पाडून घेणें हें कामगार संघटनांचे कार्य ठरतें. जमल्यास मालकवर्गाकडून, नाहींतर मालकवर्गावर कायद्याचें दडपण आणून, ह्या गोष्टी पदरांत पाडून घ्यावयाच्या असतात. त्यासाठीं वापरावयाचें मार्ग कामगार संघटनेच्या सामर्थ्यावर अवलंबून असतात. हे मार्गहि विशिष्ट क्रमानेंच अनुसरले जातात. विनंत्या, वाटाघाटी हे सौम्य मार्ग निष्फळ ठरले तरच संप-सत्याग्रहादि जहाल मार्ग वापरले जातात. संप हें कामगारसंघटनाच्या जवळचें प्रभावी शस्त्र आहे असें समजलें जातें. पण ह्या शस्त्राचा वापर तारतम्यानेंच करावा लागतो. कारण हें शस्त्र जर कां निष्फळ ठरलें, आणि वारंवार वापरलें तर तें निष्फळ ठरण्याचा धोका वाढतो, तर संघटनेवर त्या गोष्टीचा विपरीत परिणाम होण्याचा संभव असतो. ज्या सुधारणा पदरांत पाडून घ्यावयाच्या असतात त्याहि क्रमाक्रमानेंच साधून घ्याव्या लागतात. प्रथम माणुसकीला साजेशी वागणूक कामगारांना दिली जाईल एवढ्यावर लक्ष केन्द्रित केलें जातें. नंतर कामाची परिस्थिति व वेतन ह्यांच्यांतील सुधारणांकडे लक्ष दिलें जातें. नंतरच आर्थिक स्थैर्य, रोजगाराची शाश्वती ह्यांसारख्या गोष्टींना महत्त्व प्राप्त होतें, कामगार चळवळीच्या ह्या दुसऱ्या अवस्थेंत विधायक कार्याचें महत्त्व नष्ट होतें असें नाहीं. खरें पाहिलें तर विधायक कार्य नेहमींच आणि कोणत्याहि अवस्थेंत महत्त्वाचें असतेच. तथापि ह्या अवस्थेंत कामगार चळवळ ही वृत्तीनें अधिकाधिक आक्रमक होत जाते. ह्या अवस्थेंत सांघिक सौदा ह्या कामाच्या शर्ती ठरवून घेण्याच्या पद्धतीला महत्त्व येते. ह्या अवस्थेंतच कामगार-चळवळीचा प्रभाव शासन-संस्थेवर पडूं लागून महत्त्वाचे कामगार कायदे होऊं लागतात. ह्या अवस्थेंत **परस्पर सहाय्य, सांघिक सौदा व कामगार कायदे** ह्या तिन्ही पद्धतीनीं कामगारांची उन्नति होण्यास कामगार-संघटना कारणीभूत होतो. जोंपर्यंत परस्पर सहाय्यांत अंतर्भूत होणाऱ्या गोष्टींवरच कामगार-चळवळीचा भर असतो, तोंपर्यंत कामगारांचा इतर वर्गाशीं प्रत्यक्ष संबंध येत नाहीं. सांघिक सौद्यामुळें कामगार-संघटना व मालक ह्यांच्या सहकार्याचा अथवा संघर्षाचा संभव निर्माण होतो. कामगार-कायदे होऊं लागल्यानंतर लोकशाही राजवटींत एकंदर समाजाचा व कामगार-चळवळीचा प्रत्यक्ष संबंध येऊं लागतो. [८]

---

८ In the well-known scheme of Webbs, mutual insurance, collective bargaining and legal enactment are the three methods by which labour movement seeks to further the intersts of labour. Out of them mutual insurance is a method under the sole control of the trade unions in the operation of which no other set of interests needs to be consulted. Collective bargaining depends on the collaboration between two interested parties, the union and the employers. Legal enactment brings a third interest, that of the public decisively to bear on the problem of improvement of labour conditions.

कामगारवर्ग भरपूर संघटित झाला व कामगारवर्गाची आर्थिक स्थिति व कामाची परिस्थिति बऱ्याच प्रमाणांत सुधारली म्हणजे कामगारवर्गाच्या चळवळीचें तिसरें पर्व सुरू होतें. ह्या अवस्थेंत **कामगारवर्ग व मालकवर्ग हे तुल्यबळ होतात** असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. अमेरिकेसारख्या प्रगत देशांतील कामगार चळवळीनें ही अवस्था गांठलेली आहे. अप्रगत देशांत कामगारचळवळ पहिल्या-दुसऱ्या अवस्थेंत घोंटाळत असते. भारतांतल्या कामगार चळवळीची आजची परिस्थिति अशीच आहे.

तिसऱ्या अवस्थेंत जेव्हां कामगारचळवळ येते तेव्हां कामगार मालकसंबंधांचें स्वरूप व तदनुषंगानें कामगार-चळवळीचीं कार्ये ह्यांत महत्त्वाचे बदल होतात. ह्या अवस्थेंत कामगार-चळवळ ही समाजांतील अतिशय बलवान, प्रभावी व गतिमान अशी शक्ति झालेली असते.[९] कामगार चळवळ ह्या स्थितीप्रत पोंचली कीं, व्यवस्थापनांत सहभागी होण्याचा कामगारांचा हक्क मान्य करून घेण्यावर कामगार-चळवळीचें लक्ष केंद्रित होतें आणि ती मागणी मान्य झाल्यास कामगार व मालक ह्यांच्यांत सहकारितेचा नवा प्रयोग सुरू होतो व तो जास्तींत जास्त प्रमाणांत यशस्वी करणें हें कामगार चळवळीचें साध्य होतें. हा प्रयोग यशस्वी होणें कितपत शक्य आहे हा कामगार प्रश्नावरील चर्चेंत आजकाल महत्त्वाचा प्रश्न झाला आहे. ह्या प्रनाला निर्णायक उत्तर देतां येण्याजोगा अनुभव अमेरिकेंतहि अद्याप आला नाहीं. अशा परिस्थितींत त्यासंबंधीं अधिक कांहीं न लिहितां ह्या अवस्थेंतच कामगार व मालक ह्यांचें हितसंबंध मूलतः भिन्न आहेत व त्यांच्यांत यशस्वी सहकार्य होणें अशक्य आहे.[१०] ह्या अनेकदां केल्या गेलेल्या दाव्याची खरी कसोटी लागते एवढेंच म्हटल्यास पुरें होईल.

कामगार-चळवळीच्या कार्यासंबंधीं वर ज्या अवस्था दाखविल्या आहेत त्या स्थूल आहेत व विवेचनाच्या सोयीसाठीं आहेत हें लक्षांत घेतलें पाहिजे. प्रत्यक्षांत कोणतीहि अवस्था पूर्णपणें कधींच संपत नाहीं. तसेंच प्रत्येक अवस्थेंत विधायक, विरोधक व क्वचित प्रसंगीं विध्वंसक कार्यें एकाच वेळीं कामगार-चळवळीला करावी लागतात. ज्या कार्यांमुळें कामगार वर्गांतील अंगभूत दोष दूर होण्यास कामगार-चळवळीची मदत होते, तीं कार्यें विधायक ह्या स्वरूपांत पडतात कामगारांत शिक्षण-प्रसार, ज्ञान-प्रसार, कुटुंबनियोजन विषयक व इतर आरोग्य-विषयक माहितीचा प्रसार, सांस्कृतिक कार्यक्रम, कामगार-वर्गाच्या अवनतीस कारणीभूत होणाऱ्या व ऐक्यास विरोधक असणाऱ्या रूढीचें व समजुतीचें निर्मूलन

[९] Labour movement becomes a very powerful and dynamic force in the country.

[१०] It has been frequently asserted that there is inevitably a conflict between unions and management simply because the former want to get as much as possible and latter want to give as little as possible.

करण्याचा प्रयत्न ही कामगार-चळवळीची विधायक कार्यें होत. विविध मार्गांनीं मालक-वर्गाकडून व सरकारकडून सवलती मिळविण्यासाठीं केलेले प्रयत्न हें सामान्यपणें विरोधक कार्यांत जमा होतात. कारण ह्या प्रयत्नांतून अगदीं नाहीं म्हटलें तरी थोडा बहुत संघर्ष निर्माण होतोच. विधायक व विरोधक कार्यांचा तपशील अर्थातच तात्त्विक विवेचनानें ठरवितां येत नाहीं. तो देशकाल परिस्थितीवर अवलंबून असतो.

कामगार चळवळ व राजकारण :—कामगार-चळवळीचीं कार्यें मूलतः आर्थिक स्वरूपाची असतात असें वरील विवेचनांत अभिप्रेत आहे. पण कामगार-चळवळीचे प्रधानकार्य आर्थिक नसून राजकीय असतें अशीहि एक विचारसरणी आहे. ह्या विचारसरणीमागें भांडवलशाहींतील प्रस्थापित सरकार हें भांडवलदारांचेच पाठीराखे असतें आणि म्हणून कामगार हितसंवर्धन खऱ्या व व्यापक अर्थानें करण्यासाठीं तें सरकार बदलण्याची आवश्यकता असते अशी भूमिका असते. ही भूमिका मान्य केल्यास कामगार-चळवळ हा राजकीय चळवळीचा भाग होतो आणि कामगार संघटना चळवळीचे केंद्र बनते.[११]

कामगार-चळवळीला व्यापक राजकीय चळवळीचें साधन ह्या खेरीज स्वतंत्र अस्तित्व असावें कीं नसावें; हा प्रश्न वादग्रस्त आहे व तो तसा नेहमींच राहील. पण एक गोष्ट निश्चित कीं, कामगारांचें हितसंबंध सुरक्षित राखणें हें कामगार चळवळीचें साध्य मानलें तरी त्या साध्याची व्याप्तिच अलीकडे इतकी वाढली आहे कीं, कामगार-चळवळीला राजकारणापासून अगदीं अलिप्त राखणें संपूर्णतया अशक्य आहे. ह्या साध्यांतून उद्भवणाऱ्या कामगार-चळवळीच्या कर्तव्यांच्या कक्षा रुंदावणें अगदीं साहजिक आहे. कारण कामगाराचें आर्थिक हित केवळ कामगारांना पैशाच्या रूपानें किती वेतन मिळते. ह्यावर अवलंबून नसून एकंदर किंमतीमानाची पातळी, देशांतील एकंदर रोजगारस्थिति ह्यांवर अवलंबून असतें. सर्वसाधारण किंमतीमान सर्वसाधारण रहाणीखर्च, रोजगार ह्या गोष्टी सरकारच्या आर्थिक धोरणाचा परिणाम असतात. तेव्हां सरकारच्या आर्थिक धोरणांत कामगारांना लक्ष घालावें लागतें हें ओघानेंच येतें. सरकारच्या आर्थिक धोरणावर राजकारणाचा परिणाम होत असल्यामुळें कामगार चळवळीला राजकारणांत लक्ष घालावें लागणें हेंहि क्रमप्राप्तच होय. तसेंच सरकारच्या प्रत्यक्ष हातांत असलेल्या उद्योगधंद्यांचें क्षेत्र सर्व देशांतच कमी जास्त प्रमाणांत वाढत आहे. उद्योगधंद्यावरील सरकारचें नियंत्रणहि वाढत आहे. सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यांत कामगारांचें हितसंबंध सुरक्षित राहावें व सरकारी नियंत्रणामुळें कामगारांचें हित साधावें ह्या हेतूनेंहि सरकारी कारभाराकडे म्हणजे पर्यायानें राजकारणाकडे

[११] In addition to its original tasks, the trade union has to learn to take on additional duties, to become the centre for organising the working class for its political emanicipation.

कामगारांना लक्ष द्यावें लागतें. राजकारणाशीं साक्षात संबंध ठेवण्यास व त्यायोगें सरकारच्या आर्थिक धोरणावर नजर ठेवण्यास लोकशाहीमुळें कामगारांना सुदैवानें संधीहि मिळत आहे. त्या संधीचा पुरेपूर फायदा घ्यावयाचा झाल्यास कामगार चळवळीला राजकारणापासून अलिप्त राहून कसें चालेल ?[12] कामगारवर्गाला मतदानाचा जो बहुमोल अधिकार प्राप्त झाला आहे तो सुबुद्धपणें वापरण्याचें मार्गदर्शन त्यांना करणें हें कामगार संघटनांचें कार्य आहे असें निःसंकोच म्हणण्यास हरकत नाहीं. ह्या कार्याच्या व्याप्तींत जेवढें राजकारण येतें तेवढें अटळ ठरतें.

आधुनिक कामगार-चळवळीचीं कार्यें :—आतांपर्यंतच्या विवेचनाचा निष्कर्ष असा सांगतां येईल कीं, कामगार-चळवळीचें मूळचें ध्येय कायम राहिलें असलें तरी त्यांतून उद्‌भवणारी कार्याची खोली व रुंदी आतां चांगलीच विस्तारली आहे. खालीं एका कामगार संघटनेनेंच सांगितलेलीं कामगार चळवळीचीं कार्यें दिलीं आहेत. त्यावरून ह्या विधानाची यथार्थता उमजेल.[13]

आपल्या कार्यासंबंधीं कामगार संघटनेनें जें निवेदन केलें आहे त्याच्या आधारें आधुनिक कामगार चळवळीच्या कार्याची पुनर्मांडणी पुढीलप्रमाणें करतां येईल.[14]

(१) संघटनसामर्थ्याचा उपयोग करून सांघिक सौदा पद्धतीनें कामगारवर्गाचें वेतन व कामाच्या इतर शर्ती ह्यांच्यांत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करणें..

---

[12] It is now realized that not only the maintenance and improvement of the wage earners standard of life and labour demand of the trade unions an interest in a wide range of economic decisions beyond the wage bargain itself, but that the extension of the public control of the economy enables them to express that interest effectively.

[13] Functions of Trade Unions—" The first is unquestionably that of improving wages, hours of work and conditions of labour. This in itself relates to more than wages measured in monetary terms. We are also concerned with what wages can buy i. e. with the cost of living and the general leval of prices. We are in fact concerned with the size of the real national income and with the share of it which should accrue to work people.

Secondly the trade union movement is concerned with the opportunities for the worker to obtain work. Full employment is an aim which the trade unions have always pursued.

Thirdly the trade union movement exists to extend the influence of work people over the policy and purposes of industry and to arrange for their participation in its management.

(२) कामगार वर्गांत परस्पर सहकार्याची भावना निर्माण करून व कामगार वर्गातील अंगभूत दोष नाहींसे करण्याचा प्रयत्न करून कामगाराचा दर्जा व उद्योग धंद्याचा आणि समाजाचा एक घटक ह्या नात्यानें त्याची उपयुक्तता व महत्त्व वाढविण्याचा प्रयत्न करणें.

(३) अर्थव्यवस्थेवरील शासनसंस्थेच्या नियंत्रणांत सुबुद्धपणें सहभागी होण्यास कामगारांना मार्गदर्शन करणें व सरकारचें आर्थिक धोरण कामगारांना पोषक होईल अशी दक्षता घेणें.

(४) खाजगी व राष्ट्रीय मालकीच्या उद्योगधंद्याच्या व्यवस्थापनांत सहभागी होण्याचा कामगारांचा हक्क आहे ह्या मागणीचा पाठपुरावा करणें व तशी संधि मिळाल्यास त्या कामासाठीं कामगारवर्गाची लायकी सिद्ध करणें.

(३) औद्योगिक संबंधांचा प्रश्न

कामगार चळवळीमुळें कामगार वर्ग व मालकवर्ग जेव्हां तुल्यबल होतात तेव्हां औद्योगिक शांतता (Industrial Peace) राहणें ही गोष्ट कठीण होऊन बसतें. कामगार व मालक ह्यांच्यात संघर्षप्रसंग वारंवार निर्माण होऊन औद्योगिक संबंध (Industrial Relations) बिघडण्याची, म्हणजेच औद्योगिक कलह (Industrial Disputes) उद्‌भवण्याची शक्यता निर्माण होते. अशा औद्योगिक कलहांची कारणें सामान्यत: चार प्रकारची असूं शकतात. त्या अनुरोधानें औद्योगिक कलहांचें वर्गीकरण पुढीलप्रमाणें केलें जातें.

(१) कामगार संघटनेला मान्यता देण्याच्या प्रश्नावरून उद्‌भवणारे कलह. कोणतीहि कामगार संघटना जेव्हां पुरेशी प्रातिनिधीक होते, किंवा आपण प्रातिनिधीक झालों आहे अशी तिची समजूत होते तेव्हां आपल्याला मालकानें व सरकारनें मान्यता द्यावी म्हणून साहजिकच खटपट करते. ह्यावेळीं मालक सामान्यतः खळखळ करतोच. त्यामुळें कलहप्रसंग उद्‌भवतो.

(२) आर्थिक प्रश्नांतून उद्‌भवणारे कलह. अलीकडे बहुधा, विशेषतः प्रगत देशांत, कामाचे तास, वेतन, इत्यादि कामासंबंधींच्या बाबी सांघिक सौदा पद्धतीनें

१४ The functions of modern trade unions may be restated as follows:—

(i) Defending or improving the wages and other conditions of labour.

(ii) Raising the status and importance of the worker as a citizen of industry and of society.

(iii) Participating actively and intelligently in the social control of economic life.

(iv) Insisting on the worker's right of participation in the management of private and nationalised industry.

ठरतात हें वर सांगितलेंच आहे. त्यानिमित्त मालक व प्रातिनिधीक कामगार संघटना ह्यांच्यांत ज्या वाटाघाटी होतात त्यांत उभयपक्षांचें एकमत होण्याचें प्रसंग क्वचितच येतात. बहुधा दुमतच होतें. होणारें दुमत आर्थिक हितसंबंधाशीं संबंधित असल्यानें आपलें म्हणणें पूर्णपणें सोडून देण्यास किंवा तडजोडवृत्ति धारण करण्यास कोणताहि पक्ष सहजासहजीं तयार होत नाहीं. शक्य तेवढें ताणून धरण्याची वृत्ति उभयपक्षांत दिसून येण्याचा संभव असतो. त्यामुळें अर्थातच कलहप्रसंग उद्‌भवतो.

(३) कामगारांना दिल्या जाणाऱ्या वागणुकींतून उद्‌भवणारे कलह जेव्हां आपल्याला ज्या पद्धतीनें वागविलें जातें ती पद्धत अपमानास्पद आहे असें कामगाराला वाटते तेव्हां अर्थातच तो झगडा करण्यास प्रवृत्त होतो. अशा प्रसंगीं कामगार-संघटना वैयक्तिक कामगाराच्या पाठीमागें उभी राहिल्यास कलह संभवतो.

(४) करार अथवा कायद्यांचा अर्थ लावण्याच्या प्रश्नांतून उद्‌भणारे कलह सामुदायिक सौद्यानें जेव्हां सर्व गोष्टी ठरतात तेव्हां अर्थातच लिखित करार केले जातात. त्या करारांतील भाषा कितीहि स्पष्ट असली तरी विशिष्ट शब्दप्रयोगांचा निश्चित अर्थ लावण्याबाबत मतभेद होतातच. कराराप्रमाणेंच कामगार-मालक ह्यांचे संबंध निश्चित करणाऱ्या कायद्यांची स्थिति असते. त्यांच्या अर्थासंबंधींहि वादळ होतें आणि त्यांतून कलहप्रसंग उद्‌भवतात.

औद्योगिक कलहासंबंधीं आधुनिक सरकारचें धोरण :—औद्योगिक कलह जेव्हां तीव्र स्वरूप धारण करतात तेव्हां त्यांची परिणती संप, टाळेबंदी अशा गोष्टींत होऊन उत्पादनाचें काम थांबण्याचा धोका निर्माण होतो. ही गोष्ट एकंदर अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनें हितकर नसल्यामुळें, तसेंच औद्योगिक कलहांना तीव्र स्वरूप प्राप्त होणें हें एकंदर सामाजस्वास्थ व स्थैर्य ह्या दृष्टीनेंही अनुचित असल्यामुळें, शासनसंस्थेस औद्योगिक कलहाच्या प्रसंगीं स्वस्थ बसून राहतां येत नाहीं. त्या प्रश्नांत हस्तक्षेप करावाच लागतो. अशा हस्तक्षेपाचें स्वरूप काय असावें हाहि कामगार प्रश्नांतील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. औद्योगिक कलह प्रश्नांत सरकारी हस्तक्षेप होण्याच्या ज्या निरनिराळ्या पद्धती असतात त्यांचें विवेचन करण्यापूर्वी एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. औद्योगिक कलहाच्या प्रश्नाकडे पोलिसी वृत्तीनें सरकारनें पहाणें योग्य नाहीं ही जाणीव आतां सर्वत्र झाली आहे. संप झाला किंवा व्हावयाचा ठरला कीं तो बेकायदेशीर म्हणून जाहीर करावयाचा, किंवा मुळांतच संप करण्याचा कामगारांचा हक्क अमान्य करावयाचा, व नंतर धरपकडीसारख्या उपायांचा अवलंब करावयाचा हें औद्योगिक कलहांत सरकारच्या हस्तक्षेपाचें पूर्वापार तंत्र आतां साहजिक मागें पडलें आहे. कारण लोकशाही व कल्याणकारी राज्याच्या व्यवस्थेंत ह्या तंत्राला अजिबात स्थान नाहीं हें उघड आहे. पोलिसी राज्याच्या कल्पनेशीं सुसंगत असें, पण कल्याणकारी राज्याच्या कल्पनेशीं विसंगत

असें हें तंत्र आहे. अलीकडे औद्योगिक कलहासंबंधी अधिक विधायक अशी भूमिका सरकारला स्वीकारावी लागते व उभय पक्षांना समाधानकारक असा मार्ग—हा मार्ग संबंधित पक्षांना पटो अगर न पटो, एकंदर समाजाला पटला पाहिजे ही गोष्ट विशेष महत्त्वाची आहे—शोधून काढण्याचे प्रयत्न सरकाराला करावे लागतात. [१५]

सरकारी हस्तक्षेपाच्या विविध पद्धति :—औद्योगिक कलहांत सरकारनें हस्तक्षेप करण्याच्या (१) **चौकशी** (Inquiry), (२) **मध्यस्थी** (Mediation or Conciliation) आणि (३) **लवाद निर्णय** (Arbitration) ह्या तीन प्रमुख पद्धति आहेत. ह्यांतील प्रत्येक पद्धत उभयपक्षांच्या संमतीनें अंगिकारली जाऊं शकते अथवा सक्तीनें त्यांच्यावर लादली जाते. तेव्हां (१) खुशीची चौकशी, (२) सक्तीची चौकशी, (३) खुषीची मध्यस्थी, (४) सक्तीची मध्यस्थी, (५) खुषीची लवादी व (६) सक्तीची लवादी अशा सहा पद्धति आहेत असें म्हटलें तरी चालेल.

चौकशी :—चौकशीच्या पद्धतींत सरकारी हस्तक्षेपाची व्याप्ति अगदीं मर्यादित असते. सरकार उभय पक्षांच्या अगर एखाद्या पक्षाच्या विनंतीला मान्य देऊन अगर स्वतःच्या अधिकारांत उद्‌भवलेल्या कलहाच्या कारणांची चौकशी करते व आपले निष्कर्ष जनतेसमोर ठेवते. अशा चौकशीमुळें लोकांना वस्तुस्थितीचें आकलन होण्यास व कोणता पक्ष बरोबर आहे, दोन्ही पक्षांनीं मांडलेल्या दाव्यांत कितपत तथ्य आहे, कोणता पक्ष संयमी आहे, कोणता पक्ष हटवादी आहे, कोणती तडजोड उभयपक्षांना मान्य होण्यास अडचण पडूं नये इत्यादि गोष्टी करण्यास मदत होते आणि त्यामुळें लोकमताला योग्य वळण लागून व हटवादी पक्षावर त्याचें दडपण पडून कलह संपुष्टांत येण्याचा संभव असतो. जेव्हां सरकार कोणत्याहि पक्षानें विनंती केली असांहि स्वतःच्या अधिकारांत चौकशी करतें तेव्हां ती सक्तीची चौकशी असते.

मध्यस्थी :—ह्या पद्धतींत उभयपक्षांना एकत्र येणें व परस्परांशीं बोलणीं करणें ह्या गोष्टी करावयास लावून त्यांना तडजोड करण्यास प्रवृत्त करणें ही कामगिरी सरकारकडून केली जाते. जेव्हां ही कामगिरी उभयपक्षांच्या विनंतीवरून सरकार करतें तेव्हां तिला खुशीची मध्यस्थी (Voluntary Conciliation) म्हणतात. जेव्हां स्वतःच पुढाकार घेऊन स्वतःच्या अधिकारांत सरकार मध्यस्थीचे प्रयत्न करतें

[१५] Industrial disputes are no longer regarded by the State as merely a problem for the police. It is also not possible for the State to take an attitude of strict non-interference. Any such attitude is not consistent with the concept of the Welfare State and with the ultimate interests of the society at large, because industrial disputes result in complete or partial stoppage of production activity. The modern State seeks, therefore, to interfere in industrial disputes in such a way as to bring an early settlement.

व ह्या प्रयत्नांशीं सहकार्य करण्यास उभयपक्षांस भाग पाडते आणि हे प्रयत्न निष्फळ ठरेपर्यंत संप-टाळेबंदीस मनाई करते तेव्हां तिला सक्तीची मध्यस्थी (Compulsory Conciliation) म्हणतात.

लवाद-पद्धत :—ह्या पद्धतींत उभयपक्षांना तडजोड करावयास लावण्याच्या भानगडींत न पडतां सरकार उभयपक्षांच्या म्हणण्याचा समग्र विचार करून स्वतःस योग्य वाटेल असा निर्णय जाहीर करते. हा निर्णय पाळण्याचें बंधन उभयपक्षावर नसल्यास ह्या निर्णयास केवळ सरकारी शिफारशीचें स्वरूप येतें. असें जेव्हां असतें तेव्हां त्याला खुशीची लवाद पद्धति (Voluntary Arbitration) म्हणतात. पण जेव्हां सरकारनें दिलेला निर्णय मानलाच पाहिजे अशी सक्ति उभयपक्षांवर केली जाते तेव्हां त्याला सक्तीची लवाद पद्धति (Compulsory Arbitration) म्हणतात. मध्यस्थी व लवादी ह्यांतील मुख्य फरक असा आहे कीं, मध्यस्थीची परिणति तडजोडींत होते. ती तडजोड उभयपक्षांना मान्य झाल्यास तिच्या योग्यायोग्यतेचा विचार इतरांनीं करावयाचें कारण नसतें. लवाद पद्धतीनें सरकारनें दिलेल्या निर्णयांत कोणत्याहि पक्षावर अन्याय होणार नाहीं ही दक्षता सरकारला घ्यावी लागते. त्या दृष्टीनें उभयपक्षांनीं मांडलेल्या दाव्याचा सर्व बाजूनीं विचार करून स्वतःस योग्य वाटेल तोच निर्णय द्यावा लागतो.[१६]

सरकारी यंत्रणा :—औद्योगिक कलहांत सरकारला हस्तक्षेप करावयाचा असल्यास जरूर तो कायदा करून आपल्याकडे, हस्तक्षेपाची जी पद्धति सरकारला मान्य असेल तिच्याशीं सुसंगत असे अधिकार घ्यावे लागतात. अशा कायद्यालाच औद्योगिक कलहनिवारण कायदा (Industrial Dispute Settlement Act) असें म्हणतात. ह्या कायद्याच्या अंमलबजावणीसाठीं कायद्यांत अभिप्रेत असलेल्या पद्धतीशीं सुसंगत अशी यंत्रणा उभारावी लागते. म्हणजे मध्यस्थ किंवा लवाद-मंडळ इत्यादि अधिकाऱ्यांची नेमणूक करावी लागते. औद्योगिक कलह निवारण्याची जरूर ती कारभारयंत्रणा अस्तित्वांत आणणारा कायदा सर्व प्रमुख देशांत आढळून येतो.

---

[१६] To mediate or concilliate means to bring the parties together and to induce them to bargain. If this is successful, it results in an agreement between the parties. To arbitrate means to make a decision on merits. Arbitration results in an award. The award may, from the legal point of view, be no more than a recommendation to the parties, which they are free to accept or reject. On the other hand, the parties may, by law, be bound to resort to arbitration and to abide by the award. In that case, we speak of compulsory arbitration. Otherwise we call it voluntary although the arbitrator or the arbitration board might have been appointed under, and may be acting by virtue of, a statute.

सरकारी हस्तक्षेपाच्या विविध पद्धतींचा तौलनिक विचार :— औद्योगिक कलहांतील सरकारी हस्तक्षेपाची कोणती पद्धत चांगली हें तात्त्विक चर्चेनें ठरवितां येणार नाहीं. ज्याच्या त्याच्या विचारसरणीवर व त्या प्रश्नाकडे पाहण्याच्या दृष्टीवर तें अवलंबून राहील. पण तरीहि एवढें म्हणतां येईल कीं, सक्तीची मध्यस्थी व खुशीचा लवाद निर्णय ह्या दोन पद्धति लोकशाहीशीं सुसंगत आहेत. सरकारनें औद्योगिक शांतता राखण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे ह्या बद्दल वाद होण्याचें कारणच नाहीं. त्या प्रयत्नास उभयपक्षांनीं मदत केलीच पाहिजे. एवढी सक्ति त्यांच्यावर करणें हें लोकशाहीशीं विसंगत नाहीं. पण त्यापुढें जाऊन सरकारी निर्णय त्यांनीं मानलाच पाहिजे अशी सक्ति करण्यांत औद्योगिक शांतता अबाधित राहिली तरी एखाद्या पक्षावर अन्याय होण्याचा संभव असतो. शिवाय कोणताहि सरकारी निवाडा नाराज पक्षावर लादला गेला तर उत्पादनाच्या दृष्टीनें तें परिणामीं हितकर होईलच असेंहि सांगतां यावयाचें नाहीं, ह्या परिस्थितींत सरकारनें आपली बाजू व आपलें मत जाहीर करून लोकमताला योग्य वळण लावणें व हटवादी पक्षाला लोकमताच्या प्रभावानें ताळ्यावर आणणें हेंच लोकशाहीच्या दृष्टीनें इष्ट आहे. हा विचार मानल्यास सक्तीच्या निवाड्याचें समर्थन करतां येणार नाहीं. मात्र तसेंच सबळ कारण असल्यास आपद्धर्म म्हणून त्या पद्धतीचा अवलंब करण्यास हरकत नाहीं.

(४) पूर्ण रोजगाराचा प्रश्न

पूर्ण रोजगार म्हणजे काय ?:—वेतनाइतकाच कामगारांच्या दृष्टीनें रोजगाराचा प्रश्न महत्त्वाचा असतो. म्हणूनच कामगारसंघटना अलीकडे पूर्ण रोजगाराच्या प्रश्नांत लक्ष घालूं लागल्या आहेत. **पूर्ण रोजगार** (Full Employment) **म्हणजे जिच्यांत प्रस्थापित वेतनावर काम करूं इच्छिणाऱ्या प्रत्येकाला काम मिळण्यास फारसा वेळ लागत नाहीं अशी अवस्था.**[१७] बेकारीविरहित अवस्था असें तिचें यथायोग्य वर्णन करतां येईल; पण असें वर्णन करतांना हें जरूर लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, पूर्ण रोजगार स्थितींत बेकारीचा सर्वस्वीं अभाव नसतो. बेकारी अनेक प्रकारची असूं शकते. त्यांतील विशिष्ट प्रकारच्या बेकारीचा अभाव म्हणजेच पूर्ण रोजगार हें विधान समजण्यासाठीं बेकारीचे विविध प्रकार कोणते व त्यांतील कोणत्या विशिष्ट प्रकारच्या बेकारीचा अभाव पूर्ण रोजगार ह्या शब्दप्रयोगांत अभिप्रेत आहे ह्याकडे वळलें पाहिजे.

खुषीची व नाखुषीची बेकारी :—बेकारीचें वर्गीकरण दोन प्रकारें करतां येतें. **खुषीची बेकारी** (Voluntary Unemployment) व **नाखुषीची बेकारी** (In-

[१७] Full employment means a situation in which those who want to work at the prevailing rates of pay are able to find work without undue difficulty.

voluntary Unemployment) हा पहिला प्रकार. जेव्हा काम मिळत असूनहि एखादा मजूर काम करावयास तयार नसतो आणि म्हणून तो निरुद्योगी राहतो तेव्हां त्याची बेकारी त्यानें आपणहून पत्करली आहे असें म्हणावें लागतें. हीच खुषीची बेकारी. ह्याच्या उलट एखाद्या कामगाराला काम करावयाची इच्छा असूनहि व काम करण्याची त्याची पात्रता असूनहि आर्थिक अवस्थेंत जर त्याला काम मिळूं शकलें नाहीं तर त्याची बेकारी नाखुषीची नसून सक्तीची असते. ती त्यानें आपल्यावर ओढवून घेतलेली नसून ती त्याच्यावर लादली गेलेली असते. हीच नाखुशीची बेकारी.

तात्पुरती व कायमची बेकारी :—बेकारीच्या वर्गीकरणाचा दुसरा प्रकार म्हणजे **तात्पुरती बेकारी व कायमची बेकारी**. तात्पुरती बेकारी म्हणजे जी कांहीं काळपर्यंत टिकते व त्यानंतर आपोआप नाहींशी होते अशी बेकारी. मात्र कायमची बेकारी म्हणजे जी कधींच नाहींशी होत नाहीं अशी बेकारी नसून जी आर्थिक व्यवस्थेंतील प्रवाहामुळें नाहींशी होत नाहीं म्हणजे जी नाहींशी होण्यास आर्थिक व्यवस्थेला विशिष्ट धोरणच स्वीकारावें लागतें अशी बेकारी. सामान्यतः दीर्घकाल टिकणाऱ्या बेकारीला कायमची बेकारी असें संबोधण्यास हरकत नाहीं.

तात्पुरत्या बेकारीचे दोन प्रकार :—तात्पुरत्या बेकारीचेहि आर्थिक व्यवस्थेंत **घर्षणी बेकारी** (Frictional Unemployment) व **हंगामी बेकारी** (Seasonal Unemployment) असे दोन प्रकार संभवतात. जेव्हां मनुष्यबळाची काटकसर करणारी नवी यंत्रसामग्री उपयोगांत आल्यामुळें पूर्वीपेक्षां कमी कामगार लागतात तेव्हां कांहीं कामगारांवर बेकारीचा प्रसंग ओढवतो. मानवी गरजा अमर्यादित आहेत हें अर्थशास्त्राचें सर्व थम गृहीत कृत्य खरें असलें तर ही बेकारी तात्पुरतीच ठरली पाहिजे. कारण ज्या गरजा अद्याप अतृप्त आहेत त्या गरजा भागविण्याच्या कामांत बेकार झालेल्या कामगारांना वाव असतो. त्यासाठीं नवा एखादा उद्योग शिकण्याची गरज असते आणि तो शिकून होईपर्यंत बकारी चालू रहाते; पण त्यानंतर ती चालू रहाण्याचें कारण नसतें. वस्तूच्या उत्पादनांत श्रम अनावश्यक करणाऱ्या यंत्रामुळें जशी बेकारी उद्‌भवूं शकते तशीच वस्तूकरितां असलेली मागणी कमी होऊन उत्पादन कमी करण्याची जरुरी वाटल्यामुळेंहि बेकारी उद्‌भवूं शकते. ही बेकारीहि तात्पुरतीच ठरण्याची शक्यता असते. कारण वस्तूकरितां मागणी कमी होते ती सामान्यतः त्या वस्तूवर होत असलेल्या खर्चाचा ओघ दुसरीकडे वळतो म्हणून. म्हणजेच एका वस्तूकरितां मागणी कमी झाली कीं दुसऱ्या वस्तूकरिता मागणी वाढते. ज्या वस्तूकरितां मागणी वाढते त्या वस्तूच्या उत्पादनांत रोजगारीला अधिक वाव निर्माण होतो. अर्थातच तेथें ज्या वस्तूकरितां मागणी कमी झालेली असेल त्या वस्तूच्या उत्पादनांतून निघालेल्या कामगारांना काम मिळूं शकते. सारांश, एखाद्या वस्तूकरितां असलेली मागणी कमी झाल्यामुळें अगर नव्या यांत्रिक शोधामुळें उद्‌भवलेली

बेकारी टिकूं शकत नाहीं. ह्याचा अर्थ ती तावडतोब नष्ट होते असा नाहीं हें स्पष्ट केलें पाहिजे. ती नाहींशी होण्यास थोडासा अवधि लागतो. कामगारांना नवीन काम शिकण्याची जरुरी असेल तर त्यांच्याकडून तें शिकलें जाणें, नव्या उद्योगधंद्याची सुरुवात होणें, मागणी वाढल्यास उत्पादनक्षेत्राची वाढ होणें ह्या गोष्टी तावडतोब होणाऱ्या नसतात. त्यासाठीं कालावधि मान्य केलाच पाहिजे. थोडासा अवधि मिळाला तर मात्र वरील कारणांनीं निर्माण होणारी बेकारी टिकत नाहीं. ती संक्रमणकालापुरतीच मर्यादित असते. म्हणून तिला संक्रमणावस्थेंतील बेकारी म्हणतां येईल. पण त्याहिपेक्षां तिचें अर्थपूर्ण नांव म्हणजे घर्षणजन्य बेकारी. ती बेकारी त्वरित नाहींशी होत नाहीं, कारण तसें होण्यांत अनेक अडथळे असतात. कामगारांना जें काम नवीन शिकावें लागतें त्याची व्यवस्था तावडतोब होतेच असें नाहीं. एखादा नवा उद्योगधंदा सुरू करावयाचा असला तर त्याची पूर्वतयारी सुकरपणें होतेच असें नाहीं. धंदा सुरू झाला तर त्याची माहिती कामगारांना मिळतेच असें नाहीं. असें अनेक अडथळे येतात. आर्थिक व्यवस्थेंत कोणताहि बदल घर्षणाशिवाय होत नाहीं म्हणून ती बेकारी कांहीं काळ टिकते

हंगामी बेकारी :—तात्पुरत्या बेकारीचा दुसरा प्रकार म्हणजे हंगामी किंवा मोसमी बेकारी. उत्पादनाच्या कांहीं क्षेत्रांचें स्वरूपच असें असतें कीं, त्या क्षेत्रांत चारी ऋतूंत सारखेंच काम नसतें. कांहीं वेळां भरपूर काम तर कांहीं वेळां अत्यंत कमी काम अशी परिस्थिति असते. त्या क्षेत्रांतील कामकऱ्यांना कांहीं वेळां निरुद्योगी राहावें लागतें, तर कांहीं वेळां अल्पोद्योगी राहावें लागतें, तर कांहीं वेळां पूर्णोद्योगी असावें लागतें. कांहीं वेळां श्रमाची कमतरता भासते तर कांहीं वेळां त्यांची विपुलता दिसते. अशा उत्पादनक्षेत्राचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे शेतकी. शेतकीमध्यें वर्षांतील कांहीं वेळां इतकें जबर काम असतें कीं, तें उरकतां उरकत नाहीं. आणि कांहीं वेळां काम करूं म्हटलें तरी करतां येत नाहीं. शेतकीवर सर्वस्वीं अवलंबून असलेल्या बऱ्याच कामकऱ्यांना वर्षांतील कांहीं काळ निरुद्योगी राहावें लागतें. ज्यांच्या मालकीची शेती आहे त्यांना ह्या काळांत बेकारीचा तडाखा न बसला तरी रोजगारीवर काम करणारे शेतकी-मजूर जेथें असतात तेथें त्या कामकऱ्यांच्या वांट्यास ह्या काळांत बेकारीच येते. शेतकीशिवाय आणखीहि असे कांहीं व्यवसाय आहेत कीं, त्या व्यवसायांना ठराविक काळीं जोर येतो तर इतर वेळीं कामांत सुस्ताई निर्माण होते. अशा व्यवसायांत अर्थातच सदासर्वकाळ त्या व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या सर्व मजुरांना रोजगारी मिळूं शकत नाहीं. त्यांपैकीं कांहीं मजुरांना मधूनमधून बेकारच राहावें लागतें. त्यांची बेकारी सामान्यतः ठराविक मोसमांत येत असल्यामुळें त्या बेकारीला उद्देशून मोसमी बेकारी असा शब्दप्रयोग अर्थशास्त्रांत केला जातो. घर्षणजन्य बेकारीप्रमाणेंच हंगामी अथवा मोसमी बेकारी तात्पुरतीच असते. कारण ती विशिष्ट काळापुरतीच मर्यादित असते हें उघड आहे.

घर्षणजन्य बेकारी व मोसमी बेकारी ह्या दोन प्रकारच्या तात्पुरत्या बेकारीमध्यें जें एक विशेष साधर्म्य आहे तें असें कीं, घर्षणजन्य बेकारी काय किंवा मोसमी बेकारी काय जशी येते तशी जाते. त्या बेकारीला कारणीभूत होणारी परिस्थिति पालटली कीं, ती बेकारी नाहींशी होते. ती नाहींशी होण्याच्या वाटेंत जे अडथळे असतात ते त्यांना दूर होण्यास पुरेसा कालावधि मिळाला कीं दूर होतात. ते अडथळे नाहींसे होण्याच्या क्रियेला चालनाहि आपोआपच मिळते. उदाहरणार्थ, एखाद्या वस्तूवरील लोकांचा खर्च कमी झाला तर सर्वसाधारणपणें तो दुसरीकडे मुद्दाम वळवावा लागत नाहीं. आपोआपच खर्चाचा ओघ दुसरीकडे वळतो. ज्याला कायमची बेकारी म्हणतां येईल तिच्या बाबतींत असें म्हणतां येत नाहीं. ती नाहींशीं करणारे प्रवाह आर्थिक व्यवस्थेंत आपसूक निर्माण होत नाहींत. घर्षणजन्य व मोसमी बेकारी पूर्ण रोजगार स्थितीशीं विसंगत नाहीं.[१८]

खुशीची, मोसमी व घर्षणजन्य बेकारी वगळतां जी बेकारी उरते तिचा अभाव असणें म्हणजेच पूर्णरोजगार स्थिति होय. अशा बेकारीलाच **नाखुषीची किंवा सक्तीची बेकारी** असें नांव अलीकडील अर्थशास्त्रांत देण्यांत आलें आहे. सक्तीची बेकारी ओळखण्याची खूण अशी सांगतां येईल कीं, **न भरलेल्या जागांची संख्या बेकारांच्या संख्येपेक्षां कमी असते.** न भरलेल्या जागांची संख्या जवळजवळ बेकारांच्या संख्येइतकीच किंवा कमी असल्यास अर्थव्यवस्थेनें पूर्ण रोजगार स्थिति गाठली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. कारण अशा परिस्थितींतील बेकारी प्रामुख्यानें घर्षणजन्य असते. रिकाम्या जागांची माहिती होऊन त्यावर रुजूं होण्यास कामगारांना वेळ लागतो किंवा रिकाम्या जागांस बेकार असलेले कामगार पात्र नसतात; म्हणून ती निर्माण झालेली असते. जेव्हां रिकाम्या जागांची संख्या मोठी व बेकारांची संख्या फार लहान असते तेव्हां रोजगारस्थिति उत्तम असते हें ओघानें आलेंच.

सारांश, **जेव्हां रिकाम्या जागांच्या संख्येपेक्षां बेकारांची संख्या फार मोठी असते, तेव्हां ती स्थिति पूर्ण रोजगाराचा अभाव दर्शविते.** बेकारांची संख्या रिकाम्या जागांपेक्षां जेवढी मोठी तेवढी सक्तीची बेकारी अर्थव्यवस्थेंत असते.[१९]

---

[१८] Full employment is compatible with frictional unemployment i. e. unemployment due to workers having wrong skills or being located at wrong places.

[१९] It seems most satisfactory simply to say that the amount of involuntary unemployment is the amount of work which, in existing conditions, the population is willing but unable to perform—Mrs. **Robinson.**

Full employment is a situation in which "There is a much greater number of vacancies than people looking for jobs"—*Ohlin*

पूर्ण रोजगाराचें महत्त्व :--पूर्ण रोजगार प्रस्थापित होणें केवळ कामगार वर्गाच्याच दृष्टीनेंच नव्हे तर एकंदर अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनें इष्ट व आवश्यक असतें. पूर्ण रोजगाराचें महत्त्व पुढीलप्रमाणें सांगतां येईल :—

(१) पूर्ण रोजगार असतां मनुष्यबळ ह्या उत्पादनघटकांचा जास्तींत जास्त उपयोग केला जातो. त्यामुळें **उत्पादनाची कमाल मर्यादा** गांठली जाण्याची शक्यता निर्माण होते.[२०] कोणताहि घटक पूर्णपणें वापरण्यास असमर्थ ठरणें हें अर्थव्यवस्थेच्या अकार्यक्षमतेचें द्योतक आहे. मानवी गरजांना अन्त नाहीं हें खरें असेल तर कोणताहि घटक अंशतःहि निकामीं राहतां कामा नये.[२१]

(२) पूर्ण रोजगारामुळें **व्यक्तीला आर्थिक स्थैर्य** लाभतें. त्याचा उत्पादनावर अनकूल परिणाम होतो. आपली नोकरी टिकावू नाहीं आणि ती गेल्यास दुसरी मिळणें कठीण ह्या भावनेमुळें कामगाराच्या कार्यक्षमतेला धोका पोहोंचतो.[२२]

(३) पूर्ण रोजगारामुळें **कामगाराच्या स्थितींत सुधारणा** होते. पूर्ण रोजगार असतां मनुष्यबळ मिळणें कठीण होतें आणि त्यामुळें कामगारांना योग्य वेतन द्यावें लागतें व कामगारांना चांगल्या प्रकारें वागविणें मालकाला भाग पडतें. कर्तृत्ववान लोकांना वाटेल त्या परिस्थितींत खिचपत पडावें लागत नाहीं. त्यांच्या कर्तृत्वाचें जेथें चीज होते तेथेंच ते काम करतात आणि तेथील त्यांचें काम समाजाच्या प्रगतीला पोषक ठरतें.[२३]

(४) रोजगारामुळें **मनुष्याच्या व्यक्तिमत्वाचा विकास** होण्यास मदत होते. सामाजिक सुरक्षिततेची परिपूर्ण योजना देशांत असल्यास बेकारांनाहि चरितार्थाची कांहींतरी सोय उपलब्ध होते हें खरें आहे. पण कोणासहि सहसा दीर्घकाळ असें ऐतखाऊचें जीवन आवडणार नाहीं. रोजगाराशिवाय फार काळ राहवें लागल्यास समाजांत आपल्याला स्थान नाहीं, आपली समाजाला गरज नाहीं अशी भावना व्यक्तीच्या मनांत घर करून बसते आणि त्यामुळें व्यक्तिमत्वाचा विकास

[२०] Economy produces the maximum by working at full capacity.

[२१] Unemployment of the non-frictional, non-seasonal type is incompatible with the basic assumption of economics that wants are unlimited. It only shows inefficiency of the economic system.

[२२] The constant fear of unemployment is a deterrant to workers' efficiency.

[२३] Full employment not only improves the working condition of labour but promotes progress. If jobs are easy to get, men of ability and initiative do not permit themselves to be tied down to such depressing conditions and the resulting increase in enterprise and experiment greatly enriches our society.

खुंटतो. ह्या उलट ज्याला काम मिळालें आहे व त्या कामाच्या जोरावर ज्याला चरितार्थ लाभत आहे त्याला आपण समाजाचा एक उपयुक्त घटक आहोंत, आपली समाजाला जरूर आहे, समाजांत आपल्याला स्थान आहे असें वाटूं लागतें आणि त्यामुळें त्याचें व्यक्तिमत्व विकसित होण्यास मदत होते. **पूर्ण रोजगारामुळें मानवी आयुष्याचें मोल वाढतें** असें थोडक्यांत म्हणावयास हरकत नाहीं.[२४]

(५) **पूर्ण रोजगार लोकशाहीच्या व जागतिक शांततेच्या रक्षणासाठीं आवश्यक आहे.** मोठ्या प्रमाणावरील बेकारी हुकूमशाही राजवटीचें व युद्ध-पिपासू वृत्तीचें पोषण करते असा अनुभव आहे. व्यक्तीस्वातंत्र्याचें महत्त्व मनुष्य मानतों हें खरें आहे. पण उपासमारच होऊं लागल्यास किंवा आपलें जीवन मातीमोल आहे असें व्यक्तीला वाटूं लागल्यास स्वातंत्र्य, लोकशाही ह्या मूल्यापेक्षां इतर गोष्टींना किंमत दिली जाण्याचा संभव असतो. त्यामुळें लोकशाही जीवन-पद्धति धोक्यांत येते. देशांत पूर्ण रोजगार असतां सुखसमाधान नांदण्याचा व त्यामुळें युद्ध-पिपासू वृत्ति न वाढण्याचा संभव असतो. आतांपर्यंतचा खेदकारक अनुभव असा आहे कीं, युद्धकाळीं बेकारी संपूर्णपणें नष्ट होते आणि शांतताकालांत बेकारीचें थैमान सुरू होतें. ह्या अनुभवामुळें मनुष्याला युद्धच बरें असें वाटूं लागल्यास नवल नाहीं. ही स्थिति पालटणें आवश्यक आहे.[२५]

पूर्ण रोजगाराचें महत्त्व किती आहे हें पाहतां पूर्ण रोजगार कसा प्रस्थापित होईल ह्या प्रश्नाला अर्थशास्त्रांत आज अतिशय महत्त्व कां प्राप्त झालें आहे व कामगार-संघटना पूर्ण रोजगाराच्या प्रश्नांत लक्ष कां घालूं लागल्या आहेत हें उमजेल.

प्रमुख संदर्भग्रंथ

(1) Lerner—Economics of Employment.
(2) International Labour Organisation—Approaches to Social Security.
(3) Flenders and Clegg-Industrial Relations in great Britain.

[२४] Full employment contributes to dignity of human life by creating in the individual a feeling that he is a significant and a useful member of the society.

[२५] Great as is our attachment to freedom and democracy, their importance fades for people who are continuously harassed by the anxieties and humiliation of economic insecurity. Full employment is a necessary condition for the safeguarding of our democratic way of life—**Lerner**

व्याज

व्याज म्हणजे काय ?:—उत्पादनासाठीं भांडवलाचा पुरवठा जे करतात त्यांना त्यासाठीं जो मोबदला दिला जातो त्याला व्याज (Interest) म्हणतात. प्रचलित अर्थव्यवस्थेंत भांडवलाची देवाणघेवाण पैशाच्या रूपानें होते. ज्यांना भांडवल हवें असतें ते लोक जरूर तो पैसा कर्ज काढून उभा करतात. कर्ज काढणारे कर्ज देणारांना——म्हणजेच भांडवलाचा पुरवठा करणाऱ्यांना——जो मोबदला कर्ज देण्याबद्दल देतात त्यालाच व्याज असें म्हणतात. व्याज ही कर्जाची किंमत असें थोडक्यांत म्हणतां येईल. ही किंमत दरसाल दरशेंकडा ह्या पद्धतीनें आकारली जाते. म्हणून केवळ व्याज हा शब्द न वापरतां **व्याजाचा दर** (Rate of Interest) असा शब्द-प्रयोग केला जातो. भांडवली पैशाची देवघेव ज्या दरानें होते तो दर म्हणजे व्याजाचा दर होय. हा दर भांडवल बाजारांत किंवा ज्याला कर्जरोख्यांचा बाजार (Money Market) म्हणतां येईल त्यांत ठरतो.[1]

व्याज कसें ठरतें ?:—व्याज ही ज्या अर्थी किंमत आहे त्या अर्थी व्याजाचा दर कर्जासाठीं मागणी व कर्जाचा पुरवठा ह्यांच्या अनुरोधानेंच ठरावा हें ओघानेंच येतें. ज्या व्याजाच्या दरामुळें कर्जाची मागणी व पुरवठा समान होतात त्याला **व्याजाचा समतोल दर** (Equilibrium Rate of Interest) असें म्हणण्यास हरकत नाहीं. हा दर विशिष्ट पातळीवरच कां असतो, हा प्रश्न व्याजासंबंधींच्या चर्चेंत सर्वांत महत्त्वाचा आहे. ह्या प्रश्नाचें उत्तर मिळण्यासाठीं व्याज देणारा व्याज देण्यास कां प्रवृत्त होतो, व्याजाचा दर व कर्जाची मागणी ह्यांचा संबंध काय असतो, तसेंच व्याज घेणारा व्याजाची अपेक्षा कां करतो व व्याज व कर्जपुरवठा ह्यांचा संबंध काय असतो ह्या गोष्टींसंबंधीं माहिती मिळवावी लागते.

व्याजासंबंधीं सनातन मीमांसा : मागणीची बाजू :——व्याज कसें ठरतें ह्या-संबंधींची सनातन म्हणून ओळखली जाणारी मीमांसा (Classical Theory of Interest) पुढीलप्रमाणें सांगतां येईल:——भांडवल हा घटक उत्पादनक्षम असतो. ह्याचा अर्थ असा कीं, उत्पादनांत जेवढें भांडवल गुंतवलें जातें त्यापेक्षां अधिक प्राप्ति उत्पादनांतून होण्याची शक्यता असते. भांडवलाच्या उत्पादनक्षमतेमुळेंच कर्ज काढणारे व्याज देण्यास प्रवृत्त होतात. घटत्या फळाच्या सिद्धान्ताला अनुसरून भांड-वलाची उत्पादनक्षमता भांडवल-गुंतवण जसजशी वाढत जाते तसतशी कमी होत जाते. त्याचा परिणाम असा होतो कीं, अधिक कर्ज काढण्यास——म्हणजेच भांडवलाची

[1] Interest is a payment made for the privilege of borrowing money and shows itself in the repayment being greater than the sum borrowed--The rate of interest being what is paid by a borrower to lender for the privilege of borrowing money, it must depend on the conditions in the market for borrowing and lending—**Lerner**

गुंतवण वाढविण्यास—उत्पादकवर्ग व्याजाचा दर कमी झाल्यास प्रवृत्त होतो. म्हणजेच किंमत कमी झाल्यास मागणी वाढते व किंमत वाढल्यास मागणी कमी होते हा मागणीचा सिद्धान्त येथें लागू पडतो. निराळ्या शब्दांत असें म्हणतां येईल कीं, भांडवल-गुंतवण होण्याचें प्रमाण जसें वाढत जातें तसें देऊं केलेलें व्याज कमी होत जातें. गुंतवलेल्या भांडवलाची जी **सीमान्त उत्पादनक्षमता** (Marginal Productivity) असेल तेवढें व्याज देण्यास कर्ज काढणारे तयार असतात. सारांश, **मागणीच्या बाजूनें भांडवलाची सीमान्त उत्पादनक्षमता व्याजाचा दर ठरविण्यास कारणीभूत होते.**[2]

पुरवठ्याची बाजू :—भांडवलाचा पुरवठा लोकांकडून जी **शिल्लक** (Saving) टाकली जाते तिच्याएवढा असतो. उपभोगावर खर्च न करतां उत्पादनाचा जो भाग बाजूला टाकला जातो, त्याला शिल्लक म्हणतात. शिल्लक टाकण्याकरितां **उपभोग-निग्रह** (Abstinence) करावा लागतो. उपभोग-निग्रह करणें म्हणजेच उपभोगापासून मिळणाऱ्या सुखाचा त्याग करणें होय. ह्या त्यागाची किंमत म्हणून भांडवलाचा पुरवठा करणाऱ्यांकडून व्याजाची अपेक्षा केली जाते. यावर कदाचित् असें म्हणतां येईल कीं, शिल्लक ही सामान्यत: ज्यांचीं उत्पन्नें मोठीं असतात त्यांच्याकडून होत असल्यामुळें शिल्लक टाकण्यासाठीं त्याग असा करावा लागत नाहीं. शिवाय कर्जाऊ दिलेल्या रकमा कालान्तरानें परत मिळत असल्यामुळें, शिलकीमुळें उपभोगाचा त्याग करावा लागतो, असें म्हणण्यापेक्षां उपभोग लांबणीवर टाकला जातो असें म्हणणें अधिक योग्य होईल. उपभोग लांबणीवर टाकणारे एक प्रकारें हातचें सोडून पळत्याच्या पाठीमागें लागत असतात. कारण भविष्यकाळ हा नेहमींच अनिश्चित असतो. त्यामुळें उपभोगापासून आज निश्चित मिळणारें समाधान सोडून उद्यां मिळणाऱ्या समाधानासाठीं वाट पहाणें ह्यांत त्याग नसला तरी गैरसोय, वा काळजी खासच असते. ती गैरसोय पत्करण्याकरितां किंवा **उपभोग-प्रतीक्षा** (Waiting) करण्याकरितां आपली शिल्लक उत्पादनासाठीं उपलब्ध करून देणाऱ्यांना मोबदला हवा असतो. तो मोबदला म्हणजेच व्याज होय. तेव्हां व्याज हें उपभोगनिग्रहाचें, निदान उपभोगप्रतीक्षेचें मूल्य असतें, असें म्हणणें चूक होणार नाहीं.[3] उपभोग लांबणीवर टाकण्यासाठीं

[2] The demand for capital depends on its marginal productivity. The marginal productivity of capital diminishes as investment increases. As borrowers are willing to pay a rate not greater than Marginal Productivity of capital, they offer lower rate for borrowing larger amounts.

[3] Interest is a reward for abstinence. If the word abstinence is unacceptable because majority of those who have the ability to save are not required to undergo any sacrifice which is felt, interest may be described as a reward for waiting in as much as the savers have always the option of spending what they save on immediate consumption.

शिल्लक टाकणारांना व्याजरूपानें हवा असणारा मोबदला शिल्लक जशी वाढते तसा कमी होत जातो. असें होण्याचें कारण उघडच आहे. खर्च जसा वाढत जातो तसतसें ज्या गरजा भागविण्यासाठीं तो केला जातो त्यांचे महत्त्व कमीकमी होत जातें. ह्याचाच अर्थ असा कीं, शिल्लक जसजशी वाढत जाते तसतशी सीमान्त शिलकी-मुळें सोसावी लागणारी गैरसोय कमी होते. शिल्लकीचा सीमान्त भाग हा उपभोगावर खर्च केला असतां जें समाधान मिळालें असतें तें त्याच्या पूर्वीच्या भागामुळें प्राप्त होणाऱ्या समाधानापेक्षां साहजिकच कमी असतें. म्हणूनच शिल्लक जशी वाढत जाते तशी व्याजाची अपेक्षा कमीकमी होत जाते. ह्याच कारणाकरितां पुरवठा वाढल्यास मूल्य कमी होतें, हा सिद्धान्त येथेंहि लागू पडतो. तसेंच मूल्य वाढल्यास पुरवठा वाढतो आणि मूल्य कमी झाल्यास पुरवठा कमी होतो, हा सिद्धान्तहि शिलकीला लागू पडतो. शिल्लक टाकण्याबद्दल अधिक मोबदला मिळूं लागला तर उपभोग कमी करून शिल्लक वाढविण्यास लोक अधिक प्रमाणांत प्रवृत्त होतात. उलट व्याजाचा दर कमी झाल्यास आज प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचें तौलनिक महत्त्व वाढतें आणि शिल्लक टाकण्याची प्रवृत्ति कमी होऊन उपभोग-प्रवृत्ति वाढते.

समतोल व्याज :—सारांश, मागणी-पुरवठ्याचे सिद्धान्त भांडवलाच्या मागणी-पुरवठ्यासहि लागू पडतात. व्याजाचा दर वाढतो तशी शिल्लक वाढते व भांडवल-गुंतवण कमी होते व व्याजाचा दर जसा कमी होतो तशी शिल्लक कमी होऊन भांडवलगुंतवण वाढते. प्रत्येक वेळीं वेगळा व्याजाचा दर असतां भांडवलासाठीं विवक्षित प्रमाणांत मागणी होते व भांडवलाचा पुरवठाहि विवक्षित प्रमाणांत असतो. अशा परिस्थितींत **ज्या दरामुळें भांडवलासाठीं मागणी व भांडवल पुरवठा समान होतात तो दरच भांडवल बाजारांत समतोल प्रस्थापित करण्यास समर्थ असतो.** हा व्याजाचा दर भांडवल-गुंतवणीच्या सीमान्त उत्पादनक्षमतेपेक्षां अधिक असूं शकत नाहीं. हा दर असतां लोक जेवढी शिल्लक टाकतात तेवढीच बरोबर भांडवल-गुंतवण होते.[४] भांडवल-गुंतवण व शिल्लक समान करणें हें व्याजाच्या दराचें कार्य आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. शिल्लक ही व्याजाच्या दरावर मुळींच अवलंबून नसते, अशी भूमिका घेतली तरी ह्या विधानाला बाध येत नाहीं. कोणत्याहि वेळीं जी शिल्लक असेल तेवढ्या भांडवल-गुंतवणाची जी सीमान्त-उत्पदनक्षमता असेल तेवढाच व्याजाचा दर ठरून भांडवल-गुंतवण व शिल्लक अपरिहार्यपणें समान होतात.

४ The rate of interest settles at a point where the marginal productivity of capital suffices to bring out the marginal instalment of saving. The main function of the rate of interest is to equate the demand for investible capital with the total volume of savings. This is possible mainly because both the demand and supply of capital are highly interest elastic i. e. they are functionally related to the rate of interest.

मागणीच्या बाजूकडून पाहिलें असतां समतोलक व्याजाचा दर भांडवलाची सीमान्त-उत्पादनक्षमता व्यक्त करीत असतो. पुरवठ्याच्या बाजूकडून पाहिलें असतां हा दर **वर्तमानकाळाचे तौलनिक महत्त्व किंवा वर्तमानकाळ प्राधान्य** (Time Preference) व्यक्त करीत असतो व अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनें विचार करीत असतां भांडवल-गुंतवण व शिल्लक समान करीत असतो, ह्या शब्दांत व्याजाच्या दरासंबंधींच्या सनातन मीमांसेचें सार सांगतां येईल.

सनातन मीमांसेची सुधारलेली आवृत्ति :—वरील मीमांसेंत कर्जाचा पुरवठा शिलकेएवढाच असतो, असें गृहीत धरलें आहे; पण प्रत्यक्षांत कर्जाचा पुरवठा शिलकेपेक्षां भिन्न असूं शकतो. कारण एकतर जेवढी शिल्लक टाकली असेल तेवढी सर्व कर्ज म्हणून दिली जाईल, असा भरंवसा देतां येत नाहीं. शिल्लक टाकण्याचे अनेक हेतु असतात. त्यांपैकीं आपत्काळीं शिल्लक उपयोगीं पडावी, असा एक हेतु असतो. त्या दृष्टीनें शिलकीचा कांहीं भाग लोक आपापल्याजवळ राखून ठेवतील असा संभव असतो. कर्ज दिलेली रक्कम योग्य वेळीं उपलब्ध होईलच, अशी खात्री नसल्यामुळेंच ही दक्षता घेतली जाते. त्यामुळें सर्वच्या सर्व शिलकीचें कर्जांत रूपान्तर केलें जाईल, असा भरंवसा देतां येत नाहीं. अर्थातच कर्जाऊ रक्कम ही शिलकेपेक्षां कमी असूं शकते; पण तशीच ती शिलकीपेक्षां अधिकहि असूं शकते. जेव्हां बँका पैसा निर्माण करून कर्जें देतात तेव्हां त्यावेळीं तरी त्या कर्जामागें शिल्लक नसते. त्यामुळें शिल्लकीपेक्षां कर्जपुरवठा अधिक होतो. तसेंच गतकाळांत शिलकीचा कांहीं भाग कर्ज देण्यासाठीं न वापरल्यामुळें जो संचय झालेला असतो त्यांतील कांहीं भाग वर्तमानकाळांत कर्जरूपानें देण्यासाठीं वापरला जाण्याची शक्यता असते. तसें झाल्यासहि वर्तमानकालीन कर्जपुरवठा वर्तमान शिल्लकीपेक्षां अधिक होऊं शकतो. अशा प्रकारें कर्जाचा पुरवठा शिलकीपेक्षां कमी अगर अधिक असण्याची शक्यता असल्यानें भांडवलाचा पुरवठा एकंदर शिलकीवर अवलंबून असतो, असें म्हणण्यापेक्षां तो एकंदर **कर्जाऊ रकमाएवढा** (Loanable Funds) असतो असें म्हणणें अधिक उचित होईल.[५] तसेंच कर्जाच्या मागणीबद्दलहि म्हणतां येईल. कर्जाऊ रकमांसाठीं असलेली मागणी भांडवल-गुंतवणाएवढीच नसते. थोडीशी अधिक असते. कारण उत्पादनासाठीं ज्याप्रमाणें कर्जें काढलीं जातात त्याप्रमाणें उपभोगासाठीं खर्च करण्याच्या हेतूनेंहि कर्जें काढणारेहि—त्यांना ताबड-तोब पैसा हातांत मिळणें महत्त्वाचें वाटत असल्यामुळें—व्याज द्यावयास तयार असतात. अशा परिस्थितींत शिल्लक व भांडवल-गुंतवण ह्यांमुळें व्याजाचा दर ठरतो, असें म्हणण्याऐवजीं **कर्जाऊ रकमांसाठीं असलेली मागणी व कर्जाऊ रकमांचा पुरवठा ह्यांच्यावर व्याजाचा दर अवलंबून असतो** असें म्हणणें अधिक बरोबर

[५] It is of course a wellknown fact that the current supply of money capital is not necessarily indentical with the amount of current savings.—**Hayek.**

आहे. व्याज ही कर्जाची किंमत असते व कर्जाऊ रकमांसाठीं मागणी व त्यांचा पुरवठा समान करणें हें व्याजाच्या दराचें कार्य असतें.[६]

व्याजाचा व्यवहारी दर व नैसर्गिक दर ह्यांतील भेद :—सनातन मीमांसेची सुधारलेली आवृत्ति मान्य करणारे कांहीं अर्थशास्त्रज्ञ बाजारांत ठरणारा व्याजाचा दर (Market Rate of Interest) व व्याजाचा नैसर्गिक दर (Natural Rate of Interest) असा भेद करतात. कोणत्याहि वेळीं बाजारांत कर्जाऊ रकमांचा मागणीपुरवठ्यामुळें ठरणारा व्याजाचा दर हा बाजारी किंवा व्यवहारी दर होय. आणि एकंदर भांडवल-गुंतवण व लोकांनीं स्वयंप्रेरणेनें टाकलेली शिल्लक समान करणारा दर हा व्याजाचा नैसर्गिक दर होय. बाजारांतील कर्जाऊ रक्कमांचा पुरवठा लोकांच्या शिलकीएवढाच असतां तर असा भेद करण्याचें कारण पडलें नसतें. पण बँकांमुळें भांडवलपुरवठा स्वयंस्फूर्त शिलकीपेक्षां अधिक होत असल्यामुळें व्याजाचा बाजारांतील दर नैसर्गिक दरापेक्षां भिन्न होतो. बँका भांडवल-पुरवठा शिलकीपेक्षां कमी करून कृत्रिमरीत्या व्याजाचा दर खालीं अणतात.[७]

व्याजाची कीन्सवादी मीमांसा :—व्याजाची सनातन मीमांसा आतां मागें पडत असून कीन्स ह्यांनीं प्रतिपादिलेल्या व्याजाच्या दराच्या सिद्धान्ताला अधिकाधिक मान्यता मिळत आहे. कीन्स ह्यांचा सिद्धान्त असा आहे कीं, व्याजाचा दर ही भांडवल-गुंतवणाकरितां कर्जाची मागणी व वर्तमान उपभोगाचा तात्पुरता त्याग करण्याची तयारी ह्यांचा समन्वय करणारी किंमत नसून रोकड मालमत्तेला सर्वांत अधिक प्राधान्य देऊन रोकड बाळगण्याची व्यक्तींची जी प्रवृत्ति—थोडक्यांत रोकड तृष्णा किंवा रोकड प्राधान्य प्रवृत्ति (Liquidity Preference)—मुळें निर्माण होणारी रोकडीची मागणी व रोकडीचा पुरवठा ह्यांचा समन्वय करणारी किंमत आहे.[८] कीन्स ह्यांच्या मतें व्याजाच्या दरासंबंधींची लोकांची अपेक्षा वर्तमानकाळाचें महत्त्व ह्यांना किती वाटतें हें व्यक्त करीत नसून रोकड बाळगण्याचें

---

[६] The natural course seems to be to describe the rate of interest as the market price of something—which recent writers seemed to have settled down into calling 'loanable' or 'investible funds'. This price, like any other market price can be conceived as emerging from the interaction of schedules of supply and demand, showing the amounts of loanable funds which at given prevailing prices, peoples are willing to put on to and to take off the market.—**D. H. Robinson**

[७] The natural rate is the equilibrium rate of interest which equates genuine savings and investment while the market rate taken to mean the going rate of interest determined by the conditions in the money market.

त्यांना महत्त्व किती वाटतें हें व्यक्त करते.[९] निराळ्या शब्दांत वर्तमान समाधानाचा त्याग करण्याबद्दल व्याज हें बक्षिस दिलें जात नसून रोकडीचा त्याग करण्याबद्दल दिलेलें तें बक्षिस असतें.[१०]

कीन्स ह्यांच्या सिद्धान्ताचें स्पष्टीकरण :--कीन्स ह्यांनीं व्याजासंबंधीं जो नवा सिद्धान्त मांडला आहे त्याचें स्पष्टीकरण पुढीलप्रमाणें करतां येईल :--

रोकड बाळगण्याचे तीन हेतु : (१) **व्यवहारहेतु** :—कर्जानें देण्यासाठीं किती पैसा उपलब्ध होतो, हें लोकांची पैशाकरितां मागणी किती आहे व एकंदर पैशाचा पुरवठा किती आहे ह्यावर अवलंबून असतें. लोकांना आपल्याजवळ पैसा बाळगावा असें वाटण्याची तीन कारणें असतात. दैनंदिन खर्चाच्या सोयीसाठीं उपभोक्ते व उत्पादक ह्या दोन्ही वर्गांकडून कांहीं रोकड नेहमीं जवळ बाळगली जाते. कित्येकदां अशी रोकड अभावितपणेंच हातीं राहते. कारण उत्पन्न व खर्च ह्यांमध्यें कांहीं काळ जातो. उदाहरणार्थ, पहिल्या तारखेस ज्यांच्या हातीं पगार येतो त्यांचा सर्व पगार त्याच दिवशीं खर्च होत नाहीं. खर्च सावकाश होत राहतो. मध्यंतरीच्या काळांत रोकड हातीं राहते. जेव्हां खर्च आधीं आणि उत्पन्न मग अशी स्थिति असते तेव्हां दैनंदिन खर्चासाठीं मुद्दाम तजवीज करून रोकड हातीं ठेवण्याची दक्षता घ्यावी लागते. उत्पादकांना हा अनुभव नेहमीं येतो. दैनंदिन खर्चाच्या सोयीच्या दृष्टीनें हातीं रोकड बाळगणें ह्याला **व्यवहार-हेतु** (Transactions motive) म्हणतां येईल. पैसा बाळगण्याचें हें पहिलें कारण झालें.

(२) **दक्षताहेतु** :--दैनंदिन खर्चाशिवाय नैमित्तिक खर्चाकरितांहि लोकांना तजवीज करावी लागते. अनपेक्षित खर्चामध्यें नैमित्तिक खर्चाचा मुख्यतः अंतर्भाव होतो. नैमित्तिक खर्चामध्यें तीन प्रकारच्या खर्चांचा समावेश करतां येईल. पहिला प्रकार म्हणजे अपेक्षित नैमित्तिक खर्च. हा खर्च होण्यापूर्वीं बरेच दिवस त्याची आगाऊ कल्पना असते. त्या दृष्टीनें तो अपेक्षित असतो; पण ज्या वेळीं होतो तेव्हां तो एकदम होतो आणि नित्याच्या खर्चाच्या पलीकडला असतो. त्यामुळें त्याची आगाऊ तजवीज करून ठेवावी लागते. त्यामुळें अर्थातच पैशाला मागणी उद्भवते. नैमित्तिक खर्चाचा दुसरा प्रकार म्हणजे ज्याला खऱ्या अर्थानें अनपेक्षित खर्च म्हणतां येईल असा.

---

[८] The rate of interest is not the 'price which brings into equilibrium the demand for resources to invest with the readiness to abstain from present consumption. It is the price which equilibriates the desire to hold wealth in the form of cash with the available quantity of cash. --Keynes.

[९] Interest is the expression not of time preference but of liquidity preference.

[१०] Interest is a reward not for waiting for consumption but for 'parting with liquidity for a specified period'.

आकस्मिक आजारीपणावरील खर्च ह्या स्वरूपाचा असतो. नैमित्तिक खर्चाचा तिसरा प्रकार म्हणजे वस्तुतः त्या वेळीं नको असलेली पण लागणारी अशी एकादी वस्तु योग्य भावांत मिळाली म्हणून घेऊन टाकण्यासाठीं केलेला खर्च. ह्या प्रकारें नैमित्तिक खर्चाचे आणखीहि कित्येक प्रकार दाखवितां येतील. तसें विस्तारानें करण्याचें कारण नाहीं. ह्या प्रकारांतील मुख्य मुद्दा एवढाच ध्यावयाचा कीं, आकस्मिक खर्च उद्भवण्याच्या वेळा आयुष्यांत येत असल्यामुळें व्यक्तीला त्याची तजवीज करावी लागते आणि व्यक्ति अशा खर्चासाठीं उपयोगीं पडावी म्हणून विवक्षित रक्कम बाळगण्याची दक्षता घेत असल्याचें आढळून येतें. जो नियम व्यक्तीला लागू आहे तोच उत्पादन-संस्था, बाजारी संस्था आणि अन्य संस्थांना लागू आहे. ज्यांच्या उत्पन्नांतून आकस्मिक खर्चासाठीं कांहींहि राखून ठेवणें शक्य नसतें आणि जे बेफिकीर असतात, अशीं उदाहरणें वगळतां सर्वसामान्यपणें नित्य खर्चाखेरीज आकस्मिक खर्चासाठीं पैशाची मागणी असते. नित्य खर्चासाठीं पैशाला जी मागणी असते तिच्यामागील हेतूला **व्यवहारहेतु** म्हटलें तर आकस्मिक खर्चासाठीं पैशाला जी मागणी असते. तिच्यामागील हेतूला **दक्षताहेतु** (Precautionary Motive) असें म्हणतां येईल. रोकड बाळगण्याचें हें दुसरें कारण होय.

व्यवहारहेतु व संरक्षणहेतु ह्या दोन हेतूंतून उद्भवणारी पैशाकरितां मागणी किमतीमानाशीं संबंधित असते. जेव्हां किमतीमान (Price Level) वाढते तेव्हां नित्य व नैमित्तिक अशा दोन्ही प्रकारच्या खर्चाकरितां लागणारी एकूण रक्कम साहजिकच वाढते आणि त्यामुळें लोक जवळ जास्त प्रमाणांत रोकड ठेवूं इच्छितात व पैशाकरितां मागणी वाढते. ह्याच्या उलट प्रकार किंमतीमान कमी असतां होतो. त्या वेळीं लोकांचें उत्पन्नहि कमी असतें. शिवाय नित्य नैमित्तिक खर्चाकरितां लागणारी रक्कम कमी होऊन लोकांची पैशाकरितां मागणी कमी होते. ह्या ठिकाणीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, किमतीमानाचाच पैशाकरितां असणाऱ्या मागणीवर परिणाम होतो असें नसून किंमतीमानासंबंधींच्या अपेक्षांचाहि असतो. किमतीमान वाढेल अशी जेव्हां अपेक्षा असते तेव्हां पैशाचे रूपान्तर त्वरित वस्तूंत करावें, अशी प्रवृत्ति निर्माण होऊन खर्च वाढतो—म्हणजे पैशाकरितां मागणी कमी होते. उलटपक्षीं किमती कमी होणार, अशी लोकांची अपेक्षा असली तर भावी काळांतील पडलेल्या किमतीचा फायदा घेण्यासाठीं लोक पैसा राखून ठेवूं लागतात व पैशाकरितां मागणी वाढते.

(३) **सट्टेबाजीचा हेतु** :—व्यवहारहेतु व संरक्षणहेतु ह्यांखेरीज रोकड बाळगण्याचा तिसरा एक हेतु असतो, त्या हेतूला **सट्टेबाजीचा हेतु** (Speculative Motive) असें म्हणतां येईल. किमतीमान व व्याजाचा दर ह्या बाबतींत अनुकूल फेरबदल होण्याची अपेक्षा असल्यास पैसा खर्च न करतां किंवा न गुंतवितां जवळ बाळगण्याची प्रवृत्ति लोकांत असते. भावी काळांतील संभाव्य बदलांचा फायदा घेण्याच्या हेतूनें कांहीं काळ रोकड नेहमीं बाळगली जातेच. रोकड बाळगण्याचें हें तिसरें कारण होय. सट्टे-

बाजीच्या हेतूचें मुख्य कारण असें कीं, पैशाचा उपभोग अधिक पैसा मिळविण्यासाठीं करण्याची प्रवृत्ति त्यांत अभिप्रेत आहे, हें वैशिष्टच लक्षांत घेतल्यास दक्षताहेतु केव्हां असतो व सट्टेबाजीचा हेतु केव्हां असतो हें ठरविणें कठीण होणार नाहीं. किमती वाढण्याची अपेक्षा असतां माल खरेदी करण्याची तत्परता ग्राहकवर्गानें दाखविल्यास तिच्यामागें दक्षताहेतु असतो; पण पुढें किंमती वाढणार ह्या अपेक्षेनें व्यापारीवर्ग आज जी खरेदी करतो तिच्यामागें सट्टेबाजी असते. सट्टेबाजीच्या हेतूनें पैशाला जी मागणी असते ती व्याजाच्या दरावर बऱ्याच प्रमाणांत अवलंबून असते असें म्हणणें अयोग्य होणार नाहीं. कारण पैशानें पैसा वाढवावा म्हणजेच व्याज मिळवून मुद्दलांत भर टाकीत जवी हीच बुद्धि सट्टेबाजीमागें असते.

सारांश, रोकडीला लोकांची मागणी असते, ह्याचीं व्यवहारहेतु, दक्षताहेतु व सट्टेबाजीचा हेतु हीं तीन कारणें असतात.[11] ह्यांपैकीं एक, दोन अगर तिन्ही कारणांनीं प्रेरित होऊन प्रत्येक व्यक्ति स्वतःजवळ कांहीं प्रमाणांत रोकड बाळगूं इच्छिते. सर्व व्यक्तींच्या मागणीची बेरीज केल्यास रोकडीकरतां एकंदर मागणी किती तें समजतें. अर्थात वरील कारणांपैकीं प्रत्येक कारणांतून उद्‌भवणारी मागणी स्वतंत्रपणें सांगतां येत नाहीं. कारण एकंदर मागणी व्यवहारांत अविभाज्य असते. तथापि तात्त्विक दृष्टचा रोकडी-करितां असलेल्या मागणीची वरील मीमांसा समजण्यास अडचण पडूं नये. कारण रोकड हवी असल्यास वरील तीन हेतु असतात हें सहज सिद्ध करतां येईल.[12] आपली क्रयशक्ति रोकडीच्या रूपानें ठेवणें लोक पसंत करतात. म्हणजेच रोकड-संपत्तीला लोक प्राधान्य देतात. म्हणून लोकांना रोकड हवी असते असें म्हणतां येईल. **रोकडप्राधान्य** हें रोकडीच्या मागणीचें कारण होय.

---

[11] In general people desire to hold cash balances, first because it is convenient to have liquid assests around, second because future cash needs are uncertain and thirdly because spending appears less attractive than holding cash. To put it differently, people tend to hold cash balances for the purpose of (a) Conducting ordinary transactions (b) Meeting emergencies (c) Gaining speculative profits through future changes in prices.

—**Kurihara**

[12] Demand for money has many components. Partly it is determined by need for cash for transactions and partly it is influenced by the relative advantages of holding money and earning assets. To distinguish between different kinds of demand is useful for analytical purposes, but as it is impossible to 'separate statistically active cash from idle cash—it is often better to consider desired cash balance as a whole, whether intended for transactions purposes or intended to be held as an asset.'

—**Hansen.**

रोकडप्राधान्य प्रवृत्ति व व्याजाचा दर ह्यांचा संबंध :--लोकांत रोकड प्राधान्य प्रवृत्ति असते—म्हणजेच आपली संपत्ति रोकडरूपानें ठेवणें लोकांना फायदेशीर वाटत असतें म्हणूनच कर्ज देणारे व्याजाची अपेक्षा करतात. कर्ज दिल्यानें रोकड बाळगण्याचे फायदे बुडवावे लागतात, कर्ज देणाऱ्याला किती व्याजाची अपेक्षा असते, हें ज्याची त्याची रोकडप्राधान्य प्रवृत्ति कितपत जोरदार असते, ह्यावर अवलंबून असतें. सर्वसाधारणपणें रोकडप्राधान्य प्रवृत्तीचा जोर व्यक्तीजवळ असणाऱ्या एकूण रोकडीवर अवलंबून असतो, असें म्हणतां येईल. व्यक्तीजवळील रोकड जेवढी अधिक, विशेषत: व्यवहारहेतु व संरक्षणहेतु ह्या दोन कारणांतून उद्‌भवणाऱ्या मागणीपेक्षा जेवढी ती अधिक, तेवढा रोकड प्राधान्य प्रवृत्तीचा जोर कमी होतो. म्हणजेच व्यक्तीजवळील रोकड जेवढी वाढते तेवढी व्याजाची अपेक्षा कमी होते. ह्याचाच अर्थ असा कीं, रोकडीचा पुरवठा जेवढा अधिक तेवढी व्याजाचा दर कमी होण्यास मदत होते. उलट बाजूनें असें म्हणतां येईल कीं, रोकडीचा पुरवठा जेवढा कमी असतो तेवढी व्याजाबाबतची अपेक्षा वाढून व्याजाचा दर वाढण्यास मदत होते. हीच गोष्ट निराळ्या प्रकारेंहि सांगतां येईल. व्यक्तीजवळ रोख पैसा जेवढा कमी तेवढें कर्ज देऊन आपलीच रोकड वेळप्रसंगीं आपल्यालाच उपयोगी पडत नाहीं, अशी परिस्थिति निर्माण करणें व्यक्तीला न परवडणारें असतें. अशा परिस्थितींत कर्ज देण्यास व्यक्तीला प्रवृत्त करावयाचें असल्यास व्याजाचा दर तेवढाच आकर्षक असावा लागतो. उलट व्यक्तीकडील रोख पैसा तिच्या मागणीच्या मानानें जेवढा अधिक असतो तेवढा तो निकामीं पडूं देणें व्यक्तीला फायदेशीर नसते. कारण रोकड बाळगण्याचे जसे फायदे असतात तसा रोकड बाळगण्याचा तोटाहि असतो. रोकड बाळगण्याचे फायदे काय असतात, तें वर सांगितलेंच आहे. रोकड बाळगण्याचा तोटा असा असतो कीं, रोकड निष्कारण निकामी पडून राहून व्याज बुडतें. व्यक्तीकडील रोकड जेवढी अधिक तेवढें व्याज अधिक बुडतें आणि म्हणून रोकड अधिक झाल्यास कमी व्याजानेंहि कर्ज देण्यास व्यक्ति प्रवृत्त होते. सारांश, प्रत्येक व्यक्तीची व्याजाची अपेक्षा--म्हणजेच निराळ्या शब्दांत वेगवेगळे व्याजाचे दर--असतां व्यक्ति किती प्रमाणांत कर्ज द्यावयास तयार होईल हें तिची रोकडीची मागणी व तिच्याकडील रोकडीचा पुरवठा ह्यांवरून ठरतें.

व्यक्तीबाबतचें वरील विवेचन सबंध समाजालाहि अर्थात लागूं पडतें. कारण समाजांतील प्रत्येक व्यक्तीचा दृष्टिकोन ह्या बाबतींत स्थूलमानानें सारखाच असतो. त्यामुळेंच असें म्हणतां येतें कीं, जेव्हां एकंदर पैशाचा पुरवठा वाढतो तेव्हां (मागणी स्थिर आहे असें गृहीत धरून) व्याजाचा दर कमी होऊं पहातो. कारण त्या परिस्थितींत एकंदर रोकड जरुरीपेक्षां अधिक होऊन रोकड जवळ बाळगण्याचें महत्त्व कमी होतें. उलट जेव्हां एकंदर पैशाचा पुरवठा कमी होतो तेव्हां रोकडीचें महत्त्व वाढून व्याजाचा दर वाढूं पहातो. **थोडक्यांत पैशाचा पुरवठा व व्याज ह्यांचा संबंध व्यस्त आहे.** तसेंच पैशाचा पुरवठा स्थिर राहिला असतां कोणत्याहि

कारणामुळें रोकडप्राधान्य प्रवृत्ति पूर्वींच्यापेक्षां अधिक जोरदार झाली तर व्याजाचा दर वाढतो कारण पूर्वींच्या दरानें पूर्वींइतकें कर्ज देण्यास लोक प्रवृत्त होत नाहींत. ह्या उलट रोकडप्राधान्य प्रवृत्ति कमी झाल्यास व्याजाचा दर कमी होतो.[१३] **थोडक्यांत रोकडप्राधान्य व व्याज ह्यांचा संबंध सरळ आहे.**

वरील परिच्छेदांत लोकांची रोकड-प्राधान्य प्रवृत्ति स्थिर आहे, असें गृहीत धरून पैशाचा पुरवठा कमीजास्त प्रमाणांत झाल्यास त्या घटनेचे व्याजाच्या दरावर काय परिणाम होतात व पैशाचा पुरवठा स्थिर आहे, असें गृहीत धरून रोकडप्राधान्य प्रवृत्तींत—म्हणजे पैशाच्या मागणींत बदल झाल्यास—त्याचे काय परिणाम होतात हें दाखविलें आहे. जेव्हां रोकडप्राधान्य प्रवृत्ति व पैशाचा पुरवठा ह्या दोहोंत बदल होत असतो तेव्हां अर्थातच कोणता प्रवाह अधिक जोरदार आहे, हें पाहणें महत्त्वाचें आहे. कारण व्याजाच्या दरावर शेवटीं होणारा परिणाम त्यानुसार ठरणें साहजिकच आहे. उदाहरणार्थ, देशांतील एकंदर पैसा वाढत असतां त्याच प्रमाणांत रोकडप्राधान्य प्रवृत्ति वाढली तर व्याजाचा दर बदलावयाचा नाहीं. पैशाचा पुरवठा ज्या प्रमाणांत वाढतो त्यापेक्षां रोकडप्राधान्य प्रवृत्ति अधिक प्रमाणांत वाढल्यास व्याजाचा दर कमी न होतां उलट वाढेलच. वाढत्या रोकडप्राधान्य प्रवृत्तीवर पुरवठ्यानें मात केल्यासच व्याजाचा दर कमी होऊं शकेल. ह्याचप्रमाणें पैशाचा पुरवठा कमी होत असतां पैशाच्या मागणींत काय बदल होतो, हें पाहिल्याशिवाय व्याजाच्या दरावर कोणत्या प्रकारचा व किती प्रमाणांत बदल होईल, हें निश्चयानें सांगतां यावयाचें नाहीं. सारांश, रोकडप्राधान्य प्रवृत्ति व पैशाचा पुरवठा हे दोन्ही गतिमान प्रवाह असल्यामुळें व्याजाचा दर हा त्यांच्यापैकीं एकावर अवलंबून असतो, असें म्हणण्यापेक्षां त्यांच्या परस्परसंबंधावर अवलंबून असतो असें म्हणणें अधिक सयुक्तिक होईल.[१४]

---

[१३] The demand for liquidity, together with the supply of money, determines the interest rate. An increased preference for liquidity will raise the interest rate, since more must be offered to induce people to part with liquidity. A decreased preference for liquidity will lower the interest rate since less has to be offered to 'bribe' the people to give up cash holdings in favour of non-liquid assets—**Kurihare.**

[१४] Rate of interest is a function of liquidity preference, indicating the demand for money on one hand, and the supply of money on the other. The demand for money, in its turn, is a function of both incomes and the rate of interest. That part of demand for money which arises out of transactions or precautionary motive is mainly a function of income, whereas demand for money for speculative purposes responds to changes in the rate of interest.

व्याजाचा दर हा चलनविषयक प्रश्न :—व्याजाच्या दरासंबंधीं आतांपर्यंत जें विवेचन केलें त्यावरून व्याजाचा दर, पैशासाठीं असलेली मागणी व पैशाचा पुरवठा ह्यांच्याशीं संबंधित आहे, हें समजूं शकेल. म्हणून तर कीन्स ह्यांनीं '**व्याजाचा दर ही संपूर्णपणें चलनविषयक घटना आहे**' असें अर्थपूर्ण विधान केलें आहे.[१५] कीन्स ह्यांची उपपत्ति मान्य केल्यास ज्या व्याजाच्या दरामुळें पैशाकरितां असलेली मागणी व पैशाचा पुरवठा समान होतात तोच व्याजाचा दर समतोलक ठरतो. कोणत्याहि वेळेचा व्याजाचा दर स्थिर राहावयाचा असल्यास त्या वेळीं असलेल्या एकंदर पैशाच्या पुरवठ्याइतकाच पैसा जवळ बाळगण्याची प्रवृत्ति लोकांत असली पाहिजे. तसें नसल्यास व्याजाचा दर अपरिहार्यपणें बदलेल. जो दर असतां त्या पुरवठ्याइतकी रोकड बाळगण्याची प्रवृत्ति लोकांत दिसून येईल तोच दर प्रस्थापित होईल. तेव्हां पैशाचा पुरवठा व पैशासाठीं मागणी समान करणें हेंच व्याजाच्या दराचें कार्य आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

व्याजाच्या दरांतील भिन्नतेचा खुलासा :—कीन्स ह्यांच्या सिद्धान्ताच्या आधारें व्याजाच्या दरांत कर्जकालानुसार अगर प्रादेशिक स्वरूपाची जी भिन्नता आढळते तिचाहि खुलासा होऊं शकतो. अल्पकालीन कर्जावरील व्याजाचे दर व दीर्घकालीन कर्जा-वरील व्याजाचें दर भिन्न असतात हें सुपरिचित आहे. असें असण्याचें कारण असें सांगतां येतें कीं, कर्जाचा काळ मोठा असला तर रोकडीचे फायदे बुडविण्याचा काळहि लांबतो. म्हणून कर्ज देणारा अधिक व्याजाची अपेक्षा करतो. ह्याच्या उलट अल्पकालीन कर्ज द्यावयाचें झाल्यास रोकडीच्या फायद्यापासून वंचित होण्याचा काळ कमी असल्यानें कमी व्याजावर कर्ज देणारा संतुष्ट होतो. कोणत्याहि देशांतील व्याजाच्या दरासंबंधींची स्थिति पाहिली तर असें दिसून येईल कीं, व्याजाचा एकच असा दर नसतो; तर **व्याजाच्या दरांची एक चढती श्रेणी असते.** ही श्रेणी कर्जाच्या मुदतीवर अवलंबून असते. श्रेणीच्या एका टोंकास व्याजाचा कमींत कमी दर असतो व दुसऱ्या टोंकास जास्तींत जास्त दर असतो. कमींत कमी व्याज अत्यंत अल्प मुदतीच्या कर्जावरील असते व जास्तींत जास्त व्याज अत्यंत दीर्घ मुदतीच्या कर्जावरील असतें. अत्यंत कमी मुदतीचीं कर्जें जीं असतात तीं जवळजवळ रोकड-तुल्यच असतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यामुळें अशीं कर्जें देण्यांत रोकडीचें फायदे नाममात्रच बुडतात. म्हणून त्या फायद्यांचें महत्त्वहि फारच कमी होऊन त्या प्रमाणांत व्याजाचा दरहि कमी होतो. कर्जाची मुदत जसजशी वाढत जाते तसतशी उतरत्या क्रमानें कर्जाची रोकडतुल्यता कमी होत जाते. त्याच क्रमानें व्याजाचा दर वाढत जातो.

अल्पकालीन व दीर्घकालीन दर :—कर्जांच्या मुदती अनेक असल्यास व त्यामुळें मुदतीनुसार व्याजाचे दर अनेक असले तरी विवेचनाच्या सोयीसाठीं व्याजाच्या

[१५] The rate of interest is purely a monetary phenomenon.

दरांचे **अल्पकालीन दर** (Short Term Rate) आणि **दीर्घकालीन दर** (Long Term Rate) असें वर्गीकरण केलें जातें. **अल्पकालाचा व्याजाचा दर व दीर्घकालाचा व्याजाचा दर हे परस्परांशीं संबंधित असतात. तो संबंध सरळ स्वरूपाचा असतो** ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवली पाहिजे. म्हणजे अल्पकालाचा दर वाढला कीं, दीर्घकालाचा दरहि कमी होतो. अल्प व दीर्घ कालांचे व्याजाचे दर ह्यांच्यांत अशा प्रकारचा संबंध असावा ह्यांत नवल नाहीं. कारण रोकडप्राधान्य जेव्हां वाढते किंवा कमी होते तेव्हां अल्पकालाच्या व दीर्घकालाच्या कर्जावर होणारा परिणाम साहजिकच एकाच प्रकारचा असतो. त्यामुळें व्याजाच्या दरांत कालानुसारी भिन्नता कायम राहिली तरी बदल होण्याची दिशा एकच असते. अल्पकालाचा व्याजाचा दर ठरविण्यांत बँकांचा भाग फार मोठा असतो. कारण बँकांकडून मुख्यत: अल्पकालीन कर्जाचा पुरवठा होतो. अल्पकालीन कर्जाच्या पुरवठ्यांतील बहुतांश बँकांनीं दिलेल्या कर्जाचा असतो.

देशोदेशांतील व्याजाच्या दरांतील भिन्नता :––देशोदेशांतील व्याजाचे दर भिन्न असतात ह्याचा खुलासाहि कीन्स ह्यांच्या सिद्धान्तानुसार करतां येतो. सामान्यपण असें दिसून येतें कीं, प्रगत देशांत व्याजाचे दर अप्रगत देशाच्या तुलनेनें कमी असतात. ह्याचें कारण हेंच कीं, अप्रगत देशांत बहुतेक पैसा व्यवहारहेतु व दक्षताहेतूसाठींच लागत असल्यामुळें लोकांतील रोकडप्राधान्य प्रवृत्ति विशेष जोरदार असते. तुलनेनें प्रगत देशांत मागणीच्या मानानें लोकांजवळील पैसा अधिक असल्यानें रोकडप्राधान्य कमी असते व ह्या गोष्टीची मदत व्याजाचा दर कमी होण्यांत होते.

प्रादेशिक भिन्नता :––व्याजाच्या दरांतील भिन्नतेचीं आणखी एक-दोन कारणें सांगतां येतील. देशांतल्या देशांत प्रादेशिक स्वरूपाची जी भिन्नता कधीं कधीं आढळून येते ती मुख्यत: भांडवलाच्या गतिसौकर्याशीं संबंधित असते. देशांतील एका भागांतील भांडवल दुसऱ्या भागांत जेवढ्या मोकळेपणें जाऊं शकतें तेवढ्या प्रमाणांत व्याजाच्या दरांतील प्रादेशिक तफावत कमी होते. कर्ज देण्यांत जो धोका असतो त्यावरहि व्याजाचा दर अवलंबून असणें साहजिक आहे. कर्ज देण्यांत धोका जेवढा अधिक तेवढा कर्ज देणारा अधिक व्याजाची अपेक्षा करतो. कर्ज देण्यांतील धोक्यामुळेंच व्याजाच्या दरांत तफावत पडत असली तरी जेव्हां **निव्वळ व्याजाचा** (Pure Rate of Interest) विचार करावयाचा असतो तेव्हां धोका कमीजास्त असल्यामुळें पडणारा फरक बाजूस काढला जातो.

व्याजासंबंधीचे विविध सिद्धान्त मूलत: भिन्न आहेत काय ? :––व्याजासंबंधींच्या कर्जाऊ रकमांचा सिद्धान्त व कीन्स ह्यांचा रोकड-प्राधान्य सिद्धान्त हे आज प्रचलित असलेले दोन प्रमुख सिद्धान्त आहेत. हे दोन्ही सिद्धान्त मूलतः भिन्न आहेत काय, असा प्रश्न उपस्थित केला असतां त्याचें उत्तर असें द्यावें लागतें कीं,

केवळ व्याज ठरण्याची प्रक्रिया लक्षांत घेतली तर हे सिद्धान्त मूलतः भिन्न नाहींत. कारण भांडवल-बाजाराच्या दृष्टीनें रोकड-प्राधान्य प्रवृत्तीचा कर्जाच्या पुरवठ्यावर जो परिणाम होतो तोच महत्त्वाचा असतो. तसेंच कर्जाचा पुरवठा आणि मागणी समान होणें आवश्यक असतें. मागणी-पुरवठा समान होईल, असाच व्याजाचा दर ठरावा लागतो आणि असाच दर भांडवल-बाजारांत समतोल प्रस्थापित करूं शकतो.[१६] तेव्हां व्याज ठरण्याची प्रक्रियाच लक्षांत घेतली तर व्याजाचें दोन सिद्धान्त ह्या एकच गोष्ट सांगण्याच्या दोन पद्धति आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं.[१७]

कीन्सप्रणीत सिद्धान्त मूलग्राही :—तथापि संबंधित दोन सिद्धान्त ह्या व्याज कसें ठरतें, हें सांगण्याच्या दोन पद्धति असल्या तरी त्यांतील कीन्स ह्यांची पद्धति निश्चित सरस आणि एका दृष्टीनें मूलग्राही आहे. सरस अशाकरितां आहे कीं, कर्ज देणारा व्याजाची अपेक्षा कां करतो, ह्या-संबंधींचा त्या सिद्धान्ताचा खुलासा अधिक वास्तव आहे. मूलग्राही अशा अर्थानें कीं, पैशाचा पुरवठा कमीजास्त होण्यावर व्याजाचा दर अवलंबून असतो. आणि पैशासाठीं मागणी व पैशाचा पुरवठा समान करणें हें व्याजाच्या दराचें कार्य आहे. ही गोष्ट त्या सिद्धान्तांत प्रथमच स्पष्ट करण्यांत आली. कर्जाऊ रकमांच्या सिद्धान्तांत कर्जाची मागणी व पुरवठा समान करणें हेंच व्याजाच्या दराचें एकमेव कार्य समजलें जातें. कीन्स ह्यांच्या सिद्धान्ताप्रमाणें व्याजाच्या दराला एकाच वेळीं कर्जाचा मागणी-पुरवठा समान करणें व पैशाचा मागणी पुरवठा समान करणें हीं दोन्ही कार्यें करावीं लागतात.[१८] तसेंच कर्जाऊ रकमांच्या सिद्धान्ताप्रमाणें व्याजाचा दर ठरविणें हें कर्जाऊ रकमांची उपलब्धता व त्यांच्या-साठीं मागणी ह्या दोन प्रवाहांचें कार्य असतें. कीन्स ह्यांच्या सिद्धान्ताप्रमाणें **व्याजाचा दर ठरविणें हें (१) रोकडप्राधान्य प्रवृत्ति (२) पैशाचा पुरवठा (३) कर्जाऊ रकमा व (४) भांडवलाची फलक्षमता ह्या चार प्रवाहांचें कार्य असतें.** कीन्स ह्यांची व्याजासंबंधींची ही मीमांसा अधिक सखोल, अधिक व्यापक,

[१६] It cannot be denied that the rate of interest being the price paid for a loan must be at the level where the demand for loans is equal to the supply of loans.

[१७] We are left I think in no doubt about the relation between the two methods of approach. Essentially they are two different ways of saying the same thing. —**Robertson**

[१८] An equilibrium condition is reached when the desired volume of cash balance equals the quantity of money, when the marginal efficiency of capital is equal to the rate of interest and finally when the volume of investment is equal to normal or desired saving.

अधिक वास्तव आणि म्हणून अधिक मूलग्राही आहे हें निर्विवाद आहे. ती मूलग्राही आहे ह्याचें सर्वांत महत्त्वाचें कारण हें कीं, शिलकीचें प्रमाण व भांडवल-गुंतवण ह्या स्वतंत्र गोष्टी नसून भांडवल-गुंतवणीच्या प्रमाणावर शिलकीचें प्रमाण अवलंबून असतें ही गोष्ट तींत स्पष्ट झाली आहे. व्याजाचा दर भांडवल-गुंतवण व शिल्लक ह्यांच्या परस्पर संबंधामुळें ठरतो, ह्या सिद्धान्तांत नेमकी हीच महत्त्वाची गोष्ट दुर्लक्षिली गेली आहे आहे. त्यामुळें तो सिद्धान्त वास्तववादी ठरत नाहीं.[१९]

व्याजाच्या दराचें महत्त्व :—व्याजाच्या दराच्या प्रश्नाला आधुनिक अर्थशास्त्रांत महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. कारण अर्थव्यवस्थेंत एकंदर भांडवल-गुंतवण किती होते, हें ठरविणाऱ्या ज्या दोन गोष्टी आहेत त्यांतील व्याजाचा दर ही एक आहे. उरलेली दुसरी गोष्ट म्हणजे **भांडवलाची सीमान्त फलक्षमता** (Marginal Efficiency of Capital) भांडवलाची सीमान्त उत्पादनक्षमता (Marginal Productivity of Capital) व भांडवलाची फलक्षमता ह्या कल्पनांत महत्त्वाचा फरक आहे. भांडवलाची उत्पादनक्षमता ह्या शब्दप्रयोगांत प्रामुख्यानें भांडवलाची उत्पादन-शक्ति अभिप्रेत आहे. ही शक्ति प्रत्यक्ष उत्पादनाची कसोटी लावून वस्तुनिष्ठ पद्धतीनें ठरवितां येते. उलट भांडवलाची फलक्षमता ही कल्पना आत्मनिष्ठ आहे. ह्या कल्पनेमुळें भांडवल गुंतविण्यापासून जो नफा अपेक्षित असतो तो व्यक्त होतो. भांडवल गुंतविण्यांतून मिळणारा नफा दीर्घकालानें आणि दीर्घकालपर्यंत मिळत असल्यानें भांडवल-गुंतवण करणाऱ्यांना भावी काळांत भांडवल गुंतवण्यापासून किती नफा मिळूं शकेल, ह्याबाबत अंदाज बांधावे लागतात.[२०] उदाहरणार्थ, एखाद्या यंत्राचें जीवित वीस वर्षांचें असेल तर त्या अवधींत किंमत भरून येऊन त्या यंत्रामुळें किती प्रमाणांत नफ्यांत वाढ होईल ह्याचा संभाव्य घटनांच्या आधारें विचार करून भांडवल-गुंतवण करावी कीं न करावी हें ठरवावें लागतें. गतिमान अर्थव्यवस्थेंत आजची परिस्थिति भावी काळांत टिकून राहील अशी खात्री देतां येत नसल्यामुळें भावी घटनाबाबत तर्क

[१९] It is true that the rate of interest must be at a level where the supply of loans is equal to the demand for them, but it is more enlightening to say that the rate of interest is determined at the level at which the demand for holding cash is equal to the amount of cash available to be held.

Because 'Most borrowing is by investors who borrow money in order to invest and most lending is done by people who save', one is tempted to say 'that the rate of interest is determined b the opportunity to invest and the readiness to save.' Althoug widely held this theory is unacceptable primarily because 'it fai to consider the effects of changes in investment on the readines to save'—Lerner.

करूनच भांडवलाची फलक्षमता ठरविली जाते.[२१] सर्वसामान्यपणें आहे तीच परिस्थिति टिकून राहील असें मानण्याची प्रवृत्ति असली तरी बदल होण्याचें लहानसें चिन्ह दिसलें तरी उलट-सुलट तर्क-वितर्क सुरू होतात व त्यामुळें भांडवलाच्या फलक्षमतेवर अनिश्चित स्वरूपाचे परिणाम होतात. सांगावयाचें तात्पर्य असें कीं, भांडवलाची फलक्षमता बऱ्याच प्रमाणांत भांडवल-गुंतवण करणारांच्या मानसशास्त्रावर अवलंबून असल्यानें ती अतिशय अस्थिर असते. प्रत्यक्ष घटनांनींच नव्हे तर केवळ अफवांनींदेखील ती बदलते.

प्रत्यक्ष नफ्यापेक्षां नफ्यासंबंधींच्या अंदाजांनाच महत्त्व असतें. कारण **अंदाजी नफा व प्रचलित व्याजाचा दर ह्यांची तुलना करून भांडवल-गुंतवण कोणत्या उद्योगधंद्यांत करावी व किती प्रमाणांत करावी,** हें उत्पादकांकडून ठरविलें जातें. ज्या उद्योगधंद्यांतील अपेक्षित नफा प्रचलित व्याजाच्या दरापेक्षां अधिक असतो त्याच उद्योगधंद्यांत भांडवल गुंतवले जातें व ज्या मर्यादेपर्यंत भांडवल गुंतवलें असतां (भांडवल गुंतवण जशी वाढते तसा अपेक्षित नफाहि कमी होतो. कारण भांडवल गुंतवण करणाऱ्यांना घटत्या फळाची प्रवृत्ति विचारांत घ्यावीच लागते.) नफा व्याजाच्या दरापेक्षां अधिक सुटण्याची अपेक्षा असते त्या मर्यादेपर्यंत भांडवल गुंतविलें जातें. सारांश, भांडवलाची फलक्षमता व व्याजाचा दर ह्या दोन प्रवाहांचें एकंदर भांडवल-गुंतवण हें कार्य असल्यानें आणि भांडवलगुंतवणीच्या प्रमाणावर एकंदर उत्पादनाचें प्रमाण अवलंबून असल्यानें व्याजाचा दर एकंदर अर्थव्यवस्थेच्या कारभाराच्या दृष्टीनें अतिशय महत्त्वाचा ठरतो.[२२]

स्वस्त चलनी भांडवलाचें धोरण :—व्याजाच्या दरावर भांडवल-गुंतवण अवलंबून असते ह्याचा अर्थ असा कीं, व्याज जेवढें कमी तेवढी भांडवल-गुंतवण अधिक होण्याचा संभव असतो. म्हणून तर कीन्सवादी अर्थशास्त्रज्ञांकडून **चलनी-भांडवल** (Money Capital) स्वस्त करण्याच्या धोरणाचा किंवा थोडक्यांत

[२०] One of the effects of time element in investment, of the fact that the expected benefits are in the future, is that they are surrounded with risks and uncertainties which usually make them less worth while than they would be if the benefits were completely certain—Because of the time element in investment because the benefits occur later than costs, interest has to be taken into account. The higher the rate of interest, the greater must be the returns in relation to costs if the investment is to seem worthwhile—**Lerner.**

[२१] The relation between the prospective yield of one more unit of a type of capital and the cost of producing that unit furnishes us with the marginal efficiency of that type of capital. The greatest of these marginal efficiencies can be regarded as marginal efficiency of capital in general—**Keynes.**

अल्पव्याज-नीतीचा (Cheap Money Policy) आग्रहानें पुरस्कार करण्यांत येतो. व्याजाच्या दरावर परिणाम करणारे वर सांगितलेले चार प्रवाह आहेत, त्यांपैकीं चलनपुरवठा हा एकच प्रवाह राज्यसंस्थेच्या बऱ्याच प्रमाणांत ताब्यांत असतो. त्या प्रवाहाला व्याजाचा दर ज्यायोगें कमी होईल असें वळण लावण्याचा प्रयत्न करणें म्हणजेच अल्पव्याज-नीति होय. अर्थात चलनपुरवठा वाढवून व्याजाचा दर कमी करण्याचीसुद्धां एक मर्यादा असते हें लक्षांत ठेविलें पाहिजे. कारण व्याजाचा दर जेवढा कमी होतो तेवढी पैसा निकामी पडूं देण्यानें होणारी हानि कमी महत्त्वाची ठरून रोकडप्राधान्य वाढते.[२३] तथापि भांडवल-गुंतवणीवर रोजगार अवलंबून असल्यानें पूर्ण रोजगाराचा अभाव असतां व्याजाचा दर तेवढा कमी करण्याचें धोरण स्वीकारणें अत्यावश्यक ठरतें असा कीन्सप्रणीत अर्थशास्त्राचा दावा आहे.

प्रमुख संदर्भग्रंथ

(1) Kurihara—Monetary Theory and Public Policy.
(2) Keynes—General Theory of Interest, Employment and Money.
(3) Robertson—Essays in Monetary Theory.
(4) Harris—The New Economics.
(5) Lerner—Theory of Employment.
(6) Hansen—Monetary Theory and Fiscal Policy.

---

[२२] The decision to invest, that is to produce or purchase capital goods is influenced principally by (a) The current rate of interest and (b) The expected rate of profit. The current rate of interest refers to the prevailing rate which is paid to overcome people's liquidity preference and the expected rate of profit (What Keynes calls "the marginal efficiency of capital) is a percentage return on a capital outlay over the original costs— Interest rate together with the anticipated rate of profit, determines the level of investment, and therefore the level of employment. Hence the significance of the rate of interest and the theory of its determination.

"The volume of investment is determined by the rate of interest in relation to investment demand schedule. The investment demand schedule relates the marginal efficiency of capital to the volume of investment. Investment will be pushed to the point where M. E. = interest rate."—**Hansen.**

[२३] The lower the rate of interest, the more difficult it becomes to push it down still farther by monetary policy. If under the circumstances, the monetary authorities increase the money supply, the public will be content simply to hold the extra cash—**Hansen.**

खंडाची एक व्याख्या :—उत्पादनासाठीं एखादा उत्पादन-घटक उपलब्ध व्हावा म्हणून त्या उत्पादन-घटकाच्या मालकाला जो किमान मोबदला देणें आवश्यक समजलें जातें, त्यापेक्षां अधिक मोबदला द्यावा लागल्यास खंड (Rent) ह्या उत्पन्न-प्रकाराचा उद्‌भव होतो. **त्या घटकापासून मिळणारें उत्पन्न व किमान आवश्यक म्हणून मानला जाणारा मोबदला ह्यांतील फरक म्हणजे खंड अशी खंडाची व्याख्या केली जाते.**[1]

रिकार्डोची खंडाची मीमांसा :—जमिनीच्या अंगभूत व अविनाशी उत्पादन-शक्तिपासून मिळणारें उत्पन्न अशी खंडाची व्याख्या करून रिकार्डोनें खंडाचा संबंध उत्पादनाच्या निसर्गसाधनांशीं जोडला आणि असें दाखवून दिलें कीं, त्यांच्यापासून मिळणारें सर्व उत्पन्न खंड म्हटलें जाण्यास पात्र असतें. कारण निसर्ग जी देणगी देतो तिचें पुरवठामूल्य शून्य असतें. तसें तें नसेल तर देणगी ह्या शब्दाला अर्थच उरणार नाहीं. नैसर्गिक संपत्ति उत्पादनासाठीं उपलब्धच असते. ती उपलब्ध व्हावी म्हणून मोबदला देण्याची आवश्यकता नसते.[2] नैसर्गिक साधनसामुग्री जर विना मोबदला उपलब्ध होत असेल तर तिच्यापासून उत्पन्न प्राप्त कसें होतें ? ह्या प्रश्नाला रिकार्डोनें असें उत्तर दिलें कीं, निसर्गसाधनांना मूळची किंमत नसली तरी निसर्ग-साधनांचा पुरवठा ठरीव असल्यामुळें प्रगतीच्या ओघांत त्यांच्याकरितां मागणी जशी वाढूं लागते तशी त्यांची दुर्मिळता अधिकाधिक जाणवत जाते. त्यामुळें त्या साधनांना मोल प्राप्त होतें. आणि ती साधनें ज्यांच्या मालकीची असतात त्यांना (खाजगी मालकी हा प्रचलित अर्थव्यवस्थेचा पाया असल्यानें निसर्गसाधनेंसुद्धां खाजगी मालकीची असणें अपरिहार्य आहे) कांहीं मोबदला मिळणें आवश्यक ठरतें. हा मोबदला म्हणजेच निसर्गसाधनांपासून मिळणारें उत्पन्न वाढाव्याच्या (Surplus) स्वरूपाचें असतें व सर्वांना सारखें मिळत नाहीं. ज्याच्या त्याच्या मालकीच्या निसर्ग-साधनांची नैसर्गिक उत्पादनक्षमता ज्या मानानें असते त्या मानानें हें उत्पन्न कमी जास्त मिळतें. हें उत्पन्न निसर्गसाधनांच्या मालकांना मिळतें ह्याचें कारण उत्पादना-साठीं ते कांहीं शारीरिक अथवा मानसिक झीज सोसतात असें नसून निसर्गसाधनें उत्पादनासाठीं ते उपलब्ध करून देतात हेंच असते. प्रचलित अर्थव्यवस्थेंत उत्पादन-स्वातंत्र्य भरपूर असल्यानें आपल्या मालकीची उत्पादन-साधनें स्वतः न वापरण्याचें अगर दुसऱ्याला वापरूं न देण्याचें कोणी ठरविल्यास त्याला तसें करण्यास

[1] Rent is defined as the surplus earned by a particular part of a factor of production over and above the minimum amount necessary to induce it to do its work.

[2] It follows from the definition of the free gifts of nature that they are there in any case, and do not require to be paid in order to exist.

कोणतीच आडकाठी नसतें. ह्या परिस्थितींत जे एखादा रोखूं शकतो तें त्यानें उत्पादनासाठीं उपलब्ध करावें हें काम सुद्धां महत्त्वाचें मानलें गेलें तर त्यांत नवल नाहीं. आणि खंड हें अशा कामापासून मिळणारें उत्पन्न असतें. निसर्गसाधनासाठीं मागणी जशी वाढत जाते तसे ह्या कामाचें महत्त्व वाढत जातें व खंड हें उत्पन्न वाढत जातें. निसर्ग साधनांचा पुरवठा वाढणें अथवा कमी होणें अशक्य असल्यानें खंडांचें प्रमाण संपूर्णपणें मागणीवर अवलंबून असते.[3]

अधिक स्पष्टीकरण :—रिकार्डोनें केलेल्या खंडाच्या मीमांसेचे अधिक स्पष्टीकरण पुढीलप्रमाणें करतां येईल :—निसर्गदत्त साधनसामग्रीचे सर्व भाग उत्पादनक्षमतेच्या दृष्टीनें सारखे नसतात. उत्पादन वाढविणें जसजसें आवश्यक होत जातें तसतसा कमी उत्पादनक्षमता असलेला भागहि उत्पादनासाठीं वापरावा लागतो. त्यामुळें निकृष्ट साधनसामग्री व उत्कृष्ट साधनसामग्री ह्यांच्या उत्पादनांत फरक पडल्याचें आढळून येतें. **हा फरक म्हणजे खंड होय.** तो खंडसंबंधित निसर्गसाधनांच्या मालकाला मिळणें रास्त असतें. वापरण्यांत येणाऱ्या निकृष्टतम साधनसामग्रीपासून—म्हणजे सीमान्त जमिनीपासून—खंड मुळींच प्राप्त होत नाहीं. सर्वांत निष्कृष्ट जमिनीपासून खंड प्राप्त होत नाहीं. ह्याचें कारण जमिनीला मूळचें मूल्य नसतें हेंच होय. निकृष्ट जमीन कोणती हें परिस्थितिनिरपेक्ष मात्र नसते. जमिनीसाठीं मागणी वाढल्यास हल्लीं जी जमीन निकृष्टतम असते तिच्यापेक्षां कमी प्रतीची जमीन वापरावी लागते आणि अशा प्रकारें जमिनीचा किमान दर्जा सारखा खालीं जात असतो. कोणत्याहि वेळीं निकृष्टतम जमीन विनाखंड उपलब्ध होते हें मात्र खरें. तेव्हां खंड हें मूल्य नसून सर्व नैसर्गिक साधनसामग्री गुणानें सारखी नसल्यामुळें पडणारी तफावत आहे. उदाहरणार्थ, शेतीसाठीं जी जमीन वापरली जाते तिचा दर्जा सारखा असतो असें म्हणतां यावयाचें नाहीं. दर्जानुसार शेत-जमीनीची पहिल्या दर्जाची जमीन, दुसऱ्या दर्जाची जमीन, तिसऱ्या दर्जाची जमीन अशी प्रतवारी लावतां येते. वापरांत असलेल्या सर्व प्रतींच्या जमीनीवर गुणदृष्ट्या व संख्यादृष्ट्या सारख्याच प्रमाणांत भांडवलाचा व मनुष्यबळाचा खर्च केला तरी उत्पन्नांत जमीनीच्या दर्जानुसार फरक पडणें स्वाभाविक आहे. पहिल्या

[3] Ricardo defines rent as the income from "The original and indestructible powers of the soil" that is to say from the factor the supply of which is absolutely fixed and invariable. As it is original the supply cannot be increased by human industry. As it is indestructible, the supply is not diminished through decay. The value of such factors depends solely on demand and is derived from the price of goods for which it is used—"The surplus is taken by the proprietor of the natural agent and is his reward, not for having laboured or abstained, but simply for not having withheld what he was able to withhold, for having permitted the gifts of nature to be accepted"—**Senior.**

दर्जाच्या जमीनीपासून होणारें उत्पादन दुसऱ्या दर्जाच्या जमिनीपासून होणाऱ्या उत्पादनापेक्षां अधिक असतें किंवा दुसऱ्या दर्जाच्या जमिनीपासून मिळणारें उत्पादन तिसऱ्या दर्जापासून मिळणाऱ्या उत्पादनापेक्षां अधिक असलें तर नवल नाहीं. कोणत्याहि वेळीं वापरांत असणाऱ्या जमीनीपैकीं सर्वांत निकृष्ट दर्जाची जमीन ही **सीमान्त-जमीन** (Marginal Land) मानली तर तिच्यापासून होणारें उत्पादन सर्वांत कमी असेल हें उघड आहे. तुलनेनें **सीमापूर्व** (Intra Marginal Land) जमिनीपासून होणारें उत्पादन अधिक असते. सीमापूर्व व सीमान्त-जमिनीपासून पडणाऱ्या उत्पादनांत हा जो फरक पडतो तो सर्व जमीनींची उत्पादनक्षमता निसर्गत: सारखी नसते म्हणून पडतो. त्यामुळें ह्या फरकानें निसर्गाचा उत्पादनाला लागणारा हातभार ठरतो. हा फरक त्या त्या जमिनीच्या मालकाला मिळत असला तरी वस्तुत: त्या फरकाला निसर्ग जबाबदार असतो. मालकाचें कर्तृत्व त्यांत कांहीं नसते. म्हणूनच हा फरक ही मालकाला दिलीच पाहिजे अशी किंमत नसून परिस्थितीमुळें मालकाला मिळणारा वाढावा असतो. खंडाची मीमांसा उत्पादनाच्या संदर्भांत जशी करतां येतें तशीच उत्पादनखर्चाच्या संदर्भांतहि करतां येतें. तशा मीमांसेनें उत्पादनखर्च व खंड ह्यांचा संबंध अधिकच स्पष्ट होतो. निरनिराळ्या दर्जाच्या जमिनीपासून होणाऱ्या उत्पादनावर एकंदर खर्च सारखाच झाला तरी उत्पादन मात्र कमी जास्त होते. म्हणजेच दर्जानुसार उत्पादनाच्या सरासरी खर्चांत फरक पडतो. जमिनीचा दर्जा जेवढा कमी तेवढा सरासरी उत्पादनखर्च अधिक असतो. सीमान्त-जमिनीच्या उत्पादनाचा सरासरी खर्च सर्वांत अधिक असतो. सीमान्त-जमीन उत्पादनासाठीं उपलब्ध व्हावयाची असेल तर त्या जमीनीच्या उत्पादनाच्या सरासरी खर्चाएवढीं किंमत ठरणें भाग असते. तेवढीच किंमत ठरली म्हणजे त्या जमीनीच्या मालकाला कांहींच खंड मिळत नाहीं. रिकार्डोच्या शब्दांत ती **बिनखंडाची जमीन** (No Rent Land) असतें. सीमापूर्व जमिनीपासून मात्र मालकांना खंड मिळतो. कारण त्यांचा उत्पादनखर्च व किंमत ह्यांत तफावत पडते. ही तफावत म्हणजेच त्यांचा खंड होय.[४] प्रत्येक मालकाचा एकंदर खंड उत्पादन गुणिलें सीमान्त-जमिनीचा उत्पादनखर्च (म्हणजेच उत्पादनाची बाजारांत ठरणारी किंमत) उणें त्याचा उत्पादनखर्च एवढा असतो. सीमापूर्व जमिनीवर होणाऱ्या

४ With the progress of society there is an increasing demand for food and an increasing pressure on land for growing corn. But owing to the scarcity of land and owing to the operation of diminishing returns more labour has to be employed to raise an equal amount of land as cultivation progresses. The price of corn is determined at the margin where it is raised at the highest cost in labour —The excess of this marginal cost over average cost is rent per unit of product. The margin shifts downwards as population increases, giving landlords higher rents.

उत्पादनाचा सरासरी खर्च कमी असण्याचें एकमेव कारण सीमान्त-जमिनीच्या तुलनेनें त्या त्या जमिनीची नैसर्गिक गुणवत्ता अधिक असते हेंच होय. सीमापूर्व जमिनीच्या मालकांना मिळणाऱ्या खंडामुळें सीमान्तजमिनीचा उत्पादनखर्च वाढतो असें म्हणतां यावयाचें नाहीं. पण सीमान्त-जमिनीच्या उत्पादनाचा खर्च अधिक असतो म्हणून सीमापूर्व जमिनीच्या मालकांना खंड मिळतो असें मात्र म्हणतां येईल. म्हणजेच थोडक्यांत खंडामुळें किंमत ठरत नसून किंमतीमुळें खंड ठरतो. खंडाचा उत्पादन-खर्चांत व किंमतींत अन्तर्भाव होत नाहीं असें म्हटलें जातें तें ह्याच अर्थानें.[५] उत्पादनघटकाचा संबंधित भाग उत्पादनासाठीं मिळविण्याकरितां द्यावी लागणारी खंड ही किंमत नसल्यानें खंडाचा अंतर्भाव उत्पादन-खर्चांत होण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं.

रिकार्डोच्या मीमांसेचा सारांश :—रिकार्डोनें खंडाची जी मीमांसा केली आहे तिचा सारांश पुढीलप्रमाणें सांगतां येतील. (१) खंडाचा संबंध 'भू' ह्या घटकाशींच असतो कारण त्या घटकालाच पुरवठा मूल्य शून्य असतें. (२) उत्पादन-घटकाचीं सर्व परिमाणें सारख्या दर्जाचीं नसतात. म्हणूनच खंड हा फरक उद्भवतो. त्या खेरीज जमीन दुर्मिळ असते हें खंड उद्भवण्याचें खरें कारण होय. जमीन विपुल असती तर ती तिच्या मूळच्या मूल्यालाच मिळाली असती. पण जमीन विशेषतः चांगली जमीन विपुल नाहीं म्हणून खंड द्यावा लागतो. कोणत्याहि वेळीं फक्त सर्वांत कमी प्रतीची जमीन फुकट मिळते. (३) वापरांत असलेल्यांपैकीं सर्वांत कमी दर्जाच्या जमीनीच्या मालकाला खंड प्राप्त होत नाहीं. सीमापूर्व जमिनीच्या मालकांना तो मिळतो. आणि (४) खंडाचा समावेश उत्पादनखर्चांत होत नाहीं. जमिनीच्या सर्व तुकड्यांचा कस सारखा नसल्यानें उत्पादनखर्च कमीअधिक होतो. जास्तींत जास्त उत्पादनखर्चाइतकी किंमत ठरणें प्राप्तच असतें. म्हणून खंडाचा उद्भव होतो. तेव्हां खंड हा उत्पादनखर्चाचा भाग नसून उत्पादनखर्चांत फरक असण्याचा परिणाम आहे.

आधुनिक मीमांसा :—आधुनिक अर्थशास्त्रज्ञांची खंडाची मीमांसा रिकार्डोच्या मीमांसेपेक्षां बरीच वेगळी आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें **खंड हा विशिष्ट घटकाशीं संबंधित असलेला उत्पन्न-प्रकार नसून विशिष्ट परिस्थितींतून उद्भवणारा उत्पन्न-प्रकार आहे.** त्यामुळें तशी परिस्थिति असल्यास कोणत्याहि उत्पादन-घटकापासून खंड मिळूं शकतो. त्या उत्पादन-घटकाच्या संबंधित भागाच्या मालकाला तो

[५] Rent is not a price determining but price determined income—Rent does not enter into cost of production. The causal relation runs only one way, from commodity price to factor price. Hence Ricardo's oft quoted statement 'corn is not high because rent is paid but rent is paid because corn is high.' The value of rent depends on the position of the margin or in other words upon the extent of demand for land in relation to its given supply.

प्राप्त होऊं शकतो.[६] रिकार्डोनें केलेला खंडाचा अर्थ ग्राह्य धरूनहि कोणत्याहि घटकापासून खंड उद्‌भवतो हें सिद्ध करतां येईल कारण प्रत्येक उत्पादनघटकाची किमान किंमत जी असते तिच्यापेक्षां अधिक किंमत त्या घटकाच्या कांहीं भागाला तरी मिळत असते, असें वस्तुस्थितींत नेहमींच आढळतें. उदाहरणार्थ, कामगाराच्या शरीरानें नीट काम द्यावें म्हणून—कारण त्याच्या कामाचें स्वरूप शारीरिक असतें म्हणून—जेवढें वेतन आवश्यक असतें तेवढेंच कामगाराचें किमान मूल्य होय. त्या वेतनावर कामगारवर्ग उपलब्ध व्हावयास कोणतीच हरकत नाहीं. पण प्रत्यक्षांत तसें होतें काय? प्रत्यक्षांत कामगारवर्गाच्या कांहीं भागाला तरी त्यापेक्षां अधिक वेतन मिळतें हें खरें नाहीं काय? उत्पादन-क्षमता सारखी नसते म्हणून कामगारांच्या वेतनांत फरक पडतो, हीहि गोष्ट नाकारतां यावयाची नाहीं. उत्पादकांच्या नफ्याबद्दल किंवा भांडवलदारांच्या व्याजाबद्दल तेंच म्हणतां येईल. सामान्य कामगाराला मिळणाऱ्या वेतनापेक्षांहि उत्पादकाची जबाबदारी घेतल्यानें कमी नफा मिळाला तर फुकाफुकी ती जबाबदारी कोण पत्करील? तेव्हां किमान तेवढा नफा मिळावा, अशी उत्पादकाची अपेक्षा असणें स्वाभाविक आहे. ती अपेक्षा हें उत्पादकाचें किमान मूल्य समजल्यास त्यापेक्षां अधिक नफा मिळाल्यास त्याला खंडाचें स्वरूप प्राप्त होतें. उत्पादकाच्या कर्तबगारीवर नफा कांहीं प्रमाणांत तरी अवलंबून असतो. प्रत्यक्षांत मिळतें त्यापेक्षां कमी व्याज असलें तरी कित्येकांची शिल्लक कर्ज म्हणून दिली जाईल ह्यांत संदेह नाहीं. तेव्हां उत्पादनासाठीं उपलब्ध होण्यासाठीं लागणारें किमान उत्पन्न हेंच प्रमाण धरल्यास सर्व उत्पादन-घटकांच्या उत्पादनांत खंडाचा अंश असतो हें ओघानें आलेंच.

उत्पादन-साधनाच्या पुरवठामूल्याची आधुनिक मीमांसा:—पण उत्पादन-साधनाचें पुरवठामूल्य (Supply Price) नेमकें काय असतें ह्याबद्दलची आधुनिक अर्थशास्त्राची कल्पना मूळांतच भिन्न आहे. ती पुढीलप्रमाणें सांगतां येईल :—

कोणत्याहि उत्पादनसाधनासाठीं द्याव्या लागणाऱ्या किमान किंमतीचा विचार करतांना प्रत्येक उद्योगधंदा स्वतंत्रपणें लक्षांत घ्यावा लागतो. तसा विचार करतांना एकंदर उत्पादनासाठीं एखादा उत्पादनघटक किती किंमत दिली असतां उपलब्ध होऊं शकेल, हा प्रश्न अप्रस्तुत आहे. संबंधित उद्योगधंद्यासाठीं तो उत्पादन-घटक उपलब्ध होण्यासाठीं किती किंमत द्यावी लागेल हा प्रश्न खरा महत्त्वाचा असतो. ह्या प्रश्नाच्या दृष्टीनें विचार केल्यास असें दिसून येतें कीं, एखाद्या उद्योगधंद्यासाठीं एखादा उत्पादक-घटक उपलब्ध होण्यासाठीं जी किंमत द्यावी लागते ती इतर ज्या उद्योगधंद्यांत तो उत्पादक-घटक वापरतां येऊं शकेल त्यांत त्या घटकाला मिळणाऱ्या मोबदल्यावर अवलंबून असते.[७] इतर उद्योगधंद्यांतहि सामान्यतः त्या घटकाचा उपयोग होऊं शकतोच. कारण बहुतेक सर्व उत्पादनसाधनें बहुविध उपयोगी असतात. आणि म्हणून विविध उद्योगधंद्याची त्यांना प्राप्त करून

---

[६] In each of the broad categories of factors, particula pieces of factors may be found which earn rent.

घेण्यासाठी स्पर्धा चालू असते. अशा परिस्थितींत एखाद्या उद्योगधंद्यासाठीं एखादा घटक मिळवावयाचा असल्यास त्याच्या उरलेल्या उपयोगापासून जी प्राप्ति होण्याचा संभव असतो, म्हणजेच इतर उद्योगधंद्यांतून जो मोबदला त्याला मिळण्याचा संभव असतो त्यांतील सर्वांत अधिक मोबदला जेवढा असतो तेवढा तरी त्या घटकाला संबंधित उद्योगधंद्यांत मिळालाच पाहिजे. नाहींतर तो घटक त्या संबंधित उद्योगधंद्याकरितां उपलब्ध व्हावयाचा नाहीं. त्या घटकाचा ओघ इतर उद्योगधंद्याकडे साहजिकच वळेल. तो तसा न वळावा म्हणून त्या घटकाला जो मोबदला द्यावा लागतो तो टाळतां येत नाहीं. कोणत्याहि उत्पादनघटकाचें एखादे परिमाण संबंधित उद्योगधंद्यांतून बाहेर पडण्यास उद्युक्त होऊ नये म्हणून जो मोबदला द्यावा लागतो त्याला त्या परिमाणाचें **उपयोगान्तर मूल्य** (Transfer Earnings) म्हणतां येईल. कारण हें मूल्य न दिल्यास तें परिमाण संबंधित उद्योगापासून बाहेर पडून दुसऱ्या उपयोगासाठीं वापरलें जातें. हें होऊं नये म्हणून तें मूल्य द्यावेंच लागतें.[८] त्यामुळें साहजिकच तें उत्पादन-खर्चांत अंतर्भूत होतें.

उत्पादन-खर्चाचा आधुनिक अर्थ :—उत्पादनघटकाला द्याव्या लागणाऱ्या किमतीचा वरील खुलासा वास्तव उत्पादन-खर्चाबाबतच्या आधुनिक कल्पनांशीं सुसंगत असाच आहे. त्या कल्पनानुसार कोणत्याहि घटकाचें मूल्य त्या घटकाच्या मालकाला उत्पादनाप्रीत्यर्थ सोसाव्या लागणाऱ्या शारीरिक अथवा मानसिक झीजेवर अवलंबून नसून त्या घटकाचा वापर विशिष्ट वस्तूच्या उत्पादनासाठीं केल्यामुळें समाजाची जी हानि होते त्यावर अवलंबून असते. बहुतेक सर्व उत्पादनसाधनें बहुविध उपयोगाची असतात. तीं त्यांच्या अनेक उपयोगांपैकीं एकाच विशिष्ट उपयोगासाठीं वापरल्यानें समाजाची हानि होते कारण त्यांचा इतरत्र उपयोग केला असतां तर

७ From the point of view of an industry producing a particular commodity the necessary minimum payment for a factor is not the payment which will cause that factor to exist, but the payment that will cause it to take service in that particular industry rather than in another. The cost of any unit of a factor, from the point of view of one industry, is determined by the reward which that unit can earn in some other industry.
—Mrs. Robinson

८ The price which is necessary to retain a given unit of a factor in a certain industry is called its transfer earnings or transfer price, since a reduction of a payment made for it below the price would cause it to be transferred elsewhere. There is no supply price of any factor in the absolute sense. The supply price of a factor with reference to any particular industry is derived from the importance of the next best possible use to which it might be employed—**Mrs. Robinson.**

त्या त्या वस्तूच्या उत्पादनात जी भर पडली असती ती समाजाला गमवावी लागते. समाजाची ही हानि ह्याच संबंधित वस्तूच्या उत्पादनासाठीं पडणारा भुर्दंड होय. हा भुर्दंड व ज्या वस्तूच्या उत्पादनासाठीं संबंधित उत्पादन साधन वापरलें जातें त्या वस्तूच्या उत्पादनाचें महत्त्व ह्यांची बरोबरी झाल्यासच बहुविध उपयोगाचें उत्पादनसाधन विशिष्ट उपयोगासाठीं वापरण्याचा निर्णय रास्त ठरतो. ह्या बाबतींत उत्पादनघटकाच्या मालकाचे किती नुकसान होतें हा विचार अप्रस्तुत आहे.[१]

उत्पादन खर्चाच्या आधुनिक अर्थाच्या अनुरोधानें विचार केला तर उत्पादनाचा कोणताहि घटक किंवा त्याचा कोणताहि भाग विना मोबदला उत्पादनासाठीं उपलब्ध होईल, हें संभवनीय नाहीं, हें उमजेल. उदाहरणार्थ, शेतजमिनीची नैसर्गिक उत्पादनक्षमता ही निसर्गाची देणगी आहे असें समजलें जातें. तें खरेंच आहे असेंच कोणीहि म्हणेल; पण म्हणून कोणत्याहि एका वस्तूच्या उत्पादनाच्या दृष्टीनें शेतजमिनीचें पुरवठा-मूल्य शून्य आहे, असें म्हणतां यावयाचें नाहीं. उदाहरणादाखल शेतजमिनीचा एखादा तुकडा घेतला तरी चालण्याजोगें आहे. तो तुकडा बहुविध उपयोगाचा असतो. निरनिराळ्या प्रकारचा शेतमाल त्या तुकड्यांतून काढतां येतो. त्या दोन्हीपैकीं कोणत्याहि वस्तूच्या उत्पादनासाठीं तो तुकडा वापरला तर खर्चवेंच वजा जातां मालकाला कांहींतरी उरेलच. त्यांतील जी किमान रक्कम असेल तेवढी मालकाला देणें खंडानें तो तुकडा जो घेईल त्याला भागच आहे. ही रक्कम अर्थातच जो ती जमीन घेईल त्याच्या उत्पादनखर्चांत अंतर्भूत केली जाईल. असाच विचार इतर उत्पादन-घटकांबाबत करतां येतो. त्यांतून असें स्पष्ट होते कीं, किमान मोबदला कोणता हें केव्हांहि निश्चित सांगतां येत नाहीं. त्या त्या घटकासाठीं किती उद्योगधंद्याची स्पर्धा चालू आहे, प्रत्येक उद्योगधंद्यांतून त्या घटकास काय मोबदला मिळूं शकेल, ह्या गोष्टी विचारांत घ्याव्याच लागतील. स्थलकाल-परिस्थितीनुसार त्यांत भिन्नता निर्माण होईल; पण एवढें निश्चित कीं, भू ह्या घटकापासून जें उत्पन्न मालकाला मिळतें आणि ज्या उत्पन्नाला रिकार्डोच्या मीमांसेप्रमाणें खंड म्हणावें लागतें तें सर्वच्या सर्व उत्पन्न खंड

---

[१] What is relevant is not the cost to the individual owner but cost to the society in the sense of a displaced alternative. What it costs to the society in employing a particular amount of productive resources for one good is the value of other goods which these resources might produce. Cost of one thing is the value of alternatives surrendered.

This at once explains why factors are remunerated and why different kinds of land and labour are differently remunerated. Factors are remunerated because of their scarcity in relation to demand and because if they do not get adequate remuneration in one employment they would transfer their services to other employments.—**Dasgupta**

ह्या शब्दप्रयोगाला आधुनिक मीमांसेप्रमाणें पात्र होत नाहीं. त्यांतील कांहीं भाग तरी संबंधित निसर्ग साधनें संबंधित वस्तूच्या उत्पादनासाठीं उपलब्ध होण्यासाठीं मूल्य म्हणून द्यावा लागतो. ह्या भागाला त्या उद्योगधंद्याच्या दृष्टीनें खंड म्हणणें योग्य होणार नाहीं.

खंड ह्या शब्दप्रयोगाचा नवा अर्थ :—वरील विवेचनांतून असा प्रश्न उपस्थित होतो कीं, खंडनामक कांहीं उत्पन्न प्रकार असतो कीं नाहीं ? ह्या प्रश्नाचें उत्तर अर्थातच असतो असें आहे. विशिष्ट उद्योगधंद्यासाठीं उत्पादनघटक उपलब्ध व्हावा म्हणून जो कमींतकमी मोबदला द्यावा लागतो त्यापेक्षां अधिक उत्पन्न मिळविणारा त्या उत्पादनघटकाचा कांहीं भाग प्रत्येक उद्योगधंद्यांत असतो. एखाद्या उद्योगधंद्यांत जे घटकभाग (Factor Units) वापरले जात असतात त्या सर्वांना सारखाच मोबदला दिला जातो. पण त्यांपैकीं कांहीं घटक भागांना उपयोगान्तर मूल्याएवढीच किंमत मिळत असते. अशा प्रत्येक घटकभागाला सीमान्त घटकभाग म्हणतां येईल.[१०] कारण मोबदला थोडा जरी कमी झाला तरी तो घटक भाग त्या उद्योगधंद्याबाहेर पडण्यास उद्युक्त होतो. पण त्या घटकांच्या इतर कांहीं भागांना मिळणारा मोबदला उपयोगान्तर मूल्यापेक्षां अधिक असतो. ते घटक भाग कमी मोबदल्यावरहि संतुष्ट झाले असते तरीहि त्यांना अधिक मोबदला मिळतो. कारण उत्पादन-साधनांना मिळणारा मोबदला त्या त्या प्रकारच्या उत्पादन-साधनांच्या मागणी-पुरवठ्याच्या परिस्थितीवर अवलंबून असतो आणि कोणत्याहि उत्पादन-साधनांच्या सर्व घटक भागांना सारखाच मोबदला दिला जातो. एखाद्या उत्पादन-साधनाच्या ज्या घटकभागाला त्याच्या उपयोगान्तर मूल्यापेक्षां अधिक मोबदला मिळतो त्या घटकभागाला सीमापूर्व घटकभाग म्हणतां येईल. सीमापूर्व घटकभाग मालकाला उपयोगान्तर मूल्यापेक्षां जेवढे अधिक उत्पन्न मिळतें त्याला खंड असें यथार्थपणें म्हणतां येतें. **एखाद्या घटकभागाच्या मालकाला मिळणारें प्रत्यक्ष उत्पन्न व तो घटक भाग संबंधित उद्योगधंद्यांत रहावा म्हणून दिलाच पाहिजे असा मोबदला ह्यांच्यांतील फरक हा त्या उद्योगधंद्याच्या दृष्टीनें खंड होय.** असा वरील विवेचनावरून खंड ह्या शब्दाला नवा अर्थ प्राप्त होतो.[११]

आधुनिक अर्थानें खंडाचा उद्भव होण्याचीं कारणें :–ह्या नव्या अर्थानें खंडाचा उद्भव होतो. ह्याचीं कारणें रिकार्डोनें दिलेल्या कारणांपेक्षां भिन्न आहेत असें नाहीं. रिकार्डोनें विशिष्ट उत्पादनसाधन दुर्मिळ असल्यामुळें खंडाचा उद्भव होतो असें

[१०] Any particular unit of a factor may be said to be at the margin of transfer or to be a marginal unit, if the earnings which it receives in the industry where it is employed are only just sufficient to prevent it from transferring itself to someother use. A unit which would remain in the industry for a smaller payment than it actually receives may be called an Intra-marginal unit—**Mrs. Robinson**.

दाखविलें. खंडाच्या आधुनिक मीमांसेंतहि दुर्मिळतेला महत्त्व आहेच. एखाद्या उद्योगधंद्याची विशिष्ट उत्पादन-साधनाकरितां मागणी वाढल्यास आणि त्या साधनाचा एकंदर पुरवठा वाढूं शकत नसल्यास—म्हणजे त्या साधनांचा कोणताही भाग निकामी पडून राहिलेला नसल्यास—इतर उद्योगधंद्यांतगुंतलेल्या त्या साधनांच्या भागांना संबंधित उद्योगधंद्याकडे आकर्षित करावें लागतें. त्याकरितां संबंधित उद्योगधंद्याला त्या साधनाकरितां अधिकाधिक किंमत द्यावी लागतें कारण जसजशी मागणी वाढत जाते तसतशीं ज्यांचें उपयोगान्तर मूल्य वाढते आहे अशीं साधनें मिळवावीं लागतात. त्यामुळें पूर्वीं वापरल्या जाणाऱ्या घटक भागांचा मोबदला वाढतो. त्याचबरोबर त्यांच्या उत्पन्नांतील खंडाचा अंशहि वाढतो. कारण त्यांचे उपयोगान्तर मूल्य वाढलें नसतांहि केवळ संबंधित उद्योगधंदा वाढला म्हणून त्यांची प्राप्ति वाढते. किंवा ज्यांचें उपयोगान्तर मूल्य कमी आहे अशीं साधनें मिळवावीं लागतात आणि त्यांना ज्यांचे उपयोगान्तर मूल्य अधिक आहे त्यांच्याएवढाच मोबदला द्यावा लागतो. ह्या परिस्थितींत नव्यानें काम दिलेल्या घटक भागांना खंडाची प्राप्ति होते. सारांश, उत्पादनसाधनांची दुर्मिळता हें खंड उद्‌भवण्याचें महत्त्वाचें कारण आहे. मात्र ह्या ठिकाणीं एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. ती अशी कीं, केवळ दुर्मिळता हें खंडाचा उद्भव होण्याचें कारण होऊं शकत नाहीं. उदाहरणार्थ, एखाद्या दुर्मिळ साधनासाठीं सर्वच उद्योगधंद्यांची मागणी वाढली तर त्या साधनाचें मूल्य वाढेल. पण तरीहि खंडाचा उद्‌भव होईलच असें नाहीं कारण त्या साधनाचें उपयोगान्तर मूल्य सर्वच उद्योगधंद्यांत वाढेल आणि प्रत्येक उद्योगधंद्यांत त्या साधनांसाठीं वाढलेला पण उपयोगान्तर मूल्याएवढाच मोबदला दिला जाईल. जेव्हां साधनाच्या दुर्मिळतेमुळें एखाद्या उद्योगधंद्यांत त्या साधनांकरितां द्यावा लागणारा मोबदला उपयोगान्तर मूल्यापेक्षां वाढतो तेव्हांच त्या साधनांची एकंदर दुर्मिळता खंडाचा उद्‌भव होण्यास कारणीभूत होते. एखादें उत्पादनसाधन दुर्मिळ असलें तरी त्या उत्पादनसाधनाचा पुरवठा विशिष्ट उद्योगधंद्याच्या दृष्टीनें लवचिक असूं शकतो.[१२] हें प्रस्तुत संदर्भांत लक्षांत ठेविले पाहिजे. तो तसा असल्यास म्हणजे घटकमूल्यांत वाढ न होतां एखादा घटक कितीहि प्रमाणांत एखाद्या उद्योगधंद्यासाठीं उपलब्ध झाल्यास खंडाचा उद्‌भव होणार नाहीं. पण लवचिकता कमी असल्यास म्हणजे तो घटक विशिष्ट उद्योग धंद्यासाठीं मिळविण्यास अधिक किंमत देणें भाग पडल्यास खंडाचा उद्‌भव होतो. विशिष्ट उद्योगधंदा वाढत असल्यामुळें खंडाचा उद्‌भव होणें किंवा पूर्वीं मिळत असलेल्या खंडांत वाढ होणें हा प्रकार

---

[११] It is consonant with the general notion of rent to describe the difference between the actual earnings of the unit of the factor and its transfer earnings as rent from the point of view of the industry.

[१२] It is quite possible, even when the total supply of a factor is perfectly inelastic, for its supply to any one industry to be perfectly elastic. —Mrs. Robinson

कोणत्याहि उत्पादन-साधनाच्या बाबतींत शक्य होतो. पण एवढेंच म्हणतां येईल कीं, खंडास कारणीभूत होणाऱ्या गोष्टींचा जोर सर्व घटकांच्या बाबतींत सारखा नसतो.[१३] **उत्पादनसाधनाची अपूर्ण लवचिकता हें खंडाचा उद्‌भव होण्याचें मूलभूत कारण होय**. निसर्गाच्या देणगीचा पुरवठा सर्वांत कमी लवचिक असतो. कारण निसर्गानें दिलेल्या बहुतेक साधनसामग्रीचे उपयोग मोजके असतात. तिचा उपयोग वाटेल तसा करणें सामान्यत: शक्य नसतें. तेव्हां खंड ह्या उत्पन्नप्रकाराचा संबंध सर्वांत अधिक निसर्गाच्या देणगीशीं येतो, हें नाकारतां यावयाचें नाहीं. तसेंच निसर्ग-साधनांचा पुरवठा वाढविणें अगर कमी करणें शक्य नसल्यानें त्या घटकांच्या बाबतींतला खंडाचा अंश कायम टिकून राहतो. पण विशिष्ट प्रकारचा कामगारवर्ग किंवा भांडवल-साधनें दुर्मिळ झाल्यामुळें निर्माण होणारा खंड (ज्याला मार्शलनें खंड-वजा उत्पन्न 'Quasi Rent' असें नांव दिलें) तो अल्पकाळच टिकतो.

प्रमुख संदर्भग्रंथ

(1) Mrs. Robinson—Economics of Imperfect Competition.
(2) Dasgupta—The Conception of Surplus in Theoretical Economics.

: १४ : नफा

उत्पादकांना—म्हणजे उत्पादनाची सर्व जबाबदारी त्याच्यांतील धोक्यासह पत्करणारांना—जें उत्पन्न मिळतें त्याला नफा म्हणतात; पण उत्पादकांचें सर्व उत्पन्न म्हणजे नफा नव्हे हें प्रथम लक्षांत ठेवलें पाहिजे. कारण त्या उत्पन्नांत व्याज, खंड व वेतन ह्यांचाहि समावेश कांहीं प्रमाणांत असतो. उत्पादनाप्रीत्यर्थ लागणाऱ्या उत्पादनघटकांचा कांहीं भाग वेतन, खंड व व्याज ह्या रूपानें त्यांच्या मालकाकडून योग्य किंमत देऊन मिळविले जातात त्याखेरीज स्वत:च्या मालकीचें घटकभागहि उत्पादनासाठीं उत्पादकाकडून वापरलें जातात. उदाहरणार्थ, कित्येक उत्पादक स्वत: राबतात—म्हणजे निराळ्या शब्दांत असें म्हणतां येईल कीं, आपल्या मालकीचें मनुष्यबळ उत्पादनासाठीं वापरतात. निसर्गसाधनें व भांडवल ह्यांच्याबद्दल सुद्धां असेंच म्हणतां येईल. आपल्या मालकीचे उत्पादनघटक उत्पादकांनीं स्वत:च्या उत्पादनासाठीं न वापरतां इतरांना विकले असते तर त्यांना वेतन, खंड व व्याज ह्या रूपानेंच उत्पन्न मिळालें असतें. हें जर खरें असेल तर उत्पादकांच्या एकंदर उत्पन्नापैकीं कांहीं भाग तरी वेतन, खंड अथवा व्याज ह्या सदराखालीं घालणें उचित होईल. कारण तो भाग उत्पादकाचें काम केल्यामुळें मिळालेला नसतो; तर इतर घटक जें काम करतात त्या स्वरूपाचें काम केल्यामुळें मिळालेला असतो. अशा प्रकारें

[१३] The influences which lead to the occurrence of rent in an industry will apply with varying force to the four main categories of factors.

उत्पादकाच्या एकंदर उत्पन्नांतून ज्याला यथार्थतेनें वेतन, खंड अथवा व्याज म्हणतां येईल असा भाग कमी केल्यानंतर जो भाग उरतो तोच उत्पादकांचा **निव्वळ नफा** (Pure Profits) होय. असा नफा अर्थव्यवस्थेंत कशामुळें उद्‌भवतो, हें मूल्य-निश्चितीची प्रक्रिया काळजीपूर्वक तपासल्यास सहज उमजतें.

पूर्ण स्पर्धेत दीर्घकाळांत नफा नाहीं :—मूल्यनिश्चितीची प्रक्रिया तपासल्यास असें दिसून येतें कीं, पूर्ण स्पर्धा असतां दीर्घकालीन किंमत सरासरी उत्पादनखर्चा-एवढीच होते. पूर्णस्पर्धेत अर्थातच उत्पादकांना त्यांच्या स्वतःच्या घटक भागापासून वेतन, खंड व व्याज ह्या स्वरूपाचा मोबदला मिळतोच. तो सर्व मोबदला प्रत्यक्ष हिशोबांत नफा म्हणून दाखविला जातो, हा भाग वेगळा. त्या मोबदल्याला नफा म्हणावयाचेंच असेल तर त्याला शुद्ध किंवा निव्वळ नफा न म्हणतां **साधारण नफा** (Normal Profit) असें म्हणावयाची पद्धत आहे. साधारण नफ्यामध्यें उत्पादनखर्चाएवढी किंमत ठरली असतांहि एकंदर उत्पन्नाचा जो भाग उत्पादकांकडे राहतो तेवढाच भाग येतो.[1] पण ज्याला निव्वळ नफा म्हणतां येईल त्याला पूर्ण स्पर्धेतील दीर्घकालीन समतोल मूल्यामध्यें स्थान नाहीं.

नफा उद्‌भवण्याचीं कारणें :—निव्वळ नफ्याला पूर्ण स्पर्धेतील दीर्घकालीन मूल्यामध्यें स्थान नाहीं, असें म्हणण्यांत नफ्याचा उगम कशामुळें होतो, हें आपोआपच सांगितल्यासारखें होतें. अर्थव्यवस्थेंत निव्वळ नफा उद्‌भवण्याचीं दोनच महत्त्वाचीं कारणें संभवतात. **पूर्ण स्पर्धेचा अभाव** हें एक कारण आणि पूर्ण स्पर्धा असूनहि कांहीं अल्पकालीन परिस्थितीमुळें **किंमत दीर्घकालीन समतोल मूल्यापेक्षां अधिक असणें** हें दुसरें कारण.[2] ह्या दोन्ही गोष्टी स्वतंत्रपणें किंवा संयुक्तपणें नफ्याचा उद्‌भव होण्यास कारणीभूत होतात.

मक्तेदारीनिर्मित नफा :—जेव्हां मक्तेदारी पूर्णतः किंवा अंशतः एखाद्या उद्योग-धंद्यांत असते तेव्हां सामान्यपणें वस्तूची किंमत सरासरी उत्पादनखर्चापेक्षां अधिक असते. त्यामुळें ज्याला निव्वळ नफा म्हटलें जातें असा नफा उत्पादकांना मिळत असतो. त्या उद्योगधंद्यांत शिरण्यास इतरांना अनिर्बंध वाव असल्यास मक्तेदारींतून उद्‌भवणारा नफा टिकणार नाहीं हें स्पष्टच आहे. पूर्ण मक्तेदारींत इतरांना प्रवेश मिळण्याचा प्रश्नच नसतो. अपूर्ण स्पर्धा किंवा मक्तेदारी असतां उद्योग-धंद्यांतील प्रवेश सुलभ नसतो. त्यामुळें सर्वच उत्पादकांना निव्वळ नफा मिळत राहतो. सारांश, मक्तेदारीचें स्वरूपच असें कांहीं आहे कीं, त्यामुळें निव्वळ नफा

[1] The accounting profit or residual received by enterprise owner's would be composed only of competitive interest on owners interested funds and competitive wages and rent imputed to owner supplied labour and land—**Bain**

[2] If pure profits do arise, this will be because of departure either from pure competition or from long run equilibrium.

सतत मिळत राहणें क्रमप्राप्त होते.[३] मक्तेदारीमुळें हमखास नफा प्राप्त होतो. म्हणून उत्पादक लोक हरप्रयत्नानें मक्तेदारी––जमल्यास संपूर्णपणें नाहींतर शक्य असेल त्या प्रमाणांत––मिळविण्याचा प्रयत्न करीत असतात. मक्तेदारींतच हमखास सतत नफा मिळविण्याची शक्यता असल्यामुळें पूर्ण स्पर्धा ग्राहकाच्या दृष्टीनें कितीहि चांगली असली तरी एका दृष्टीनें पूर्णस्पर्धा भांडवलशाही अर्थव्यवस्थेशीं विसंगत आहे, ही गोष्ट ह्या ठिकाणीं स्पष्ट केली पाहिजे. नफा ही तर भांडवलशाहीच्या सर्व अर्थ-व्यवहारांची प्रेरणाशक्ति आहे. असें असतांना उत्पादकवर्गाकडून पूर्ण स्पर्धा नसावी, कोठें असल्यास ती नाहींशी व्हावी, असे प्रयत्न न केले गेले तरच नवल !

अर्थव्यवस्था गतिमान असल्यामुळें उद्‌भवणारा नफा :—अर्थव्यवस्था **स्थितिशील** (Stationary) असल्यास म्हणजेच अर्थव्यवस्थेंत मागणीच्या अगर पुरवठ्याच्या बाजूस कोणत्याहि प्रकारचा बदल केव्हांहि होत नसेल तर पूर्णस्पर्धेच्या परिस्थितींत एकदां प्रस्थापित झालेला समतोल ढांसळण्याची वेळच येणार नाहीं; आणि नफा हें उत्पन्न कधींच उद्‌भवणार नाहीं. पण अर्थव्यवस्था **गतिशील** असल्यामुळें मागणीच्या व पुरवठ्याच्या बाजूनें सारखे बदल होत असतात. त्या बदलामुळें उत्पादनखर्चाएवढ्या किंमतीला मागणीपेक्षां पुरवठा कमी, अशी परिस्थिति निर्माण होऊन नफ्याचा वारंवार उद्‌भव––पूर्णस्पर्धा बाजारांत असली तरी––होत असतो. कोणत्याहि एका बदलामुळें उद्‌भवलेला नफा बाजारांत खरोखरच पूर्णस्पर्धा असल्यास कायम टिकणार नाहीं. कारण उत्पादनखर्चाएवढ्या किमतीला समतोल प्रस्थापित करणारे प्रवाह आपलें कार्य करीत असतातच. तरीहि ह्या संदर्भांत दोन गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत. पहिली गोष्ट अशी कीं, अल्पकाळ म्हणजे नेमका किती काळ हें ठरलेलें नाहीं. तेव्हां अर्थशास्त्रांतील अल्पकाळ हा मानवी व्यवहारांच्या दृष्टीनें दीर्घकाळहि समजला जाईल. तसेंच मागणी अगर पुरवठ्याच्या बाजूस ज्यायोगें समतोल ढांसळेल असा कोणताहि बदल झाला तर ढांसळलेला समतोल पुनः प्रस्थापित होण्यासाठीं कांहीं काळ जावाच लागतो. तो काळ जाण्यापूर्वींच दुसरा एखादा बदल झाला तर समतोलमूल्य बाजारांत प्रस्थापित होण्यास संधि मिळणार नाहीं आणि वारंवार आणि झपाट्यानें मागणी व पुरवठ्याच्या बाजूस बदल होत गेले तर कदाचित् ढांसळलेला समतोल केव्हांच प्रस्थापित व्हावयाचा नाहीं ! ह्याहि कारणा-करितां अर्थव्यवस्था अतिशय गतिमान असेल तर तत्त्वतः अल्पकालीन ठरलेला नफा कायमचा आहे, असें वाटण्याजोगी परिस्थितीहि निर्माण होऊं शकेल.

अल्पकालीन नफ्यास कारणीभूत होणाऱ्या गोष्टी :—अल्पकालीन नफ्यास मागणी पुरवठ्याकडील बदल कारणीभूत होत असतात. मागणी पुरवठ्याकडील जे बदल नवी परिस्थिति निर्माण करतात आणि ज्यांच्यामुळें उत्पादन खर्चापेक्षां किंमत

[३] Monopolitic market structures may permit enterprise to earn an excess or pure profit reward more or less persistently.

अधिक होते तेच बदल नफ्यास कारणीभूत होतात. अशा बदलांना अर्थशास्त्रांत **नाविन्यें** (Innovations) म्हणतात. ज्यांच्यामुळें नफा उद्भवतो असे पांच प्रकारचे बदल दाखवितां येतील. ते पुढीलप्रमाणें : (१) नव्या वस्तूंचे उत्पादन, (२) उत्पादित वस्तूचे नवे नमुने, (३) उत्पादन तंत्रातील सुधारणा, (४) नव्या बाजारपेठा, (५) आधीं असलेल्या बाजारपेठेचा विस्तार. ह्या पांच नाविन्यपूर्ण बदलांपैकी पहिले तीन बदल प्रधानतः पुरवठ्याच्या बाजूशीं व उरलेले दोन मागणीच्या बाजूशीं संबंधित असतात.

मागणीच्या बाजूचे बदल :—मागणीच्या बाजूस बदल झाल्यास नफा निर्माण होतो. मागणीच्या बाजूकडील बदलांमुळें होणारा नफा (१) ग्राहकाच्या संख्येशीं (२) त्याच्या आवडी-निवडींशी व (३) त्याच्या उत्पन्नाशीं संबंधित असतो. ग्राहकांची संख्या वाढली, मग ती लोकसंख्या वाढल्यामुळें वाढो किंवा एखादी वस्तू किंमत कमी होऊन अगर लोकांच्या उत्पन्नांत वाढ होऊन त्यांच्या आटोक्यांत आल्यामुळें वाढो, कीं मागणी वाढते व जोंपर्यंत त्या प्रमाणांत पुरवठा वाढत नाहीं तोंपर्यंत नफा मिळूं शकतो. तसेंच ग्राहकांच्या आवडीनिवडी नेहमींच बदलत असतात. ज्या वस्तूंची आवड लोकांत निर्माण होते त्या वस्तूंकरितां मागणी वाढते. पुरवठा अर्थातच तत्काळ वाढूं शकत नाहीं. मध्यंतरीच्या काळांत किंमत वाढून नफा निर्माण होतो. ज्या वस्तूंविरुद्ध लोकांची लहर फिरते त्या वस्तूंकरितां असलेली मागणी कमी होऊन किंमत कमी होते व पुरवठा कमी होईपर्यंतच्या काळांत नफा कमी होतो. एकंदर पैशाचे मागणीवर फारच व्यापक परिणाम होतात. एकंदर पैसा वाढत गेल्यास लोकांचें पैशांतील उत्पन्न वाढून सर्वसामान्यपणें सर्वच वस्तूंच्यासाठीं मागणी वाढते. त्यामुळें वस्तूंच्या किंमती वाढतात. वस्तूंच्या वाढत्या मागणीला तोंड देण्याकरितां पुरवठा वाढवावा लागतो. तो वाढेपर्यंत वस्तूंच्या किंमती वाढल्यामुळें उत्पादकांना नफा मिळतोच. पण त्याखेरीज असेंहि होतें कीं, उत्पादन वाढविण्यासाठीं घटकांच्यासाठीं मागणी वाढते आणि उत्पादन-घटकांच्या किंमती वाढतात. अशा वेळीं अनुभव असा येतो कीं, वस्तूंच्या किंमती ज्या प्रमाणांत वाढतात त्या प्रमाणांत घटकांच्या किंमती वाढत नाहींत. निराळ्या शब्दांत उत्पादन-खर्चांतील वाढ वस्तूंच्या किंमतींतील वाढीपेक्षां प्रमाणानें कमी असते. त्यामुळें जो नफा होतो तो बराच काळपर्यंत टिकतो. ह्याच्या उलट देशांतील एकंदर पैसा जेव्हां कमी होतो तेव्हां तोटा होतो. तेजीच्या काळांत झालेला नफा व मंदीच्या काळांत होणारा तोटा परस्पर छेदक ठरतील असा भरंवसा नाहीं. पैशांतील उत्पन्नें कमीअधिक झाल्यामुळें नफ्याच्या प्रमाणांत जे फेरफार होतात त्याला ज्यांना नफा मिळतो ते जबाबदार नसतात. एकंदर पैशांतील बदल आणि त्या अनुषंगानें होणारे लोकांच्या उत्पादनांतील बदल त्यांच्या स्वाधीनचे नसतात. त्या बदलांवर त्यांचा कांही एक ताबा नसतो. त्यामुळें त्या बदलामुळें नफा झाला तर त्यांच्या दृष्टीनें ती एक आपणहून चालून येणारी सुवर्णसंधि असते. अशा

प्रकारच्या दैववशात् प्राप्त होणाऱ्या नफ्याला **अस्मानी नफा** (Windfall Profits) असें म्हणतात. मात्र उत्पादकांच्या प्रयत्नामुळें जेव्हां मागणीचा विस्तार होतो तेव्हां प्राप्त होणाऱ्या नफ्याला अस्मानी नफा म्हणतां यावयाचें नाहीं. उदाहरणार्थ, जाहिरातीमुळें जर बाजारपेठ वाढली तर मिळणारा नफा अस्मानी नसतो.[४]

पुरवठ्याच्या बाजूचे बदल :—पुरवठ्याच्या बाजूकडील दोन प्रकारचे बदल महत्त्वाचे असतात. हे दोन्ही प्रकारचे बदल नाविन्याच्या स्वरूपाचे असतात. नव्या शोधांपैकीं कांहीं शोध उत्पादित वस्तूच्या नमुन्याशीं संबंधित असतात. उत्पादित वस्तूचे नवेनवे नमुने काढून ते बाजारांत ठेवण्यांत उत्पादक नेहमींच गर्क असतात. एखादा ग्राहकांना आकर्षित करणारा नवा नमुना बाजारांत आला कीं, ग्राहकांची त्यावर लागलीच उडी पडते. तो प्रथम काढणाराला पुष्कळच नफा प्राप्त होतो. स्पर्धेमुळें तो नमुना सार्वत्रिक झाला तरी कांहीं काळपर्यंत मागणीपेक्षां पुरवठा कमी अशी परिस्थिति दिसून येतेच. त्यामुळें एकंदर उद्योगधंद्यांतच नफा होतो. अर्थात् स्पर्धेच्या प्रभावामुळें हा नफा टिकून रहात नाहीं, हें निराळें. असाच प्रकार उत्पादनतंत्रांतील शोधांबाबत दिसून येतो. जे शोध लागतात त्यामुळें सामान्यत: उत्पादनखर्च कमी होतो. बाजारांतील वस्तूची किंमत त्यामुळें लगेच बदलत नसल्यामुळें नफा होऊं लागतो. शोधासाठीं जो उत्पादक जबाबदार असेल त्याला बराच नफा मिळतो; पण पूर्ण स्पर्धा बाजारांत असेल तर उत्पादखर्चांतील बदल सार्वत्रिक होऊन त्या प्रमाणांत कालान्तरानें किंमत कमी होते व तो नफा नाहींसा होतो. नव्या शोधामुळें निर्माण झालेला नफा पूर्ण स्पर्धा असेल तर फार काळ टिकूं शकणार नाहीं हें खरें; पण त्याचबरोबर हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, नव्या शोधांचा उपयोग जे उत्पादक प्रथम करतात ते नवे शोध सार्वत्रिक होऊं नये म्हणून पराकाष्ठेचें प्रयत्न करतात. ते प्रयत्न यशस्वी झाल्यास पूर्णस्पर्धेला मारक ठरतात. आणि अपूर्ण स्पर्धेला जन्म देतात. पूर्ण स्पर्धेत नव्या शोधामुळें होणारा नफा अल्पकालीन ठरण्याची भीति असते, हें जात्याच चाणाक्ष असलेल्या उत्पादकांना माहीत असतें. त्यामुळें त्या शोधांचा फायदा घेऊन शोधजन्य नफ्याला मक्तेदारीजन्य नफ्याचें स्वरूप आलें. त्यामुळें तो नफा टिकाऊ ठरला तर उत्पादकांना तें हवेंच असतें.

नफ्यास कारणीभूत होणाऱ्या दोन्ही प्रवाहांचें निकटचें साहचर्य :—निव्वळ नफा कशामुळें उद्भवतो, ह्याचीं कारणें सारांशरूपानें सांगावयाचीं

[४] Since individual enterprises are generally unable to control the fluctuations of aggregate money incomes which occur, any profits and losses arising from this source may be appropriately characterised as 'windfalls' outside their control. This is not so, however, of profits created by dynamic changes in product or technique since these are in general purposefully introduced by enterprise precisely in pursuit of a pure profit.

झाल्यास असें म्हणतां येईल कीं, मक्तेदारी हें निव्वळ नफ्याचें पहिलें महत्त्वाचें उगमस्थान आहे; पण मक्तेदारी ही नफ्याला कारणीभूत होणारी एकच गोष्ट नाहीं. मक्तेदारी नसली तरी अर्थव्यवस्था एकंदरीनें गतिमान असल्यामुळें लोकांच्या आवडी-निवडींत, लोकांच्या उत्पन्नांत, उत्पादित वस्तूच्या नमुन्यांत किंवा उत्पादनाच्या तंत्रांत जे बदल होत असतात त्या बदलांमुळेंहि नफ्याचा उद्भव होऊं शकतो.[५]

मक्तेदारी व मागणी पुरवठ्याकडील बदल हीं नफा उद्भवण्याचीं महत्त्वाचीं कारणें आहेत. प्रत्यक्ष व्यवहारांत ह्या दोन्ही कारणांचें निकटचें साहचर्य आढळतें. कांहीं उद्योगधंद्यांत मक्तेदारीमुळें आधींच नफा होत असतो. त्यांतच मागणी-पुरवठ्याकडील बदलांची भर पडते आणि नफ्याचें प्रमाण वाढते. पूर्ण स्पर्धा असल्यास मागणीपुरवठ्याकडील बदलांमुळें जो नफा होतो तो कायम टिकविण्या-साठीं उत्पादकवर्ग मक्तेदारी निर्माण करूं पहातो हें वर दाखविलें आहे. प्रत्यक्षांत पूर्णस्पर्धा अपवादात्मक असल्यामुळें उत्पादकांना, मधूनमधून येणारी मंदी सोडल्यास कायमचा नफा मिळत असल्याचें दिसून येतें. मंदीचा काळ धरूनहि सरासरीनें नफा होतो ह्याची साक्ष पिढ्यान्पिढ्या दिमाखानें टिकून राहणाऱ्या उत्पादनसंस्था व वैयक्तिक उत्पादक देतात. मक्तेदारीमुळें निर्माण होणाऱ्या नफ्यांतच अर्थव्यवस्थेच्या गतिमान स्वरूपामुळें निर्माण होणाऱ्या नफ्याची भर पडत असते.

नफा व इतर उत्पन्नें :—नफ्यासंबंधीचें वर जें विवेचन केलें आहे त्यामुळें नफा व इतर उत्पन्नें ह्यांमधील फरक लक्षांत येण्याजोगा आहे. नफा हें खरोखरच उरणारें किंवा **अवशिष्ट उत्पन्न** (Residual Income) आहे. इतर उत्पन्नें नफ्यापूर्वीं दिलीं गेलेलीं असतात. नंतर जें उत्पन्न प्राप्त होतें त्यांतील इतर उत्पन्नें वजा नफा किती होतो, हें ठरवावयाचें असतें. इतर उत्पन्नें हीं विक्रयपूर्व उत्पन्नें असतात असें म्हणतां येईल. कारण मालाची विक्री होण्यापूर्वींच तीं उत्पन्न मिळत असतात. तीं उत्पन्नें उत्पादनपूर्व असेंहि म्हणतां येईल. कारण कित्येकदां आधीं किंमत घेऊनच उत्पादन-घटक उत्पादनासाठीं उपलब्ध केले जातात. नफा हें उत्पन्न मात्र निश्चितपणें उत्पा-दनोत्तर-विक्रयोत्तर असें उत्पन्न असतें. नफ्याखेरीज इतर उत्पन्नें एक प्रकारें करारबद्ध असतात. कारण उत्पादकांनीं इतर उत्पादन-घटकांच्या मालकांशीं जे करार केलेले असतात, त्याप्रमाणें किंमती द्याव्या लागतात. त्या दृष्टीनें इतर उत्पन्नें निश्चित असतात. कारण उत्पादनांत तोटा झाला तरी इतर घटकांच्या किमती द्याव्या लागतात; पण नफा मात्र अत्यंत अनिश्चित असा असतो. झाला तर होतो, नाहींतर नाहीं. नफ्याचा अनिश्चितपणा दुसऱ्या प्रकारेंहि व्यक्त होतो. इतर उत्पन्नें नफ्याच्या मानानें स्थिर असतात. नफा अतिशय अस्थिर असतो. गतिमान अर्थव्यवस्थेंत वस्तूंच्या किमती वारंवार आणि अतिशय झपाट्यानें, तसेंच शीघ्र

[५] Monopoly is not the only source of pure profit. Dynamic chagnes in income and innovations of either technique or product may also give rise to a distinct share of income to enterprise.

गतीनें बदलत असतात. त्या मानानें घटकांच्या किंमती जरी बदलल्या तरी त्यांतील बदल तुलनेनें कमी वेळां होतात, आणि झाले तरी मंदगतीनें होत असल्यामुळें त्यांचें प्रमाणहि कमी असतें. नफ्यांतील बदल हे वस्तूंच्या किमतीशीं संबंधित असल्यामुळें नफ्यांत कमालीची अस्थिरता दिसून येते. इतर उत्पन्नें घटकांच्या किमतीशीं संबंधित असल्यामुळें त्यांत त्या मानानें अस्थिरता कमी दिसून येते. नफा व इतर उत्पन्नें ह्यांतील हे सर्व फरक नफ्याच्या स्वरूपांतूनच उद्‌भवलेले असतात. नफ्याला किंमत असें म्हणतां येत नाहीं. इतर घटकांचीं उत्पन्नें हीं किंमत होत.

नफा हा कशाचा मोबदला ? :—अर्थव्यवस्थेंतून ज्याला उत्पन्न प्राप्त होतें तो अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनें कांहीं तरी महत्त्वाची कामगिरी बजावीत असेल तरच त्याचें उत्पन्न योग्य असें समजलें जातें. ज्या उत्पन्नाचा उगम निश्चित अशा कामगिरींत असतो त्या उत्पन्नाला **अर्जित उत्पन्न** (Earned Income) म्हणतात. ज्या उत्पन्नामागें कोणतीहि कामगिरी नसते तें **अनर्जित उत्पन्न** (Unearned Income) होय. अर्थव्यवस्थेसाठीं कामगार-वर्गाकडून जी शारीरिक व मानसिक झीज सोसली जाते ती उघड उघड दिसणारी आहे. त्यामुळेंच **वेतन** हें **अर्जित उत्पन्न** आहे, ह्याबद्दल संदेह नाहीं. नफ्याबद्दल मात्र बराच वाद आहे. नफा हें उत्पन्न अनर्जितच आहे असा दावा करण्यांत आला आहे. हा दावा करणारांचें म्हणणें असें कीं, वस्तुतः कोणत्याहि वस्तूला मूल्य प्राप्त होण्यास त्या वस्तूच्या निर्मितीसाठीं होणारे श्रमच जबाबदार असतात. त्या मूल्यांतूनच नफ्याचा भाग बाजूला काढणें म्हणजे एक प्रकारें कामगारांचें शोषण करणेंच होय. नफा हें प्रचलित अर्थव्यवस्थेंत भांडवलदारांकडून कामगारांची पिळवणूक होत असल्याचें प्रतीक होय. त्या दाव्याला असें उत्तर देण्यांत आलें आहे कीं, नफा हें उत्पन्न समर्थनीय आहे. कारण गतिमान अर्थव्यवस्थेंत भावी काळासाठीं, बाजारपेठेसाठीं उत्पादन करण्यामध्यें धोका असतो, अनिश्चितता असते. हा धोका पत्करण्याची कामगिरी कोणी तरी केल्याशिवाय उत्पादन व्हावयाचेंच नाहीं. तेव्हां उत्पादनांतील धोके डोळे उघडे ठेवून पत्करणें ही फार मोठी कामगिरी आहे. आणि त्याबद्दल नफ्याच्या रूपानें जें बक्षिस मिळतें तें योग्यच आहे. उत्पादनांत धोके असतात, अनिश्चितता असते, गतिमान अर्थव्यवस्थेमुळें नवे बदल करावे लागतात किंवा होत असलेल्या बदलांशीं जुळवून घ्यावे लागते म्हणून तर व्यवस्थापन हा उत्पादनाचा स्वतंत्र घटक मानावा लागतो. ज्या जगांत कोणतेहि बदल होत नाहींत त्या जगांत उत्पादनाला केवळ यांत्रिक स्वरूप येईल आणि व्यवस्थापनाची गरजच पडणार नाहीं अशा जगांत नफ्याचा प्रश्न उद्‌भवणार नाहीं. पण प्रत्यक्ष जगांत सतत बदल होत असल्यामुळें किंवा होणें प्राप्त असल्यामुळें व्यवस्थापनाची आवश्यकता निर्माण होते आणि व्यवस्थापन हवें पण व्यवस्थापकांना मोबदला द्यावयाची तयारी मात्र नाहीं ही भूमिका अतार्किक असल्यामुळें नफा समर्थनीय ठरतो.[६] कारण जबाबदारी घेण्यामध्यें, धोके पत्करण्यामध्यें जी शारीरिक व मानसिक

झीज होते ती ज्याची त्यालाच समजते. तसेंच पूर्ण स्पर्धेमध्यें नव्या शोधांमुळें जो नफा उद्भवतो तो तर सर्वथैव योग्य असतो. कारण नव्या शोधामुळें समाजाची प्रगति होत असते. नफारूपी प्रोत्साहन नसतें तर ही प्रगति झालीच नसती.[७] नव्या शोधामुळें होणाऱ्या प्राप्तीचा कांहीं भाग शोध लावणाऱ्या शास्त्रज्ञांना मिळतो आणि उरलेला त्या शोधाचा वापर करणाऱ्या उत्पादकांना मिळतो. शोध लावण्याचें काम महत्त्वाचें खरेंच; पण लागलेल्या शोधांचा उपयोग करण्याची कामगिरी त्यामुळें कमी महत्त्वाची ठरत नाहीं. कारण शोधांचा उपयोग करण्यांतच खरा धोका असतो आणि तो पत्करणारे महत्त्वाची कामगिरी बजावीत असतात. इंग्लंडमध्यें व नंतर जगाच्या इतर भागांत जी औद्योगिक क्रान्ति झाली तिचें श्रेय महान् संशोधकांना जेवढें आहे तेवढेंच त्या शोधांच्या रूपानें निसर्गाला मनुष्यासाठीं राबविण्यास लावणाऱ्या उद्योगपतींना आहे. वैयक्तिक नफा हें अनियोजित अर्थ-व्यवस्थेंतील सर्वांत मोठें प्रोत्साहन आहे आणि तें न देतांहि अर्थव्यवस्था नीट चालली पाहिजे, हा आग्रह विसंगतीचा आहे. भांडवलशाही असावी कीं नसावी हा प्रश्न अगदीं वेगळा आहे; पण जोंपर्यंत खाजगी मालमत्ता हा अर्थव्यवस्थेचा पाया आहे व खाजगीरीत्या उत्पादन व्हावें अशी अपेक्षा आहे तोंपर्यंत नफा हें सर्वस्वीं अर्जित उत्पन्न ठरतें. व्याज व खंड ह्यांचेंहि अशाच प्रकारें समर्थन करतां येईल.

खरा प्रश्न आर्थिक विषमतेचा :—वरील विवेचनासंबंधी लक्षांत ठेवण्याची मुख्य गोष्ट ही कीं, जेव्हां अमुक प्रकारचें उत्पन्न वाईट, अशी तक्रार केली जाते तेव्हां ती तक्रार खरी त्या उत्पन्न-प्रकाराविरुद्ध नसते. त्या उत्पन्न-प्रकारामुळें जी आर्थिक विषमता निर्माण होते तिच्याविरुद्ध तक्रार असते. किंवा कटाक्षानें बोलावयाचें झाल्यास आर्थिक विषमतेमुळें सर्वांना समान संधि मिळूं शकत नाहीं ह्या विरुद्ध असते. नफ्याचें कितीहि जोरानें समर्थन केलें आणि कांहीं प्रमाणांत नफा हा आवश्यक कामगिरीचा मोबदला आहे हें मान्य करावें लागत असलें तरी नफ्याचा कांहीं भाग तरी अर्थव्यवस्थेंतील मोक्याच्या व अधिकाराच्या

---

[६] Profit is due to the dynamic character of society. Uninsurable risk is in fact chiefly associated with economic change—The connection of profit with change is simply the fact that decisions of a managerial sort either produce changes or involve adaptations to changes or both—In a world free from progressive change, no managerial decisions would be called for—**Knight**

[७] The promoter performs an indispensable function in the community by discovering, formulating and assembling the business propositions by whose development the wealth of society is increased. These functions necessitate as a rule ceaseless effort and unrelaxing vigilance, in a world exertions which must be paid for.

जागांवर स्थानापन्न होण्याची संधि मिळते ह्यांतूनच उद्‌भवतो हें नाकारतां यावयाचें नाहीं.[८] शिवाय नफा ह्या उत्पन्नप्रकाराचें कदाचित समर्थन करतां आलें तरी त्यामुळें नफा मिळविण्याची संधि प्रचलित अर्थव्यवस्थेंत विशिष्ट वर्गांतील लोकांनाच मिळूं शकते ह्याचें समर्थन होत नाहीं.[९] व्याज व खंड ह्यांबाबतहि हेंच म्हणतां येईल. आर्थिक विषमता नसती तर कोणतें उत्पन्न अर्जित, कोणतें अनार्जित ह्याची एवढी चर्चा झाली नसती. भांडवलशाही अर्थव्यवस्था स्वीकारल्यानंतर प्रत्येक उत्पन्नाच्या पाठीमागें कांहींतरी कामगिरी असते. म्हणून तें उत्पन्न समर्थनीय असतें, असें सहज दाखवितां येईल. शिवाय असेंहि दाखवितां येईल कीं, अलीकडील आर्थिक विचारानुसार उत्पादन घटकांना मोल प्राप्त होण्याचें खरें कारण त्यांच्याकडून केली जाणारी एखादी कामगिरी किंवा त्यांच्या मालकांना सोसावी लागणारी शारीरिक अथवा मानसिक झीज नसून मागणीच्या मानानें त्यांची कमतरता असते हेंच आहे. खाजगी मालमत्तेवर आधारलेल्या अर्थव्यवस्थेंत उत्पादनसाधनांची किंमत त्यांच्या मालकांना मिळावी हें क्रमप्राप्तच आहे. पण त्यामुळें आर्थिक विषमता अपरिहार्य आहे आणि म्हणूनच ती समर्थनीय आहे, असें मात्र मुळींच म्हणतां यावयाचें नाहीं. कारण ज्या अर्थव्यवस्थेंत कमालीची आर्थिक विषमता अपरिहार्य ठरते ती अर्थव्यवस्था नकोच, असें त्यावर सहज म्हणतां येईल. तेव्हां कोणतें उत्पन्न समर्थनीय आणि कोणतें असमर्थनीय ह्या वादापेक्षां अर्थशास्त्राच्या दृष्टीनें अनियंत्रित अर्थव्यवस्थेंत आर्थिक विषमता कां उद्‌भवते, आर्थिक विषमता अपरिहार्य असते काय, अपरिहार्य असल्यास तिचीं कारणें कोणतीं, आर्थिक विषमता भांडवलशाही अर्थव्यवस्थेची चौकट कायम ठेवून नष्ट करणें शक्य आहे कां इत्यादि प्रश्न अधिक महत्त्वाचे आहेत.

प्रमुख संदर्भग्रंथ

(1) Knight—Risk, Uncertainty and Profit.
(2) American Economic Association–Studies in the Theory of Income and Distribution.

---

[८] There are manipulative and exploitative gains of the business leader which accrue to him because of his strategic position of control.

[९] Though pure profits may be explainable in terms of change, uncertainty and friction, the facts that these gains go to particular persons is related not to the exercise of entrepreneural functions but rather to the nature and distribution of ownership rights—**Gordon.**

समस्त अर्थव्यवस्थेचा समतोल : प्रवृत्ति व प्रवाह

: १५ : राष्ट्रीय उत्पन्न

राष्ट्रीय उत्पन्न (National Income):—**विशिष्ट कालखंडांत (सामान्य-पणें एक वर्षाचा) देशांत होणारें सर्व वस्तूंचें व कामगिरीचें एकंदर उत्पादन** अशी राष्ट्रीय उत्पादनाची व्याख्या करण्यांत येते.[१] राष्ट्रीय उत्पादनाचें मापन करतांना लक्षांत ठेवावयाची सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही कीं, कोणतीहि वस्तु अगर कामगिरी एकापेक्षां अधिक वेळां मोजली जातां कामा नये. ह्या दृष्टीनें फक्त **अंतिम वस्तू** (Final Products)च विचारांत घेतल्या जातात. मध्यम अवस्थेंतील वस्तु विचारांत घेतल्या जात नाहींत. उदाहरणार्थ, कापडांत कापूस अंतर्भूत होत असल्यानें जो कापूस वर्षांत कापडासाठी वापरला जातो तो विचारांत घेतला जात नाहीं. दुबार मोजणी टाळणें अत्यावश्यक असल्यानें ही दक्षता घ्यावीच लागते. मात्र जो कापूस हिशेबाच्या वर्षाच्या शेवटीं वापरला गेलेला नसतो तो मोजावाच लागतो. नाहीतर तो कोठेंच अंतर्भूत होणार नाहीं. **कोणतीहि वस्तु व कामगिरी एकदां आणि फक्त एकदांच मोजली गेली पाहिजे**, हें तत्त्व राष्ट्रीय उत्पन्नाची मोजणी करण्याच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे.[२]

आयात-निर्यातीचें राष्ट्रीय उत्पन्नांतील स्थान :—राष्ट्रीय उत्पन्नाची व्याख्या अधिक कटाक्षानें तयार झाल्यास देशांत उत्पादन किती होतें, ह्यापेक्षां देशांतील लोकांच्या गरजा भागविण्यास वस्तूंचा व कामगिरीचा सांठा किती प्रमाणांत **उपलब्ध** होतो, ह्या गोष्टीला अधिक महत्त्व दिलें पाहिजे. कारण लोकांच्या विविध वस्तु व कामगिरीच्या गरजा भागणें हें अर्थव्यवस्थेचें साध्य असतें. त्या दृष्टीनें राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे **सर्व प्रकारच्या** आर्थिक व्यवहारापासून देशाला उपलब्ध होणाऱ्या वस्तुसंभारांची व कामगिरींची बेरीज अशी व्याख्या करणें उचित होईल.[३] ही व्याख्या घेतल्यास आयात-निर्यातीचा विचार करावाच लागतो. कारण जो माल आयात होतो तो देशांतील लोकांना वापरण्यास उपलब्ध होतो. उलट निर्यात होणारा देशांतील लोकांसाठीं अनुपलब्ध होतो. तेव्हां देशांतील उत्पादनांत आयातीची भर टाकावी लागते व त्यांतून निर्यात वगळावी लागते. ही गोष्ट लक्षांत घेतल्यास राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे **देशांतील उत्पादनाची बेरीज अधिक आयात उणें निर्यात** असें म्हणावें लागते.[४]

---

[१] National income is defined as the amount of goods and services produced in a country, during a period of time, usually a year.

[२] It is necessary that double counting is avoided. Hence only final products are included in National product. Intermediate products included in final products are necessarily excluded.

[३] The National income is a measure of goods and services becoming available to the nation from economic activity.

अंतर्गत उत्पत्तीचें मापन :—राष्ट्रीय उत्पन्न व्यक्त करण्यासाठी पैशाचा माप म्हणून उपयोग करणें सोयीचें असतें. प्रचलित अर्थव्यवस्थेंत पैसा हें मूल्यमाप असल्यानें प्रत्येक वस्तूचें व कामगिरीचें मोल पैशांत केलें जातें. पैशांतील मूल्यालाच किंमत म्हणतात. पैशांत ठरणारी किंमत लक्षांत घेऊन **एका वर्षाच्या अवधींत देशांत होणाऱ्या अंतिम वस्तूंची व कामगिरींची एकूण किंमत** अशी पैशाच्या भाषेंत राष्ट्रीय उत्पन्नाची व्याख्या करतां येईल. राष्ट्रीय वस्तूंचें पैशांत मापन करतांना अंतिम वस्तूंचा जो भाग पैशांत विकला गेला असेल त्याची विक्रीची किंमत लक्षांत घेतली जाते व जो भाग विकला गेला नसेल त्याचा उत्पादनखर्च विचारांत घेतला जातो.[५]

वरील अर्थानें अंतर्गत उत्पादन मोजण्याची अधिक सोपी पद्धत म्हणजे प्रत्येक उद्योगधंद्यांतील उत्पादनाच्या पैशांतील मूल्याची बेरीज म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न असें समजावयाचें. पण उत्पादनाची किंमत लक्षांत घेतांना त्यांतून एखाद्या वस्तूच्या उत्पादनांत ज्या इतर वस्तु वापरलेल्या असतील त्यांची किंमत मात्र वगळावयाची. असें केल्यास दुबार मोजणी आपोआपच टाळली जाते. उदाहरणानें हा मुद्दा स्पष्ट होईल. एखाद्या गृहस्थानें तयार कोट विकत घेतला तर एकतर त्या कोटाची किंमत राष्ट्रीय उत्पन्नांत धरतां येईल किंवा कोटासाठीं वापरलेल्या कापडाची किंमत त्यांतून वगळून उरलेली किंमत लक्षांत घेतां येईल. पहिली पद्धत वापरल्यास कापडाच्या उद्योगधंद्यांतील तेवढ्या कापडाचें मूल्य विचारांत घेतां यावयाचें नाहीं. कारण ती दुबार मोजणी होईल. कापडाचा उपयोग विविध वस्तूंच्या उत्पादनांत होत असल्यानें ही पद्धत गैरसोयीची होईल. तसें करण्यापेक्षां कोटाच्या किंमतींतून कापडाची किंमत वगळणें अधिक सोयीचें होईल. ह्या पद्धतींत शिंपीकामाचा विचार करतांना शिलाईच फक्त विचारांत घेतली जाते, हें सहज लक्षांत येण्याजोगें आहे. ह्याच न्यायानें कापडाच्या उद्योगधंद्याचा विचार करतांना कापसाची (व अन्य वापरलेल्या वस्तूंची) किंमत काढून टाकली म्हणजे कच्च्या मालाचें कापडांत रूपान्तर करण्यासाठीं जेवढा खर्च येतो तेवढाच विचारांत घेतला जातो. कोणत्याहि वस्तूच्या एकूण किमतींतून त्या वस्तूच्या निर्मितीसाठीं वापरलेल्या इतर वस्तूंची किंमत कमी केल्यास फक्त त्या वस्तूच्या निर्मितीसाठीं—म्हणजे वापरलेल्या वस्तूंचें रूपान्तर संबंधित वस्तूंत करण्यासाठीं—द्यावी लागणारी उत्पादन घटकांची किंमतच उरते हें स्पष्ट आहे तेव्हां निरनिराळ्या उद्योगधंद्यांत उत्पादन घटकांच्या मालकांना दिलेल्या रकमांची बेरीज केल्यास अंतर्गत उत्पादनाची यथायोग्य कल्पना येते. ह्या पद्धतीनें उत्पादनाच्या

[४] National income is the sum of the products of the various industries of the Nation plus imports minus exports.

[५] The final products are valued at their sales prices if they have been sold during the year. If they are not sold, they are valued at cost of production—**Soup.**

प्रत्येक टप्प्यामुळें वापरलेल्या वस्तूच्या मूल्यांत पडणारी भरच फक्त मोजली जाते. अशी भर पडत पडतच राष्ट्रीय उत्पादन वाढत जाते.[६] अंतर्गत उत्पादनाच्या ह्या पद्धतीनें केलेल्या गणतींत आयातीचा विचार होत नाहीं. कारण आयात ही बाहेरील एखाद्या देशाच्या उत्पादनांत मोजली गेलेली असते.[७] अर्थात् देशांतील लोकांना काय उपलब्ध होत आहे, ह्याचा विचार करतांना आयात निर्यात लक्षांत घ्यावीच लागते. ती घेतां यावी म्हणून अंतर्गत उत्पादन व राष्ट्रीय उत्पादन असा भेद केला जातो. राष्ट्रीय उत्पादनांत अंतर्गत उत्पादनाखेरीज आयात निर्यातींतील तफावत लक्षांत घेतली जाते. राष्ट्रीय उत्पादन म्हणजे देशांतील लोकांना उपलब्ध होणारें उत्पादन, मग तें कोणत्याहि प्रकारें उपलब्ध होवो.[८]

उत्पादनाच्या मोजणींतील वजाबाकी :—अंतर्गत उत्पादनाची मोजणी ही नुसती बेरीज नसते. त्यांत वजाबाकीचाहि भाग असतो. कोणत्याहि वर्षी होणाऱ्या उत्पादनाच्या प्रक्रियेमुळें किंवा केवळ वर्षाचा काळ उलटल्यामुळें उत्पादनासाठीं वापरण्यांत येणारीं उत्पादन-साधनें प्रतिवर्षी कांहीं प्रमाणांत बाद होत असतात. यंत्रसामग्री, इमारत अशासारख्या साधनांना ही गोष्ट लागू पडते. उत्पादनामुळें राष्ट्राच्या संपत्तींत भर पडते; पण ज्या प्रमाणांत स्थिर उत्पादनसाधनें बाद होतात, त्या प्रमाणांत ती संपत्ति कमीहि होते. प्रत्येक उत्पादनसाधन किती प्रमाणांत बाद होतें, हें ठरविण्याची एक ठरलेली पद्धत आहे. त्या साधनाचें अपेक्षित जीवित लक्षांत घेऊन हें प्रमाण ठरविलें जातें. उदाहरणार्थ, एखादी इमारत वीस वर्षें टिकून राहील अशी अपेक्षा असल्यास दरवर्षी ती एकविसांश ह्या प्रमाणांत वापरली जाते अगर बाद होते असें समजलें जातें. तेवढ्या प्रमाणांत राष्ट्रीय उत्पन्न कमी झालें असें समजण्यांत येतें.[९] वजाबाकीचा उपयोग इतर वस्तूंच्या संबंधांतहि करावा लागतो. राष्ट्रीय उत्पादनांत समाविष्ट होणाऱ्या वस्तूंचा वर्षाच्या सुरुवातीला कांहीं एक सांठा असतो. त्या सांठ्यांतील कांहीं भाग वापरला जातो.

---

[६] Domestic product measures the total output of goods and services within the nation, described as the domestic product. The domestic product is the sum of the products of industries or productive enterprises within the nation, but it is the sum of only the factor payments in each industry or enterprise. It is essentially a sum of value added at each stage of production.

[७] Domestic product includes only the factor payments arising within the nation. It does not include the value of imported goods and services which are part of the domestic product of other countries.

[८] Domestic product describes the total of domestic production. The National product describes the domestic product and net imports.

वापरल्या गेलेल्या भागापेक्षां वर्षातील उत्पादन कमी झाल्यास वर्षाखेरचा सांठा वर्षाच्या सुरुवातीच्या सांठ्यापेक्षां कमी भरेल. तेवढ्या प्रमाणांत राष्ट्रीय उत्पन्नांत घट झाली असेंच मानावें लागेल. उदाहरणार्थ, वर्षाच्या सुरुवातीला १००० गांठी कापूस असला आणि त्यांतील २५० गांठी वर्षभरांत कापडासाठीं वापरल्या गेल्या आणि कापडाचें उत्पादन १५० गांठीच झालें तर वर्ष-अखेरीच्या हिशेबांत ९०० गांठी कापूस धरणेंच उचित होईल. त्यासाठीं वजाबाकी करावी लागते. [१०]

उत्पादनाच्या हिशेबांत समाविष्ट न होणारें उत्पादन :—राष्ट्रीय उत्पादनाचे हिशेब पैशांत केले जात असल्यामुळें उत्पादनक्रियेच्या ज्या विभागाचें मूल्यमापन पैशांत होत नाहीं त्यांचा अंतर्भाव राष्ट्रीय उत्पादनाच्या हिशेबांत होऊं शकत नाहीं. उदाहरणार्थ, स्त्रियांनीं केलेलें घरकाम. मोलकरणीकडून करून घेतलेलें घरकाम राष्ट्रीय उत्पादनांत येतें; पण गृहिणीनें केलेलें घरकाम मात्र त्यांत येत नाहीं. ही विसंगति आहे, हें नाकारतां यावयाचें नाहीं; पण पैशांत हिशेब करण्याची पद्धति सर्वथा सोयीची असल्यानें अशी कांहींशी विसंगति पत्करावी लागते. सुदैवानें ज्याचा पैशांत हिशेब होत नाहीं असा उत्पादनाचा भाग प्रचलित अर्थव्यवस्थेंत लहान असल्यानें उत्पादनाचा हा भाग वगळला गेला तरी राष्ट्रीय उत्पादनाची उपयुक्त कल्पना येण्यास अडचण पडत नाहीं.

एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवली पाहिजे. मोलानें घरकाम करून घेण्याची पद्धत जशी वाढत जाते तसा पैशांत होणाऱ्या हिशेबाच्या कक्षेंत येणाऱ्या उत्पादनाचा भाग वाढत जातो. त्यामुळें राष्ट्रीय उत्पादनाचें पैशांत व्यक्त होणारें मूल्य वाढतें; पण ती वाढ खरी नसते. तुलना करण्याचा जेव्हां प्रसंग येतो तेव्हां उत्पादनमूल्यांत झालेली वाढ नेमकी कशामुळें झाली आहे, हें दक्षतापूर्वक पहावें लागतें. शहरांत किंवा प्रगत देशांत राष्ट्रीय उत्पादनमूल्य अधिक असण्याचें घरकाम तेथें बऱ्याच प्रमाणांत मोलानें करून घेतलें जातें, हेंहि एक कारण असतें.

राष्ट्रीय उत्पन्नाचा उगम :—राष्ट्रीय उत्पन्नाचा उगम उत्पादनाच्या विविध शाखांतून होत असतो. विविध उद्योगधंदे व व्यवसाय हे राष्ट्रीय उत्पादनाचे झरे असतात, असें म्हणावयास हरकत नाहीं. राष्ट्रीय उत्पन्न ही विविध उद्योगधंद्यांतून होणाऱ्या उत्पादनाच्या एकूण किंमतीची बेरीज असते. निराळ्या शब्दांत असें म्हणतां येईल कीं, राष्ट्रीय उत्पन्नाची अशा प्रकारें विभागणी करून

[९] The process of production and the passage of time involve a gradual using up of the nation's, productive assets —its buildings and machinery. This use of capital, or depreciation, should clearly be taken into account in calculating the net annual addition to the nation's wealth and should therefore be regarded as deduction from product.

[१०] A minus entry is made to take account of this inroad into the stock of wealth existing at the start of the year—**Soup.**

दाखवितां येतें कीं, त्यामुळें प्रत्येक उद्योगधंद्याचा राष्ट्रीय उत्पन्नाच्या निर्मितीला किती प्रमाणांत हातभार लागतो हें स्पष्ट व्हावें. राष्ट्रीय उत्पन्नाची अशा प्रकारें केलेली विभागणी अर्थव्यवस्थेचें स्वरूप नेमकें कसें आहे ह्याची कल्पना देते.

सरकारचें अर्थव्यवस्थेंतील स्थान —राष्ट्रीय उत्पन्नाची उद्योगवार विभागणी दर्शवितांना एक महत्त्वाचा भेद प्रथम केला जातो, तो भेद म्हणजे सरकारी क्षेत्र (Public Sector) व **खाजगी क्षेत्र** (Private Sector) हा होय. सरकारी क्षेत्रांत ज्या उत्पादनाला सरकार जबाबदार असतें त्या उत्पादनाचें मूल्य समाविष्ट होतें व **खाजगी क्षेत्र** ह्या विभागांत खाजगी उत्पादनाचें मूल्य येतें. अशा प्रकारच्या विभागणीमुळें सरकारचें अर्थव्यवस्थेंतील स्थान काय आहे याची कल्पना येते. सरकारचें अर्थव्यवस्थेंतील स्थान व महत्त्व सर्व देशांत सारखें नसतें हें उघड आहे. सरकारचें अर्थव्यवस्थेंतील स्थान समजल्यास अर्थव्यवस्था कोणत्या नमुन्याची आहे हें समजतें. सर्वसामान्यपणें असें म्हणतां येईल कीं, संपूर्णपणें अनियोजित अर्थव्यवस्थेपेक्षां नियंत्रित किंवा मिश्र अर्थव्यवस्थेंत (Mixed Economy) व नियंत्रित अर्थव्यवस्थेपेक्षां संपूर्ण नियोजित अर्थव्यवस्थेंत (Planned Economy) सरकारचा उत्पादनांतील भाग अधिक मोठा असतो. हेंच अशा प्रकारेंहि सांगतां येईल कीं, अनियोजित अर्थव्यवस्थेंतील सरकारचें स्थान उल्लेखनीय असतें व संपूर्णपणें नियोजित अर्थव्यवस्थेंत सरकारचें स्थान वर्चस्वपूर्ण असतें. अनियोजित अर्थव्यवस्था असलेला देश जेव्हां नियोजनाच्या मार्गानें जाऊं लागतो तेव्हां सरकारचें अर्थव्यवस्थेंतील स्थान व महत्त्व वाढत जातें हें ओघानें आलेंच.

खाजगी उत्पादनाची व्यवसाय उद्योगवार विभागणी :—खाजगी क्षेत्रांतून होणाऱ्या उत्पादनाची उद्योगवार विभागणी करून प्रत्येक महत्त्वाच्या उत्पादनशाखेचा एकंदर राष्ट्रीय उत्पन्नाच्या निर्मितीला किती प्रमाणांत हातभार लागतो हें स्वतंत्रपणें दाखविलें जातें. सरकारी उत्पादनाच्या बाबतींतहि अशी उपविभागणी करतां येईल; पण कांहीं विशेष कारणांसाठीं जरूर पडली तरच अशी उपविभागणी करण्यांत येते. नाहींतर सरकार ही उत्पादनाची एक स्वतंत्र शाखा समजून सरकारचा राष्ट्रीय उत्पन्नाच्या निर्मितीला लागणारा हातभार संकलितरीत्या एक रकमेनें दाखविला जातो. खाजगी उत्पादनाची मात्र उद्योगधंद्यावार विभागणी करून प्रत्येक उत्पादनशाखेकडून होणारी निर्मिति स्वतंत्रपणें दाखविली जातें.[११]

खाजगी उत्पादनाची उद्योगवार विभागणी पाहिली असतां देशाच्या अर्थव्यवस्थेचें स्वरूप समजतें. मुख्यतः देशाची अर्थव्यवस्था शेतकीप्रधान आहे कीं उद्योगप्रधान आहे ह्याचा पत्ता लागतो. उत्पादनाचें **प्राथमिक उत्पादन** (Primary

[११] The total output of private enterprise is usually broken down according to the net value added by each major industry—The Government. on the contrary, is usually considered to be but one industry—**Soup.**

Production), **दुय्यम उत्पादन** (Secondary Production) **व सहाय्यक उत्पादन** (Tertiary Production) असें तीन भाग पडतात. प्राथमिक उत्पादनापासून बहुतांश राष्ट्रीय उत्पन्नाची निर्मिती होणें हें शेतकीप्रधान अर्थव्यवस्थेचें व्यवच्छेदक लक्षण आहे. उलट उद्योगप्रधान अर्थव्यवस्थेंत दुय्यम व सहाय्यक उत्पादनाला विशेष महत्त्व असतें. शेतीप्रधानता हें अर्थव्यवस्था अप्रगत असल्याचेंहि लक्षण समजलें जातें. शेतीप्रधान देश उद्योगप्रधान देशांच्या मानानें तुलनेनें राहणीच्या खालच्या पातळीवर असतात असा नियम सांगतां येणार नाहीं. पण तसा आजपर्यंतचा अनुभव आहे असें मात्र निश्चित दाखवितां येईल. देश जसजसा उद्योगप्रधान होत जातो तसा राष्ट्रीय उत्पन्नाला दुय्यम व सहाय्यक उत्पादनाचा लागणारा हातभार वाढत जातो. त्याचबरोबर देशाचें राहणीमानहि वाढत जाते.

दोन नमुने :—राष्ट्रीय उत्पन्नाची विभागणी खाजगी क्षेत्र व सरकारी क्षेत्र ह्यांत कशा प्रकारें होते व तदनंतर खाजगी उत्पन्नाची विभागणी विविध उत्पन्नांत कशा प्रकारें होते व त्यामुळें अर्थव्यवस्थेच्या स्वरूपावर कसा प्रकाश पडतो ह्याची कल्पना येण्यासाठीं खालीं दोन नमुने दिले आहेत.

राष्ट्रीय उत्पन्न :— उगमाच्या अनुरोधानें

भारताचें राष्ट्रीय उत्पन्न १९५२–५३			अमेरिकेचें राष्ट्रीय उत्पन्न १९४३	
उत्पादन शाखा	कोटि रु.	टक्केवारी	उत्पादन शाखा	टक्केवारी
१ शेती	४७९०	४८·६	१ शेती	९
२ मोठे उद्योग व खाणी	७९०	८·०	२ खनिज उत्पादन	२
३ छोटे उद्योग	९७०	९·८	३ उद्योगधंदे	३३
४ रेल्वे व दळणवळण	२४०	२·४	४ बांधकाम	३
५ बँका व विमा	७०	०·७	५ वाहतूक	६
६ व्यापार वाहतूक	१४७०	१४·९	६ गॅस, दळणवळण	२
७ स्वतंत्र व्यवसाय	५२०	५·२	७ व्यापार	१२
८ सरकारी कारभार	४६०	४·७	८ अर्थपुरवठा (बँका वगैरे)	६
९ इतर	५६०	५·७	९ सरकार	१७
			१० कामगिरी	७
			११ इतर	३
	९,८७०	१०००		१००

राष्ट्रीय उत्पादनाचा विनियोग :—कोणत्याहि वर्षात होणाऱ्या उत्पादनाचें काय होते असा विचार केल्यास त्या उत्पादनाचे पुढीलप्रमाणें भाग पडत असल्याचें दिसून येईल. (१) **उपभोक्त्यांची खरेदी** : राष्ट्रीय उत्पादनाचा कांहीं भाग त्या त्या वस्तूच्या उपभोक्त्यांकडे जाऊन उपभोगाप्रीत्यर्थ तो वापरला जातो. (२) **सरकारची खरेदी** : राष्ट्रीय उत्पन्नाचा कांहीं भाग सरकारकडून खरेदी केला जातो. सरकारकडून केल्या जाणाऱ्या खरेदींत उपभोग्य वस्तु, भांडवली वस्तु व कामगिरी

ह्या तिन्हींचा समावेश होतो. सरकारनें खरेदी केलेल्या उपभोगवस्तूंचा व कामगिरीचा वापर सामान्यपणें त्या त्या वर्षांत होऊन राष्ट्रीय उत्पन्नांतून त्यांची कायमची गळती होते. सरकारनें खरेदी केलेल्या अथवा निर्माण केलेल्या भांडवली वस्तूंमुळें सामाजिक मालकीच्या भांडवलांत भर पडते. (३) **व्यापारी सांठ्यांत वाढ** : राष्ट्रीय उत्पन्नाचा जो भाग त्या त्या वर्षांत किंवा अन्तिम ग्राहकास विकला जात नाहीं तो भाग उत्पादकाकडे किंवा उत्पादकांकडून तो अधिकाऱ्यांनीं खरेदी केलेला असल्यास त्यांच्याकडे व्यापारी सांठ्याच्या (Business inventories) रूपानें पडून राहतो. (४) **भांडवली साधनांत वाढ** : अन्तिम ग्राहकांकडून जी खरेदी केली जाते त्यांतील कांहीं खरेदी उपभोगाच्या हेतूनें उपभोक्त्यांकडून केलेली असते ती (१) मध्यें अन्तर्भूत झालेली आहे, पण कांहीं खरेदी उत्पादकांनीं केलेली असते ही खरेदी उत्पादनाचें साधन म्हणून दीर्घकालपर्यंत ज्यांचा उपयोग होऊं शकतो अशा भांडवली साधनांची म्हणजे ज्याला स्थिर भांडवल म्हणून सामान्यपणें संबोधले जातें अशा भांडवली साधनांची असते. ह्या विभागांत समाविष्ट होणारी साधनें व विभाग तीनमध्यें समाविष्ट होणारीं भांडवलीं साधनें ह्यांत मुख्य फरक असा कीं, विभाग तीनमधील भांडवलीं साधनें विक्रीच्या हेतूनें सांठविलेलीं किंवा सांठलेलीं असतात. पण ह्या विभागांतील भांडवली साधनें भावी काळांत अधिक उत्पादन करण्यासाठीं त्यांचा उपयोग होतो म्हणून उत्पादकांनीं खरेदी केलेली असतात. (५) परदेशांनीं केलेली खरेदी व परदेशांतून केलेली खरेदी ह्यांतील फरक ह्या विभागाचा देशांतील उत्पादनाशीं प्रत्यक्ष संबंध नसतो. म्हणून हा भाग वेगळा दाखविला आहे. हा भाग लक्षांत घेणें मात्र आवश्यक आहे. कारण परदेशांतून केलेल्या खरेदीमुळें देशांतील लोकांना उपलब्ध होणाऱ्या उपभोग्य वस्तंत व उत्पादनसाधनांत भर पडते. उलट परदेशस्थानीं केलेली खरेदी वजा करावी लागते.

कोणत्याहि वर्षांतील राष्ट्रीय उत्पन्नाचे भाग वरीलप्रमाणें पडत असल्यानें उलट बाजूनें विचार करून असें म्हणतां येईल कीं, राष्ट्रीय उत्पन्न ही वरील पांच भागांची बेरीज असते.[१२]

उपभोगवस्तु व भांडवलवस्तु :—राष्ट्रीय उत्पादनाची वर जी विभागणी दाखविली आहे तिच्या आधारें असें म्हणतां येईल कीं, कोणत्याहि वर्षांतील उत्पादनाचा विनियोग करण्याचे दोन प्रमुख मार्ग असतात. राष्ट्रीय उत्पा-

[१२] The National income may be expressed as total of (a) Goods and services purchased by consumers, (b) Goods and services purchased by Government, (c) Net addition to business inventories, (d) Net increase in depreciable and depletible capital business assets, (e) Net increase in claims against residents.

दनाचा कांहीं भाग उपभोगासाठीं म्हणजे अंतिम गरजा भागविण्यासाठीं वापरला जातो. आणि उरलेला भाग, म्हणजे ज्या भागाचा उपभोगासाठीं उपयोग करतां येत नाहीं किंवा उपभोगासाठीं उपयोग करणें शक्य असूनहि संबंधित वर्षात तो केला जात नाहीं असा भाग भांडवल म्हणून शिल्लक उरतो. प्रस्तुत संदर्भात उपभोगासाठीं न वापरलेला उत्पादनाचा भाग अशी भांडवलाची अकारणात्मक व्याख्या करतां येईल. उपभोगासाठीं उत्पादनाचा जो भाग वापरला जातो तो अंशतः सरकारकडून व अंशतः खाजगी व्यक्तींकडून वापरला जातो. भांडवलाबाबत तेंच म्हणतां येईल. उपभोगासाठीं न वापरलेला उत्पादनाचा जो भाग असतो त्यांतील काहीं भाग सरकारी मालकीचा होतो व कांहीं भाग खाजगी मालकीचा होतो. सरकारी मालकीचा भाग खाजगी उत्पादकांकडून सरकारनें खरेदी तरी केलेला असतो किंवा सरकारनें उत्पादिलेला तरी असतो. खाजगी मालकीचें भांडवल वर्षांच्या शेवटीं ज्यांच्या नांवावर दाखल होतें त्यांनीं तें स्वतः उत्पादिलेलें तरी असतें किंवा मूळच्या उत्पादकाकडून विकत तरी घेतलेलें असतें. कोणत्याहि वर्षातील उत्पादनाचे **उपभोगवस्तु** (Consumption goods) व **भांडवल-वस्तु** (Production goods) असे जे दोन प्रमुख भाग पडतात त्यांच्यांतील एक प्रमुख भेद लक्षांत ठेवला पाहिजे. तो असा कीं, उपभोगवस्तु म्हणून वापरलेला भाग संबंधित वर्षानंतर राष्ट्रीय उत्पादनाच्या हिशेबांतून कायमचा बाहेर पडतो. भांडवलवस्तु म्हणून वापरलेला भाग भावी काळांत अधिक उत्पन्नासाठीं किंवा ताबडतोब उपभोगासाठीं वापरतां येतो.

वरील सर्व विवेचन उदाहरणानें अधिक स्पष्ट होईल. समजा १९५७ सालांत भारतांत १५ लक्ष टन साखर, २ लक्ष टन कागद व २००० यंत्रमाग एवढें उत्पादन झालें आहे. ह्या उत्पादनाचें वर्षअखेरीस काय झालें असें पाहिल्यास असें दिसून येईल की, साखरेचा कांहीं भाग उपभोक्त्याकडे जाऊन संपलेला असेल (उपभोक्त्याकडे वर्षाच्या शेवटीं पडून राहिलेली साखर पण ती राष्ट्रीय उत्पन्नाच्या हिशेबाच्या दृष्टीनें संपली असेच समजलें जाते) किंवा काहीं भाग उत्पादकांच्या अगर व्यापाऱ्यांच्या सांठ्यांत दाखल झालेला असेल. ह्यांतील पहिला भाग उपभोग म्हणून व दुसरा भाग भांडवल म्हणून दाखविला जातो. ह्या ठिकाणीं हें मुद्दाम लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, साखर ही उपभोग्य वस्तु असली तरी ती जोंपर्यंत तिचा अंतिम भाग उपभोक्त्यांकडे जात नाहीं तोंपर्यंत अर्थशास्त्रदृष्ट्या भांडवल समजली जाईल. कागदाच्या उत्पादनाची विभागणी खाजगी व्यक्तींनीं आपल्या उपभोगासाठीं खरेदी केलेला कागद, सरकारनें आपल्या विविध खात्यांसाठीं खरेदी केलेला कागद, प्रकाशकांनीं पुढील छपाईसाठीं खरेदी केलेला कागद व उत्पादक व्यापाऱ्यांकडे विकला न जातां शिल्लक राहिलेला कागद अशी होईल. ह्यांतील पहिल्या दोन वर्गांतला कागद उपभोगांत व उरलेल्या दोन वर्गांतील कागद भांडवल ह्या सदरांत टाकला जातो. यंत्रमाग ही भांडवली वस्तूच असल्यानें

तिच्या उत्पादनाचा समावेश भांडवलांत करावा लागतो. त्यांतील कांहीं भाग सरकारनें खरेदी केला असेल (सरकारी मालकीच्या गिरण्या आहेत असें समजू) कांहीं भाग खाजगी उत्पादकांनी खरेदी केलेला असेल व त्यांच्या स्थिर भांडवलांत मालमत्तेच्या बाजूस जमा झालेला असेल, कांहीं भाग व्यापाऱ्यांनीं खरेदी केलेला न विकतां त्यांच्याकडे पडून राहिल्यामुळें त्यांच्या साठ्यांत समाविष्ट झालेला असेल आणि कांहीं भाग यंत्रभागाच्या मूळच्या उत्पादनाकडे तसाच राहिलेला असेल. हें सर्व विस्तारानें सांगण्याचा हेतु असा कीं, राष्ट्रीय उत्पादनाची **भांडवली माल व उपभोग्य माल** अशी विभागणी कोणत्या तत्त्वानुसार केली जाते हें नीट लक्षांत यावें.

राष्ट्रीय उत्पन्न ही घटक मालकांच्या उत्पन्नाची बेरीज (National income as aggregation of incomes) :—राष्ट्रीय उत्पन्नाची विभागणी त्या उत्पन्नाच्या निर्मितींत सहभागी होत असलेल्या उत्पादन घटकांच्या मालकांत होत असल्यामुळें राष्ट्रीय उत्पन्न हें शेवटीं व्यक्तिगत अगर संस्थागत उत्पन्नाची बेरीज असते असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. वर्षांत होणाऱ्या एकंदर उत्पादनाची एकूण किंमत काढल्यानें राष्ट्रीय उत्पन्नाची ज्या प्रमाणें कल्पना येते त्याचप्रमाणें देशांतील सर्व उत्पन्नदारांच्या उत्पन्नाची बेरीज काढल्यानेंहि राष्ट्रीय उत्पन्नाची कल्पना येते. **उत्पन्न मिळविणाऱ्या व्यक्ति व उत्पादनसंस्था ह्यांच्या उत्पन्नाची बेरीज करणें ही राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याची दुसरी पद्धति होय.** ह्या पद्धतीनें येणाऱ्या राष्ट्रीय उत्पन्नाचा बहुतांश भाग देशांतल्या देशांत होणाऱ्या उत्पादन व्यवहारांतून उद्भूत झालेला असतो. उरलेला थोडा भाग परराष्ट्रांतील आर्थिक व्यवहारापासून किंवा मालमत्तेपासून मिळत असतो. त्याचप्रमाणें देशांतील उत्पन्नाचा कांहीं भाग परदेशाकडे जात असतो. हें सर्व लक्षांत घेऊन राष्ट्रीय उत्पन्नाचा प्रस्तुत संदर्भांत अर्थ देशांतील नागरिकांचे अंतर्गत उत्पादनांतून प्राप्त होणारें व्यक्तिगत व संस्थागत उत्पन्न अधिक परदेशांतील आर्थिक व्यवहारांतून प्राप्त होणारें व्यक्तिगत व संस्थागत उत्पन्न (हें उत्पन्न कधींकधीं उणें ह्या चिन्हानेंहि दर्शवावे लागेल.) असा करतां येईल.[१३]

राष्ट्रीय उत्पन्नाची मोजणी करण्यासाठीं व्यक्तिगत व संस्थागत उत्पन्नांची बेरीज करण्याची वरील पद्धत वापरतांना एक गोष्ट लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. कांहीं प्रकारच्या उत्पन्नांचा चालू उत्पादन व्यवहाराशीं संबंध नसतो. **निवृत्तीवेतन** (Pensions) हें अशा प्रकारच्या उत्पन्नाचें उदाहरण आहे. चालू उत्पादनांतून तें द्यावें लागतें. अशी उत्पन्नें राष्ट्रीय उत्पन्नाच्या बेरजेंत समाविष्ट करण्याऐवजीं राष्ट्रीय उत्पन्नावर बोजा म्हणून समजल्यास त्या उत्पन्नप्रकारांची व एकंदर राष्ट्रीय उत्पन्नाची अधिक यथार्थ कल्पना येते. ज्या उत्पन्नाचा चालू व्यवहारांशीं संबंध नसतो व चालू उत्पादनांतून व्यक्तींना व संस्थाना मिळणाऱ्या उत्पादनांतून जीं देणीं विना

[१३] National income is aggregate of incomes arising from annual production of goods and services plus net income from abroad.

मोबदला द्यावीं लागतात त्यांना **उचलीं देणीं** (Transfer Payments) असें म्हणतात. अशी देणीं उत्पादनांची बेरीज करते वेळीं त्यांत समाविष्ट केली जात नाहींत. किंवा स्वतंत्रपणें हिशेबाच्या सोयीसाठीं समाविष्ट केल्यास मूळच्या उत्पन्नांतून म्हणजे ज्यांच्या उत्पन्नांतून ती दिली जातात त्यांतून तीं वगळली जातात.[१४]

सरकारी करांचें राष्ट्रीय उत्पन्नांतील स्थान :—उचली देण्यांचे (किंवा दुसऱ्या बाजूनें उत्पन्नाचें) सर्वांत महत्त्वाचें दुसरें उदाहरण म्हणून सरकारनें लोकांवर बसविलेल्या करांचा उल्लेख करतां येईल. कर हें सक्तीचे देणें असतें. तत्त्वतः कर हें विनामोबदला देणें असतें. कारण करांच्या मोबदल्यांत कोणतीहि कामगिरी करण्याची हमी देण्यास सरकार बांधील नसते. त्यामुळें कर हा लोकांच्या उत्पन्नावर पडणारा बोजा असतो. म्हणून करापासून सरकारला मिळणारे उत्पन्न व्यक्तिगत अथवा संस्थागत उत्पन्नांच्या बेरजेंत मिळविलें जात नाहीं. त्या बेरजेचा कर हा एक भाग समजला जातो. कराचा अंतर्भाव त्या बेरजेंत करण्याच्या दोन वेगवेगळचा पद्धति आहेत. व्यक्तीचें अगर संस्थांचें उत्पन्न ठरवितांना कर वगळून उरेल तेंच उत्पन्न व्यक्तीचें व संस्थांचें खरें उत्पन्न असें समजलें जातें व अशा उत्पन्नांची बेरीज करून त्यांत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांपासून मिळणारें उत्पन्न मिळविलें जातें. किंवा व्यक्ति-संस्थाचे करपश्चात उत्पन्न लक्षांत न घेतां करपूर्व उत्पन्न विचारांत घेतलें जातें व मग करापासून सरकारला मिळणाऱ्या उत्पन्नाची दखल घेतली जात नाहीं. ह्यांतील पहिली पद्धत चांगली आहे. कारण त्या पद्धतीनें अर्थव्यवस्थेवर पडणारा सरकारचा बोजा किंवा अर्थव्यवस्थेंतील सरकारचें स्थान बरोबर समजतें. शिवाय कर वगळून उरणारें उत्पन्न हेंच आपलें खरें उत्पन्न असें समजण्याची लोकांना संवय असल्यानें **करपश्चात वापरणीय उत्पन्न** (Disposable income after taxes) हेंच त्यांचें खरें उत्पन्न समजणें उचित आहे.

विविध उत्पन्नप्रकार :—राष्ट्रीय उत्पन्नांत समाविष्ट होणारें उत्पन्न व्यक्तिगत व संस्थागत मानतां येतें. उत्पन्नप्रकारांचे कांटेकोर वर्गीकरण तात्त्विक विवेचनांत

---

[१४] National income includes only those incomes of residents of the nation, whether individual or corporate, which are derived directly from the current production of goods and services. Such incomes, can be described as incomes of factors of production, or more shortly, as factor incomes. Other forms of income which are not payments for current services to production and which are paid for out of factor incomes are described as transfer incomes. The National income being the total value of goods and services becoming available, cannot include both factor incomes and transfer incomes. It is more usefully measured by the sum of factor incomes.

केलें जातें; पण व्यवहारांत तें करणें बरेंच कठीण आहे. कारण विविध उत्पन्न-प्रकार एकमेकांत मिळालेलें असतात. उदाहरणार्थ व्यवहारांत ज्याला नफा म्हणून संबोधिलें जातें त्यांत कित्येक वेळां व्यवस्थापनाच्या कामगिरीबाबतचें वेतन, ज्यांच्या मालकीचे उद्योगधंदे असतात त्यांच्या भांडवलावरील, मालमत्तेपासून प्राप्त होणारा खंड इत्यादि गोष्टी अंतर्भूत असतात. अशा सरमिसळीमुळें बऱ्याच अडचणी उपस्थित होतात. त्या सर्व लक्षांत घेऊन शक्य तेवढें कांटेकोर वर्गीकरण करावें लागतें व जरूर तो खुलासा त्या वर्गीकरणास जोडावा लागतो.

श्रमजन्य उत्पन्न व मालमत्ताजन्य उत्पन्न :—स्थूलमानानें उत्पन्न प्रकारांचे प्रथम रोजगारीपासून मिळणारें म्हणजेच श्रमजन्य उत्पन्न (Income from Work) आणि मालमत्तेपासून मिळणारें उत्पन्न (Income from Property) असे दोन भाग पाडतां येतात. श्रमजन्य उत्पन्नांत **वेतन व पगार** (Wages and Salaries) ह्यांचा समावेश होतो. मालमत्तेपासून मिळणाऱ्या उत्पन्नांत **व्याज, नफा व खंड** हे तीन उत्पन्नप्रकार येतात. ह्यांपैकीं वेतन व पगार ह्या उत्पन्नाला दोन दृष्टींनीं महत्त्व आहे. एकतर बहुसंख्य लोकांचें तें उत्पन्न असतें व दुसरें म्हणजे एकंदर राष्ट्रीय उत्पन्नांत ह्या उत्पन्न प्रकाराचा वांटा सर्वांत मोठा असतो. मालमत्तेपासून मिळणारें उत्पन्न दुसऱ्या अर्थानें महत्त्वाचें असतें. तें उत्पन्न प्रमाणानें कमी असलें तरी थोड्या लोकांतच विभागलें जातें. श्रम-जन्य उत्पन्न व मालमत्ताजन्य उत्पन्न ह्यांपैकीं प्रत्येक उत्पन्न प्रकाराबाबत तें एकंदरीनें किती आहे व कितीजणांत विभागलें आहे हें समजल्यास विभाजनावर चांगलाच प्रकाश पडतो. आर्थिक विषमता किती प्रमाणांत आहे ह्याचा त्यापासून पत्ता लागतो. रोजगारीपासून उत्पन्न व मालमत्तेपासून उत्पन्न ह्यांच्यांत कांटेकोर भेद करण्याची अडचण मुख्यत: स्वत:चा व्यवसाय स्वत: चालविणारांच्या बाबतींत येते. कारण त्यांचे उत्पन्न श्रम व मालमत्ता ह्या दोहोंपासून मिळालेलें असतें व कामापासून मिळालेलें उत्पन्न किती व मालकीपासून मिळणारें किती हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. म्हणून कांहीं देशांच्या हिशेबांत हें उत्पन्न हा वेगळाच प्रकार मानून वेगळेंच दाखविलें जाते. ही पद्धत एका दृष्टीनें फारच उपयुक्त आहे. कारण देशांत स्वत:च कामगार स्वत:च राबणाऱ्यांची संख्या किती व त्यांना मिळणारा राष्ट्रीय उत्पन्नाचा वांटा किती ही माहिती देशाच्या **अर्थस्थितीवर** (Economic Condition) प्रकाश टाकणारी असते. लहान उद्योगधंद्यांचें प्राबल्य असणाऱ्या देशांत अशा प्रकारच्या उत्पन्नांना तुलनेनें अधिक महत्त्वाचें स्थान असतें.

मालमत्तेपासून मिळणारें उत्पन्न :—मालमत्तेपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचें व्याज, नफा व खंड असे तीन प्रकार असतात. व्याज हें उत्पादनासाठीं भांडवलपुरवठा करणाऱ्यांना मिळणारें उत्पन्न असतें. नफा हें उत्पादनांतील धोके पत्करण्याबद्दल मिळणारें उत्पन्न असतें. खंड ह्या उत्पन्न प्रकाराला राष्ट्रीय उत्पन्नांच्या हिशेबांत

विशिष्ट अर्थ देण्यांत आला आहे. त्या अर्थानुसार खंड म्हणजे स्थावर मालमत्तेपासून —म्हणजे जमीन व इमारती ह्यांच्या मालकीपासून—मिळणारें उत्पन्न होय. अशी मालमत्ता भाड्यानें दिल्यास तिच्यापासून मिळणारें उत्पन्न लगेच समजतें; पण मालक जेव्हां स्वतः आपली स्थावर मालमत्ता वापरतो तेव्हां खंडासंबंधी हिशेब करून खंडाच्या खातीं कांहीं रक्कम दाखविली जाते. अशा हिशेबांत ती मालमत्ता भाड्यानें दिली असतां ज़ेवढें उत्पन्न मिळालें असतें तेवढें खंड म्हणून धरलें जातें. स्वतःच मालक असणाऱ्यांचा नफा वेगळा काढलेला असला तर मुख्यतः खाजगी व सार्वजनिक संस्थांचाच नफा उरतो. नफ्याचा हिशेब करतांना घसारा बाजूला काढला जातो. त्याचप्रमाणें कर स्वतंत्र दाखवावयाचे असतील तर तेहि वगळले जातात. खाजगी संस्थांचा सर्वच्या सर्व नफा त्यांचें उत्पन्न म्हणून धरावयाचा कीं फक्त न वांटलेला नफा (Undistributed Profits) लक्षांत घ्यावयाचा हा सोयीचा प्रश्न आहे. कोणत्याहि उत्पन्न प्रकाराची दुबार मोजणी टाळणें अवश्य असते हा नियम मात्र लक्षांत ठेवला पाहिजे. वांटलेला नफा व्यक्तीच्या उत्पन्नांत समाविष्ट केलेला असल्यास खाजगी संस्थांच्या उत्पन्नांत धरतां येणार नाहीं हें उघड आहे.

उत्पन्न प्रकारांचें वर्गीकरण :—वरील विवेचनाच्या आधारें खालीं उत्पन्न प्रकारांचें एक वर्गीकरण दिलें आहे. त्या वर्गीकरणांत दर्शविलेल्या उत्पन्न प्रकारांपासून मिळणाऱ्या उत्पन्नांची बेरीज म्हणजेच राष्ट्रीय उत्पन्न. खालील वर्गीकरण हा केवळ एक नमुना आहे. निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या प्रकारें वर्गीकरण केले जातें. उदाहरणार्थ, सरकारी मालकीचे उद्योगधंदे प्रधानतः नफ्यासाठीं नसतात. तेव्हां त्यांतून होणारा नफा हें अप्रत्यक्ष कर असे समजण्याची सूचनाहि केली गेली आहे. वर्गीकरण कोणत्या प्रकारें करावें हें राष्ट्रीय उत्पन्नासंबंधींच्या हेतूवर व विविध प्रकारची आंकडेवारी निश्चित स्वरूपांत किती प्रमाणांत उपलब्ध होते ह्यावर अवलंबून असतें. कोणतेंहि वर्गीकरण स्वीकारण्यास कोणतेंही उत्पन्न एकापेक्षां अधिक वेळां मोजले जाऊं नये ही दक्षता घ्यावीच लागते. ही दक्षता घेतलेली असल्यास व राष्ट्रीय उत्पन्नाची जी व्याख्या वर्गीकरण करणाऱ्यांनीं स्वीकारलेली असते तिच्याशीं त्यांचें वर्गीकरण सुसंगत असल्यास विविध प्रकारच्या वर्गीकरणामुळें शेवटीं येणाऱ्या बेरजेंत फरक पडत नाहीं. उत्पन्नप्रकारांचें वर्गीकरण करण्याची खालील पद्धति उपयुक्त आहे असें सर्व दृष्टींनीं विचार केल्यानंतर वाटतें.

(अ) **व्यक्तिगत उत्पन्न** (Personal Income):—(१) रोजगारापासून उत्पन्न (Income from work). (२) व्याज व लाभांश (Interests and Dividends). (३) खंड (Rent from immovable property). (४) मालक-कामगारांचें उत्पन्न (Income from self employment).

टीप :—(अ) व्यक्तिगत उत्पन्नांतून प्रत्यक्ष कर वगळले आहेत.

टीप :—(आ) मालक-कामगारांचें उत्पन्न हा मिश्र उत्पन्नप्रकार असून त्यांत काम व मालमत्ता ह्या दोहोंपासून उत्पन्न समाविष्ट आहे.

(ब) **संस्थागत उत्पन्न** :—(१) खाजगी मालकीच्या उद्योगसंस्थांचा न वांटलेला नफा (कर वगळून), (२) सार्वजनिक आर्थिक संस्थांचा (Public Corporations) नफा (सरकारला दिलेला नफ्याचा भाग वगळून).

(क) **सरकारचें महसूली उत्पन्न** :—(१) प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांचें उत्पन्न, (२) सार्वजनिक मालकीच्या उद्योगधंद्यांतील नफ्याचा वांटा, (३) सरकारच्या विविध खात्यांकडून केल्या जाणाऱ्या कामांतील नफा.

(ड) **परराष्ट्रीय अर्थव्यवहारांपासून मिळणारें उत्पन्न** :—परदेशांतील मालमत्तेपासून मिळणारें उत्पन्न उणें परदेशीं पाठवावयाचें उत्पन्न.

राष्ट्रीय खर्च :—आतांपर्यंत राष्ट्रीय उत्पन्नाची मोजणी करण्याच्या दोन पद्धति सांगितल्या. राष्ट्रीय उत्पन्नाचा तिसऱ्याहि प्रकारें विचार करतां येतो. राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे उत्पादनाची एकंदर किंमत असेल तर ह्या किंमतीची विभागणी उत्पादनांत सहभागी होणाऱ्यांत शेवटीं होते. म्हणून उत्पादनाचें एकूण मूल्य उत्पन्नप्रकारांच्या बेरजेइतकें असलेंच पाहिजे असें ज्याप्रमाणें म्हणतां येतें त्याप्रमाणें उत्पादनाची एकंदर किंमत ही त्या उत्पादनावर होणाऱ्या एकंदर खर्चाइतकी असलीच पाहिजे असेंहि म्हणतां येतें. त्यामुळें **देशांतील एकंदर खर्चाची मोजणी करणें ही राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याची तिसरी पद्धत** होऊं शकते.[१५] ह्या पद्धतींतहि कोणत्याहि खर्चाची मोजणी एकापेक्षां अधिक वेळां होणें टाळावें लागतें त्यासाठीं अंतिमावस्थेंत वस्तूंवर होणारा खर्चच फक्त विचारांत घेतला जातो मध्यमावस्थेंतील वस्तूंवरील खर्च अंतिमावस्थेंतील वस्तूंवरील खर्चांत अंतर्भूत असतो हें सांगावयाला पाहिजे असें नाहीं.[१६]

खर्चाच्या बाजूकडून राष्ट्रीय उत्पन्नाचा हिशेब करतांनासुद्धा परराष्ट्रांबरोबरील आर्थिक व्यवहारांची दखल घ्यावी लागते. परदेशांपासून प्राप्त होणारें उत्पन्न, निर्यातीची किंमत म्हणून एकंदर खर्चांत मिळवावें लागतें आणि परदेशांतून होणाऱ्या आयातीवरील खर्च व परदेशी दिलेली अन्य देणीं एकंदर खर्चांतून वजा करावी लागतात. तेव्हां एकंदर खर्च म्हणजे अंतिम वस्तू व कामगिरीवरील देशांतील

[१५] The National income has been defined as the value of goods and services becoming available to the Nation. Hence it can be measured not only as a sum of incomes but also by summing expenditures on these goods and services.

[१६] Just as the national income is not simply an aggregation of all incomes, and the national product is not an aggregation of the selling values of all goods sold, so the national expenditure is not the aggregation of all purchases—To avoid duplication, only the final purchases are included in the aggregate of national expenditure.

लोकांचा खर्च अधिक निर्यातमूल्य व परदेशी व्यवहारांतील अन्य देणीं उणें आयात मूल्य व परदेशस्थांची देणीं असें म्हणतां येईल.[१७]

खर्चाची विभागणी :—राष्ट्रीय खर्चाची विभागणी—(अ) खर्चाचा हेतु लक्षांत घेऊन व (आ) ख़र्च कोणाकडून होत आहे हें लक्षांत घेऊन करतां येते. हेतु लक्षांत घेतल्यास खर्चाचे दोन महत्त्वाचे भाग पडतात. पहिल्या भागांत भोग्य वस्तूंवरील खर्च, थोडक्यांत **उपभोगखर्च** (Consumption Expenditure) येतो व दुसऱ्या भागांत भांडवली वस्तूंवरील खर्च किंवा **भांडवल गुंतवण** (Investment) येते. भांडवली खर्चामुळें देशाच्या संपत्तीनिर्मितीच्या साधनांत भर पडते.

खर्च कोणाकडून होतो हें विचारांत घेऊन ख़र्चाचे **खाजगी खर्च व सरकारी खर्च** असे दोन भाग पडतात. खाजगी खर्चांत उपभोक्ते ह्या नात्यानें ख़ाजगी व्यक्ति व संस्थांकडून होणारा खर्च समाविष्ट होतो. सरकारी खर्चांत उपभोग वस्तूंवर व कामगिरीवर सरकारकडून होणारा खर्च व तसेंच सरकारीरीत्या होणारी भांडवल गुंतवण येते.

खर्चाची विभागणी करण्याच्या वरील दोन्ही पद्धती लक्षांत घेऊन खर्चाचें वर्गीकरण पुढील प्रकारें करतां येईल.

(अ) ख़ाजगी खर्च (१) ख़ाजगी व्यक्तींचा उपभोगखर्च.
(२) खाजगी व्यक्ति व संस्थांची भांडवलगुंतवण.
(ब) सार्वजनिक खर्च (१) सरकारचा चालू खर्च.
(२) सरकारची भांडवली गुंतवण.

टीप :—सरकारी मालकीच्या पण स्वतंत्रपणें चालविल्या जाणाऱ्या उत्पादन-संस्थांची भांडवली गुंतवण (ब) (२) मध्यें समाविष्ट आहे. ती वेगळीहि दाखवितां येईल.

एकच गोष्ट मोजण्याच्या तीन पद्धति :—ह्या प्रकरणांत राष्ट्रीय उत्पन्नाचे तीन अर्थ दिले आहेत व त्या त्या अर्थानुसार राष्ट्रीय उत्पन्नाची मोजणी करण्याच्या पद्धतीचें स्थूल स्वरूपाचें विवेचन केलें आहे. राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे (१) राष्ट्रांतील उत्पादनाचें एकूण मूल्य (२) राष्ट्रांतील व्यक्तींच्या उत्पन्नाची बेरीज व (३) राष्ट्रांतील एकंदर खर्च असें दाखविलें आहे. ह्या बाबतींत लक्षांत ठेवण्याची मुख्य गोष्ट अशी कीं, **राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याच्या तीन पद्धती ह्या एकाच गोष्टीच्या तीन बाजू** असल्यामुळें मोजणी कोणत्याहि पद्धतीनें केली तरी शेवटची बेरीज एकच येणें अपरिहार्य आहे. तेव्हां असें खुशाल म्हणण्यास हरकत नाहीं कीं, **एकंदर उत्पादन मूल्य = एकंदर उत्पन्न = एकंदर खर्च.** असें असूनहि वेगवेगळ्या पद्धतीनें मोजणी करण्याचे दोन हेतु असतात. ताळा व्हावा हा एक हेतु आणि विविध पद्धतीनें

[१७] The National expenditure is equal to total expenditure by the residents of the nation on all final goods and services plus total exports and income received from abroad less total imports and income paid abroad.

केलेल्या मोजणीमुळें व त्या त्या पद्धतींतील वर्गीकरणामुळें अर्थव्यवस्थेच्या विविध अंगोपांगांचा परिचय करून घेतां येतो हा दुसरा हेतु.

अर्थव्यवस्थेचें विभाग :—यापूर्वीं सांगितल्याप्रमाणें कोणत्याहि देशाच्या अर्थव्यवस्थेचे (१) खाजगी विभाग व सरकारी विभाग असे दोन विभाग पडतात ह्यांतील प्रत्येक विभागाचा (अ) उत्पादन दृष्ट्या (ब) उत्पन्न दृष्ट्या व (क) खर्च दृष्ट्या विचार करतां येतो.

उत्पादनाचे खाजगी विभागांतील उत्पादन व सार्वजनिक विभागांतील उत्पादन असे भाग पाडतां येतात. खाजगी उत्पादनांत खाजगी व्यक्तींनीं व संस्थांनीं केलेलें वस्तूंचें व कामगिरींचें उत्पादन समाविष्ट होतें. सार्वजनिक उत्पादनांत सार्वजनिक मालकीचें पण त्यासाठीं खास स्वरूपाच्या संस्था प्रस्थापित करून चालविलेलें उद्योग-धंदे—उदाहरणार्थ, भारतांतील Life Insurance Corporation किंवा State Transport ह्या सारखे—व सरकार व तत्सम संस्थांकडून होणारें उत्पादन येतें. उत्पादनाची ज्याप्रमाणें खाजगी उत्पादन व सार्वजनिक उत्पादन अशी विभागणी करतां येते त्याप्रमाणें उत्पन्नाची विभागणी खाजगी उत्पन्न व सार्वजनिक उत्पन्न व खर्चाची विभागणी व खाजगी विभाग अशी अर्थव्यवस्थेची विभागणी केल्यानंतर प्रत्येक विभागाचे स्वतंत्र हिशेब करतां येतात. अशा प्रकारच्या हिशेबावरून त्या त्या विभागांतील उत्पन्न व खर्च ह्यांचा बोध तर होतोच पण ह्या दोन महत्त्वाच्या विभागांचें अर्थव्यवस्थेंतील तौलनिक स्थान काय आहे व त्यांचा परस्परसंबंध कोणत्या स्वरूपाचा आहे ह्याचाहि बोध होतो. अर्थव्यवस्थेचे विविध विभाग पाडून त्या त्या विभागांचे स्वतंत्र हिशेब करणें व त्यांचा उपयोग करून अर्थव्यवस्थेचा संकलित अभ्यास करणें हें अलीकडे अर्थशास्त्र व संख्याशास्त्र ह्यांचा समन्वय करणारें नवीनच शास्त्र होऊं पहात आहे. **सामाजिक हिशेब शास्त्र** (Social Accounting) असें नांवहि त्याला प्राप्त झालें आहे.

प्रमुख संदर्भग्रंथ

(1) Shoup—National Income Analysis.
(2) Central Statistical Office—National Income Statistics. (U. K. Govt.)

: १६ :

राष्ट्रीय उत्पन्नाचें विभाजन

विभाजन :—राष्ट्रीय उत्पन्न हें वेतन-पगार, व्याज, नफा व खंड ह्या चार प्रकारच्या उत्पन्नांची बेरीज असते असें मागील प्रकरणांत दाखविलें आहे. ह्याचाच अर्थ असा कीं, राष्ट्रीय उत्पन्न हें शेवटीं ह्या चार उत्पन्न-प्रकारांत विभागलें जातें. राष्ट्रीय उत्पन्नाच्या निर्मितींत जे सहभागी होतात त्यांना ह्या चारपैकीं कोणत्या तरी एका अगर अधिक प्रकारचें उत्पन्न मिळत असते. निरनिराळ्या प्रकारचीं जीं उत्पन्नें प्रत्येक व्यक्तीला मिळत असतात त्यांची बेरीज केली म्हणजे वैयक्तिक उत्पन्न किती तें समजतें. सारांश, राष्ट्रीय उत्पन्नाची विभागणी शेवटीं राष्ट्रीय निर्मितींत सहभागी होत असणाऱ्या असंख्य व्यक्तींत होत असते. ह्यालाच राष्ट्रीय उत्पन्नाचें विभाजन (Distribution) म्हणतात.[1]

विभाजनांतील विषमता :—अनियोजित अर्थव्यवस्थेंतील विभाजनाचा आराखडा स्थूलपणें जरी पाहिला तरी असें दिसून येतें कीं, उत्पन्नाची विभागणी अतिशय विषम असते. राष्ट्रीय उत्पन्नाची विभागणी अशी विषम कां व्हावी हा एक अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. ह्या प्रश्नाचा विचार करण्यापूर्वी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे; ती ही कीं, उत्पन्नाचें वर्गीकरण चार प्रकारांत करणें सोयीचे असलें तरी उत्पन्न मिळविण्याची साधनें खरी दोनच असतात. तीं म्हणजे (१) श्रम व (२) वस्तुरूप उत्पादनसाधनांची मालकी किंवा खाजगी मालमत्ता हीं होत. त्या दृष्टीनें **श्रमजन्य उत्पन्न व मालमत्ताजन्य उत्पन्न** हें उत्पन्नाचें वर्गीकरण अधिक मूलगामी आहे. वरील चार उत्पन्न प्रकारांच्या अनुरोधानें असें म्हणतां येईल कीं, वेतन-पगार हें उत्पन्न श्रमापासून मिळणारें असतें. उरलेली तीन म्हणजे व्याज, खंड व नफा हीं उत्पन्नें मालमत्तेपासून मिळतात. खंड ह्या उत्पन्नाचा अर्थशास्त्रमान्य अर्थ पहिला तर खंड हें उत्पन्न वेगळें आहे असें समजतां येत नाहीं. इतर तिन्ही उत्पन्नांत हें अंतर्भूत असतें. पण राष्ट्रीय उत्पन्नाच्या परिभाषेंत खंड हें विशिष्ट प्रकाराच्या मालमत्तेपासून म्हणजे स्थावर मालमत्तेपासून मिळणारें उत्पन्न असतें. अर्थात खंड हें उघडउघड मालकी हक्कापासून मिळणारें उत्पन्न होय. व्याजासंबंधींची सनातन किंवा कीन्सवादी ह्यांपैकीं कोणतीहि उपपत्ति मानली तरी व्याज हें भांडवलावर मालकी प्रस्थापित करण्याची कुवत ज्यांच्यांत आहे म्हणजेच उपभोगखर्च केल्यानंतर ज्यांच्याकडे कर्जाऊ देण्यास पैसा राहूं शकतो त्यांना मिळणारें उत्पन्न असतें हें नाकारतां यावयाचें नाहीं. साहजिकच व्याज हेंहि मालमत्ताजन्यच उत्पन्न होय. ज्याच्याजवळ

---

[1] The National Income of a country is divided into four kinds of income, viz. wages, interest, rent and profits. These in turn are divided into individual income.

काहीचीहि मालमत्ता नाहीं तो धीटपणें उत्पादनसामग्रीची संपूर्णतया उसनवारी करून व उत्पन्नाची सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन नफा मिळवूं शकेल हें तात्त्विक दृष्टचा संभवनीय आहे. पण व्यवहारांत नफा हें उत्पन्न मालमत्तेशींच संबधित असते. उत्पादनाच्या वस्तूरूप साधनांवर ज्यांची मालकी असते व त्या मालकीच्या बळावर उत्पादनांतील धोके पत्करून उत्पादनाची जबाबदारी जे घेतात त्यांनाच हें उत्पन्न मिळतें. तेव्हां वेतन-पगार एका बाजूला व इतर तीन उत्पन्नप्रकार दुसऱ्या बाजूला असा विचार करून राष्ट्रीय उत्पन्नाची विभागणी श्रमजन्य उत्पन्न व मालमत्ताजन्य उत्पन्न अशी होते असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं.[२]

कामगार व भांडवलदार :—श्रमजन्य व मालमत्ताजन्य उत्पन्न ह्या वर्गीकरणाच्या आधारें समाजाची विभागणी कामगारवर्ग (Labour) व भांडवलदार वर्ग (Capitalist) अशी विभागणी करतां येते. कामगारवर्ग हा श्रमजीवी वर्ग होय. अगदीं कटाक्षानें बोलावयाचें झाल्यास ज्या वर्गाचें उत्पन्न संपूर्णपणें वेतन-पगाररूपानें मिळत असते तो श्रमजीवी (Proletariat) वर्ग होय. तसेच ज्या वर्गाचें उत्पन्न संपूर्णपणें उत्पादनाच्या वस्तुरूप साधनावरील मालकी हक्कापासून मिळत असतें तो भांडवलदार वर्ग होय. एवढी कांटेकोर विभागणी व्यवहारांत अर्थातच करतां येत नाहीं. कारण श्रम व मालमत्ता ह्या दोन्हीपासून उत्पन्न मिळविणाऱ्यांची संख्या लहान नसते. तेव्हां ज्यांचें बहुतांश उत्पन्न श्रमापासून प्राप्त झालेलें असतें तो कामगारवर्ग व ज्यांचें बहुतांश उत्पन्न मालमत्तेपासून मिळत असतें तो भांडवलदार वर्ग असें म्हटल्यास बिघडणार नाहीं.

विभाजनांतील विषमता :—श्रमजन्य उत्पन्न व मालमत्ताजन्य उत्पन्न ह्या वर्गीकरणाच्या आधारें राष्ट्रीय उत्पन्नाच्या विभाजनाची तपासणी केल्यास बहुतेक सर्व राष्ट्रांत विभाजन अतिशय विषम असल्याचें दिसून येतें. कोणत्याहि राष्ट्राच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा सर्वांत मोठा वांटा श्रमजीवी वर्गांतच वांटला जातो. त्या मानानें भांडवलजीवी वर्गाच्या वाटचास येणारा राष्ट्रीय उत्पन्नाचा भाग लहान असतो. परंतु श्रमजीवी वर्गाच्या वाटचास राष्ट्रीय उत्पन्नाचा जो भाग येतो त्याच्या वाटेकऱ्यांची संख्या एवढी प्रचंड असतें कीं, प्रत्येकाचा सरासरी भाग फारच लहान होतो. उलट मालमत्ताजन्य उत्पन्नाचें एकंदर उत्पन्नांतील तौलनिक स्थान लहान वाटलें तरी तें उत्पन्न थोडचा जणांत विभागलें जात असल्यामुळें प्रत्येकाचें सरासरी उत्पन्न मोठें असतें. सारांश, सरासरी श्रमजन्य उत्पन्न व मालमत्ताजन्य उत्पन्न असा विचार केल्यास विभाजनांतील विषमतेची चांगलीच कल्पना येते.

श्रमजन्य उत्पन्न व मालमत्ताजन्य उत्पन्न ह्यांचा वेगवेगळा विचार केला तरी त्या त्या उत्पन्न प्रकाराच्या विभागणींतहि कमालीची विषमता आढळून येईल.

[२] In all modern societies the two chief sources of income are the performance of work and the ownership of property—**Dobb**

तात्त्विक चर्चेचें अत्यंत हीन दर्जाचें काम करणाऱ्याला होणारी प्राप्ति हें वेतन होय अत्यंत महत्त्वाचें काम करणाऱ्या अधिकाऱ्याला मिळणारा पगार हेंहि वेतन किंवा श्रमजन्य उत्पन्न होय. पण त्या दोहोंचे मूळ सारखे असलें तरी त्या दोन्ही वेतनांत कमालीचा फरक असतो हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. मालमत्तेपासून मिळणाऱ्या उत्पन्नाबाबत हीच गोष्ट दिसून येते. सर्वच भांडवलदारांची प्राप्ति सारखी नसते. त्यांतील सर्वांत किमान प्राप्ति व कमाल प्राप्ति ह्यांच्यांत खूपच मोठा फरक असतो. सर्व उद्योगधंद्यांतील नफ्याचें प्रमाण सारखे नसतें. एकाच उद्योगधंद्यांत सर्व उत्पादकांना नफाहि सारखा नसतो. तसेंच स्थावर मिळकतीपासून प्राप्त होणारा खंडहि सर्वांना सारख्या प्रमाणांत मिळत नाहीं. व्याजाचेंहि तेंच आहे. व्याजापासून निरनिराळ्या व्यक्तींना मिळणारें उत्पन्न कधींच सारखें नसतें. सारांश, विभाजनाचा विचार कोणत्याहि दृष्टीकोनांतून केला तरी विषमताच डोळ्यांत भरते. उत्पन्नांतील विषमता (Inequality of Incomes) हा प्रचलित आर्थिक व्यवस्थेचा स्थायी भाव आहे असें म्हणण्यास बिलकुल हरकत नाहीं. आर्थिक विषमता (Economic Inequality) एवढ्या मोठ्या प्रमाणावर कां असावी हा अर्थातच त्यामुळें फार महत्त्वाचा प्रश्न ठरतो.

आर्थिक विषमतेचीं कारणें :—(१) **खाजगी मालमत्ता** : राष्ट्रीय उत्पन्नाच्या विभाजनांत जी कमालीची विषमता दिसून येते तिचें आद्य कारण खाजगी मालमत्ता (Private Property) ह्या अर्थसंस्थेंत (Economic Institution) आढळून येतें. श्रम व भांडवलावरील मालकी हे उत्पन्न मिळविण्याचे दोन मार्ग आहेत. त्यांपैकीं भांडवलाच्या मालकीमुळें ज्यांना उत्पन्न मिळतें त्यांची उत्पन्नें सारखीं असणें शक्यच नाहीं. कारण एक तर वारसा हक्कानें मिळालेल्या किंवा स्वकष्टानें कमाविलेल्या मालमत्तेचें प्रमाण सर्वांचें सारखें नसतें आणि शिवाय विविध प्रकारच्या मालमत्तेची उत्पन्न मिळविण्याची पात्रता कमीजास्त असूं शकते. मालमत्तेचे कांहीं प्रकार विशेष उत्पन्नोत्पादक असतात. त्यामुळें त्या प्रकारच्या मालमत्तेचें मूल्य सारखें वाढत जाते.[3] मनुष्यबळाचा पुरवठा भांडवलाच्या मानानें विपुल असतो किंवा निराळ्या शब्दांत भांडवलाची दुर्मिळता तुलनेनें अधिक असते. भांडवलाचा पुरवठा कमी असण्याचा आणखी एक परिणाम होतो; तो असा कीं, भांडवलाची मालकी स्वभावतःच थोड्या लोकांच्या हातांत केन्द्रित झालेली असते. शिवाय भांडवलशाही देशाच्या आर्थिक विकासांत असें दिसून येतें कीं, भांडवलावरील मालकी अधिकाधिक केन्द्रित होत जाते. असें होणें साहजिकच आहे कारण भांडवलावरील मालकीचा

[3] The three immediate causes of inequality from property are first differences in the amounts of property received by different individuals by way of inheritance and gifts, second differences in the amount of property accumulated by different individuals through savings and third changes which take place in the value of different prices of property—**Dobb**

उपयोग भांडवलवृद्धि करण्यासाठीं करतां येतो. व्यक्तीच्या मालकीचें उत्पन्न दोन प्रकारें वाढूं शकतें. अर्थव्यवस्थेंत उपलब्ध असणाऱ्या एकंदर भांडवलांत वाढ घडवून आणून वाढलेलें भांडवल आपल्या पदरीं पाडून घ्यावयाचें हा आपल्या मालकीचें भांडवल वाढविण्याचा एक मार्ग होय. दुसऱ्याच्या मालकीचें भांडवल हस्तगत करून घ्यावयाचें हा दुसरा मार्ग होय. ह्या दोन्ही मार्गांनीं श्रीमान वर्ग अधिक श्रीमान होत जातो. त्यामुळें भांडवलावरील मालकीचें केन्द्रीकरण होत जाते असा इतिहासाचा दाखला आहे. भांडवलावरील मालकीचें केन्द्रीकरण जसें वाढत जातें तशी विभाजनांतील विषमताहि वाढत जाते. केन्द्रीकरणाबरोबर विषमता वाढत जाणें हें स्वाभाविक आहे. कारण एकतर भांडवलाची मालकी जेवढ्या थोड्या लोकांच्या हातांत येते तेवढ्या प्रमाणांत भांडवलदार वर्गाचें सरासरी उत्पन्न वाढतें. शिवाय भांडलाच्या केंद्रीकरणाच्या बरोबरीनें श्रमजीवी वर्गाचे परावलंबित्व वाढतें. मक्तेदारींत ह्या दोन्ही गोष्टी दिसून येतात. मक्तेदारीमुळें उत्पादकाला मिळणाऱ्या नफ्याचें प्रमाण वाढतें ह्याची दोन कारणें सांगतां येतील. पहिलें कारण असें कीं, स्पर्धा नष्ट झाल्या-मुळें किंमत उत्पादन खर्चापेक्षा बऱ्याच वरच्या पातळीवर राहील अशी व्यवस्था करणें जमूं शकते. दुसरें कारण असें कीं, मक्तेदाराला वेतनसंबंधींच्या प्रकरणांत सांगितलेल्या अर्थानें कामगारवर्गाचें शोषण करणेंहि जमूं शकते. प्रचलित अर्थ-व्यवस्थेंत मक्तेदारीचा प्रभाव वाढत आहे असें मक्तेदारीच्या विवेचनांत सांगितलेंच आहे. ह्याचाच अर्थ असा कीं, प्रचलित अर्थव्यवस्थेंत भांडवलाचें केन्द्रीकरण व तदनुषंगानें निर्माण होणारी आर्थिक विषमताहि (Economic Inequality) वाढत आहे.

समान संधीचा अभाव (Inequality of Opportunity):—आर्थिक विषमता आढळण्याचें दुसरें महत्त्वाचें कारण समान संधीचा अभाव हें होय. समानसंधीचा अभाव हा एका अर्थानें आर्थिक विषमतेचा परिणाम असतो आणि दुसऱ्या अर्थानें आर्थिक विषमतेचें तें कारण होऊं शकते. हीच गोष्ट अशीहि सांगतां येईल कीं, आर्थिक विषमता निर्माण झाली कीं, सर्वांना समानसंधि मिळणें दुरापास्त होते आणि सर्वांना समानसंधि न मिळाल्यामुळें आधीच असलेली आर्थिक विषमता वाढते.

समानसंधीच्या अभावामुळें आर्थिक विषमतेची वाढ होण्यास मदत होते ह्याचें मुख्य कारण असें कीं, उत्पादनदृष्ट्या जें व्यवसाय किंवा उद्योगधंदे फलदायी असतात त्यांच्यांतील प्रवेश मर्यादित होतो आणि त्या व्यवसायांत मागणीच्या मानानें पुरवठा कमी राहून श्रमाचें मोल वाढतें. जे स्वतंत्र व्यवसाय मानाचे म्हणून समजले जातात त्यांच्यांत सामान्यतः अशी स्थिति असते. किंवा असेंहि म्हटलें तरी चालेल कीं, समानसंधीच्या अभावामुळें कांहीं विशिष्ट व्यव-सायांतील व उद्योगधंद्यांतील प्रवेश मर्यादित राहून ते धंदे उत्पन्नदृष्ट्या चांगलेच फलदायी होतात. उलट ज्या व्यवसायांत प्रवेश करण्यास पदराला कांहींहि खार

लागत नाहीं किंवा खर्च करावा लागला तर तो अल्पच असतो अशा व्यवसायांत श्रमिकांची संख्या मोठी असते व त्यामुळें श्रमाचे मोल कमी होते. अकुशल कामाचें प्राबल्य जेथें असतें त्या व्यवसायांत सामान्यतः अशी स्थिति असते.[४]

समानसंधीच्या अभावाचें परिणाम कसें होतात हें विविध उत्पन्न प्रकारांच्या बाबतींतलीं कांहीं उदाहरणें घेऊन स्पष्ट करतां येईल. डॉक्टर किंवा इंजिनिअर ह्यांना मिळणारें उत्पन्न सामान्यतः नेहमींच अधिक असतें. तसें असण्याची अनेक कारणें असूं शकतात; पण त्या त्या धंद्याकरितां आवश्यक असलेली शारीरिक व बौद्धिक पात्रता असूनहि कित्येकांना त्या व्यवसायांत शिरण्याची संधीच मिळत नाहीं आणि म्हणून ते व्यवसाय करणाऱ्यांची संख्या मर्यादित राहते हेंच त्यांतील सर्वांत महत्त्वाचें कारण होय. त्या व्यवसायांत शिरण्याची संधि ज्यांना तो व्यवसाय हवा असतो त्या सर्वांना न मिळण्याचींहि अनेक कारणें असूं शकतात; पण त्यांतहि आर्थिक कारण सर्वांत महत्त्वाचें असतें. वरील व्यवसायांकरितां लागणारें शिक्षण खर्चिक असतें. शिक्षणावरील खर्चाच्या रूपानें एकप्रकारें भांडवल गुंतवणच करावी लागते. ती करण्याचें सामर्थ्य ज्या कुटुंबाचें मूळचें उत्पन्न मोठें असतें अशांतच असतें. साहजिकच आधींच जे श्रीमान् असतात त्यांनाच अशा व्यवसायांत प्रवेश मिळविणें सुकर होतें व त्यांची मूळची श्रीमंती अधिकच वाढते.

समानसंधीचा अभाव मालमत्तेपासून मिळणाऱ्या उत्पन्नांच्या बाबतींतहि जाणवतो. ज्या उद्योगधंद्यांत मक्तेदारी असते त्यांत कितीहि नफा मिळाला तरी इतरांना प्रवेश बंदच असतो. अपूर्ण स्पर्धा असलेल्या उद्योगधंद्यांत प्रवेशबंदी नसते हें खरें; पण ज्या उत्पादकांनीं आधींच आपलें बस्तान नीट बसविलेलें असते त्यांच्याशीं नव्यानें स्पर्धा सुरू करणें चांगलेंच कठीण असतें. मक्तेदारी किंवा अपूर्ण स्पर्धा टिकून रहाण्याची सुद्धां बरींच कारणें असतात; पण त्या सर्व कारणांतहि

[४] All workers are not free, at the beginning of their working lives to choose any occupations. In order to enter certain occupations, a long and expensive training is necessary which is beyond the means of the majority of the workers—These occupations are partially barricaded by high costs of entry, and according as the costs of entry are relatively large the number of workers able to enter the occupation in question is relatively small and the value of the work performed is relatively high. This is the case in most of the professions. It also follows that there is a great concentration of workers in occupations where the costs of entry are very small or non-existent and that the value of work performed in these occupations is relatively very low. This is the case with what are commonly known as unskilled occupations—**Dobb.**

आर्थिक कारणच सर्वांत परिणामकारक असतें हें आग्रहानें सांगितलें पाहिजे. अलीकडे बहुतेक सर्व उद्योगधंद्यांत पर्याप्त उत्पादनप्रमाण मोठें झालें असल्यानें व उत्पादनतंत्र भांडवलप्रधान झालें असल्यानें सुरुवातीसच फार मोठ्या प्रमाणावर भांडवल-गुंतवण करावी लागते. ती करण्याची कुवत थोड्यांतच असल्यानें उद्योग-धंद्यांतील प्रवेश मर्यादित होतो. सुरुवातीस करावी लागणारी भांडवल-गुंतवण जेवढी मोठी तेवढें एखाद्या उद्योगधंद्यांत प्रवेश करणें अधिक कठिण असतें आणि त्यामुळें त्या धंद्यांतील नफ्याचें प्रमाण मोठें असण्यास मदत होते. समानसंधीचा अभाव ज्या उत्पादनसाधनांचा पुरवठा निसर्गतःच मर्यादित असतो त्यांच्या बाब-तींत सर्वांत अधिक जाणवतो. त्या उत्पादनांवरील मालकीहक्क ज्यांच्याकडे असतात त्यांना त्यापासून कितीहि उत्पन्न मिळालें तरी तें कमी करण्यास समर्थ असणारे प्रवाह अर्थव्यवस्थेंत नसतात. उत्तम प्रतीची कसदार जमीन हें अशा प्रकारच्या उत्पादनसाधनाचें उत्कृष्ट उदाहरण होय. शहरांतील मोक्याच्या जागांच्या बाबतींतहि असाच प्रकार असतो.

समानसंधीच्या अभावाचा एक परिणाम सांगण्याजोगा आहे. समानसंधीच्या अभावामुळें उत्पन्नवाढ व्हावी ह्या हेतूनें वर्गांतर करणेंहि कठिण, जवळजवळ अशक्यच होतें. उदाहरणार्थ, ज्यांना मुख्यतः श्रम करण्यापासून उत्पन्न मिळत असतें त्यांना मालमत्ता मिळवून आपलें उत्पन्न वाढविण्याची कितीहि इच्छा असली तरी अशी संधि त्यांना सहजासहजीं मिळूं शकत नाहीं. कारण त्यांचें मूळचें उत्पन्न दनंदिन गरजा भागविण्याइतपतच जेमतेम असतें. त्यामुळें त्यांना शिल्लक टाकून भांडवल जमवावें म्हटलें तरी तें शक्य होत नाहीं. ह्या कारणामुळें साहजिकच श्रमापासून मिळणारें उत्पन्न व भांडवलापासून मिळणारें उत्पन्न ह्यांतील फरक टिकून राहतो.

समानसंधीच्या अभावासंबंधीच्या ह्या विवेचनाचा सारांश असा सांगतां येईल कीं, मुख्यतः आर्थिक विषमतेमुळें आपलें उत्पन्न वाढविण्याची संधि सर्वांना सारख्या प्रमाणांत उपलब्ध होत नाहीं आणि त्यामुळें ज्यांचें उत्पन्न आधींच अधिक आहे त्यांच्याकडेच संपत्तीचा ओघ वेगानें वाहत असतो आणि म्हणून श्रीमंत अधिक श्रीमंत व गरीब अधिक गरीब होण्याची प्रक्रिया अनियोजित अर्थव्यवस्थेंत सतत चालू रहाण्याची व त्यामुळें मूळच्या आर्थिक विषमतेंत भर पडत जाण्याची शक्यता नेहमींच असते.

वैयक्तिक गुणवत्तेंतील फरक :—सर्वांना समानसंधि दिल्यास आर्थिक विषम-तेचें संपूर्णपणें उच्चाटन होईल असा वरील विवेचनावरून कोणी ग्रह करून घेतल्यास तो चूक ठरेल. व्यक्तिगत उत्पादनांत जी विषमता आढळते ती कांहीं अंशीं तरी सर्व व्यक्ति गुणवत्तेनें किंवा पात्रतेनें सारख्या नसतात, ह्यांतून उद्भवते ह्यांत शंका नाहीं. डॉक्टरीच्या व्यवसायांत इतर व्यवसायांच्या मानानें उत्पन्नमान अधिक

असतें. ह्याचा खुलासा समानसंधीच्या अभावाकडे बोट दाखवून कांहीं प्रमाणांत करतां येईल. पण कांहीं प्रमाणांत त्या व्यवसायासाठीं लागणारी शारीरिक, बौद्धिक व मानसिक पात्रता कमी लोकांत आढळते आणि म्हणून तो व्यवसाय करणाराची संख्या कमी राहते हेंहि मान्य करावयास हवें. ज्या व्यवसायासाठीं विशेष प्रकारची पात्रता किंवा गुणवत्ता लागते तो व्यवसाय करणारांची संख्या मर्यादित राहणें व ते व्यवसाय करणारांना इतरांपेक्षां अधिक उत्पन्न मिळणें साहजिकच आहे. कुशल कामगार व अकुशल कामगार ह्यांच्या उत्पादनांत कांहीं झालें तरी फरक हा राहणारच.[5] शिवाय उत्पन्नांतील फरक हा सर्वस्वीं विशिष्ट प्रकारचें काम करणाऱ्यांच्या बाबतींतली मागणी पुरवठ्याची परिस्थिति कशी असते ह्यावर अवलंबून नसते. कामाकामांच्या तौलनिक महत्त्वांतहि फरक असतो, आणि त्यामुळेंहि निरनिराळीं कामें करणाऱ्यांच्या उत्पन्नांत फरक असणें साहजिक असतें. कांहीं कामें जबावदारीचीं असतात. तीं कामें करणारे अधिक वेतनाची अपेक्षा करतात आणि तें त्यांना द्यावेंहि लागतें. एखाद्या उद्योगसंस्थेच्या व्यवस्थापकाला जेवढा पगार दिला जातो तेवढाच तेथील शिपायाला मिळावा, असें म्हणणें कधींच रास्त ठरणार नाहीं. प्रत्यक्षांत तसें कधीं झाल्याचें आढळणारहि नाहीं. कांहीं कामें जबाबदारीचीं असतात; तर कांहीं कामांत धोका बराच असतो. तो धोका पत्करून तीं कामें करणाऱ्यांना अधिक वेतन देणें भागच असतें. साध्या कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारापेक्षां खाणींत काम करणाऱ्यांना अधिक वेतन मिळण्याचें हेंच कारण असतें. वैमानिक, सैनिक ह्यांना अधिक पगार दिला जातो तो ह्याच कारणासाठीं.[6]

एकाच प्रकारचें, एकाच दर्जाचें काम करणाऱ्या सर्वांना सारखें उत्पन्न मिळत नाहीं. ह्याचें कारणहि वैयक्तिक पात्रतेंत जो फरक असतो त्यांतच शोधावें लागतें. डॉक्टरांच्या व्यवसायाचा उल्लेख ह्या प्रकरणांत बऱ्याच वेळां केला आहे. आणि त्या व्यवसायांतील सर्वसाधारण उत्पन्नमान अधिक कां असतें ह्याचा खुलासा केला आहे. त्या व्यवसायांतील सर्वांचें उत्पन्न सारखें असतें असें मुळींच नाहीं. डॉक्टर-डॉक्टरांच्या उत्पन्नांत जो फरक असतो त्याचा खुलासा मुख्यतः सर्व डॉक्टरांची व्यवसाय-विशिष्ट पात्रता सारखी नसते ह्यांतच आढळतो. त्या व्यवसायासाठीं लागणारे गुण ज्यांच्यांत प्रकर्षानें वास करीत असतात त्यांना साहजिकच इतरांच्या मानानें पुष्कळच अधिक उत्पन्न मिळतें. इतर व्यवसायांतहि सामान्यपणें हीच परिस्थिति असते. ठराविक चाकोरीचें काम करणाऱ्यांमध्येंहि ज्यांच्यांत तडफ असते त्यांना लौकर बढतीचा योग येण्याचा संभव असतो.

---

[5] Inequalities in the earnings of labour may be caused by differences in the innate skill required in different occupations

—Meade

[6] Wages paid in different occupations may remain permanently different because of the work in certain occupations is relatively more unpleasant or risky than in others.

व्यक्ती-व्यक्तींच्या गुणवत्तेंत जो फरक असतो तो कांहीं प्रमाणांत नफा ह्या उत्पन्न-प्रकारांत फरक दिसून येण्यास जबाबदार असतो. उत्पादनाची जबाबदारी घेणाऱ्या सर्वांना सारखाच नफा मिळत नाहीं. जे उत्पादक विशेष तडफदार असतात, नाविन्यपूर्ण योजना आंखण्यांत व पार पाडण्यांत जे विशेष वाकबगार असतात, कोणत्याहि प्रकारचा धोका पत्करण्यास जे डगमगत नाहींत त्यांना अधिक प्रमाणांत नफा मिळतो हें आर्थिक व्यवहारांत नेहमींच दिसून येतें.

आर्थिक विषमतेच्या कारणांचा तौलनिक विचार :—राष्ट्रीय उत्पन्नाच्या विभाजनांत जो विषमता आढळते तिचीं कारणें तीन असतात. तीं अशीं : (१) खाजगी मालमत्तेच्या संस्थेमुळें प्रत्येकाच्या मालकीचीं उत्पादन-साधनें संख्यादृष्टया व महत्त्व-दृष्टया सारखी नसतात. (२) आधींच अस्तित्वांत असलेल्या आर्थिक विषमतेमुळें सर्वांना समानसंधि मिळत नाहीं आणि (३) सर्वांची पात्रतासारखी नसते व त्यांच्या कामाचें महत्त्वहि सारखें नसतें. ह्या तीन कारणांपैकीं उत्पादनाच्या **वस्तुरूप साधनांवरील खाजगी-मालकी** (व विशेषतः वारसाहक्कानें एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाणारी खाजगी मालकी) **हेंच कारण सर्वांत अधिक महत्त्वाचें** असतें ह्यांत बिलकुल शंका नाहीं.[७] समानसंधीचा अभाव खाजगी मालमत्तेंतून निर्माण होणाऱ्या आर्थिक विषमतेंतूनच उद्भवतो म्हणून तें कारण तुलनेनें कमी महत्त्वाचें ठरतें. सारांश, खाजगी मालमत्तेमुळें प्रत्यक्ष मालमत्तेपासून मिळणारें उत्पन्न तर विषम होतेंच; पण समानसंधीचा अभाव निर्माण करून श्रमांपासून मिळणारें उत्पन्न विषम होण्यास मालमत्ता अप्रत्यक्षपणें कारणीभूत होते.[८] सर्वांची पात्रता व योग्यता सारखी नसते, हें तिसरें कारण स्वतंत्र आहे हें मान्य केलें पाहिजे; पण तरीहि तुलनेंत त्या कारणाचें महत्त्व कमी ठरेल. पात्रता व योग्यतेंतील फरक हेंच जर आर्थिक विषमतेचें कारण असतें तर किमान व कमाल उत्पन्न ह्यांच्यांत आज आढळते तेवढी तफावत दिसली नसती. विभाजनांतील विषमतेची जबाबदारी बहुतांशानें वारसा हक्कानें जाणाऱ्या खाजगी मालमत्तेवरच पडते हें निर्विवाद होय.

प्रमुख संदर्भग्रंथ

(1) Meade—Economic Analysis and Policy.
(2) Dobb—Inequality of Incomes.

---

[७] The institution of inheritance promotes social stratification through its indirect effects, not less than through its direct —Taussig.

[८] Private property directly contributes to inequality in as much as some persons own much larger amounts of property than others and indirectly because the effects of inherited property in maintaining the inequality of income from work are also great, since the children of those who own property inherit better economic opportunity, of health, education and comfort. Private property, combined with the system of inheritance is undoubtedly the most important cause of economic inequality in modern times.

राष्ट्रीय उत्पन्नाचे निर्माते व भागीदार

लोकसंख्येच्या प्रश्नाचें महत्त्व :—लोकसंख्येच्या प्रश्नाला अर्थशास्त्रांत दोन दृष्टींनीं महत्त्व आहे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या निर्मितीला लोकसंख्या प्रत्यक्षपणें (मनुष्यबळाचा पुरवठा करून) व अप्रत्यक्षपणें (उत्पादनासाठीं मागणी निर्माण करून) जबाबदार असते; म्हणून देशांत लोकसंख्या किती ह्या प्रश्नाला महत्त्व प्राप्त होतें; ही झाली एक दृष्टि. दुसरी दृष्टि अशी कीं, राष्ट्रीय उत्पन्नाची विभागणी शेवटीं लोकांत होत असल्यानें सरासरीनें किती उत्पन्न दरमाणशीं उपलब्ध होतें, हें लोकांच्या संख्येवर अवलंबून असणें साहजिक आहे. **दर माणशीं राष्ट्रीय उत्पन्न** (National Income per head) हें राष्ट्रीय उत्पन्नाच्या हिशेबांत कोणत्याहि राष्ट्राची आर्थिक स्थिति अजमावण्याचें साधन मानलें जातें. देशोदेशांच्या आर्थिक स्थितीची तुलना करण्यासाठीं, तसेंच एकाच देशाच्या भिन्नभिन्न काळांतील आर्थिक स्थितीची तुलना करण्यासाठीं हेंच साधन वापरलें जातें.

उत्पादन व लोकसंख्या ह्यांचा संबंध :—एकंदर उत्पादन व एकंदर लोकसंख्या ह्यांच्या परस्परसंबंधाविषयीं कांहीं निश्चित अनुमान करतां येणें शक्य आहे काय, किंबहुना त्यांच्यांत कांहीं परस्पर संबंध आहेत काय, हा प्रश्न अर्थशास्त्रांत चर्चिला गेला आहे. ह्या प्रश्नाची एवढी चर्चा होण्यास माल्थसचा लोकसंख्या सिद्धान्त कारणीभूत झाला. माल्थसनें असें ठामपणें सांगितलें कीं, धान्योत्पादनांत ज्या प्रमाणांत वाढ होते त्यापेक्षां लोकसंख्येंतील वाढीचें प्रमाण कितीतरी पटींनीं अधिक असतें.[1] अन्नाची गरज भागल्याशिवाय जीवन अशक्य असल्यामुळें धान्योत्पादन करण्यास मनुष्य प्रवृत्त होतो आणि लैंगिक आकर्षणाच्या प्रभावामुळें त्याच्याकडून प्रजोत्पादन होतें. पण प्रजोत्पादनाची मनुष्याची शक्ति धान्योत्पादनाच्या शक्तीपेक्षां खूपच अधिक असल्यानें धान्योत्पादन हें गणितश्रेणीनें तर प्रजोत्पादन हें भूमितिश्रेणीनें वाढत असतें.[2]

धान्योत्पादनांत ज्या गतीनें वाढ होते त्यापेक्षां अधिक प्रमाणांत वाढण्याची प्रवृत्ति लोकसंख्येंत असल्यामुळें अन्नाचा तुटवडा अखेरीस लोकसंख्येच्या वाढीला आळा घालतो. अन्नाच्या तुटवड्यामुळें लढाया, दुष्काळ, रोगराई इत्यादि गोष्टींचा प्रादुर्भाव होऊन नैसर्गिक संहार होतो व वाढलेली लोकसंख्या कमी होऊन

[1] The power of population is indefinitely greater than the power in the earth to produce subsistence for man.

[2] Food is necessary for the existence of man—Passion between sthe sexes is necessary and will remain nearly in its present tate—Population, when unchecked increases in a geometrical ratio. A slight acquaintance with the figures will show the immensity of the first power in comparison with the second.—**Malthus**

धान्योत्पादन व प्रजोत्पादन ह्यांचा समन्वय होतो. पण प्रजोत्पादनाच्या जोरदार प्रवृत्तीमुळें पुन:पुन्हा ह्या घटनांची पुनरावृत्ति होते.[३] शेतीच्या उत्पादनतंत्रांत कांहीं प्रगति झाल्यास धान्योत्पादन प्रजोत्पादनाच्या मानानें कमी होण्याचा प्रसंग व त्यांतून उद्‌भवणाऱ्या अनिष्ट घटना कांहीं काळ लांबणीवर पडतात. पण असें होऊं शकतें ह्यांत समाधानाला जागा नाहीं. कारण एक तर शेतींतील सुधारणांमुळें अनिष्ट घटना केवळ लांबणीवर पडतात, टळत नाहींत; आणि दुसरें म्हणजे शेती-सुधारणामुळें तात्पुरती जी सुस्थिति येते त्यामुळें प्रजोत्पादनाची गति वाढण्यासच मदत होते आणि भविष्यकाळांत लोकसंख्येचा प्रश्न अधिकच बिकट होतो.[४]

वरील परिस्थितीवर माल्थसच्या मतें एकच उपाय आहे आणि तो म्हणजे नैतिक संयम (Moral restraint).[५] पण हा उपाय अंमलांत आणणें कठिण ! बहुसंख्य सामान्य जनांच्या दृष्टीनें तर तो जवळ जवळ अशक्यच. त्यामुळें हा उपाय परिणामकारकरीत्या अंमलांत आणला जाईल असा निर्वाळा देतां येणार नाहीं. असें असल्यामुळें लोकसंख्येचा प्रश्न हा सतत काळजीचा प्रश्न राहणें अपरिहार्य आहे. सारांश, माल्थसच्या मतें धान्योपादनांतील वाढीपेक्षां लोकसंख्येंतील वाढ अधिक असणें हा नियम व तसें नसणें हा अल्पकाळापुरताच कधीं कधीं दिसून येणारा हा अपवाद होय.[६]

माल्थसच्या सिद्धान्ताचा सारांश :—माल्थसच्या सिद्धान्ताचा त्याच्याच शब्दांत सारांश सांगावयाचा झाल्यास असें म्हणतां येईल कीं, (१) चरितार्थ-साधनांच्या मर्यादांमुळें लोकसंख्येची वाढ अपरिहार्यपणें थोपविली जाते. (२) लोकसंख्येंतील वाढीला प्रभावी उपायांनीं अटकाव न केल्यास चरितार्थ-साधनें वाढली कीं, लोकसंख्या वाढते असा नियम आहे. (३) वेगानें वाढत जाण्याची लोकसंख्येची प्रवृत्ति

[३] There must be 'a strong and constantly operating check on population from the difficulty of subsistence.

[४] Malthus conceded that there was a possibility of 'fresh starts' in agriculture, that is of technical progress. But he held that if this possibility was realized the day of reckoning was merely postponed, and perhaps aggrevated in its effects, since each fresh start would, other things being equal, give rise to an even greater population—**Bowen.**

[५] 'Of the preventive checks the restraint from marriage which is not followed by irregular gratification may properly be termed moral restraint.

[६] "There are few States in which there is not a constant effort in the population to increase beyond the means of subsistance" which "tends to subject the lower classes of society to distress and to prevent any great permanent melioration of their condition"—**Malthus.**

थोपवून धरून चरितार्थसाधनांच्या लक्ष्मणरेषेवर लोकसंख्येला राखणाऱ्या गोष्टींचें नैतिक संयम, अनीति व हलाखी असें वर्गीकरण करतां येतें.[७]

माल्थसच्या सिद्धान्तांतील कच्चे दुवे :—माल्थसच्या सिद्धान्तांत अनेक कच्चे दुवे असल्याचें सिद्ध झालें आहे. आज जगांत जे देश प्रगत म्हणून ओळखले जातात त्या देशांपुरता तरी माल्थसचा सिद्धान्त खोटा ठरला आहे. माल्थसची भविष्यवाणी खोटी ठरविण्यास त्या देशांत दोन गोष्टी प्रामुख्यानें कारणीभूत झाल्या. त्यांतील पहिली गोष्ट ही कीं, सतत होत गेलेल्या शास्त्रीय प्रगतीमुळें उत्पादनशक्ति वाढत गेली व त्याबरोबरीनें भांडवलवृद्धि होऊन लोकसंख्येंतील वाढीवर उत्पादनवाढीला मात करतां आली. दुसरी गोष्ट अशी कीं, कांहीं काळानंतर संततिनियमनामुळें लोकसंख्येंतील वाढहि आटोक्यांत आली.[८]

वरील कारणामुळें पाश्चिमात्य देशांत लोकसंख्येंतील वाढ भूमिति श्रेणीनें न होतां S ह्या आकाराच्या कमानीबरहुकूम होत गेल्याचें दिसून आलें. म्हणजे त्या देशांत राहाणीचें मान जेव्हां अगदीं कमी होतें तेव्हां लोकसंख्येंतील वाढीचें प्रमाण कमी होतें. नंतर कांहीं काळपर्यंत जननप्रमाण कमी न होतां मृत्युप्रमाण कमी झाल्यामुळें लोकसंख्या वेगानें वाढली; पण उत्पादनवाढ त्याहीपेक्षां अधिक प्रमाणांत होत गेल्यामुळें त्या देशांची आर्थिक स्थिति सुधारलीच. आतां ते देश तिसऱ्या अवस्थेंत असून जननप्रमाण कमी होत असल्यामुळें लोकसंख्या स्थिर राहाण्याची प्रवृत्ति दिसून येत आहे.[९]

---

[७] Population invariably increases where the means of subsistence increase, unless prevented by some powerful and obvious checks. These checks, and the checks which repress the superior powers of population, and keep its effects on a level with the means of subsistence are all resolvable into moral restraint, vice and misery.

[८] The falsification of Malthus's anticipations of the future in respect of western societies resulted, firstly from innovations and increased capital formation which enabled productive power to grow more rapidly than population and secondly from a widespread use of contraceptives.

[९] Populations in western Europe displayed the logistic S–shaped curve of growth a slow rate of increase at low consumption levels, being followed by a decline in mortality, (of which improved health measures as well as improved economic conditions were on important cause) unaccompanied by a corresponding decline in fertility, but with such as increase in productive power as exceeded the rapid increase in population and eventually by such a decline in population as caused the rate of increase in population to flatten out—**Belshaw**

पुरावा :—वरील विवेचनाचा पुरावा माल्थसच्या स्वतःच्या देशांतीलच म्हणजे इंग्लंड व वेल्स ह्या देशांतील लोकसंख्येच्या आंकडेवारींत मिळतो. १७५० पर्यंत इंग्लंड मध्यें जननप्रमाण व मृत्युप्रमाण दरहजारीं सुमारें ३५ होतें. त्यामुळें लोकसंख्येची वाढ अल्प होती. माल्थसच्या सिद्धान्ताला बळकटी आणणारी अशीच ही परिस्थिति होती. १७५० नंतर इंग्लंडमध्यें औद्योगिक क्रान्तीचीं चक्रें वेगानें फिरूं लागली व त्याचा पहिला दृश्य परिणाम मृत्युप्रमाण कमी होण्यांत झाला. जननप्रमाण पूर्वी-एवढेंच राहिलें. सुमारें १८८० पर्यंत इंग्लंडमध्यें जननप्रमाण हजारीं ३५ व मृत्यु-प्रमाण सुमारें २२ व लोकसंख्या वाढण्याचें प्रमाण हजारीं सुमारें १३ होतें. १८८० नंतर जननप्रमाण अचानकपणें कमी होऊं लागलें. १९३० मध्यें जननप्रमाण हजारीं सुमारें १६ व मृत्युप्रमाण हजारीं सुमारें १२ होतें. लोकसंख्येंतील वाढ पुनः मंदावली; पण ह्या वेळीं मुख्यतः जननप्रमाण कमी झाल्यामुळें ती मंदावली, हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. असाच अनुभव इतर पाश्चिमात्य देशांत आला आहे.[१०] हा अनुभव माल्थसचा सिद्धान्त साफ खोटा ठरविणारा आहे हें स्पष्टच आहे.

माल्थसच्या सिद्धान्तांतील कच्चेपणा :—माल्थसचा सिद्धान्त खोटा ठरला ह्यांत नवल वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. माल्थसच्या सिद्धान्ताचा पायाच कच्चा आहे. अन्नाची गरज व लैंगिक सुखाची गरज ह्या मानवी जीवनांतील दोन अत्यन्त मूलभूत गरजा आहेत, हें त्याचें म्हणणें मान्य करावयासच हवें; पण अन्नोत्पादना-पेक्षां प्रजोत्पादन अधिक वेगानें होतें, ह्या त्याच्या म्हणण्याला आधार काय? स्वयंसिद्ध अशी ही गोष्ट आहे, असें कोणत्याच अर्थानें म्हणतां यावयाचें नाहीं. शेवटीं अनुभवाचाच आधार घेऊन लोकसंख्येबाबत विवेचन केलें पाहिजे, हें स्वतः माल्थसनेंच एका ठिकाणीं मान्य केलें आहे.[११] अनुभवाचा आधार माल्थसच्या उलट गेला आहे हें स्पष्टच आहे. खरें म्हटलें म्हणजे नैतिक संयमानें लोकसंख्येंतील वाढ थोपवितां येते किंवा शेतींतील सुधारणांमुळें ती जाणवत नाहीं, असें जेव्हां माल्थसनें स्वतःच मान्य केलें तेव्हां त्याच्या सिद्धान्ताचा पायाच डळमळीत झाला.[१२] शेतींत सतत सुधारणा होत रहाणार नाहींत किंवा लोकसंख्या वाढूं नये म्हणून लोक आपण होऊन उपाययोजना करणार नाहींत, असें म्हणण्यांत केवळ मोघम अनुमान

[१०] Trends generally similar to those in England and Wales have been followed throughout the West. In Western Europe, the cycle has brought about a sixfold growth of population in the past three centuries, while the scientific revolutions have made possible a comparable rise in standards of living. The U. S. A. Canada, and Australia empty two hundrd years ago have had the same experience of growth in population and material wealth. —**Areport by P. E. P.**

[११] In an endeavour to determine the natural power of mankind to increase, we have no other guide than past experience.

आहे. त्याला शास्त्रीय आधार कांहींच नाहीं. मनुष्य हा बुद्धिमान प्राणी आहे, असें गृहीत धरून अनुमान करावयाचें झाल्यास आपल्या बुद्धीचा उपयोग आपलें जीवित निश्चित करण्यासाठींच मनुष्य करील, असें म्हणणेंच तर्कशास्त्राच्या नियमांना अधिक धरून होईल. असें असल्यास प्रजोत्पादन कमी करण्याची व अन्नोत्पादन वाढविण्याची पराकाष्ठा करण्याची प्रवृत्ति मनुष्यांत दिसून येईल असाच सिद्धान्त मांडावा लागेल. सांगण्याचा मुद्दा एवढाच कीं, कांहींतरी गृहीत धरून कोणताहि सिद्धान्त मांडतां येतो; पण शेवटीं तो सिद्धान्त चुकीचा कीं बरोबर हें ठरवितांना गृहीत धरलेल्या गोष्टी वस्तुस्थितीच्या निकषावर घांसून पहाव्या लागतात. तसें करावयाचें ठरविल्यास माल्थसचा सिद्धान्त टिकणार नाहीं. कारण त्या सिद्धान्ताचें समर्थन करण्यासाठीं (१) उत्पादनकलेंत सतत सुधारणा होत राहणें अशक्य आहे. (म्हणजेच शास्त्रीय प्रगतीला सुद्धां अन्त आहे) व (२) मनुष्य हा नेहमींच नैसर्गिक प्रवृत्तीच्या संपूर्णपणें आहारीं जाणारा व तसें करण्याच्या परिणामाकडे दुर्लक्ष करणारा असतो—म्हणजेच तो आपल्या बुद्धीचा वापर करणार नाहीं— ह्या दोन गोष्टी गृहीत धराव्या लागतात. ह्या दोन गोष्टी गृहीत धरण्यास कांहींएक आधार नाहीं. हें सहज समजण्याजोगें आहे. उत्पादनतंत्रांत सुधारणा होऊं शकतात व मनांत आणल्यास मनुष्य नैतिक संयम पाळूं शकतो ह्या माल्थसनें मान्य केलेल्या गोष्टींच्याच आधारें विवेचन केल्यास देखील माल्थसचा सिद्धान्त फोल कसा ठरतो हें आपोआप लक्षांत येतें.

पर्याप्त लोकसंख्येची कल्पना:—माल्थसचा लोकसंख्येचा सिद्धान्त खोटा ठरल्यामुळें एक गोष्ट चांगलीच सिद्ध झाली. ती ही कीं, लोकसंख्येबाबत स्थलकालाबाधित असा सिद्धान्त मांडतां येणार नाहीं. माल्थसनें स्वतःच एका ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें कोणत्याहि समाजांतील चालीरीति, समाजनियामक संस्था, कायदेकानु ह्यांचा प्रजोत्पादनावर परिणाम होत असतो. ह्या गोष्टी अतिशय गतिमान असल्यानें त्यांचें विशिष्ट स्वरूप गृहीत धरून लोकसंख्येबाबत फार दूरवरचें भविष्य वर्तविणें धाडसाचें ठरतें. लोकसंख्येसंबंधांतील वर्तमान स्थिति व कांहींसा गतानुभव लक्षांत घेऊन नजिकच्या भविष्यकाळांत कोणत्या प्रवृत्ति दिसून येतील एवढेंच जास्तींत जास्त सांगतां येते.[१३]

लोकसंख्येच्या वर्तमानस्थितीचा विचार करतांना पर्याप्त लोकसंख्येची कल्पना अर्थशास्त्रांत वापरली जाते. **पर्याप्त लोकसंख्या** (Optimum Population) ही कल्पना कॅनन ह्या अर्थशास्त्रज्ञानें प्रथम मांडली. **कोणत्याहि वेळची उपलब्ध नैसर्गिक**

[१२] Once it is admitted that 'fresh starts' in Agriculture are capable of postponing the evil effects of growing population and also that moral restraint can act as a check. "The essay on the principle of population falls to the ground as an argument, and remains only a choice of facts collected to illustrate the effects of laws which do not exist.—**Bowen**

साधनसामग्री व भांडवल आणि उत्पादनतंत्र लक्षांत घेतां ज्या लोकसंख्येमुळें दर माणशीं उत्पादन जास्तींत जास्त होतें ती लोकसंख्या पर्याप्त होय. त्या मर्यादेपलीकडे लोकसंख्या वाढल्यास एकंदर उत्पादन वाढूनहि दरमाणशीं उत्पादन कमी झाल्यामुळें सरास री राहणीमान कमी होतें. आणि **अतिलोकसंख्येची परिस्थिति** उद्भवते.[१४]

अतिलोकसंख्येच्या परिस्थितींत भांडवल व नैसर्गिक साधनसामग्री ह्या उत्पादनघटकांच्या मानानें मनुष्यबळ अप्रमाण असतें. निसर्गनिर्मित व मानवनिर्मित उत्पादनसाधनांवर मनुष्यबळ ह्या उत्पादनसाधनाचा ताण पडून अर्थव्यवस्थेची एकंदर कार्यक्षमता कमी होते. अतिलोकसंख्येची ही कल्पना उत्पादनफलसिद्धान्तावर अधिष्ठित आहे, हें जाणकारांच्या सहज लक्षांत येईल. उत्पादनफलसिद्धान्तानुसार कोणत्याहि घटकांचें प्रमाण व उत्पादनतंत्र ह्या गोष्टींत कांहींहि बदल न झाला तर कांहीं काळपर्यंत दरमाणशीं उत्पादन वाढतें; पण ही प्रवृत्ति अपरिहार्यपणें कधींतरी संपुष्टांत येऊन दरमाणशीं उत्पादन कमी होऊं लागतें. जोंपर्यंत उत्पादनावर वाढत्या फळाच्या प्रवृत्तीचा अंमल असतो तोंपर्यंत मनुष्यबळांत म्हणजे एकंदर लोकसंख्येंत वाढ होणें हितकर असतें; पण मनुष्यबळ वाढत वाढत जाऊन घटत्या फळाची प्रवृत्ति उत्पादनांत दिसूं लागण्यास कारणीभूत होऊं लागलें कीं, त्यानंतर लोकसंख्येंत वाढ होणें अहितकर ठरतें. वाढत्या फळाची प्रवृत्ति जेथें संपुष्टांत येते व घटत्या फळाच्या प्रवृत्तीस जेथून सुरुवात होते त्या लोकसंख्येलाच पर्याप्त लोकसंख्या म्हणतात. त्यापेक्षां लोकसंख्या कमी असणें ही **अल्पलोकसंख्येची परिस्थिति** (Under-population) होय. अल्पलोकसंख्या असतां मनुष्यबळ वाढवून अर्थव्यवस्थेची उत्पादनक्षमता व दरमाणशीं उत्पादन वाढविण्यास वाव असतो. पर्याप्त लोकसंख्येपलीकडे गेलें असतां जी परिस्थिति उद्भवते तिलाच वर अतिलोकसंख्येची परिस्थिति म्हटलें आहे.[१५]

---

१३ At the level of optimum population, income per head is at its maximum for the assumed amount of land and capital and at the assumed level of technical development. Thereafter a further increase in population means lower income per head. Even though total production may increase, the standard of living falls. The country becomes overpopulated.

१४ Over population is a State of society in which there are too many people for economic efficiency, in other words too many for the society to live at the highest level that is possible with existing land and capital, and existing technical skill. It follows that, other things being equal, further rise in population will depress living standards still more. The definition is based on the economic laws of increasing and decreasing returns.

अतिलोकसंख्येची परिस्थिति अनिष्ट असते आणि अल्पलोकसंख्येची परिस्थिति सुद्धां अनिष्ट असते, हा विचार पर्याप्त लोकसंख्येच्या कल्पनेंत अभिप्रेत आहे आणि ही गोष्ट खरीच आहे. मात्र ह्या ठिकाणीं एवढें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, अति-लोकसंख्येची परिस्थिति ज्या कारणाकरितां अनिष्ट असते त्यापेक्षां अगदीं वेगळ्या कारणाकरितां अल्पलोकसंख्येची परिस्थिति अनिष्ट असते.[१६] अल्पलोकसंख्येच्या परिस्थितींत एकतर समाजाला मनुष्यबळाचा तुटवडा भासतो आणि त्यामुळें श्रम-विभागणी व त्यायोगें उत्पादनक्षमतेंत वाढ इत्यादिसारख्या गोष्टींना वाव राहात नाहीं आणि शिवाय उत्पादिलेल्या वस्तूंना पुरेशी बाजारपेठ मिळूं शकत नाहीं. लोकसंख्येंत वाढ न होतां लोकसंख्या कमीच होऊं लागली तर बाजारपेठेचा जो नैसर्गिक विस्तार होणें आवश्यक असतें तो होत नाहीं. अल्पलोकसंख्या असतां मनुष्यबळांत बचत करणारे यांत्रिक शोध लागण्यास मात्र मदत होते व त्यामुळें उत्पादनतंत्रच बदलण्याची शक्यता असते. अतिलोकसंख्येची परिस्थिति अनिष्ट असते, ह्याचें मुख्य कारण एकंदर मनुष्यबळाच्या उत्पादनक्षमतेवरच त्यामुळें प्रतिकूल परिणाम होतो.

पर्याप्त लोकसंख्येची कल्पना व्यवहारांत वापरणें कठिण :—पर्याप्त लोक-संख्येची कल्पना तात्त्विक विवेचनांत उपयुक्त असली तरी व्यवहारांत ती वापरणें अडचणीचें असतें. ती वापरण्यांतली मुख्य अडचण अशी कीं, गतिमान अर्थव्यवस्थेंत पर्याप्त लोकसंख्याहि स्थिर नसते. उत्पादनतंत्र स्थिर आहे, असें गृहीत धरूनच पर्याप्त लोकसंख्येची कल्पना मांडावी लागते; पण गतिमान अर्थव्यवस्थेंत तर उत्पादनतंत्र सतत बदलत असतें. अशा परिस्थितींत पर्याप्त लोकसंख्याहि बदलत जाईल हें उघड आहे.[१७] पर्याप्त लोकसंख्या सतत बदलत असल्यास कोणत्याहि वेळची

[१५] Optimum population is that population which produce maximum economic welfare or maximum real income per head. Over population exists when the numbers exceed the optimum, under population exists when they fall below it. In either case, real income per head would be less than it would be if optimum population pervailed.

[१६] The dangers of under population (Too small a population for economic efficiency) and of overpopulation (Too large a population) are both real dangers though they arise from different causes—**Hicks**

[१७] While a definition on the above lines appears to be generally accepted, it is a difficult concept to apply precisely to individual situations. It assumes that such factors as technical skill remain constant. In fact, they are subject to considerable change and the optimum population must, of course, change with them.

लोकसंख्या पर्याप्त आहे कीं, त्यापेक्षां कमी अथवा अधिक आहे हें ठरविणें अतिशय कठीण आहे.

लोकसंख्या विषयक मापनीय प्रवृत्तीचा अभ्यास आवश्यक :—साहजिकच पर्याप्त लोकसंख्येच्या कल्पनेच्या आधारें एखाद्या देशांत अति लोकसंख्येची परिस्थिति उद्भवली आहे व अमुक प्रमाणांत लोकसंख्या पर्याप्तापेक्षां अधिक आहे असें निश्चितपणें केव्हांहि सांगतां येत नाहीं. त्यामुळें पर्याप्त लोकसंख्येची कल्पना लोकसंख्येसंबंधींच्या चर्चेत अलीकडे फारशी वापरली जात नाहीं. त्याऐवजीं मापनीय अशा कांहीं साधनांच्या आधारें एका बाजूनें उत्पादनविषयक प्रवृत्ति व दुसऱ्या बाजूनें **लोकसंख्याविषयक प्रवृत्तींच्या** (Population Trends) वर्तमानकाळा-समीपच्या गतकाळापुरतां तौलनिक अभ्यास करून समीपच्या भविष्य काळाच्या संदर्भांत लोकसंख्येची परिस्थितिं काळजी करण्याजोगी आहे काय व असल्यास त्या काळजीचें निवारण व्हावें म्हणून अर्थव्यवस्थेंत कोणत्या स्वरूपाचे बदल होणें इष्ट आहे, तसेंच ते बदल होण्यासाठीं अनुकूल परिस्थिति कोणती, ह्या प्रश्नावरच लक्ष केन्द्रित करणें इष्ट समजलें जातें. लोकसंख्याविषयक प्रवृत्ति अजमावण्याची साधनें खात्रीलायक आहेत असा दावा करतां येणार नाहीं; पण तरीहि तीं साधनें उपयुक्त ठरतात. कारण लोकसंख्या व उत्पादन ह्यांचा समतोल जेव्हां ढोबळपणें ढासळलेला असतो तेव्हां ती परिस्थिति त्या साधनांच्या द्वारा समजण्यास फारशी अडचण पडत नाहीं.[१८]

उत्पादनवाढ व लोकसंख्यावाढ ह्यांची तुलना महत्त्वाची :—लोकसंख्येचा प्रश्न काळजीचा आहे कीं नाहीं, हें ठरविण्यासाठीं उत्पादनवाढ व लोकसंख्या-वाढ ह्यांची तुलना महत्त्वाची समजली जाते. कोणत्याहि काळांतील रहाणीमान केवळ टिकून रहाण्यासाठीं लोकसंख्येंत ज्या प्रमाणांत वाढ होते, तेवढी वाढ राष्ट्रीय उत्पन्नांत होणें अत्यावश्यक असतें. वास्तविक लोकसंख्येंतील वाढ राष्ट्रीय उत्पन्नांतील वाढीपेक्षां अधिक असावयास पाहिजे. कारण तसें असेल तरच रहाणीमान सुधारत जातें. पण तें शक्य नसल्यास निदान उत्पादनवाढ व लोकसंख्यावाढ ह्यांची बरोबरी झाली पाहिजे. लोकसंख्येंतील वाढीपेक्षां उत्पादनवाढ कमी असल्यास रहाणी-मान कमी होतें. दीर्घकाळपर्यंत लोकसंख्येंतील वाढ उत्पादनवाढीपेक्षां अधिक असल्यास उत्पादन व लोकसंख्या ह्यांच्यांतील समतोल ढासळल्याचें तें चिन्ह मानावें लागेल.[१९]

---

१८ Both the theoretical and practical value of the quest for optimum population are open to argument. From both stand points it seems much more important to concentrate study on the cruder and more readily identifiable conditions which can be measured by case studies, where maladjustment between population and economic resources is extreme, either permanently or during periods of rapid change.—P. E. P.

लोकसंख्येंतील वाढीचें मापन करण्याचीं साधनें :——लोकसंख्येंतील वाढीचें मापन करण्यासाठीं **वृद्धीचें नैसर्गिक प्रमाण** (Natural rate of increase) हें साधन वापरण्यांत येतें. हें प्रमाण जननप्रमाण व मृत्युप्रमाण ह्यांच्यांतील तफावत व्यक्त करतें. जननप्रमाण म्हणजे लोकसंख्येंतील दर हजारामागें होणारी जन्मांची संख्या. एखाद्या वर्षी होणाऱ्या एकंदर जननसंख्येला लोकसंख्या जेवढी हजार असेल त्या आंकड्यानें भागिलें असतां जननप्रमाण समजतें. ह्याच पद्धतीनें मृत्युप्रमाण काढल्यास जननप्रमाण व मृत्युप्रमाण ह्यांच्यांतील तफावत दर हजारीं लोकसंख्येंतील वाढीचें प्रमाण दर्शवितें. हें प्रमाण दर शेंकडा ह्या पद्धतीनें सुद्धां काढतां येतें. जननप्रमाण व मृत्युप्रमाण समान असल्यास लोकसंख्या स्थिर रहाते. दरसाल दर शेंकडा ज्या दरानें लोकसंख्या निसर्गत: जेवढी वाढते तेवढी वाढ तरी राष्ट्रीय उत्पन्नांत झाली पाहिजे.

प्रजोत्पादन-प्रमाण (Reproduction Rate) :—जनन-प्रमाण आणि मृत्युप्रमाण ह्याच्या तुलनेंतून निघणारे वृद्धीचें नैसर्गिक प्रमाण भावी कालासंबंधीं अंदाज करण्यास फारसें उपयोगीं पडत नाहीं. त्यांत एक मोठाच दोष आहे. तो असा कीं, अशा अंदाजांत लोकसंख्येची वयवार विभागणी व प्रजोत्पादनक्षम स्त्रियांची संख्या ह्यांची योग्य दखल घेतली जात नाहीं.[२०] हा दोष काढून टाकला जावा म्हणून अलीकडे **प्रजोत्पादनप्रमाण** हें साधन वापरलें जातें.

प्रजोत्पादनक्षम एक हजार स्त्रिया आपल्या प्रजोत्पादन-क्षम कालांत प्रजोत्पादनाची वयोमर्यादा गांठूं शकतील अशा किती मुलींना जन्म देतात, ह्यावरून प्रजोत्पादनप्रमाण ठरविलें जातें. प्रजोत्पादनप्रमाण ठरविण्यासाठीं स्त्रियांची वर्तमान प्रजोत्पादन-क्षमता, विविध वयोमर्यादेंतील मुलींची संख्या व विविध वयोमर्यादेंतील मृत्युप्रमाण ह्यांचा आधार घेतला जातो. त्यावरून आजच्या हजार मातांची जागा घेणाऱ्या भावी माता किती असतील हें सांगतां येतें. आजच्या हजार मातांची जागा घेण्यास हजार भावी माता असतील तर लोकसंख्या स्थिर राहील असा अंदाज करतां येतो. भावी मातांची संख्या वाढल्यास ती ज्या प्रमाणानें वाढेल त्या प्रमाणांत लोकसंख्या वाढण्याची गति वाढते. भावी मातांची संख्या कमी झाल्यास लोकसंख्या भावी काळांत कमी होईल असा अंदाज करतां येतो. भावी मातांच्या संख्येला

---

[१९] The existing standards of living can be maintained only if increase in National income keeps pace with the growth of population. If National income fails to keep pace with population for a fairly long period of time, it is regarded as an indication of maladjustment between population and economic resources.

[२०] Changes in birth rates and death rates ignore the age distribution and the proportions of women of child bearing age in the population.

आजच्या मातांच्या संख्येनें भागिल्यास प्रजोत्पादनप्रमाण ठरतें. उदाहरणार्थ, आजच्या हजार माता भावी हजार मातांना जन्म देत असतील तर प्रजोत्पादनप्रमाण एक असतें, भावी मातांची संख्या दोन हजार असेल तर तें दोन असतें. पांचशें असेल तर ते ·५ असतें. प्रजोत्पादनप्रमाण एकापेक्षां कमी असल्यास भावी काळांत लोक-संख्या कमी होण्याचा, एकापेक्षां अधिक असल्यास ती वाढण्याचा आणि एक असल्यास स्थिर रहाण्याचा संभव निर्माण होतो. प्रजोत्पादनप्रमाण काढण्याच्या पद्धतींत प्रजोत्पादनाच्या प्रक्रियेवर परिणाम करूं शकणाऱ्या अनेक गोष्टींचा विचार केलेला असतो. आणि त्यामुळें हें प्रमाण स्थूलमानानें बराच काळपर्यंत स्थिर राहण्याचा संभव असतो आणि त्यामुळें भावी काळासंबंधीं अंदाज बांधण्याच्या दृष्टीनें हें साधन अधिक उपयुक्त समजलें जातें. भारतांत १९४१ मध्यें प्रजोत्पादन-प्रमाण १·३० होतें. त्याच वर्षी इंग्लंडमध्यें हें ०·७५, जपानांत १·४४, अमेरिकेंत १·१९ होतें.

कर्त्या लोकसंख्येचें प्रमाण :—लोकसंख्या उत्पादनापेक्षां अधिक प्रमाणांत वाढणें हा जसा काळजीचा विषय होऊं शकतो त्याचप्रमाणें एकंदर लोकसंख्येंत कर्त्या लोकसंख्येचें प्रमाण कमी असणें हेंहि अनिष्टच होय. लोकसंख्येचा जो कर्ता भाग असतो तेवढाच राष्ट्रीय उत्पन्नाच्या निर्मितीला कारणीभूत होतो. कर्त्या लोकांवर उरलेल्या लोकांच्या पालनपोषणाची जबाबदारी पडते, आणि **कर्ती लोकसंख्या** (Working Population) लहान व एकंदर लोकसंख्या अफाट अशी परिस्थिति असली तर कर्त्या लोकसंख्येवर पडणारा भार पेलण्यास कठिण असा होतो. कर्ती लोकसंख्या म्हणजे मनुष्यबळाचा उत्पादनक्षम व उत्पादनकार्यात गुंतलेला भाग होय. कर्त्या लोकसंख्येचें एकंदर लोकसंख्येंतील प्रमाण (अ) लोकसंख्येची वयवार विभागणी (Age distribution of population) (ब) कर्तेपणाच्या वयोमर्यादेंतील स्त्रियांचें प्रमाण व (क) एकंदर रोजगार स्थितीवर अवलंबून असते.

वयवार विभागणी महत्त्वाची असते. कारण विशिष्ट वयोमर्यादेंतील लोकच मनुष्यबळाचा पुरवठा करण्यास शारीरिक दृष्ट्या समर्थ असतात. कर्तेपणाची वयो-मर्यादा जेथून सुरू होते त्या अलीकडील लोकसंख्येचा भाग उत्पादनकार्यास समर्थ झालेला नसतो. कर्तेपणाची वयोमर्यादा जेथें संपते त्या पलीकडील लोकसंख्येचा भाग शारीरिकदृष्ट्या दुर्बल झालेला असतो आणि म्हणून उत्पादनाच्या दृष्टीनें निरुपयोगी असतो. ज्या देशांत लोकसंख्या हा काळजीचा प्रश्न असतो त्या देशांत कर्ती लोक-संख्या दोन-तीन कारणांकरितां कमी असते. पहिलें कारण असें कीं, लोकसंख्या झपाट्यानें वाढत असलेल्या देशांत बालकांची संख्या तरुणांच्या किंवा वृद्धांच्या तुलनेनें बरीच मोठी असते. दुसरें कारण असें कीं, बालमृत्यु किंवा अपमृत्यूचें प्रमाण अशा देशांत मोठें असण्याचा संभव असतो. त्यामुळें बरीचशी लोकसंख्या कर्तेपणाच्या वयोमर्यादेपर्यंत पोंचतच नाहीं आणि पोंचली तरी ती वयोमर्यादा संपेपावेतों तिचें कर्तृत्व टिकत नाहीं. तिसरें कारण असें कीं, अशा देशांत वृद्धावस्था लौकर सुरू होत असल्यामुळें कर्तेपणाची वयोमर्यादा देखील संकुचित असते. आणखी एक कारण

सांगतां येईल कीं, मनुष्यबळ जरुरीपेक्षां अधिक असल्यास त्याला भरपूर काम देण्यास निसर्गनिर्मित साधनसामग्री अपुरी पडून सुप्त अथवा प्रकट, संपूर्ण अथवा अल्प बेकारी पुष्कळांच्या वांटचास येते. त्यामुळें नाईलाजानें त्यांना नाकर्तेपणा स्वीकारावा लागतो. स्त्रियांचें प्रमाण एवढचाच करतां पहावें लागतें कीं, कर्तेपणा स्वीकारणाऱ्या सर्व स्त्रिया राष्ट्रीय उत्पादनाच्या कल्पनेंत समाविष्ट झालेलें उत्पादन करीत नसतात. बऱ्याच स्त्रिया घरकामांत गुंतलेल्या असतात. हें काम राष्ट्रीय उत्पादनांत धरलें जात नाहीं. स्त्रियांनीं अर्थोत्पादक काम करणें न करणें कांहींशा आर्थिक व कांहींशा इतर कारणांवर अवलंबून असतें. गरीब देशांत कल्पनपेक्षां अधिक प्रमाणांत स्त्रिया राष्ट्रीय उत्पन्नाच्या निर्मितींत सहभागी होत असतात. पुढारलेल्या देशांतील स्त्रिया मुख्यतः समान हक्कांच्या कल्पनामुळें अर्थोत्पादक रोजगारासाठीं पुढें येत असतात. कर्तेपणाच्या वयोमर्यादेंतील काम करणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण किती असूं शकेल, हें केवळ तात्त्विक विवेचन करून सांगतां येणार नाहीं. प्रत्येक देशांतील त्या त्या वेळच्या परिस्थितीचा अभ्यास करूनच तें ठरवावें लागेल.

मानवी जीवनाचा अपव्यय :—मानवी जीवनाचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत रहाणें, हें लोकसंख्येचा प्रश्न अतिलोकसंख्येमुळें काळजीचा झाला असल्याचें तिसरें गमक आहे. प्रस्तुत संदर्भांत मानवी जीवनाचा अपव्यय ह्याचा अर्थ अपमृत्यु असा घेतला पाहिजे. अपमृत्यूमुळें मानवी जीवनाचा अपव्यय होत आहे कीं नाहीं, हें ठरविण्यासाठीं दोन प्रकारची आंकडेवारी वापरली जाते. **सरासरी अपेक्षित आयुर्मानाची** (Average expectation of life at birth) आंकडेवारी देशांत जन्मलेल्यांना आपलें कर्तृत्व दाखविण्यास दीर्घायुष्य मिळण्याचा संभव किती प्रमाणांत असतो हें दर्शविते. दुसरी आंकडेवारी बालमृत्युसंबंधाची. ह्या आंकडेवारीवरून अपव्ययाची चांगलीच कल्पना येते. जन्मलेल्या हजार बालकांपैकीं पहिल्या वर्षाच्या आंत किती मृत्युमुखीं पडतात, ह्यासंबंधीची ती आंकडेवारी असते. बालमृत्यु मोठचा प्रमाणावर होणें सर्व दृष्टींनीं अनिष्ट असतें ह्यांत शंका नाहीं. आरोग्यासंबंधीची आंकडेवारीसुद्धां मानवी जीवनाचा भरपूर उपयोग केला जात आहे कीं नाहीं, हें ठरविण्याच्या दृष्टीनें उपयुक्त असते. ज्या देशांतील लोकांचें आरोग्य वारंवार बिघडतें—म्हणजेच ज्या देशांत रोगराई बरीच असते व जीवनकालांत आजारी पडण्याचे प्रसंग लोकांवर वारंवार येण्याचा संभव असतो त्या देशांतील उत्पादनाच्या दृष्टीनें मानवी जीवनाचा एक प्रकारचा अपव्ययच होत असतो, असें म्हटलें पाहिजे. कारण आजारीपणाचा काल कर्त्या जीवनांतून वजा करावा लागतो.

कार्यक्षमता :—लोकसंख्येसंबंधीच्या अभ्यासांत संख्येचा प्रश्न महत्त्वाचा आहेच; पण त्याहीपेक्षां कार्यक्षमतेचा प्रश्न महत्त्वाचा आहे. मनुष्यबळाची कार्यक्षमता कमी असणें हें अतिलोकसंख्येच्या प्रश्नाचें चौथें लक्षण मानावें लागतें. मनुष्यबळाची कार्यक्षमता अनेक गोष्टींवर अवलंबून असते; पण त्या सर्वांत रहाणीमान विशेष महत्त्वाचें असतें ह्यांत शंका नाहीं. रहाणीमान कमी असतां आवश्यक

गरजाहि समाधानकारक भागल्या जात नाहींत. मुख्यतः अपुऱ्या व निकस अन्नामुळें (Under-nourishment) **जीवनक्षमता** (Vitality) कमी होऊन त्याचा कार्यक्षमतेवर अनिष्ट परिणाम होतो हें निर्विवाद होय. तेव्हां लोकसंख्येच्या कार्यक्षमतेचा किंवा गुणाचा प्रश्न संख्येच्या प्रश्नापासून अलग करतां येणार नाहीं. संख्येचा व गुणाचा प्रश्न हे एकमेकांशीं अगदीं निगडित असतात.

सारांश, आजच्या अर्थशास्त्रांत लोकसंख्येच्या प्रश्नाचें स्वरूप निव्वळ सैद्धान्तिक असें उरलेलें नाहीं. लोकसंख्येबाबत **जीवनविषयक आंकडेवारी** (Vital Statistics) च्या आधारें लोकसंख्येच्या प्रश्नाचें स्वरूप स्थलकालाच्या संदर्भांत निश्चित करणें ह्या गोष्टीला आज अर्थशास्त्रांत विशेष प्राधान्य दिलें जातें. त्यामुळें लोकसंख्या-विषयक विवेचनांत एखाद्या सिद्धान्ताच्या चर्चेपेक्षां विविध प्रकारच्या आंकडेवारीचें महत्त्व, ती जमविण्याच्या व मांडण्याच्या पद्धती व तिच्यापासून वेगवेगळ्या परिस्थितींत काढतां येणारे निष्कर्ष ह्या प्रश्नांना तात्त्विक विवेचनांत विशेष स्थान दिलें जातें. लोकसंख्येच्या विवेचनांत जननप्रमाण, मृत्युप्रमाण, प्रजोत्पादन-प्रमाण, बालमृत्यु-प्रमाण, अपेक्षित आयुष्यमान, वयवार विभागणी, लिंगवार विभागणी, व्यवसायवार विभागणी इत्यादि साधनांना आज महत्त्व प्राप्त झालें आहे तें ह्याच कारणामुळें.

प्रगत व अप्रगत देशांतील फरक:—लोकसंख्येच्या दृष्टीनें असें म्हणतां येईल कीं, अप्रगत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देशांत लोकसंख्येचा प्रश्न जेवढा जाणवत आहे तेवढा तो प्रगत देशांत जाणवत नाहीं. प्रगत देशांत हा प्रश्न जाणवत नाहीं, ह्याचें मुख्य कारण उत्पादनतंत्रांतील प्रगतींत जसें आढळते तसेंच तें कुटुंब-नियोजनाच्या प्रवृत्तींतहि आढळतें. संततिनियमनाच्या खात्रीलायक साधनांमुळें कुटुंब-नियोजनाचा प्रसार झाला हें खरें; पण संततिनियमन केलें जाण्याचें तें खरें कारण नव्हे. संततिनियमनकला ह्या नाहीं त्या रूपानें फार पूर्वीपासून ज्ञात आहे; पण संततिनियमनाचा प्रसार पाश्चिमात्य राष्ट्रांत पूर्वीं एवढा नव्हता आणि आज फार झाला आहे, ह्याचें खरें कारण लोकांची मनोभूमिका विविध सामाजिक व आर्थिक कारणांमुळें अनुकूल झाली हेंच होय.[२१] रहाणीमान वाढणें, धार्मिक समजुतींचा पगडा कमी होणें, विभक्त कुटुंबपद्धति वाढणें, औद्योगीकरणाचा विस्तार होणें, स्त्रीशिक्षणाचा प्रसार होणें, स्त्रियांना त्यांच्या हक्कांची जाणीव होणें, कुटुंब-

---

[२१] The increased knowledge and availability of means to control birth is undoubtedly a factor, but methods of family limitation are not new and the knowledge was not applied on a sufficient scale over the preceding centuries to reduce birth rates. So the real causes must be sought in changes in the socio-economic environment affecting the spread of knowledge, the availability of means and even more the motives to apply them.

नियोजनाला धोरण म्हणून सरकारी मान्यता मिळणें, प्रभावी प्रचार होणें इत्यादि बदल कुटुंबनियोजनाच्या दृष्टीनें वातावरण तयार होण्यास आवश्यक असतात हा धडा प्रगत राष्ट्रांच्या अनुभवावरून अप्रगत राष्ट्रांना शिकण्याजोगा आहे.

प्रमुख संदर्भग्रंथ

(1) Wright—Population.
(2) Bowen—Population.
(3) Belshow—Population growth and levels of consumption.
(4) Report by P. E. P.—World population and resources.

: १८ : समस्त अर्थव्यवस्थेचा समतोल

राष्ट्रीय उत्पन्न = खाजगी + सरकारी उत्पन्न :—कोणत्याहि वर्षातील एकंदर राष्ट्रीय उत्पन्न (१) खाजगी व्यक्तीचें उत्पन्न; (२) खाजगी उद्योगसंस्थांचें उत्पन्न व (३) सरकारी उत्पन्न ह्यांची बेरीज असते. खाजगी व्यक्तीचें उत्पन्न म्हणजे प्रस्तुत संदर्भांत वेतन-पगार, व्याज, खंड, नफा-लाभांशरूपानें खाजगी व्यक्तींना मिळणारें उत्पन्न उणे त्या उत्पन्नांतून द्यावे लागणारे प्रत्यक्ष कर होत. खाजगी उद्योगसंस्थांचें उत्पन्न म्हणजे त्यांचा नफा उणे वांटलेला नफा (जो लाभांशरूपानें खाजगी व्यक्तींच्या उत्पन्नांत समाविष्ट होतो). उणे उद्योगसंस्थांना नफ्यांतून भरावे लागणारे कर (अप्रत्यक्ष कर हे उद्योगसंस्थांना व उद्योगपतींना भरावे लागतात व त्यामुळें त्यांच्या उत्पादन-खर्चांत भर पडून नफा त्या मानानें कमी होतो. उत्पादन-खर्चाचा हा भाग व्यक्तीचें उत्पन्न न होतां सरकारचें उत्पन्न होतें). सरकारचें उत्पन्न म्हणजे सरकारला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष करांच्या रूपानें मिळणारें उत्पन्न व सरकारी व्यवसायांतून होणारा नफा.

उपभोगखर्च व बचत :—खाजगी व्यक्तींच्या उत्पन्नाचे (कर वगळून) दोन भाग पडतात. एक भाग भोग्य वस्तूंवर खर्च केला जातो. ह्या भागाला उपभोग-खर्च (Consumption Expenditure) असें म्हणतात. उरलेला भाग ही खाजगी व्यक्तींनीं टाकलेली शिल्लक होय. उत्पन्नाचा जो भाग खर्च केला जात नाहीं त्याला शिल्लक (Saving) म्हणतात.[1] खाजगी उद्योगधंद्यांचा न वांटलेला नफा

[1] Saving is equal to income less consumption expenditure. Saving is disposable net income not spent on consumption by net income recipient.

ही शिल्लक असते. त्यांत उपभोग-खर्चाचा संबंध नसतो.[२] सरकारी उत्पन्नाचे सुद्धां खर्च व शिल्लक असे दोन भाग पडतात. सरकारचा खर्च म्हणजे प्रस्तुत संदर्भांत महसुली किंवा चालू खर्च होय व सरकाराचें उत्पन्न म्हणजे करांपासून मिळणारें उत्पन्न होय. उत्पन्नांतून चालू खर्च वगळतां जो भाग उरतो तो सरकारची शिल्लक दर्शवितो.[३] सारांश, एकंदर राष्ट्रीय उत्पन्नाचे उपभोग-खर्च व बचत असे दोन भाग पडतात. उपभोग-खर्च हा खाजगी व्यक्तींचा खर्च व सरकारचा चालू खर्च ह्यांची बेरीज असते. बचत ही खाजगी व्यक्तींची बचत + संस्थांचा न विभागलेला नफा + सरकारी बचत एवढी असते.

भांडवल-गुंतवण (Investment) :—आतांपर्यंतच्या विवेचनांत उपभोग-खर्चाचाच फक्त उल्लेख केला आहे; पण अर्थव्यवस्थेंत लोकांकडून किंवा सरकार-कडून ज्या वस्तु विकत घेतल्या जातात त्या सर्व उपभोग वस्तु नसतात. त्यांतील कांहीं भांडवली वस्तु असतात. म्हणजेच उपभोग्य वस्तूंवरील खर्चाखेरीज भांडवली वस्तूंवरील खर्चाचाहि लोकांच्या व सरकारच्या खर्चांत अंतर्भाव होत असतो. भांडवली वस्तूंवरील खर्चालाच अर्थशास्त्रांत **भांडवल-गुंतवण** म्हणतात. (Investment is use of funds for acquiring capital goods) देशांतील एकंदर भांडवल-गुंतवण खाजगी क्षेत्रांत होणारा भांडवली वस्तूंवरील खर्च, अधिक सरकार-कडून होणारा भांडवली वस्तूंवरील खर्च एवढा असतो.

भांडवल-गुंतवणासाठीं क्रयशक्तीची उपलब्धता :—भांडवलगुंतवण करावयाची असल्यास त्यासाठीं अर्थपुरवठा (Finance) लागतो. हा पुरवठा कोठून होतो, ह्याचा विचार करतांना दोन गोष्टी लक्षांत घ्याव्या लागतात. पहिली गोष्ट अशी कीं, भांडवलगुंतवणीसाठीं होणारा खर्च शेवटीं लोकांना काय किंवा सरकारला काय, उत्पन्नांतूनच करावा लागतो. म्हणजेच एकंदर राष्ट्रीय उत्पन्न हा भांडवल-गुंतवणाचा मूळचा आधारस्तंभ असतो. दुसरी गोष्ट अशी कीं, हा आधारस्तंभ संपूर्णपणें भांडवली गुंतवणासाठीं उपयोगीं पडत नाहीं. कारण एकंदर उत्पन्नांतील कांहीं भाग वर दाखविल्याप्रमाणें लोकांकडून व सरकारकडून भोग्य वस्तूंवर खर्च केला जातो. भोग्य वस्तूंवर खर्च केला जाणारा उत्पन्नाचा भाग अर्थातच भांडवली वस्तूंवरील खर्चासाठीं उपलब्ध होऊं शकत नाहीं. तेव्हां उत्पन्नाचा जो भाग भोग्य वस्तूंवर खर्च न होतां उरतो तेवढाच भाग भांडवली खर्चास उपलब्ध होतो. भोग्य वस्तूंवर खर्च न होणाऱ्या उत्पन्नाच्या भागालाच वर शिल्लक म्हटलें आहे. तें लक्षांत घेतां राष्ट्रीय उत्पन्नांतून केली जाणारी बचत भांडवली खर्चाचें मूळ असतें असें म्हटल्यास तें चूक होणार नाहीं.

[२] Corporate net savings for a year is the corporate profits of that year, after all taxes, minus the dividends paid to individuals in that year.

[३] Government saving is the surplus of current revenues over expenditures other than outlays for investment.

एकंदर खर्च व एकंदर उत्पन्न :--येथपावेतों जी माहिती दिली तिच्यावरून कांहीं महत्त्वाच्या गोष्टी समजतात. त्या खालीं सूत्ररूपानें दिल्या आहेत :—

(अ) एकंदर राष्ट्रीय उत्पन्न, खाजगी उत्पन्न अधिक सरकारी उत्पन्न एवढें असतें.

(ब) एकंदर राष्ट्रीय उत्पन्नाचे (१) उपभोग्य वस्तूंवर खर्च व (१) भोग्य वस्तूंवर न होणारा खर्च म्हणजेच बचत असे दोन भाग पडतात. उत्पन्न मिळविणें, भोग्य वस्तूवर खर्च करणें व शिल्लक टाकणें ह्या तिन्ही क्रिया सरकारकडून व खाजगी व्यक्तीकडून--म्हणजेच अर्थव्यवस्थेच्या दोन्ही विभागांकडून होत असल्यानें एकंदर उत्पन्नाचे चार भाग पडतात असेंहि म्हणतां येईल. ते चार भाग असे :-- (१) खाजगी भोग्य खर्च, (२) सरकारी भोग्य खर्च, (३) खाजगी बचत व (४) सरकारी बचत.

(क) देशांतला एकंदर खर्च, खाजगी खर्च + सरकारी खर्च एवढा असतो. खाजगी खर्चाचे (अ) भोग्य वस्तूवर खर्च व (आ) भांडवली वस्तूंवर खर्च असे दोन भाग पडतात. त्याचप्रमाणें सरकारी खर्चाचे (इ) भोग्य- वस्तूंवर खर्च व (ई) भांडवली वस्तूंवर खर्च असे दोन भाग पडतात. तेव्हां असें म्हणतां येईल कीं, एकंदर खर्च खाजगी उपभोग-खर्च + अधिक सरकारी उपभोग-खर्च + खाजगी भांडवल-गुंतवण + सरकारी भांडवल-गुंतवण एवढा होतो.

(४) एकंदर खर्च = उपभोग खर्च + भांडवल-गुंतवण व एकंदर उत्पन्न = उपभोग-खर्च अधिक शिल्लक अशी परिस्थिति असल्यानें व दोन्ही बाजूंकडील उपभोग-खर्च रकमेनें समान असणें अपरिहार्य असल्यानें, **भांडवल-गुंतवण व बचत ह्या दोन्ही गोष्टी समान झाल्यास--आणि झाल्या तरच--अर्थव्यवस्थेंतून प्राप्त होणारें सर्व उत्पन्न सरकार व लोक ह्यांनीं मिळून खर्च केलें असें म्हणतां येईल.** आधीं उत्पन्न मिळतें व मग खर्च करावयाचा असतो. हें लक्षांत घेतल्यास असें म्हणतां येईल कीं, शिल्लक व भांडवल गुंतवण समान झाल्यास आजचें उत्पन्न व उद्यांचा खर्च ह्या राशी समान होतात. आजच्या उत्पन्नांतून होणाऱ्या शिलकीचा विनियोग संपूर्णपणें भांडवल-गुंतविण्यासाठीं केला न गेल्यास आजच्या उत्पन्नापेक्षां उद्यांचा खर्च (व म्हणून उद्यांचें उत्पन्न) कमी होतें. आजच्या शिलकीपेक्षां भांडवली खर्च अधिक झाल्यास (सरकारनें व बँकांनीं नवा पैसा निर्माण करून भांडवल-गुंतवणीसाठीं उपलब्ध करून दिल्यास ही परिस्थिति उद्भवूं शकते) आजच्या उत्पन्नापेक्षां उद्यांचा खर्च (व म्हणून उद्यांचें उत्पन्न) अधिक होतो. सारांश, जेवढी शिल्लक तेवढीच भांडवल-गुंतवण होणें एकंदर राष्ट्रीय उत्पन्न स्थिर राहण्याच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. शिलकीपेक्षां भांडवल-गुंतवण कमी झाल्यास राष्ट्रीय उत्पन्न कमी होतें नाहींतर वाढतें.

शिल्लक व भांडवलगुंतवण ह्यांची समानता :—शिल्लक व भांडवल-गुंतवण ह्या संबंधींच्या ह्या विवेचनानंतर शिल्लक व भांडवल-गुंतवण समान होणें अपरिहार्य

आहे काय असा प्रश्न उपस्थित होतो. ह्या प्रश्नाचीं दोन उत्तरें आहेत. हीं दोन्हीं उत्तरें वरवर पाहणाऱ्याला विसंगतीचीं वाटण्याचा संभव असल्यामुळें--पण वस्तुतः त्यांत मुळींच विसंगती नसल्यानें--ती जरा लक्षपूर्वकच समजून घेतलीं पाहिजेत.

पहिलें उत्तर असें कीं, **योजलेली शिल्लक** (Planned or intended saving) व **योजलेली भांडवल-गुंतवण** (Planned or intended investment) समान होतीलच असें ठांसून सांगतां यावयाचें नाहीं. असें म्हणण्याचीं दोन कारणें आहेत. पहिलें कारण असें कीं, शिल्लक करणारे व भांडवल-गुंतवण करणारे हे दोन अर्थ-व्यवस्थेंतील वेगळे वर्ग असतात. दुसरें कारण असें कीं, शिलकीमागील प्रेरणा व भांडवल-गुंतवणीमागील प्रेरणा जात्याच भिन्न असते. अशा परिस्थितींत शिलकीचे निर्णय व भांडवल-गुंतवणीचे निर्णय ह्यांचा समन्वय होईलच असें सांगतां यावयाचें नाहीं. ह्या दोन कारणांचा थोडा अधिक विस्तार केला पाहिजे.

शिल्लक ही अंशतः उत्पन्न मिळविणाऱ्या खाजगी व्यक्तींनीं, अंशतः औद्योगिक संस्थांनीं व अंशतः सरकारनें केलेली असते. पैकीं खाजगी व्यक्तींनीं केलेली शिल्लक ही एकंदर शिलकीचा फारच मोठा भाग असल्यानें ती कोणत्या हेतूनें टाकली जाते, ह्याला विशेष महत्त्व आहे. जी शिल्लक टाकली जाते तिच्यांतील कांहीं अहेतुक व कांहीं सहेतुक होते. ज्यांच्या खर्चाच्या संवयीच्या मानानें उत्पन्न मोठें असतें त्यांच्याकडून आपोआपच शिल्लक टाकली जाते. मुद्दाम प्रयत्नपूर्वक त्यांना ती टाकावी लागत नाहीं. श्रीमानांच्या बाबतींत सामान्यपणें अशी स्थिति असते. अशी शिल्लक अहेतुक होय. सहेतुक शिल्लक दोन हेतूंनीं टाकली जाते. भावी काळांतील अनिश्चिततेविरुद्ध उपाय म्हणून--म्हणजेच भावी काळासाठीं तरतूद म्हणून--शिल्लक केली जाते. तसेंच व्याजाच्या आशेनें—म्हणजेच भावी काळांत व सरकारकडून केली जाणारी शिल्लक सामान्यपणें भांडवल-गुंतवणाच्या हेतूनें ती टाकली जाते. पण एकंदर शिल्लकींत खाजगी व्यक्तीकडून केल्या जाणाऱ्या बचतीचा भागच सर्वांत मोठा असल्यानें शिलकीचा भांडवल-गुंतवणीशीं साक्षात् संबंध नसतो, असें म्हटल्यास तें चूक होणार नाहीं. भांडवल-गुंतवण मुख्यतः खाजगी उत्पादकांनीं व कांहीं प्रमाणांत सरकारकडून केली जाते. खाजगी रीत्या होणारी भांडवल-गुंतवण प्रमाणानें मोठी असल्यानें तिच्यामागील प्रेरणाच महत्त्वाची मानली पाहिजे. ती प्रेरणा नफ्याची असते त्यामुळें प्रचलित व्याजाच्या दरापेक्षां अपेक्षित सीमान्त नफ्याचें प्रमाण अधिक असल्यासच भांडवल-गुंतवणसुद्धां गुंतविली जाईलच असें सांगतां येणार नाहीं. ह्या परिस्थितींत भांडवल-गुंतवणीशीं जिचा साक्षात् संबंध नसतो अशी शिल्लक व भांडवल-गुंतवण समान होईल, असा भरंवसा कसा देतां येईल ? सारांश, **योजिलेली शिल्लक व भांडवल-गुंतवण असमान होणेंच संभवनीय** दिसतें.

शिल्लक व भांडवल-गुंतवण समान होणें अपरिहार्य आहे काय ? ह्या प्रश्नाचें दुसरें उत्तर असें कीं, योजलेली शिल्लक व योजलेली भांडवलगुंतवण

असमान तरी प्रत्यक्ष शिल्लक व प्रत्यक्ष भांडवल गुंतवण समान होणें अपरिहार्य आहे. ही अपरिहार्यता राष्ट्रीय खर्च व राष्ट्रीय उत्पन्न ह्या एकाच गोष्टीच्या दोन बाजू आहेत, ह्यांतून उद्‌भवते. देशांत उत्पादिल्या जाणाऱ्या वस्तूंवर व कामगिरींवर जो खर्च होतो त्या खर्चाचीच (उत्पादनसाधनांची किंमत ह्या नात्यानें) उत्पादनसाधनांच्या मालकांत विभागणी होते. निराळ्या शब्दांत लोकांकडून होणारा खर्चच लोकांचें उत्पन्न होतो. त्यामुळें एकंदर खर्च व एकंदर उत्पन्न असम होणें संपूर्णतया अशक्य आहे. एकंदर खर्च मोजल्यानें राष्ट्रीय उत्पन्नाची एक प्रकारें मोजणी होते. एकंदर उत्पन्न मोजल्यानें राष्ट्रीय उत्पन्नाची दुसऱ्या प्रकारें मोजणी होते. राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एकच गोष्ट मोजण्याच्या ह्या दोन वेगवेगळ्या पद्धति असल्यानें उत्पन्न व खर्च ह्यांत फरक असणें असंभवनीय आहे.

लोकांचा समस्त खर्च (Aggregate Expenditure) व लोकांचें समस्त उत्पन्न (Aggregate Income) ह्या एकाच गोष्टीच्या दोन बाजू असतील, तर बचत व भांडवलगुंतवण समान होणें अटळ हें ओघानेंच येतें. कारण एकंदर खर्च हा भोग्य वस्तूवरील खर्च अधिक भांडवलगुंतवण असल्यामुळें व एकंदर उत्पन्नाची विभागणी भोग्य वस्तूवरील खर्च व शिल्लक ह्या दोन विभागांत होत असल्यामुळें दोन्ही बाजूंस आढळणारा भोग्य वस्तूवरील खर्च काढून टाकल्यास भांडवलगुंतवण व शिल्लक ह्या दोन्ही राशी सारख्या झाल्याच पाहिजेत. समीकरणानें ही गोष्ट चांगली पटेल.

(१) उत्पन्न = शिल्लक + भोग्य वस्तूवर खर्च.

(२) खर्च = भांडवलगुंतवण + भोग्य वस्तूवर खर्च.

म्हणून (३) शिल्लक = भांडवलगुंतवण,[४]

सारांश, भोग्य वस्तूवर खर्च न होणारा उत्पन्नाचा भाग अशी शिलकीची व्याख्या केल्यास व एकंदर खर्च उणे भोग्य वस्तूवर खर्च अशी भांडवल गुंतवणीची व्याख्या केल्यास बचत व भांडवलगुंतवण अटळपणें एक होते.

[४] This conclusion follows from the identity of national product and national income. Since consumption spending plus investment spending determines national product, national income must be at a level where the fraction going to saving equals investment spending.—"The equation, saving = investment is an identity not a conditional equation; it follows from definations adopted. For the private investment alone, investment is defined as net output minus consumption. Net output is the same as net income, and consumption in this terminology, is expenditure on consumption. Saving is defined as net income minus expenditure on consumption. Thus saving and investment are defined alike and obviously must be identical in amount.

—**Shoup**

बचत व भांडवलगुंतवण ह्या राशी समान कशा होतात ? :—योजलेली शिल्लक व योजलेली भांडवल-गुंतवण समान असण्याचें कारण नसतांना प्रत्यक्ष शिल्लक व प्रत्यक्ष भांडवल-गुंतवण समान कशा होतात ह्याचा उलगडा करणें अत्यावश्यक आहे. हा उलगडा अशा प्रकारें करतां येईल कीं, जेव्हा योजलेली शिल्लक व योजलेली भांडवल-गुंतवण ह्यांच्यांत तफावत पडते तेव्हां अर्थव्यवस्थेंतील प्रवाह अशा प्रकारें आप-सूकच वाहूं लागतात कीं, प्रत्यक्ष शिल्लक व भांडवलगुंतवण समान व्हावीं. हें कसें होतें तें खालीं उदाहरणें घेऊन स्पष्ट केलें आहे.

योजलेली भांडवल-गुंतवण योजलेल्या शिलकीपेक्षां कमी असल्यास :—(१) समजा, उत्पन्न मिळाल्यानंतर लोक जेवढी बचत करतात त्यापेक्षां योजलेली भांडवल-गुंतवण कमी आहे. १००० रु. आजचें उत्पन्न असतां त्यांतील रु. ४०० ची बचत होते व रु. ६०० चा उपभोगखर्च होतो असें समजूं. अशा परिस्थितींत योजलेली भांडवल-गुंतवण रु. ४०० असेल तर आजचें सर्व उत्पन्न हा आजचा खर्च व उद्यांचें उत्पन्न होईल व परिस्थितींत कोणत्याहि प्रकारें फरक पडणार नाहीं. पण योजलेली भांडवल-गुंतवण रु. ३०० असेल तर आजचें सर्व उत्पन्न आज खर्च होणार नाहीं आणि त्यामुळें उद्यांचें उत्पन्न १०० नें कमी होईल. खर्च तेवढाच राहील तर बचतहि १०० नें कमी व्हावीच लागेल. म्हणजेच ३०० भांडवल-गुंतवण कमी झाल्यानें बचतहि तेवढीच होणें भाग पडेल. म्हणजे शिलकीपेक्षां भांडवल-गुंतवण कमी झाल्यास खर्च कमी होतो, खर्च कमी झाल्यामुळें भावी उत्पन्न कमी होतें व उत्पन्न कमी झाल्यामुळें शिल्लक कमी होणें भाग पडतें. सारांश, योजलेल्या बचतीपेक्षां योजलेली भांडवलगुंतवण जोंपर्यंत कमी आहे तोंपर्यंत अर्थव्यवस्थेंत समतोल कदापि निर्माण व्हावयाचा नाहीं. जेव्हां समतोल निर्माण होईल तेव्हां योजलेली भांडवल-गुंतवण ज्या प्रमाणांत कमी भरेल त्या प्रमाणांत शिल्लक कमी पडून प्रत्यक्ष बचत व प्रत्यक्ष भांडवलगुंतवण समान झालेली असेल. मात्र त्या वेळीं एकंदर राष्ट्रीय उत्पन्न व राष्ट्रीय खर्च—म्हणजेच एकंदर सर्वच अर्थक्रिया खालच्या पातळीवर आलेल्या आढळतील.

(२) **योजलेली भांडवल-गुंतवण योजलेल्या शिलकीपेक्षां अधिक असल्यास** :— आतां योजलेली भांडवलगुंतवण योजलेल्या शिलकीपेक्षां अधिक असल्यास काय होतें तें पाहूं. त्यासाठीं आजचें उत्पन्न रु. १००० असतां त्यांतील रु. ४०० ची शिल्लक पडते व रु. ६०० उपभोगावर खर्च होतात असें समजूं. अशा परिस्थितींत योजलेली भांडवलगुंतवण ६०० असेल तर आजच्या उत्पन्नापेक्षां आज अधिक खर्च केला जाईल. त्यामुळें उद्यांचें उत्पन्न वाढेल व उत्पन्न वाढल्यामुळें सहाजिकच शिलकीचें प्रमाणहि वाढेल. योजलेल्या शिलकीपेक्षां जोंपर्यंत भांडवल-गुंतवण कमी असते तोंपर्यंत ज्याप्रमाणें अर्थव्यवस्थेंत समतोल प्रस्थापित होऊं शकत नाहीं त्याचप्रमाणें योजलेली भांडवल-गुंतवण जोंपावेतों योजलेल्या शिलकीपेक्षां अधिक असते तोंपर्यंतहि समतोल प्रस्थापित व्हावयाचा नाहीं.

समतोलाची महत्त्वाची अट :—वरील विवेचनावरून एक महत्त्वाचा निष्कर्ष निघतो. तो असा कीं, **योजलेली शिल्लक व योजिलेली भांडवल-गुंतवण समान व्हावयास पाहिजे.** एकंदर अर्थव्यवस्थेचा समतोल साधला जाण्याची ही महत्त्वाची अट आहे. कोणत्याहि उद्योगधंद्यांत उत्पादन कमी अगर अधिक करण्याची प्रेरणा उत्पादकांत निर्माण होण्याजोगी परिस्थिति नसणें हें समतोलाचें लक्षण समजलें जातें. हाच न्याय एकंदर अर्थव्यवस्थेसहि लागू करतां येईल. एकंदर उत्पादन वाढविण्याची अगर कमी करण्याची प्रेरणा एकंदर उत्पादकवर्गास नसणें हें एकंदर अर्थव्यवस्थेचा समतोल साधला गेला असल्याचें लक्षण समजण्यास हरकत नाहीं.

एकंदर उत्पन्न हें एकंदर खर्चावर अवलंबून असतें. जोंपर्यंत कोणत्याहि उत्पादन-प्रमाणांतून उद्‌भवणाऱ्या एकंदर उत्पन्नाएवढाच एकंदर खर्च असतो तोंपर्यंत तें उत्पादनप्रमाण टिकून राहूं शकतें. निराळ्या शब्दांत उत्पादनप्रमाणांत बदल करण्याची प्रेरणा निर्माण होण्याचें कारण नसतें. पण आजच्या उत्पन्नापेक्षां उद्यांचा खर्च अधिक किंवा कमी असेल तर उत्पादनप्रमाणांत बदल झाल्यावांचून रहाणार नाहीं. उद्यांचा खर्च आजच्या उत्पन्नापेक्षां अधिक असल्यास उत्पादन वाढेल अन्यथा कमी होईल. तेव्हां अर्थव्यवस्थेंतून उद्‌भवणारें एकंदर उत्पन्न व योजलेला खर्च समान असणें ही समस्त अर्थव्यवस्थेच्या समतोलाची महत्त्वाची अट आहे. ह्या अटीसंबंधीं अधिक खोलांत जाऊन विचार केल्यास असें दिसून येईल कीं, योजिलेला उपभोगखर्च व प्रत्यक्ष उपभोगखर्च समान होणें अपरिहार्यच आहे. कारण ह्या दोन्ही गोष्टी एकच आहेत; पण योजिलेली शिल्लक व योजलेली भांडवल-गुंतवण समान होणें अपरिहार्यच नाहीं. त्या दोन्ही गोष्टी समान झाल्यास एकंदर उत्पन्न व एकंदर खर्च ह्यांत वर दाखविल्याप्रमाणें तफावत पडेल. हें लक्षांत घेतल्यास **योजिलेली शिल्लक व योजिलेली भांडवल-गुंतवण समान होणें ही समस्त अर्थव्यवस्था समतोल होण्याची खरी अट आहे** असें म्हणण्यास हरकत नाहीं. प्रत्यक्ष भांडवल-गुंतवण व प्रत्यक्ष शिल्लक समान होणें आवश्यक असणें, ही अट मानतां येणार नाहीं. कारण योजिलेली शिल्लक व योजिलेली भांडवल-गुंतवण समान असो वा नसो; प्रत्यक्ष भांडवल-गुंतवण व प्रत्यक्ष शिल्लक ही अर्थव्यस्थेंतील प्रवाहामुळें केव्हांहि समान होतेच. योजिलेली भांडवल-गुंतवण व योजलेली शिल्लक समान नसतांहि प्रत्यक्ष शिल्लक व प्रत्यक्ष भांडवल-गुंतवण समान होते, असें म्हणण्यांत विसंगति मुळींच नाहीं. हा केवळ **घटनापूर्व** (Ex-ante) व **घटनापश्चात्** (Ex-post) विश्लेषणांतील फरक आहे. योजिलेली शिल्लक व योजिलेली भांडवल-गुंतवण ह्यांचा विचार जेव्हां केला जातो तेव्हां शिल्लक व भांडवल गुंतविण्याच्या घटना घडावयाच्या असतात. त्यामुळें तो विचार घटनापूर्व असतो. त्या घटना घडून गेल्यानंतर त्यांच्या परिणामाचा जेव्हां विचार केला जातो तेव्हां तो घटनापश्चात् विचार असतो. योजिलेली शिल्लक व योजिलेली भांडवल गुंतवण समान नसण्याचा परिणाम अपरिहार्यपणें प्रत्यक्ष शिल्लक व भांडवल गुंतवण समान होण्यांत होतो, हें वर दाखविलेंच आहे. प्रत्यक्ष शिल्लक व प्रत्यक्ष

भांडवल-गुंतवण नेहमीं समानच होत असल्यामुळें त्यांच्यांतील समानता व समतोल ह्यांचा संबंध जोडतां येणार नाहीं. म्हणूनच योजलेली भांडवल-गुंतवण व योजिलेली शिल्लक ह्यांची समानता ही समतोलाची महत्त्वाची शर्त मानणें प्राप्त आहे.

अपूर्ण रोजगाराचा समतोल :—समस्त अर्थव्यवस्थेचा समतोल होण्याच्या वेळीं अर्थव्यवस्थेंत पूर्ण रोजगार स्थिति प्रस्थापित झालेली असेल तर अशा समतोलाला **पूर्ण रोजगाराचा समतोल** (Full employment equilibrium) असें म्हणतात. पण तशी स्थिति नसेल आणि जिला घर्षणी अथवा हंगामी म्हणतां येणार नाहीं अशी बेकारी अर्थव्यवस्थेंत दिसून येत असेल तर प्रस्थापित होणाऱ्या समतोलाला **अपूर्ण रोजगाराचा समतोल** (Under employment equilibrium) असें म्हणतात.[५]

कीन्सपूर्व अर्थशास्त्रावर सेच्या बाजाराच्या सिद्धान्ताचा पगडा :—अपूर्ण रोजगाराच्या समतोलाची शक्यता हा कीन्सवादी अर्थशास्त्राचा पाया आहे. कीन्सपूर्व अर्थशास्त्रीय लिखाणांत **जे. बी. से**. ह्या अर्थशास्त्रज्ञानें प्रतिपादिलेला बाजाराचा सिद्धान्त (Law of Market) व त्या सिद्धान्तांतून निघणारे सर्व निष्कर्ष मानले जात असत. पूर्ण रोजगार प्रस्थापित करण्याकडे अर्थव्यवस्थेची नैसर्गिक प्रवृत्ति असते. त्यामुळें अर्थव्यवस्थेंत दिसून येणारी सारी बेकारी हंगामी अथवा घर्षणी असते. किंवा अर्थव्यवस्थेच्या नैसर्गिक प्रवृत्तीच्या मार्गांत जाणूनबुजून अडथळे निर्माण करण्याच्या प्रयत्नांतून उद्भवलेली असते असा मुख्य निष्कर्ष सेच्या सिद्धान्तांतून निघतो. सेच्या सिद्धान्ताचा कीन्सपूर्व अर्थशास्त्रावर एवढा पगडा होता कीं, त्यामुळें बेकारीच्या प्रश्नाची त्या अर्थशास्त्रानें उपेक्षाच केली, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.[६] हें विधान अर्थातच सनातनवादी व नवसनातनवादी अर्थशास्त्रापुरतें मर्यादित आहे. मार्क्सवादी आर्थिक विचारास हें विधान लागू पडत नाहीं. ज्या सेच्या सिद्धान्ताचा जुन्या अर्थशास्त्रावर एवढा प्रभाव पडला त्याचा परिचय करून घेणें अगत्याचें आहे.

सेचा बाजाराचा सिद्धान्त :—सेचा सिद्धान्त थोडक्यांत पुढीलप्रमाणें सांगतां येईल. पूर्ण स्पर्धेच्या भरभक्कम पायावर उभारलेल्या अर्थव्यवस्थेंत कितीहि उत्पादन केलें तरी तें खपणार नाहीं याची भीति मुळींच नसते. कारण पुरवठा वाढला कीं तेवढीच

[५] Under employment equilibrium is a situation in which equilibrium of savings and investment is reached considerably below the full employment level.

[६] Say's Law of Markets despite all assertions to the contrary, by orthodox apologists, did run like a thread through the entire body of classical and neo-classical theory. It is almost impossible to exaggerate either the hold which Say's law exercised on the professional economists, or its importance as an obstacle to realistic analysis—**Sweezy**

मागणी वाढते. पुरवठ्यांत मागणी निर्माण करण्याची ताकद असते असें म्हणणें चूक नाहीं. त्यामुळें उत्पादिलेल्या वस्तूचा खप होईलच अशी हमी देतां येते. कोणत्याहि वस्तूच्या उत्पादनाची प्रक्रिया चालू असतां त्या वस्तूच्या उत्पादनखर्चाइतकी रक्कम उत्पादन-साधनांच्या मालकांत उत्पन्नरूपानें वांटली जाते आणि तेवढीच रक्कम त्यांनीं त्या वस्तूच्या खरेदीवर खर्च केल्यास उत्पादनखर्च सहज वसूल होऊं शकतो. म्हणजेच त्या वस्तूचें उत्पादनप्रमाण टिकून राहण्यास कोणताही बाध येत नाहीं. एका वस्तूचें उत्पादन केवळ उदाहरणादाखल आहे. कारण वस्तूच्या उत्पादनाच्या क्रियेंत जेवढें उत्पन्न वांटलें जाईल तेवढें सर्व त्या वस्तूंवरच खर्च केलें जाईल असा नेम नाहीं; पण समस्त उत्पादनाचा (Aggregate production) विचार केला तर असें सहज म्हणतां येतें कीं, उत्पादनाच्या प्रक्रियेंत जेवढी रक्कम उत्पादनखर्च म्हणून वांटली जाते तेवढी सर्व त्या उत्पादनाच्या—म्हणजे त्या उत्पादनांत अंतर्भूत असलेल्या विविध वस्तूंच्या—खरेदीसाठीं खर्च केली जातच असल्यामुळें उत्पादनखर्च भरून येणार नाहीं, असा धोका केव्हांहि निर्माण होत नाहीं. म्हणून कोणतेंहि उत्पादनाचें मान एकदां गांठलें गेलें कीं, तें टिकून रहावयाला मुळींच अडचण नसते. हेंच विधान आंकडेवारीनें अधिक स्पष्ट होईल. समजा, समस्त उत्पादनाचा एकंदर उत्पादनखर्च १ लाख रुपये आहे. ह्याचाच अर्थ असा कीं, त्या उत्पादनाच्या क्रियेला हातभार लावणाऱ्यांच्या उत्पन्नाची एकूण बेरीज १ लाख रुपयेच होईल. तें सर्व उत्पन्न उत्पादित वस्तूंवर खर्च होणें प्राप्तच आहे. तेव्हां समस्तखर्च (Aggregate expenditure) १ लाखच असणार. अर्थातच जेवढा उत्पादनखर्च होतो तेवढा भरून येईलच हें उघड आहे. तेव्हां ज्या उत्पादनाचा एकूण उत्पादनखर्च १ लाख रुपये आहे तें टिकून राहण्यास कोणतीच हरकत नाहीं. १ लाख रु. ज्याचा उत्पादनखर्च आहे तें उत्पादन टिकून राहील अशी हमी देतां येते. एवढेंच नव्हे तर उत्पादन वाढविलें तरीहि वाढलेलें उत्पादन टिकून राहील अशीहि हमी देतां येते. वरील उदाहरणांत उत्पादन दुप्पट केलें असें समजू. उत्पादन दुप्पट झाल्यास एकूण उत्पादनखर्च दोन लाख रु. होईल. त्यामुळें आर्थिक व्यवस्थेंत दोन लाख रु. ची वांटणी होईल. अर्थातच दोन लाख रु. खर्चासाठीं उपलब्ध होतील. तेवढे सर्व उत्पादनावर खर्च झाले कीं, वाढलेल्या उत्पादनाचा खर्च भरून देऊन तेंहि टिकूं शकेल. सारांश, अर्थव्यवस्थेंत कितीहि उत्पादन झालें तरी बिघडत नाहीं. अर्थव्यवस्थेची कार्यपद्धति अशी आहे. समस्त उत्पादनाच्या बाबतींत **अत्युत्पादन** (Over production) असंभवनीय आहे.[७]

[७] Say's Law that supply creates its own demand denies the possibility of general over-production. It argues that in the long run, there is always a tendency for demand to be sufficient to buy all that the economy is capable of producing. This long run assumption is brought about automatically by market forces alone.

पूर्ण रोजगाराचा अभावहि असंभवनीय :--सेच्या बाजाराच्या सिद्धान्ताचे रोजगारीच्या विषयाला लागू पडणारे निष्कर्ष काय निघतात, तें सहज समजण्याजोगें आहे. पहिला निष्कर्ष निघतो तो असा कीं, पूर्णोद्योगावस्था प्रस्थापित होण्यासाठीं जें उत्पादनाचे मान असावें लागतें त्यासाठीं ज्या प्रमाणांत भांडवल-गुंतवण व्हावी लागते तेवढी भांडवल-गुंतवण होणें अगदीं शक्य आहे, असें धरून चालावयास हरकत नाहीं. तेवढ्या भांडवल-गुंतवणासाठीं जरूर असलेली शिल्लक कोठून उपलब्ध होणार, एवढाच काय तो प्रश्न असतो. पण हा प्रश्न फारसा बिकट नाहीं. कारण शिल्लक टाकणें, कांहीं अंशीं शिल्लक टाकण्याची म्हणजे उपभोग प्रवृत्तीला आवर घालण्याची इच्छा व कांहीं अंशीं शिल्लक टाकण्याची कुवत ह्यांवर अवलंबून असतें. पैकीं कुवत ही उत्पन्नाच्या मानावर अवलंबून असते आणि इच्छा व्याजाच्या दरावर अवलंबून असते. अधिकाअधिक प्रमाणांत भांडवल-गुंतवण होऊं लागली कीं, उत्पन्नाचें मान वाढत जातें आणि त्याबरोबर एकूण शिल्लकहि वाढते. शिलकींत वाढ, शिलकींत वाढ म्हणून भांडवल-गुंतवणांत वाढ, भांडवल-गुंतवणांत वाढ म्हणून उत्पादनांत वाढ, उत्पादनांत वाढ म्हणून उत्पन्नांत वाढ, उत्पन्नांत वाढ म्हणून पुनः शिलकींत वाढ आणि त्यामुळें पुनः भांडवली खर्चांत, उत्पादनांत, उत्पन्नांत वाढ हें सत्र सारखेंच चालू राहतें व त्या सत्राचा शेवट उत्पादनाचीं उपलब्ध साधनें पूर्णपणें वापरलीं जाण्यांत होतो. अर्थात् बेकारीचा प्रश्न उद्भवतच नाहीं. उत्पादनाचीं साधनें पूर्णपणें वापरांत आलीं तर तीं अपुरीं पडूं लागतात. त्यामुळें तीं वांचविण्यासाठीं प्रयत्न होतो. त्यामुळें बेकारी निर्माण झाली तरी तात्पुरतीच ठरते. कारण भांडवल-गुंतवणासाठीं असलेला वाव केव्हांच कमी होत नाहीं.

उत्पादनाच्या वा ीला भरपूर वाव असल्यानें म्हणजेच कितीहि उत्पादन केलें तरी तें किफायतशीर होईल अशी शाश्वति असल्यानें जेवढी शिल्लक होईल तेवढ्याची भांडवल-गुंतवणासाठीं उसनवारी करण्यास उद्योगपति नेहमींच तयार असतात आणि त्यासाठीं व्याजरूपानें किंमतहि ते देतात. शिल्लक टाकणाऱ्यांचा हेतु त्या शिलकीचा भावी कालांत उपयोग व्हावा असाच असतो. त्यामुळें ताबडतोबीच्या काळांत शिल्लक केवळ पडून राहण्यापेक्षां व्याजरूपानें कांहीं फलप्राप्ति झाली तर त्यांना हवीच असते. त्यामुळें किंमत मिळाल्यास आपल्या शिलकीचा उपयोग दुसऱ्या कोणासहि करूं देण्यास त्यांची ना नसते. मागणीची बाजू व पुरवठ्याची बाजू सारखीच उत्सुक असल्यानें उपभोग वर्ज्य करून शिलकीच्या रूपानें बाजूस ठेवलेली सर्व रक्कम भांडवली वस्तूवरील खर्चासाठीं उपलब्ध होते आणि शिल्लक व भांडवल-गुंतवण असमान अशी परिस्थिति कधींच उद्भवत नाहीं. सारांश, पूर्ण रोजगार तर प्रस्थापित होतोच आणि पूर्ण रोजगार असतां पडणाऱ्या शिलकीच्या एवढी भांडवल-गुंतवण होण्यास कोणतीहि आडकाठी नसल्यानें पूर्ण रोजगार टिकून राहतो.

ह्याचा अर्थ असा नव्हे कीं, प्रत्येक वस्तूचें उत्पादन-प्रमाण टिकाऊ ठरतें. खर्च तेवढाच असूनहि वस्तू-वस्तूवरील खर्च कमीजास्त होऊं शकतो.

तसें झाल्यास कांहीं वस्तूंचें उत्पादन कमी तर कांहीं वस्तूंचें उत्पादन जास्त होतें. त्यामुळें ज्या वस्तूंच्या उत्पादनांत कपात होते तेथें बेकारी होते; पण ही बेकारी टिकाऊ ठरत नाहीं. कारण थोड्याच काळांत बेकार झालेले लोक ज्या वस्तूचें उत्पादन वाढतें त्या वस्तूच्या उत्पादनांत काम मिळवूं शकतात. एका वस्तूचा खर्च लोकांनीं कमी करून दुसऱ्या वस्तूवरील खर्च वाढविला तरी कांहीं एक बिघडत नाहीं; एवढेंच नव्हे तर उपभोग्य वस्तूवरील खर्च कमी करून शिल्लक वाढवावयाचें समाजानें ठरविलें तरी सुद्धां कांहीं बिघडत नाहीं. त्यामुळें एकूण खर्च कमी होण्याचें कारणच नसतें. त्यामुळें कांहीं झालें तरी तें एवढेंच होतें कीं, उपभोग्य वस्तूचें उत्पादन कमी होऊन भांडवली वस्तूचें उत्पादन वाढतें. सारांश, (अ) शिल्लक बहुतांशीं व्याजाच्या दरावर अवलंबून असते. म्हणून व्याजाचा दर वाढला कीं, ती वाटेल तेवढी वाढूं शकते. तसेंच (आ) शिलकीचें भांडवल-गुंतवणांत आपोआप रूपान्तर होतें. ह्या दोन समजुतींवर सेचा बाजाराचा सिद्धान्त आधारलेला आहे.[८]

अपूर्ण रोजगाराच्या समतोलाची कीन्सकृत मीमांसा :—पूर्ण रोजगारांसाठीं लागणारी भांडवल-गुंतवण होण्याची हमी अर्थव्यवस्थेंत नेहमींच असते, हीच गोष्ट नेमकी कीन्सवादी अर्थशास्त्रानें नाकारली आहे. रोजगारासंबंधीची कीन्सकृत मीमांसा पुढीलप्रमाणें सांगतां येईल :—

(१) **समस्त रोजगार समस्त खर्चावर अवलंबून** :—अर्थव्यवस्थेंत एकंदर किती लोकांना रोजगार उपलब्ध होतो हें एकंदर खर्च किती होतो ह्यावर अवलंबून असतें. समस्त खर्च समस्त रोजगार (Aggregate Employment) निश्चित करतो असें म्हणण्यास हरकत नाहीं.[९] समस्त खर्चांत कोणत्याहि कारणानें वाढ झाल्यास एकंदर उत्पादनांत वाढ होऊन रोजगारांत वाढ होते. उलट समस्त खर्च कोणत्याहि कारणानें कमी झाल्यास उत्पादन कमी होऊन रोजगारहि कमी होतो.

[८] Translated into modern terms, Say's market law that supply creates its own demand means that savings are automatically the same as investment without the benefit of any mechanism to bring savings into equilibrium with investment. This version assumes that investment opportunities are unlimited at the going rate of interest. What is implied here is that there can be no such thing as oversaving or underinvestment. The theory simply does not admit of the possibility of excess of saving over investment. **Kurihara.**

[९] The general or overall level of employment depends on the total rate at which money is being spent on buying all kinds of goods and services—**Lerner.**

(२) **भांडवल-गुंतवणांत सतत वाढ होणें आवश्यक** :—पूर्ण रोजगार प्रस्थापित होण्यासाठीं उत्पादनांत म्हणजे पर्यायानें भांडवल-गुंतवणांत सतत वाढ होणें अत्यावश्यक असतें.

(३) **भांडवल-गुंतवण सतत वाढणें कठिण** :—पण उत्पादन जसजसें वाढत जातें तसतशी भांडवल-गुंतवण वाढणें अधिकाधिक कठीण होतें. कारण उत्पादन वाढूं लागलें म्हणजे समस्त उत्पन्नहि वाढूं लागतें. उत्पन्न ज्या प्रमाणांत वाढत जातें त्यापेक्षां अधिक प्रमाणांत शिल्लक वाढत जाते. (शिल्लक ही व्याजाच्या दरावर फारशी अवलंबून नसते. प्रामुख्यानें ती उत्पन्नावर अवलंबून असते.) ह्याला कारण घटती उपभोगप्रवृत्ति असते. ह्या प्रवृत्तीचा अर्थ असा होतो कीं, उत्पन्न ज्या प्रमाणांत वाढतें त्या प्रमाणांत उपभोगावरील खर्च वाढत नाहीं. उपभोगावरील खर्च उत्पन्नापेक्षां कमी प्रमाणांत वाढतो.[१०] एकंदर समाजाचें उत्पन्न जसें वाढत जातें तसा उपभोगखर्च कमी होत असल्यामुळें भांडवलाची फलक्षमता कमी होत जाण्याचा संभव असतो. उपभोगावरील खर्च उत्पादनाच्या प्रमाणांत वाढत नाहीं. ह्या दृश्याचा उद्योगपतींच्या अपेक्षावर विपरीत परिणाम होण्याचा संभव असतो. उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनांतून जेवढ्या उत्पन्नाची निर्मिती होते तेवढा खर्च त्या वस्तूंवर केला जात नाहीं, असें जेव्हां उद्योगपतींना आढळून येतें तेव्हां उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनासंबंधींच्या निर्णयांची फेरतपासणी करून उत्पादन कमी करण्याची प्रवृत्ति उद्योगपतींत दिसून येते. थोड्याच अवधींत त्यामुळें भांडवल-गुंतवण कमी होऊं लागते. सारांश, समाजाचें एकंदर उत्पन्न जसें वाढूं लागतें तेव्हां एका बाजूनें शिल्लक वाढते; पण दुसऱ्या बाजूनें भांडवलाची फलक्षमता कमी होऊन वाढलेल्या शिलकीचें भांडवल-गुंतवणांत रूपान्तर होण्याची शक्यता कमी होत जाते. किंवा असेंहि म्हणतां येईल कीं, समाजाचें उत्पन्न जसें वाढत जातें तसें योजलेली भांडवल-गुंतवण व योजलेली शिल्लक ह्यांच्यांतील **अंतर** वाढत जातें. अशा परीस्थितींतहि भांडवल-गुंतवण वाढावयाची असल्यास व्याजाचा दर सतत कमी व्हावा लागतो. कारण भांडवल-गुंतवणीचें प्रमाण भांडवल-गुंतवण व व्याजाचा दर ह्यांच्या तुलनेवर अवलंबून असतें. व्याजाचा दर हा मुद्दाम प्रयत्न केला नाहीं

---

[१०] The relation between income and consumption is called propensity to consume. The conception of marginal propensity to consume is exceedingly important in employment analysis. " The marginal propensity to consume may be defined as the ratio of the change in consumption to the change in income or as the rate of change in average propensity to consume as income changes. " Keynes' law of consumption states that as income increases marginal propensity to consume decreases or in other words when aggregate income increases, consumption expenditure will also increase but by a somewhat smaller amount.

तर सहसा कमी होत नाहीं. कारण रास्त व्यजाचा दर कोणता ह्यासंबंधीं लोकांच्या मनांत ज्या कल्पना असतात त्यांवर तो बऱ्याच प्रमाणांत अवलंबून असतो. त्यापेक्षां तो कमी होऊं लागल्यास रोकड प्राधान्य प्रवृत्ति वाढण्याचा धोका असतो. मुद्दाम प्रयत्न करूनहि व्याजाचा दर फार खालीं आणतां येत नाहीं असा अनुभव आहे. सारांश, भांडवलाची फलक्षमता सतत कमी होत असेल आणि व्याजाचा दर ताठर असेल तर भांडवल गुंतवण वाढत जाणें कठीण असते. पूर्ण रोजगार प्रस्थापित होण्यापूर्वींच (घटत्या उपभोग प्रवृत्तीच्या प्रभावामुळें) भांडवलगुंतवणींत वाढ होण्याचें थांबणें हेंच अधिक संभवनीय असल्यामुळें पूर्ण रोजगार आपोआप प्रस्थापित होईल असें म्हणण्यांत अर्थ नाहीं [११]

(४) **पूर्ण रोजगार टिकणें कठीण :**—पूर्ण रोजगार यदाकदाचित प्रस्थापित झालाच तर विशेष प्रयत्नाशिवाय टिकून राहणें फारच कठीण आहे. कारण पूर्ण रोजगार असतां अर्थव्यवस्थेकडून होणारें एकंदर उत्पादन सर्वांत जास्त असतें व शिलकीचें प्रमाणहि सर्वांत अधिक असतें. ह्या परिस्थितींत शिल्लक व योजलेली भांडवलगुंतवण सारखीं होणें ही सर्वांत कठीण गोष्ट असते. म्हणून पूर्णरोजगार परिस्थितींतले उत्पादन गांठलें जाण्याची व गांठलें गेल्यास टिकण्याची शक्यता फार कमी असते. प्रत्यक्षांत योजलेली भांडवल गुंतवण व शिल्लक समान होणें समतोलासाठीं अपरिहार्य असल्यानें जें उत्पादन असतां त्यांच्यांत समानता निर्माण होईल तेंच उत्पादन गांठलें जातें. आतांपर्यंतच्या विवेचनाच्या आधारें असें म्हणतां येईल कीं, हें उत्पादन पूर्ण रोजगाराच्या परिस्थितींत होणाऱ्या उत्पादनापेक्षां कमी असणें, आणि म्हणून पूर्ण रोजगाराचा अर्थव्यवस्थेंत अभाव असणें, हीच गोष्ट अधिक संभवनीय म्हटलें पाहिजे तेव्हां अपूर्ण **रोजगाराचा समतोल हाच अर्थव्यवस्थेचा खरा नियम व पूर्ण रोजगार अपवाद आहे** असें म्हटलें तरी बिघडणार नाहीं. सारांश, आर्थिक व्यवस्थेंत पूर्ण रोजगार आपोआप प्रस्थापित होईलच आणि झाला तर टिकून राहीलच ही कल्पना भ्रामक आहे. [१२]

(५) **वेतन व समस्त रोजगार ह्यांच्यांतील संबंधाचें स्वरूप :**—सेच्या सिद्धान्ताच्या प्रभावामुळें वर्षणी किंवा मोसमी नसलेली बेकारी बेकार कामगारांची

---

[११] A private enterprise system, in the nature of the case is compelled to stop short of full employment.

[१२] The theoretical possibility of secular under employment arises from (a) The propensity to invest, which is not high enough to offset full-employment savings and (b) The propensity to save or its inverse, the propensity to consume, which remains more or less stable relative to the unstable propensity to invest. Given these propensities to save and to invest the economy may be in equilibrium far short of full employment for an indefinite period of time—**Kurihara.**

विद्यमान वेतनावर काम करण्याची कामगाराची तयारी नसते म्हणून निर्माण होते असें मानण्याची जुन्या अर्थशास्त्राची प्रवृत्ति होती. तसें असल्यास मजुरी कमी झाल्यास बेकारी नाहींशी होईल हें ओघानेंच येतें; पण तसें नसतें. कारण एकतर विद्यमान वेतनावर काम करण्याची तयारी असूनहि बेकारांना काम मिळू शकत नाहीं ही वस्तुस्थिति आहे. शिवाय वेतन कमी झाल्यास उत्पन्नांत कपात होऊन समस्त खर्च कमीच होईल. त्यामुळें उत्पन्न व रोजगार कमीच होऊं पाहील.[१३]

प्रमुख संदर्भग्रंथ

(1) Keynes--General Theory of Interest employment and Money.
(2) Hansen--Monetary Theory and Fiscal Policy.
(3) Kariharv--Monopoly Theory Public Policy.
(4) Lerner—Economics of Employment.
(5) Harris--The New Economics.

: १९ : अनियोजित, नियंत्रित व नियोजित अर्थव्यवस्था

अनियोजित अर्थव्यवस्थेंतील पांच अनिष्ट प्रवृत्ति :—प्रस्तुत ग्रंथांत मुख्यतः अनियोजित अर्थव्यवस्थेचा कारभार कसा चालतो, ह्याचें विवेचन केलें आहे. त्या विवेचनावरून अनियोजित अर्थव्यवस्थेच्या कारभारांत दिसून येणाऱ्या अनिष्ट प्रवृत्ति कोणत्या व त्या कां उद्‌भवतात ह्याचा उलगडा होण्यास मदत व्हावी. अनियोजित अर्थव्यवस्थेंतील अनिष्ट प्रवृत्तींपैकीं पांच विशेष उल्लेखनीय आहेत. त्या म्हणजे (१) **आर्थिक विषमता** निर्माण होऊन ती वाढत जाण्याची प्रवृत्ति, (२) **अपूर्ण रोजगाराची** प्रवृत्ति, (३) आर्थिक विषमता व बेकारीची भीति ह्यांमुळें वेतनावरच प्रामुख्यानें अवलंबून असणाऱ्या बहुसंख्य लोकांच्या जीवनांत **आर्थिक असंतोष** व **आर्थिक असुरक्षतेची भावना** निर्माण होण्याची प्रवृत्ति, (४) **आर्थिक असंतोष** व त्यांतून उद्‌भवणारी वर्गसंघर्षाची प्रवृत्ति व (५) **आर्थिक आंदोलनें** ह्या होत. अनियोजित अर्थव्यवस्थेचे--म्हणजेच पर्यायानें अनियंत्रित भांडवलशाहीचे--ह्या पांच प्रवृत्ति म्हणजे पांच प्रमुख दोष आहेत असें म्हणतां येईल.

[१३] A wage deflation will result in a general income deflation and will have unfavourable repurcussions on expectations, investment, production and employment.

अपूर्ण रोजगारीची प्रवृत्ति सर्वांत अनिष्ट :—वरील पांच अनिष्ट प्रवृत्त्यांपैकीं अपूर्ण रोजगारीची प्रवृत्ति सर्वांत अनिष्ट मानण्याचा कल आधुनिक अर्थशास्त्रांत दिसून येतो. त्या प्रवृत्तीला विशेष महत्त्व दिलें गेलें आहे, ह्याचें एक महत्त्वाचें कारण आहे. तें असें कीं, पूर्ण रोजगार प्रस्थापित झाल्यास—म्हणजेच अर्थव्यवस्थेंत प्रत्येकाला चरितार्थाचें खात्रीचें साधन उपलब्ध झाल्यास—इतर दोष कमी होण्यास कांहीं प्रमाणांत मदत होते. त्यानंतर इतर दोष थोड्या प्रमाणांत टिकून राहिले तर ते फारसे जाणवत नाहींत. ह्या विचारांत तथ्य आहे हें मान्य केलें पाहिजे. कारण पूर्ण रोजगारापासून अर्थव्यवस्था कदापि न ढळल्यास आर्थिक आंदोलनांचा म्हणजे वरीलपैकीं पांचव्या अनिष्ट प्रवृत्तीचा प्रश्नच उद्‌भवत नाहीं. पूर्ण रोजगाराची वेतनमान वाढण्यास आणि त्या प्रमाणांत आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होते. शिवाय पूर्ण रोजगारासाठीं जे उपाय आधुनिक अर्थशास्त्रज्ञ सांगतात त्यांमध्यें आर्थिक विषमता कमी करणें ह्या उपायाला विशेष स्थान दिलें आहे. आर्थिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न केल्यास ज्यांची सीमान्त उपभोग प्रवृत्ति कमी आहे त्यांच्या हातांतून ज्यांची सीमान्त उपभोग प्रवृत्ति अधिक आहे त्यांच्याकडे पैसा येतो आणि त्यायोगें उपभोग-खर्च वाढून उत्पादन व रोजगार वाढण्यास हातभार लागतो, अशी कीन्सप्रणीत अर्थशास्त्राची ह्याविषयींची मीमांसा आहे.[१] पूर्ण रोजगाराच्या हेतूनें कां होईना आर्थिक विषमता कमी करण्यांत आली कीं वर्गसंघर्ष, आर्थिक असुरक्षितता ह्या दोषांची तीव्रता कमी होते. अशा प्रकारें **पूर्ण रोजगाराला भांडवलशाहीच्या नव्या अर्थशास्त्रांत मूलभूत स्थान** दिलें जातें व **पूर्ण रोजगार प्रस्थापित करणें हें अर्थव्यवस्थेचें साध्य** मानलें जावे असा आग्रह धरण्यांत येतो.

निर्हस्तक्षेपाची नीति :—अनियोजित अर्थव्यवस्थेंतील सर्व अनिष्ट प्रवृत्ति दूर करणें व विशेषतः पूर्ण रोजगार प्रस्थापित करणें हें अर्थव्यवस्थेचें साध्य मानल्यास निर्हस्तक्षेपाचें धोरण राज्यसंस्थेनें स्वीकारणें इष्ट, ह्या विचाराला अर्थातच मान्यता देतां येत नाहीं. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनीं निर्हस्तक्षेपाच्या नीतीचा (Laissez Faire Policy) हिरीरीनें पुरस्कार केला. कारण निर्हस्तक्षेपाचें धोरण राज्यसंस्थेनें स्वीकारल्यासच पूर्ण रोजगार आपसूक प्रस्थापित होईल व अर्थव्यवस्था सदैव प्रगतिपथावर राहूं शकेल अशी त्यांची श्रद्धा होती.[२]

निर्हस्तक्षेपाची नीति ज्यांनीं सांगितली त्या ॲडॅम स्मिथ प्रभृति अर्थशास्त्रज्ञांच्या विचारामागें एक निश्चित तत्त्वज्ञान होतें. आपलें हित कशांत आहे, हें व्यक्तीचें व्यक्तीलाच कळतें. प्रत्येक व्यक्तीनें आपला स्वार्थ साधला तर समाजाचा स्वार्थ

---

[१] Although functional finance has nothing to say about equality as an end in itself "The maintenance of continuous full employment will result in greater equality"—**Lerner**

[२] It reduces inequality even between different groups of workers by promoting mobility of labour.

आपोआपच साधतो. कारण व्यक्तिहित व समाजहित परस्परविरोधी नाहींत, ह्या शब्दांत त्या तत्त्वज्ञानाचा आशय सांगतां येईल. स्पर्धा आणि सहकार्य ह्या दोन्ही गोष्टी स्वयंप्रेरित असणेंच इष्ट. स्वयंप्रेरित व अनियंत्रित स्पर्धेमुळें व सहकार्यामुळें एकंदर समाजाचें अहित होण्याचा संभव कमी असतो. कारण स्पर्धेमध्यें जे समाजहित करतात तेच टिकून राहतात. स्वहितासाठीं जेथें आवश्यक असतें तेथें लोक आपोआपच सहकार्याला प्रवृत होतात; असेंच सहकार्य समाजहिताला पोषक ठरतें.[३]

जुन्या अर्थशास्त्रांत मानवी कल्याणाला प्राधान्य :—जुन्या सनातनवादी अर्थ-शास्त्रज्ञांना अन्याय करावयाचा नसेल तर एक गोष्ट येथें कबूल केली पाहिजे. ती ही कीं, अर्थशास्त्र मानवी कल्याणाशीं संबंधित आहे व मानवी कल्याण हा विचार डोळ्या-समोर ठेवूनच अर्थव्यवस्थेंतील प्रवाह प्रवृत्तींचा अभ्यास अर्थशास्त्र ानें केला पाहिजे, ह्या कल्पनेनें जुन्या अर्थशास्त्रज्ञांचें सर्व लिखाण भरून गेलें आहे. त्यांनीं केलेला निर्हस्त-क्षेप-नीतीचा पुरस्कार आज चूक वाटत असेल; पण तो जेव्हां केला गेला तेव्हां त्याच्या-मागें मानवी कल्याणाची दृष्टीच होती ह्यांत शंका नाहीं. म्हणूनच कल्याणाच्या दृष्टीनें निर्हस्तक्षेपाच्या तत्त्वाला मुरड घालण्याची त्यांची नेहमींच तयारी होती.[४] पण एकंदरीनें सरकारच्या हातांत सत्ता मोठ्या प्रमाणावर केन्द्रित झाल्यानें ती नीट वापरली जाणार नाहीं व समाजाचें परिणामीं नुकसानच होईल, अशी त्यांची भावना असल्यानें निर्हस्त-क्षेपाला घालावी लागणारी मुरड हा आपद्धर्म समजण्याचीच त्यांची प्रवृत्ति होती. सत्तेच्या केन्द्रीकरणाला त्यांचा किती विरोध होता, हें समाजवादाला त्यांचा जो प्रखर विरोध होता त्यावरून उमजतें.[५]

---

२ Our economy does not need any guidance. It is a complete self-sufficient and self-regulating mechanism which would automatically give us full employment, if we would only refrain from interfering with it. This can be doubted only by those who do not understand it or who wish to destroy it.

३ They believed that objective of economic activity was best attained by a system of spontaneous co-operation and that the motive of self-interest conduced to the interests of all concerned by the mechanism of the market and the force of competition.

४ The Principle of Laissez Faire may be safely trusted in some things but in many more it is surely inapplicable and to appeal to it on all occasions savours more of the policy of a parrot than that of a statesman or a philosopher—**Macculah**

It is the duty of a Government to do whatever is conducive to the welfare of the governed—most fatal of all the errors would be the general admission that a Government has no right to interfere for any purpose except that of affording protection.

—Senior

निर्हस्तक्षेप-नीति त्याज्य :—अनियोजित अर्थव्यवस्थेच्या कारभारांत दिसून येणाऱ्या ह्या प्रकरणाच्या सुरुवातीस सांगितलेल्या पांच दोषांमुळें निर्हस्तक्षेपाचें धोरण त्याज्य आहे, असें मानण्याची आजच्या अर्थशास्त्राची प्रवृत्ति आहे. समाजहितास जें पोषक तेंच व्यक्तिहितास पोषक असतें हें आधुनिक अर्थशास्त्रज्ञांना मान्य नाहीं.[६] निर्हस्तक्षेप नीतीमुळें अर्थव्यवस्थेला इष्ट वळण लागतें, हा आशावाद देशोदेशांतील प्रत्यक्ष अनुभवानें फोल ठरला आहे. कीन्सप्रणीत अर्थशास्त्रानें तर असें दाखवून दिलें आहे कीं, अर्थव्यवस्थेंतील प्रवृत्ति-प्रवाहांना अनि ंत्रित सोडलें तर पूर्ण रोजगार प्रस्थापित होईलच अशी हमी देतां येत नाहीं. उलट तसें न होणें हेंच अधिक संभवनीय असतें. अपूर्ण स्पर्धेबाबतचें आधुनिक अर्थशास्त्र हेंच सांगतें कीं, मनुष्यस्वभाव पाहतां पूर्ण स्पर्धा हा अपवाद आणि मक्तेदारीची प्रवृत्ति हाच नियम होय. एवढेंच नव्हे तर कोठें स्पर्धा असेल तर तिचीच परिणती मक्तेदरींत होते. कारण विशिष्ट वर्गाला आपल्या हितसंबंधांच्या दृष्टीनें स्पर्धा चालू ठेवणें परवडत नाहीं.[७] म्हणजेच अनियोजित अर्थव्यवस्थेंत मक्तेदारी व तींतून उद्भवणारे आर्थिक विषमता, समान-संधीचा अभाव हे प्रभाव निर्हस्तक्षेप नीतीचा अवलंब करणाऱ्या देशांत अटळ आहेत. कामगार-मालक हितसंबंध बहुतांशीं परस्परविरोधी असल्यानें वर्गसमन्वय न होणें आणि मधूनमधून औद्योगिक कलह उद्भवणें हेंच साहजिक. ह्या परिस्थितींत निर्हस्तक्षेपाच्या धोरणाला आधुनिक आर्थिक विचाराची मान्यता न मिळाल्यास त्यांत नवल नाहीं.

नियंत्रित अर्थव्यवस्थेचा पुरस्कार :—निर्हस्तक्षेपनीति त्याज्य मानल्यास नियंत्रित अर्थव्यवस्थेचा पुरस्कार ओघानेंच येतो. अर्थव्यवस्थेला इष्ट वळण लावण्या-साठीं राज्यसंस्थेनें योग्य आर्थिक नीति (Economic Policy) स्वीकारावी व ती यशस्वी करण्यासाठीं जरूर तीं नियंत्रणें बसविण्यास मागें पुढें पाहूं नये अशी आधुनिक अर्थशास्त्राची विचारसरणी आहे. मात्र संपूर्णपणें अनियोजित अर्थव्यवस्थेला पर्याय म्हणून नियंत्रित किंवा निराळ्या शब्दांत मिश्र अर्थव्यवस्थेचा जे अर्थशास्त्रज्ञ पुरस्कार करतात त्यांचा असा जोरदार आग्रह असतो कीं, खाजगी साहसाचा तेजोभंग करणें हा नियंत्रणांचा उद्देश कदापि नसावा. उलट खाजगी साहसाला अधिक कार्यक्षम व समाज-हितसन्मुख करणें हाच कोणत्याहि नियंत्रणांचा मूलभूत

[५] Even plunder or confiscation is less fatal to abstinence than what is called socialism or communism. The first only incidentally diminishes the motives of production; the second aims specifically at destroying them—The Socialist nation, unless it is to starve, must be divided into slaves and slavedrivers—**Senior**.

[६] It is not always in the interests of individuals to do that which is good for the community as a whole—**Lerner.**

[७] The workings of competition educate men progressively for monopoly—**Knight**.

उद्देश्य असावा. तसेंच आर्थिक धोरण व तदनुषंगानें येणारी आर्थिक नियंत्रणें लोकशाही मार्गानें संमत झालेली असावींत व लोकशाहीच्या मूलभूत कल्पनांशीं सुसंगत असावींत असाहि त्यांचा आग्रह असतो. सरकारचा अर्थव्यवस्थेंतील हस्तक्षेप कार्ययुक्त डोळस व कार्यक्षम असूं शकतो व अशा हस्तक्षेपानें लोकशाहीला धोका न पोंचता उलट हुकूमशाहीची वाटचाल थोपवली जाते असा मिश्र अर्थव्यवस्थेच्या पुरवठ्यांचा दावा आहे.[८] मिश्र अर्थव्यवस्थेच्या म्हणजेच पर्यायानें नियंत्रित अर्थव्यवस्थेच्या पुरस्कारामागें जी विचारसरणी आहे तिची दोन सूत्रें सांगण्याजोगी आहेत. पहिलें सूत्र असें कीं, अर्थव्यवस्था विशिष्ट वर्गाच्या हितसंबंधाच्या रक्षणासाठीं व वृद्धीसाठीं चालवली जात नसून समाज कल्याणासाठीं चालवली जाते हें पाहणें समाजांतील सार्वभौम सत्ता ह्या नात्यानें सरकारचें कर्तव्य आहे.[९] दुसरें सूत्र असें कीं, विद्यमान संस्थांचा जास्तींत जास्त उपयोग करून घेणें हाच समाज सुधारणेचा खरा मार्ग आहे. त्यांचा नाश करणें हा नव्हे. विद्यमान संस्थांचा समूळ नाश केला कीं, जगाच्या कारभारांत आपोआप सुधारणा होते हा आशावाद फोल आहे.[१०]

कार्यप्रवण आर्थिक नीतीची व्याप्ति:—कार्य-प्रवण आर्थिक नीतीमध्यें **चलन-नीति** (Monetary Policy), **अर्थसंकल्पीय-नीति** (Fiscal or Policy) ह्यांचा प्रामुख्यानें समावेश होतो. चलन-नीतींत एकंदर चलन-पुरवठा व चलनाचा वापर ह्या विषयींचे सरकारी धोरण अंतर्भूत होते. त्या धोरणाच्या अनुषंगानें जीं नियंत्रणें उपयोगांत आणली जातात त्यांना **चलन-नियंत्रणें** (Monetary controls) म्हणतात. चलन-नियंत्रणांचा आर्थिक नीतीचें साधन म्हणून उपयोग करणें शक्य होतें. कारण चलन-पुरवठ्यावर सरकारचा संपूर्ण ताबा असतो आणि चलन-पुरवठा हा आजच्या अर्थव्यवस्थेंतील अतिशय महत्त्वाचा प्रवाह असल्यानें चलन-पुरवठा कमी करून अप्रत्यक्षपणें अर्थव्यवहारांचें नियंत्रण करण्याचा प्रयत्न सरकारला करतां येतो. उदाहरणार्थ, व्याजाच्या दरावर खाजगी भांडवल-गुंतवण अवलंबून असते आणि व्याजाचा दर आधुनिक मीमांसेप्रमाणें चलन-पुरवठ्यावर अवलंबून असतो. साहजिकच

---

८ By making private enterprise society better, it would weaken such forces of collectivism as are built on unthinking discontent.

९ It favours the acceptance of Governmental responsibility for seeing that the economy as a whole operates for the general interests and not for the benefit of purely sectional private interests.

१० It tries to make use of any useful existing institutions and to make them work better. It is directly contrary to the idea that the way to make things better is to destroy what exists and believe that a better world would automatically emerge from the ruins —**Lerner**

चलन-पुरवठा कमीजास्त करून व्याजाच्या दरांत इष्ट असा बदल घडवून आणणें व त्या मार्गानें भांडवल-गुंतवण, उत्पादन व रोजगार ह्यांना इष्ट वळण लावणें ह्या दिशेनें प्रयत्न करतां येतो. अर्थसंकल्पीय नीतीमध्यें सरकारचें कर-विषयक धोरण व सरकारी खर्चासंबंधीचें धोरण ह्यांचा प्रामुख्यानें अंतर्भाव होतो. अर्थसंकल्पीय नीतीचा मुख्य उद्देश देशांतील समस्त खर्च व त्या खर्चाचा खाजगी खर्च व सरकारी खर्च ह्या दोन महत्त्वाच्या **अर्थप्रवाहांत** (Economic forces) इष्ट दिशेनें व इष्ट गतीनें बदल घडवून आणणें असा असतो. अर्थसंकल्पीय नीतीच्या अनुषंगानें जो विविध प्रकारची नियंत्रणें बसविलीं जातात त्यांना **अर्थसंकल्पीय नियंत्रणें** (Fiscal controls) म्हणतात. आर्थिक व्यवस्थेंतील कोणत्या कार्याची जबाबदारी घ्यावयाची, त्यांवर एकूण पैसा किती खर्च करावयाचा, खर्चाची विभागणी कशा प्रकारें करावी, जरूर तेवढा पैसा कोणत्या मार्गांनीं उभा करावयाचा, करांचा बोजा विविध वर्गांवर किती प्रमाणांत टाकावयाचा, हें सर्व सरकारच ठरवितें. ह्या सर्व बाबतींत सरकारकडून जे निर्णय घेतले जातात त्यांना अर्थव्यवस्थेंत फार महत्त्वाचें स्थान असतें. कारण उपभोग, उत्पादन, विनिमय, विभाजन ह्या प्रमुख अर्थक्रियांवर परिणाम करण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत असतें. त्यामुळें आपल्या अर्थव्यवहाराबाबत संकलित विचार करून अर्थव्यवस्थेला इष्ट वळण लावण्याचा प्रयत्न करणारें धोरण सरकारला आंखतां येतें.

सरकारचें खाजगी अर्थव्यवहारावरील नियंत्रण अप्रत्यक्ष असतें किंवा तें प्रत्यक्षहि असूं शकतें. जेव्हां आपली धोरणें यशस्वी होण्यासाठीं उत्पादनाचा कांहीं भाग सरकारकडून आपल्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं घेतला जातो तेव्हां प्रत्यक्ष नियंत्रणाचा भाग सरकारकडून स्वीकारला गेला असें म्हणतां येईल. अर्थात् एका क्षेत्रांतील प्रत्यक्ष नियंत्रण दुसऱ्या क्षेत्रांत अप्रत्यक्ष नियंत्रणास कारणीभूत होतें, हें लक्षांत ठेवलेंच पाहिजे. अर्थव्यवस्थेचा कांहीं भाग प्रत्यक्षपणें आपल्या ताब्यांत सरकारकडून जेव्हां घेतला जातो तेव्हां अर्थव्यवस्थेचे सरकारी क्षेत्र व खाजगी क्षेत्र असे दोन सुस्पष्ट भाग पडतात, आणि जिला मिश्र अर्थव्यवस्था म्हणतात ती अस्तित्वांत येते. नियंत्रित अर्थव्यवस्था व मिश्र अर्थव्यवस्था हे शब्दप्रयोग समानार्थी वापरण्यानें फारसें बिघडत नसलें तरी तात्त्विक चर्चा करतांना त्यांच्यांतील भेद स्पष्ट करणें अगत्याचें असते. जेव्हां आर्थिक नीति यशस्वी करण्यासाठीं उत्पादन क्षेत्राचा कांहीं भाग प्रत्यक्ष सरकारी मालकीचा होतो तेव्हांच मिश्र-अर्थव्यवस्था अस्तित्वांत येते. अप्रत्यक्ष नियंत्रणांनीं भागत नाहीं असें आढळून आल्यामुळें नियंत्रित अर्थव्यवस्थेचा पुरस्कार हा अलीकडे मिश्र-अर्थव्यवस्थेचा पुरस्कार होऊं पाहात आहे.

आर्थिक नियोजन :—अनियोजित अर्थव्यवस्थेंत दिसून येणारे दोष केवळ आर्थिक नियंत्रणानें दूर होतील, हा कीन्सप्रणीत अर्थशास्त्राचा दावा आहे. हा दावा अनेक अर्थशास्त्रज्ञांना—विशेषतः समाजवादी अर्थशास्त्रज्ञांना—मान्य नाहीं. त्यांच्या मतें अनियोजित अर्थव्यवस्थेचे दोष नियोजित अर्थव्यवस्थेनेंच—म्हणजे आर्थिक

नियोजनानेंच—दूर होऊं शकतील. आर्थिक नियोजनामध्यें राज्यसंस्थेच्या कार्याच्या कक्षा अतिव्याप्त होतात आणि देशांतील समग्र उत्पादनसाधनांचा विनियोग समाजहिताच्या दृष्टीनें करणें हें कार्य त्यांत समाविष्ट होतें.[११]

आर्थिक नियोजनाच्या विविध व्याख्या:—आर्थिक नियोजनाच्या विविध व्याख्या करण्यांत आलेल्या आहेत. त्यांमधील '**महत्त्वाचे आर्थिक निर्णय, म्हणजे कशाचें, किती, कोठें व कसें उत्पादन करावयाचें व उत्पादनाचें विभाजन कसें करावयाचें ह्याविषयींचें निर्णय, अर्थव्यवस्थेचा समग्र व सांगोपांग विचार करून प्रस्थापित सरकारकडून जाणीवपूर्वक घेतले जातात तेव्हां त्या घटनेला आर्थिक नियोजन म्हणावें**. ही व्याख्या विशेष उल्लेखनीय आहे.[१२] वरील व्याख्या ग्राह्य धरल्यास नियोजनाचीं तीन वैशिष्टचें असतात असें म्हणतां येतें. तीं पुढीलप्रमाणें:—
(१) नियोजनांत अर्थव्यवस्था अविभाज्य आहे असें मानलें जातें व सर्व उपलब्ध साधनसामग्रीचा विचार करून त्यांचा विनियोग कसा करावयाचा हें ठरविलें जातें.[१३]
(२) नियोजनांत आर्थिक निर्णय घेण्याच्या सत्तेचें केन्द्रीकरण अपरिहार्य असतें. नियोजनाच्या संदर्भात केन्द्रीकरण ह्याचा अर्थ उत्पादनसाधनांच्या मालकीचें

---

[११] Economic planning consists in the extension of the functions of public authorities to the organisation and utilisation of economic resources. It is based on the belief that by central control of the national economy certain aims may be attained which cannot be achieved by an unplanned economy; that a country's productive resources must be utilised as a whole and in the interests of the whole of its people; and that this utilisation with result in large scale economics.—**Zweig**

It is asserted that planned economy (a) is more efficient than an unplanned economy in regard to the full utilisation of available resources, (b) is more suitable for achievement of ends economic, political or social, (c) is more suitable instrument of doing things urgently and quickly.

[१२] Planning consists of "The making of major economic decisions, what and how much is to be produced, how, when and where it is to be produced, and to whom it is to be allocated by the conscious decision of a determined authority on the basis of a comprehensive survey of the economic system as a whole —**Dickinson.**

[१३] Planning implies the management of national economy as a whole. The major idea of planning is that all the productive resources of a country should be directed rationally and consciously as correlated parts of a single whole—**Zweig.**

केन्द्रीकरण, उत्पादनाचें केन्द्रीकरण किंवा उत्पादनावरील नियंत्रणाचें केन्द्रीकरण ह्यांपैकीं कांहींहि होऊं शकतें. ह्यांपैकीं एकाच अर्थानें, दोन अर्थांनीं किंवा तिन्ही अर्थांनीं केन्द्रीकरण होणें हें प्रामुख्यानें नियोजनाच्या स्वरूपावर अवलंबून असतें.[१४] तिन्ही प्रकारचें केन्द्रीकरण होणें हें नियोजनाच्या विविध प्रकारांतील एक टोंक झालें. केवळ नियंत्रणाच्या अधिकाराच्या केन्द्रीकरणावर भागणें हें दुसरें टोंक झालें. ह्यांत राज्यसंस्थेवर प्रामुख्यानें नियोजनाचा आराखडा करण्याचीच जवाबदारी असते. नियोजनाचा आराखडा पार पाडण्याची जवाबदारी, अपवाद वगळतां, मुख्यत्वेंकरून खाजगी क्षेत्रावरच असते. मात्र खाजगी क्षेत्राचें जरूर त्या प्रमाणांत नियंत्रण करण्याचे अधिकार सरकारकडे असतात. भारतांतील सध्यांचें नियोजन ह्याच धर्तीचें आहे. नियोजनाचा हा सर्वांत साधा प्रकार होय. (नियोजनाचा हा प्रकार तत्त्वतः मिश्र अर्थव्यवस्थेंतच मोडतो.)

नियोजनांतील आर्थिक सत्तेच्या केन्द्रीकरणामुळें उत्पादनविषयक निर्णय घेण्याचा उद्योगपतींचा अधिकार, व्यवसायाची निवड करण्याचा कामगारांचा अधिकार व उपभोगविषयक निर्णय घेण्याचा व्यक्तीचा अधिकार हे सर्व अधिकार व त्यांत अभिप्रेत असलेलें स्वातंत्र्य तत्त्वतः नष्ट होऊन सरकारकडे जातात. प्रत्यक्षांत विविध प्रकारचें आर्थिक निर्णय घेण्याचें व्यक्तीचें स्वातंत्र्य किती प्रमाणांत नष्ट होतें, हें नियोजनाच्या स्वरूपावर अवलंबून असतें. आत्यंतिक नियोजनांत व्यक्तिस्वातंत्र्याचें संपूर्णपणें अपहरण होतें. पण व्यक्तिस्वातंत्र्याचें फार मोठ्या प्रमाणांत अपहरण केल्याशिवायहि नियोजन होऊं शकतें, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. मात्र केवळ तात्त्विक विचार केला तर नियोजनांत व्यक्तिस्वातंत्र्य कमी होण्याचा धोका नेहमींच असतो, हें मान्य केलें पाहिजे.[१५]

(३) आर्थिक नियोजनाला उद्दिष्ट हें असतेंच, मग तें कांहींहि असो. उद्दिष्टाशिवाय नियोजन ह्या शब्दाला अर्थच राहात नाहीं. ज्या हेतूनें नियोजन केलेलें असेल त्या हेतूच्या अनुरोधानेंच सर्व आर्थिक निर्णय नियोजनमंडळाकडून

---

[१४] Planning implies and leads to centralisation of the national economy. By centralisation of the economy is meant either concentration of ownership, centralisation of production or concentration of control.—Zweig

[१५] Planning implies the transfer of essential choice in matters of production, consumption, saving, investment, profession etc. from entrepreneurs, consumers, and workers to the Planning Authority. When all the choices are suppressed the control of national economy is absolute. But the complete suppression of all economic freedom is unlikely and often unnecessary. The extent of suppression depends on the nature of the plan and its purpose

घेतले जातात.[१६] आर्थिक स्वयंपूर्णता, आर्थिक समता, पूर्ण रोजगार, अप्रगत देशांचा आर्थिक विकास इत्यादिपैकीं आर्थिक स्वरूपाचें किंवा अन्य राजकीय अगर सामाजिक स्वरूपाचें कोणतेंहि उद्दिष्ट कांहींहि असो, तें उद्दिष्ट नियोजनाच्या मार्गानेंच अधिक कार्यक्षमतेनें, अधिक सुकरतेनें साधलें जातें, ह्या समजुतीनें नियोजनाचा पुरस्कार देशाची आर्थिक नीति म्हणून केला जातो.

प्रमुख संदर्भग्रंथ

(1) Robbins—The Theory of Economic Policy.
(2) Zweig—The Planning of free Societies.
(3) Lerner—Theory of Employment.

: २० : अर्थशास्त्र :

व्याख्या, स्वरूप, व्याप्ति, कार्यें व उपयुक्तता

अर्थशास्त्राची मार्शलनें केलेली व्याख्या अर्थशास्त्रांतील जुनी परंपरा दर्शविणारी प्रातिनिधिक व्याख्या समजतां येईल. ह्या व्याख्येनुसार अर्थशास्त्र हा मनुष्याच्या व्यावसायिक जीवनाचा अभ्यास आहे. **कल्याणवृद्धि करणाऱ्या मूर्त वस्तु मिळविणें व त्यांचा उपयोग करणें ह्यांच्याशीं ज्यांचा निकटचा संबंध असतो अशा वैयक्तिक व सामाजिक व्यवहारांचा अभ्यास अर्थशास्त्राकडून केला जातो.**[१] ही व्याख्या ग्राह्य धरल्यास मूर्त संपत्ति हा अर्थशास्त्राचा विषय ठरतो व मूर्त संपत्तीशीं संबंधित असलेल्या मानवी जीवनाचा एक भाग अर्थशास्त्राकडून अभ्यासिला जातो असें म्हणावें लागतें. पण ह्या व्याख्येंतील सर्वांत प्रातिनिधिक भाग म्हणजे अर्थशास्त्राचा संबंध मानवी कल्याणाशीं (Welfare) असतो, ही त्यांत अभिप्रेत असलेली गोष्ट होय. अर्थशास्त्राचा संबंध मानवी कल्याणाशीं पोंचतो. कल्याणाची दृष्टि ठेवूनच अर्थशास्त्राकडून मानवी जीवनाच्या विशिष्ट भागाचा--म्हणजे मूर्त संपत्तीशीं संबंधित असलेल्या भागाचा--अभ्यास केला जातो हा विचार अर्थशास्त्रांतील सनातन परंपरेशीं सुसंगत आहे. मानवी कल्याणाचा विचार अर्थशास्त्राच्या अभ्यासांतच अंतर्भूत असल्यानें त्या विषयाच्या अभ्यासावरून निघणारे निष्कर्ष मानवी कल्याणाच्या अभिवृद्धीला उपकारक ठरूं शकतात अशी त्यांची श्रद्धा होती. मनुष्याला मार्गदर्शन

[१६] Planning without purpose is meaningless, planned economy is supposed to be methodically subordinated to certain goods.

[१] Economics is a study of mankind in the ordinary business of life. It examines that part of individual and social action which is closely connected with the attainment and the use of the material requisites of well-being--**Marshall**

करण्याच्या दृष्टीनें अर्थशास्त्राची उपयुक्तता त्यांच्या मतें संशयातीत होती.[२] सनातन अर्थशास्त्राचे विद्यमान अध्वर्यु प्रा. पिगु ह्यांनीं आपल्या अर्थशास्त्रावरील प्रमुख ग्रंथाचें नांव '**कल्याणाचें अर्थशास्त्र**'—Economics of Welfare—असें ठेवलें हें प्रस्तुत संदर्भांत लक्षांत ठेवण्याजोगे आहे. त्या ग्रंथांत पिगु ह्यांनी पैशानें **मापन करतां येणाऱ्या कल्याणाचा विचार** असें अर्थशास्त्राचे कार्य सांगितलें आहे.[३]

प्रा. रॉबिन्स ह्यांची व्याख्या व भूमिका :—मनुष्याचें कल्याण कशानें साधेल हा विचार डोळ्यांसमोर ठेवून मूर्त संपत्तीशीं संबंधित असलेल्या मानवी जीवनाचा अभ्यास करणें हें अर्थशास्त्राचें कार्य आहे. ह्या भूमिकेचें खंडन अलीकडील काळांत प्रा. रॉबिन्स ह्यांनीं केलें आहे. त्यांनीं "**बहुविध साध्यें** (Ends) **व पर्यायी उपयोगाची मर्यादित उत्पादन साधनें ह्यांचा मेळ घालण्याच्या मनुष्याच्या प्रयत्नांचा अभ्यास करणारें शास्त्र** अशी अर्थशास्त्राची व्याख्या केली.[४] ह्या व्याख्येनुसार आर्थिक प्रश्न सोडविण्याची मनुष्याची धडपड हा अर्थशास्त्राचा विषय ठरतो. आर्थिक प्रश्न उद्‌भवण्यास (१) **साध्यांची बहुविधता** (Multiplicity of Ends). (२) **साध्यांचा त्यांच्या महत्त्वानुसार क्रम लावतां येण्याची शक्यता**. (३) **साधनांची मर्यादितता** आणि (४) **साधनांचे पर्यायी उपयोग** ह्या चारी शर्ती पुऱ्या व्हाव्या लागतात. तसें झाल्यास मनुष्यावर साधनांच्या उपयोगाबाबत निर्णय घेण्याचा प्रसंग येतो.

ह्या चारी शर्ती पुऱ्या झाल्यासच आर्थिक समस्या निर्माण होते हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. त्यांतील कोणतीहि एक स्वतंत्रपणें पुरी होऊन भागणार नाहीं. उदाहरणार्थ, बहुविध गरजा भागविण्याची साधनें भरपूर असतीं तर गरजांची बहुविधता ही समस्या झाली नसती. बहुविध गरजांचे क्रम लावतां आले नसते तर कोणत्या गरजांना प्राधान्य द्यावें हा निर्णय घेतांच आला नसता. तसेंच साधनांना पर्यायी उपयोग नसते तर साधनांचा वापर कशासाठीं करावा हें ठरविण्याचा प्रश्नच उपस्थित झाला नसता.[५] साधनांच्या उपयोगाबाबत घ्यावे लागणारे ते निर्णय कोणत्या तत्त्वावर घेतले जातात, हा अर्थशास्त्राचा विषय होतो. साधनांच्या वापराबाबत कोणताहि निर्णय घेतला तरी त्याला आर्थिक बाजू असते. कारण साधनांच्या अनेक उपयोगांपैकीं एका उपयोगाची निवड करणें ह्याचा अर्थ इतर उपयोग बाजूला सारणें असाच होतो. कोणत्याहि साधनाचा अनेक प्रकारें उपयोग

[२] There can be no doubt that they thought that the science which they were in process of discovering was of immense value in forming the basis for an act of policy—**Robbins**

[३] Economics is the study of " that part of welfare which can be brought directly or indirectly into relation with the measuring rod of money. "—**Pigou**

[४] Economics is the science which studies human behaviour as a relationship between ends and scarce means which have alternate uses—**Robbins**

होऊं शकत असला तरी तें एका वेळीं एकाच उपयोगाकरितां वापरतां येतें हें उघड आहे. म्हणूनच साधनांच्या द्वारा कोणतेंहि साध्य साधण्याकरितां इतर साध्यांच्या रूपानें किंमत द्यावी लागते. जें मिळतें त्यापासून होणारें समाधान व जें घालवावें लागतें त्यापासून होणारी हानि ह्यांची तुलना करूनच मनुष्याला कोणताहि निर्णय घ्यावा लागतो. ह्यालाच त्या निर्णयाची आर्थिक बाजू म्हणतात. मानवी जीवनाच्या आर्थिक बाजूचा अभ्यास हेंच अर्थशास्त्राचें कार्य होय.

रॉबिन्स ह्यांच्या व्याख्येंतील आशयाचा विस्तार :—प्रा. रॉबिन्स ह्यांच्या भूमिकेची वैशिष्टचें व परिणाम पुढीलप्रमाणें सांगतां येतील.

(१) **मूर्तवस्तूपुरती अर्थशास्त्राची व्याप्ति संकुचित करणें चुकीचें** :—अर्थशास्त्राची व्याप्ति केवळ मूर्त वस्तूंनीं भागणाऱ्या गरजांपुरतीच आहे, असें म्हणणें चुकीचें आहे. कोणतीहि गरज भागविण्यानें मनुष्याला मिळणारें समाधान अमूर्तच असतें. हा भाग सोडून दिला तरी मनुष्याच्या गरजांपैकीं कांहीं गरजा अमूर्त वस्तूंनींच भागत असतात. उदाहरणार्थ, संगीताची गरज. शिवाय मूर्तवस्तु देखील त्यांच्या मूर्तत्वामुळें अर्थशास्त्रांत संपत्ति समजल्या जात नाहींत तर विशिष्ट गरजा भागविण्यासाठीं त्यांचा उपयोग होऊं शकतो म्हणूनच त्यांना महत्त्व प्राप्त होतें. अशा परिस्थितींत मूर्त शब्दावर भर देऊन अर्थशास्त्राची व्याप्ति सांगणें अर्थशास्त्राच्या स्वरूपाची यथायोग्य कल्पना देण्याच्या दृष्टीनें रास्त नाहीं.[६]

(२) **अर्थशास्त्राचा विषय मानवी जीवनाचा एक भाग नसून त्याची एक बाजू आहे** :—अर्थशास्त्राकडून मानवी जीवनाच्या एका भागाचा अभ्यास केला जातो असें म्हणण्यापेक्षां एका अंगाचा विचार केला जातो, असें म्हणणें अधिक सयुक्तिक आहे. मनुष्याच्या जीवनाचे आर्थिक जीवन, राजकीय जीवन अशा प्रकारचे भाग पाडतां येत नाहींत. मनुष्याच्या प्रत्येक कृतीला विविध बाजू असतात. त्यांतील आर्थिक बाजूचा म्हणजे आर्थिक प्रश्नाशीं संबंधित असलेल्या बाजचा अभ्यास करणें

[५] By itself the multiplicity of ends has no necessary interest for the economist—Nor is the mere limitation of means by itself sufficient to give rise to economic phenomena. If means of satisfaction have no alternative use, then they may be scarce but they cannot be economised—Nor again is the alternative applicability of scarce means a complete condition of the kind of phenomena we are analysing—

When time and means of achieving ends are limited and capable of alternative application, and the ends are capable of being distinguished in order of importance, then behaviour necessarily assumes the form of choice. Every act which involves time and scarce means for the achievement of one end involves the relinquishment of their use for the achievement of another. It has an economic aspect—**Robbins**

हें अर्थशास्त्राचें कार्य असतें. मनुष्याच्या प्रत्येक कृतीला आर्थिक बाजू असते, ह्याचें कारण असें सांगतां येईल कीं, प्रत्येक कृतींत उत्पादन-साधनांचा वापर विशिष्ट प्रकारें केला जात असतो. उत्पादन-साधनांचा एका प्रकारें वापर होण्यास अनेक पर्याय असतात. विशिष्ट प्रकारें उत्पादन-साधनांचा वापर करण्यानें इतर सर्व पर्याय गमवावे लागतात. म्हणजेच मनुष्याच्या प्रत्येक कृतीला जशी जमेची बाजू--मिळणारें समाधान ही जमा--असते तशी खर्चाची बाजू--पर्याय गमविल्यानें होणारें नुकसान हा खर्च--असते. ह्या दोन्ही बाजूंचा साकल्यानें विचार करूनच कोणताहि निर्णय मनुष्याकडून घेतला जावा असें अपेक्षित असतें. अर्थशास्त्र हा मानवी जीवनाच्या विशिष्ट भागाचा अभ्यास आहे, असें म्हणणारे अर्थशास्त्रज्ञ मनुष्य जेव्हां अर्थार्जनाचें काम करीत असतो तेव्हांचे त्याचें जीवनच विचारांत घ्यावयास तयार असतात. पण इतर वेळेचें त्याचें जीवन--उदाहरणार्थ, विश्रांतीचा काळ--विचारांत घ्यावयाची त्यांची तयारी नसतें, हें अशास्त्रीय आहे. कारण ह्या वृत्तीमुळें कोणत्याहि मनुष्याला कोणते काम करावें, हें ठरविण्यापूर्वी काम करावें कीं न करावें हा प्राथमिक निर्णय घ्यावाच लागतो.[७] ह्या गोष्टीची योग्य ती दखल घेतली जात नाहीं. हा निर्णय अर्थशास्त्राशीं संबंधित नाहीं, असें म्हणून चालावयाचें नाहीं; कारण विश्रांतीपासून होणारें आर्थिक नुकसान व विश्रांतीचें महत्त्व ह्यांचें तौलनिक मूल्यमापन करूनच हा निर्णय घ्यावयाचा असतो. सारांश, साधनांच्या कमतरतेमुळें व प्रत्येक गोष्टींत कोणत्या ना कोणत्या स्वरूपाच्या--काळ, पैसा, श्रम इत्यादि--साधनांचा वापर अपरिहार्य असल्यामुळें प्रत्येक गोष्टीला आर्थिक बाजू असते व तिचा विचार केला गेल्यामुळें मनुष्याच्या वर्तनावर जो परिणाम होतो त्याचा अभ्यास अर्थशास्त्राकडून अपेक्षित आहे. असें असल्यास अर्थशास्त्राची जुनी वर्गीकरणात्मक व्याख्या सोडून नवी विश्लेषक व्याख्या ठरविणें सर्व दृष्टीनें हितावह ठरेल.[८]

(३) **अर्थशास्त्राची अतिविस्तृत व्याप्ति** :--अर्थशास्त्र हें मानवी जीवनाच्या एका भागाचा अभ्यास नसून एका अंगाचा विचार आहे हें मानल्यास अर्थशास्त्राची व्याप्ति फारच वाढून एक प्रकारें सबंध मानवी जीवन अर्थशास्त्राच्या कक्षेंत येतें. कारण मनुष्याच्या प्रत्येक कृतीला, प्रत्येक निर्णयाला पर्याय असतात, म्हणजेच

[६] It is not the materiality of even material means of gratification, which gives them their status as economic goods. It is their relationship to given wants rather than their technical substance which is significant. The materialist definition of economics therefore misrepresents the science as we know it. Even if it does not definitely mislead as to its scope, it necessarily fails to convey an adequate concept of its nature. There seems no valid argument against its rejection--**Robbins**

[७] There is still an economic problem of deciding between the 'economic' and the 'non-economic.'—**Robbins**

आर्थिक बाजू असते.[९] एका अर्थानें मात्र अर्थशास्त्राची व्याप्ति संकुचित होते.
कारण मानवी कल्याणाचा विचार अर्थशास्त्रांतून संपूर्णपणें वगळला जातो.

(४) **कल्याण-विचार अर्थशास्त्रांत अप्रस्तुत** :--कल्याणाच्या विचाराला अर्थ-
शास्त्रांत स्थान देतां येत नाहीं. देणें उचित होणार नाहीं. मर्यादित साधनांचा
अमर्यादित साध्यांशीं मेळ घालण्याच्या मनुष्याच्या प्रयत्नांचा अर्थशास्त्राकडून अभ्यास
केला जातो. ज्या साध्याशीं साधनांचा मेळ घालावयाचा असतो तीं साध्यें इष्ट
कीं अनिष्ट, ह्या प्रश्नाशीं अर्थशास्त्राला कांहींच कर्तव्य नाहीं. साध्यांच्या बाबतींत
अर्थशास्त्राला मत नसतें. साध्यांच्या बाबतींत अर्थशास्त्राचीवृत्ति तटस्थपणाची असते.[१०]

(५) **कल्याण विचाराला स्थान दिल्यास अर्थशास्त्राचें शास्त्रीयत्व नष्ट
होईल** :--साध्यांबाबत अर्थशास्त्राला अनुकूल वा प्रतिकूल मतप्रदर्शन करण्याचें
कांहीं एक प्रयोजन नसतें. साध्यांच्या इष्टानिष्टतेचा किंवा कल्याण-अकल्याणाचा
विचार अर्थशास्त्रानें न करणेंच योग्य आहे. कारण कोणत्याहि साध्याची इष्टा-
निष्टता मापण्याची कोणतीहि खात्रीची कसोटी उपलब्ध नाहीं. तसेंच साध्यां-
बाबत एकमत कधींच होऊं शकणार नाहीं. अशा परिस्थितींत साध्यांचा अभ्यास

---

[८] The couception we have rejected, the conception of
economics as the study of causes of material welfare, was what may
be called a classificatory conception. It marks off certain
kinds of human behaviour, behaviour directed to the procuring
of material welfare and designates those as the subject-matter
of economics. The conception we have adopted may be described
as analytical. It does not attempt to pick out certain kinds of
behaviour, but focusses attention on a perticular aspect of be-
haviour, the form imposed by the influence of scarcity—**Robbins**

[९] Any kind of human behaviour falls within the scope of
economic generalisations--In so far as—(an) activity involves
the relinquishment of other desired alternatives, it has its economic
aspect. There are no limitations on the subject matter of economics
save this—**Robbins**

[१०] Economics is entirely neutral between ends—Economics
is not concerned with ends as such--To speak of any end as
being itself economic is entirely misleading—The economist is
not concerned with ends as such. He is concerned with the way
in which the attainment of ends is limited. The ends may be
noble or they may be base. They may be material or immaterial
—If ends can be so described. But if the attainment of one set
of ends involves the sacrifice of others, it has an economic aspect
—Economics cannot pronounce on the ultimate judgements of
value—**Robbins**

अर्थशास्त्रांत अंतर्भूत करावयाचें ठरविल्यास अर्थशास्त्राला शास्त्राचें स्वरूप कधींच प्राप्त होणार नाही.[११] अर्थशास्त्र ही विविध व परस्परविरोधी विचारांची गल्लत होऊन बसेल. उदाहरणार्थ, आर्थिक विषमता इष्ट कीं अनिष्ट, ह्या वादांत निर्णायक मत देणें अर्थशास्त्राला कसें शक्य आहे? तसें मत देण्यास कोणता आधार आहे? संपत्तीचें वांटप सम झाल्यामुळें श्रीमंतांकडील कांहीं संपत्ति कमी होऊन ती गरिबांकडे येईल, एवढें अर्थशास्त्राला सांगतां येईल. त्यामुळें श्रीमंतांना मिळणाऱ्या एकंदर समाधानांत कांहीं घट होऊन गरिबांना मिळणाऱ्या समाधानांत वाढ होईल हेंहि अर्थशास्त्राला दाखवितां येईल. येथपावेतों ज्या गोष्टी मापनीय व सिद्ध करतां येण्याजोग्या आहेत त्यांच्याशींच अर्थशास्त्राचा संबंध येतो. पण ह्याच्या पलीकडे जाऊन आर्थिक समता प्रस्थापित झाल्यास समाजाच्या कल्याणांत भर पडेल असें अर्थशास्त्राला कसें सांगतां येईल?

तसें सांगावयाचें झाल्यास श्रीमंतांच्या समाधानांत होणारी घट गरिबांच्या समाधानांत होणाऱ्या वाढीपेक्षां कमी असते असें अर्थशास्त्रास निश्चयानें सांगतां आलें पाहिजे. तसें सांगतां येत नाहीं. कारण त्या ठिकाणीं वेगवेगळ्या व्यक्तींच्या समाधानाची तुलना (Inter-personal comparison of utility) करण्याचा प्रश्न उद्भवतो. समाधान हें मुळांतच मापनीय नसतें; पण प्रत्येक व्यक्ति आपल्या मानसिक क्रियांशीं परिचित असल्यानें आपल्याला मिळणाऱ्या समाधानाचा अजमास घेऊन आपल्यापुरतें इष्टानिष्ट काय तें ठरवूं शकते असें गृहीत धरण्यास कोणतीच हरकत नाहीं. पण दोन व्यक्तींना स्वतंत्रपणें मिळणाऱ्या मूलतः (Subjective) असलेल्या समाधानाची वस्तुनिष्ठ (Objective) पद्धतीनें तुलना करून त्यासंबंधांत कोणाचें समाधान अधिक अशा स्वरूपाचा निर्णय घेणें तिसऱ्या व्यक्तीला कसें शक्य आहे. आणि तें शक्य न झालें तर आर्थिक समता समाजकल्याणास पोषक असते असें म्हणण्यास काय आधार आहे? अशा परिस्थितींत आर्थिक समता व आर्थिक विषमता ह्यांच्या इष्टनिष्टतेबाबत मतप्रदर्शन करणें अर्थशास्त्राच्या दृष्टीनें उचित नाहीं. आर्थिक समतेचे व आर्थिक विषमतेचे साध्यें व साधनें ह्यांच्या परस्परसंबंधांवर काय परिणाम होतात—म्हणजेच एकंदर समाजावर आर्थिक स्वरूपाचे काय परिणाम होतात—एवढ्यापुरतीच अर्थशास्त्राची व्याप्ति मर्यादित करणें रास्त आहे. आर्थिक विषमता कमी झाल्यास लोकांना शिल्लक

[११] Differences may arise either as a result of differences about ends or as a result of differences about the means of attaining ends. Now as regards the first type of difference, neither economics, nor any other science can provide a solvent—But if we disagree about means, then scientific analysis can often help us to resolve our differences—It is worth while eliminating the neutral area of science from the more disputable area of moral and political philosophy—**Robbins.**

टाकणें कठिण होतें आणि त्यामुळें भांडवल-संचय व भांडवल-वृद्धि ह्या अर्थक्रियांच्या मार्गांत अडथळा निर्माण होतो, असें अर्थशास्त्राला म्हणतां येईल किंवा आर्थिक समतेमुळें उपभोग वस्तूंवरील--विशेषतः आवश्यक वस्तूंवरील--खर्च वाढून त्यांचें उत्पादन वाढविणारा प्रवाह अर्थव्यवस्थेंत दिसूं लागेल, अशा अर्थाचें विधान अर्थ-शास्त्रांत खपून जाईल, पण आर्थिक समतनें कल्याणवृद्धि होईल असें म्हणणें अशास्त्रीय ठरेल.

इतर साध्यांबाबत हीच परिस्थिति आहे. एकंदर उत्पादन वाढणें इष्ट असें तरी अर्थशास्त्राला म्हणतां येईल काय? नाहीं. कारण साधी रहाणी चांगली कीं रहाणीमानांत सतत वाढ करणें चांगलें, हाहि शेवटीं जीवनमूल्यांचाच प्रश्न आहे. ह्यांतील कोणतें जीवनमूल्य चांगलें हें अर्थशास्त्र कसें सांगूं शकेल? शिवाय एकंदर उत्पादन वाढविलें पाहिजे असें म्हणण्याला कांहींच अर्थ नाहीं. उत्पादन वाढवावयाचें झाल्यास कोणत्या वस्तूंचें उत्पादन वाढवावयाचें हा प्रश्न उपस्थित झाल्याशिवाय रहात नाहीं. **कोणत्या वस्तूंचें उत्पादन इष्ट व कोणत्या वस्तूंचें अनिष्ट, हें ठरविण्याची वस्तुनिष्ठ कसोटी उपलब्ध नाहीं.** त्यामुळें आर्थिक नियोजन इष्ट असें अर्थशास्त्राला निश्चयानें म्हणतां यावयाचें नाहीं. नियोजनाधिष्ठित अर्थव्यवस्थेंतील आर्थिक निर्णयावर नियोजनाचा आराखडा ज्यांच्याकडून केला जातो त्यांच्या जीवन-मूल्यांची छाप पडणें अटळ आहे. कोणत्याहि नियोजनाच्या आराखड्यामुळें कल्याण-वृद्धि होते असें म्हणावयाचें असल्यास त्या नियोजनामुळें कांहीं व्यक्तींचा होणारा लाभ व कांहीं व्यक्तींची होणारी हानि ह्यांची तुलना करतां आली पाहिजे. तसें करण्याची कोणतीहि शास्त्रसंमत पद्धति उपलब्ध नाहीं. अशा परिस्थितींत समाजकल्याण कशांत आहे, हें ठरवितां येणें अशक्य आहे. तेव्हां तथाकथित समाजहित साधण्याची ग्वाही देणारे कोणतेहि सामाजिक निर्णय कांहीं लोकांनीं इतरांवर लादलेले असेच असतात ह्यांत संशय नाहीं.[१२]

सारांश, साध्यांची इष्टानिष्टता व साध्यांपासून होणारें कल्याण-अकल्याण हा शास्त्रीय अभ्यासाचा विषय होऊं शकत नाहीं. कोणत्याही समाजाचीं साध्यें गृहीत धरून व साधनांची उपलब्धता व गुणवत्तता लक्षांत घेऊन त्यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न कसा केला जातो, ह्याचा वस्तुनिष्ठ पद्धतीनें अभ्यास करणें, एवढेंच अर्थ-शास्त्राचें कार्य आहे.[१३] अर्थशास्त्रांत जेव्हां समतोलाची परिस्थिति कोणती, हें सांगितले जातें तेव्हां त्या परिस्थितीबद्दल चांगलें किंवा वाईट मत त्यांत अभिप्रेत नसतें. **समतोल म्हणजे केवळ समतोल**; चांगला किंवा वाईट समतोल नव्हे.[१४]

---

[१२] If we exclude the possibility of interpersonal comparison of utility, then the only method of passing from individual tastes to social preferences which will be satisfactory and which will be defined for a wide range of sets of individual orderings are either imposed or dictatorial.—**Arrow**

(६) **अर्थशास्त्राच्या सिद्धान्ताचें स्वरूप** :—साधनांच्या कमतरतेचा विविध परिस्थितींत होणारा आविष्कार हा अर्थशास्त्राचा वर्ण्य विषय असल्यानें अर्थशास्त्रांत दोन प्रकारचे सिद्धान्त आढळतात. अर्थशास्त्राचे कांहीं सिद्धान्त स्वयंसिद्ध व स्थल-काल-निरपेक्ष अशा परिस्थितीचे परिणाम दर्शविणारे असतात. त्यामुळें अर्थव्यवस्थेचें स्वरूप कांहींहि असो, ते लागू पडतात.[१५] उदाहरणार्थ, कोणतीहि गरज सतत भागवूं लागलें असतां केव्हांतरी ती पूर्ण नष्ट होणें अपरिहार्य आहे. ह्या नेहमींच्या अनुभवावर घटत्या उपभोग्यतेचा सिद्धान्त आधारलेला आहे. तसेंच उत्पादनाचीं विविध साधनें परस्परांचा पूर्ण पर्याय कधींच होऊं शकत नाहींत, ह्या स्वयंसिद्ध गोष्टीवर घटत्या फळाचा सिद्धान्त आधारलेला आहे.[१६] अशा प्रकारचे सिद्धान्त हे स्वयंसिद्धच असल्यानें व दैनंदिन अनुभवांत त्यांची प्रचीति हरघडीं येत असल्यानें त्यांचा खरेखोटेपणा पडताळण्यासाठीं वेगळ्या प्रायोगिक पुराव्याची आवश्यकता नसते.[१७] अर्थशास्त्रांतील इतर सिद्धान्तांत स्वयंसिद्ध गोष्टींखेरीज विशिष्ट प्रकारची परिस्थिति गृहीत धरलेली असते. त्या परिस्थितींत आर्थिक प्रश्नाचा आविष्कार कशा प्रकारें होईल, हें सांगणें हें त्या सिद्धान्ताचें कार्य असतें. हे सिद्धान्त चूक आहेत कीं अचूक आहेत हा तर्कशास्त्राच्या तत्त्वांचा प्रश्न असतो. तर्कशास्त्रमान्य अनुमान-पद्धति योग्य प्रकारें वापरलेली असल्यास या सिद्धान्ताच्या प्रतिपादनांत चूक होण्याचें कारण नसतें. स्पर्धेंत किंवा मक्तेदारींत मूल्यनिश्चिति कशी होते, तसेंच अनियोजित, नियंत्रित किंवा नियोजित अर्थव्यवस्थेंत साधनांचें वांटप कोणत्या तत्त्वांवर होतें,

---

[१३] The subject matter of economics is essentially a series of relationship between ends conceived as the possible objectives of conduct on the one hand and the technical and social environment on the other. Ends as such do not form part of this subject matter. Nor does the technical and social environment. It is the relationship between these things and not the things in themselves which are important for the economist —**Robbins**.

[१४] There is no penumbra of approbation round the theory of equilibrium. Equilibrium is just equilibrium—**Robbins**

[१५] The propositions of economic theory, like all scientific theory, are obviously deductions from a series of postulates. And the chief of these postulates are all assumptions involving in some way simple and indisputable facts of experience relating to the way in which the scarcity of goods which is the subject matter of our study shows itself in the world of reality—**Robbins**

[१६] The Law of Diminishing Returns is simply one way of putting the obvious fact that different factors of production are imperfect substitutes for one another—**Robbins**

ह्यासंबंधींचे सिद्धान्त हे अशा प्रकारचे सिद्धान्त म्हणतां येतील. ह्या सिद्धान्तांचा व्यवहारांत उपयोग करण्यापूर्वीं त्यांत गृहीत धरलेली परिस्थिति प्रत्यक्षांत आहे कीं नाहीं, हें काळजीपूर्वक पारखून घ्यावें लागतें.[१८]

(७) **अर्थशास्त्राची उपयुक्तता** :—साध्यांच्या इष्टानिष्टतेचा म्हणजे कल्याण-अकल्याणाचा विचार अर्थशास्त्रांतून काढून टाकल्यानें अर्थशास्त्राची उपयुक्तता कमी होत नाहीं, उलट ती वाढते. कल्याण-अकल्याणाचा निर्णय शास्त्रीय व वस्तुनिष्ठ कसोटचा लावून घेतां येत नसल्यामुळें तो विचार अर्थशास्त्रांत अंतर्भूत झाल्यानें अर्थशास्त्राला भोंगळ स्वरूप प्राप्त होण्याचा व त्यामुळें अर्थ-शास्त्राची उपयुक्तता कमी होण्याचा धोका असतो; पण कल्याण-अकल्याणाचा विचार अर्थशास्त्रांतून दूर करून विविध साध्यें गृहीत धरून त्यांचे परिणाम काय होतात, हें अर्थशास्त्रांत स्पष्ट केलें गेल्यासच साध्यांची अचूक निवड करण्याच्या दृष्टीनें अर्थशास्त्राकडून मनुष्याला बहुमोल मदत होईल. कारण कोणत्याहि गोष्टीच्या परिणामांची जाणीव होणें हें निर्णय घेण्याच्या दृष्टीनें आवश्यक असते.[१९] उदाहरणार्थ, भांडवलशाही चांगली कीं वाईट, ह्याबद्दल मत-प्रदर्शन न करतां भांडवलशाही व समाजवाद ह्यांच्या उत्पादन, विभाजन व उपभोग ह्या अर्थक्रियांवर होणाऱ्या परिणामांची इष्ट कल्पना अर्थशास्त्राला आली तर अर्थशास्त्र उपयुक्त होऊं शकतें. कारण त्या परिणामांची जाणीव झाल्यासच विशिष्ट अर्थव्यवस्थेची डोळसपणें निवड करणें समाजाला शक्य होतें. तसेंच साध्यांपैकीं कांहीं साध्यें जात्याच परस्परविरोधी असतात आणि तीं एकाच वेळीं साधणें शक्यच नसतें. परिणामांची वास्तव कल्पना नसल्यास कोणतीं साध्यें परस्पर-विरोधीं आहेत, हें चटकन उमजत नाहीं; पण अर्थशास्त्रानें ती कल्पना दिल्यास

---

[१७] We do not need controlled experiments to establish their validity. They are so much the stuff of our everyday experience that they have only to be stated to be recognised as obvious. They are applicable wherever and whenever the conditions which give rise to economic phenomena are present.

[१८] The truth of generalisations of this kind depends on their logical consistency. " Their applicability to the interpretation of any particular situation depends upon the existence in that situation of the elements postulated. "—**Robbins**

[१९] Economics provides 'No norms which are binding in practice. It is incapable of deciding as between the desirability of different ends. It is fundamentally distinct from ethics. Wherein then, does its unquestionable significance consists ? Surely it consists in just this that when we are faced with a choice between ultimates, it enables us to choose with full awareness of the implications of what we are choosing—**Robbins.**

परस्परविरोधी साध्यांचा हव्यास टाळला जातो.[२०] अर्थशास्त्राची आणखी एक उपयुक्तता सांगण्याजोगी आहे. साध्यें व साधनें ह्यासंबंधींची माहिती मिळाल्यास उपलब्ध साधनांचा जास्तींत जास्त उपयोग करून साध्यें जास्तींत जास्त प्रमाणांत कशीं साधतां येतील, ह्यासंबंधीं मार्गदर्शन करणें अर्थशास्त्राच्या लक्षण रेषेंत बसतें. उदाहरणार्थ, अप्रगत देशांच्या आर्थिक विकासासाठीं काय करावें लागेल किंवा आर्थिक विषमता कमी करण्यासाठीं कोणते उपाय योजावे लागतील, हें अर्थशास्त्राच्या अभ्यासानें समजूं शकेल.

अर्थशास्त्राच्या उपयुक्ततेच्या मर्यादा :—अर्थशास्त्राच्या सिद्धान्ताचा उपयोग करतांना एक गोष्ट लक्षांत ठेवणें अत्यावश्यक आहे. ती ही कीं, अर्थशास्त्राचे बहुतेक सिद्धान्त परिस्थिति-सापेक्ष असतात. अर्थातच परिस्थितीनुसार त्यांत बदल होत असतो. त्यामुळें ते सिद्धान्त परिस्थितीचा पुरता अभ्यास केल्याशिवाय वापरणें अतिशय धोक्याचें असतें. प्रत्यक्ष परिस्थितीचा काळजीपूर्वक अभ्यास करून तार-तम्यानें त्यांचा वापर करणें हेंच हितावह ठरतें. हा इशारा देणें अगत्याचें आहे. कारण तात्त्विक सिद्धान्ताचा वापर करतांना कोणतेंहि शास्त्र कितीहि गहन असलें तरी प्रत्यक्ष जीवन त्याहीपेक्षां गहन आणि अथांग आहे. त्यामुळें शास्त्रीय सिद्धान्तांत—विशेषत: सामाजिक शास्त्रांच्या सिद्धान्तांत—अपूर्णता असण्याचा संभव असतो ही गोष्ट विसरली जाते.[२१]

कल्याणाचें अर्थशास्त्र (Economics of Welfare) :—कल्याणाचा विचार अर्थशास्त्रांत अप्रस्तुत आहे, ह्या प्रा. राबिन्स ह्यांच्या विचारामुळें अर्थशास्त्राला एक आव्हानच मिळाल्यासारखें झालें आहे. कारण प्रा. राबिन्स ह्यांची विचारसरणी ग्राह्य धरल्यास कोणत्याहि आर्थिक नीतीचा पुरस्कार करणें अर्थशास्त्रास सामान्यत: कठीणच होऊन बसते. कारण प्रत्येक आर्थिक नीतीमध्यें कोणतें ना कोणतें तरी जीवनमूल्य अभिप्रेत आहे, असें प्रा. राबिन्स व त्यांचे अनुयायी म्हणणारच. रॉबिन्स ह्यांच्या विचारामुळें जें आव्हान मिळालें आहे त्यांतून अर्थशास्त्र व कल्याण ह्यांच्या परस्परसंबंधाची फेरतपासणी होऊं लागली आहे. आर्थिककल्याणाची

[२०] "It makes it possible for us to select a system of ends which are mutually consistent with each other—It enables us to see what sets of ends are compatiable with each other and what are not and upon what conditions such compatibility is dependent"—**Robbins**.

[२१] Theory is always simpler than reality.—**Viner**

The theory of economics does not furnish a body of settled conclusions immediately applicable to policy. It is a method rather than a doctrine, an apparatus of the mind, a technique of thinking, which helps its possessor to draw correct conclusions —**Keynes.**

व्याख्या करून तें कसें वाढू शकेल ह्याविषयीं विचार करणें हा कल्याणाच्या अर्थशास्त्राचा उद्देश असतो. कल्याणाच्या अर्थशास्त्राचा अभ्यास करणाऱ्यांना विश्वास वाटत असतो म्हणूनच ते ह्या अभ्यासास प्रवृत्त झालेले असतात.[२२] निराळ्या शब्दांत, कोणत्याहि शास्त्राचा अभ्यास शेवटीं समाजोपयोगी ठरला तरच त्या शास्त्राच्या अभ्यासाला महत्त्व प्राप्त होतें. हें जाणून आपल्या शास्त्राच्या अभ्यासांतून निघणाऱ्या सिद्धान्तांचा मार्गदर्शक म्हणून उपयोग कसा होईल, ही दृष्टि अर्थशास्त्रज्ञांनीं बाळगणें अत्यावश्यक आहे. ह्या सनातन अर्थशास्त्रज्ञांच्या दृष्टिकोनाचें व कीन्स-मार्क्स ह्या अर्थशास्त्रज्ञांनीं मान्य केलेल्या दृष्टिकोनाचें कल्याणाच्या अर्थशास्त्रांत पुनरुज्जीवन झालें आहे, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.[२३] कल्याणाच्या अर्थशास्त्राची पुनर्मांडणी अधिक शास्त्रशुद्धरीत्या होऊं लागली आहे. कल्याणाच्या अर्थशास्त्रांतील नवे विचारप्रवाह अजून परिपक्व अवस्थेप्रत आले आहेत असें म्हणतां येणार नाहीं. म्हणून त्यांचा विशेष विस्तार न करतां त्या विचाराची स्थूल रूपरेखाच फक्त दिली आहे.

कल्याणाच्या अर्थशास्त्राची रूपरेखा :—कल्याण हा शब्द नुसताच वापरला तर त्या शब्दाच्या अर्थाला निश्चितता देणें कठिण आहे. कारण कल्याण कशांत आहे, ह्याबद्दल मतभेद होण्याचा व त्या मतभेदांची बैठक विविध जीवनमूल्यांवर आधारलेली असण्याचा संभव आहे. पण आर्थिक कल्याण ह्या शब्दप्रयोगाला नेमका अर्थ देणें कठिण नाहीं आणि तसा तो देतां आला तर आर्थिक कल्याणाचा साध्य म्हणून अर्थशास्त्रानें पुरस्कार करणें ह्यांत अयोग्य कांहीं आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. मात्र आर्थिक कल्याणाची जी कोणती व्याख्या स्वीकारली जाईल ती विशिष्ट जीवनमूल्यापासून अलिप्त असली पाहिजे. आर्थिक कल्याण संख्यात्मक

---

२२ Welfare economics is concerned to investigate the dominant influences through which the economic welfare of the world, or of a particular country is likely to be increased. The hope of those who pursue it is to suggest the lines of action—or non-action—on the part of the State or of private persons that might foster such influences.—**Pigou**

२३ If it were not for the hope that a scientific study of men's social action may lead, not necessarily directly or immediately, but at sometime and in same way, to practical results in social improvement, not a few students of those actions would regard the time devoted to their study as time mis-spent. That is true of all social sciences but especially true of economics—If this conception of the motive behind economic study is accepted, it follows that the type of science that the economist will endeavour to develop must be one adopted to form the basis of an art.—**Pigou**

व म्हणून मापनीय तरी असलें पाहिजे किंवा वस्तुनिष्ठ कसोटचा लावून तें ठरवतां आलें पाहिजे.

उत्पादन-रोजगारांत वाढ इष्ट :—वरील पद्धतीनें विचार करून, **उत्पादनांत वाढ हें आर्थिक कल्याणांत वृद्धि झाल्याचें गमक मानलें जातें.** उत्पादन-क्षमतेंत वाढ होऊन एकंदर वास्तव उत्पादनांत वाढ झाल्यास कोणाचाहि तोटा न होतां प्रत्येकाचा थोडाबहुत लाभ होऊं शकतो, निदान कोणाचाहि तोटा न होतां कांहीं लोकांना तरी लाभ होऊं शकतो. दुसऱ्या कोणत्याहि माणसाचा तोटा न होतां एकाला जरी लाभ झाला तरी त्यांत एकंदर समाजाचा फायदा झाला, असें म्हणण्यास संख्यात्मक दृष्टचा काय हरकत आहे? असें म्हणण्यांत दोन व्यक्तींच्या समाधानाची तुलना करण्याचा प्रश्न—ज्या प्रश्नामुळें रॉबिन्स ह्यांनीं कल्याणाचें अर्थशास्त्र अशास्त्रीय ठरविलें तो प्रश्न—उद्भवतच नाहीं. कारण कोणाचेंहि समाधान कमी न होतां कांहींचें समाधान वाढत असतें. तेव्हां ज्या धोरणामुळें एकंदर उत्पादनांत वाढ होते—म्हणजे कोणत्याहि वस्तूंचें उत्पादन कमी न होतां कांहीं वस्तूंच्या उत्पादनांत वाढ होते—त्या धोरणाचा अर्थ-शास्त्रानें व अर्थशास्त्रज्ञांनीं उजळ माथ्यानें पुरस्कार करण्यांत कांहींहि चूक नाहीं.[२४] उदाहरणार्थ, पूर्ण रोजगाराचा पुरस्कार अर्थशास्त्रज्ञाला केवळ एक विचारवंत व्यक्ति म्हणून नव्हे तर अर्थशास्त्रज्ञ ह्या नात्यानें करतां येतो. कारण पूर्ण रोजगारामुळें कोणाचेंहि काम न जातां बेकारांना काम मिळतें आणि निकामीं पडलेलीं उत्पादन-साधनें वापरलीं गेल्यामुळें कोणत्याहि वस्तूंचें उत्पादन कमी न होतां कांहीं वस्तूंच्या उत्पादनांत वाढ होऊं शकते.

आर्थिक समता इष्ट :—त्याचप्रमाणें घटत्या उपभोगप्रवृत्तीचा कीन्सप्रणीत सिद्धान्तहि ह्या बाबतींत महत्त्वाचा आहे. ह्या सिद्धान्ताचा अर्थ असा होऊं शकेल कीं, व्यक्तींचें उत्पन्न जसें वाढत जातें तसें उपभोगाच्या दृष्टीनें उत्पादनाचें महत्त्व कमी होत जातें. हें मानल्यास उत्पादनांतील विषमता कमी करणें इष्ट आहे, असें म्हणतां येतें. म्हणजेच उत्पन्नांतील विषमता कमी करण्याच्या धोरणाचा पुरस्कार अशर्थास्त्राला मानवता-वादाच्या भूमिकेवरच नाहीं तर अर्थशास्त्राच्या भूमिकेवरून करतां येतो. विशेषतः आर्थिक विषमता कमी करण्यानें जर रोजगारांत

[२४] In all cases, where a certain policy leads to an increase in physical productivity, and thus of aggregate real income, the economist's case for the policy is quite unaffected by the comparibility of individual satisfactions; since in all such cases, it is possible to make everybody better off than before, or at any rate to make some people better off without making anybody worse off—There is no interpersonal comparison of satisfaction involved in judging any policy designed to increase the sum total of wealth just because any such policy could be carried out in a way as to secure unanimous consent.—**Kaldor**

वाढ व उत्पादनांत वाढ होण्याची शक्यता असेल तर त्या पुरस्काराला शुद्ध आर्थिक स्वरूप प्राप्त होतें.

व्यक्तींच्या मूलभूत प्रवृत्ति एकसारख्या :––शिवाय वेगवेगळ्या व्यक्तींच्या समाधानाची तुलना करतां आली नाहीं तरी सर्व व्यक्ती अनेक महत्त्वाच्या गोष्टींच्या बाबतींत सारख्या असतात, असें मानवसमाजाचा विविध सामाजिक शास्त्रांनीं जो अभ्यास केला आहे त्यावरून सिद्ध झालें आहे. तेव्हां जें एका व्यक्तीच्या बाबतींत खरें आहे तेंच सर्वांच्या बाबतींत बऱ्याच प्रमाणांत खरें असतें असें गृहीत धरून त्यापासून अनुमानें काढलीं तर सहसा चूक होत नाहीं. उदाहरणार्थ, कोणतीहि व्यक्ति आपल्या गरजांबाबत निर्णय घेतांना आवश्यक वस्तूंना सर्वांत अधिक महत्त्व देते, त्यानंतर आरामवस्तूंचा क्रम लागतो व सर्वांत शेवटीं विलास-वस्तूंना स्थान दिलें जातें, असें दिसून येतें. ह्यावरून असा निष्कर्ष काढला कीं, आवश्यक वस्तूंपासून व्यक्तीला सर्वांत अधिक समाधान मिळतें आणि त्यानंतर आरामवस्तु व विलासवस्तु ह्यांपासून उतरत्या क्रमानें समाधान मिळतें; तर त्यांत चूक तें काय? तसेंच हाच निष्कर्ष सर्व व्यक्तींना लागू केला तर तें व्यवहाराला सोडून होईल असें वाटत नाहीं. हा निष्कर्ष सर्वांना लागू केल्यास आर्थिक समतेचें समर्थन आपोआपच होतें. कारण ज्या वस्तु प्रत्येकाच्या दृष्टीनें सर्वांत महत्त्वाच्या असतात त्या सर्वांना मिळतील, अशी व्यवस्था समाजकल्याण साधणारी आहे असें अनुमान त्या निष्कर्षावरून ओघानेंच निघतें. जें मापनीय आहे तेवढ्यालाच शास्त्रांत स्थान मिळालें पाहिजे, हा रॉबिन्स ह्यांचा आग्रह सदोष आहे. शास्त्राच्या अभ्यासाच्या व शास्त्रीय सिद्धान्त काढण्याच्या अनेक पद्धति असतात. त्यांतील कोणती पद्धत कोणत्या ठिकाणीं उपयुक्त, हें तारतम्यानेंच ठरविलें पाहिजे. प्रत्येक सिद्धान्त मापनीयतेच्या कसोटीला उतरलाच पाहिजे, हा आग्रह रास्त नाहीं. कोणत्याहि समाजांतील व्यक्तींच्या मूलभूत प्रवृत्ति एकसारख्याच असतात, हें इतर शास्त्रांच्या अभ्यासानें सिद्ध झालेलें असल्यामुळें अर्थशास्त्रानें तें ग्राह्य धरण्यास कोणतीहि हरकत नाहीं.[२५] सारांश, वेगवेगळ्या व्यक्तींच्या समाधानाची तुलना करतां येत नाहीं हें खरें आहे; पण त्या गोष्टींचा नसता बाऊ करण्यांत अर्थ नाहीं.

कल्याणाच्या अर्थशास्त्राच्या मर्यादा :––कल्याणाच्या अर्थशास्त्राची वाढ कोणत्या दिशेनें होत आहे, ह्याची वर केवळ रूपरेखा दिली आहे. अर्थात् एक गोष्ट स्पष्टपणें व आग्रहानें सांगितलीच पाहिजे. तीं ही की, कल्याणाच्या

---

[२५] In many features that are comparable by objective tests (people) are on the average pretty much alike––On this basis we are entitled, I submit, to infer by anglogy, that they are probably pretty much alike in other respects also. In all practical affairs we act on that supposition. We cannot prove that it is true. But we do not need to do so.––**Pigou**

अर्थशास्त्राला कितीहि शास्त्रशुद्ध स्वरूप प्राप्त झालें तरी अन्तिम जीवनमूल्यें अर्थशास्त्राच्या कक्षेंत येणार नाहींत. विशिष्ट जीवनमूल्यांचा पुरस्कार करण्याचा अधिकार अर्थशास्त्राला नाहीं, कदापि मिळावयाचा नाहीं. तो नाहीं म्हणून अर्थशास्त्राला किंवा अर्थशास्त्रज्ञाला कमीपणा वाटावा असें त्यांत कांहीं नाहीं. कारण अर्थशास्त्रालाच काय **कोणत्याहि शास्त्राला**—मग तें कितीहि प्रगल्भ झालेलें असो वा नसो—नाही. जीवनमूल्यें हीं ज्याची त्यानेंच ठरवावयाचीं असतात. शास्त्रांचें त्यांत फक्त मार्गदर्शन होऊं शकतें. तेव्हां कल्याणाचें अर्थशास्त्र सुद्धां आर्थिक कल्याण कशास म्हणावे, ह्याचा अर्थ स्पष्ट करून असुक गोष्ट आर्थिक दृष्टचा हितकर व अमुक नाहीं, एवढेंच सांगतें. ती गोष्ट मानवानें स्वीकारलीच पाहिजे असा आग्रह धरूं शकत नाहीं. हा मुद्दा स्पष्ट होण्यासाठीं आरोग्य शास्त्रज्ञाच्या कार्याचा दाखला देतां येईल. आरोग्याच्या दृष्टीनें काय हितकर व काय अहितकर हें सांगण्याचा आरोग्यशास्त्रज्ञाला निश्चित अधिकार आहे. निराळ्या शब्दांत, आरोग्य हें आरोग्यशास्त्राचें साध्य मानण्यास हरकत नाहीं. पण म्हणून आरोग्य हेंच प्रत्येकानें आपलें जीवनमूल्य मानलें पाहिजे, असा आग्रह आरोग्यशास्त्रज्ञाला कसा धरतां येईल ? इतर जीवनमूल्यांच्या प्रभावामुळें कोणी आपल्या आरोग्याची हेळसांड जाणून-बुजून करीत असल्यास हा प्रश्न ज्याच्या त्याच्या जीवनमूल्यांचा आहे, असें म्हणून सोडून द्यावा लागेल. अर्थशास्त्राचें नेमकें असेंच आहे. आर्थिकदृष्टचा कल्याणकारक गोष्टी कोणत्या हें सांगण्यापलीकडे कल्याणाच्या अर्थशास्त्राला जाता येत नाहीं. पण प्रा. रॉबिन्स ह्यांच्या भूमिकेचें स्पष्टीकरण करीत असतां सांगितल्याप्रमाणें अर्थशास्त्राची उपयुक्तता कमी न होतां उलट वाढते. कारण जीवनमूल्यें ठरविण्याचा अधिकार शास्त्रज्ञांना नसला तरीहि विविध शास्त्रांतील विचारांचा प्रभाव जीवनमूल्यावर व जीवनपद्धतीवर अपरिहार्यपणें पडतो, असाच आजपर्यंतचा जगाचा अनुभव सांगतो. अर्थशास्त्र ह्या अनुभवाला मुळींच अपवाद नाहीं. [२६] ह्याकरितां जातिवंत शास्त्रज्ञ आपले विचार प्रकट करतांना अतिशय दक्षता घेत असतो. असो. कल्याणाच्या अर्थशास्त्राच्या मर्यादा व महत्त्व ओळखणें ह्यांतच अर्थशास्त्राचें कल्याण आहे.

प्रमुख संदर्भग्रंथ

(1) Robbins—The Nature and Significance of Economic Science.
(2) Pigou—The Economics of Welfare.
(3) Little—A Critique of Welfare Economics.
(4) Myint—Theories of Welfare Economics.
(5) Arrow—Social Choice and Individual Values.

[२६] The ideas of economists and political philosophers, both when they are right and when they are wrong are more powerful than is commonly understood.—**Keynes**

महत्त्वाचे पारिभाषिक शब्द

[टीप :—कंसांतील आंकडा जेथें शब्द प्रथम वापरला आहे तो पृष्ठांक दर्शवितो.]

A

Abstinence–उपभोग निग्रह (१६८)
Administrative Unit–कारभार केन्द्र (७९)
Aggregate Income–समस्त उत्पन्न (२४२)
,, Expenditure– ,, खर्च (२४२)
,, Production–समस्त उत्पादन (२४६)
,, Employment–समस्त रोजगार (२४८)
Average Cost–उत्पादन खर्च (२८)
,, Revenue–सरासरी प्राप्ति (२८)
,, Revenue Curve–सरासरी प्राप्तीची कमान (३६)

B

Bargaining Power–सौदा शक्ति (१२९)
Business Inventories–व्यापारी सांठे (२०९)

C

Cheap Money Policy-अल्पव्याज नीति (१८२)
Classical–सनातन (४४)
Collective Bargaining–सांघिक सौदा, सांघिक वाटाघाटी (१३९)
Competition–Perfect–पूर्ण स्पर्धा (१४)
,, Imperfect–अपूर्ण स्पर्धा (१९)
Combination of Goods-वस्तू समूह (४६)
Consumer's Sovereignty–उपभोक्त्यांचें सार्वभौमत्व (१२)
Conciliation–मध्यस्थी (१५९)
Consumption Expenditure–उपभोग खर्च (२१६)

D

Demand Curve-मागणीची कमान(३६)
Diminishing Cost (Law of)–घटत्या खर्चाचा सिद्धान्त (३०)
Diminishing Return (Law of)–घटत्या फळाचा सिद्धान्त (३०, ६२)
Disintegration–विसंयोग (९२)
Dividend–लाभांश

E

Economic Condition–अर्थ स्थिति (२१३)
Economic Inequality–आर्थिक विषमता (२२०)
,, Iconomic Institution–अर्थ संस्था (२२०)
Economic Insecurity–आर्थिक असुरक्षितता (२५१)
Economic Discontent–आर्थिक असंतोष (२५१)
Economic Fluctuations–आर्थिक आंदोलनें (२५१)
Economic Forces–अर्थप्रवाह
Economic System–अर्थव्यवस्था (६)
Economic Policy–अर्थनीति
Economic Behaviour–आर्थिक वर्तन (६)

Economic Motive—अर्थप्रेरणा (७)
,, Activity—अर्थक्रिया (१२)
Economies—काटकसर (६५)
Economic Monopoly—आर्थिक मक्तेदारी (११२)
Economic Welfare—आर्थिक कल्याण (११६)
Economic Security—आर्थिक सुरक्षितता (१४८)
Elasticity—लवचिकता (१६)
Employment—रोजगार
Equilibrium—समतोल (३४)
,, of Consumption—उपभोगाचा समतोल (५०)
Equilibrium
,, of Full Employment—पूर्ण रोजगाराचा समतोल (२४५)
,, of Under Employment—अपूर्ण रोजगाराचा समतोल (२४५)
Equilibrium Rate of Interest—व्याजाचा समतोल दर (१६७)
Ex—Ante—घटनापूर्व (२४४)
Ex—Post—घटनापश्चात (२४४)
Exploitation—शोषण (१२९)
Expanding Economy—विकासशील अर्थव्यवस्था (१४५)

F

Factor Units—घटकभाग (१९०)
Final Product—अंतिम वस्तु (२०३)
Finance—अर्थपुरवठा (२३९)
Firm—उद्योग-संस्था (६८)
Freedom of Consumption—उपभोगस्वातंत्र्य (७)
Freedom of Production—उत्पादनस्वातंत्र्य (७)
Frictional Unemployment—घर्षणी बेकारी (१६२)
Full Employment—पूर्णरोजगार (१६१)

G

Goodwill—प्रस्थापित ख्याति

H

Horizontal Combination—समसंयोग

I

Income From Work—श्रमजन्य उत्पन्न (२१३)
Income From Property—मालमत्ताजन्य उत्पन्न (२१३)
Income Personal—व्यक्तिगत उत्पन्न (२१४)
Increasing Return (Law of)—वाढत्या फळाचा सिद्धान्त (३०, ६२)
Increasing Cost (Law of)—वाढत्या खर्चाचा सिद्धान्त (३०)
Industrial Relations—औद्योगिक संबंध (१५७)
Industrial Disputes—औद्योगिक कलह (१५७)
Industrial Dispute Settlement Act—औद्योगिक कलह निवारण कायदा (१६०)
Indifference—समवृत्ती (४६)
Indifference Curve-समवृत्तीची कमान
Indivisibility—अविभाज्यता (६६)
Industry—उद्योगधंदा (६८)
Industrial Efficiency—औद्योगिक कार्यक्षमता (११७)
Industrial Peace—औद्योगिक शांतता (१५६)

Inequality of Opportunity–समान संधीचा अभाव
Infinite–अमाप (२४)
Immobile–गतिशून्य (१००)
Imperfect Competition–अपूर्ण स्पर्धा (१९)
Innovation–नाविन्य (१९५)
Integration of Processes–उत्पादन प्रक्रियांचा संयोग (७२)
Integration–संयोग
Internal Economies–अन्तर्गत काटकसर (६२)
Intramarginal Land-सीमापूर्व जमीन (१८५)
Investment–भांडवल-गुंतवण (२१६)
Involuntary Unemployment–नाखुषीची बेकारी (१६१)

L

Laissez Faire Policy–निर्हस्तक्षेप नीति (२५२)
Land–निसर्गसाधनें (६७)
Laws of Returns–उत्पादन फल सिद्धान्त (६२)
Legal Monopoly–विधिसिद्ध मक्तेदारी (१११)
Living Wage–जीवन-वेतन (१४२)
Liquidity Preference–रोकड प्राधान्य प्रवृत्ति (१७१)
Loanable Funds–कर्जाऊ रक्कम (१७१)
Long Period Equilibrium Value–दीर्घकालीन समतोल मूल्य (३४)
Long Period Cost–दीर्घकालीन उत्पादन-खर्च (५८)

M

Management–व्यवस्थापन (६७)
Marginal Land–सीमान्त-जमीन (१८५)
Marginal Productivity–सीमान्त-उत्पादन-क्षमता (१२५)
Marginal Productivity Theory of Wages–सीमान्त-उत्पादन-क्षमता सिद्धान्त (१२७)
Marginal Efficiency of Capital–भांडवलाची सीमान्त-फल-क्षमता (१८०)
Marginal Productivity of Capital-भांडवलाची सीमान्त-उत्पादन-क्षमता (१८०)
Marginal Satisfaction–सीमान्त-समाधान (९)
Marginal Cost–सीमान्त-खर्च (२७)
Marginal Revenue–सीमान्त-प्राप्ति (२७)
Marginal Unit–सीमान्त-परिमाण (२७)
Marginal Product–सीमान्त-उत्पादन (२७)
Marginal Rate of Substitution–सीमान्त-पर्याय प्रमाण (४६)
Marginal Revenue Curve–सीमान्त-प्राप्तीची कमान (३५)
Marginal Cost Curve–सीमान्त खर्चाची कमान (३५)
Market–बाजारपेठ (१४)

Means–साधनें (१)
Mediation–मध्यस्थी (१५९)
Minimum Wages–किमानवेतन(१४४)
Mixed Economy–मिश्र अर्थव्यवस्था (२०७)
Mobility–गतिसौकर्य (१००)
Monopoly–ग्राहक मक्तेदारी, ग्राहकीय मक्तेदारी (१२८), (१३२)
Money Market–कर्जरोख्यांचा बाजार (१६७)
Money Capital–चलनी-भांडवल (१८१)
Monopoly–Perfect–पूर्ण मक्तेदारी (१८)
Monopoly-Economic–आर्थिक मक्तेदारी (११२)
Monopolistic Competition–मक्तेदारी युक्त स्पर्धा (१९)
Monopoly-Legal–विधिसिद्ध मक्तेदारी

N

Natural Monopoly–नैसर्गिक मक्तेदारी (११०)
National Income–राष्ट्रीय उत्पन्न (२०३)
No Rent Land–बिनखंडाची जमीन (१८५)
Normal Profit–साधारण नफा (२८)

O

Optimum Scale of Production–पर्याप्त उत्पादन प्रमाण (३४)
Optimum Population–पर्याप्त लोकसंख्या
Optimum Production–पर्याप्त उत्पादन (६८)
Optimum Firm–पर्याप्त-उद्योगसंस्था (६९)
Optimum Technical Unit–पर्याप्त तांत्रिक उत्पादन-प्रमाण (७०)
Optimum Managerial Unit–पर्याप्त व्यवस्थापन प्रमाण
Optimum Marketing Unit–पर्याप्त क्रय-विक्रय प्रमाण (७९)
Optimum Financial Unit–भांडवल दृष्टचा पर्याप्त-उत्पादन प्रमाण (८५)
Optimum Survival Unit–पर्याप्त निर्धास्त उत्पादन-प्रमाण (८९)
Output–उत्पत्ति (१)
Overhead Cost–वरखर्च (१०६)
Overpopulation–अतिलोकसंख्या
Overproduction–अत्युत्पादन (२४६)

P

Pension–निवृत्ति वेतन (२१२)
Perfect Competition–पूर्ण स्पर्धा (१४)
Perfect Substitute–पूर्ण पर्याय वस्तु (१७)
Perfect Monopoly–पूर्ण मक्तेदारी (१८)
Planned Economy–नियोजित अर्थव्यवस्था (६)
Plant–साधनसामग्री (५९)
Precautionary Motive–दक्षता हेतु (१७३)
Price Level–किमतीमान, भावमान (१७३)

Profit-Windfall–अस्मानी अथवा अकल्पित नफा (१९६)
Private Sector–खाजगी क्षेत्र (२०७)
Production–Primary–प्राथमिक उत्पादन (२०७)
,, Secondary– दुय्यम उत्पादन (२०८)
,, Tertiary–सहाय्यक उत्पादन (२०८)
Private Property–खाजगी मालकी (७)
Price Mechanism–मूल्य यंत्रणा, किंमतीची यंत्रणा (८)
Price Discrimination-मूल्यभेद (३९)
Propensity to Consume–उपभोग-प्रवृत्ति (८)
Product Differentiation-विक्रय वस्तूंतील गुणभेद (१५)
Processing Cost–संस्करणखर्च (९९)
Productivity–उत्पादन क्षमता (१२५)
,, Marginal–सीमान्त उत्पादन क्षमता (१२५)
Production Goods–भांडवल वस्तू (२१०)
Proletariate–श्रमजीवी (२१९)
Private Property–खाजगी मालमत्ता (२२०)
Public Sector–सरकारी क्षेत्र (२०७)
Public Utilities–सार्वजनिक उपभोग वस्तु (११७)

R

Rationalisation–शास्त्रशुद्ध पुनर्रचना (१०२)
Regional Decentralisation-प्रादेशिक विकेन्द्रीकरण (७९)
Residual Income–अवशिष्ट अथवा उर्वरित उत्पन्न (१९७)

S

Saving–बचत, शिल्लक
Scientific Management–शास्त्राधिष्ठित व्यवस्थापन (१०३)
Seasonal Unemployment–हंगामी बेकारी (१६२)
Selling Cost–विक्री खर्च (२५)
Services–कामगिरी, (१)
Speculative Motive–सट्टेबाजीचा हेतु (१७३)
Specialisation–विशेषीकरण (६५)
Stages of Production–उत्पादन टप्पे
Stagnated Economy–विकासशून्य अर्थव्यवस्था (१५०)
Social Assistance–सामाजिक सहाय्य (१५०)
Substitute–Perfect–पूर्ण पर्याय वस्तु (१७)
Substitution Effect–पर्याय वस्तु वापराचा परिणाम (५२)
Substitute–पर्याय (५४)
Surplus–वाढावा (१८३)

T

Time Preference–वर्तमान प्राधान्य (१७०)
Transport Cost–वाहतुक खर्च (९४)
Transactions Motive–व्यवहार हेतु (१७२)

Transfer Earnings-उपयोगान्तर मूल्य (१८८)

,, Payments–उचली देणीं (२१२)

U

Under Employment–अपूर्ण रोजगार

Unemployment–Frictional–घर्षणी बेकारी (१६२)

,, Seasonal–हंगामी बेकारी (१६२)

Unearned Income–अनर्जित उत्पन्न (१९९)

Unplanned Economy–अनियोजित अर्थव्यवस्था (६)

V

Value of Marginal Product–सीमान्त उत्पादन मूल्य (१२५)

Variable Cost–बदलता उत्पादन खर्च (५९)

Vertical Combination–ऊर्ध्वसंयोग (११५)

Voluntary Unemployment-खुषीची बेकारी (१३१)

W

Wages : Subsistence Theory of–किमान चरितार्थ सिद्धान्त (१३४)

,, : minimum-किमान वेतन (१४४)

Waiting–उपभोग प्रतिक्षा (१६८)